| (६७) | " महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित, मुंबई (महानंद दुग्धशाळा) यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वैधानिक लेखा परिक्षण अहवाल " | २७ डिसेंबर २०२२ |
| (६८) | " गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल " | २७ डिसेंबर २०२२ |
| (६९) | " कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा एकतीसावा वार्षिक अहवाल " | २७ डिसेंबर २०२२ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| (७०) | " शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा विसावा वार्षिक " | २७ डिसेंबर २०२२ |
| (७१) | " महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक हिशोब " | २७ डिसेंबर २०२२ |
| (७२) | " महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा सत्तावन्नावा वार्षिक अहवाल " | २७ डिसेंबर २०२२ |
| (७३) | " महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचे सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक अहवाल " | २७ डिसेंबर २०२२ |
| (७४) | " मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा चोपन्नावा वार्षिक अहवाल " | २७ डिसेंबर २०२२ |
| (७५) | " विदर्भ विकास महामंडळ मर्यादित, नागपूर यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचा एकावन्नावा वार्षिक अहवाल " | २७ डिसेंबर २०२२ |
| (७६) | " संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा २०१८-२०१९ या वर्षाचा पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल " | २८ डिसेंबर २०२२ |
| (७७) | " महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांचे सन २०१६-२०१७ व सन २०१७-२०१८ या वर्षांचे वार्षिक अहवाल " | २८ डिसेंबर २०२२ |
| (७८) | " महाराष्ट्र मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित (महामेट्रो) यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल " | २८ डिसेंबर २०२२ |
| (७९) | " मुंबई रेल्वे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल " | २८ डिसेंबर २०२२ |
| (८०) | " मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल " | २८ डिसेंबर २०२२ |
| (८१) | " डी.वाय.पाटील कृषी व तंत्र विद्यापीठ, तळसंदे कोल्हापूर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल " | २८ डिसेंबर २०२२ |
| (८२) | " सोमय्या विद्याविहार विद्यापीठ, मुंबई यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल " | २८ डिसेंबर २०२२ |
| (८३) | " एमआयटी आर्ट, डिझाईन ॲण्ड टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटी, पुणे यांचे सन २०१६-२०१७ ते सन २०२० २०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल " | २८ डिसेंबर २०२२ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| (८४) | “ संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर यांचे सन २०१७-२०१८, २०१८-२०१९, २०१९-२०२० व २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल ” | २८ डिसेंबर २०२२ |
| (८५) | “ विश्वकर्मा विद्यापीठ, पुणे यांचे सन २०१७-२०१८ ते सन २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल ” | २८ डिसेंबर २०२२ |
| (८६) | “ कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचा सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल व वार्षिक हिशोब पत्रके ” | २८ डिसेंबर २०२२ |

## सन २०२२ तृतीय (हिवाळी) अधिवेशन

## महाराष्ट्र विधानमंडळ समित्यांचे सभागृहास सादर करण्यात आलेले अहवाल

| अ.क्र. | विषय | विधानपरिषदेत ठेवण्यात आलेला दिनांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| (१) | विधानपरिषदेच्या सन २०२२ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ ते दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत मा. मंत्री महोदयांनी विधानपरिषद सभागृहात दिलेल्या एकूण ६६ आश्वासनांची यादी तसेच, सन २०२२ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, पूर्तता करण्यात आलेल्या एकूण ९४ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह. | २१ डिसेंबर, २०२२ |
| (२) | विधानपरिषद सदस्य अनुपस्थिती समिती (२०२१-२०२२) चा दुसरा अहवाल. | २७ डिसेंबर, २०२२ |
| (३) | विधानपरिषद विनंती अर्ज समितीचा अहवाल. | २८ डिसेंबर, २०२२ |

## विवरण क्रमांक - १

बैठकींचे दिनांक व वेळ

| अ.क्र. | बैठकीचा दिनांक | बैठकीची वेळ पासून पर्यंत | एकूण वेळ तास | | मिनिटे |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | | |
| १. | सोमवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२२ | दुपारी १२-०० ते दुपारी १२-४५ | ०० | - | ४५ |
| २. | मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०२२ | दुपारी १२-०० ते दुपारी १२-०८ | ०० | - | ०८ |
| | | दुपारी १२-२३ ते दुपारी १२-५९ | ०० | - | ३६ |
| ३. | बुधवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२२ | सकाळी ११-०० ते दुपारी १२-०५ | ०१ | - | ०५ |
| | | दुपारी १२-१० ते दुपारी ०१-२९ | ०१ | - | १९ |
| | | दुपारी ०२-३० ते दुपारी ०२-३९ | ०० | - | ०९ |
| | | दुपारी ०२-५४ ते दुपारी ०३-०० | ०० | - | ०६ |
| | | दुपारी ०३-१५ ते रात्री ०७-११ | ०३ | - | ५६ |
| ४. | गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२ | सकाळी ११-०० ते सकाळी ११-४६ | ०० | - | ४६ |
| | | दुपारी १२-०० ते दुपारी ०१-१३ | ०१ | - | १३ |
| | | दुपारी ०१-१८ ते दुपारी ०१-२० | ०० | - | ०२ |
| | | दुपारी ०२-२० ते दुपारी ०२-२४ | ०० | - | ०४ |
| | | दुपारी ०२-५४ ते दुपारी ०३-०१ | ०० | - | ०७ |
| | | दुपारी ०४-०१ ते दुपारी ०४-०५ | ०० | - | ०४ |
| | | दुपारी ०४-२० ते दुपारी ०४-२४ | ०० | - | ०४ |
| ५. | शुक्रवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२२ | सकाळी १०.३० ते दुपारी १२.०१ | ०१ | - | ३१ |
| | | दुपारी १२.१५ ते दुपारी १२.२६ | ०० | - | ११ |
| | | दुपारी १२.५६ ते ते दुपारी १२.५९ | ०० | - | ०३ |
| - | शनिवार, दिनांक २४ डिसेंबर, २०२२ | – | – | - | – |
| - | रविवार, दिनांक २५ डिसेंबर, २०२२ | – | – | - | – |
| ६. | सोमवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२२ | सकाळी ११-०० ते सकाळी ११-४७ | ०० | - | ४७ |
| | | दुपारी १२-०५ ते दुपारी ०२-२२ | ०२ | - | १७ |
| ७. | मंगळवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२२ | सकाळी १०.३० ते सकाळी ११.४७ | ०१ | - | १७ |
| | | दुपारी १२.०० ते दुपारी ०२.०१ | ०२ | - | ०१ |
| | | दुपारी ०२.४० ते दुपारी ०२.५८ | ०० | - | १८ |
| | | दुपारी ०३.०३ ते सायं. ०५.३२ | ०२ | - | २९ |

| (१) | (२) | (३) | (४) | | |
|---|---|---|---|---|---|
| ८. | बुधवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२२ | सकाळी ११-०० ते सकाळी ११-४५ | ०० | - | ४५ |
| | | दुपारी १२-०० ते दुपारी ०२-०५ | ०२ | - | ०५ |
| | | दुपारी ०२.५५ ते सायं. ०४.५२ | ०१ | - | ५७ |
| | | सायं. ०५.०२ ते सायं. ०५.०४ | ०० | - | ०२ |
| | | सायं. ०५.१४ ते रात्री. ०९.०१ | ०३ | - | ४७ |
| ९. | गुरुवार, दिनांक २९ डिसेंबर, २०२२ | सकाळी १०-०० ते सकाळी ११-४६ | ०१ | - | ४६ |
| | | दुपारी १२-०० ते दुपारी १२-५२ | ०० | - | ५२ |
| | | दुपारी १२-५७ ते दुपारी ०२-३० | ०१ | - | ३३ |
| | | दुपारी ०३-०० ते सायं. ०७-४३ | ०४ | - | ४३ |
| ५. | शुक्रवार, दिनांक ३० डिसेंबर, २०२२ | सकाळी १०-०० ते सकाळी ११-४६ | ०१ | - | ४६ |
| | | दुपारी १२-०० ते दुपारी ०१-२१ | ०१ | - | २१ |
| | | दुपारी ०२-०० ते दुपारी ०३-५५ | ०१ | - | ५५ |
| | | दुपारी ०४-०० ते दुपारी ०४-०१ | ०० | - | ०१ |
| | | दुपारी ०४-१६ ते सायं. ०७-१६ | ०३ | - | ०० |
| | **एकूण : सेहेचाळीस तास एक्कावन्न मिनिटे फक्त** | | **४६** | **-** | **५१** |

## विवरण क्रमांक -२

(अ) नवनिर्वाचित सदस्यांची शपथ / प्रतिज्ञा ग्रहण करणारे सदस्य

| अ.क्र. (१) | सदस्यांचे नाव (२) | शपथ घेतल्याचा दिनांक (३) |
|---|---|---|
| | निरंक | |

(ब) सभागृह नेता संदर्भातील घोषणा - म.वि.प. २ (जे-१)

| अ.क्र. (१) | नेत्यांचे नाव (२) | दिनांक (३) |
|---|---|---|
| | निरंक | |

(क) नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय

| अ.क्र. (१) | सदस्यांचे नाव (२) | परिचयाचा दिनांक (३) |
|---|---|---|
| | निरंक | |

(ड) मंत्री / राज्यमंत्री यांचा परिचय

| अ.क्र. (१) | सदस्यांचे नाव (२) | परिचयाचा दिनांक (३) |
|---|---|---|
| | मंत्री | |
| | निरंक | |
| | राज्यमंत्री | |
| | निरंक | |

विवरण क्रमांक - ३

**विधानपरिषदेचे (हिवाळी) अधिवेशन २०२२**

दिनांक १९ ते ३० डिसेंबर, २०२२

महाराष्ट्र विधानपरिषद सदस्यांच्या उपस्थितीचे दिवस व बैठकीच्या एकंदर दिवसांची टक्केवारी

(मा.उप सभापती, विरोधी पक्षनेता व्यतिरिक्त)

एकूण बैठकांची संख्या - १०

| अ.क्र | वार व दिनांक | एकूण सदस्य संख्या | उपस्थिती संख्या | अनुपस्थितीची संख्या | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| (१) | सोमवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२२ | ५७ | ४२ | १३ | ७३.६८% |
| (२) | मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०२२ | ५७ | ४५ | १० | ७८.९४% |
| (३) | बुधवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२२ | ५७ | ४७ | ८ | ८२.४५% |
| (४) | गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२ | ५७ | ४५ | १० | ७८.९४% |
| (५) | शुक्रवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२२ | ५७ | ३८ | १७ | ६६.६६% |
| (६) | सोमवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२२ | ५७ | ४४ | ११ | ७७.१९% |
| (७) | मंगळवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२२ | ५७ | ४८ | ७ | ८४.२१% |
| (८) | बुधवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२२ | ५७ | ४८ | ७ | ८४.२१% |
| (९) | गुरुवार, दिनांक २९ डिसेंबर, २०२२ | ५७ | ४८ | ७ | ८४.२१% |
| (१०) | शुक्रवार, दिनांक ३० डिसेंबर, २०२२ | ५७ | ३५ | २० | ६१.४०% |

मा. सदस्यांची अधिवेशनातील उपस्थिती व अनुपस्थितीबाबत संबंधीताकडून वाचून घेतले असून त्यात सुधारणा केल्याप्रमाणे  सुधारणा करून घेण्यात यावा.

विवरण क्रमांक - ४

**विधानपरिषदेचे (हिवाळी) अधिवेशन २०२२**

दिनांक १९ ते ३० डिसेंबर, २०२२

महाराष्ट्र विधानपरिषद सदस्यांच्या उपस्थितीचे दिवस व बैठकीच्या एकंदर दिवसांची टक्केवारी

(मा.उप सभापती, विरोधी पक्षनेता व्यतिरिक्त)

एकूण बैठकांची संख्या – १०

| अ.क्र | सदस्याचे नाव | उपस्थिती | अनुपस्थितीची | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| (१) | असगावकर, श्री. जयंत दिनकर | ०८ | ०२ | ८०% |
| (२) | अहिर, श्री. सचिन मोहन | १० | ०० | १००% |
| (३) | आंबटकर, डॉ. रामदास भगवानजी | १० | ०० | १००% |
| (४) | कराड, श्री. रमेश काशिराम | ०८ | ०२ | ८०% |
| (५) | कायंदे, डॉ. मनीषा शामसुंदर | ०६ | ०४ | ६०% |
| (६) | काळे, श्री. विक्रम वसंतराव | ०७ | ०३ | ७०% |
| (७) | खडसे, श्री. एकनाथराव गणपतराव | ०९ | ०१ | ९०% |
| (८) | खापरे, श्रीमती उमा गिरीष | १० | ०० | १००% |
| (९) | खंडेलवाल, श्री.वसंत मदनलाल | १० | ०० | १००% |
| (१०) | गाणार, श्री.नागोराव पुंडलिक | ०६ | ०४ | ६०% |
| (११) | गिरकर, श्री.विजय ऊर्फ भाई विठ्ठल | ०० | १० | ००% |
| (१२) | गोऱ्हे, डॉ.नीलम दिवाकर | | मा.उप सभापती | |
| (१३) | चव्हाण, श्री.सतीश भानुदासराव | ०९ | ०१ | ९०% |
| (१४) | जगताप, श्री.अशोक अर्जुनराव ऊर्फ भाई | ०२ | ०८ | २०% |
| (१५) | जानकर, श्री.महादेव जगन्नाथ | १० | ०० | १००% |
| (१६) | ठाकरे, श्री.उध्दव बाळासाहेब | ०५ | ०५ | ५०% |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| (१७) | डावखरे, श्री.निरंजन वसंत | १० | ०० | १००% |
| (१८) | तटकरे, श्री.अनिकेत सुनिल | ०८ | ०२ | ८०% |
| (१९) | तांबे, डॉ.सुधीर भास्करराव | ०५ | ०५ | ५०% |
| (२०) | दटके, श्री.प्रविण प्रभाकरराव | १० | ०० | १००% |
| (२१) | दराडे, श्री.किशोर भिकाजी | ०९ | ०१ | ९०% |
| (२२) | दराडे, श्री.नरेंद्र भिकाजी | १० | ०० | १००% |
| (२३) | दरेकर, श्री.प्रविण यशवंत | ०८ | ०२ | ८०% |
| (२४) | दानवे, श्री.अंबादास एकनाथराव | | मा.विरोधी पक्षनेता | |
| (२५) | दुर्राणी, श्री.अब्दुल्ला खान ए.लतिफ खान | ०५ | ०५ | ५०% |
| (२६) | धस, श्री.सुरेश रामचंद्र | १० | ०० | १००% |
| (२७) | नाईक, श्री.नीलय मधुकर | १० | ०० | १००% |
| (२८) | नाईक-निंबाळकर, श्री.रामराजे प्रतापसिंह | ०९ | ०१ | ९०% |
| (२९) | पटेल, श्री.अमरिशभाई रसिकलाल | ०२ | ०८ | २०% |
| (३०) | पडळकर, श्री.गोपीचंद कुंडलिक | १० | ०० | १००% |
| (३१) | परब, ॲड.अनिल दत्तात्रय | ०९ | ०१ | ९०% |
| (३२) | पाडवी, श्री.आमश्या फुलजी | ०९ | ०१ | ९०% |
| (३३) | पाटील, श्री.कपिल हरिश्चंद्र | ०७ | ०३ | ७०% |
| (३४) | पाटील, श्री.जयंत प्रभाकर | १० | ०० | १००% |
| (३५) | पाटील, श्री.बाळाराम दत्तात्रय | ०३ | ०७ | ३०% |
| (३६) | पाटील, डॉ.रणजीत विठ्ठलराव | ०७ | ०३ | ७०% |
| (३७) | पाटील, श्री.रमेशदादा | ०९ | ०१ | ९०% |
| (३८) | पाटील, श्री.रामराव बालाजीराव | ०९ | ०१ | ९०% |
| (३९) | पाटील, श्री.सतेज ऊर्फ बंटी डी. | ०३ | ०७ | ३०% |
| (४०) | पोटे-पाटील, श्री.प्रविण रामचंद्रजी | १० | ०० | १००% |
| (४१) | पोतनिस, श्री.विलास विनायक | १० | ०० | १००% |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| (४२) | बाजोरीया, श्री.विप्लव गोपीकिसन | ०७ | ०३ | ७०% |
| (४३) | बावनकुळे, श्री.चंद्रशेखर कृष्णरावजी | ०५ | ०५ | ५०% |
| (४४) | भारतीय, श्री.श्रीकांत पंडीतराव | १० | ०० | १००% |
| (४५) | मिर्झा, डॉ.वजाहत मिर्झा अथर | ०९ | ०१ | ९०% |
| (४६) | मिटकरी, श्री.अमोल रामकृष्ण | १० | ०० | १००% |
| (४७) | मोहिते-पाटील, श्री.रणजितसिंह विजयसिंह | १० | ०० | १००% |
| (४८) | राठोड, श्री.राजेश धोंडीराम | १० | ०० | १००% |
| (४९) | लाड, श्री.अरुण गणपती | १० | ०० | १००% |
| (५०) | लाड, श्री.प्रसाद मिनेश | ०९ | ०१ | ९०% |
| (५१) | वंजारी, श्री.अभिजीत गोविंदराव | १० | ०० | १००% |
| (५२) | शिंदे, प्रा.राम शंकर | १० | ०० | १००% |
| (५३) | शिंदे, श्री.शशिकांत जयवंतराव | ०८ | ०२ | ८०% |
| (५४) | शिंदे, श्री.सुनिल गोविंद | १० | ०० | १००% |
| (५५) | सरनाईक, श्री.किरण रामराव | ०९ | ०१ | ९०% |
| (५६) | सातव, डॉ.प्रज्ञा राजीव | १० | ०० | १००% |
| (५७) | सिंह, श्री.राजहंस | १० | ०० | १००% |
| (५८) | रिक्त | | | |
| (५९) | रिक्त | | | |
| (६०) | रिक्त | | | |
| (६१) | रिक्त | | | |
| (६२) | रिक्त | | | |
| (६३) | रिक्त | | | |
| (६४) | रिक्त | | | |
| (६५) | रिक्त | | | |
| (६६) | रिक्त | | | |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| (६७) | रिक्त | | | |
| (६८) | रिक्त | | | |
| (६९) | रिक्त | | | |
| (७०) | रिक्त | | | |
| (७१) | रिक्त | | | |
| (७२) | रिक्त | | | |
| (७३) | रिक्त | | | |
| (७४) | रिक्त | | | |
| (७५) | रिक्त | | | |
| (७६) | रिक्त | | | |
| (७७) | रिक्त | | | |
| (७८) | रिक्त | | | |

विवरण क्रमांक - ५

## सन २०२२ च्या विधानपरिषदेच्या डिसेंबर मध्ये झालेल्या तिसऱ्या (हिवाळी) अधिवेशनातील दैनंदिन कार्यवाहिचा संक्षिप्त अहवाल

### सोमवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२२

विधानपरिषदेची बैठक नागपूर येथील विधानपरिषदेच्या सभागृहात दुपारी १२-०० वाजता माननीय उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**अधिवेशनाचा शुभारंभ " वंदे मातरम् " या गीताच्या समूह गायनाने झाला.**

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी, " महाराष्ट्र एकीकरण समितीने बेळगाव येथे मराठी बांधवांच्या मेळाव्याचे आयोजन करणे. तथापि, महाराष्ट्रातील नेत्यांना कर्नाटकात येण्यावर बंदी घालण्याचे निदेश बेळगावच्या जिल्हाधिकाऱ्याकडून देण्यात येणे." इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात श्री. शशिकांत शिंदे, श्री. अभिजीत वंजारी, श्री. जयंत प्र. पाटील यांनी आपापले मत व्यक्त केले.

उप मुख्यमंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

**१. (१) बंदरे व खनिकर्म मंत्र्यांनी, (क) सन २०२२ चा अध्यादेश क्रमांक १२** - मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२२ आणि (ख) सन २०२२ चा अध्यादेश क्रमांक ११ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२२ सभागृहाच्या पटलावर ठेवले.

**(२) उप मुख्यमंत्र्यांनी, सन २०२२ चा अध्यादेश क्रमांक १०** - महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश, २०२२ सभागृहाच्या पटलावर ठेवला.

**(३) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२२ चा अध्यादेश क्रमांक १३** - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२२ सभागृहाच्या पटलावर ठेवला.

**(४) ग्रामविकास मंत्र्यांनी, सन २०२२ चा अध्यादेश क्रमांक ९** - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (तिसरी सुधारणा) अध्यादेश, २०२२ सभागृहाच्या पटलावर ठेवला.

**२.** उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी, सन २०२२-२०२३ करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहास सादर केले व तसे करीत असताना भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०३ (३) आणि २०५ मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सन २०२२-२०२३ या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली आहे असे सांगितले.

सन २०२२-२०२३ मधील खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर झाले असून सदरहू विवरणपत्राच्या प्रती सन्माननीय सदस्यांसाठी राखून ठेवलेल्या टपालखणाद्वारे वितरीत करण्यात येत आहेत तसेच सदर प्रकाशन विधानमंडळाच्या *www.mls.org.in* या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

**३.** प्रधान सचिवांनी, माननीय राष्ट्रपतींची अधिसंमती मिळालेले एक वि.स. विधेयक व माननीय राज्यपालांची अधिसंमती मिळालेली १० वि.स. विधेयकांची नावे सभागृहात वाचून दाखविली.

**४.** माननीय उप सभापतींनी, महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम ८ (१) अन्वये खालील सदस्यांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित केले.

(१) ॲड. निरंजन डावखरे
(२) श्री. नरेंद्र दराडे
(३) श्री. अनिकेत तटकरे
(४) श्री. अभिजीत वंजारी

**पुरःस्थापनार्थ :—**

**उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.प.विधेयक क्रमांक ४** – जेएसपीएम विद्यापीठ, पुणे विधेयक, २०२२ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

**माननीय उप सभापतींनी खालील घोषणा केली —**

" आपणा सर्वांना विदित आहेच की, राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे दरवर्षी महाराष्ट्र विधिमंडळाच्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशन कालावधीत राज्यातील विद्यापीठांतील " राज्यशास्त्र व लोकप्रशासन " या विषयांचा अभ्यास करणाऱ्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी संसदीय अभ्यासवर्गाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार यावर्षी सुध्दा दिनांक २० ते २७ डिसेंबर, २०२२ या कालावधीत ४९ व्या संसदीय अभ्यासवर्गाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

सदर संसदीय अभ्यासवर्गाचे उद्घाटन माननीय मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते व सर्व मान्यवरांच्या सन्मान्य उपस्थितीत मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजी सकाळी ९.००० वाजता विधानपरिषद सभागृह, विधानभवन, नागपूर येथे होणार आहे. संसदीय अभ्यासवर्गासंबंधीची निमंत्रणपत्रिका व कार्यक्रमपत्रिका सर्व माननीय सदस्यांना त्यांचेसाठी राखून ठेवण्यात आलेल्या टपाल खणाद्वारे वितरित करण्यात आली आहे. तरी सर्व माननीय सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी संसदीय अभ्यासवर्गास उपस्थित राहून व्याख्यानांचा लाभ घ्यावा. "

**माननीय उपसभापतींनी खालील घोषणा केली**

" सर्व सन्माननीय सदस्यांना सूचित करण्यात येते की, आजपासून प्रारंभ झालेल्या नागपूर हिवाळी अधिवेशन, २०२२ साठी करण्यात आलेल्या विविध उपाययोजना, अधिवेशन दैनंदिनी, महत्त्वाच्या व्यक्तींचे दूरध्वनी, विविध बैठकांसंदर्भातील माहिती एका क्लिक वर उपलब्ध करून देण्यासाठी " महा असेंब्ली " हे ॲप कार्यान्वित करण्यात आले आहे. विशेष आनंदाची बाब म्हणजे हे ॲप नांदेड जिल्ह्यातील किनवट येथील सेटट्राईब ह्या आयटी कंपनीच्या ग्रामीण भागातील आदिवासी विद्यार्थ्यांनी तयार केले आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी या ॲपचा लाभा घ्यावा.

प्रा. राम शिंदे, वि.प.स. यांनी, " धनगर समाजाचा मोर्चा." इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाच्या वतीने सदर मोर्चाकडील निवेदने घेण्यासंबंधी व्यवस्था केली जाईल तसेच ही बाब सर्व मोर्चांच्या निमित्ताने देखील करण्यात येईल असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

**६.** माननीय उपसभापतींनी, सर्वश्री. सुरेश विठ्ठलराव पाटील, प्रभाकर अनंत संत व शांताराम पुंजाजी आहेर, माजी वि.प.स. यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवगंतांना श्रद्धांजली वाहिली.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला. प्रस्तावाची एक प्रत व विधिमंडळाचे स्मृतिपत्र शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

**मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०२२**

माननीय सभापतींनी प्रश्नोत्तरे पुकारली.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी, नागपूर सुधार प्रन्यासच्या भूखंडाबाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

याबाबत संसदीय कार्य मंत्री यांनी आपले मत मांडले.

ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनी याबाबत आपले म्हणणे मांडले.

सदरहू माहितीविषयक मुद्यावरून सभागृहात गोंधळसदृश वातावरण निर्माण झाल्यामुळे माननीय उप सभापतींनी सभागृहाची बैठक १५ मिनिटांकरिता स्थगित केली.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ०८ मिनिटांनी दुपारी १२ वाजून २३ मिनिटांपर्यंत स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून २३ मिनिटांनी पुन्हा सुरु झाली.

श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स. यांनी उक्त माहितीविषयक मुद्याबाबत आपले म्हणणे मांडले. सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी उक्त माहितीविषयक मुद्याबाबत विस्तृत खुलासा केला.

सदरहू माहितीविषयक मुद्यावरून सभागृहात पुन्हा गोंधळसदृश वातावरण निर्माण झाल्यामुळे माननीय उप सभापतींनी सभागृहाची बैठक दिवसभराकरिता स्थगित केली.

**बुधवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२२**

१) श्रीमती उमा खापरे व इतर वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्रीमती उमा खापरे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

" माटुंगा येथील मुंबई महानगर पालिकेच्या शाळेत वर्गातील विद्यार्थी डान्सच्या तासासाठी बाहेर जाताच आठवीत शिकणाऱ्या दोन विद्यार्थ्यांनी तेरा वर्षीय विद्यार्थिनीवर वर्गात लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ च्या पहिल्या आठवड्यामध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली असणे, या संदर्भात मुलीच्या तक्रारीवरून पोलिसांनी दोन विद्यार्थ्यांविरोधात गुन्हा नोंदवलेला असणे, त्याचप्रमाणे कल्याण स्टेशन परिसरातील जवळच्या सोसायटीत एका नववर्षाच्या मुलीचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडालेली असणे, या अल्पवयीन मुलीवर आधी बलात्कार करून नंतर तिची हत्या केल्याची प्राथमिक माहिती उघडकीस येणे, यासंदर्भात कल्याण पोलीस स्टेशनमध्ये

बलात्कार प्रकरणी गुन्ह्यांची नोंद करण्यात येणे, तसेच लहान वयात हाती आलेले मोबाईल व अश्लील व्हिडिओ सहज उपलब्ध होत असल्याने शरीरासंबंधीच्या विकृत दृष्टिकोन लहान वयातच मुलांमध्ये वाढत असणे यामुळे लहान अल्पवयीन मुले हिंसेचा व सूड घेण्याच्या प्रवृत्तीमुळे गुन्ह्याच्या विळख्यात अडकत असल्याचे मत मानसोपचार तज्ज्ञांनी व्यक्त केले असणे, त्यामुळे शाळा व शाळा परिसरात मोबाईल जामर लावण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे, त्यामुळे राज्यातील शाळकरी विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर झालेला असणे यासाठी शासनाने एक टास्क फोर्स नेमून शाळेतील विद्यार्थिनींना योग्य ते संरक्षण देण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना. ”

उप मुख्यमंत्र्यांनी, मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

२) श्री अभिजित वंजारी व इतर वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. अभिजित वंजारी, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले.

“ राज्यामध्ये फक्त विदर्भातील नागपूर आणि अमरावती विभागामध्ये इंग्रजांच्या काळापासून नझूल जमिनी भाडेपट्ट्यावर दिलेल्या असणे, नझूल भाडेपट्ट्याचे हस्तांतरण, व्यापारात बदल शर्ती भंग, नियमितीकरण इत्यादीकरिता अनअर्जीत रकमेचे दर हे वाजवीपेक्षा जास्त असून इतकी रक्कम शासनाकडे जमा करणे, सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर झालेले असणे, नागपुरातील धंतोली, रामदासपेठ आणि ज्या ज्या भागात नझूलच्या जमिनी आहेत, त्या ठिकाणी भाडेपट्टे नूतनीकरण न केल्याने जिल्हा कार्यालयातून दिनांक ३१ डिसेंबर २०२२ पर्यंत संबंधित रहिवाशांनी भाडेपट्टे नूतनीकरण न केल्यास त्या जप्त करण्याचे आदेश देणे, परिणामी सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असणे, यापूर्वीसुद्धा नागपूर विभागामध्ये भाडेपट्ट्याच्या नूतनीकरणामध्ये विलंब केल्यास आणि त्या अटी व शर्ती भंग केल्यास त्या पट्टेधारकाला दोन हजार प्रति स्क्वेअर फूट इतका दंड आकारला जात असणे आणि अशाप्रकारच्या कारवाईमुळे शासनाकडे हजारो कोटी रूपयांचा महसूल जमा होणे, परंतु राज्याच्या इतर विभागामध्ये नझूल भाडेपट्ट्यावर जमिनीच्या कायदा अस्तित्वात नसल्यामुळे तसेच स्वातंत्र्याच्या काळानंतर ब्रिटीशकालीन अनेक कायदे आपण रद्द केलेले नसणे, त्यामुळे नझूल भाडेपट्ट्यावर दिलेल्या संदर्भावर पूर्व विदर्भातील नागरिकांमध्ये पसरलेली तीव्र नाराजीची भावना, याबाबत शासनाने पुनर्विचार करून बाधित लोकांना दिलासा देण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. ”

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले.

" केंद्र सरकार कर्मचाऱ्यांनी साई वैभव सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यात येणे, सदर संस्था केवळ कोकणवासीयांसाठी गठीत करण्यात येऊन त्यांनी दिनांक १८ एप्रिल, २००६ च्या पत्रान्वये मा. अप्पर मुख्य सचिव, महसूल विभाग यांचेकडे मुंबई उपनगर जिल्हा मौजे विक्रोळी, ता. कुर्ला, सर्व्हे नं. ६५ मधील ७ एकर जागा मिळणेबाबत मागणी करून अद्यापही साई वैभव सहकारी, गृहनिर्माण संस्थेला जागा न देण्यात येणे, सदर संस्थेचे २१२ हून अधिक सदस्य असतानाही संस्थेला जागा न मिळाल्याने घरांचा प्रश्न प्रलंबित राहणे, सदर जागा मिळणेबाबत संस्थेकडून सातत्याने पाठपुरावा करूनही प्रश्न अद्याप निकाली न निघणे, सन २०१३ साली असलेल्या तत्कालीन महसूल मंत्री यांनी याबाबत सोसायटीचे पदाधिकारी व संबंधित अधिकारी यांची एकत्रितपणे बैठक घेऊन त्यातून योग्य तो मार्ग काढून सोसायटीच्या सभासदांना मदत करण्याकरिता प्रयत्न केला जाईल असे आश्वासन देण्यात येणे, परंतु दिलेल्या आश्वासनानुसार अद्याप या विषयासंदर्भात कोणत्याही संबंधित अधिकारी तसेच साई वैभव सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांबरोबर कोणतीही बैठक न होणे, परिणामी संस्थेच्या सदस्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) सर्वश्री गोपीचंद पडाळकर व अंबादास दानवे, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. गोपीचंद पडाळकर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधले.

" राज्यात मेंढपाळ बांधवांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून नाहक त्रास बांधवांना सहन करावा लागत असणे, राज्यात गेली अनेक वर्ष धनगर समाज आपला पारंपरिक मेंढीपालन व्यवसाय करून आपली उपजीविका चालवत असणे, या व्यवसायामुळे मेंढपाळ बांधव महाराष्ट्रभर भटकंती करत असणे, परंतु गेल्या काही काळामध्ये मेंढपाळ आणि वन खात्याचे अधिकारी तसेच गावगुंडांमध्ये सातत्याने संघर्षाची परिस्थिती उद्‌भवत असणे, मेंढपाळांना जंगली चराईसाठी खुली करणे, धरण बुडीत क्षेत्र खुले करणे, वृक्ष लागवडीस पाच वर्षे पूर्ण झाल्यानंतर वनीकरणाच्या जमिनीसाठी खुल्या करणे, १००-१०० वर्षांपासून लाभक्षेत्र मध्ये मेंढपाळ वास्तव्यास असून त्यांना वन अधिकाऱ्यांकडून नाहक त्रास सहन करावा

लागत असणे, गायरानावरती अतिक्रमण झाल्यामुळे मेंढ्यांच्या साठी जमिनी शिल्लक राहिल्या नसणे, तरी ती अतिक्रमण काढणे, तसेच पावसाळ्यात दूषित पाणी पिल्याने व रस्ते अपघातात शेळ्या-मेंढ्या मरण पावतात अशावेळी नैसर्गिक आपत्ती घोषित करून मेंढपाळांना आर्थिक भरपाई देण्यात यावी, अशा अनेक मागणी राज्यातील मेंढपाळ बांधवांच्या शासनाकडे असणे, दिनांक १९ ऑक्टोबर, २०२२ रोजी शासनाने मा. वने मंत्री यांनी राज्यातील मेंढपाळ बांधव व लोकप्रतिनिधी यांची संयुक्त बैठक घेऊन याबाबत येणाऱ्या २० दिवसांत माहिती सादर करून पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले असणे, संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना निर्देश देऊन एक महिनापेक्षा अधिकचा कालावधी होऊनदेखील आजमितीस मेंढपाळ बांधवांच्या प्रश्नाबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, यामुळे राज्यातील मेंढपाळ बांधवांच्या मनात निर्माण झालेली तीव्र असंतोषाची भावना याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

वने मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक दुपारी १२ वाजून ०५ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२ वाजून १० मिनिटांनी माननीय उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१. (अ) चार तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(ब) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील अडुसष्ट प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

(क) अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी, दहावी, अकरावी, बारावी व तेरावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली.

२. (१) बंदरे व खनिकर्म मंत्र्यांनी,

(क) सन २०१४-२०१५ या वर्षाचा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षण पुनर्विलोकन (चतुर्थ) अहवाल,

(ख) महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा चौसष्टावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(२) मृद् व जलसंधारण मंत्र्यांनी, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांचा सन २०१३-२०१४ ते सन २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे १४, १५, १६, १७, १८, १९, २० व २१ वे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(३) संसदीय कार्य मंत्र्यांनी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(४) महसूल मंत्र्यांनी, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(५) संसदीय कार्य मंत्र्यांनी, विधानपरिषदेच्या सन २०२२ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ ते दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत मा. मंत्रिमहोदयांनी विधानपरिषद सभागृहात दिलेल्या एकूण ६६ आश्वांसनांची यादी तसेच, सन २०२२ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, पूर्तता करण्यात आलेल्या एकूण ९४ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह, विधानपरिषदेच्या सभागृहासमोर ठेवली.

(६) वस्त्रोद्योग मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, नवी मुंबई यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा ४९ वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(७) खनिकर्म मंत्र्यांनी, मॉयल लिमिटेड याचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा साठावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(८) कृषी मंत्र्यांनी, डॉ. बाळासाहेब सावंत, कोकण कृषी विद्यापीठ, दापोली याचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(९) सहकार मंत्र्यांनी,

(अ) महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा २१ वा वार्षिक अहवाल, तसेच

(ब) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित याचा सन २०१३-२०१४, सन २०१४-२०१५, सन २०१५-२०१६, सन २०१६-२०१७ व सन २०१७-२०१८ या वर्षांचे अनुक्रमे ३९, ४०, ४१, ४२ व ४३ वे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

नियम २८९ च्या चार सूचना प्राप्त झालेल्या आहेत. आज दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी श्री. अंबादास दानवे, डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी सकाळी ९.३१ वाजता राज्यात राजकीय पक्षाकडून महापुरुषांचा झालेला अवमान असा एक विषय आहे. तर दुसरा विषय आज दिनांक २१ डिसेंबर २०२२ रोजी श्री. अंबादास दानवे, डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी सकाळी ९.३२ वाजता नागपूर येथील झोपडपट्टीवासियांकरिता घरे बांधण्यासाठी देण्यात आलेल्या ५ एकर भूखंड १६ खाजगी विकासकांना भाडेतत्त्वावर दिल्याबाबत आहे. याबाबत सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी दोन मिनिटे बोलावे, असे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी, नागपूर येथील झोपडपट्टीवासीयांकरिता घरे बांधण्यासाठी देण्यात आलेल्या ५ एकर भूखंड १६ खाजगी विकासकांना भाडेतत्त्वावर देणे इ.बाबत दिलेल्या नियम २८९ च्या सूचनेसंदर्भात आपले म्हणणे मांडले.

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकत्र बोलतात)

सभागृहामध्ये गोंधळसदृश परिस्थिती निर्माण झाल्यामुळे सभागृहाची बैठक १५ मिनिटांसाठी स्थगित करत असल्याचे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून २९ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ४४ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

सभागृहाची बैठक मध्यांतरासाठी स्थगित करत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

मध्यांतरासाठी सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ४४ मिनिटांनी स्थगित झाली.

मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून ३० मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

गटनेत्यांच्या बैठकीत ठरल्यानुसार नियम २८९ नुसार थोडक्यात म्हणणे मांडण्याची परवानगी विरोधी पक्षनेता यांना देण्यात आली आहे, असे मा. उप सभापतींनी सांगितले.

सदरहू विषयावर यापूर्वी चर्चा झाली असल्याने त्या विषयावर पुन्हा चर्चा होऊ शकत नाही, असा मुद्दा मा. उप मुख्यमंत्र्यांनी उपस्थित केला.

सभागृहामध्ये गोंधळसदृश परिस्थिती निर्माण झाल्यामुळे सभागृहाची बैठक १५ मिनिटांसाठी स्थगित करत असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून ३९ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून ५४ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी, " नागपूर येथील झोपडपट्टीवासीयांसाठी राखीव असलेली जमीन, " इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनी यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

सभागृहामध्ये गोंधळसदृश परिस्थिती निर्माण झाल्यामुळे सभागृहाची बैठक १५ मिनिटांसाठी स्थगित करत असल्याचे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी ३.०० वाजता स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून १५ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनी उक्त नियम २८९ च्या सूचनेबाबत आपले म्हणणे मांडले.

मा. उपसभापतींनी उक्त सूचनेसंदर्भात निर्णय देत सदरहू सूचना फेटाळल्याचे सांगितले.

नियम २८९ अन्वये दुसरी सूचना सन्माननीय सदस्य श्री. सुनील शिंदे यांनी, "पालघर जिल्ह्यातील माहिम येथील एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अंमली पदार्थाच्या आहारी गेलेल्या युवकांनी तब्बल १८ तास केलेला बलात्कार" या विषयावर दिलेली आहे. त्यांनी हा विषय नियम २८९ च्या निकषात कसा बसतो हे थोडक्यात निदर्शनास आणून द्यावे, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. सुनील शिंदे, वि.प.स. यांनी उपरोक्त विषयाबाबत आपले म्हणणे मांडले.

उपरोक्त विषय गंभीर असून आयुधामार्फत चर्चा करण्यासाठी परवानगी देता येईल, असे उप सभापतींनी सांगितले.

आज दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी सकाळी १०.४२ वाजता " समाजकल्याण विभागाने सामाजिक विकास योजनेतून ३६ कोटी रुपयांच्या खरेदी केलेल्या पुस्तकात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, शाहू महाराज, महात्मा गांधी, सावित्रीबाई फुले यांची किंवा यांच्या विचारांची कोणतीही पुस्तके नसणे" या विषयाबाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली आहे. सन्माननीय सदस्यांनी त्यावर त्यांचे म्हणणे मांडावे, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. कपिल पाटील, शिंदे, वि.प.स. यांनी उपरोक्त विषयाबाबत आपले म्हणणे मांडले.

उक्त प्रकरणी चौकशी करून नेमकी वस्तुस्थिती मांडता येईल, असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी सांगितले.

३. (अ) (१) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.प.वि. क्रमांक ५ – पिंपरी-चिंचवड विद्यापीठ, पुणे विधेयक, २०२२ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

(२) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.प.वि. क्रमांक ६ – युनिव्हर्सल ए आय विद्यापीठ, कर्जत विधेयक, २०२२ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

(ब) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.प.वि. क्र. ४ – जेएसपीएम विद्यापीठ, पुणे विधेयक, २०२२ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयकावरील चर्चेत पुढील सदस्यांनी सहभाग घेतला.

(१) श्री. अभिजित वंजारी (२) श्री. शशिकांत शिंदे
(३) डॉ. मनिषा कायंदे (४) श्री. कपिल पाटील

(चर्चा अपूर्ण)

४. उपमुख्यमंत्र्यांनी, “ विधानपरिषद नियमांतील नियम २८९ अन्वये पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या संदर्भात, विधानपरिषद नियमांतील नियम २३०(२) मधील तीन दिवसांच्या कालावधीची जी तरतूद आहे ती स्थगित करण्यात यावी, ” असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे – (पुढे सुरू)

सन २०२२ चे वि.प.वि. क्र. ४ – जेएसपीएम विद्यापीठ, पुणे विधेयक, २०२२ वरील चर्चेत पुढील सदस्यांनी सहभाग घेतला.

(३) श्री. सतीश चव्हाण

उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी चर्चेला उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०२२ व बुधवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजीच्या प्राप्त झालेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना तसेच औचित्याचे मुद्दे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

**नियम ९३ अन्वये सूचना -**

मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०२२ व बुधवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजीच्या प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य केलेल्या सूचना सभागृहाच्या सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

(क) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडशः विचार व संमत करणे.

(अ) पणन मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक २९–महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२२ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयकावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. जयंत प्र. पाटील (२) श्री. शशिकांत शिंदे

(३) श्री. एकनाथ खडसे (४) श्री. दादाजी भुसे

(ब) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर सन २०२२ चे वि.स.वि. क्र. २९ संमत झाले.

(ब) पणन मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक २८ — मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२२ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयकावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. सुनील शिंदे (२) ॲड. अनिल परब

विधेयक विचारात घेण्यात आले.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर सन २०२२ चे वि.स.वि. क्र. २८ संमत झाले.

५. माननीय उप सभापतींनी पुरवणी मागण्यांवरील चर्चेची कार्यपद्धती विशद केली व खालील मंत्र्यांच्या विभागांच्या मागण्यांवर चर्चा होईल, असे सांगितले.

(१) उप मुख्यमंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक – बी-१, बी-५, बी-१०, जी-१, जी-४, जी-५, जी-६, जी-८, जी-१०, आय-३, आय-५, जे-१, जे-२, के-६, के-११, ओ-७, ओ-८, ओ-१०, ओ-११, ओ-१४, ओ-१५, ओ-१६, ओ-१७

(२) महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक – सी-१, सी-२, सी-४, सी-५, डी-४ डी-५

(३) वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक सी-७, डी-६, डी-९, झेडडी-१, झेडडी-२.

(४) आदिवासी विकास मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक – टी-५, टी-६.

(५) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक – वाय-२, वाय-५, वाय-६.

(६) कामगार मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक – के-४

(७) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक – आर-१.

(८) कृषि मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक – डी-३, डी-७.

(९) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक – ई-१, ई-२.

उपरोक्त मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते (२) श्री. शशिकांत शिंदे

(चर्चा अपूर्ण)

श्री. गोपिचंद पडळकर, वि.प.स. यांनी, " केदारलिंगवाडी, धनगरवाडा, शाहूवाडी तालुक्यात बिबट्याच्या हल्ल्यामध्ये एका लहान मुलाचा झालेला मृत्यू, " इ. बाबतचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने योग्य दखल घ्यावी, असे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

उपरोक्त सन २०२२-२०२३ च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(३) श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील

श्री. बाळाराम पाटील, वि.प.स. यांनी, " पनवेल महानगरपालिकेच्या विरोधात ९५ गाव संघर्ष समिती व पनवेल उरण महाविकास आघाडी यांच्या विद्यमाने १६ डिसेंबर, २०२२ पासून सुरू असलेले धरणे आंदोलन, " इ. बाबतचा माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने योग्य ती कार्यवाही करावी, असे निदेश माननीय तालिका सभापतींनी दिले.

**मागण्यांवर चर्चा – (पहिला दिवस) (चर्चा पुढे सुरू)**

उपरोक्त सन २०२२-२०२३ च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला :—

(४) श्री. राजेश राठोड

(५) श्री. गोपीचंद पडळकर

(६) श्री. एकनाथ खडसे

पुरवणी मागण्यांवरील चर्चा उद्या घेण्यात येईल, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

**६. (क) सर्वश्री प्रवीण दरेकर व इतर वि.प.स. यांचा नियम २६० अन्वये पुढील प्रस्ताव – श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी पुढील प्रस्ताव मांडला–**

" महाविकास आघाडी सरकारच्या ३३ महिन्यांच्या कार्यकाळात विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागातील अनेक विकास प्रकल्पांकडे अक्षम्य दुर्लक्ष करण्यात येणे, राज्यात विदर्भ, मराठवाडा व कोकणासह उर्वरित अविकसित भागाचा संतुलित विकास होण्याची आवश्यकता, नैसर्गिक व सेंद्रिय शेती आणि फळबागांच्या लागवडीस प्रोत्साहन देणे, संत्रा उद्योग, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन इत्यादी शेतीच्या जोडधंद्यांना प्रोत्साहन देऊन अधिकाधिक रोजगार उपलब्ध करणे, कृषी मालावर आधारित प्रक्रिया उद्योग उभारणे, धानावर प्रक्रिया उद्योग उभारणे, विदर्भ आणि मराठवाड्यातील तीर्थक्षेत्र व पर्यटनस्थळांचे जाळे तयार करून रोजगार निर्मिती वाढविणे, विदर्भातील कापूस उत्पादनावर आधारित सूत गिरण्या व कापूस उद्योगाला चालना देणे, विदर्भ व मराठवाड्यात खनिज व जंगल संपत्ती मोठ्या प्रमाणात असल्याने त्याचा अधिकाधिक फायदा जनतेला मिळण्याच्या दृष्टीने आधुनिक तंत्रज्ञान विकसित करणे, विदर्भातील विशेषतः अमरावती व मेळघाट येथे आधुनिक सोयीसुविधा युक्त रुग्णालयांची निर्मिती करून कुपोषणामुळे होणारे बालकांचे मृत्यू टाळण्याची आवश्यकता, राष्ट्रीयीकृत बँकांच्या तुलनेत सहकारी बँकांची जिल्ह्या-जिल्ह्यात सहज उपलब्ध होणारी सेवा विचारात घेता सहकारी बँकांवरचे वाढते निर्बंध शिथील करण्याची आवश्यकता, राज्यातील गड-किल्ल्यांचे जतन करून त्यांच्या संवर्धनाकरिता विशेष निधी उपलब्ध करणे व राजे शिवछत्रपतींचा इतिहास पर्यटकांसमोर मांडण्याची आवश्यकता, राज्यातील १२ बलुतेदारांसाठी एमआयडीसीमध्ये कौशल्य विकास केंद्राचे जाळे उभारून ग्रामीण भागातील बलुतेदारांना त्यांच्या व्यवसायांत आयटीआयच्या धर्तीवर तंत्रशिक्षण देऊन त्यांच्या

उद्योगात आधुनिकता आणण्याची आवश्यकता, केंद्र शासनाचे नदीजोड प्रकल्प प्रभावीपणे कार्यान्वित करण्याची आवश्यकता, विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांना बारमाही पाणी उपलब्ध करून त्यांच्या उत्पादनास चालना देण्याची आवश्यकता, जलयुक्त शिवार योजनेमुळे शाश्वत सिंचनाच्या सुविधा अधिक प्रभावी करण्याकरिता या योजनेच्या अटी व निकष शिथील करणे, विदर्भ व मराठवाड्यासह राज्यातील बेरोजगार युवकांची वाढती संख्या विचारात घेता मिहान प्रकल्प व अन्यत्र जड उद्योग, कृषी प्रक्रिया उद्योग, ऑटोमोबाईल प्रकल्प सुरू करण्याची आवश्यकता, राज्यातील सर्व जिल्ह्यांत पर्यावरणाचा धोका टाळण्यासाठी अधिकाधिक वृक्ष लागवड करण्याची आवश्यकता, सन २०२२-२३ हे मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष म्हणून राज्य शासनाच्या वतीने साजरे करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

(भाषण अपूर्ण) (चर्चा अपूर्ण)

सभागृहाची बैठक उद्या गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता पुन्हा भरेल. सकाळी ११.०० ते ११.४५ वाजेपर्यंत सभागृहाची विशेष बैठक होईल. उक्त बैठकीत आजच्या सकाळच्या विशेष सत्रातील २ प्रलंबित लक्षवेधी सूचना व नियमित कामकाजातील ४ प्रलंबित लक्षवेधी सूचना अशा ६ लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येतील. त्यानंतर दुपारी १२.०० वाजता सभागृहाची नियमित बैठक पुन्हा सुरु होईल, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

उद्या रात्री ७.०० वाजता विभागीय आयुक्तांनी फुटाळा तलावाच्या सुशोभिकरणासंदर्भात कार्यक्रम आयोजित केलेला आहे. माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितीनजी गडकरी व राज्य शासनाने आपल्याला त्या कार्यक्रमासाठी निमंत्रित केले आहे, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

**गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर २०२२**

**(अ) (१) श्री. आमश्या पाडवी, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.**

" राज्यातील अनुसूचित जमातीच्या राज्य शासकीय, निमशासकीय कर्मचाऱ्यांनी जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र दाखल केलेले नाही, तसेच ज्यांचे जातीचे दाखले अवैध ठरलेले आहेत अशा सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च यांनी सन २०१६, २०१७ मध्ये सेवेतून कमी करण्याची कार्यवाही करण्याबाबत शासनाला दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी आदेशित करणे, सदर आदेशात उपरोक्त कर्मचाऱ्यांवर दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ पर्यंत कारवाई करण्यात यावी असे नमूद करण्यात आलेले असणे, तथापि, मा. न्यायालयाच्या आदेशानुसार कोणतीच कार्यवाही न करता अधिसंख्य पदे निर्माण करून त्यांची बिंदू नामावलीत मंजूर कार्यकारी पदावर नियुक्ती करण्यात येणे, तद्नंतर दिनांक

२९ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या मंत्रिमंडळ निर्णयान्वये उपरोक्त बोगस प्रमाणपत्रधारक अधिकारी व सद्यःपरिस्थितीत अधिसंख्य पदावर कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना मानवतेचा दृष्टीकोन लक्षात घेत सेवा विषयक लाभ देण्याचा निर्णय घेण्यात येणे, त्यामुळे या प्रकरणी शासनाने मा. न्यायालयाच्या आदेशाची केलेली पायमल्ली, परिणामी मूळ आदिवासी समाजातील होतकरु उमेदवारांवर झालेला अन्याय, तसेच मूळ आदिवासी असलेल्या अधिकाऱ्यांना पदोन्नतीपासून वंचित रहावे लागणे, त्यामुळे त्यांच्यात वाढते नैराश्याचे व असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तात्काळ चौकशी करून जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र दाखल न करणाऱ्यां व बोगस प्रमाणपत्र सादर दाखल न करणाऱ्या व बोगस प्रमाणपत्र सादर करणाऱ्या अधिकारी /कर्मचारी यांना सेवेतून कमी करण्याची आवश्यकता, तसेच अनुसूचित जमाती प्रवर्गातील राखीव असलेली रिक्त पदे तातडीने भरण्याच्या अनुषंगाने शासनाने केलेली निर्णयात्मक कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया. ”

शालेय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) सर्वश्री अमोल मिटकरी, विक्रम काळे, शशिकांत शिंदे, सतीश चव्हाण, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे फलोत्पादन मंत्र्यांचे लक्ष वेधले :-

“ यावर्षी विदर्भात १ लाख ७० हजार हेक्टरवर संत्री-मोसंबीची लागवड करण्यात आलेली असणे, परंतु यंदा राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे विदर्भातील संत्री पिकावर त्याचा विपरीत परिणाम झाल्याचे आढळून येणे, या दरम्यान संत्री कोळशी या रोगामुळे काळी पडू लागल्याचे व त्यामुळे संत्री उत्पादनात घट झाल्याचे दिनांक ४ डिसेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, कोळशी रोगाचा प्रादुर्भाव झाला असताना शासकीय यंत्रणांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याचे तसेच संत्रा उत्पादकांना कसलेही मार्गदर्शन करण्यात आले नसल्याबाबत उत्पादक शेतकऱ्यांनी शासनाकडे तक्रारी केल्या असल्याचेही त्याचसुमारास निदर्शनास येणे, काळी पडलेली किंवा डाग असलेली संत्री व्यापारीसुद्धा खरेदी करीत नसल्यामुळे उत्पादकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका बसल्याचे निदर्शनास येणे, यास्तव संत्री उत्पादक शेतकऱ्यांनी शासनाकडे नुकसान भरपाईची मागणी करण्यात येणे, परंतु त्याकडे शासकीय यंत्रणांनी दुर्लक्ष करण्यात येणे, परिणामी, विदर्भातील संत्रा उत्पादकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व उदासिनतेची भावना, त्याबाबत शासनाने चौकशी करुन नुकसान भरपाई देण्याप्रकरणी कार्यवाही करण्याची आवश्यकता व त्याबाबतची शासनाची प्रतिक्रिया. ”

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

गोंधळसदृश परिस्थितीत सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक १२ वाजेपर्यंत स्थगित करीत असल्याचे माननीय तालिका सभापती यांनी सांगितले.

सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून ४६ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२-०० वाजता पुन्हा सुरू झाली.

विशेष सत्रामध्ये काय घडले त्यासंदर्भात थोडक्यात माहिती सन्माननीय सदस्या डॉ. मनिषा कायंदे यांनी द्यावी, असे माननीय उप सभापती यांनी सांगितले.

डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी, विशेष सत्रामध्ये घडलेल्या घटनेसंदर्भात सभागृहात माहिती दिली.

उप मुख्यमंत्र्यांनी याबाबत दखल घेतली.

श्री. अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी, विधानमंडळातील स्वच्छतेबाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केले.

उप मुख्यमंत्र्यांनी याबाबत नोंद घेतली.

याबाबत दोन दिवसात चौकशी करून दोषींवर विधीमंडळ सचिवालयाकडून कारवाई करण्यात यावी असे निदेश दिले असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

१. (अ) (१) पाच तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील चौपन्न प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी, सन्माननीय खासदार श्री. राहुल शेवाळे यांच्या संसदेतील वक्तव्याबाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

माननीय उप सभापतींनी उपरोक्त सन्माननीय सदस्यांच्या मुद्यास परवानगी नाकारीत असल्याचे सांगितले.

(सत्ताधारी व विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीतच असतात.)

गोंधळसदृश परिस्थितीमध्ये सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक ५ मिनिटांसाठी स्थगित करीत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून १३ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून १८ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

२. (अ) राज्य उत्पादन शुल्क, परिवहन मंत्र्यांनी पुढील अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(१) लोकआयुक्त आणि उप लोकआयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ३ सप्टेंबर, २०१३, दिनांक २८ ऑक्टोबर, २०१३, दिनांक ४ डिसेंबर २०१३, दिनांक २६ मे, २०१४, दिनांक २६ जून, २०१४, दिनांक ३० जून, २०१४, दिनांक १ जुलै, २०१४, दिनांक १७ डिसेंबर २०१५, दिनांक २३ डिसेंबर २०१५, दिनांक १८ जुलै, २०१८, दिनांक १ जून, २०१९ व दिनांक २७ नोव्हेंबर, २०२० चे मा. राज्यपाल महोदयांना सादर केलेले असे एकूण १२ विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवले.

(२) लोकआयुक्त आणि उप लोकआयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचा चव्वेचाळीसावा, पंचेचाळीसावा, शेहेचाळीसावा, सत्तेचाळीसावा व अठ्ठेचाळीसावा वार्षिक एकत्रित अहवाल स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवले.

(३) महाराष्ट्र भूविकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(४) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(५) तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचा सन २०१९-२०२० चा स्वतंत्र लेखापरीक्षा व त्यावरील अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(६) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन २०२० करिताचा अलग लेखा अहवाल व तेवीसावा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(७) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(८) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे सन २०१७-२०१८ ते सन २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवले.

(९) शुल्क नियामक प्राधिकरण यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा वार्षिक अहवाल व लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(१०) कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवले.

(११) पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक लेखापरीक्षित लेखे व अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(१२) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचा दिनांक १ एप्रिल, २०२१ ते ३१ मार्च, २०२२ या कालावधीचा वार्षिक अंकेक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(दोन्ही बाजूंकडील सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात)

सभागृहाची बैठक एक तासाकरीता स्थगित करण्यात येत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून २० मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून २० मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनी, मुंबईतील खासदाराने दुबईस्थित महिलेवर केलेल्या बलात्काराबाबत माहितीविषयक मुद्दा मांडला व याप्रकरणी एस.आय.टी. चौकशी व्हावी अशी विनंती केली.

(सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

गोंधळसदृश परिस्थितीमध्ये सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक ३० मिनिटांसाठी स्थगित करीत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून २४ मिनिटांनी स्थगित केली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून ५४ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी, मुंबईतील खासदाराने दुबईस्थित महिलेवर केलेल्या बलात्काराबाबत म्हणणे मांडले.

संसदीय कार्यमंत्र्यांनी याबाबत आपले मत मांडले.

सन्माननीय सदस्यांनी विनंती केल्यामुळे उक्त विषयाप्रकरणी शासनाने एस.आय.टी. चौकशी करावी असे निर्देश माननीय उपसभापतींनी दिले.

गोंधळसदृश परिस्थितीमध्ये सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक १ तासाकरिता स्थगित करीत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी ०३ वाजून ०१ मिनिटांनी स्थगित केली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी ०४ वाजून ०१ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

३. आजच्या कामकाज पत्रिकेतील अनुक्रमांक तीनवर दर्शविण्यात आलेले अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहास सादर झाले असल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

४. आज गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मी, मान्य केलेल्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

५. आज गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी प्राप्त झालेल्या विशेष उल्लेखाच्या सूचनांपैकी मान्य केलेल्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

६. गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी प्राप्त झालेल्या औचित्यांच्या मुद्यांपैकी मान्य केलेले औचित्याचे मुद्दे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

७. खालील विभागाच्या मागण्या चर्चेला घेण्यात येतील असे माननीय उप सभापतींनी सांगितले :—

(१) मुख्यमंत्री.

(२) उप मुख्यमंत्री.

(३) महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री.

(४) वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री.

(५) उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री.

(६) आदिवासी विकास मंत्री.

(७) ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री.

(८) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री.

(९) कामगार मंत्री.

(१०) रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री.

(११) उद्योग मंत्री.

(१२) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री.

(१३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री.

(१४) कृषी मंत्री.

(१५) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री.

(१६) सहकार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री.

(१७) पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महिला व बालविकास मंत्री.

उपरोक्त पुरवणी मागण्यांवरील चर्चेचा आजचा दुसरा व शेवटचा दिवस आहे. परंतु आज सभागृहामध्ये सत्ताधारी व विरोधी पक्षाकडून सभागृहात गोंधळसदृश परिस्थिती असल्यामुळे अन्य सन्माननीय सदस्यांना पुरवणी मागण्यांवर बोलण्याकरिता मला संधी देता येत नाही. पुरवणी मागण्या हा विषय सत्ताधारी पक्षाचा असूनही दुर्दैवाने तेदेखील आजच्या या सभागृहातील गोंधळसदृश्य परिस्थितीचा भाग आहे. विरोधी पक्षाचीही सभागृहात गडबड सुरू असल्यामुळे मला सन्माननीय सदस्यांना मागण्यांवर बोलण्यास वाव देता येणार नाही असे सांगून सभागृहाने सन २०२२-२०२३ च्या पुरवणी मागण्यांवर विचार केला असल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

(सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाच वेळी घोषणाबाजी करतात.)

गोंधळसदृश परिस्थितीमध्ये सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक १५ मिनिटांकरिता स्थगित करीत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी ०४ वाजून ०५ मिनिटांनी स्थगित केली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपरी ०४ वाजून २० मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

८. (क) उप मुख्यमंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ३४—महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२२ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०७, खंड (१) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून त्यांनी हे विधेयक विचारात घेण्याबाबत महाराष्ट्र विधानपरिषदेस शिफारस केली.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

विधेयक खंडशः सभागृहास सादर कण्यात आले.

शिफारशी करावयाच्या असल्यास सन्माननीय सदस्यांनी मांडाव्यात असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(खंड २ व ३) अनुसूची खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्याच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आलेली नाही.

ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, कोणत्याही शिफारशीशिवाय हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

उपरोक्त विधेयक संमत झाले.

सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांनी एका प्रकरणात एस.आय.टी. नेमण्याची मागणी केली होती. त्यानुसार सभागृहात माननीय उप मुख्यमंत्री उपस्थित आहेत. त्यामुळे मी सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांना पुन्हा त्यांची मागणी मांडण्यासाठी संधी देत असल्याचे सांगितले.

ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनी यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने एस.आय.टी. नेमण्याची घोषणा उप मुख्यमंत्र्यांनी केली तसेच ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने मा. उप सभापतींनी दिलेले निर्देश तपासून योग्य ती कारवाई करण्यात येईल असे सांगितले.

**शुक्रवार, दिनांक २३ डिसेंबर २०२२**

**१. (१) श्री. अंबादास दानवे,** विरोधी पक्ष नेते यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधले :–

“ राज्यात दिवाळी सणानिमित्त शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाने महाराष्ट्र दिवाळी निमित्त फूड किट (चणा डाळ, रवा, साखर व पामतेल) पुरवठा करण्याबाबत राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीपूर्वीच ५१३ कोटी २४ लाख रुपयांची निविदा NCDEX E-markets limited या कंपनीला देण्यात आलेली असणे, दिनांक १ ऑक्टोबर २०२२ रोजी कंपनीकडून परिपत्रक प्रसिद्ध झाले असून शासनाच्या निकषाप्रमाणे निविदा प्रक्रिया न करता संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी मनमानी पद्धतीने संबंधित कंपनीला कंत्राट दिलेले असणे, सदर योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता काढण्यात आलेले टेंडर, नेमलेले ठेकेदार ही सर्व कार्यवाही करत असताना शासन नियमाप्रमाणे कोणतेही नियम व निकष यांचे पालन करण्यात न आल्याची गंभीर बाब उघडकीस येणे, पुणे, मुंबई, औरंगाबाद तसेच राज्यातील अन्य जिल्ह्यात दिवाळी सणाच्या आधी रेशनकार्डधारकांना आनंदाचा शिधा मिळाला नसल्याच्या आलेल्या लाखो तक्रारी, जाहीर केलेले पाच जिन्नस एकाच पिशवीतून एकाच वेळी मिळाल्याच्या घटना संपूर्ण राज्यात कोठेही न घडणे, शासनाने शिधापत्रिकाधारकांना हा आनंदाचा शिधा देत असताना औरंगाबाद, नाशिक, नगर इ. अनेक जिल्ह्यात बायोमेट्रिक यंत्रणा बंद असल्याने सदर शिधा रेशनधारकांपर्यंत पोहोचविण्यात रेशन दुकानदारांना आलेले अपयश, राज्यातील लाभार्थ्यांना दिवाळी सणानिमित्त स्वस्तात अन्नधान्य मिळावे यासाठी १०० रुपये अशी आनंदाच्या शिध्याची किंमत शासनाने निश्चित करण्यात आलेली असताना ही आदिवासी भागातील शहापूर तालुक्यात ३०० रुपयांत विक्री होत असल्याची घटना निदर्शनास येणे, राज्यात पैठण व इतर भागात शिधावाटपाच्या पिशवीवर राजकीय नेत्यांचे फोटो छापण्यास उशीर झाल्यामुळे दिवाळी सणाच्या दिवशीही आनंदाचा शिधा त्यांच्यापर्यंत पोहोचलेला नसल्याच्या घटना निदर्शनास येणे, सामान्य जनतेची दिवाळी गोड करण्याच्या उद्देशाने निविदा काढण्यात दाखवलेली तत्परता, सर्वसामान्य लाभार्थ्यांना आनंदशिधा मिळण्यासाठी न दाखविल्यामुळे जनतेमध्ये शासनाप्रति असंतोषाची भावना निर्माण झालेली

असणे, दिवाळी सणानिमित्त किती आनंदाचा शिधा वितरीत करण्यात आला तसेच सदर विक्रीतून झालेल्या उत्पन्नाच्या लेखाशीर्षाची माहिती लोकप्रतिनिधींना संबंधित विभागाकडे मागूनही देण्यात आलेली नसणे, सदर प्रकरणाची चौकशी करून नियमांची पायमल्ली करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तसेच सर्वसामान्य नागरिकांची लूट करणाऱ्या दुकानदारांवर कारवाई करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

२) श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी, ‘ महाराष्ट्र शासनाच्या सर्व विभागातील सरळ सेवेची भरती प्रक्रिया सन २०१९ पासून अद्याप राबविण्यात न येणे ’ इ. बाबत दिलेल्या लक्षवेधीसाठी संबंधित सन्माननीय सदस्य अनुपस्थित होते.

**(२) डॉ. मनिषा कायंदे,** आणि इतर वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधले :—

“ राज्यात समाजकल्याण विभागामार्फत ४४१ शासकीय वसतिगृहे चालविली जात असून त्यात जवळपास ५० हजारांहून अधिक गरीब व गरजू विद्यार्थी शिक्षण घेत असणे, परंतु या वसतिगृहात विद्यार्थ्यांना गैरसोयी, अस्वच्छता आणि असुविधेचा अनुभव येणे, तर काही ठिकाणी नोंदवहीत नोंद असून विद्यार्थी गायब असणे, काही वसतिगृहात तर पिण्याचे पाणी तसेच ग्रंथालयाची सोय, मुलींच्या वसतिगृहात सीसीटीव्ही नसल्याचे समोर येणे, वसतिगृहात साधनसामग्रीचा नियमित पुरवठा होऊनही काही ठिकाणी इन्व्हर्टर, गरम पाण्याची तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही, अशा अनेक सोयीसुविधांपासून विद्यार्थी वंचित असणे, सन, २०२१ मध्ये ६४ कोटी रुपयांचा निधी राज्यातील सर्व शासकीय वसतिगृहाच्या सोयीसुविधांसाठी निधी देण्यात आला होता तर काही वसतिगृहाच्या दुरुस्तीकरिता साडेसात कोटींचा निधी देण्यात आलेला होता असे असतांनाही विद्यार्थ्यांना सुविधांपासून वंचित ठेवण्यात येणे, अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत नसणे, संगणक कक्ष, भोजन कक्ष नसणे, इमारतीतील दारे, खिडक्यांच्या काचा, स्नानगृह, स्वच्छतागृह यांची असलेली दुरवस्था, उक्त विभागातर्फे सुरू असलेल्या वसतिगृहात विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे त्याचबरोबर गेल्या सहा महिन्यांपासून रखडलेला निर्वाह भत्ता, शाळा महाविद्यालये सुरू होऊनही साहित्य मिळालेले नसणे, परिणामी विद्यार्थी आर्थिक संकटात सापडणे, निर्वाह भत्ता आणि इतर सुविधा तत्काळ न दिल्यास विद्यार्थ्यांनी आंदोलनाचा दिलेला इशारा, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून तातडीने करावयाची कार्यवाही, यास जबाबदार असणाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. ”

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(३) श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील,** वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधले :–

" करमाळा तालुक्यातील सीना नदीवर सिना-कोळेगाव प्रकल्पास १९९२ साली प्रशासकीय मान्यता मिळून १९९४ साली करमाळा तालुक्यातील पूर्व भागातील मिरगव्हाण, भालेवाडी, हिवरे, आवाटी, कोळगाव, निमगाव ह, गौंडरे या गावातील ७३२ शेतकऱ्यांच्या घरांचे व जमिनींचे भूसंपादन करण्यात येणे, धरणग्रस्तांसंबंधी 'अगोदर पुनर्वसन नंतर धरण ' हे धोरण असताना संबंधित धरणग्रस्तांना पर्यायी जमिनी अद्यापि न मिळणे, गेली २७ वर्षे हा प्रश्न प्रलंबित असणे, संबंधित गावातील धरणग्रस्तांच्या प्रश्नांवर २०१२ साली तत्कालीन पुनर्वसन मंत्री यांचे दालनात बैठक होऊन अन्यायकारक निकष लावल्याने धरणग्रस्तांना जमिनी मिळाल्या नसल्याचे निदर्शनास येणे, त्यानंतर तत्कालीन पुनवर्सन मंत्री महोदयांनी संबंधित शेतकऱ्यांना जमिनी देण्यासाठी दोन महिन्यांत प्रस्ताव सादर करून कार्यवाही करण्याचे आदेश देणे, परंतु अद्यापही संबंधित ७३२ शेतकऱ्यांना पर्यायी जमिनीचे वाटप झालेले नसणे, यामुळे सीना-कोळेगाव प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष, याकडे प्रशासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत निर्णय घेऊन करमाळा तालुक्यातील सीना-कोळगाव धरणग्रस्तांना पर्यायी जमिनी मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

विधानसभेच्या विद्यमान सदस्या श्रीमती मुक्ताताई टिळक यांचे दुःखद निधन झाले आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडून अंत्यसंस्काराला सुरुवात झाल्याचा निरोप आल्यावर सभागृहाचे कामकाज १५ मिनिटांसाठी थांबविण्यात येईल, त्यानंतर शोकप्रस्ताव घेण्यात येईल. शोकप्रस्तावानंतर सभागृहाचे सर्व कामकाज दिवसभरासाठी स्थगित करण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

**(४) श्री. अभिजित वंजारी** व इतर वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधले :–

" टाकळी-डोल्हारी प्रकल्पांतर्गत मौजा उदापूर, ता. नेर, जि. यवतमाळ येथील गावकऱ्यांची दिशाभूल करून, प्रकल्पग्रस्तांना विश्वासात न घेता, बनावट कागदपत्रे बनवून अवैध पद्धतीने ग्रामसभा घेऊन भांडवलदारांच्या हिताकरिता आर्थिक हेतू बोगस, अवैधपणे, बेकायदेशीरपणे राबविण्यात आलेल्या पुनर्वसन प्रक्रिया रद्द करण्याबाबतची मागणी स्थानिक नागरिकांनी शासनाकडे केलेली असणे, उक्त प्रकरणी

तत्कालीन मंत्री महोदय, मदत व पुनर्वसन तसेच जलसंपदा व संबंधित विभागाचे प्रधान सचिव यांच्या उपस्थितीत बैठक होऊन ग्रामसभा वैध अथवा अवैध याबाबत जिल्हाधिकारी, यवतमाळ व मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. यवतमाळ यांच्याकडून स्वयंस्पष्ट अहवाल मागविण्यात आलेला असणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. यवतमाळ यांनी अहवाल शासनास सादर केला असून त्यात त्यांनी ग्रामसभा अवैध असल्याचे स्पष्ट म्हटलेले असणे, जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनीसुद्धा याबाबतचा अहवाल शासनास सादर केलेला असणे, असे असताना महसूल व वन विभागाच्या दिनांक १९ ऑक्टोबर, २०२२ च्या पत्राच्या अनुषंगाने उक्त विषयी जिल्हा नियोजन व विकास मंडळ यांचेकडून अभिप्राय प्राप्त करण्यासाठी निर्देश देणे व तातडीने दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी जिल्हा नियोजनच्या बैठकीत सदर विषय मांडण्यात येणे, परंतु मागील महिन्यापासून बैठकीचे इतिवृत्त तयार केले नसल्याचे संबंधित विभागाकडून सांगण्यात येणे, त्यामुळे या प्रकरणात मोठा आर्थिक घोटाळा झाल्याचे स्थानिकांमध्ये होत असलेली चर्चा, पुनर्वसन व भूसंपादन कायद्यानुसार जिल्हा नियोजन समिती ही घटनात्मक संस्था नसून ग्रामसभेलाच सर्व अधिकार असताना हेतुपुरस्सरपणे कायद्याला न जुमानता जिल्हा नियोजनकडे हा विषय देणे गैर असल्याने याची सखोल चौकशी करण्याची नितांत आवश्यकता, तसेच अहवाल सादर करूनही दोषींवर कोणत्याही प्रकारची कारवाई होत नसल्याने स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र स्वरूपाचा असंतोष व संतापाचे वातावरण, टाकळी - डोल्हारी प्रकल्पांतर्गत मौजा उदापूर, ता. नेर, जि. यवतमाळ येथील गावकऱ्यांची दिशाभूल करून, प्रकल्पग्रस्तांना विश्वासात न घेता, बनावट कागदपत्रे बनवून अवैध पद्धतीने राबविण्यात येत असलेली पुनर्वसन प्रक्रिया तातडीने रद्द करून नवीन पुनर्वसन प्रक्रिया राबविण्याबाबचे आदेश त्वरित निर्गमित करण्याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व याबाबतची शासनाची भूमिका.''

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(५) श्री. सचिन अहिर,** वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधले :-

'' दिनांक ८ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या पहाटे ५.०० च्या सुमारास नाशिक ते औरंगाबाद मार्गावर मिरची हॉटेलजवळ चिंतामणी ट्रॅव्हल्सच्या एका खाजगी बसला झालेला मोठा अपघात, अपघातानंतर या बसमध्ये आग लागून १२ प्रवाशांचा झालेला होरपळून मृत्यू, या अपघातात जवळपास ३८ प्रवासी गंभीर जखमी होणे, तर काहींची प्रकृती चिंताजनक असणे, त्याच दरम्यान नाशिक येथील सप्तशृंगी गड ग्रामपंचायत टोल नाक्याच्या जवळ महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळच्या एस.टी. बसला शॉर्ट सर्कीटमुळे लागलेली आग, राज्यात वाढत असलेले वारंवार रस्ते अपघात याबाबत पोलीस यंत्रणा विशेषतः परिवहन विभाग गंभीर नसणे, वाहन चालक बेधडकपणे प्रवासी कोंबून प्रवाशांकडून वाढीव भाडे वसूल करणे याबाबत शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया.''

परिवहन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक दुपारी १२-०१ वाजता स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२-१५ वाजता माननीय उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

(१) एका तारांकित प्रश्नांचे उत्तर देण्यात आले.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सत्तर प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

विधानसभेच्या विद्यमान दिवंगत सदस्या श्रीमती मुक्ताताई टिळक यांच्यावर पुणे येथील वैकुंठ स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार सुरू असल्यामुळे सभागृहाचे कामकाज ३० मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे. त्यानंतर शोकप्रस्ताव घेण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १२-२६ वाजता ३० मिनिटांसाठी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १२-५६ वाजता सुरू झाली.

३. माननीय उप सभापतींनी, विधानसभेच्या विद्यमान सदस्या श्रीमती मुक्ताताई टिळक यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवगंतांना श्रद्धांजली वाहिली.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला. प्रस्तावाची एक प्रत व विधिमंडळाचे स्मृतिपत्र शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

## सोमवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२२

महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न या विषयावर म.वि.प.नियम ९७ अन्वये सभागृहात चर्चा घेण्यात येणार असून या विषयावरील चर्चा ही मतदानाकरिता नसून भूमिका मांडण्यासाठी आहे, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी उपरोक्त चर्चा ही म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्तावामध्ये रूपांतरीत करावी, अशी मागणी केली.

श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स यांनी या विषयाबाबत आपले म्हणणे मांडले.

सदरहू प्रस्ताव माननीय मुख्यमंत्री विधानसभेच्या सभागृहात मांडणार असून माननीय उपमुख्यमंत्री सदरहू प्रस्ताव विधानपरिषदेच्या सभागृहात मांडणार आहेत, अशी माहिती संसदीय कार्यमंत्र्यांनी सभागृहास दिली.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेता यांनी पुढील अल्पकालीन चर्चा उपस्थित केली व भाषण केले-

“ महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नावर कर्नाटक सरकारकडून महाराष्ट्राबाबत वादग्रस्त विधाने करण्यात येत असणे, त्यावर महाराष्ट्र सरकारची प्रतिक्रिया, सन १९५६ साली झालेली भाषावार प्रांतरचनेमुळे मोठया प्रमाणात मराठी भाषिक जनता गेली ६६ वर्ष विविध मार्गांनी महाराष्ट्रात सामील होण्यासाठी अहिंसेच्या मार्गाने आंदोलन करत असणे, कर्नाटक सरकारने पोलिसांच्या मदतीने अनेक खोटे गुन्हे मराठी भाषिकांवर दाखल करण्यात आलेले असणे, सीमावर्ती भागातील मराठी भाषिकांना कृषी, पाणी, वीज, रस्ते, शिक्षण आणि आरोग्य आदी संबंधीच्या समस्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत असणे, मराठी भाषेत कोणतेही कागदपत्र न देणे, सीमावर्ती भागातील मराठी भाषिक जनतेला स्वतंत्र भारतात दुर्लक्षित घटकासारखे जीवन जगावे लागत असणे, मा. सर्वोच्च न्यायालयात सदर खटला प्रलंबित असतानाही कर्नाटक सरकारने बेळगाववर आपला हक्क सांगण्यासाठी खाजगी संस्थेच्या जागेत सन २००६ पासून अधिवेशन घेण्यास सुरुवात केलेली असणे, राज्यातील मंत्र्यांना व नेत्यांना बेळगावात येण्यास मनाई करण्यात आलेली असणे, काही कर्नाटक संघटनांकडून महाराष्ट्रातील वाहनांवर दगडफेक करुन दहशतीचे वातावरण निर्माण करणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष परिणामी सीमावर्ती भागातील मराठी भाषिक जनतेमध्ये निर्माण झालेला असंतोष.”

उपरोक्त चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

१ ) श्री. उद्धव ठाकरे

२ ) श्री. प्रवीण दरेकर

( भाषण पूर्ण ) ( चर्चा अपूर्ण )

**सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून ४७ मिनिटांनी दुपारी १२ वाजून ०५ मिनिटांपर्यंत स्थगित झाली.**

**स्थगितीनंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२ वाजून ०५ मिनिटांनी माननीय उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.**

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेता यांनी म.वि.प.नियम २८९ च्या अन्वये सूचना सभागृहास दिली असून या सूचनेतील विषयाची तातडी लक्षात घेता सदरहू विषय प्रश्नोत्तरांच्या तासानंतर घेण्यात येईल, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

प्रा. राम शिंदे, वि.प.स. यांनी, " आजच्या दिवसाच्या कामकाजातील तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील प्रश्नांचा क्रम बदलल्यामुळे यादीत पहिल्या क्रमांकावर वेगळाच प्रश्न छापलेला असणे", इ.बाबत कामकाजासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला.

ही बाब गंभीर असून याबाबत चौकशी करण्यात येईल, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

(१) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सहा प्रश्न उत्तरीत झाले.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एकोणपन्नास प्रश्न हे वेळेअभावी अतारांकित झाले.

२. उपसचिव यांनी, सोमवार, दिनांक १९ डिसेंबर,२०२२ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवली.

३. पुढील कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उपसभापतींनी जाहीर केले-

(१) महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) नुसार सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पाच्या संदर्भात जमा व खर्चाच्या अर्धवार्षिक आढाव्याचे निष्कर्ष दर्शविणारे विवरणपत्र

(२) मुंबई विद्यापीठ,यांचा सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या वर्षांचा वार्षिक अहवाल

(३) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचा सन २०२१ या वर्षाचा तेवीसावा वार्षिक अहवाल व सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे

(४) (१) " महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे सन २००४-२००५ ते सन २०१३-२०१४ या वर्षांचे वार्षिक अहवाल "

(२) " रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा अठरावा वार्षिक अहवाल"

(३) “ रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचे सन २०१७-२०१८ ते २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल ”

(४) “ पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचे सन २०१९-२०२० व २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे सतरावा व अठरावा वार्षिक अहवाल ”

(५) “ नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचे सन २०१९-२०२० व २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे सोळावा व सतरावा वार्षिक अहवाल ”

(६) “ औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा अठरावा वार्षिक अहवाल ”

(७) “ नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा एकोणिसावा वार्षिक अहवाल ”

(८) “ अहमदनगर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल”

(९) “ कापड बाजार आणि दुकाने मंडळ यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल ”

(१०) “ माल वाहतूक कामगार मंडळ बृहन्मुंबई यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल ”

(११) “ दि रेल्वे गुड्स क्लिअरिंग ॲण्ड फॉरवर्डिंग एस्टाब्लिशमेंट लेबर बोर्ड यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा चव्वेचाळीसावा वार्षिक अहवाल ”

(१२) “ दि खोका मेकिंग ॲण्ड टिंबर मार्केट लेबर बोर्ड, मुंबई यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल. ”

(१३) “ सातारा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचे सन २०१४-२०१५ ते २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल ”

(१४) “ सांगली जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचे सन २०१५-२०१६ ते २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे बत्तीसावा, तेहतीसावा, चौतीसावा, पस्तीसावा, व छत्तीसावा वार्षिक अहवाल”

(१५) “ इचलकरंजी माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ इचलकरंजी यांचे सन २०१९-२०२० व २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे सत्तावीसावा व अठ्ठावीसावा वार्षिक अहवाल ”

(१६) “ नाशिक जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ ( लासलगांव ) यांचे सन २०१९-२०२० ते २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे एकतीसावा व बत्तीसावा वार्षिक अहवाल ”

(१७) “ नाशिक माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नाशिक यांचे सन २०१९-२०२० ते २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे पस्तीसावा छत्तीसावा वार्षिक अहवाल ”

(१८) “ परभणी-हिंगोली जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, परभणी यांचे सन २००९-२०१० ते २०१६-२०१७ या वर्षांचे सहावा, सातवा, आठवा, नववा, दहावा, अकरावा, बारावा व तेरावा वार्षिक अहवाल ”

(१९) “बीड जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, बीड यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा चोवीसावा वार्षिक अहवाल ” सभागृहासमोर ठेवतील.

(२०) “ नागपूर व वर्धा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नागपूर यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा सत्तेचाळीसावा वार्षिक अहवाल ”

(२१) “ जालना जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, जालना यांचे सन २०१८-२०१९ ते २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे तीसावा, एकतीसावा व बत्तीसावा वार्षिक अहवाल ”

(२२) “ मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळ, मुंबई यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा छत्तीसावा वार्षिक अहवाल ”

(२३) “ महाराष्ट्र मच्छीमारी उद्योगातील मच्छीमार आणि इतर कामगार मंडळ यांचे सन २०१९-२०२० ते २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे सहावा व सातवा वार्षिक अहवाल ”

(२४) “ पुणे माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ यांचे सन २००५-२००६ ते २०१६-२०१७ या वर्षांचे अनुक्रमे सव्वीसावा, सत्तावीसावा, अठ्ठावीसावा, एकोणतीसावा, तीसावा, एकतीसावा, बत्तीसावा, तेहतीसावा, चौत्तीसावा, पस्तीसावा, छत्तीसावा व सदतीसावा वार्षिक अहवाल ”

(२५) “ पिंपरी चिंचवड माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचे सन २०१८-२०१९ ते २०१९-२०२० या वर्षांचे सत्तावीसावा व अठ्ठावीसावा वार्षिक अहवाल ”

(२६) “ अहमदनगर माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, अहमदनगर यांचे सन २०१९-२०२० ते २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल ”

(२७) “ औरंगाबाद माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, औरंगाबाद यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा एकोणतीसावा वार्षिक अहवाल ”

(२८) “ जळगाव जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, जळगाव यांचा सन २०२०- २०२१ या वर्षाचा अहवाल”

(२९) “ धुळे व नंदुरबार जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, धुळे यांचे सन २०१७-२०१८ ते २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे एकोणतीसावा, तीसावा, एकतीसावा वार्षिक अहवाल ” सभागृहासमोर ठेवतील.

(३०) “ लातूर, उस्मानाबाद जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचा सन २०२०- २०२१ या वर्षाचा तीसावा वार्षिक अहवाल ”

(३१) “ क्लिअरींग ॲण्ड फॉरवर्डिंग असंरक्षित गोदी कामगार मंडळ यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा तीसावा वार्षिक अहवाल ” व

(३२) “ नांदेड, माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नांदेड यांचा सन २०२० - २०२१ या वर्षाचा एकोणतीसावा वार्षिक अहवाल ”

(५) (क) “ डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा त्रेपन्नावा वार्षिक अहवाल”

(ख) “ डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचे सन २०१५-२०१६ व सन २०१६-२०१७ या वर्षाचे वार्षिक लेखे व लेखा परीक्षण अहवाल ” व

( ग ) “ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांचे सन २०१३-२०१४ ते सन २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक लेखे व लेखा परीक्षण अहवाल ”

(६) “ महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचा सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे सव्वीसावा व सत्तावीसावा अहवाल ”

**४.** उद्योग मंत्र्यांनी पुढील ठराव मांडला-

ज्याअर्थी, नागरी विमानचालन महासंचालक, नागरी विमानचालन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी, स्थायी आदेश क्रमांक ७२७ ( ई ), दिनांक ४ ऑक्टोबर १९९४ व्दारे प्रदान केलेल्या, वायुयान अधिनियम, १९३४ ( १९३४ चा २२ या अन्वये तयार केलेल्या वायुयान नियम, १९३७ याच्या नियम ७८ खालील अधिकारांचा वापर करून, सिंधुदुर्ग विमानतळ, सिंधुदुर्ग याकरिता, आयआरबी सिंधुदुर्ग एअरपोर्ट प्रायव्हेट लिमिटेड यास ‘ विमानतळ लायसन - सार्वजनिक हितार्थ वापरार्थ ’ दिले आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग येथील उक्त विमानतळाला " बॅ. नाथ पै विमानतळ, सिंधुदुर्ग" असे नाव देणे इष्ट आहे आणि त्या प्रयोजनार्थ, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांची मान्यता मिळाल्यानंतर, असा प्रस्ताव, भारत सरकारच्या नागरी विमानचालन मंत्रालयाकडे पाठवणे आवश्यक आहे;

त्याअर्थी आता, महाराष्ट्र विधानपरिषद नियमांच्या नियम १०६ नुसार, महाराष्ट्र विधानपरिषद याद्वारे, सिंधुदुर्ग येथील उक्त विमानतळाला " बॅ. नाथ पै विमानतळ, सिंधुदुर्ग " असे नाव देण्याची शिफारस भारत सरकारला करते.

ठराव प्रस्तुत झाला.

उपरोक्त ठरावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

१ ) श्री. जयंत प्र. पाटील        २ ) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते

उद्योग मंत्र्यानी उपरोक्त चर्चेस उत्तर दिले.

ठराव मतास टाकून संमत झाला.

५. (१) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.प.वि.क्रमांक ५- पिंपरी-चिंचवड विद्यापीठ, पुणे विधेयक, सभागृहाच्या अनुमतीने विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेता यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स. यांनी भाग घेतला.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी उपरोक्त चर्चेस उत्तर दिले.

उपरोक्त विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खंडश : विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(२) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.प.वि.क्रमांक ६ – युनिव्हर्सल ए.आय. विद्यापीठ, कर्जत विधेयक, सभागृहाच्या अनुमतीने विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेता यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स. यांनी भाग घेतला.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी उपरोक्त चर्चेस उत्तर दिले.

उपरोक्त विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खंडश : विचारात घेण्यात आले.

खंडश : विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेता यांनी म.वि.प.नियम २८९ अन्वये " वाशिम येथील ३७.१९ एकर गायरान जमीन बेकायदेशीररीत्या तत्कालीन महसूल राज्यमंत्री तसेच विद्यमान कृषि मंत्री यांना दिल्याप्रकरणी नागपूर उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेला आदेश" इ. बाबत म.वि.प.नियम २८९ अन्वये दिलेल्या सूचनेसंदर्भात आपले म्हणणे मांडले.

श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स.यांनी देखील याबाबत आपले म्हणणे मांडले.

माननीय उपसभापतींनी सदरहू सूचनेस अनुमती नाकारली.

सदरहू सूचनेवरून सभागृहात पुन्हा गोंधळसदृश वातावरण निर्माण झाल्यामुळे माननीय उपसभापतींनी सभागृहाची बैठक दिवसभराकरिता स्थगित केली.

**मंगळवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२२**

**१) श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.**

" महाराष्ट्र शासनाच्या सर्व शासकीय विभागातील सरळ सेवेची भरती प्रक्रिया सन २०१९ पासून आज अखेरपर्यंत घेण्यात आलेली नसणे, तथापि, त्यासंदर्भात सरळसेवा पदभरतीबाबतची एकही जाहिरात देण्यांत आलेली नसणे, शासनाने सदर परीक्षेकरिता दिनांक १७/१२/२०२१ पर्यंत वयोमर्यादा संपणाऱ्या उमेदवारांना परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात आलेली असणे, परंतु अद्यापपर्यंत सरळसेवा पदभरतीची जाहिरात आलेली नसल्याकारणाने उमेदवार विद्यार्थी परीक्षेस बसण्यास अपात्र होत असल्याचे निदर्शनास येणे, वास्तविक महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २०१९ पासून गेल्या ३ वर्षांच्या कालावधीमध्ये घेण्यात आलेल्या परीक्षांबाबत ज्या ३-४ जाहिराती प्रसिद्ध करण्यात आल्या त्यामध्ये ३० ते ४० जागा

दिव्यांगाच्या सर्व संवर्गामध्ये भरण्यात आल्या असल्याचे निदर्शनास आलेले असणे, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्वसाधारण उमेदवारांसाठी दिनांक १७/१२/२०२१ च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेऊन दिनांक १७/१२/२०२१ पर्यंत वय संपलेले उमेदवार यांना दिनांक ३१/१२/२०२२ पर्यंत संधी देण्यात यावी, असे परिपत्रक काढण्यांत आलेले असणे, परंतु शासनाने दिव्यांग उमेदवारांच्या बाबतीत वेगळा निर्णय घेतला असल्याचे निदर्शनास येणे, परिणामी, शासनाने दिनांक १७/१२/२०२१ च्या परिपत्रकामध्ये शुद्धिपत्रक काढून दिनांक ३१/१२/२०२२ पर्यंत विहित वयोमर्यादा संपणाऱ्या उमेदवारांना दिनांक ३१/१२/२०२३ पर्यंत अर्ज करण्याची अनुमती देण्यात यावी म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या भरतीमध्ये त्यांना संधी मिळेल व त्यांच्यावर अन्याय होणार नाही अशी सर्वसाधारण उमेदवारांनी शासनाकडे मागणी करण्यांत येणे, तथापि,अद्यापही शासनस्तरावर कार्यवाही न होणे, त्यामुळे त्याबाबत आंदोलन करण्याची या उमेदवारांवर आलेली पाळी, सदर मागणी प्रकरणी शासनाने कार्यवाही करुन सर्वसाधारण (खुल्या) वर्गांतील उमेदवारांना न्याय देणे आवश्यक असणे व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया. ”

शालेय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**२) सर्वश्री अभिजित वंजारी व इतर वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.**

**डॉ. वझाहत मिर्झा, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले.**

“ राज्यातील इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना ज्यात प्रामुख्याने मुस्लीम, बौद्ध, जैन, पारसी, शीख विद्यार्थ्यांचा समावेश असणे, अशांना प्री-मॅट्रिक स्कॉलरशिप योजनेतून केंद्र सरकारमार्फत दरवर्षी एक हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जात असणे, यावर्षी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर अर्ज भरून घेणे व पडताळणी करून केंद्राकडे पाठविण्याची जबाबदारी शिक्षण संचालक (योजना) कार्यालयाकडे दिली जाणे, सुरुवातीला अत्यल्प अर्ज भरले गेल्याने संचालनालयाने ३१ ऑक्टोबरपर्यंत मुदत वाढवून देणे, त्यानंतर पुन्हा ५ नोव्हेंबर पर्यंत मुदत वाढविण्यात येणे, मात्र आता विद्यार्थ्यांनी भरलेले अर्ज शाळा स्तरावर प्रमाणित झाल्यानंतर नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर अचानक अर्ज रद्द करण्याचे परिपत्रक जारी करणे, या परिपत्रकानुसार पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांना आर.टी.ई. नुसार मोफत शिक्षणाचा लाभ दिला जात असल्याने त्यांना प्री-मॅट्रिक शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाणार नसणे, केवळ नववी आणि दहावीतील विद्यार्थ्यांचेच अर्ज प्रमाणित करणे, त्यामुळे राज्यातील पहिली ते आठवीचे अल्पसंख्याक समाजातील राज्यातील सुमारे १० लाख विद्यार्थी शिष्यवृत्तीला मुकणे, परिणामी अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थी व पालक वर्गात निर्माण झालेली तीव्र असंतोषाची भावना, अल्पसंख्याक समाजाकडून

केंद्र सरकारच्या या निर्णयाविरोधात राज्यभर निदर्शने करण्यात येणे, सदर शिष्यवृत्ती योजना पूर्ववत करण्याची सातत्याने मागणी अल्पसंख्याक समाजाकडून होत असणे, केंद्र सरकारचा हा निर्णय अन्यायकारक असल्याने पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती पूर्ववत सुरू ठेवावी तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन म्हणून शिष्यवृत्ती रक्कमही वाढविण्यासाठी केंद्र शासनाकडे राज्य सरकारने मागणी करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.''

शालेय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**३) श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.**

'' मुंबई घाटकोपर येथील रेल्वे पोलीस वसाहतीच्या सीटीएस क्र.१९४A/६ व १९४४A/७७या आरक्षित भूखंडावर गृह खात्याची व महसूल खात्याची परवानगी न घेता अनधिकृत पेट्रोलपंप उभारला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ च्या पहिल्या आठवडयात वा त्या सुमारात निदर्शनास येणे, सदर मौजे घाटकोपर येथील भूखंड गृह विभाग, रेल्वे पोलीस वसाहत व रेल्वे हेडक्वाटर्स यांच्या वापरासाठी मे.क.सो यांचेकडील ऑर्डर नं. AC/LND/SR-V/७५५ दिनांक २१/०२/१९६४ नुसार पोलीस वसाहतीसाठी देण्यात येणे, सदर जागेचा अन्य कामासाठी उपयोग करावयाचा नाही, जर गृह विभागाला सदर जागा नको असेल तर ती महसूल खात्याकडे परत देण्याची आहे, असे स्पष्ट आदेश देण्यात येणे, या संदर्भात विविध संघटनांनी तलाठी, घाटकोपर यांच्या अहवालानुसार अभिलेख अहवाल तपासले असता सदर पेट्रोल पंपासाठी परवानगी दिल्याची कागदपत्रे राज्य शासनाकडील/जिल्हाधिकारी यांच्याकडील ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आल्याची नोंद नसल्याची बाब आढळणे, सदर जागेवर भारत पेट्रोलियम यांच्या पंपाचे काम पूर्ण होऊन पंप विनापरवाना चालू असणे, याबाबतीत सदर आरक्षित भूखंडावर बृहन्मुंबई महानगर पालिका विकास नियंत्रण नियमावली २०३४ नुसार राखीव जागेसंदर्भातील आरक्षण बादलण्यासाठी महापालिका आयुक्त यांची परवानगी तसेच महसूल खाते व गृह खात्याची ना-हरकत प्रमाणपत्र न सादर करता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव (विशेष) यांनी बांधकामाच्या परवानग्या कशाच्या आधारावर दिल्या हे अनाकलनीय असणे, त्यामुळे मुंबई घाटकोपर येथील रेल्वे पोलीस वसाहतीच्या सीटीएस क्र.१९४A/६ व १९४४A/७ या आरक्षित भूखंडावर गृह खात्याची व महसूल खात्याची परवानगी न घेता अनधिकृत पेट्रोलपंप उभारणे यावर शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया.''

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**४) श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.**

" महापालिकेच्या मालमत्ता करातून राज्यातील सर्व खाजगी शिक्षण संस्थांना अनुदानित, विनाअनुदानित असा भेदभाव न करता वगळण्याची आवश्यकता असणे, एसआरए अंतर्गत शाळांच्या पुनर्विकासासाठी शासनाने एफएसआय संदर्भात केलेली तरतूद मुंबईच्या नवीन विकास नामावलीत पुनर्स्थापित करण्याची आवश्यकता असणे, महापालिकेच्या शालेय इमारतीमध्ये खाजगी शाळांच्या वर्गाकरीता भाडेतत्त्वावर घेतलेल्या वर्गखोल्यांसाठी सवलतीच्या दरात वार्षिक भाडे आकारण्याची आवश्यकता असणे, महापालिकेच्या वर्गखोल्यात भरणाऱ्या रात्रशाळांना भाडे पूर्णपणे माफ करण्याची गरज असणे, मुंबईतील खाजगी प्राथमिक अनुदानित शाळेतील शिक्षकांना एमईपीएस अथवा ग्रँटीनियन कोड लागू करुन मुंबई महानगरपालिकेतील मान्यताप्राप्त १०४ खाजगी प्राथमिक शाळांना १०० टक्के अनुदान देण्याची आवश्यकता असणे, मुंबई महापालिका व खाजगी शिक्षण संस्था संचलित प्राथमिक शाळांना सातवा वेतन आयोग लागू करणे, सन २०२२ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधी सूचनेवर दिलेल्या आश्वासनांची पूर्तता न करणे, महापालिकेत १० वर्षे पूर्ण करणाऱ्या लिपिक व लेखा परीक्षकीय कामगारांना विनाअट कालबद्ध रिक्त पदावर नियमित पदोन्नती देणे, मुंबई महापालिकेतील कामगार, कर्मचारी, अधिकाऱ्यांना आणि त्याच्या कुटुंबीयांना रु. १० लाख संरक्षण असलेली वैद्यकीय गटविमा योजना लागू करणे, महापालिकेतील विविध संवर्गातील ४७ हजार रिक्त पदे भरण्याची गरज,जतसेच इंडियन कौन्सिल अथवा इंडियन मेडिकल कौन्सिलने प्रस्तृत केलेल्या सर्व आस्थापनेवर परिचारिकांची पदे निर्माण करुन रिक्त पदे भरणे, सफाई खाते, मलनिःसारण खाते,बाजारखाते व रुग्णालयातील कामगार मानवी मलमूत्र व इतर घाणीशी संबंधित कामकाज करत असल्याने त्यांच्या वारसांना शैक्षणिक अर्हतेमुळे पालिकेत नोकरी आणि मोफत हक्काची घरे देण्याची आवश्यकता असणे, यामुळे महानगरपालिकेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सफाई कामगार, कर्मचारी आणि अधिकारी यांच्यामध्ये पसरलेला प्रचंड असंतोष आणि संताप याबाबत शासनाची भूमिका आणि करावयाची कार्यवाही. "

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**५) प्रा. राम शिंदे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले.**

" कर्जत तालुक्यात (जि.अहमदनगर) अनेक अनधिकृत खडीक्रशचर असून त्यामुळे शासनाच्या करोडो रुपयांच्या महसूलाची हानी होण्याबरोबरच पर्यावरणाचा ऱ्हास होत असणे, सदर प्रकरणी Wild Life Protection Act, १९७२ चे ही उल्लंघन होत असल्यामुळे तहसीलदार, कर्जत यांनी चौकशी करुन

जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना तालुक्यातील अनधिकृत खडीक्रशचरबाबत व त्यांच्यावर लावलेल्या दंडाबाबतचा अहवाल दिलेला असणे, उक्त प्रकरणी तालुक्यामध्ये एकही अधिकृत खडीक्रशचर नसताना महसूल अधिकारी यांच्याशी संगनमत करून रात्री अपरात्री मोठ्या प्रमाणावर अनधिकृत उत्खनन केले जात असल्याचे निदर्शनास येणे, कर्जत तालुक्यातील अनधिकृत खडीक्रशचर प्रकरणाची मा. निवृत्त न्यायाधीश, उच्च न्यायालय यांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरण अधिकारी व खनिकर्म अधिकारी यांच्यासह त्रिसदस्यीय उच्च समितीमार्फत चौकशी करून दोषींवर तत्काळ कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३१.१०.२०२२ रोजी बंदरे व खनिकर्म मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे केली असणे, सदर मागणीनुसार चौकशी करून दोषींवर तत्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाची प्रतिक्रिया. ”

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**६) श्री. प्रवीण दटके, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले.**

“ हाफकिनच्या कार्यप्रणालीमुळे रुग्णालयांना अडचणींचा सामना करावा लागत असणे, दैनंदिन सर्जिकल साहित्य मागणीनंतर पुरवठ्यामध्ये साधारण वर्षभराचा फरक वाढल्याने तुटवडा होऊन रुग्णसेवेत अडचणी येत असणे, हाफकिनची खरेदी प्रणाली अत्यंत वेळ खाऊ असून संचालनालय येथे करण्यात येणारी मागणी ते डीएमई मार्फत पडताळणी होऊन प्रशासकीय मान्यतेसाठी पाठवणे नंतर हाफकिन महामंडळाद्वारे निविदा प्रक्रिया राबवणे अशा किचकट प्रक्रियेमुळे प्रत्यक्ष पुरवठ्यात विलंब होत असणे, संस्था स्तरावर वस्तू व पुरवठा लेखाशीर्ष २९ मधून प्राप्त निधीतून ९०%निधी हाफकिन महामंडळाकडे वर्ग झाल्यानंतर ८००% साहित्य प्राप्त होणे अपेक्षित असताना उर्वरित १०%टक्के निधीतून औषधी तसेच सर्जिकल साहित्य प्राप्त होण्यास अडचणी येत असणे, रुग्णांची गैरसोय होत असल्यास निदर्शनास येत असणे, याबाबत लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे तक्रार केलेली असणे, सदर मंडळाचे बळकटीकरण करणे, मनुष्यबळाची अडचण दूर करून ऑनलाइन प्रणाली गतिशील करणे, वस्तू पुरवठा अबाधित राहण्यासाठी अंदाजपत्रक रुग्णसंख्या व प्रत्यक्ष खाटाच्या संख्येवर ठरवणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ”

वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**७) श्री. महादेव जानकर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले.**

“ शासनाने सहायक प्राध्यापक पदभरती संदर्भात दिनांक १२ नोव्हेंबर, २०२१ व एप्रिल, २०२२ च्या शासन निर्णयानुसार २०८८ पदांच्या भरतीला त्वरित परवानगी देण्याबाबत व २०२२ पर्यतची सर्व रिक्त पदे १०० टक्के भरण्यात यावी, तसेच तासिक तत्त्वावरील मानधन वाढीसंदर्भात, व दिनांक १ ऑक्टोबार,२०१७ च्या आकृती बंधाला अंतिम मान्यता देऊन १०० टक्के प्राध्यापक पदभरती करण्याबाबतच्या प्रमुख मागण्या अद्यापि प्रलंबित असल्याचे नुकतेच माहे नोव्हेंबर,२०२२ मध्ये उघडकीस येणे, राज्यात गेल्या १० वर्षामध्ये प्राध्यापक पदभरती नियमित व पूर्ण क्षमतेने झालेली नसल्याचे उघडकीस येणे, ७५ टक्के भरतीला परवानगी असतानाही नियमित भरती केलेली नसणे, सन २०१४ पासून आजपर्यत प्राध्यापक पदभरती सातत्याने कपात करण्यात येणे, सन २०१७ पासून महाराष्ट्र नवप्राध्यापक संघटनेने महाराष्ट्रातील उच्चशिक्षित तरुण NET, SET, PH.D पात्रता धारकांना न्याय मिळावा, विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे याकरिता रस्त्यावर उतरुन आंदोलने केलेली असणे, आतापर्यत केवळ २ ते ३ हजार प्राध्यापकांची भरती शासनाने केलेली असणे, अद्याप हजारो जागा रिक्त असणे, दिनांक २५ मे, २०१७ ला आकृतीबंधाच्या नावाखाली प्राध्यापक पदभरतीवर बंदी घालण्यात येणे, उच्च शिक्षणातील अशासकीय, शासकीय,अकृषी विद्यापीठातील आकृतीबंध मंजुरीसाठी भरती बंद केली त्यानंतर दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ चा आकृतीबंधानुसार दिनांक ३ नोव्हेंबर,२०१८ साली दिनांक १ ऑक्टोंबर, २०१७ च्या आकृती बंधाला उच्च स्तरीय सचिव समितीने तत्वता मान्यता देण्यात येणे, त्यानुसार अध्यापक संवर्गातील (सहायक प्राध्यापक) एकूण रिक्त पदांच्या ४० टक्केनुसार ३५८० पदांच्या भरतीला मान्यता देण्यात येणे, ठेव या पदांची भरती सुरू होती परंतु कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर दिनांक ४ एप्रिल, २०२० रोजी या भरतीला देण्यात आलेली स्थगिती, परंतु कोव्हिड-१९ संपल्यानंतरही भरती सुरु होत नसल्याने दिनांक १९ एप्रिल, ते १६ सप्टेंबर, २०२१ दरम्यान नवप्राध्यापक संघटनेच्या वतीने शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे यांच्या कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणे, सदर आंदोलनादरम्यान तत्कालीन उच्च शिक्षणमंत्री यांनी दोन महिन्यांत प्राध्यापक पदभरती सुरू करण्याचे दिलेले आश्वासन, कोव्हिड-१९ मध्ये बंद पडलेली भरती सुरु करण्यांसदर्भात दिनांक ३ नोव्हेंबर,२०१८ ला २०८८ उर्वरित पदांच्या भरतीला परवानगी देऊन शासन निर्णय पारित करण्यात येऊन पाच वर्षाहून अधिक कालावधी उलटूनही अद्याप पदे भरण्यात आलेली नसणे, त्यामुळे विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान, प्राध्यापकांच्या प्रमुख मागण्यांसदर्भात महाराष्ट्र नव प्राध्यापक संघटनेने अनेक आंदोलन व उपोषणे, करूनही याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने सहा.प्राध्यापक पदभरती संदर्भात दिनांक १२ नोव्हेंबर,२०२१ व एप्रिल, २०२२ च्या शासन निर्णयानुसार २०८८ पदांच्या भरतीच्या त्वरित देण्याबाबत व २०२२ पर्यतची सर्व रिक्त पदे १०० टक्के भरण्यात यावी, तसेच तासिक तत्वावर मानधन वाढीसंदर्भात, व १ ऑक्टोबर, २०१७७ च्या आकृतीबंधाला

अंतिम मान्यता देऊन १०० टक्के प्राध्यापक पदभरती करण्याबाबत सत्वर निर्णय घेऊन प्राध्यापकांच्या प्रमुख मागण्या मान्य करण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. "

उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून ४७ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२-०० वाजता माननीय उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१. (अ) तीन तारांकित प्रश्न उत्तरित झाले.

(ब) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील चव्वेचाळीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

२. (१) मुख्यमंत्र्यांनी, खालील अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवले -

(क) " शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (सिडको) यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल "

(ख) " महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक अहवाल"

(ग) " महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक लेखापरीक्षण अहवाल".

(घ) " महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा हिशेब व हिशेब तपासणी अहवाल "

(ङ) " महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ पनचक्की, औरंगाबाद यांचे सन २००२-२००३ ते सन २००८-२००९ या वर्षांचे वार्षिक अहवाल "

(२) २उप मुख्यमंत्री, खालील अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवले -

(क) " सन २००१-२००२ च्या आठव्या अहवालातील परिच्छेद १.२८ नुसार मंत्रालयीन सर्व विभागांनी केलेल्या सन २०२१-२०२२ या वित्तीय वर्षातील पुनर्विनियोजनाबाबतच्या माहितीचे एकत्रित विवरणपत्र "

(ख) " महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल"

(३) पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्र्यांनी, खालील अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवले-

(क) “ पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा बेचाळीसावा वार्षिक अहवाल ”

(ख)“ महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित, मुंबई (महानंद दुग्धशाळा) यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वैधानिक लेखा परीक्षण अहवाल ”

(४) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, खालील अहवाल आणि अधिसूचना सभागृहाच्या पटलावर ठेवल्या

(क) “ गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल ”

(ख) “ कवयित्री बाहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा एकतीसावा वार्षिक अहवाल ”

(ग) “ महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ (२०२२ चा १७) चे कलम ३ मधील पोट-कलम (१) अन्वये राज्य शासनाने स्थापन केलेल्या, चालविलेल्या तसेच अनुदान दिलेल्या शैक्षणिक संस्थामधील अध्यापक संवर्गातील सर्व विषयातील मंजूर पदांना संवर्गनिहाय आरक्षण लागू करणारी अधिसूचना क्रमांक संकीर्ण २०१९ / प्र.क्र.९४ / १९ / विशि-१ दिनांक ७ एप्रिल,२०२२ ”

(घ) “ उच्च व तंत्र शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक रूसाये- २०१९ / प्र.क्र. १८६ / -३, दिनांक ३० ऑक्टोबर,२०१९ अन्वये हैदराबाद (सिंध) नॅशनल कॉलेजिएट समूह विद्यापीठ फंडाची तरतूद प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक संकीर्ण-२०१९ / प्र.क्र.१८५ / विशि-३, दिनांक २८ ऑक्टोबर, २०२१ ”

(५) आदिवासी विकास मंत्र्यांनी, “ शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा विसावा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवला.

(६) उद्योग मंत्र्यांनी, खालील अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवले -

(क) “ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक हिशोब ”

(ख) “ महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा सत्तावन्नावा वार्षिक अहवाल ”

(ग) “ महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळयांचे सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ या वर्षांचा वार्षिक अहवाल ”

(घ) “ मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा चोपन्नावा वार्षिक अहवाल ”

(ङ) " विदर्भ विकास महामंडळ मर्यादित, नागपूर यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचा एकावन्नावा वार्षिक अहवाल.

३. श्री. नरेंद्र दराडे, समिती सदस्य, यांनी विधान परिषद सदस्य अनुपस्थिती समितीचा (२०२१-२०२२) दुसरा अहवाल सभागृहाला सादर केला.

४. (क) म.वि.प. ९३ अन्वये प्राप्त झालेली, सन्माननीय सदस्य सर्वश्री. बाळाराम पाटील, जयंत प्र. पाटील, शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांबाबत संसदीय कार्य मंत्र्यांनी योग्य ती कार्यवाही करावी, अशी सूचना माननीय उप सभापतींनी केली.

शुक्रवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२२, सोमवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२२ व मंगळवार दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजीच्या प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य केलेल्या सूचना सभागृहाच्या सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उपसभापती यांनी घोषित केले.

शुक्रवार, दिनांक २३ डिसेंबर,२०२२, सोमवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२२ व मंगळवार दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजीच्या प्राप्त झालेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना तसेच औचित्याचे मुद्दे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी, " लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने जशी निवेदने मिळतात त्याच धर्तीवर नियम ९३ अन्वये सूचना उपस्थित केल्यानंतर निवेदने मिळाली पाहिजे, " इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स. यांनी, " पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील सुकापूरर या गावात इमारतीचा स्लॅब कोसळून मृत पावलेल्या कु. शुभम राजभर याच्या कुटुंबाला मदत जाहीर करणे तसेच या भागातील धोकादायक इमारती दुरूस्ती करण्यासाठी नैना प्राधिकरणाची मान्यता घ्यावी लागत असल्याने सिडको-नैना प्रकल्प रद्द करणे, " इ. बाबत दिलेल्या नियम ९३ अन्वये सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींच्या निदेशानुसार राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

२) श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांनी, " सिरोंचा (जि. गडचिरोली) तालुक्यातील मेडीगड्डा धरणग्रस्त शेतकऱ्यांनी त्यांच्या अधिग्रहित जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी केलेले आंदोलन," इ. बाबत दिलेल्या नियम ९३ अन्वये सूचनेस अनुलक्षून माननीय उपसभापतींच्या निदेशानुसार राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

३) श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांनी, " मौजे रोडपाली (ता. पनवेल, जि.रायगड) येथील बौद्धवाडी सेक्टर १८ येथील भूखंडावर करण्यात आलेले अतिक्रमण, " इ. बाबत दिलेल्या नियम ९३ अन्वये सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींच्या निदेशानुसार राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

४) सर्वश्री. शशिकांत शिंदे व इतर वि.प.स. यांनी, " राज्य शासनाने गायरान जमिनीवरील बेकायदा बांधकामे हटविण्याचा निर्णय घेतल्यामुळे बाधित नागरिकांनी आंदोलन करणे," इ. बाबत दिलेल्या नियम ९३ अन्वये सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींच्या निदेशानुसार महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

५) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी, " राज्यातील विविध भागात अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान होऊनही शेतकरी अद्यापपर्यंत आर्थिक मदतीपासून वंचित राहणे, " इ. बाबत दिलेल्या नियम ९३ अन्वये सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींच्या निदेशानुसार राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

६) श्री. एकानाथराव खडसे, वि.प.स. यांनी, " राज्यातील पोलीस पाटील यांच्या विविध मागण्या, " इ. बाबत दिलेल्या नियम ९३ अन्वये सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींच्या निदेशानुसार राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

७) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स. यांनी, " औरंगाबाद जिल्ह्यात महिला कृषी महाविद्यालय स्थापन करणे, " इ. बाबत दिलेल्या नियम ९३ अन्वये सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींच्या निदेशानुसार कृषी मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

८) आजच्या कामकाज पत्रिकेत अनुक्रमांक ९ अंतर्गत दर्शविण्यात आलेल्या सन्माननीय सदस्य श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी यांच्या सूचना क्रमांक ८८ " जालना जिल्ह्यातील वाटूर ते परभणी जिल्ह्यातील चारठाणा या रस्त्याच्या कामाच्या दर्जाबाबत," दिलेल्या नियम ९३ अन्वये सूचनेवरील निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उपसभापतींनी घोषित केले.

९) श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी, " राज्यातील इंग्रजी माध्यमांच्या विनाअनुदानित शिक्षण संस्थांच्या शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समस्या," इ. बाबत दिलेल्या नियम ९३ अन्वये सूचनेस अनुलक्षून माननीय उपसभापतींच्या निदेशानुसार शालेय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

५. मुख्यमंत्र्यांनी, म.वि.प. नियम १०६ अन्वये पुढील ठराव मांडला व भाषण केले.

" ज्याअर्थी, नोव्हेंबर, १९५६ मध्ये राज्यांची पुनर्रचना झाल्यानंतर तत्कालीन मुंबई राज्यातील बेळगाव (चंदगड तालुका वगळून) विजापूर, धारवाड व कारवार हे मराठी भाषिक जिल्हे पूर्वीच्या म्हैसूर राज्यात विलीन करण्यात आले. महाराष्ट्राने खेडे हे एक घटक, भौगोलिक सलगता, मराठी किंवा कन्नड भाषिक लोकांची सापेक्ष बहुसंख्या व लोकेच्छा या सूत्रानुसार फेररचनेची मागणी करून कर्नाटकातील ८६५ सीमावादीत गावांवर दावा सांगितला आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य शासनाने दावा केलेली ८६५ गावे महाराष्ट्रात समाविष्ट व्हावी म्हणून महाराष्ट्र शासनाने केंद्र शासन व कर्नाटक राज्य शासन यांच्याविरुद्ध मा. सर्वोच्च न्यायालयात दिनांक २९.०३.२००४ रोजी मूळ दावा क्र.४/२००४ Originsl Suit दाखल केला आहे. मा. सर्वोच्च न्यायालयात अंतरिम अर्ज क्र. IA १ / २०१४ वर सुनावणी अंती दि. १२ सप्टेंबर २०१४ रोजी, दाव्यातील साक्षी, पुरावे नोंदविण्यासाठी मा. कोर्ट कमिशनर म्हणून मा. श्री. मनमोहन सरीन, भूतपूर्व मुख्य न्यायाधीश जम्मू काश्मीर यांची नियुक्ती केली. परंतु सदर दि.१२ सप्टेंबर २०१४ रोजी पारित केलेल्या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशात सुधारणा करावी या मागणीसह कर्नाटक शासनाने दि. ०६ डिसेंबर २०१४ रोजी अंतरिम अर्ज क्र. IA १२/२०१४ मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केला आहे. सदर सीमावादाचा प्रश्न न्यायप्रविष्ट असून ही कायदेशीर लढाई महाराष्ट्र शासन सर्व ताकदीने लढत आहे. महाराष्ट्राच्या बाजूने खटला चालविण्यासाठी या क्षेत्रातील अनुभवी असणारे ज्येष्ठ, अनुभवी व नामांकीत विधिज्ञांची पॅनलवर नियुक्ती केली आहे.

आणि ज्याअर्थी, सीमा भागातील प्रश्न, सीमा भागातील लाखो मराठी भाषिकांवर तेथील प्रशासनाकडून वर्षोनुवर्ष होणारे अन्याय, मराठी भाषिकांना मिळत असलेली दुय्यम वागणूक, त्यांचेवर अत्याचार केले जाणे, त्यांच्या जीविताचा प्रश्न गंभीर होणे, इतकेच नव्हे तर मा. समन्वयक मंत्री, सीमाप्रश्न यांनाच कर्नाटकमध्ये प्रवेश करण्यास कर्नाटक प्रशासनाकडून बंदी घालणे, मराठी भाषिकांनी आता पर्यंत शांततेने काढलेल्या अनेक पदयात्रांवर कर्नाटक पोलिसांनी अमानुषपणे लाठीमार करणे, त्यांची आंदोलने चिरडण्याचा प्रयत्न करणे व महाराष्ट्र राज्यातील वाहनांवर हल्ले करणे, तेथील मराठी भाषिकांच्या जमिनी स्थानिक विकास प्राधिकरणांकरिता संपादित करून त्याचे भूखंड कन्नड भाषिकांना वितरीत करणे, तसेच अल्पसंख्य आयोगाने व मा. उच्च न्यायालयांनी दिलेल्या मराठीसह दोन्ही भाषांमध्ये स्थानिक प्राधिकरणातील दिली

जाणारी शासकीय सर्व कागदपत्रे आदेशाची अंमलबजावणी न करता स्थानिक मराठी भाषिकांची संख्या कमी करण्यासाठी प्रयत्न करणे इ. बाबी कर्नाटकातील स्थानिक प्रशासनाकडून जाणीवपूर्वक केला जात आहे. या सर्व बाबींवर केंद्र शासनाने हस्तक्षेप करण्यासाठी दि.१४ डिसेंबर २०२२ रोजी मा. केंद्रीय गृहमंत्री यांनी नवी दिल्ली येथे कर्नाटकचे मुख्यमंत्री आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री यांच्या बैठकीत दोन्ही राज्यांमध्ये समन्वय ठेऊन मा. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईपर्यंत वाद न वाढविता शांतता ठेवण्याकरिता एकमत केले असताना देखील विपरित भूमिका कर्नाटक शासनाने घेतलेली आहे. दरम्यान कर्नाटक विधिमंडळाने एकही इंच जमीन न देण्याच्या दि.२२ डिसेंबर २०२२ रोजी केलेल्या ठरावामुळे सीमावादाला चिथावणी देण्याचे काम कर्नाटक सरकारकडून जाणीवपूर्वक केले जात असून कर्नाटक शासनाची ही भूमिका लोकशाही संकेतास धरून नाही. एकाच देशातील दोन राज्यांमध्ये सौहार्दाचे वातावरण, शांततेचे वातावरण राहावे यासाठी महाराष्ट्राने अत्यंत खंबीरपणे व सर्व शक्तीनिशी या बाबतचा कायदेशीर लढा सनदशीर मार्गाने सुरू ठेवला आहे. मा. सर्वोच्च न्यायालयात आपले लोक महाराष्ट्राची भूमिका ठामपणे मांडतील.

आणि ज्याअर्थी, सद्य:स्थितीत कर्नाटक राज्यात असलेल्या सीमा भागातील ८६५ मराठी भाषिक खेडे घटक, भौगोलिक सलगता, मराठी भाषिक लोकांची सापेक्ष बहुसंख्यता व महाराष्ट्रात समाविष्ट होण्यासाठीची तेथील लोकेच्छा या तत्त्वांचा महाराष्ट्र राज्याने नेहमीच आदर केला आहे. त्याअनुषंगाने त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक उन्नतीसाठी विविध सोईसुविधा व सवलती उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यात मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या लाभांबरोबरच अभियांत्रिकी/वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशासाठी विशेष सवलत, भारतीय प्रशासकीय सेवा पूर्वप्रशिक्षणासाठी सवलत, सारथी व अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ व इतर शासकीय संस्थांच्या मार्फत विहित अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

त्याअर्थी आता महाराष्ट्र विधानपरिषद याद्वारे कर्नाटक प्रशासनाच्या मराठी विरोधी प्रवृत्तीचा तीव्र शब्दांत धिक्कार करीत आहे, तीव्र शब्दात निषेध करण्याबरोबरच महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०६ नुसार, -

१. कर्नाटकातील बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर, भालकीसह मराठी भाषिक ८६५ गावांची इंच न इंच जागा तिथल्या मराठी भाषिक नागरिकांसह कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रात समाविष्ट करण्यासाठी आवश्यक तो सर्व कायदेशीर पाठपुरावा सर्वोच्च न्यायालयात करण्यात येईल.

२. मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेला सीमावाद हा सनदशीर मार्गाने अत्यंत खंबीरपणे दृढ निश्चयाने व संपूर्ण ताकदीनिशी लढला जाईल.

३. ८६५ गावातील बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर, भालकीसह मराठी भाषिक जनतेसोबत महाराष्ट्र शासन खंबीरपणे निर्धाराने व सर्व ताकदीनिशी त्यांच्या पाठीशी उभे आहे.

४. तसेच याबाबत केंद्र शासनाने मा. गृह मंत्री भारत सरकार यांच्या बैठकीत झालेल्या निर्णयाची अमंलबजावणी करण्याचा आग्रह कर्नाटक शासनाकडे धरावा तसेच सीमा भागातील मराठी जनतेच्या सुरक्षिततेची हमी घेण्याबाबत कर्नाटक सरकारला समज द्यावी, असा ठराव ही विधानपरिषद आज निर्धारपूर्वक एकमताने पारित करीत आहे. ''

ठराव प्रस्तुत झाला.

ठराव एकमताने संमत झाला.

उपरोक्त ठरावावर खालील सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

१) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते २) श्री. जयंत प्र. पाटील

३) श्री. एकनाथ खडसे

सभागृहाची बैठक ३० मिनिटांसाठी स्थगित करत असल्याचे उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून ०१ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून ३० मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी, '' सभागृहात एकही माननीय मंत्री किंवा राज्यमंत्री उपस्थित नसणे, '' इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

सभागृहामध्ये माननीय मंत्री किंवा राज्यमंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक १० मिनिटांसाठी स्थगित करत असल्याचे उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून ३० मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून ४० मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

६. आजच्या कामकाजपत्रिकेत दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १ श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांची असून सदरहू लक्षवेधी सूचना उद्या चर्चेला घेण्याची विनंती महसूल मंत्र्यांनी केली असल्यामुळे ही लक्षवेधी सूचना उद्या घेण्यात येईल, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

१) श्री. जयंत आसगावकर, वि.प.स. यांनी, '' कोल्हापूर येथील कदमवाडी या शाळेत एका शिक्षकावर पालकाने कोयत्याने केलेला हल्ला, हल्लेखोरावर तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, '' इ. बाबतचा माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

मंत्रिमहोदयांनी नोंद घ्यावी, असे निदेश माननीय उप सभापतींनी दिले.

नोंद घेतली असल्याचे मंत्रिमहोदयांनी सांगितले.

२) श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांनी, "मुंबईत लोअर परळ इथे एका अल्पवयीन मुलीवर झालेला सामूहिक बलात्कार, आठवडा उलटून गेल्यावरही गुन्ह्याची नोंद न होणे, राज्यात इतरत्रही अशाच घटना घडलेल्या असणे, महिलांच्या सुरक्षिततेच्या बाबतीत शासनाने तताडीने पावले उचलण्याची गरज," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

३) श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी, " वन जमिनीवरील लोकांना मूलभूत नागरी सुविधा मिळाव्यात यासाठी दामूनगर, कांदिवली येथील रहिवाशांचे मागील २१ दिवसांपासून सुरू असलेले उपोषण," . बाबतचा माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

४) श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी, "उपरोक्त मुद्याच्या अनुषंदगाने उपोषणासाठी बसलेल्या उपरोक्त लोकांना देण्यात येत असलेला त्रास, त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्याची आवश्यकता, " इ. बाबतचा माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सर्वश्री. प्रवीण दरेकर व विलास पोतनीस यांनी मांडलेल्या मुद्याची शासनाने दखल घ्यावी, असे निदेश माननीय उप सभापतींनी दिले.

नोंद घेतली असल्याचे मंत्रिमहोदयांनी सांगितले.

५) श्री. अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी, " देशाचे पहिले कृषी मंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांची आज १२४ वी जयंती असून विदर्भात विधिमंडळाचे अधिवेशन सुरू असताना विधिमंडळ परिसरात त्यांना मानवंदना देण्यात आली नसणे," इ. बाबतचा माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

५) श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स. यांनी, " ग्रामपंचायतीतील कर्मचाऱ्यांना जिल्हा परिषदेत सामावून घेण्याचा निर्णय झालेला असूनही त्यावर अद्याप कोणतीही कारवाई न होणे, त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेली अस्वस्थता," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

माननीय मुख्यमंत्र्यांनी या विषयाची गांभीर्याने दखल घेऊन सन्माननीय सदस्यांनी मांडलेले औचित्याचे मुद्दे, तातडीचे मुद्दे यांची उत्तरे संबंधित विभागाने देण्यासंदर्भात मुख्य सचिवांसोबत स्वतः एखादी बैठक बोलवावी, असे निदेश माननीय उप सभापतींनी दिले.

मुख्य सचिवांना तशा सूचना देऊन संबंधित विभागांनाही त्या देऊ, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

५) श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी, " ठाण्यातील सुपर मॅक्स कंपनी बंद पडणे, कामगारांच्या दृष्टीने हा प्रश्न कायमस्वरूपी संपण्यासाठी निर्णायक निर्णय घेणे," इ. बाबतचा माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

बैठक घेऊन सकारात्मक मार्ग काढला जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

६) श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी, " राज्यात शासकीय कर्मचारी आणि शिक्षकांनी जुनी पेन्शन सुरू करण्यासाठी सुरू केलेले आंदोलन, त्यांच्या प्रतिनिधींसोबत चर्चा करणे, " इ. बाबतचा माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

याबाबत बैठक घेण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

७) श्री. सुनील शिंदे, वि.प.स. यांनी, " मुंबईतल्या सफाई कामगारांच्या निवासस्थानाची पुनर्बांधणी करण्यासाठी त्यांना एका महिन्याच्या आत घरे रिक्त करण्यासाठी देण्यात आलेली नोटीस, दोन महिन्यांमध्ये मुलांच्या परीक्षा असल्यामुळे या नोटीशीला स्थगिती देण्याची आवश्यकता, " इ. बाबतचा माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

**१) सर्वश्री. अमोल मिटकरी, व इतर वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.**

" सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर नगरपरिषदेने प्रारुप विकास आराखडा (कॉरिडॉर) प्रकल्प तयार केला असून त्यास शासनाने सन २०१२ मध्ये मंजुरी दिलेली असणे, या आराखडयात पंढरपूर येथील अनेक भूखंड विविध प्रयोजनासाठी आरक्षित ठेवण्यात आले असून, अनेक रस्त्यांच्या रुंदीकरणाचे तसेच मंदिरापाशी यायला मोठे दोन रस्ते असताना चौफाळा व महाद्वार घाट यांचे नियंत्रण करणे अवघड असतांना अजून मंदिरापाशी यायला दोन मोठे रस्ते करण्याचा प्लॅन करत असल्याने सर्व गर्दी एकाच ठिकाणी एक झाल्यावर गोंधळ होऊन नियंत्रण करणे कठीण होण्याची भीती व्यक्त होत असणे, नवीन आराखडयात सर्व उपदेव मंदिर, काळभैरव, नवग्रह मंदिर, खंडोबा मंदिर, रेणुका माता मंदिर, मल्लिकार्जुन महोदव मंदिर, अकरा रुद्र मारुती मंदिर, संत नामदेवांचे वास्तव्य ठिकाण, संत तुकोबारायांच्या वंशज यांचे घर, काल्याचा वाडा, ताकपीठ विठोबा मंदिर, अनेक परंपरांगत मठ, संत महात्मे राहून गेलेली घरे ही ऐतिहासिक धरोहर असलेल्या वास्तू पुरातत्व विभागाकडून दुर्लक्ष करुन पाडण्याचा निर्णय होणे, मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांचा ड्रीम प्रोजेक्ट असल्याने त्यांच्या दबावामुळे अधिकारी व प्रशासकीय यंत्रणेकडून दुर्लक्ष होणे, प्रस्तावित कॉरिडॉरमध्ये अनेक सुविधा प्रस्तावित केलेला असणे, या सगळया सुविधा सध्या मंदिरात असताना कॉरिडॉर उभारण्याची आवश्यकता नसल्याच्या भावना नागरिकांकडून व्यक्त होत असणे, कॉरिडॉर ही योजना रद्द करण्याबाबत तेथील नागरिकांची होत असलेली मागणी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

बंदरे आणि खनिकर्म मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहामध्ये गोंधळसदृश परिस्थिती निर्माण झाल्यामुळे सभागृहाची बैठक ५ मिनिटांसाठी स्थगित करत असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून ५८ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून ०३ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

**२) सर्वश्री. अभिजीत वंजारी व इतर वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.**

**श्री. अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले.**

" राज्यातील काही राईस मिलकडून मानवी खाण्यास अयोग्य असलेल्या तांदळाचा पुरवठा करून शासनाचे करोडो रुपयांचे नुकसान करण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरू असून यामध्ये प्रामुख्याने गडचिरोली जिल्ह्यातील मिलधारकाकडून अशाप्रकारचा घोटाळा सातत्याने एक वर्षापासून सुरू असल्याचे निदर्शनास येणे, गडचिरोली जिल्ह्यातील मेसर्स देवीकमल राईस मिल, वडसा, देसाईगंज या गिरणीधारकाकडून जमा केलेला तांदूळ (लॉट नं. टीडीसी गडचिरोली/४) माहे मे, २०२२ च्या दरम्यान केंद्रशासनाच्या गुणनियंत्रण पथकाद्वारे दौरा कार्यक्रम असतांना शासकीय अधिकाऱ्यांनी हा लॉट जप्त करून पंचनामा करून त्याचे नमुने तपासले असता मनुष्याकरिता खाण्यास अयोग्य असल्याचे आढळून येणे, केंद्रशासनाच्या पथकाकडून बेस्ट गोदाम टीडीसी, आरमोरी येथील तांदळाच्या तपासणीचा अहवाल जिल्हाधिकारी (पुरवठा शाखा) गडचिरोली यांच्याकडे मानवी खाण्यास अयोग्य असल्याचा अभिप्राय आला असून अशा गिरणी धारकांवर जीवनावश्यक कायदा, १९८० / १९५५(कलम ३ (i) व त्यामुळे सुधारणा, २०२० यानुसार काळ्या यादीमध्ये टाकणे आवश्यक असून प्रत्येक जिल्ह्यातील भात भरडाईकरिता अभिकर्ता संस्था यांच्याद्वारे आधारभूत खरेदी योजना अंतर्गत खरेदी झालेल्या धानाच्या भरडाईकरिता ज्या-ज्या राईस मिल जबाबदार असणे, त्यांच्यावर केवळ तीन वर्षाकरिता काळ्या यादीमध्ये नांव टाकून शिक्षा देणे पुरेसे नसून राज्य शासनाच्या योजनेचा अपहार केल्याप्रकरणी अशा प्रकारचा गैरव्यवहार करणाऱ्या सर्व राईस मिल मालकांच्या विरोधात फौजदारी गुन्हा दाखल करून त्यांच्यावर कठोर स्वरूपाची कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. "

अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**३) श्री. श्रीकांत भारतीय व प्रा. राम शिंदे, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.**

**श्री. श्रीकांत भारतीय, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महिला व बाल विकास मंत्र्यांचे लक्ष वेधले.**

" अठरा वर्षावरील अनाथांचे कल्याण, पुनर्वसन व त्यांच्या विरोधी होणारे अत्याचार हा विषय महाराष्ट्र शासनाचा कोणत्याही विभागाच्या अंतर्गत न येणे, १८ वर्षावरील अनाथांच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाचा स्वतंत्र विभाग स्थापन करण्याची तसेच अनाथ कल्याण महामंडळ स्थापन करण्याची आवश्यकता असणे, दिनांक ११/ २/ २०२० व २१ /१० /२०२० रोजी महिला बाल विकास विभाग अंतर्गत अनाथांच्या कल्याणासाठी प्रलंबित विविध मागण्यासंबंधी बैठक आयोजित होणे, या बैठकीत अनाथ मुले व मुली कल्याणासाठी खालील मागण्या जसे की अनाथ प्रमाणपत्र पडताळणीसाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करावी, अठरा वर्षानंतरच्या अनाथ मुलांच्या पुनर्वसनासाठी विशेष विभाग स्थापन करावा, अनाथ विकास महामंडळाची स्थापना करावी, प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी १८ वर्षानंतरच्या उच्च शिक्षण घेणाऱ्या अनाथ मुलांसाठी स्वतंत्र वसतिगृहाची आवश्यकता, अनाथ मुलांना शालेय महाविद्यालयीन शिक्षणामध्ये शिक्षण मोफत द्यावे, शासनाच्या सर्व कल्याणकारी योजनांमध्ये अनाथांसाठी एक टक्का आरक्षण राखीव ठेवावा, अनाथ मुलांना शहर विकास आराखड्यामध्ये दिव्यांगांच्या धरतीवर भूखंड राखीव ठेवण्यात यावा, राज्य लोकसेवा आयोग व शासनामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षेमध्ये खेळाडू व दिव्यांग यांना लागू असलेल्या पर्सेंटाईल गुण पद्धती अनाथांना देखील लागू करण्यात यावी या व इतर मागण्या सादर करण्यात येणे, सद्यस्थितीमध्ये अनाथांना केवळ शिक्षण व नोकरी यामध्ये आरक्षण लागू असून सदर आरक्षण शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये लागू करण्यात येण्याची आवश्यकता असणे, सद्यस्थितीत अनाथांसाठी उपलब्ध असणाऱ्या आरक्षण पद्धतीत सुधारणा करणे, शासनाच्या विशेष सहाय्य योजनेअंतर्गत १८ वरील सर्व अनाथांना लाभ देण्यासाठी शासनाने विशेष शिबिर आयोजित करण्याची आवश्यकता असणे याबद्दल शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. "

महिला व बाल विकास मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**४) सर्वश्री. विक्रम काळे व इतर वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.**

**श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले.**

" राज्यातील अशासकीय अनुदानित शाळेतील दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत आलेल्या परंतु, ती शाळा किंवा वर्गतुकडी विनाअनुदान, अंशतः अनुदान किंवा टप्पा अनुदानावर असणे व दि. १ नोव्हेंबर, २००५ नंतर ती शाळा किंवा वर्गतुकडी १००% अनुदानावर येणे, या शिक्षकांची जुन्या पेन्शन योजनेची खाती उघडणे, त्या खात्यावर जुन्या पेन्शन योजनेप्रमाणे वेतनातून जी.पी.एफ हप्त्याची रक्कम कपात होणे, यामधील सेवानिवृत्त झालेल्या काही शिक्षकांना जुन्या पेन्शन योजनेचा लाभ मिळणे, त्यानंतर काही शिक्षकांची तोंडी आदेशाने जी.पी.एफ कपात बंद करणे, परंतु जुन्या पेन्शनची खाती सुरू ठेवणे, दि.

१ नोव्हेंबर, २००५ पासून नवीन पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय शासनाने घेणे असे असतांना नियमानुसार दि. १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत आलेल्या शिक्षकांची शाळा किंवा वर्गतुकडी दि. १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी १००% अनुदानावर नाही म्हणून त्यांना जुनी पेन्शन योजना लागू न करणे, हे अन्यायकारक असणे, यासाठी शिक्षक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी शासनाकडे पाठपुरावा करणे, शासनाने यासंबधीची काढलेली दि. १० जुलै, २०२० ची अधिसूचना रद्द करणे, शासनाने यासाठी सम्यक अभ्यास समितीचे गठन करणे, त्याचा अहवाल शासनास प्राप्त होणे, परंतु तरीही आजपावेतो शासनाकडून सकारात्मक निर्णय न होणे, पेन्शन हा विषय शिक्षकांच्या जीवनाशी व कुटुंबाशी निगडित असल्यामुळे शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.''

शालेय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**५) डॉ. सुधीर तांबे व इतर वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.**

**डॉ. सुधीर तांबे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले.**

“ राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना डीसीपीएस योजना लागू असून नगरपालिका संचालित माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना डीसीपीएस योजना लागू नसल्यामुळे निवृत्तीनंतर शासनाचे लाभ व विमा यापासून सदरचे नगरपालिका शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वंचित राहणार असून शासनाचा कोणताही लाभ त्यांना मिळणार नसणे तसेच, नाशिक जिल्ह्यातील मालेगाव महानगरपालिका शिक्षण मंडळाचे सेवानिवृत्त कर्मचारी कुटुंब सेवानिवृत्त वेतनधारकांचे ७ व्या वेतन आयोगाच्या फरकाची शासनाच्या हिस्स्याची ५० टक्के रक्कम पहिला, दुसरा, तिसरा हप्ता तसेच मागील दोन वर्षाचे महागाई भत्त्याचे सर्व फरक उत्पन्नाची रक्कम अद्यापही शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांच्या कार्यालयाकडून मालेगाव महानगरपालिका शिक्षण मंडळ यांना प्राप्त झालेली नसल्यामुळे सेवानिवृत्त सर्व शिक्षकांना निवृत्तिवेतनाच्या रकमेपासून वंचित राहावे लागल्यामुळे त्यांच्यावर आलेली उपासमारीची पाळी त्यामुळे त्यांच्यात पसरलेले तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत दोन्ही विषयांबाबत चौकशी करून नगरपालिका संचलित शाळांमध्ये शिक्षक व शिक्षक पात्र कर्मचारी योजना लागू करण्याबाबत व महानगरपालिकेतील सेवानिवृत्त कर्मचारी व कुटुंब सेवानिवृत्त वेतनधारकांचे निवृत्तीवेतनाचे कमी मिळालेले अनुदान व ऑक्टोबर २०२२ पासून पेन्शन तातडीने मिळणेबाबत करावयाची कार्यवाही, याबाबत राज्य शासनाचे प्रतिक्रिया. ”

शालेय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**६) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.**

“ ठाणे शहरातील विविध भागांना जोडणारी रिंग मेट्रो प्रस्तावित असणे, सद्यस्थितीत अस्तित्वात असणाऱ्या मंजूर विकास आराखडा मधील एच. सी. एम. टी. आर. (HCMTR) म्हणजेच हाय कॅपॅसिटी मास ट्रान्झिट रेल (HIGH CAPACITY MASS TRANSIT RAILÂ) याची आखणी व नव्याने प्रस्तावित एम. आर. टी. एस. (MRTS) म्हणजेच मास रॅपिडट्रान्झिट सिस्टीम (MRTSÂ)MASS RAPID TRANSIT SYSTEM) (THANE METRO), यांचा तुलनात्मक अभ्यास केला असता त्यामध्ये विविध त्रुटी असणे, उत्तरेला घोडबंदर रस्त्याच्या दुतर्फा वाढलेल्या शहराला जोडण्याकरिता ग्डन्च्च् चा विस्तार कावेसर पर्यंत वाढविला असणे, ठाणे पूर्वेचा भाग संपूर्णपणे MRTS च्या आखणीतून वगळण्यात आला असणे, सिडको बस स्टॉप ते पूर्व द्रुतगतीमहामार्ग यादरम्यान, MRTSची आखणी नव्याने करण्यात आली असून, MRTS चा हा भाग संपूर्णतः भूमिगत होणार असणे, या ठळक मुद्द्यांपैकी उत्तरेला घोडबंदर रस्त्याच्या दुतर्फा वाढलेल्या शहराला जोडण्याकरिता MRTS चा केलेला विस्तार हा नक्कीच स्वागतार्ह असणे, मात्र नव्याने विकसित होणाऱ्या भागांना जोडणारी मार्गिका तयार करत असताना ठाणे पूर्व सारख्या अत्यंत जुन्या भागाला या मार्गिकेतून वगळणे, सिडको बस स्टॉप ते पूर्व द्रुतगती महामार्ग दरम्यान MRTS् च्या नव्याने केलेल्या आखणीनुसार सदर मार्गिका, ठाणे पश्चिमेकडील स्टेशन लगतच्या अत्यंत दाट लोकवस्ती असलेल्या भागातील सुमारे ५० इमारतींना बाधित करत भूमिगत पद्धतीने प्रस्तावित असणे, सर्वांगीण विचार करता सदर प्रस्तावित भूमिगत मार्गिका अत्यंत अव्यवहार्य असणे, भूमिगत मेट्रोचा खर्च हा उन्नत मेट्रोच्या खर्चाच्या सुमारे चार पट जास्त असतो व त्यामुळे वाढीव खर्चाचा बोजा सदर प्रकल्पावर येत असणे, त्याचबरोबर सदर प्रस्तावित भूमिगत मार्गाचा अभ्यास केला असता असे निदर्शनास येते की, सदर मार्ग अस्तित्वातील रस्त्याच्या खालून न जाता, अस्तित्वातील सुमारे चाळीस वर्ष जुन्या, जवळपास ५० इमारतींच्या खालून जात असणे, या बाधित, जुन्या आणि मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास, हा देखील या भूमिगत मेट्रोच्या प्रस्तावित मार्गिकेमुळे अडचणीत आला असणे, भूमिगत मेट्रो मार्गामुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नांवर सखोल अभ्यास करण्यासाठी व त्यातून मार्ग काढण्यासाठी लोकप्रतिनिधींना सोबत घेऊन समिती तयार करणे आवश्यक असणे, तसेच मेट्रोचे काम कुठल्याही परिस्थितीत थांबू न देण्यासाठी लवकरात लवकर उपरोक्त प्रश्नांवर तोडगा काढून नागरिकांना देखील दिलासा देण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही.”

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**७) श्री. किशोर दराडे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.**

" नाशिक जिल्ह्यातील येवला मर्चंट को. ऑप. बँकेचे दि.१३ नोव्हेंबर, २०२२ रोजी मतदान पार पडणे, सदरील निवडणुकीमध्ये प्रगती पॅनल व समृद्धी हे परस्पर विरोधी पॅनल असणे, सदर मतदान प्रक्रिया सुरु असताना विद्यमान नगरसेवक व माजी नगराध्यक्ष व नगरसेविका हे प्रगती पॅनलचे नेतृत्व करीत असणे, दि.१३ नोव्हेंबर, २०२२ रोजी येवला शहरातील येवला मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक या बँकेच्या मतदान केंद्रावर पॅनल प्रमुख व इतर कार्यकर्ते उभे राहिले असता येवला शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक व त्यांचे सहकारी यांनी प्रगती पॅनल प्रमुख व इतरांना धक्काबुक्की करत शिवीगाळ करणे, तसेच त्यांना मारहाण करीत जबरदस्तीने मतदान केंद्रातून बाहेर काढून त्यांना मतदानापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आलेला असणे, सदर मतदान केंद्रावर सन्माननीय सदस्य स्वतः उभे असल्याने याबाबत पोलीस निरीक्षक यांनी अडवले असता त्यांनी धक्काबुक्की करण्याचा प्रयत्न करणे, तसेच एकेरी भाषा वापरुन सदर ठिकाणाहून निघून जाण्याबाबत दम देणे, त्याच प्रमाणे फायरिंग केली जाईल अशी धमकीही दिलेली असणे, पोलीस निरीक्षक यांच्याकडे सदर निवडणुकीत विरोधी पक्षाकडून मोठ्या प्रमाणात खुले आम पैसे वाटप करण्यात येत असल्याच्या तक्रारी करूनही त्यावर दुर्लक्ष करून उलट समृध्दी पॅनलला पाठिशी घालत प्रगती पॅनल प्रमुख व इतर पदाधिकारी यांना मारहाण करण्यात येणे, तसेच लोकप्रतिनिधी यांचाही पोलीस निरीक्षकांनी अवमान केल्याने येवला शहरात पोलीस निरीक्षकांच्या विषयी मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झालेला असणे, सदर प्रकरणी पोलीस महासंचालक, मुंबई यांच्याकडेही दिनांक १६ नोव्हेंबर २०२२ रोजी तक्रार केलेली असूनही पोलीस महासंचालक यांच्याकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसणे, ज्या शहरात लोकप्रतिनिधीच जर अशा अधिकाऱ्यांपासून सुरक्षित नसतील तर सामान्य जनतेला हे कसे संरक्षण देणार, अशी भावना जनमानसात पसरणे, पोलीस निरीक्षकांनी एका लोकप्रतिनिधीचा अवमान केलेला असल्यामुळे त्यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही. "

उपमुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**८) श्री. नरेंद्र दराडे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.**

" मौजे राजापूर, ता.येवला, जि.नाशिक येथील युवकांनी गावातील चौकामध्ये महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा दिनांक २१-११-२०२० रोजी बसविणे, छत्रपती शिवाजी महाराज संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत असून सर्व धर्मीयांचे श्रध्दास्थान असल्याने गावातील युवकांनी महाराजांप्रती

आदर व्यक्त करण्याच्या हेतूने गावातील चौकात पुतळा स्थापन करणे, परंतु गावातील काही युवकांवर परवानगी न घेता पुतळा स्थापन केल्यामुळे येवला पोलीस स्टेशनमध्ये भादंवि क्रमांक १४३,१४९,४४७ सह महाराष्ट्र पुतळयांच्या विटंबनेस अधिनियम, १९९७ चे कलम ११ प्रमाणे मुंबई पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) चे उल्लंघन १३५ प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात येणे, राज्याचे माजी मुख्यमंत्री महोदयांनी सदरील गुन्हे मागे घेण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात येणे, तथापि सदर गुन्हे मागे घेण्यात आलेले नसणे, तसेच विद्यमान मुख्यमंत्री महोदयांनीही येवला येथे दिनांक ३० जुलै,२०२२ रोजी दौऱ्यावरअसताना सदर गुन्हे मागे घेण्याबाबतची घोषणा केलेली असणे, महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा गावात बसविणाऱ्या युवकांवरील गुन्हे तत्काळ मागे घेण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया. ”

उपमुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आज म.वि.प. नियम २८९ अन्वये प्रस्तावाच्या २ सूचना प्राप्त झाल्या असून त्या प्रलंबित असल्यामुळे त्या मांडण्यास अनुमती देत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

१) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी, “ मे. टिळकनगर इंडस्ट्रीज लि. श्रीरामपूर (जि.अहमदनगर) यांनी रुपये २१० कोटींची गुंतवणूक विशाल प्रकल्पासाठी पात्र होत नसल्याने चिपळूण (जि.) रत्नागिरी येथे सदरहू प्रकल्पासाठी रुपये ८२.७० कोटींची गुंतवणूक करून जमीन खरेदी करणे, ” इ. बाबत दिलेल्या सूचनेसंदर्भात आपले मत व्यक्त केले.

सदर विषय आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे ही सूचना अमान्य करीत असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

उप मुख्यमंत्र्यांनी याबाबत अधिक खुलासा केला.

२) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी, “ राज्यात महापुरुषांचे अवमान प्रकरणात होत असलेली वाढ, ” इ. बाबत दिलेल्या सूचनेसंदर्भात आपले मत व्यक्त केले.

श्री. शशिकांत शिंदे, ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनीही उपरोक्त मुद्यावर आपले मत व्यक्त केले.

उप मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात निवेदन करावे, असे सांगून माननीय उप सभापतींनी सदर सूचनेस अनुमती नाकारीत असल्याचे सांगितले.

**बुधवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२२**

**सर्वश्री अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांची म.वि.प.नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा- (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

" महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नावर कर्नाटक सरकारकडून महाराष्ट्राबाबत वादग्रस्त विधाने करण्यात येणे." (चर्चा पुढे सुरू )

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री.जयंत प्र.पाटील (२) श्री. प्रसाद लाड (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण..

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून ४५ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता **माननीय उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे** यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१.(अ) (१) पाच तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) एक तारांक्रित प्रश्न राखून ठेवण्यात आला.

(३) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एकाहत्तर प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

२. आजच्या कामकाजपत्रिकेत अनुक्रमांक-तीन वर " कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे " या शीर्षकांतर्गत दर्शविण्यात आलेली पुढील कागदपत्रे व अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

**(१) मुख्यमंत्री :**

(क) " संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा २०१८-२०१९ या वर्षाचा पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल "

(ख) " महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांचे सन २०१६-२०१७ व सन २०१७-२०१८ या वर्षांचे वार्षिक अहवाल."

(ग) " महाराष्ट्र मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित (महामेट्रो) यांचा सन २०२१- २०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल."

(घ) " मुंबई रेल्वे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल."

(ङ) “ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल.”

(च) “मौजे कशेळी, गुंदवली, दापोडे, दिवे (अंजूर), ता. भिवंडी येथे नाल्याच्या दुतर्फा ५० मिटरचे अंतर न सोडता अनधिकृतपणे गोडाऊनचे बांधकाम होणे” या विषयावरील श्री. धनंजय मुंडे व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या म.वि.प. नियम १०१ अन्वये, लक्षवेधी सूचना क्रमांक १९४ बाबत दिनांक २६ मार्च, २०१८ रोजी झालेल्या चर्चेच्या दरम्यान तत्कालीन राज्यमंत्री (नगर विकास) यांनी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती.

**(२) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री :**

(क) “ डी.वाय.पाटील कृषी व तंत्र विद्यापीठ, तळसंदे कोल्हापूर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल.”

(ख) “ सोमय्या विद्याविहार विद्यापीठ, मुंबई यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल.”

(ग) “ एमआयटी आर्ट, डिझाईन ॲण्ड टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटी, पुणे यांचे सन २०१६-२०१७ ते सन २०२० २०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल.”

(घ) “ संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर यांचे सन २०१७-२०१८, २०१८-२०१९, २०१९-२०२० व २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल.”

(ड.) “ विश्वकर्मा विद्यापीठ, पुणे यांचे सन २०१७-२०१८ ते सन २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल.”

(च) “ कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचा सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल व वार्षिक हिशोब पत्रके.”

३. संसदीय कार्य मंत्र्यांनी, बुधवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता विधान भवन, नागपूर येथे झालेल्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर केले व ते संमत करावे असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

प्रतिवृत्त संमत झाले.

४. माननीय उप सभापतींनी पुढील अभिनंदनपर प्रस्ताव मांडला.

“ २६ डिसेंबर हा दिवस “वीर बाल दिवस” म्हणून दरवर्षी साजरा करण्याची घोषणा करून त्याची अंमलबजावणी केल्याबाबत भारताचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन ”

प्रस्ताव सर्वानुमते संमत झाला.

माननीय उप सभापतींनी, सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांची विधानपरिषदेतील विधिमंडळ कॉंग्रेस पक्षाच्या गट नेते पदी नियुक्ती करण्यात आली असल्याचे घोषित केले.

मुख्यमंत्र्यांनी उपरोक्त " २६ डिसेंबर हा दिवस " वीर बाल दिवस" म्हणून दरवर्षी साजरा करण्याची घोषणा करुन त्याची अंमलबजावणी केल्याबाबत भारताचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या अभिनंदनबाबत प्रस्तावाच्या संदर्भात आपल्या भावना व्यक्त केल्या.

श्री. अंबादास दानवे (विरोधी पक्ष नेता) यांनी उपरोक्त अभिनंदन प्रस्तावास अनुमोदन दिले.

५. ॲड. निलय नाईक (समिती सदस्य) यांनी, " दि वाशिम अर्बन को-ऑप बॅंकेने पी.एम.पॅकेज अंतर्गत केलेल्या आर्थिक अपहाराची चौकशी करण्याबाबत " या विषयावरील श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांच्या विनंती अर्जावरील विधानपरिषद विनंती अर्ज समितीचा अहवाल सभागृहाला सादर केला.

६. श्री. अभिजीत वंजारी (समिती सदस्य) यांनी सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवण्याबाबत तदर्थ समितीचा अहवाल सभागृहाला सादर केला.

७. बुधवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी म.वि.प. नियम ९३ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या सूचना व त्यावरील माझे निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

८. बुधवार दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी मान्य केलेल्या महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ (अ) अन्वये विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

९. बुधवार दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी मान्य करण्यात आलेले औचित्याचे मुद्दे सभागृहाच्या पटलावर ठेवल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

१०. (१) श्री. अभिजीत वंजारी वि.प.स. यांनी, " राज्यातील उद्योग परराज्यात जाऊ नयेत यासाठी कोणतीही कार्यवाही केलेली नसणे " इ. बाबत नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार परिवहन मंत्र्यांनी निवदेन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) सर्वश्री. विलास पोतनीस व इतर वि.प.स. यांनी, " मुंबई उपनगरातील धोकादायक इमारतींकरिता बृहन्मुबई महानगरपालिका अधिनियमात व महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास अधिनियमात सुधारणा करणे " इ. बाबत नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार मुख्यमंत्र्यांनी निवदेन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. जयंत प्र. पाटील वि.प.स. यांनी, “ गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड खाणीला शासनाने परवानगी देऊनही लॉयड्स मेटल्स अॅन्ड इंजिनियर्स या कंपनीने अद्याप पर्यंत पोलाद प्रकल्प उभारला नसणे तसेच सदर खाणीत कॅप्टिव्ह माईन्सचा दर्जा संपुष्टात येणे ” इ. बाबत नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार बंदरे व खनिकर्म मंत्र्यांनी निवदेन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) सर्वश्री. सुनिल शिंदे व इतर वि.प.स. यांनी, “ अंधेरी, मुंबई येथील सहारा स्टारर या पंचतारांकित हॉटेलमधील मेन्शन क्लबमध्ये दिनांक २ ऑक्टोबर, २०२२ रोजी ड्राय डे असतानाही मद्यविक्री सुरू असण” इ. बाबत नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी निवदेन केले.

श्री. एकनाथराव खडसे वि.प.स. यांनी, “ फोन टॅपिंगसंदर्भात ” माहितीविषयक मुद्दा मांडला.

यासंदर्भात नंतर उत्तर दिले जाईल असे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक मध्यंतराकरिता दुपारी ०२ वाजून ०५ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी ०२ वाजून ४५ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

सभागृहात माननीय मंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक १० मिनिटांकरिता स्थगित करीत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी ०२ वाजून ४५ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी ०२ वाजून ५५ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

अॅड. निरंजन डावखरे वि.प.स.यांनी, Non Creamy Layer नसलेल्या उमेदवारांना अपात्र करण्यात येणे, इ. बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

श्री. किरण सरनाईक वि.प.स. यांनी, “ मातोश्री ग्राम समृद्धी शेत पाणंद रस्ते योजनेंतर्गत दि. ३ मार्च, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये वाशिम जिल्ह्यात २२२ किलोमीटरचे विविध रस्ते मंजूर करण्यात आले असून प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या दप्तर दिरंगाईमुळे अनेक रस्त्यांच्या कामांना सुरुवात देखील झालेली नसणे ” इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

“ महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नावर कर्नाटक सरकारकडून महाराष्ट्राबाबत वादग्रस्त विधाने करण्यात येणे” (चर्चा पुढे सुरू )

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(२) श्री. प्रसाद लाड (भाषण पूर्ण) (३) श्री. शशिकांत शिंदे

( चर्चा अपूर्ण..

" पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांनी, जल जीवन मिशन कार्यक्रम अधिक गतीमान करण्यासाठी नव्याने पद निर्मिती करण्यात येणे " इ. बाबत नियम ४६ अन्वये निवेदन केले.

ॲड. अनिल परब वि.प.स. यांनी, " सन्माननीय सदस्यांना माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या बंगल्यावर जाण्यासाठी मज्जाव करणे " इ. बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला व आपले मत मांडले.

यासंबंधी नोंद घेतली असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

" महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नावर कर्नाटक सरकारकडून महाराष्ट्राबाबत वादग्रस्त विधाने करण्यात येणे " (चर्चा पुढे सुरू )

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(२) ॲड. अनिल परब (३) श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील

(४) श्री. गोपीचंद पडळकर (५) श्री. अभिजित वंजारी

मुख्यमंत्र्यांनी उपरोक्त अल्पकालीन चर्चेस उत्तर दिले.

ॲड. अनिल परब वि.प.स. यांनी उत्तरादाखल भाषण केले.

अल्पकालीन चर्चा संपली असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

गोंधळसदृश परिस्थितीमध्ये सभागृहाचे कामकाज करणे शक्य नसल्यामुळे सभागृहाची बैठक १० मिनिटांकरिता स्थगित करीत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक सायंकाळी ०४ वाजून ५२ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक सायंकाळी ०५ वाजून ०२ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

गोंधळसदृश परिस्थितीतीमुळे सभागृहाची बैटक १० मिनिटांकरिता स्थगित करीत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक सायंकाळी ०५ वाजून ०४ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक सायंकाळी ०५ वाजून १४ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

**११. (१) सर्वश्री. रामराजे नाईक-निंबाळकर, जयंत पाटील, कपिल पाटील, अनिकेत तटकरे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

“ महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ (१९७८ च्या दुरुस्तीसह) च्या प्रशासकीय स्तरावरील अंमलबजावणीमध्ये संदिग्धता असणे, व त्यामुळे सामाजिक, आर्थिक व भौतिक नुकसान होणे, वन व्यवस्थापन, पर्यावरण, शेती सुधारणा व शेतीची कमाल धारणा इत्यादीचा व्यापक दृष्टीकोनातून महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ (१९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक -२९) राज्यात अंमलबजावणी करण्यास विधीमंडळाने मान्यता दिलेली असणे, सदर कायद्याद्वारे दिनांक ३०.८.१९७५ पासून राज्यातील सर्व खाजगी वने संपादित करण्यात आलेली असणे, वन विभागांतर्गत सदर कायाद्यातील तरतुदींच्या अधीन राहून एका प्रकरणामध्ये निर्णय देणे, त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांस शासनाने निलंबित करणे, परंतु सदर प्रकरण न्यायालयात गेले असता न्यायालयाने त्या अधिकाऱ्याचा निर्णय कायम ठेवणे त्याअनुषंगाने महसुल, वन, विधी व न्याय विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना उक्त कायद्यातील तरतुदींचा अर्थ न समजल्यामुळे अशा प्रकारची अनेक प्रकरणे न्यायालयाने निकाली काढताना शासनाच्या विरोधात निर्णय दिल्याचे निष्पन्न होणे, यामुळे शासनाच्या विभागातील उच्चस्तरीय अधिकाऱ्यांना या कायद्यातील तरतुदींचा अर्थ समजून घेण्याची नितांत गजर लागणे, तसेच सदर शासकीय अधिकारी आपल्या पदाचे कर्तव्य व्यवस्थित पार पाडत नसल्याने सामान्य जनतेला आपल्या न्यायासाठी न्यायालयात जावे लागत असणे व त्यामुळे अशा बहुतांश प्रकरणामध्ये न्यायालयात शासन प्रतिवादी असणे, या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरिता महाराष्ट्र खाजगी वन प्राधिकरण निर्माण करण्याची मागणी, तसेच खाजगी वन म्हणून शासनाकडे विहीत झालेल्या जमीनीचा रोख मोबदला सध्या प्रचलित असलेल्या कार्यप्रणाली प्रमाणे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून प्राधान्याने अदा करण्याबाबत शासनाने निश्चित करावयाचे ठोस धोरण करण्याची मागणी होणे, यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना ”

वन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(२) सर्वश्री जयंत आसगावकर, नागोराव गाणार वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना-**

श्री. जयंत आसगावकर वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

“ राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील गुणवत्तेचा दर्जा कमी होत जाणे, अजूनही साडेतीन लाखाहून अधिक मुले शाळाबाह्य असणे, संचमान्यतेचे निकष बदलून

गणित, विज्ञान, इंग्रजी, हिंदी-उर्दू, मराठी, समाजशास्त्र विषयांना स्वतंत्र शिक्षक मिळण्याची आवश्यकता असणे, कला-क्रीडा शिक्षकांची पदे पुनर्स्थापित करण्याची आवश्यकता असणे, दुर्गम व मागास भागातील कमी पटसंख्येच्या शाळांना संरक्षण देण्याची आवश्यकता असणे, कार्यानुभव विषयांतर्गत संगणक साक्षरतेचे महत्त्व लक्षात घेऊन प्रत्येक शाळेत ICT शिक्षक पद निर्माण करण्याची आवश्यकता असणे, शाळेतील अर्धवेळ ग्रंथपाल पदांवरील कार्यरत कर्मचाऱ्यांना विषयभार देऊन पूर्णवेळ शिक्षक (ग्रंथपाल) किंवा मोठ्या शाळांमध्ये पूर्णवेळ शिक्षक (ग्रंथपाल) पदाचा संचमान्यतेत समावेश करण्याची आवश्यकता असणे, अशैक्षणिक कामांसाठी अधिग्रहित करण्यात आलेल्या शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना रिक्त पदांवर पाठवण्याची आवश्यकता असणे, अनुकंपा तत्वावरील भरती तत्काळ सुरू करण्याची आवश्यकता असणे, विनाअनुदानित शाळा व तुकड्यांची त्रुटी पूर्तता करून १०० टक्के वेतन सुरू करणे, चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची कंत्राटी पद्धतीने सुरू केलेली नेमणूक रद्द करून कायमस्वरूपी वेतनश्रेणीवर नियुक्ती करण्याची आवश्यकता असणे, या प्रश्नांच्याबाबत तातडीने सोडवणूक न झालेल्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, याबाबत तातडीने दखल घेऊन शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही आणि यावर शासनाची प्रतिक्रिया. ”

शालेय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(३) श्री. अंबादास दानवे, ॲड.अनिल परब, श्री अभिजित वंजारी, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

श्री. अंबादास दानवे (विरोधी पक्षनेता) यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले.

“ मौजे तुडाळ येथील सर्व्हे नं.१४/१, सर्व्हे नं.१३/२/१, १६/२, ही जमीन सरकारी अकारीपड असून महसूल व वन विभाग यांच्याकडील शासन निर्णय दि.२३.१.२०१९ अन्वये शासकीय जमिनीवर लिलाव पद्धतीने खारपट्टा देण्याची तरतूद असणे, मौजे तुडाळ येथील स.नं.ग.नं.१६/१, एकूण क्षेत्र १४.४७.० हेक्टर आर पैकी १.००.० हेक्टर आर या खाणपट्टा जमिनीकरिता दि.३१.३.२०१६ अन्वये मंजूर करण्यात येणे, परंतु लिलाव पद्धतीने खाण धारकाबाबत खनिज खाणपट्टा नूतनीकरणाचे आदेश व्यपगत झालेले असणे, याबाबतची टिपणी जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी मंजूर केलेली असून मा.अप्पर जिल्हाधिकारी यांचेकडे स्वाक्षरीकरिता दि.३१.१२.२०१९ करिता सादर करण्यात येणे, याबाबत मा.अप्पर जिल्हाधिकारी यांनी आजतागायत ती अनिर्णीत ठेवण्यात येणे, जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी केलेल्या मोजणीच्या अनुषंगाने खाणधारकाने एकूण १,०६,८८३ ब्रास उत्खनन केल्याचे निदर्शनास येणे, सदर खाणीमध्ये उत्खननाकामी महाराष्ट्र राज्य वीज

वितरण कंपनी यांचेकडील माहे मार्च २०२० पर्यंत विद्युत देयक व होणारा वीज वापर यांचे विवरणपत्र सादर करण्यात येणे यावरून सदर अनधिकृत उत्खनन आजमितीस सुरू असणे, त्यानुषंगाने खाणधारकास दंडात्मक आदेश काढून तात्काळ दंडात्मक रक्कम शासनास जमा करण्याबाबत कळविलेले असणे, मा. जिल्हाधिकारी रायगड यांजकडील पत्र जा.क्र.खशा/कात-१/ईटीएस मोजणी/तुडाळ/२०१८, दि.२.०८.२०१८ व पत्र क्र.गौखशा/कात-/तुडाळ/मा.म.दळवी/अन.उत्खनन/२०२०, दि.१९.०५.२०२० अन्वये सदर प्रकरणी सुनावणी घेण्याकामी उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांना प्राधिकृत करण्यात आले असणे, तद्नंतर मा.अप्पर जिल्हाधिकारी रायगड यांजकडील पत्र क्र.गौखशा / कात-१ / तुडाळ / दळवी / अन.उत्खनन/ २०२०, दि.१५.१०.२०२० अन्वये (परिशिष्ट-२४) सदर प्रकरणी या कार्यालयाकडील मूळ संचिकासह उपविभागीय अधिकारी पेण यांच्याकडे वर्ग करण्याबाबत आदेशित केलेले होते. सद्यःस्थितीत सदरचे प्रकरणे या कार्यालयाकडील पत्र दि.२०.११.२०२० अन्वये उपविभागीय अधिकारी, पेण यांचे कार्यालयात वर्ग करण्यात आली असणे, परंतु सदर प्रकरण हे उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्याकडे पुन्हा वर्ग करण्यात येणे, सबब याबाबत कोणताही आदेश न झाल्याने महाराष्ट्र शासनाचा १५ कोटी ३१ लाख ११ हजार ३२५ हून अधिक दंडात्मक रक्कम खाणधारकाने न भरल्याने शासनाचा महसूल वसूली कामी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(४) सर्वश्री सुनील शिंदे, विलास पोतनीस, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.**

श्री. सुनील शिंदे वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

'' बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून सन २०२१-२२ या वर्षात केवळ २४ टक्के विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली असून तब्बल ७६ टक्के विद्यार्थी अद्यापही आरोग्य तपासणीपासून वंचित राहिले असल्याची बाब प्रजा फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेने दि. ५ डिसेंबर, २०२२ रोजी प्रसिद्ध केलेल्या अहवालावरून समोर आली असणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून होणारी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी हा विभागाचा सर्वोत्तम उपक्रमांपैकी एक असणे, तरीदेखील बृहन्मुंबई महानगरपालिका शाळेत शिक्षण घेत असलेल्या तीन लाख अठरा हजार दोन विद्यार्थ्यांपैकी केवळ ८४ हजार २४७ विद्यार्थ्यांची आजतागायत आरोग्य तपासणी करण्यात आलेली असणे, तसेच सन २०१४ - २०१५ ते सन २०२१-२०२२ दरम्यान शिक्षण विभागाकडून होणाऱ्या आरोग्य तपासणी उपक्रमात ५८ टक्क्यांची घट दिसून आली असणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडे आरोग्य तपासणीसाठी आवश्यक असलेल्या निधीची तरतूद असतानाही विद्यार्थ्यांच्या आरोग्याची होत असलेली हेळसांड, कोविड काळानंतर आणि मुंबईत पसरलेल्या

विविध साथ रोगांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने असलेली आरोग्य तपासणीची असलेली नितांत आवश्यकता, परंतु शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी आणि पालकांत शासनाप्रति पसरलेली तीव्र नाराजीची आणि संतापाची भावना, यास्तव बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची नियमित आरोग्य तपासणी करण्याबाबत शासनाने तत्काळ करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया. ”

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(५) श्री. प्रसाद लाड वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.**

“ धोकादायक म्हणून जाहीर केलेला अंधेरी पूर्व आणि पश्चिमेला जोडणारा गोपाळ कृष्ण गोखले पूल पुनर्बांधणीसाठी दिनांक ७ नोव्हेंबर, २०२२ पासून संपूर्णतः बंद करण्यात आल्यामुळे अभूतपूर्व वाहतूक कोंडीसह परिसरातील नागरिकांना असंख्य गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने सदरहू पूलाचे पुनर्बांधणीचे काम युद्धपातळीवर हाती घेऊन लवकरात लवकर पुनर्रचित पूल वाहतुकीसाठी कार्यान्वित करण्यात यावा, अशी मागणी नागरिकांनी लोकप्रतिनिधींना केली असणे, सदरहू पूल वाहतूकीसाठी संपूर्णतः बंद केल्यामुळे वाहतुक कोंडीचा परिणाम औषध खरेदी करणारे, शाळकरी-महाविद्यालयीन विद्यार्थी परिसरातील रुग्णालयामध्ये उपचारासाठी येणाऱ्या रूग्णांना तसेच सर्वसाधारण नागरिकांना होत असल्याने ही कोंडी सुटण्यासाठी शासनाने पर्यायी उपाययोजना करीत नसणे, सदरहू पुलांच्या पुनर्बांधणीच्या कामास प्रत्यक्षात सुरूवात करण्यास शासनाकडून होत असलेले दुर्लक्ष, या पुलाचे काम पूर्ण होऊन हा पूल वाहतुकीसाठी कार्यान्वित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(६) श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.**

“ मुंबई शहरातील माजगाव ताडवाडी लवलेन मुंबई सेंट्रल आग्रीपाडा परळ इत्यादी भागात वसलेल्या बीआयटी चाळी असणे, सदर चाळींमध्ये भाडेकरून सोबत पोलीस कर्मचारी तसेच मुंबई महापालिकेचे कामगार वर्षानुवर्षेत राहत असणे, सदर चाळी सुमारे १०० वर्षांच्या असून त्या चाळी मोडकळीस आलेल्या असणे, सदर चाळींचा पुनर्विकास प्रक्रिया गेल्या अनेक वर्षांपासून चर्चेत असणे प्रत्यक्षात कोणतीच समक्ष कारवाई अद्याप न होणे, चाळींची दुरवस्था झाल्याने तेथील हजारो रहिवासी जीव मुठीत धरून वास्तव्यात

असणे, मुंबईतील चाळींचे पुनर्विकास धोरण शासनाने घेतल्याने त्याच गतीवर बीआयटी चाळींचा पुनर्विकास करण्याची नितांत आवश्यकता असणे, याबाबत लोकप्रतिनिधीनी रहिवाशांनी शासनाकडे केलेली वारंवार मागणी, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया.

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(७) सर्वश्री अनिकेत तटकरे, शशिकांत शिंदे, सतीश चव्हाण, अमोल मिटकरी, विक्रम काळे, डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना-**

श्री. शशिकांत शिंदे वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

" पेण जि.रायगड येथे २८ डिसेंबर, २०१७ रोजी बाळगंगा प्रकल्पग्रस्त शेतकरी समितीने अन्यायाविरोधात वाचा फोडण्यासाठी लोकशाही मार्गाने आंदोलन केलेले असणे, या आंदोलनात सर्व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी एकत्र येऊन खरोशी फाटा दरम्यान मुंबई गोवा हायवे रास्ता रोखो आंदोलन केलेले असणे, या आंदोलनात प्रकल्पग्रस्त शेतकरी, आदिवासी बांधव व स्थानिक नागरिकांनी सहभाग नोंदविलेला असणे, लोकशाही मार्गाने शांततेत आंदोलन पार पाडण्याची प्रकल्पग्रस्तांनी खबरदारी घेतलेली असणे, मात्र प्रशासनाने बळजबरीने आंदोलन चिरडून प्रकल्पग्रस्तांना अटक करणे, त्यांचेवर गुन्हे दाखल करणे, अन्यायकारक गुन्हे दाखल झाल्याने स्थानिकांमध्ये नाराजी पसरणे, चुकीच्या पद्धतीने दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याविषयी त्यांनी वेळोवेळी लेखी निवेदने देऊनही शासनाने त्याची कोणतीच दखल न घेणे, जवळपास ६५ जणांवर गुन्हे दाखल झालेले असून यामध्ये सामाजिक कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांचाही समावेश असल्याने स्थानिक गावांमध्ये या विषयी नकारात्मक वातावरण निर्माण झालेले असणे, एकूणच प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांवर चुकीच्या पद्धतीने दाखल झालेले गुन्हे त्वरित मागे घेण्याविषयी वारंवार होत असलेली मागणी, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका.

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(८) ॲड अनिल परब वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.**

" वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीचा पुनर्विकासाचा प्रकल्प अद्याप रखडला असल्याचे नुकतेच माहे डिसेंबर,२०२२ मध्ये निदर्शनास येणे, शासकीय वसाहतीतील रहिवाश्यांना मालकी हक्काच्या सदनिका देण्यासाठी

भूखंड उपलब्ध करण्याच्या प्रस्तावास महाविकास आघाडी सरकारने सन २०२२ मध्ये दिलेली तत्वतः मान्यता, प्रस्तावास तत्वतः मान्यता मिळूनही अद्याप वसाहतीच्या पुनर्विकासाचा प्रकल्प रखडलेला असणे, परिणामी स्थानिक रहिवाशांना जीव मुठीत घेऊन रहावे लागत असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, वांद्रे शासकीय वसाहत ही ९६ एकर शासकीय भूखंडावर सन १९५९ ते १९७५ दरम्यान तत्कालिन विनिदेशानुसार बांधण्यात येणे, सदर वसाहतीमध्ये एकूण ३७० इमारती असून ४७८२ सदनिका असणे, सदरहू इमारतीचे आयुष्यमान हे केवळ ५० ते ६० वर्षाचेच असल्याचे सद्य:स्थितीत इमारतीची अवस्था अत्यंत बिकट असणे, इमारतीच्या काही भाग कोसळलेला, तर काही भागांच्या छताचा भाग पडलेला असणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिंनी सातत्याने शासनाकडे विविध आयुधांद्वारे लक्ष वेधूनही कोणतीच कार्यवाही होत नसणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, सद्यःस्थितीत वसाहतीतील निवासस्थानाची दुरावस्था पाहताव सदर इमारतीमध्ये वास्तव्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांची मानसिकता पाहता शासकीय वसाहतीचा पुनर्विकास तातडीने घेण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. ”

उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**१२. विधानसभेने संमत केल्याप्रमाणे विचार, खंडशः विचार संमत करणे.**

**(१) शालेय शिक्षण मंत्र्यांनी,** सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक ३८ - महाराष्ट्र अधिसंख्य पदांची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती (सुधारणा) विधेयक, २०२२ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्य सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, अभिजित वंजारी,राजेश राठोड यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्‌नंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल. आता सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण सुरू करावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(सन्माननीय सदस्यांची भाषणे झाली नाहीत.)

विधेयक विचारात घेण्यासबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**(२) वित्त व नियोजन मंत्र्यांनी,** सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ३५ - उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करणे (सुधारणा) विधेयक, २०२२ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्याबाबतच्या चर्चेत श्री. एकनाथराव खडसे वि.प.स. यांनी भाग घेतला.

उप मुख्यमंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**(३) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी,** सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक-३० - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२२ व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्य श्री अंबादास दानवे यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल. आता सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण सुरू करावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(सन्माननीय सदस्यांची भाषणे झाली नाहीत.)

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**(४) ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांनी,** सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ३१ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२२ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्य श्री अंबादास दानवे यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्‌नंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल. आता सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण सुरू करावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. एकनाथराव खडसे (२) श्री. अभिजित वंजारी

(३) श्री. जयंत प्र. पाटील

ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

१३. श्री. प्रवीण दरेकर व इतर वि.प.स. यांचा प्रस्ताव (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)

“ महाविकास आघाडी सरकारच्या ३३ महिन्यांच्या कार्यकाळात विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागातील अनेक विकास प्रकल्पांकडे झालेले अक्ष्यम दुर्लक्ष ” इ. बाबतचा प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. प्रवीण दरेकर (२) श्री. सचिन अहिर

(३) श्री. प्रसाद लाड (४) श्री. महादेव जानकर

(५) श्री. अंबादास दानवे (भाषण अपूर्ण)

( चर्चा अपूर्ण..

## गुरुवार, दिनांक २९ डिसेंबर, २०२२

**(क)** सर्वश्री. प्रवीण दरेकर व इतर वि.प.स. यांचा, " महाविकास आघाडी सरकारच्या ३३ महिन्यांच्या कार्यकाळात विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागातील अनेक विकास प्रकल्पांकडे झालेले अक्षम्य दुर्लक्ष " इ. बाबत म.वि.प. नियम, २६० अन्वये प्रस्ताव.

आणि

**(ख)** सर्वश्री. अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांचा, " राज्यात विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील अविकसित भागांचा झपाट्याने विकास करण्याची नितांत आवश्यकता " इ. बाबत म.वि.प. नियम, २६० अन्वये प्रस्ताव

तसेच

**(ग)** सर्वश्री. प्रवीण दरेकर व इतर वि.प.स. यांचा, " विद्यमान सरकार सत्तेवर येताच तत्कालीन सरकारच्या कार्यकाळात घेतलेल्या निर्णयांमध्ये बदल करून जनतेच्या हिताचे घेतलेले निर्णय " इ. बाबत म.वि.प. नियम, २६० अन्वये प्रस्ताव.

उपरोक्त प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाले.

उपरोक्त प्रस्तावांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. अंबादास दानवे (विरोधी पक्ष नेता)
(२) ॲड. निलय नाईक
(३) श्री. एकनाथराव खडसे
(४) श्री. श्रीकांत भारतीय
(५) श्री. जयंत प्र. पाटील (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून ४६ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता माननीय उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**१.** **(क)** बुधवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला श्री. विक्रम काळे व इतर वि.प.स. यांचा, " मुंबईतील इंदू मिलच्या जागेवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारणे " या विषयावरील एक तारांकित प्रश्नाचे उत्तर देण्यात आले.

**(ख) तारांकित प्रश्न -**

**(१)** आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एक तारांकित प्रश्न उत्तरित झाला. १६१८३ (चर्चा अपूर्ण)

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ५२ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ५७ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

(१) तारांकित प्रश्न क्रमांक १६१८३ (उत्तरित झाला), १५१५२, १५३५२ व १६०९४ यांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील अनुक्रमांक (६) ते (४८) वरील प्रश्न हे वेळेअभावी अतारांकित झाले.

२. श्री. अभिजीत वंजारी, समिती सदस्य यांनी, शुक्रवार, दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय विधेयकांना वेळ नेमून देण्यासंबंधीचे अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत सभागृहाला सादर केले व ते संमत करावे असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

प्रतिवृत्त संमत झाले.

३. आज गुरुवार, दिनांक २९ डिसेंबर, २०२२ रोजी म.वि.प. नियम, १०१-अ अन्वये प्राप्त झालेल्या विशेष उल्लेखाच्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्या असल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

४. आज गुरुवार, दिनांक २९ डिसेंबर, २०२२ रोजी प्राप्त झालेल्या औचित्याच्या मुद्यांपैकी मान्य करण्यात आलेले औचित्याचे मुद्दे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले असल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

आता सकाळी अपूर्ण राहिलेल्या नियम, २६० अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात होईल तसेच प्रस्तावावरील चर्चा संपल्यानंतर लक्षवेधी सूचना घेण्यात येतील असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

**(क)** सर्वश्री. प्रवीण दरेकर व इतर वि.प.स. यांचा, “ महाविकास आघाडी सरकारच्या ३३ महिन्यांच्या कार्यकाळात विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागातील अनेक विकास प्रकल्पांकडे झालेले अक्ष्यम दुर्लक्ष “ इ. बाबत म.वि.प. नियम, २६० अन्वये प्रस्ताव.

आणि

**(ख)** सर्वश्री. अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांचा, “ राज्यात विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील अविकसित भागांचा झपाट्याने विकास करण्याची नितांत आवश्यकता ” इ. बाबत म.वि.प. नियम, २६० अन्वये प्रस्ताव

तसेच

**(ग)** सर्वश्री. प्रवीण दरेकर व इतर वि.प.स. यांचा, “ विद्यमान सरकार सत्तेवर येताच तत्कालीन सरकारच्या कार्यकाळात घेतलेल्या निर्णयांमध्ये बदल करून जनतेच्या हिताचे घेतलेले निर्णय ” इ. बाबत म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव.

उपरोक्त प्रस्तावांवरील एकत्रित चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

श्री.जयंत प्र.पाटील यांनी आपले भाषण पूर्ण केले.

(६) श्री. राजेश राठोड
(७) डॉ. रणजित पाटील
(८) श्री. नरेंद्र दराडे
(९) श्री. अभिजीत वंजारी
(१०) श्री. रामदास आंबटकर
(११) श्री. अरुण लाड
(१२) श्री. रमेशदादा पाटील
(१३) श्री. अमोल मिटकरी
(१४) श्री. गोपिचंद पडळकर
(१५) श्री. सुरेश धस
(१६) श्री. आमश्या पाडवी
(१७) श्री. प्रवीण दटके (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची बैठक दुपारी ३.०० वाजेपर्यंत मध्यंतरासाठी स्थगित होत असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी दुपारी २ वाजून ३० मिनिटांनी स्थगित झाली.

मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक दुपारी ३.०० वाजता सुरू झाली.

**(क)** सर्वश्री. प्रवीण दरेकर व इतर वि.प.स. यांचा, “ महाविकास आघाडी सरकारच्या ३३ महिन्यांच्या कार्यकाळात विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागातील अनेक विकास प्रकल्पांकडे झालेले अक्षम्य दुर्लक्ष ” इ. बाबत म.वि.प. नियम, २६० अन्वये प्रस्ताव.

आणि

**(ख)** सर्वश्री. अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांचा, “ राज्यात विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील अविकसित भागांचा झपाट्याने विकास करण्याची नितांत आवश्यकता ” इ. बाबत म.वि.प. नियम, २६० अन्वये प्रस्ताव

तसेच

**(ग)** सर्वश्री. प्रवीण दरेकर व इतर वि.प.स. यांचा, “ विद्यमान सरकार सत्तेवर येताच तत्कालीन सरकारच्या कार्यकाळात घेतलेल्या निर्णयांमध्ये बदल करून जनतेच्या हिताचे घेतलेले निर्णय ” इ. बाबत म.वि.प. नियम, २६० अन्वये प्रस्ताव.

उपरोक्त प्रस्तावांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

श्री. प्रवीण दटके यांनी आपले भाषण पूर्ण केले.

(१८) श्री. प्रवीण पोटे-पाटील

(चर्चा अपूर्ण)

श्री. श्रीकांत भारतीय, वि.प.स. यांनी, “ महाराष्ट्रातील सर्व सार्वजनिक ठिकाणी “ हिरकणी कक्ष” उभा करण्यात यावा ” इ. बाबत हरकतीचा मुद्दा उपस्थित केला.

सन्माननीय सदस्यांनी महत्वाचा विषय मांडला असून त्याची नोंद घेण्यात येईल असे शालेय शिक्षण मंत्र्यांनी सांगितले.

**५.** **(९)** सर्वश्री. विक्रम काळे व इतर वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना –

श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले -

“ राज्यातील कायम शब्द वगळलेल्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व वर्गतुकड्यांची पुन्हा मंत्रालय स्तरावरून तपासणी करणे, तपासणीअंती त्रुटी पूर्ण केलेल्या शाळांची यादी घोषित करण्यासाठी शिक्षक लोकप्रतिनिधींनी वारंवार पाठपुरावा करणे, तत्कालीन सरकारने या याद्या घोषित करण्यासाठी मान्यता देणे, त्या सर्व शाळांचे शासन निर्णय शिक्षण विभागाकडून तयार होणे, तरीही शासन निर्णय निर्गमित न होणे, तत्कालीन आघाडी सरकारने सन २०११ मध्ये विनाअनुदान शाळांना अनुदान देण्यासाठी मान्य केलेले प्रचलित धोरण पहिल्या वर्षी २०%, दुसऱ्या वर्षी ४०%, तिसऱ्या वर्षी ६०% व चौथ्या वर्षी ८०% व पाचव्या वर्षी १००% अनुदान याप्रमाणे वेतन अनुदान देण्याचा निर्णय न होणे, मूल्यांकन निकषानुसार तपासणीअंती अनुदानास पात्र ठरणाऱ्या अघोषित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा तसेच सन २०१२-१३ च्या

वर्गतुकड्यांना वेतनअनुदानासाठी पात्र ठरवून शिक्षण आयुक्तांमार्फत प्रस्ताव शासनास सादर होणे, तरीही शासन स्तरावरुन सदरील शाळा व वर्ग तुकड्या अनुदानासाठी घोषित न होणे, या सर्व कायम शब्द वगळलेल्या शाळेतील शिक्षक-कर्मचाऱ्यांना सेवासंरक्षण देणे, यासाठी शिक्षक लोकप्रतिनिधी सातत्याने शासनाकडे पाठपुरावा करणे, राज्यातील शिक्षक-कर्मचारी आझाद मैदानावर वेळोवेळी आंदोलन करणे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ”

शालेय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(१०)** श्री. किरण सरनाईक, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले--

“ राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अनेक समस्या असून यामुळे हे कर्मचारी तणावपूर्ण वातावरणात काम करत असणे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पद भरती रखडलेली असणे, राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन व कोविड काळापासून प्रलंबित असलेले वैद्यकीय देयकासाठीच्या निधीची तरतूद अद्याप केलेली नसणे, डी.सी.पी.एस/ एन.पी.एस. खाते नसणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना सातव्या वेतन आयोगाचा हप्ता रोखीने मिळत नसणे, डी.सी.पी.एस/एन.पी.एस. खाते धारकांना ६ व ७ व्या वेतन आयोगाची थकबाकी मिळत नसणे, राज्यातील ० ते २० पट संख्या असलेल्या शाळा बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, यामुळे विद्यार्थी व शिक्षक दोघांचेही नुकसान होणार असणे, तरीही शासन हा निर्णय मागे न घेणे, नगर परिषद माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती योजनाचा लाभ मिळत नसणे, राज्यातील मान्यताप्राप्त अनुदानित शाळामधील पूर्णवेळ शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रत्येकी २ मुलांना निःशुल्क शिक्षण देण्याबाबत अद्याप निर्णय न होणे, राज्यात बृहत आराखडा शिवाय कुठल्याही स्वयंअर्थसहाय्यित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयांना मान्यता न देण्याबाबतही शासनामार्फत कोणताही निर्णय अद्याप न होणे, परिणामी राज्याचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी-पालकांमध्ये शासनाच्या या शैक्षणिक उदासीन धोरणामुळे शासनाप्रती चिडीची व संतापाची भावना निर्माण होणे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या या विविध समस्या तातडीने सोडवण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

शालेय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवी वर्षासंबंधी औरंगाबाद जिल्ह्यातील सर्व सन्माननीय सदस्यांची बैठक घेण्यात येईल असे शालेय शिक्षण मंत्र्यांनी सांगितले.

उपरोक्त मुद्यासंदर्भात विरोधी पक्ष नेते यांनी आपले मत व्यक्त केले.

**(६)** श्री. गोपिचंद पडळकर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधले –

" महाराष्ट्र राज्यातील कोळी, महादेव कोळी, मल्हार, ढोर, कोळी , आणि टोकरे कोळी, या जमातींच्यावर अन्याय होत असणे, कोळी समाज एसटी आणि एसबीसी असे दोन कॅटेगिरीमध्ये विभागले गेले असणे, ज्यामध्ये केव्हा समुद्रकिनारी राहून वंशपरंपरेने मासेमारीचा व्यवसाय करणारे सोन कोळी किंवा मच्छीमार कोळी समाजातील लोकांना एसबीसी मध्ये समाविष्ट करण्यात आलेले असणे असे असताना सुद्धा समुद्रकिनाऱ्या-व्यतिरिक्त इतर प्रत्येक जिल्ह्यातील महादेव कोळी, मल्हार कोळी, टोकरे कोळी, ढोर कोळी, डोंगर कोळी यांना एसटीच्या सवलती देण्यात येत नसणे, जर आदिवासी क्षेत्राबाहेर राहणाऱ्या आदिवासींना आदिवासी विकास विभाग बोगस समजत असेल तर राज्यामध्ये अनुसूचित जमातीच्या एकूण लोकसंख्या ९.३५% (१,०५,१०,२१३) असणे ज्यामध्ये आदिवासी क्षेत्रामध्ये (STP) ३.९% (४३,७२,००७ तर आदिवासी क्षेत्राबाहेर (OTSP) ५.४% (६१,३८,२०६ ) लोकसंख्या असणे, महाराष्ट्र मध्ये एकूण ९.३५ % लोकसंख्या असल्याकारणाने अनुसूचित जमातीच्या आरक्षणापासून एकूण २५ आमदार आणि चार खासदार निवडून येत असणे, ज्यामध्ये आदिवासी क्षेत्रातीलल ३.९% लोकसंख्येमुळे ११ आणि २ खासदार तर आदिवासी क्षेत्राबाहेरीलल ५.४% लोकसंख्येमुळे १४ आमदार आणि दोन खासदार निवडून येत असणे, जर आदिवासी क्षेत्राबाहेर राहणारे ५.४ % लोक ३० ते ३३ जमाती बोगस असल्यास, त्यांच्या लोकसंख्येच्या आधारावर निवडून येणारे १४ आमदार आणि दोन खासदार सुद्धा नैसर्गिकपणे बोगस ठरत असणे, त्यामुळे राज्यातील कोळी, महादेव कोळी, मल्हार कोळी, ढोर आणि टोकरे कोळी या जमातीवर होत असलेला अन्यायाविषयी तोडगा काढण्याची मागणी निवेदनाद्वारे दिनांक १६/९/२०२२ रोजी राज्याचे आदिवासी विकास मंत्री यांना आदिवासी कोळी जमात सामाजिक संस्था, खानापुरे यांच्या कडून करण्यात येणे, उक्त मागणीच्या अनुषंगाने योग्य ती उपाययोजना करण्याची आवश्यकता."

आदिवासी विकास मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(७)** सर्वश्री सतीश चव्हाण व इतर वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना –

श्री.सतीश चव्हाण, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे ग्रामविकास मंत्र्यांचे लक्ष वेधले –

" गंगापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील तुर्काबाद खराडी येथून नागझरी नदी वाहत असणे, सदर नदीचे पात्र किमान १०० फुटाचे असणे, सदर नदी पात्र बारामाही वाहत असून पावसाळ्यात पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने परिसरातील नागरिकांना नदी ओलांडणे अवघड जात असणे, तुर्काबाद, राजुरा, शेरोडी, मलकापुर, डोमेगांव, बोरगांव सह येसगांव येथील लोकसंख्या किमान २५ हजार असणे, सदर परिसरातील ग्रामस्थांना वाळुज औद्योगिक परिसरात जाण्यासाठी हाच एकमेव रस्ता असणे, नदी पात्रात पाणी असल्याने पादचारी व दोन चाकी वाहनास नदी ओलांडून जाण्यासाठी त्रास सहन करावा लागत असणे, मागील दोन वर्षापूर्वी शेतातून घरी पायी येत असतांना नदी ओलांडतांना पाण्याचा अंदाज न आल्याने एका ३५ वर्षीय शेतकऱ्याला जीव गमवावा लागला असणे, सततच्या पावसाने नदीपात्रात नेहमी मोठया प्रमाणावर पाणी वाहत असणे, वाळूज औद्योगिक वसाहतीत कामगारांना जाण्यासाठी कायमच अडचणी येत असणे, तुर्काबाद खराडी परिसरातील शेतकरी,कामगार व शाळेकरी मुलांना येण्याजाण्यासाठी सदर नागझरी नदीवर पूल बांधणे अत्यंत गरजेचे असणे, सदर ठिकाणी पुलाचे बांधकाम करण्यासाठी होत असलेली मागणी, याबाबतीत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

ग्रामविकास मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(८)** श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले –

" सातारा जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या उभारणी करण्यासाठी कृष्णानगर पाटबंधारे वसाहतीमध्ये कृष्णा खोरे विकास महामंडळाची सुमारे ६३ एकर जागा या महाविद्यालयासाठी देण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, जून २०२२ मध्ये पोलीस प्रशासन व कार्यकारी अभियंता धोम कालवे विभाग क्र. २ यांनी व काही अधिकारी व बाहेरच्या लोकांनी संयुक्त मोहीम राबवून या जागेत असलेल्या सुमारे ४५ वर्षांपासूनचे व्यापारी गाळे, ४७ कार्यालयीन इमारती, १२ तात्पुरते गोडाऊन व १२३ निवासी इमारतीचा समावेश असलेल्या या वास्तु पाडण्यास सुरुवात करणे, जुन्या इमारती, गोडाऊन व दुकाने पाडल्यानंतर लोखंडी स्टील, विटा व अन्य बांधकाम साहित्याची निविदा प्रक्रिया न काढता किंवा लिलाव न करता या भंगार मालाची अनधिकृतपणे विक्री करून न कोट्यवधी रुपयाचा केलेला भ्रष्टाचार या संदर्भात काही सामाजिक संघटनांनी चौकशी करून संबंधितांविरुद्ध कारवाई करण्याची जिल्हाधिकारी, सातारा यांना दिलेले निवेदन, या संदर्भात चौकशी करून संबंधिताविरुद्ध कारवाई करण्याची तेथील लोकप्रतिनिधींसह इतर सामाजिक संघटनांनी केलेली मागणी, यावरर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना. "

वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(१३)** श्री. राजेश राठोड, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास मंत्र्यांचे लक्ष वेधले -

" अखिल बंजारा समाजाचे तीर्थक्षेत्र असलेले वाशिम जिल्ह्यातील पोहरादेवी हे स्थान बंजारा समाजासाठी श्रद्धास्थान असणे, पोहरादेवी या ठिकाणी बंजारा समाजातील नागरिक मोठया संख्येत दररोज दर्शनासाठी येत असून या ठिकाणी बंजारा कुंभ घेणे आवश्यक असतांना अखिल भारतीय धर्मजागरण समन्वय या संघटनेद्वारे जानेवारी, २०२३ मध्ये गोद्री ता. जामनेर जिल्हा जळगांव येथे कुंभमेळयाचे आयोजन करण्यात आलेले असणे, शासनाने हिंदुगोर बंजारा व लबाना नायकडा कुंभकरिता पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा व मलनिःस्सारण शौचालय व स्नानगृह यासाठी सुमारे ४ कोटीपेक्षा जास्त निधीची मंजुरी दिलेली असून शासनाचे १०० कोटी पेक्षा जास्त निधी खर्च करण्याची तयारी असणे, वास्तविकक हिंदु कुंभमेळा अलाहाबाद, नाशिक, हरिद्वार, उज्जैन अशा ठराविकच तीर्थक्षेत्रामध्ये भरविला जात असणे, असे असताना गोद्री जामनेर या ठिकाणची निवड कोणत्या आधारे करण्यात आली तसेच केवळ हिंदु धर्म व्यापक असल्याने हिंदु बंजारा कुंभ आयोजित करुन बंजारा जमाती करिता मर्यादित का ठेवण्यात आला याबाबत जनमानसात होत असलेली चर्चा, शासनाच्या निधीची तरतूद करताना कशाच्या आधारे कामाची निवड केली गेली, गावाची संख्या कमी भौतिक सुविधांसाठी जास्त निधी अशा प्रकारे जनतेच्या पैशाचा गैरवापर केला जात असल्याची नागरिकांमध्ये निर्माण होत असलेली शंका, या प्रकारातून पोहरादेवी या ठिकाणचे महत्व कमी करण्याचे होत असलेले प्रयत्न, सदरच्या कुंभमेळाच्या आयोजनामुळे हिंदू बंजारा असे नवीन नामकरण आयोजकांकडून करण्यात येणे, पोहरादेवी येथे पायाभूत सुविधा स्वच्छतागृह, रस्ते, पिण्याचे पाणी इत्यादीची व्यवस्था होणे गरजेचे असताना जाणीवपूर्वकपणे गोद्री येथे कुंभ भरविण्यात येत असल्याने बंजारा समाज बांधवात निर्माण झालेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन करावयाची आवश्यक कार्यवाही याबाबत शासनाची प्रतिक्रिया. "

ग्रामविकास मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आता अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा करण्यात येईल असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

**६. सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, डॉ. सुधीर तांबे, ॲड.अनिल परब, सर्वश्री एकनाथराव खडसे, अभिजीत वंजारी, सचिन अहिर, सुनिल शिंदे, सतेज उर्फ बंटी पाटील, राजेश राठोड, विलास पोतनीस, अमोल मिटकरी, जयंत आसगावकर, नरेंद्र दराडे, सतीश चव्हाण, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री वजाहत मिर्झा, जयंत पाटील, विप्लव बाजोरीया, अनिकेत तटकरे, आमश्या पाडवी, अरुण लाड, अब्दुलाखान दुर्राणी, वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव —**

श्री.अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी म.वि.प. नियम २५९ अन्वये पुढील अंतिम आठवडा प्रस्ताव मांडला व भाषण केले -

" राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्थेची स्थिती, गंभीर गुन्ह्यांना आळा घालण्यात सरकारला आलेले अपयश, राज्यात अवैध धंद्यात तसेच महिलांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ, अनुसूचित जमातीच्या महिलेवरील बलात्कार व हत्येचा गुन्हा दडपण्याचा पोलिसांकडून झालेला प्रयत्न, वेठबिगारीसाठी अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींच्या खरेदी-विक्रीच्या उघडकीस आलेल्या घटना, बालगृहात होणारे मृत्यू, सत्तारुढ लोकप्रतिनिधीच्या आक्षेपार्ह वक्तव्यांमुळे राजकीय गुंडगिरीला मिळालेला अभय, राजकीय कुरघोडीतून होत असलेले गुन्हे, प्रशासकीय यंत्रणा, पोलीस दल व केंद्रीय यंत्रणांचा राजकीय सुडबुध्दीने होत असलेला गैरवापर, सत्तारुढ पक्षाच्या लोकप्रतिनिधींच्या सुरक्षेसाठी निर्भया पथकातील वाहनांचा गैरवापर करणे, विरोधी पक्षाच्या लोकप्रतिनिधींवर खोटे आरोप ठेऊन त्यांना जेलमध्ये डांबून ठेवणे, सत्तारुढ पक्षाच्या लोकप्रतिनिधींकडून विरोधी पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांना धमक्या देणे, तसेच त्यांच्यावर खोट्या पोलीस केसेस दाखल करणे, अतिरेकी हल्ल्याच्या धमक्यांचे सत्र सुरू असून लोकप्रतिनिधी व उद्योजकांनाही धमक्या आल्या असणे, यामुळे महाराष्ट्रातील सर्व गोरगरीब जनतेमध्ये निर्माण झालेले असुरक्षिततेचे व भीतीचे वातावरण, गत सहा महिन्यांच्या कालावधीत महाराष्ट्रातील महापुरुषांचा अवमान करणारी, महाराष्ट्राच्या भूमीचे विभाजन करणारी महाराष्ट्राच्या स्वाभिमानाशी खेळणारी, महाराष्ट्र हिताशी प्रतारणा करणारी वक्तव्ये, निर्णय, कृती सांविधानिक पदावर असलेल्या व्यक्तीकडून महाराष्ट्रात घडल्या असणे, यामुळे महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला तडा गेल्याची भावना जनमानसात निर्माण झाली असणे, अर्धन्यायिक प्रकरणात पदाचा दुरुपयोग केल्याची तसेच मंत्र्यांची व प्रशासकीय यंत्रणांची अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणे उघडकीस आली असणे, तसेच, राज्य परिवहन महामंडळाच्या जुन्या बसेसची दुरवस्था झाली असून त्याजागी नवीन बस खरेदी करण्याची आवश्यकता, तसेच राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभे करण्याची घोषणा राज्यसरकारने केली असली तरी त्यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद केलेली नसणे, राज्यात काही शैक्षणिक संस्थांनी मान्यता न घेता फिजिओथेरपीचे अभ्यासक्रम सुरू केले असणे, राज्यावर करोना महामारीचे संकट पुन्हा घोंगावत असल्याने त्याबाबत तातडीने करावयाच्या उपाययोजना, गत ६ महिन्यात कुपोषणाचे वाढलेले प्रमाण, व्हेंटिलेटर अभावी नागपूरच्या मेडिकल हॉस्पिटलमध्ये १७ वर्षांच्या मुलीचा मृत्यू झाला असणे, जव्हार तालुक्यातील २१ वर्षीय मातेची रस्त्याअभावी जंगलात प्रसूती होणे, स्व.बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गासारख्या महामार्गावर १०८ च्या रुग्णवाहिका, इंडिकेटर व इतर आरोग्य सुविधा उपलब्ध नसणे, राज्यात शिक्षक पात्रता परीक्षेत (टीईटी) गैरप्रकार झाले असणे, आजही दोषी उमेदवार कार्यरत असणे, कमी पटसंख्येच्या शासकीय शाळा बंद केल्यामुळे ग्रामीण, दुर्गम आदिवासी भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली असणे, शालेय पोषण आहार योजनेमध्ये झालेला गैरव्यवहार, शासनाच्या " आपले गुरुजी उपक्रमाला शिक्षक व पालकांकडून होत असलेला तीव्र विरोध, आठवी ऐवजी

तिसरीपासून परीक्षा घेण्याबाबत राज्याच्या शिक्षण मंत्र्यांनी व्यक्त केलेला मानस, परिणामी शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेली संदिग्धता, राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा स्थगित झाली असणे, सन २०२१-२२ या वर्षाचे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्काराला विलंब होत असणे, राज्यातील खासगी, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व वर्ग तुकड्यांतील ६५ हजार विना आणि अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना माहे जून, २०१४ व नोव्हेंबर, २०१५ मधील वेतन अनुदान वितरणाचे सूत्र लागू करण्याची होत असलेली मागणी, तसेच सरकारच्या उदासीन धोरणांमुळे गेल्या सहा महिन्यांत वेदान्त फॉक्सकॉन, टाटा एअर बस, बल्क ड्रग पार्क सह अनेक उद्योग महाराष्ट्राबाहेर गेले असणे, महाराष्ट्रात गुंतवणूक होण्यासाठी राजकीय इच्छाशक्तीचा अभाव असणे, परिणामी महाराष्ट्रातील बेरोजगार तरुणांच्या हिरावलेल्या रोजगाराची संधी, उद्योजकांना जमिनी वाटप करण्याच्या एमआयडीसीच्या निर्णयाला स्थगिती दिल्यामुळे हजारो लघु व मध्यम उद्योग उभारण्यात अडथळा निर्माण होणे, तसेच गरीबांसाठी राबविण्यात येत असलेली “ आनंदाचा शिधा ” या योजनेत झालेला भ्रष्टाचार व गैरव्यवहार, मागील सरकारनं यशस्वीपणे राबवलेल्या शिवभोजन थाळी योजनेकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, माहे जून ते ऑक्टोबर, २०२२ या काळात अतिवृष्टी, पूर, सततचा पाऊस व अवकाळी पाऊस यामुळे राज्यातील फळपिकांचे नुकसान झाले असणे, ओला दुष्काळ जाहीर करण्याच्या केलेल्या मागणीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, शेतकऱ्यांना जाहीर केलेली मदत तुटपुंजी असून उक्त मदत अद्याप लाखो शेतकऱ्यांना मिळालेली नसणे, शासनाच्या उदासीनतेमुळे पीक विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांचे लाखो दावे नाकारून केलेली फसवणूक, लम्पी रोगावर नियंत्रण मिळविण्यास शासनास आलेले अपयश, त्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या पशुधनाचे झालेले नुकसान, त्यासाठी करावयाच्या उपाययोजना याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, राज्यात महागाईचा उसळलेला डोंब, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी. ”

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

(चर्चा अपूर्ण)

**(क)** सर्वश्री. प्रवीण दरेकर व इतर वि.प.स. यांचा, “ महाविकास आघाडी सरकारच्या ३३ महिन्यांच्या कार्यकाळात विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागातील अनेक विकास प्रकल्पांकडे झालेले अक्ष्यम दुर्लक्ष ” इ. बाबत म.वि.प. नियम, २६० अन्वये प्रस्ताव.

आणि

**(ख)** सर्वश्री. अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांचा, “ राज्यात विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील अविकसित भागांचा झपाट्याने विकास करण्याची नितांत आवश्यकता ” इ. बाबत म.वि.प. नियम, २६० अन्वये प्रस्ताव

तसेच

**(ग)** सर्वश्री. प्रवीण दरेकर व इतर वि.प.स. यांचा, " विद्यमान सरकार सत्तेवर येताच तत्कालीन सरकारच्या कार्यकाळात घेतलेल्या निर्णयांमध्ये बदल करून जनतेच्या हिताचे घेतलेले निर्णय इ. बाबत म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव.

विदर्भाशी संबंधित दोन प्रस्तावाचा संबंध किंवा अंतर्भाव असल्यामुळे त्याचे एकत्रितपणे उत्तर देण्यात येईल तसेच तिसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. प्रवीण दरेकर यांचा असून त्याचे उत्तर अंतिम आठवडा प्रस्तावात एकत्रित करून दिले जाईल असे उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

उपरोक्त प्रस्तावांवरील चर्चेस उप मुख्यमंत्र्यांनी एकत्रितपणे उत्तर दिले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी उत्तरादाखल भाषण केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

उपरोक्त प्रस्तावावर सभागृहाने विचार केला असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

श्री. गोपिचंद पडळकर, वि.प.स. यांनी, " आटपाडी येथे वरद हॉस्पिटलमध्ये धर्मांतरणा संदर्भातील गंभीर घटना घडलेली असणे " इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

श्री. गोपिचंद पडळकर, वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या प्रत्येक मुद्यांची चौकशी होईल आणि त्यावर नियमानुसार कारवाई केली जाईल असे उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**७. निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांना निरोप** –

निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांसंदर्भात माननीय उप सभापतींनी पुढील घोषणा केली –

आज एकूण ५ सन्माननीय सदस्यांना निरोप द्यायचा आहे. पुढील महिन्यात म्हणजे दिनांक ७ फेब्रुवारी, २०२३ रोजी निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत –

(१) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२) डॉ. सुधीर तांबे, वि.प.स.

(३) डॉ. रणजित पाटील, वि.प.स.

(४) श्री. नागोराव गाणार, वि.प.स.

(५) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

माननीय उप मुख्यमंत्र्यांनी निवृत्त होणाऱ्या सदस्यांबाबत आपल्या भावना व्यक्त केल्या.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

निवृत्त होणाऱ्या खालील सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

(१) श्री. विक्रम काळे

(२) डॉ. सुधीर तांबे

(३) डॉ. रणजित पाटील

(४) श्री. नागोराव गाणार

माननीय उप सभापतींनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

**शुक्रवार, दिनांक ३० डिसेंबर, २०२२**

" राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली परिस्थिती व राज्यातील विविध समस्याबाबत " या विषयावर सर्वश्री अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते व इतर वि.प.स. यांचा प्रस्ताव.

उपरोक्त प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला–

(१) श्री. शशिकांत शिंदे (२) श्री. चंद्रशेखर बावनकुळे
(३) श्री. नरेंद्र दराडे (४) डॉ. प्रज्ञा सातव
(५) श्री. जयंत प्र. पाटील (भाषण पूर्ण )

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून ४६ मिनिटांनी दुपारी १२. ०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता माननीय उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**१.** (१) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पाच प्रश्न क्रमांक हे प्रश्न उत्तरीत झाले.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील साठवरील प्रश्न हे वेळेअभावी अतारांकित झाले.

**२.** माननीय उप सभापती यांनी, अतारांकित प्रश्नोत्तरांची चौदावी, पंधरावी, सोळावी, सतरावी, अठरावी, एकोणीसावी, विसावी, एकविसावी, बाविसावी व तेविसावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवली.

**३.** (१) पर्यटन मंत्र्यांनी, " भूपृष्ठ सिंचनातील परिणामांवर निष्पादन लेखापरीक्षण अहवाल"

(२) " सन २०२१-२०२२ या वर्षाचा विनियोजन लेखा अहवाल " (३) " सन २०२१-२०२२ या वर्षाचा वित्तीय लेखा अहवाल खंड - एक व खंड - दोन" सभागृहासमोर ठेवला.

(२) रोजगार मंत्र्यांनी, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ कलम ४ च्या खंड (ब) अंतर्गत संशोधन संस्था म्हणून घोषित करणे व कलम ३ मधील तरतुदी सदर संस्थांना लागू न होण्याबाबत प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक-संकीर्ण-२०२२/ प्र.क्र.३४/२०२२/ वैसेवा-२, दिनांक १७ नोव्हेंबर,२०२२ " सभागृहा समोर ठेवली.

**४.** प्रधान सचिवांनी, विधानपरिषदेने संमत केलेल्या विधेयकांना विधानसभेची संमती मिळालेली ३ वि.प.विधेयके व माननीय राज्यपालांची अधिसंमती मिळालेले १ वि.स.विधेयक यांची नावे सभागृहास वाचून दाखविली.

श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी, " व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी अखेरच्या फेरीत प्रवेश घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करणे " इ. बाबत मुद्दा उपस्थित केला. श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स. यांनीही याबाबत आपले मत व्यक्त केले.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

श्री. आमश्या पाडवी, वि.प.स. यांनी , " लतिफ पठान हा अधिकारी बोगस जातीचे प्रमाणपत्र घेऊन नोकरीवर लागल्याच्या प्रकरणी केलेली तक्रार " याबाबतचा मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

सदरहू प्रकरणी आवश्यकता असल्यास पोलिसांची मदत घेऊन आवश्यक ती कारवाई करण्याचे निर्देश दिलेले असल्याचे शालेय शिक्षण मंत्र्यांनी सांगितले.

" नांदेडच्या एका पत्रकाराने वर्तमानपत्रातील बातमी Whats App लतिफ पठान याबाबत एक बातमी आपल्याला पाठविली असून सदरहू बातमी कोणत्या वर्तमानपत्रात छापून आली आहे हे विधिमंडळ सचिवालयाला शोधण्यास सांगितले आहे. त्या बातमीत असा उल्लेख आहे की, "पठान यांना निलंबित करण्यात आले. उप सभापतींचे निर्देश. " मुळात असे निर्देश दिलेले नसताना सुद्धा ती बातमी छापून आली आहे. तथापि, आजची बातमी नीट प्रसिद्ध होईल असे पहावे. " असे निदेश माननीय उप सभापतींनी दिले.

५. माननीय उप सभापतींनी, भारताचे पंतप्रधान मा.श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या मातोश्री श्रीमती हिराबेन दामोदरदास मोदी यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला.

शोक प्रस्तावाची एक प्रत व विधानमंडळाचे स्मृतीपत्र शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल, असे

६. माननीय उप सभापतींनी पुढील घोषणा केली-

" निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांना निरोप देण्याचा कार्यक्रम काल पार पडलेला आहे. नेहमीच्या प्रथेप्रमाणे विधान भवनाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ एकत्रित छायाचित्र काढण्याचा कार्यक्रम आयोजित केला आहे. "

सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी दुपारी ०१ वाजून २१ मिनिटांनी २.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक २.०० वाजता पुन्हा सुरु झाली.

७. (१) कामगार मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ३३ - महाराष्ट्र कामगार कायदे (सुधारणा) विधेयक,२०२२ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेता यांचा विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी भाग घेतला.

माननीय मंत्री महोदयांनी सदरहू विधेयकाच्या अनुषंगाने माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री आणि माननीय संसदीय कार्यमंत्री महोदयांसमवेत चर्चा करावी. सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांचा असा कल दिसून येत आहे की, हे विधेयक थांबवून पुढील ३६ क्रमांकाचे विधेयक चर्चेला घ्यावे, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(२) शालेय शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ३६ - महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेता यांचा विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडण्यात आला.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

या विधेयकाबाबत ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा उल्लेख आहे. त्याबाबत दोन्ही सभागृहांची मंजुरी आवश्यक असते. तसेच ही बाब माननीय विरोधी पक्ष नेत्यांशी चर्चा करून यावर निर्णय घेण्यात येईल. त्यामुळे या विधेयकावरील चर्चा नंतर घेण्यात यावी, असे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

ॲड. अनिल परब व श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी “ वि.स.वि. क्रमांक ३३ बाबत” मुद्दा उपस्थित केला.

उपमुख्यमंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

विधयेक क्रमांक ३३ प्रलंबित ठेवत असून ७५ जणांच्या संयुक्तक्त चिकित्सा समितीकडे असे जे वाचले आहे, त्या संदर्भात कार्यवृत्तामध्ये सुधारणा करण्यात येईल, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(३) उप मुख्यमंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ३२ - महाराष्ट्र पोलीस आणि महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) (सुधारणा) विधेयक,२०२२ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेता यांचा विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

उपरोक्त विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खंडश : विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(४) कौशल्य विकास मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ३९– आयटीएम कैशल्य विद्यापीठ,नवी मुंबई विधेयक,२०२२ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेता यांचा विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

उपरोक्त विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खंडश : विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

महादेव जानकर, वि.प.स. यांनी, "आज दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी नागपूर येथील हिवाळी अधिवेशन संपल्यानंतर बहुतांश आमदार व त्यांची कुटुंबे, स्वीय सहाय्यक, वरिष्ठ व कनिष्ठ अधिकारी नागपूर येथून मुंबईला असल्यामुळे दुरान्तो एक्सप्रेसला दोन एसी डबे जोडण्याकरिता रेल्वे राज्यमंत्री माननीय श्री. रावसाहेब दानवे यांना विनंती करणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

८. (१) श्री. विलास पोतनीस व श्री. सुनील शिंदे, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना-

श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

" अंधेरी, मुंबई येथील साकीनाका परिसरात प्लेसमेंट कार्यालय उघडून परदेशात नोकरीसाठी पाठवण्याचे प्रलोभन दाखवून बेरोजगार तरुणांना फसविणारी टोळी कार्यरत असल्याची बाब दि. ७ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास उघडकीस येणे, या टोळीने आलिशान कार्यालय उघडून मुंबईतील अनेक बेरोजगार तरुणांना लाखो रुपयांना गंडा घातलेला असणे, या टोळीकडून एका प्लेसमेंट एजंटला माहे डिसेंबर,२०२० मध्ये फारइस्ट ड्रिलिंग प्रा. लि. कंपनीकडून परदेशांत नोकरीच्या संधी उपलब्ध असल्याचा ई मेल पाठविण्यात आला असणे, अनेक बेरोजगार तरुण संपर्कात असलेल्या या एजंटने सर्व बेरोजगार तरुणांची कागदपत्रे, पासपोर्ट व विविध शुल्कापोटी रोख रक्कम साकीनाका परिसरातील प्लेसमेंट कार्यालयात जमा केली असणे, परंतु गेल्या वर्षभरापासून या बेरोजगार तरुणांना परदेशात नोकरीस पाठविण्यास सदरहू कार्यालयाकडून टाळाटाळ सुरू असणे, त्यामुळे सरतेशेवटी रोख रक्कम परत मिळविण्यासाठी बेरोजगार तरुणांनी सदरहू प्लेसमेंट कार्यालय गाठले असता कार्यालय बंद करून टोळी गायब झाल्याची धक्कादायक बाब समोर येणे, त्यामुळे हवालदिल झालेल्या संबंधित बेरोजगार युवकांनी साकीनाका पोलीस ठाण्यात तक्रार दिलेली असणे, या टोळीने मुंबई शहराच्या विविध भागात प्लेसमेंट कार्यालये उघडून अशाच प्रकारे अनेक बेरोजगार तरुणांची फसवणूक केली असल्याची दाट शक्यता असणे, त्यामुळे सदर प्रकरणाच्या तपासासाठी विशेष पथक नेमून सखोल चौकशी करून बेरोजगार तरुणांना फसवणूक करणाऱ्या टोळीस तातडीने अटक करण्याची असलेली नितांत आवश्यकता, त्यामुळे सदरहू प्रकरणाचा तपास जलद गतीने करून दोषींना कठोर शासन करण्यास अशाप्रकारे बेरोजगार तरुणांना नोकरीची प्रलोभने दाखवून त्यांची आर्थिक लूट करण्यासाठी मुंबईत जागोजागी उघडण्यात आलेल्या प्लेसमेंट कार्यालयांवर अंकुश ठेवण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया. "

उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्रीमती उमा खापरे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

" शासकीय सेवेत असताना किंवा निमशासकीय सेवेत असताना अथवा सेवा निवृत्त वेतनाचा लाभ घेत असलेल्या आई-वडिलांच्या निधनानंतर वारसा हक्काने त्यांच्या पश्चात अविवाहित किंवा घटस्फोटीत किंवा दिव्यांग / मानसिक दृष्ट्या सक्षम नसणाऱ्या मुलींना त्यांच्या आई-वडिलांची पेन्शन मिळत नसल्याने अशा कुटुंबीयांचे होत असलेले आर्थिक हाल, यामुळे आई-वडिलांच्या निधनानंतर वारसा हक्काने त्यांच्या पश्चात मुलींना पेन्शन मिळण्याबाबतचे केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे राज्य शासनाकडून कार्यवाही होण्याबाबतची होत असलेली मागणी, याबाबत तातडीने कार्यवाही होऊन अशा मुलींना आर्थिक आधार देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. "

उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. रामराव पाटील, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महिला व बालविकास मंत्र्यांचे लक्ष वेधले-

" राज्यातील विधवा महिलांच्या समान अधिकारांवर व स्वतंत्र अस्तित्वावर गदा येत असल्याचे नुकतेच दिसून येणे, या अनिष्ट, क्रूर, व जाचक प्रथेतून मुक्त करण्यासाठी महाविकास आघाडी सरकारने दि. १७ मे २०२२ रोजी हेरवाड, ता. शिरोळ जिल्हा कोल्हापूर पॅटर्न संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्यात यावा म्हणून परिपत्रक काढून ही प्रथा बांद करण्याबाबत ग्रामसभेत ठराव मंजूर करणे, महिलांना सन्मानाची व सौजन्याची वागणूक मिळण्याकरिता त्यामुळे शासनाने तातडीने राज्यात विधवा महिला सन्मान व संरक्षण कायदा करण्याची अत्यंत आवश्यकता, शासनाने याबाबत तातडीने दखल घेऊन न्याय देण्याची आवश्यकता व करावयाची उपाययोजना. "

उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. एकनाथराव पाटील, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

" जळगाव जिल्ह्यातील भुसावळ औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र दिपनगर येथे युनिट क्र. ४ व ५ चे बांधकाम पूर्ण होऊन वीज निर्मितीला सुरुवात झालेली असून त्याद्वारे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असणे, या संदर्भात दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी अध्यक्ष एम.पी.सी.बी. व प्रधान सचिव, ऊर्जा विभाग यांचेकडे केलेली तक्रार, त्याचप्रमाणे या केंद्रातून राखेच्या पाईपलाईनद्वारे राखमिश्रित पाणी सोडून पाणी प्रदूषण होत असल्यामुळे त्या परिसरातील सिंचन योजना उध्वस्त होत असल्याची तेथील नागरीकांनी केलेल्या तक्रारी, येथील युनीट क्र. ३ ची प्रकल्प मर्यादा संपलेली असूनही सदर केंद्रातून होत असलेली वीज निर्मिती, त्यामुळे मोठ्या प्रमाणावर हवेतील प्रदूषण होत असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे निदर्शनास येणे परिणामी या कामी पर्यावरण पूरक आराखडा तयार करण्याची आवश्यकता, येथील राख साठवणूक स्थळ क्र. ३ चे दुरुस्तीचे कामासाठी मोठ्या प्रमाणावर गौण खनिजाचे उत्खनन व चोरी करुन वन विभागाचे हद्दीतून गौण खनिज उत्खनन व वाहतूक करून शासनाचे कोट्यवधीचे नुकसान केल्याबाबत वेल्हाळे ता.भुसावळ येथील ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केलेली तक्रार,याबाबत या सर्व बाबीचा विचार करता शासनाने यासंदर्भात निर्णय घेऊन या भुसावळ औष्णिक विद्युत केंद्राद्वारे होत असलेले प्रदूषण बंद करण्याबाबत केलेली वा करावयाची उपाययोजना, तेथील नागरीकांमध्ये निर्माण झालेली संतापाची भावना, याबाबत शासनाची भूमिका व शासनाची प्रतिक्रिया."

उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्री. अब्दुल्लाह खान दुर्राणी, वि.प.स. यांनी, " पाथरी जि.परभणी येथील आठवडे बाजार भरविण्यासंबंधी काही व्यक्तींनी नगरपरिषद कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करून धमकी देणे " इ. बाबत दिलेल्या लक्षवेधी सूचनेवरील निवेदन हे श्री. अब्दुल्लाह खान दुर्राणी, वि.प.स. सभागृहात उपस्थित नसल्यामुळे माननीय उपसभापतींनी सभागृहाच्या पटलावर ठेवले.

(६) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

" सोलापूर जिल्ह्यातील एका लोकप्रतिनिधींनी अन्याय, अत्याचार केल्याचा गंभीर आरोप एका महिला तक्रारदाराने पुण्यात पत्रकार परिषदेत केला असणे, महिला तक्रारदाराच्या पतीचे लोक प्रतिनिधींसोबत आर्थिक व्यवहार असणे, ते समाजकारणात सक्रिय असल्यामुळे व प्रगतीला अडथळा निर्माण करून पतीला पोलिसांच्या मदतीने अनेक खोट्या गुन्ह्या मध्ये अडकवून अन्याय केला असल्याचे महिला तक्रारदाराने मांडणे, सत्ताधारी असल्यामुळे पोलिसांकडे तक्रार करूनही न्याय मिळत नसल्याचा आरोप तक्रारदार यांनी केला असणे, खोट्या प्रकरणांमध्ये अडकवत पोलिसांकडे खोट्या तक्रारी करत पदाचा गैरवापर करून तक्रारदार यांनी त्यांच्या पतीला गुन्ह्यांमध्ये अडकवले असल्याचे पत्रकारांशी बोलताना सांगितले असणे या सर्व प्रकारामुळे तक्रारदार व त्यांच्या मुलींचे आयुष्य खराब झाले असणे, मुलीने सर्व प्रकाराला कंटाळून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला असणे, एका प्रकरणात मा. न्यायालयाने या आरोपीच्या विरोधात गुन्हा नोंद करण्याचा आदेश दिला असूनही पोलिसांनी उक्त आदेशाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे गंभीर आरोप करणे, शासन दरबारी मदत मिळत नसल्याने त्यांनी पुण्यात पत्रकार परिषद घेऊन सदरहू बाबीचा खुलासा केला असणे, उक्त प्रकरणी शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी महिला तक्रारदाराच्या कुटबीयांमध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण,णउक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही."

उपमुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची बैठक दुपारी ०३ वाजून ५५ मिनिटांनी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक सायंकाळी ४.०० वाजता पुन्हा सुरु झाली.

सभागृहाची बैठक सायंकाळी ०४ वाजून ०१ मिनिटांनी सायंकाळी ०४ वाजून ११ मिनिटांपर्यंत स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक सायंकाळी ०४ वाजून ११ मिनिटांनी पुन्हा सुरु झाली.

**गणपूर्तीअभावी सभागृहाची बैठक सायंकाळी ०४ वाजून ११ मिनिटांनी सायंकाळी ०४ वाजून १६ मिनिटांपर्यंत स्थगित झाली.**

**स्थगितीनंतर सभागृहाची बैठक सायंकाळी ०४ वाजून १६ मिनिटांनी पुन्हा सुरु झाली.**

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी, " १७ सप्टेंबर, २०२२ पासून सुरु झालेले मुक्ती संग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करण्याच्या अनुषंगाने राज्य शासनाने करावयाची उचित कार्यवाही" इ. बाबत मत व्यक्त केले.

अमृत महोत्सवी वर्ष साजरे करण्याच्या संदर्भात एक उच्चस्तरीय बैठक पार पडलेली आहे. माननीय मंत्री श्री.सुधीर मुगंटीवार यांच्याकडे ही जबाबदारी देण्यात आलेली आहे. दि.१७ सप्टेंबर, २०२३ पर्यंत अमृत महोत्सवानिमित्त कोणकोणते कार्यक्रम घ्यायचे याचे नियोजन ते करीत असल्याचे माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

९. " राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली परिस्थिती व राज्यातील विविध समस्यांबाबत" याविषयावर सर्वश्री अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते व इतर वि.प.स. यांचा अंतिम आठवडा प्रस्ताव.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

| | |
|---|---|
| १) श्री. महादेव जानकर | २) ॲड. अनिल परब |
| ३) डॉ.सुधीर तांबे | ४) श्री. आमश्या पाडवी |
| ५) श्री. प्रवीण दरेकर | ६) श्री. एकनाथराव खडसे |
| ७) श्री. राजेश राठोड | ८) श्री. अमोल मिटकरी |
| ९) श्री . सचिन अहिर | १०) श्री. प्रसाद लाड |

(चर्चा अपूर्ण)

श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स. यांनी, " दिनांक ३० जानेवारी,२०२३ रोजी महात्मा गांधी यांची पुण्यतिथी असल्यामुळे कोकण, औरंगाबाद, अमरावती, नागपूर व नाशिक येथील विभागीय निवडणुकांचा मतदान दिवस दिनांक ३० जानेवारी, २०२३ न ठेवता शासनाने या निवडणुकीचा सुधारित कार्यक्रम पुन्हा जाहीर करावा." इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

ॲड निलय नाईक, वि.प.स. यांनी, " कै. वसंतराव नाईक यांच्या नावाने नागपूर येथे ५० ते १०० कोटी रूपयांमध्ये तातडीने एक अद्ययावत प्रेक्षागृह (Auditorium) करावे " इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

**९.** “राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली परिस्थिती व राज्यातील विविध समस्यांबाबत” या विषयावर सर्वश्री अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते व इतर वि.प.स. यांचा अंतिम आठवडा प्रस्ताव.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेस उपमुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी उत्तरादाखल भाषण केले.

सभागृहाने प्रस्तावावर विचार केला असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेत दाखविण्यात आलेले अशासकीय कामकाज हे त्या स्तरावर पुढे ढकलण्यात येत असून आज शुक्रवार, दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजीची महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने, मान्य केलेल्या महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये विशेष उल्लेख सूचना तसेच औचित्याचे मुद्दे सभागृहाच्या पटलावर ठेवल्याचे माननीय उपसभापतींनी घोषित केले.

१०. प्रधान सचिवांनी, आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील बाब क्रमांक पाच (ख) च्या अंतर्गत दर्शविण्यात आलेल्या क्रमांक १ ते १५३ या लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवली.

माननीय उपसभापतींनी, सन २०२२ या वर्षातील नागपूर हिवाळी (तिसऱ्या) अधिवेशनातील कामकाजाचा आढावा सदनासमोर ठेवला.

माननीय उपसभापतींनी, महाराष्ट्र विधानपरिषदेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ पासून मुंबई येथील विधान भवनात बोलवावे, अशी शिफारस माननीय राज्यपालांकडे करण्याचे ठरले आहे, असे जाहीर केले.

माननीय उपसभापतींनी, सत्र-समाप्तीसंबंधीचा माननीय राज्यपालांचा पुढील आदेश वाचून दाखविला-

“ भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १७४, खंड(२), उपखंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी भगतसिंह कोश्यारी, महाराष्ट्राचा राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र विधानपरिषदेचे सत्र संस्थगित करीत आहे.”

**यानंतर “राष्ट्रगीत” म्हणण्यात आले.**

**विधान परिषदेचे अधिवेशन सायंकाळी ०७ वाजून १६ मिनिटांनी संस्थगित झाले.**

**महाराष्ट्र विधानपरिषद**

**विवरण क्रमांक -**

**बैठकींचे दिनांक व वेळ**

| अ.क्र. | बैठकीचा दिनांक | बैठकीची वेळ | | एकूण वेळ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | तास | | मिनिटे |
| (१) | (२) | (३) | | (४) | | |
| १. | सोमवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२२ | दुपारी १२-०० ते दुपारी १२-४५ | | ०० | - | ४५ |
| २. | मंगळवार, दिनांक २० डिसेंबर,२०२२ | दुपारी १२-०० ते दुपारी १२-०८ | | ०० | - | ०८ |
| | | दुपारी १२-२३ ते दुपारी १२-५९ | | ०० | - | ३६ |
| ३. | बुधवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२२ | सकाळी ११-०० ते दुपारी १२-०५ | | ०१ | - | ०५ |
| | | दुपारी १२-१० ते दुपारी ०१-२९ | | ०१ | - | १९ |
| | | दुपारी ०२-३० ते दुपारी ०२-३९ | | ०० | - | ०९ |
| | | दुपारी ०२-५४ ते दुपारी ०३-०० | | ०० | - | ०६ |
| | | दुपारी ०३-१५ ते रात्री ०७-११ | | ०३ | - | ५६ |
| ४. | गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२ | सकाळी ११-०० ते स. ११-४६ | | ०० | - | ४६ |
| | | दुपारी १२-०० ते दुपारी ०१-१३ | | ०१ | - | १३ |
| | | दुपारी ०१-१८ ते दुपारी ०१-२० | | ०० | - | ०२ |
| | | दुपारी ०२-२० ते दुपारी ०२-२४ | | ०० | - | ०४ |
| | | दुपारी ०२-५४ ते दुपारी ०३-०१ | | ०० | - | ०७ |
| | | दुपारी ०४-०१ ते दुपारी ०४-०५ | | ०० | - | ०४ |
| | | दुपारी ०४-२० ते दुपारी ०४-२४ | | ०० | - | ०४ |
| ५. | शुक्रवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२२ | सकाळी १०.३० ते दुपारी १२.०१ | | ०१ | - | ३१ |
| | | दुपारी १२.१५ ते दुपारी १२.२६ | | ०० | - | ११ |
| | | दुपारी १२.५६ ते ते दु. १२.५९ | | ०० | - | ०३ |
| - | शनिवार, दिनांक २४ डिसेंबर, २०२२ | | | | - | – |
| - | रविवार, दिनांक २५ डिसेंबर, २०२२ | | | | - | – |

| (१) | (२) | (३) | (४) | | |
|---|---|---|---|---|---|
| ६. | सोमवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२२ | सकाळी ११-०० ते स. ११-४७ | ०० | - | ४७ |
| | | दुपारी १२-०५ ते दुपारी ०२-२२ | ०२ | - | १७ |
| ७. | मंगळवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२२ | सकाळी १०.३० ते स. ११.४७ | ०१ | - | १७ |
| | | दुपारी १२.०० ते दुपारी ०२.०१ | ०२ | - | ०१ |
| | | दुपारी ०२.४० ते दुपारी ०२.५८ | ०० | - | १८ |
| | | दुपारी ०३.०३ ते सायं. ०५.३२ | ०२ | - | २९ |
| ८. | बुधवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२२ | सकाळी ११-०० ते स.११-४५ | ०० | - | ४५ |
| | | दुपारी १२-०० ते दुपारी ०२-०५ | ०२ | - | ०५ |
| | | दुपारी ०२.५५ ते सायं. ०४.५२ | ०१ | - | ५७ |
| | | सायं. ०५.०२ ते सायं. ०५.०४ | ०० | - | ०२ |
| | | सायं. ०५.१४ ते रात्री. ०९.०१ | ०३ | - | ४७ |
| ९. | गुरुवार, दिनांक २९ डिसेंबर, २०२२ | सकाळी १०-०० ते स. ११-४६ | ०१ | - | ४६ |
| | | दुपारी १२-०० ते दुपारी १२-५२ | ०० | - | ५२ |
| | | दुपारी १२-५७ ते दुपारी ०२-३० | ०१ | - | ३३ |
| | | दुपारी ०३-०० ते सायं. ०७-४३ | ०४ | - | ४३ |
| १०. | शुक्रवार, दिनांक ३० डिसेंबर, २०२२ | सकाळी १०-०० ते स. ११-४६ | ०१ | - | ४६ |
| | | दुपारी १२-०० ते दुपारी ०१-२१ | ०१ | - | २१ |
| | | दुपारी ०२-०० ते दुपारी ०३-५५ | ०१ | - | ५५ |
| | | दुपारी ०४-०० ते दुपारी ०४-०१ | ०० | - | ०१ |
| | | दुपारी ०४-१६ ते सायं. ०७-१६ | ०३ | - | ०० |
| **एकूण : सेहेचाळीस तास एकावन्न मिनिटे फक्त** | | | **४६** | **-** | **५१** |

**विवरण क्रमांक -**

**मत विभाजन**

| दिनांक व प्रभारी सदस्य | प्रस्ताव/सुधारणा | प्रस्तावाला/सुधारणेला अनुकूल मत | प्रस्तावाला/सुधारणेला प्रतिकूल मत | तटस्थ | प्रस्ताव/ सुधारणा संमत की असंमत |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| — | — | निरंक | — | — | — |

## विवरण क्रमांक ६
## महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम ८(१) अन्वये,
## माननीय सभापतींनी नामनिर्देशित केलेली सभापती तालिका-

| अ.क्र. | सदस्यांचे नाव |
|---|---|
| १. | श्री. प्रसाद लाड, वि.प.स. |
| २. | श्री. नरेंद्र दराडे, वि.प.स. |
| ३. | श्री. अब्दुल खान दुर्राणी, वि.प.स. |
| ४. | डॉ. सुधीर तांबे, वि.प.स. |

*****

# विवरण क्रमांक ७

## विविध विद्यापीठांवर सदस्यांची नामनियुक्ती

---

निरंक

---

*****

## विवरण क्रमांक ८

## विधेयकावरील संयुक्त समितीवर सदस्यांची नामनियुक्ती / समिती नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव

---

निरंक

---

*****

## विवरण क्रमांक ९

## विधेयकावरील संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्यासाठी मुदतवाढीचा प्रस्ताव

---

निरंक

---

*****

**विवरण क्रमांक १०**

**विविध समित्यांच्या बैठका**

| अ.क्र. | समितीचे नाव | बैठकीचा दिनांक | बैठकीत झालेले कामकाज |
|---|---|---|---|
| (१) | विधानपरिषद कामकाज सल्लागार समिती | दिनांक १३ डिसेंबर, २०२२ | समितीने महाराष्ट्र विधानपरिषदेच्या आगामी सन २०२२ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशना-संबंधात विचार-विनिमय करून सोमवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२२ ते शुक्रवार, दिनांक ३० डिसेंबर, २०२२ पर्यंतचे सभागृहाचे कामकाज घेण्याचे निश्चित केले. |
| | | दिनांक २८ डिसेंबर २०२२ | समितीने सन २०२२ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनासंबंधात विचार-विनिमय करून गुरुवार दिनांक २९ डिसेंबर २०२२ ते शुक्रवार दिनांक ३० डिसेंबर २०२२ पर्यंतचे सभागृहाचे कामकाज निश्चित केले. |

*****

**विवरण क्रमांक ११**

**मत विभाजन**

**(म.वि.प. नियम ४१)**

| दिनांक व प्रभारी सदस्य | प्रस्ताव/सुधारणा | प्रस्तावाला/सुधारणेला अनुकूल मत | प्रस्तावाला/सुधारणेला प्रतिकूल मत | तटस्थ | प्रस्ताव/ सुधारणा संमत की असंमत |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | निरंक | | | |

*****

**विवरण क्रमांक १२**

**चर्चा समाप्तीचा प्रस्ताव**
**(म.वि.प. नियम ३८)**

---

निरंक

---

*****

## विवरण क्रमांक १३

महाराष्ट्र विधानपरिषद

**सन २०२२ मधील विधानपरिषदेच्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनामध्ये विधानपरिषद विशेषाधिकार कक्षाकडे प्राप्त झालेल्या विशेषाधिकारभंगाच्या सूचनांचे विवरणपत्र**

| अ.क्र. | सूचना क्रमांक | सदस्यांचे नाव | विषय | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक | सद्यस्थिती/ निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | १२ | श्री. सुरेश धस, वि.प.स. दिनांक १८-८-२०२२ | श्री. सचिन ओम्बासे, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद, श्री. कौस्तुभ दिवेगावकर, तत्कालीन जिल्हाधिकारी, उस्मानाबाद तसेच श्री. हरीकल्याण यलगट्टे, तत्कालीन मुख्याधिकारी, नगरपरिषद, उस्मानाबाद यांचे विरुध्द<br>सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, “ उस्मानाबाद नगरपरिषदेचे तत्कालीन मुख्याधिकारी श्री. हरीकल्याण यलगुट्टे यांच्या कार्यकाळात झालेल्या विकास कामांची बिले अदा करण्यासाठी दिलेले धनादेश निधी अभावी न वठल्याने अशा धनादेशांच्या एकूण रक्कमेची माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना दिनांक २२ जून, २०२२ पासून ते दिनांक २७ सप्टेंबर, २०२२ पर्यंत पत्रव्यवहार करुनही जिल्हाधिकाऱ्यांनी माहिती उपलब्ध करुन न दिल्याने यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी पुन्हा दिनांक २८ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या पत्राद्वारे जिल्हाधिकाऱ्यांना माहिती देण्याबाबत विनंती केल्यावर मा.सदस्यांना दिनांक १२ डिसेंबर २०२२ रोजीच्या पत्रान्वये दिशाभूल करणारी व चुकीची माहिती दिल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय. ” | | सूचना पुढील कार्यवाही साठी प्रस्तुत करण्यात आली. |

## सन २०२२ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

## विवरण क्रमांक १४

## उपस्थित केलेले व पटलावर ठेवलेले औचित्याचे मुद्दे - ४५

| अ.क्र. | सदस्यांचे नाव व थोडक्यात विषय | मुद्दा सभागृहात उपस्थित केल्याचा तसेच पटलावर ठेवल्याचा दिनांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | **श्री. नागोराव गाणार, वि.प.स.**<br>राज्यात शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी या प्रमुख मागणीसह इतर प्रलंबित मागण्याबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| २ | **श्री. अभिजित वंजारी, डॉ. सुधीर तांबे, श्री. राजेश राठोड, श्री. जयंत आसगावकर, डॉ. वजाहत मिर्झा, डॉ. प्रज्ञा सातव, वि.प.स.**<br>नोकरीच्या संदर्भात न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा अभ्यास करण्यासाठी शासनाने विधि व न्याय विभागाची विशेष समिती स्थापन करण्याबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| ३ | **डॉ. सुधीर तांबे, वि.प.स.**<br>राज्य सेवा आयोगाकडून प्रत्येक परीक्षेतील सदोष उत्तरतालिका यामुळे उमेदवारांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी उपाय योजना करण्याबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| ४ | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>सांगोला (जि. सोलापूर) तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीत जनावरांसाठी चारा छावण्यांच्या अनुदानाची रक्कम तात्काळ वितरीत करण्याबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| ५ | **श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.**<br>विनाअनुदानित ते अनुदानित बदली स्थगितीचे परिपत्रक रद्द करणेबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| ६ | **श्री. गोपिचंद पडळकर, वि.प.स.**<br>पंढरपूर (जि. सोलापूर) तालुक्यातील उजनी धरण लाभक्षेत्रातील उजवा डावा कालवा वितरिका क्रमांक ४२ वरील ७, ८ व ९ या उपफाटे हे दुरुस्ती अभावी अत्यंत दयनीय अवस्थेत असल्याबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ७ | **श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.**<br>नागपूर शहरामध्ये वाढत असलेल्या प्रदुषणावर उपाययोजना करण्याबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| ८ | **श्री. सचिन अहिर, वि.प.स.**<br>राज्यात ऑनलाईन फसवणूकीचे वाढत असलेले प्रमाण. | २१ डिसेंबर २०२२ |
| ९ | **डॉ. सुधीर तांबे, वि.प.स.**<br>राज्यातील इयत्ता आठवी, नववी व दहावी साठी उर्दू व कन्नड शाळेतील विद्यार्थ्यांना मराठी शिकविण्यासाठी अल्पसंख्याक आयोगाच्या शिक्षकांना माध्यमिक शिक्षकांचा दर्जा देण्याबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| १० | **श्री. नागोराव गाणार, वि.प.स.**<br>राज्यातील ७१ हजाराहून अधिक शाळा केंद्र सरकारच्या शिक्षण कायद्यानुसार आखलेले निकष पूर्ण करीत नसल्याबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| ११ | **श्री. अंबादास दानवे, वि.प.स.**<br>रायगड जिल्ह्यातील सेझ प्रकल्पांतर्गत घेतलेल्या जमिनींवर प्रकल्प उभारला गेला नसल्यामुळे शासनाच्या निकषानुसार घेतलेल्या जमिनी परत मिळण्याबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| १२ | **श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.**<br>नवी मुंबईत महानगरपालिकेमार्फत घनकचरा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभागाने नियमबाह्य कामे करून केलेल्या गैरव्यवहाराबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| १३ | **ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.**<br>दापोली उपजिल्हा (जि. रत्नागिरी ) रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत. | २२ डिसेंबर २०२२ |
| १४ | **श्री. सतिश चव्हाण, श्री. विक्रम काळे, वि.प.स.**<br>धनगर समाजाचा अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात समावेश करण्याबाबत. | २२ डिसेंबर २०२२ |
| १५ | **श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी, वि.प.स.**<br>पाथरी (जि. परभणी) येथे वरिष्ठ स्तर न्यायालय व अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन करण्याबाबत. | २२ डिसेंबर २०२२ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| १६ | **श्री. नागोराव गाणार, वि.प.स.**<br>आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना धान्य पुरवठा करण्याबाबत. | २२ डिसेंबर २०२२ |
| १७ | **डॉ. सुधीर तांबे, वि.प.स.**<br>राज्यात कोरोनामुळे दोन वर्षे परीक्षा न झाल्याबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| १८ | **श्री. अंबादास दानवे, वि.प.स.**<br>यवतमाळ जिल्ह्यातील लाभार्थी असलेल्या शेतकऱ्यांना छत्रपती शिवाजी महाराज कर्जमाफी सन्मान योजनेचा लाभ मिळण्याबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| १९ | **श्री. नागोराव गाणार, ॲड निरंजन डावखरे, वि.प.स.**<br>राज्यातील शिक्षण सेवकांच्या विविध मागण्यांबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| २० | **श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.**<br>अंधेरी पूर्व मरोळ येथील सुक्या मासळीच्या बाजारातील विक्रीबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| २१ | **श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स.**<br>दुधनवाडी देऊर, बिचकुले नलवडेवाडी (ता. कोरेगाव, जि. सातारा) येथील रस्त्यावरील अतिक्रमणे काढून टाकण्याबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| २२ | **श्री. नागोराव गाणार, वि.प.स.**<br>राज्यात माहिती तंत्रज्ञान स्वतंत्र खाते कार्यान्वित करण्याबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| २३ | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>रायगड जिल्हा सामान्य रूग्णालयाची इमारत नादुरूस्त झाल्याने नवीन इमारत बाांधण्याबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| २४ | **श्री. विलास पोतनीस, श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.**<br>खासगी शाळांमधील शुल्काबाबत गठित केलेल्या काझी समितीच्या अहवालाबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| २५ | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>खरसाई (ता. म्हसळा, जि. रायगड) येथील धरणामध्ये भूसंपादित झालेल्या जमिनीचे व नुकसान झालेल्या फळबागांची नुकसान भरपाईच्या सानुग्रह अनुदान मिळण्याबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| २६ | **श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.**<br>गडचिरोली जिल्ह्यातील शासनाच्या योजनेच्या माध्यमातून लाभार्थ्यांची फसवणूक झाल्याबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| २७ | **श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स.**<br>कोरेगाव (जि. सातारा) शहरासाठी प्राप्त झालेला निधी इतर रस्त्याच्या कामाकडे वळविण्यात आल्याबाबत. | २८ डिसेंबर २०२२ |
| २८ | **श्री. नागोराव गाणार, वि.प.स.**<br>अकोला जिल्ह्यातील शासकीय वैद्यकिय महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी डॉक्टरांच्या समस्यांबाबत. | २८ डिसेंबर २०२२ |
| २९ | **श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.**<br>सोलापुर जिल्ह्यात उत्तेजक औषधांची खुलेआम विक्री होत असल्याबाबत. | २८ डिसेंबर २०२२ |
| ३० | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>कातकरी समाजासाठी धोरणात्मक निर्णय घेऊन रायगड जिल्ह्यातील ८२८ वाड्या/ वस्त्यांचा समावेश जिल्हा वार्षिक उपयोजनेमध्ये करण्याबाबत. | २८ डिसेंबर २०२२ |
| ३१ | **श्री. विलास पोतनीस, श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.**<br>राज्यातील शाळांमध्ये शालेय परिवहन समिती स्थापन करण्यासह ऑटोरिक्षा प्रमाणे स्कूल बस किवा व्हॅनचे भाडे ठरविण्याबाबत. | २८ डिसेंबर २०२२ |
| ३२ | **श्री. नागोराव गाणार, वि.प.स.**<br>मान्यताप्राप्त खाजगी शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन व भविष्य निर्वाहनिधी योजना नियमित करण्यबाबत. | २९ डिसेंबर २०२२ |
| ३३ | **ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.**<br>ठाणे शहरातील क्लस्टर मध्ये निर्माण होणाऱ्या समस्याबाबत. | २९ डिसेंबर २०२२ |
| ३४ | **श्री. आमश्या पाडवी, वि.प.स.**<br>मुंबईतील भांडुप येथील एल.बी.एस. मार्गावर असलेल्या सिटी सर्वे क्र. ६०/ १७ ते २५ या श्री. मेघश्याम भेलसेकर यांच्या मालमत्तेवर मातोश्री डेव्हलपर्स यांनी बेकायदेशीर कब्जा केल्याबाबत. | २९ डिसेंबर २०२२ |
| ३५ | **श्री. विलास पोतनीस, श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.**<br>संजय गांधी निराधार अनुदान योजनेसाठी दरवर्षी लागणाऱ्या उत्पन्नाच्या दाखल्या ऐवजी स्वयं उत्पन्न घोषणापत्र घेण्याची तरतूद करण्याबाबत. | २९ डिसेंबर २०२२ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ३६ | **श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.**<br>पूर्व नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पामधील धरम नगर, के. के. हाउसिंग सोसायटी, जगदंबा सोसायटी, कीर्तीधर लेआऊट, आर. बी. हाउसिंग सोसायटी या भागात मुलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत. | २९ डिसेंबर २०२२ |
| ३७ | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>अनुसूचित जमातींच्या जात प्रमाणपत्र व जात पडताळणी संदर्भात निर्माण होणाऱ्या समस्यांबाबत. | २९ डिसेंबर २०२२ |
| ३८ | **श्री. गोपिचंद पडळकर, वि.प.स.**<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी यांची चुकीच्या पद्धतीने केलेली नेमणुक व गैरकारभाराबाबत. | २९ डिसेंबर २०२२ |
| ३९ | **श्री. सुनिल शिंदे, श्री. विलास पोतनीस, वि.प.स.**<br>मुंबईतील अग्निशमन दलातील रिक्त पदे भरण्याबाबत. | २९ डिसेंबर २०२२ |
| ४० | **श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.**<br>महावितरण लातूर मंडळ कार्यालय अंतर्गत लातूर विभागातील अभियंते व लाईनमन खाजगी व्यक्तीकडून वीज दुरुस्तीचे कामे करून घेत असल्याबाबत. | ३० डिसेंबर २०२२ |
| ४१ | **श्री. महादेव जानकर, वि.प.स.**<br>मुंबईमध्ये बेस्टच्या माध्यमातून पी.एम.पी. ग्रुपकडून बेस्टच्या कुलाबा, कुर्ला, वडाळा, विक्रोळी, बांद्रा या पाच आगारामधील कंत्राटी कामगारांना थकीत वेतन देण्यात तसेच या कामगारांना कायमस्वरुपी सेवेत घेण्याबाबत. | ३० डिसेंबर २०२२ |
| ४२ | **श्री. सुनिल शिंदे,श्री. विलास पोतनीस, वि.प.स.**<br>हिवाळी अधिवेशनासाठी नागपूर येथे येणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या विशेष दैनिक भत्त्यात वाढ करण्याबाबत. | ३० डिसेंबर २०२२ |
| ४३ | **श्री. नागोराव गाणार, वि.प.स.**<br>राज्यात ठाणे जिल्ह्यातील वेतन पथक अधीक्षक यांच्याबाबत अनेक शिक्षक, मुख्याध्यापक यांच्या तक्रारीबाबत. | ३० डिसेंबर २०२२ |

| (१) | (२) | (३) |
| --- | --- | --- |
| ४४ | **श्री. विलास पोतनीस, श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.**<br>राज्यातील खासगी ट्रॅव्हल कंपन्यांच्या मनमानी कारभारास आवर घालण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत. | ३० डिसेंबर २०२२ |
| ४५ | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>सन २०२० मधील राबविण्यात आलेल्या अनुकंपा भरती प्रक्रियेची संपूर्ण चोकशी करून उमेदवारांना शैक्षणिक अर्हतेनुसार योग्य पदावर/सेवा वर्ग करून नियुक्ती देण्याबाबत. | ३० डिसेंबर २०२२ |

# सन २०२२ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

## विवरण क्रमांक - १५

## निकडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींची चर्चा करण्यासाठी प्रस्ताव

## (म.वि.प.नियम ९३ अन्वये प्रस्ताव)

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | प्राप्त झालेल्या सूचनांची संख्या | : | ५८ |
| (२) | निवेदन करण्याबाबत निदेश दिलेल्या सूचनांची संख्या | : | २७ |
| (३) | अनुमती नाकारलेल्या सूचनांची संख्या | : | ३१ |
| (४) | निवेदनावर चर्चा झालेल्या सूचनांची संख्या | : | १२ |
| (५) | निवेदन पटलावर ठेवलेल्या सूचनांची संख्या | : | २ |

| सूचना क्रमांक (१) | सदस्यांचे नांव व विषय (२) | शेरा (३) |
|---|---|---|
| १. | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>सिरोंचा (जि. गडचिरोली) तालुक्यातील मेडीगड्डा धरणग्रस्त शेतकरी अधिगृहीत जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनाबाबत. | दिनांक २७ डिसेंबर २०२२ रोजी निवेदनावर चर्चा झाली. |
| २. | **श्री. शशिकांत शिंदे, श्री. एकनाथराव खडसे, श्री. अमोल मिटकरी, वि.प.स.**<br>राज्यातील गायरान जमिनीवरील बेकायदा बांधकामे हटविण्याचा शासनाने घेतलेल्या निर्णयाबाबत. | दिनांक २७ डिसेंबर २०२२ रोजी निवेदनावर चर्चा झाली. |
| ३. | **श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.**<br>औरंगाबाद येथे महिला कृषी महाविदयालय स्थापन करणेबाबत. | दिनांक २७ डिसेंबर २०२२ रोजी निवेदनावर चर्चा झाली. |
| ४. | **श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.**<br>पनवेल तालुक्यातील सुकापूर या गावात इमारतीचा स्लॅब कोसळून मृत पावलेल्या शुभम राजभर यांच्या कुटुंबाला मदत जाहीर करून या भागातील सिडको-नैना प्रकल्प रद्द करणेबाबत. | दिनांक २७ डिसेंबर २०२२ रोजी निवेदनावर चर्चा झाली. |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ५. | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>मौजे रोडपाली, ता. पनवेल, जि. रायगड येथील बौध्दवाडी सेक्टर १८, कळंबोली, सर्व्हे नं. २२, २६/१, २७/१, २८/१९, २९/१, ३०/१, ५०/१, ५७/१, ५७/२ या साधारणता सिडकोच्या अखत्यारितीत असलेल्या ५ एकर भूखंडावर व्यावसायिक चाळ, बहुमजली इमारत व मोठे पार्कींग, मोबाईल टॉवर अनधिकृतपणे अतिक्रमण केल्याबाबत. | दिनांक<br>२७ डिसेंबर २०२२<br>रोजी निवेदनावर<br>चर्चा झाली. |
| ६. | **श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.**<br>राज्यातील उद्योग परराज्यात जाऊ नयेत यासाठी कोणतीही कार्यवाही केलेली नसल्याबाबत. | दिनांक<br>२८ डिसेंबर २०२२<br>रोजी निवेदनावर<br>चर्चा झाली. |
| ७. | **श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स.**<br>राज्यातील पोलिस पाटील यांच्या मागण्यांबाबत. | दिनांक<br>२७ डिसेंबर २०२२<br>रोजी निवेदनावर<br>चर्चा झाली. |
| ८. | **श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी, वि.प.स.**<br>जालना जिल्ह्यातील वाटुर फाटा ते परभणी जिल्ह्यातील चारठाणा या सत्तावीस किलोमीटर अंतराची कामाचे सुमारे २४८ कोटी रुपयांची किंमत निश्चित केल्याबाबत. | दिनांक<br>२७ डिसेंबर २०२२<br>रोजी निवेदना<br>सभागृहाच्या पटलावर<br>ठेवण्यात आले. |
| ९. | **श्री. कपिल पाटील, वि.प.स.**<br>विनाअनुदानित शिक्षण संस्थांच्या समस्यांबाबत. | दिनांक<br>२७ डिसेंबर २०२२<br>रोजी निवेदनावर<br>चर्चा झाली. |
| १०. | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>गडचिरोली जिल्ह्यातील कॅप्टिव्ह माइन्सचा दर्जा संपुष्टात आल्याबाबत. | दिनांक<br>२८ डिसेंबर २०२२<br>रोजी निवेदनावर<br>चर्चा झाली. |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ११. | **श्री. अंबादास दानवे, वि.प.स.**<br>राज्यातील विविध भागात अतिवृष्टी होऊन पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याबाबत. | दिनांक २७ डिसेंबर २०२२ रोजी निवेदनावर चर्चा झाली. |
| १२. | **श्री. कपिल पाटील, वि.प.स.**<br>राज्यातील दिव्यांगांच्या विशेष शाळेतील कर्मचाऱ्यांचे विविध मागण्यांबाबत. | दिनांक २७ डिसेंबर २०२२ रोजी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. |
| १३. | **श्री. सुनिल शिंदे, श्री. विलास पोतनीस, वि.प.स.**<br>राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त मद्यविक्रीस मनाई असतानाही अंधेरी, मुंबई येथील सहारा स्टार या पंचतारांकित हॉटेलमधील मेन्शन क्लबमध्ये मद्यविक्री सुरु असल्याबाबत. | दिनांक २८ डिसेंबर २०२२ रोजी निवेदनावर चर्चा झाली. |
| १४. | **श्री. विलास पोतनीस,श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.**<br>मुंबई उपनगरातील धोकादायक इमारतीतील बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियमात व महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास अधिनियमात सुधारणा करण्याबाबत. | दिनांक २८ डिसेंबर २०२२ रोजी निवेदनावर चर्चा झाली. |
| १५. | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>चंद्रपूर जिल्ह्यातील नागभिड नगरपरिषदेवर मुख्याधिकारी या पदावर असलेले श्री. चंद्रकांत चव्हाण यांच्या चौकशीबाबत. | |
| १६. | **श्री. कपिल पाटील, वि.प.स.**<br>पालघर जिल्ह्यातील डहाणू औष्णिक ऊर्जा प्रकल्पातून होत असलेले प्रदूषण. | |
| १७. | **श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.**<br>श्री. सतिष खरे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी निवडणूक कामकाजात कसूर केल्या प्रकरणी तसेच पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग केल्याबाबत. | |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|

१८. **श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.**
खुलताबाद तालुक्यातील सुलीभंजन नंद्राबाद येथे प्राथमिक उपआरोग्य केंद्र मंजुर करणेबाबत.

१९. **श्री. आमश्या पाडवी, वि.प.स.**
अक्कलकुवा (जि.नंदूरबार) शहरात भेसळयुक्त तेल, महू फूल, अफीम सारखे मादक पदार्थ विक्री करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्याबाबत.

२०. **श्री. सचिन अहिर, वि.प.स.**
एक्साईड इंडस्ट्रिज लिमिटेड,पुणे या कंपनीमध्ये निर्मिती होणाऱ्या बॅटरीमध्ये लेड आणि प्लास्टीक हे घातक पदार्थ असल्यामुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत असल्याबाबत.

२१. **श्री. अंबादास दानवे, वि.प.स.**
संभाजीनगर येथील जुन्या पाणी पुरवठा योजनेच्या निविदेबाबत.

२२. **श्री. सचिन अहिर, वि.प.स.**
एक्साईड इंडस्ट्रिज लिमिटेड,पुणे या कंपनीमध्ये निर्मिती होणाऱ्या बॅटरीमध्ये लेड आणि प्लास्टीक हे घातक पदार्थ असल्यामुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत असल्याबाबत.

२३ **श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.**
भंडारा व गोंदिया जिल्हयात खरीप हंगामातील धान खरेदी करण्यासाठी केंद्रे सुरु झाले नसल्याबाबत.

२४. **श्री. आमश्या पाडवी, वि.प.स.**
शासकीय निवासी आश्रमशाळेतील आदिवासी मुलींच्या आत्महत्ये प्रकरणी एस.आय.टी. मार्फत चौकशी करण्याबाबत.

२५. **श्री. अंबादास दानवे, वि.प.स.**
मरसुळ बीट कक्ष क्र. ४३३ व ४३४ (ता. उमरखेड जि. यवतमाळ) येथील शासकीय जंगलाला लागलेल्या आगीमध्ये झालेल्या आर्थिक नुकसानाबाबत.

२६. **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**
मौजे बोरले, सांगडे, बेलवली व पाली खुर्द (ता.पनवेल) ही गावे नैना प्रकल्पात येणाऱ्या विरार अलिबाग महामार्गातून वाचविण्याबाबत.

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| २७. | **श्री. सुनिल शिंदे,श्री. विलास पोतनीस, वि.प.स.**<br>राष्ट्रीय औषध मूल्य निर्धारण प्राधिकरणाने (एनपीपीए) केलेल्या औषधांच्या दर निश्चतीबाबत. | |

# सन २०२२ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

## विवरण क्रमांक - १५अ

## महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९३ अन्वये स्थगन प्रस्तावाची स्विकारलेली सूचना

| अ.क्र. | सदस्यांचे नांव व विषय | सूचना ज्या तारखेस सभागृहात घेतली ती तारीख | शेरा |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

# सन २०२२ च तिसरे (हिवाळी) अधिवेशन

## विवरण क्रमांक – १६

## विशेष उल्लेख म्हणून उपस्थित करण्यात आलेल्या तसेच पटलावर ठेवलेल्या सूचना – १०६

| अ.क्र. | सदस्यांचे नाव व थोडक्यात विषय | मा. सदस्यांनी सभागृहात मांडलेल्या सूचनेचा दिनांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| **१.** | **ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.**<br>श्री. मिहिर अपार आंतरराष्ट्रीय तिरंदाजी स्पर्धेमध्ये भारतीसाठी सुवर्ण पदक मिळविलेल्या खेळाडूस उच्च दर्जाची तिरंदाजी किट नाकारल्याबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| **२.** | **श्री. प्रसाद लाड, वि.प.स.**<br>यवतमाळ जिल्ह्यातील महावितरणकडे कृषी पंपाच्या वीज जोडणीसाठी होत असलेला विलंब. | २१ डिसेंबर २०२२ |
| **३.** | **श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.**<br>वाशी नवी मुंबई खाडी किनारी झोपड्यांचे अतिक्रमणाबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| **४.** | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>श्री. गोविंद गणू पाटील,रा.चिंचवटी (ता.अलिबाग, जि.रायगड) यांच्यासह इतर लाभार्थी आणीबाणी मानधन देण्याबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| **५.** | **श्री. नागोराव गाणार, वि.प.स.**<br>राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेतील शिक्षकांच्या विविध मागण्यांबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| **६.** | **श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.**<br>शिक्षण हक्क कायदा या योजनेच्या प्रतिपूर्तीचा परतावा नियमित होत नसल्याबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| **७.** | **श्री. रामदास आंबटकर, वि.प.स.**<br>वर्धा जिल्ह्यातील कृषी पंपाना दिवसा १२ तास विज पुरवठा सुरु करण्याबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ८. | **श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.**<br>आदिवासी विकास विभागाच्या अंतर्गत आदिवासी शासकीय आश्रमशाळा/वसतिगृहांमधील कला, क्रीडा व संगणक शिक्षकांना सेवेत कायम करून घेण्याबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| ९. | **श्री. विलास पोतनीस, वि.प.स.**<br>गोराई चारकोप येथील म्हाडा वसाहतीतील बैठ्या सदनिका १९ फूट उंच दुमजली करण्यासाठी म्हाडाकडून अधिकृत परवानगी मिळण्याबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| १०. | **डॉ. सुधीर तांबे, वि.प.स.**<br>राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| ११. | **श्री. गोपिचंद पडळकर, वि.प.स.**<br>भोगलवाडी (ता. धारूर, जि. बीड) येथील तरुणाचा विजेचा शॉक लागून मृत्यू झाल्याबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| १२. | **श्री. अमोल मिटकरी, वि.प.स.**<br>विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १९१२ ते १९३४ या २२ वर्षाच्या कालावधी दरम्यान राहत असलेल्या परेल बी.आय.टी.चाळ क्र. १ मधील खोली क्र. ५० व ५१ चे राष्ट्रीय स्मारक घोषित करणेबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| १३. | **श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.**<br>बेस्ट उपक्रमातील परिवहन अभियांत्रिकी विभागातील 'ब' वर्ग श्रेणीतील तांत्रिकी अधिकारी आणि सेवक वर्गाची रिक्त पदे भरण्याबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| १४. | **ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.**<br>दिवा शहरात डम्पिंग ग्राउंड बंद करण्याबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| १५. | **डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, वि.प.स.**<br>अंध व बहिरे असूनही लर्निंग लायसन देण्यात येत असल्यामुळे अपघातांच्या वाढत्या प्रमाणाबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| **१६.** | **श्री. प्रसाद लाड, वि.प.स.**<br>मिरज शहरातील वॉन्लेस रुग्णालय पुन्हा सुरू करण्याबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| **१७.** | **श्री. कपिल पाटील, वि.प.स.**<br>राज्यातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना GPF खाते बंद करुन NPS खाते उघडण्याची सक्ती केल्याबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| **१८.** | **श्री. सचिन अहिर, वि.प.स.**<br>राज्यातील अंगणवाडी सेविकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| **१९.** | **डॉ. सुधीर तांबे, वि.प.स.**<br>राज्यातील शिक्षकांच्या ५० टक्के रिक्त जागा भरण्याबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| **२०.** | **श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.**<br>हॉटेल मॅनेजमेंट आणि कॅटरिंग टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| **२१.** | **श्री. नागोराव गाणार, वि.प.स.**<br>राज्यातील ३७ हजार नर्सेसच्या नर्सिंग कौन्सिलने केलेल्या नोंदणी बोगस ठरविल्याबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| **२२.** | **श्री. अंबादास दानवे, वि.प.स.**<br>महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय समूहातील धोबी-वरठी, धोबी- परिट ह्या दोन्ही जातींचा इतर मागासप्रवर्गामध्ये दोन भिन्न क्रमांकावर समावेश असल्याने त्यांना शासनाच्या सवलतींपासून वंचित राहावे लागत असल्याबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| **२३.** | **श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.**<br>विदर्भातील गोंदिया, भंडारा, नागपूर, वर्धा, अकोला व बुलडाणा या सहा जिल्ह्यात अनुसुचित क्षेत्रांची पुनर्रचना करण्याबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| **२४.** | **श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.**<br>राज्यातील प्राथमिक शिक्षकांना मुख्यालयी राहण्याची अट रद्द करणेबाबत. | २१ डिसेंबर २०२२ |
| **२५.** | **श्री. प्रसाद लाड, वि.प.स.**<br>महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये (एमपीएससी) पूर्ण सदस्य संख्या नसल्याबाबत. | २२ डिसेंबर २०२२ |

| (१) | (२) | (३) |
| --- | --- | --- |
| **२६.** | **श्री. अनिकेत तटकरे, वि.प.स.**<br>पेण नगरपरिषदेतील रोजंदारी सफाई कामगारांना नोकरी देण्याबाबत. | २२ डिसेंबर २०२२ |
| **२७.** | **श्री. कपिल पाटील, वि.प.स.**<br>गिरगाव चौपाटी, मुंबई येथील लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या स्मारकाचे सुशोभिकरण करण्याबाबत. | २२ डिसेंबर २०२२ |
| **२८.** | **श्री. विलास पोतनीस, वि.प.स.**<br>कांदिवली, पूर्व येथील सीटीएस क्रमांक ८१८/ए४ केळीपाडा, ठाकूर व्हिलेज येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भूखंडावर ‘ होम ग्राऊंड क्रिकेट ॲकडमी ’ या संस्थेने अनधिकृतरित्या केलेल्या बांधकामाबाबत. | २२ डिसेंबर २०२२ |
| **२९.** | **श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.**<br>वाळुज येथील क्रिडांगणात सोई सूविधा उपलब्ध करून देणेबाबत. | २२ डिसेंबर २०२२ |
| **३०.** | **श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी, वि.प.स.**<br>परभणी जिल्हयातील विहीरींची कामे विहित मुदतीत पूर्ण करून गावकऱ्यांना पिण्याच्या पाण्यासाठीचे स्त्रोत उपलब्ध करून देण्याबाबत. | २२ डिसेंबर २०२२ |
| **३१.** | **श्री. आमश्या पाडवी, वि.प.स.**<br>आदिवासी समाजातील महापुरुषांची जीवनगाथा, संघर्ष व त्यांच्या कार्याची प्रचिती राज्यातील सर्व जनतेपर्यंत पोहचण्याबाबत. | २२ डिसेंबर २०२२ |
| **३२.** | **श्री. सचिन अहिर, वि.प.स.**<br>ठाणे येथील वागळे औद्योगिक वसाहत (पश्‍िचम) येथील सुपर मॅक्स केअर कंपनी विविध खात्यामध्ये कुशल व अकुशल या पद्धतीने काम करणाऱ्या कामगारांना वेळेत वेतन मिळत नसल्याबाबत. | २२ डिसेंबर २०२२ |
| **३३.** | **श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.**<br>महाराष्ट्र सुरक्षा दलाच्या जवानांना सुरक्षा कवच, पगारवाढीसह अन्य सोई-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत. | २२ डिसेंबर २०२२ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| **३४.** | **श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.**<br>वैयक्तिक मान्यता तसेच शालार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ट करण्याच्या कार्यपद्धतीत सुधारणा करण्याबाबत. | २२ डिसेंबर २०२२ |
| **३५.** | **श्री. नागोराव गाणार, वि.प.स.**<br>राज्यात नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिकचे १३३ माध्यमिकचे ७० शिक्षकांना ठोक मानधन तत्वावर कार्यरत असल्याने या शिक्षकांना महानगरपालिकेच्या सफाई कामगार पेक्षाही कमी मानधन मिळत असल्याबाबत. | २२ डिसेंबर २०२२ |
| **३६.** | **श्री. अमोल मिटकरी, वि.प.स.**<br>अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांसाठी असलेली राजर्षी शाहू महाराज परदेश शिष्यवृत्तीच्या जागांमध्ये वाढ करण्याबाबत. | २२ डिसेंबर २०२२ |
| **३७.** | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील रामराज ग्रामपंचायत हद्दीमधील निमिर्डेवाडी येथे नवीन अंगणवाडीला मान्यता मिळणेबाबत. | २२ डिसेंबर २०२२ |
| **३८.** | **श्री. किरण सरनाईक, वि.प.स.**<br>दिनांक १८ जुलै, २०१८ च्या UGC रेगुलेशनची शासनाने जशीच्या तशी अंमलबजावणी करण्याबाबत. | २२ डिसेंबर २०२२ |
| **३९.** | **श्री. रामदास आंबटकर, वि.प.स.**<br>राज्यात सार्वजनिक आरोग्य विभाग अंतर्गत समुदाय आरोग्य अधिकारी त्यांना सेवेत सामावून घेण्याबाबत. | २२ डिसेंबर २०२२ |
| **४०.** | **श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.**<br>आदिवासी विकास विभाग नाशिक यांचेकडून महादेव कोळी समाजाला वैयक्तिक लाभाच्या योजनेपासून वंचित ठेवलेबाबत. | २२ डिसेंबर २०२२ |
| **४१.** | **श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.**<br>राज्यातील सेवानिवृत्त शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतनाबाबत. | २२ डिसेंबर २०२२ |
| **४२.** | **डॉ. सुधीर तांबे, वि.प.स.**<br>मेडीकल लॅबोरेटरीसाठी कायदा करण्याबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| **४३.** | **ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.**<br>बाल्मिकी मेहतर समाजातील जातीच्या लोकांना सामाजिक न्याय मिळवून देण्याबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| **४४.** | **श्री. जयंत आसगावकर, वि.प.स.**<br>जैन समाजाच्या पवित्र स्थान असलेल्या सम्मेद शिखरजी या तीर्थक्षेत्राला पर्यटनक्षेत्र म्हणून घोषित केल्याबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| **४५.** | **श्री. प्रसाद लाड, वि.प.स.**<br>हिंगणघाट (जि.वर्धा) येथील अनेक जिनिंग प्रेसिंग युनिट बंद पडल्याबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| **४६.** | **श्री. रामदास आंबटकर, वि.प.स.**<br>राज्यात समग्र शिक्षा अभियान अंतर्गत असलेल्या रिक्त पदांबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| **४७.** | **श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.**<br>रायगड जिल्ह्यातील कासाडी व गाढी नदी पनवेल तालुक्यातील नदी प्रदूषण मुक्त करण्याबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| **४८.** | **श्री. विलास पोतनीस, वि.प.स.**<br>विलेपार्ले येथील डॉ. आर. एन. कुपर रुग्णालयात बांधण्यात आलेले वसतीगृह सुरू करण्याबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| **४९.** | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यामधील शेतकऱ्यांच्या शेत जमीन मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यांवर " महाराष्ट्र शासन राखीव वने " तसेच " वने " म्हणून करण्यात आलेली नोंद रद्द करणेबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| **५०.** | **श्री. कपिल पाटील, वि.प.स.**<br>राज्यातील जिल्हा परिषद, शासकीय, निमशासकीय कर्मचारी व शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांना सातवा वेतन आयोगाचा हफ्ता मिळणेबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| **५१.** | **श्री. नागोराव गाणार, वि.प.स.**<br>राज्यात अघोषित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय नैसर्गिक वाढीच्या तुकड्या ३९६१ शाळांचे प्रस्ताव निधीसह मंजूर करून शंभर टक्के पगाराचे शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| **५२.** | **श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.**<br>शासकीय परिवहन सेवा (जीटीएस) विभागात सतीश जोंधळे संचालक पदावर असल्यापासून बदली होईपर्यत आणि त्यानंतरही वापर केलेल्या वाहनांची चौकशी सुरु करण्याबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| **५३.** | **श्री. किरण सरनाईक, वि.प.स.**<br>बहूजन कल्याण विभागामार्फत चालू असलेल्या आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वरिष्ठ व निवड श्रेणीचा लाभ देण्याबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| **५४.** | **श्री. प्रसाद लाड, वि.प.स.**<br>हिंगणघाट व चंद्रपूर जिल्ह्यात आरोग्य विभागाने पुरेसा प्रशिक्षित कर्मचारी वर्ग व वैद्यकीय सूविधा उपलब्ध करून देण्याबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| **५५.** | **श्री. नागोराव गाणार, वि.प.स.**<br>महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील मराठी शाळेच्या मान्यतेचे प्रस्ताव राज्य शासनाकडे पडून असून शाळा सुरू झाल्यावर या शाळांना पाच वर्षानंतर अनुदान द्यावे लागेल या भीतीपोटी शालेय शिक्षण विभागाने हे प्रस्ताव रद्द ठरवले असणेबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| **५६.** | **श्री. कपिल पाटील, वि.प.स.**<br>राज्यातील अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील आणि वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथपाल व शारिरिक शिक्षण संचालक ही प्राध्यापक संवर्गातील पदे भरणेबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| **५७.** | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>अलिबाग तालुक्यातील (जि. रायगड) सुडकोली ग्रामपंचायत हद्दीतील भागवाडी गावाची नोंद सरकार महसूल दप्तरी स्वतंत्र करणेबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| **५८.** | **श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.**<br>अनूसूचित जमाती संवर्गातील श्री. संतोष सावंजी मौळे यांच्यावर वैयक्तिक मान्यतेप्रकरणी झालेल्या अन्यायाबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| **५९.** | **श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.**<br>गंगापूर तालूक्यातील काटेपिंपळगाव ते शंकरपूर रा. मा. २१६ या रस्त्याच्या व रस्त्यावरील पुलाच्या कामास मंजूरी मिळणेबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |

| (१) | (२) | (३) |
| --- | --- | --- |
| **६०.** | **ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.**<br>आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे आदर्श विद्या मंदिर, कुळगाव (ता. अंबरनाथ, जि. ठाणे) या शाळेमधील माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील शिक्षकांच्या समस्यांबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| **६१.** | **श्री. किरण सरनाईक, वि.प.स.**<br>आदिवासी विकास विभागाचा ८ जून २०१६ च्या शासन निर्णयातील 'काम नाही वेतन नाही' ही अट रद्द करणेबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| **६२.** | **श्री. कपिल पाटील, वि.प.स.**<br>समग्र शिक्षा अभियान समावेशित शिक्षणांतर्गत राज्यातील जिल्हा परिषद व महानगरपालिकांमध्ये विविध पदावर काम करणाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| **६३.** | **श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.**<br>तारापूर एमआयडीसीमधील कंपन्यांमधून प्रक्रिया न केलेले प्रदूषित रसायनयुक्त सांडपाणी समुद्रात सोडले जात असल्याबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| **६४.** | **श्री. नागोराव गाणार, वि.प.स.**<br>राज्यातील सीबीएसई शिक्षण संस्थेत सेवा देणाऱ्या शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मागण्यांबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| **६५.** | **श्री. विलास पोतनीस, वि.प.स.**<br>बोरीवली पश्चिम येथील गोराई १ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका पुरस्कृत गोराई दवाखाना/आरोग्य केंद्राच्या जागी आरोग्य केंद्राची बहुमजली इमारत उभारण्याबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| **६६.** | **श्री. सचिन अहिर, वि.प.स.**<br>महाराष्ट्र राज्यातील ठाणे व नवी मुंबई परिसरातील महावितरण कंपनीच्या अधिपत्याखालील अदानी इलेक्ट्रिकल कंपनीस चालवायला देण्यासाठी समांतर परवाना देण्याबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| **६७.** | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) चेंढरे ग्रामपंचायत हद्दीमध्ये वीज यंत्रणा सक्षम करण्यासाठी राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण कार्यक्रमांतर्गत भूमिगत विद्युत वाहिन्या टाकतेवेळीस रस्त्यासह इतर मालमत्तेचे होत असलेल्या नुकसानीबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| **६८.** | **श्री. प्रसाद लाड, वि.प.स.**<br>महाराष्ट्रात वातावरण बदल अभियान सुरू करण्याबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| **६९.** | **श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.**<br>नागपूर शहरातून निघणाऱ्या कचऱ्याने भांडेवाडी येथे कचरा प्रक्रिया बंद असल्याबाबत. | २७ डिसेंबर २०२२ |
| **७०.** | **श्री. आमश्या पाडवी, वि.प.स.**<br>अक्कलकुवा तालुक्यातील मांडवा गावाची मान्यता प्राप्त आदिवासी विकास प्रकल्प मार्फत अनुदानित माध्यमिक आश्रमशाळेतील विद्यार्थ्याला दुचाकीने दिलेल्या धडकेमध्ये विद्यार्थ्याचा झालेला मृत्यू. | २७ डिसेंबर २०२२ |
| **७१.** | **श्री. किरण सरनाईक, वि.प.स.**<br>वाशिम जिल्ह्यामधील मातोश्री ग्राम समृद्धी शेत पानंद रस्ते योजना अंतर्गत विविध रस्त्यांच्या कामाबाबत. | २८ डिसेंबर २०२२ |
| **७२.** | **श्री. महादेव जानकर, वि.प.स.**<br>मौजे बरड (ता.फलटण, जि.सातारा) येथे निकृष्ट डिपी, ट्रान्सफॉर्मर आदि पुरविण्यात येणाऱ्या कंपनीची चौकशी करून शेतकऱ्यांना सदोष डिपी व ट्रान्सफार्मर देण्याबाबत. | २८ डिसेंबर २०२२ |
| **७३.** | **श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.**<br>वाळूज एमआयडीसी मधील खाजगी गट नंबर मधील लघु उद्योजकांना औद्योगिक विद्युत वाहिनीने वीज पुरवठा करणे तसेच एमआयडीसीने मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत. | २८ डिसेंबर २०२२ |
| **७४.** | **श्री. अरुण लाड, वि.प.स.**<br>एसटी महामंडळाने शासनाकडे दिलेला २०० नवीन बसेसचा प्रस्ताव मंजूर करणे तसेच ग्रामीण भागातील बंद फेऱ्या पुन्हा पुर्ववत करण्याबाबत. | २८ डिसेंबर २०२२ |
| **७५.** | **ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.**<br>ठाणे जिल्ह्यासाठी भव्य स्पोर्टस् कॉम्प्लेक्स उभारण्याबाबत. | २८ डिसेंबर २०२२ |
| **७६.** | **श्री. नागोराव गाणार, वि.प.स.**<br>अपंग समावेशित शिक्षक मुलभूत सुविधांपासून वंचित असल्याबाबत. | २८ डिसेंबर २०२२ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| **७७.** | **डॉ. सुधीर तांबे, वि.प.स.**<br>ऊर्जा विभागातील तांत्रिक कामगार, ॲप्रेंटीस कंत्राटी कामगारांच्या मागण्यांबाबत. | २८ डिसेंबर २०२२ |
| **७८.** | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>मोडी लिपी येत असलेल्या अभ्यासकाची आवश्यकता असल्याने शासनाने तसे पद निर्माण करून श्री. संतोष शिंदे या मोडीलिपी अभ्यासकाची नेमणूक करण्याबाबत. | २८ डिसेंबर २०२२ |
| **७९.** | **श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.**<br>नागपूर महानगरपालिकेतील १८९ कंत्राटी संगणक चालकांची सेवा संपुष्टात आणून नवीन कंत्राटदाराची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव आणला असल्याबाबत. | २८ डिसेंबर २०२२ |
| **८०.** | **श्री. विलास पोतनीस, वि.प.स.**<br>मेट्रो २ अ मधील दहिसर ते डी. एन. नगर आणि मेट्रो ७ मधील दहिसर ते अंधेरी मार्गिकेतील दुसरा टप्पा कार्यान्वित करण्याबाबत. | २८ डिसेंबर २०२२ |
| **८१.** | **श्री. प्रसाद लाड, वि.प.स.**<br>रायगड जिल्ह्यातील निजामपूर ते माणगाव विळेभागाड एमआयडीसी हद्दीत विविध प्रकल्पासाठी भूसंपादन करण्यात आलेले असून आतापर्यंत एकही उद्योग सुरू झालेला नसल्याबाबत. | २८ डिसेंबर २०२२ |
| **८२.** | **श्री. नागोराव गाणार, वि.प.स.**<br>अनुदानित वसतिगृह कर्मचाऱ्यांना सेवा शाश्वती, समान काम, समान वेतन धारेणानुसार तात्काळ वेतनश्रेणी लागू करण्याबाबत. | २९ डिसेंबर २०२२ |
| **८३.** | **ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.**<br>अलिबाग ते मुंबई समुद्रमार्गे बोट रुग्णवाहिका प्रस्तावास मंजुरी मिळण्याबाबत. | २९ डिसेंबर २०२२ |
| **८४.** | **श्री. किरण सरनाईक, वि.प.स.**<br>राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे कार्यरत ३०९ निदेशक व गटनिदेशक शिक्षक या कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्याबाबत. | २९ डिसेंबर २०२२ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| **८५.** | **डॉ. सुधीर तांबे, वि.प.स.**<br>राज्यातील ग्रंथालयांचे अनुदान वर्षानुवर्षे बंद असल्याने त्यांचे अनुदान देण्याबाबत व श्रेणी वाढविण्याबाबत. | २९ डिसेंबर २०२२ |
| **८६.** | **श्री. सचिन अहिर, वि.प.स.**<br>राज्यातील बिबट्यांचा मुक्त संचारावर उपाययोजना करण्याबाबत. | २९ डिसेंबर २०२२ |
| **८७.** | **श्री. प्रसाद लाड, वि.प.स.**<br>आनंदवाडी (ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग) येथे अत्याधुनिक व सुसज्ज मत्स्यव्यवसायास बंदर उभारण्याबाबत. | २९ डिसेंबर २०२२ |
| **८८.** | **श्री. निलय नाईक, वि.प.स.**<br>यवतमाळ जिल्ह्यातील पुसद येथे अतिरिक्त पोलीस कार्यालय व काळी दौलत, पुसद येथे पोलीस ठाणे हे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत. | २९ डिसेंबर २०२२ |
| **८९.** | **श्री. आमश्या पाडवी, वि.प.स.**<br>अक्कलकुवा तालुक्यातील (जि. नंदूरबार) अतिदुर्गम भागात असलेल्या दहेली आणि रामपूर धरणाचे काम पूर्णत्वास नेऊन कार्यान्वित करण्याबाबत. | २९ डिसेंबर २०२२ |
| **९०.** | **श्री. नागोराव गाणार, वि.प.स.**<br>राज्यातील जिल्हा रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केद्रे, उपकेद्रामध्ये डाटा एन्ट्री ऑपरेटर कर्मचाऱ्यांना सेवा शाश्वती, समान काम, समान वेतन धारेणानुसार वेतनश्रेणी लागू करण्याबाबत. | २९ डिसेंबर २०२२ |
| **९१.** | **श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.**<br>तरोडी खुर्द या गावात नागपूर सुधार प्रन्यासने बांधलेले २३७४ गाळे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गतकाम अर्धवट असल्याबाबत. | २९ डिसेंबर २०२२ |
| **९२.** | **श्री. विलास पोतनीस, वि.प.स.**<br>पश्चिम रेल्वेवरील दहिसर, पश्चिम येथील रेल्वे हद्दीतील झोपडपट्ट्यासह मुंबईतील रेल्वेच्या हद्दीतील झोपडपट्ट्याचा पुनर्विकास करण्याबाबत. | २९ डिसेंबर २०२२ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ९३. | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>अलिबाग तालुक्यातील (जि. रायगड) खारेपाटातील  शहापूर गावात समुद्राचे भरती पाणी गावात शिरत असल्याने कायमस्वरूपी सिमेंट काँक्रीटीकरणचा बंधारा बांधण्याबाबत. | २९ डिसेंबर २०२२ |
| ९४. | **श्री. अमोल मिटकरी, वि.प.स.**<br>लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे वास्तव्य असलेल्या घाटकोपर येथील चिराग नगर (मुंबई) येथील झोपडपट्टीचा  पुनर्विकास करून तेथील अण्णाभाऊ साठे यांच्या घरांचे  जतन करून त्यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याबबत. | २९ डिसेंबर २०२२ |
| ९५. | **श्री. गोपिचंद पडळकर, वि.प.स.**<br>आष्टी (जि. जालना)येथील पोलीस चौकीचे सहायक पोलीस निरिक्षक शिवाजी नागवे यांच्यावर कारवाई करण्याबाबत. | २९ डिसेंबर २०२२ |
| ९६. | **श्री. राजेश राठोड, वि.प.स.**<br>बंजारा बोली (गोरमाटी भाषा) चा समावेश करण्यासाठी  राज्य शासनाने शिफारस करावी, बंजारा बोली संवर्धनासाठी विशेष उपक्रम हाती घेण्याबाबत. | २९ डिसेंबर २०२२ |
| ९७. | **श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.**<br>शासनाच्या रुग्णालयातील परिचारिकांप्रमाणे मुंबई महानगर पालिकेच्या अखत्यारीतील रुग्णालयातील परिचारिकांना महिन्याला ६ सुट्ट्या देण्याबाबत. | २९ डिसेंबर २०२२ |
| ९८. | **प्रा. राम शिंदे, वि.प.स.**<br>राहुरी येथील तहसिलदार यांच्यावर मनुष्यवधाचा  गुन्हा दाखल करणे आवश्यक असून त्यांनी त्यांच्या पदाचा गैरवापर करून मिळवलेल्या अवैध संपत्तीची  चौकशी होणेबाबत. | ३० डिसेंबर २०२२ |
| ९९. | **श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स.**<br>नवीन व जुन्या हार्वेस्टर मशिन्सला ज्यांना अनुदान प्राप्त नाही अशा सर्वानाच अनुदान देणे बाबत. | ३० डिसेंबर २०२२ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| **१००.** | **ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.**<br>मुंबई महानगरपालिकेतील लिपिक संवर्गाच्या कर्मचाऱ्यांना देय असणाऱ्या वेतनवाढी अन्यायकारकरित्या रद्द केल्याबाबत. | ३० डिसेंबर २०२२ |
| **१०१.** | **श्री. किरण सरनाईक, वि.प.स.**<br>समाजकार्य महाविद्यालयामध्ये कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सातव्या वेतन आयोगाचा फरक अजूनही प्रलंबित असून तो त्वरित देण्याबाबत. | ३० डिसेंबर २०२२ |
| **१०२.** | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>क्यार, महाचक्रीवादळामुळे रायगड जिल्ह्यातील नुकसानग्रस्त मच्छिमारांना शासनाकडून देण्यात येणाऱ्या अनुदानापासून वंचित राहिले असल्याबाबत. | ३० डिसेंबर २०२२ |
| **१०३.** | **श्री. नागोराव गाणार, वि.प.स.**<br>आदिवासी विकास विभागांतर्गत एकात्मिक विकास प्रकल्पात कार्यरत कंत्राटी शिक्षकांना शासकीय सेवेत समायोजित करणेबाबत. | ३० डिसेंबर २०२२ |
| **१०४.** | **श्री. विलास पोतनीस, वि.प.स.**<br>मुंबईतील वाढत्या प्रदूषणावर उपाययोजना करण्याबाबत. | ३० डिसेंबर २०२२ |
| **१०५.** | **श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.**<br>अहमदनगर जिल्ह्यातील साकळाई उपसा सिंचन योजनेबाबत. | ३० डिसेंबर २०२२ |
| **१०६.** | **श्री. अंबादास दानवे, वि.प.स.**<br>पालखेड (ता. वैजापूर, जि. संभाजीनगर) येथील श्री. नंदकिशोर जाधव यांचेसह १३ नागरिकांवर राजकीय हेतूने प्रेरीत होऊन गुन्हा केल्याबाबत. | ३० डिसेंबर २०२२ |

## विवरण क्रमांक १७

# सन २०२२ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

महाराष्ट्र विधानपरिषद नियम २५९ व २६० अन्वये विचारात घेण्यात आलेले प्रस्ताव

| | | |
|---|---|---|
| (१) म. वि. प. नियम २५९ अन्वये चर्चा झालेला प्रस्ताव | - | १ |
| (२) म. वि. प. नियम २६० अन्वये प्राप्त झालेले प्रस्ताव | - | ३ |
| (३) म. वि. प. नियम २६० अन्वये स्वीकृत झालेल्या सूचनांची संख्या | - | ३ |
| (४) म. वि. प. नियम २६० अन्वये चर्चा झालेल्या सूचनांची संख्या | - | ३ |

| अ. क्र. (१) | सदस्यांचे नाव (२) | विषय (३) | चर्चेचा दिनांक (४) | शेरा (५) |
|---|---|---|---|---|
| | | **म. वि. प. नियम २५९ अन्वये प्रस्ताव** | | |
| १. | **श्री. अंबादास दानवे** व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये प्रस्ताव— | " राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्थेची स्थिती गंभीर गुन्ह्यांना आळा घालण्यात सरकारला आलेले अपयश, राज्यात अवैध धंद्यात तसेच महिलांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ, अनुसूचित जमातीच्या महिलेवरील बलात्कार व हत्येचा गुन्हा दडपण्याचा पोलिसांकडून झालेला प्रयत्न, वेठबिगारीसाठी अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींच्या खरेदी-विक्रीच्या उघडकीस आलेल्या घटना, बालगृहात होणारे मृत्यू, सत्तारुढ लोकप्रतिनिधीच्या आक्षेपार्ह वक्तव्यांमुळे राजकीय गुंडगिरीला मिळालेला अभय, राजकीय कुरघोडीतून होत असलेले गुन्हे, प्रशासकीय यंत्रणा, पोलीस दल व केंद्रीय यंत्रणांचा राजकीय सुडबुद्धीने होत असलेला गैरवापर, सत्तारुढ पक्षाच्या लोकप्रतिनिधींच्या सुरक्षेसाठी निर्भया पथकातील | दिनांक २९ व ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली. |

**विवरण क्रमांक १७—**(पुढे सुरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | वाहनांचा गैरवापर करणे, विरोधी पक्षाच्या लोकप्रतिनिधींवर खोटे आरोप ठेऊन त्यांना जेलमध्ये डांबून ठेवणे, सत्तारुढ पक्षाच्या लोकप्रतिनिधींकडून विरोधी पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांना धमक्या देणे, तसेच त्यांच्यावर खोट्या पोलीस केसेस दाखल करणे, अतिरेकी हल्ल्याच्या धमक्यांचे सत्र सुरू असून लोकप्रतिनिधी व उद्योजकांनाही धमक्या आल्या असणे, यामुळे महाराष्ट्रातील सर्व गोरगरीब जनतेमध्ये निर्माण झालेले असुरक्षिततेचे व भीतीचे वातावरण, गत सहा महिन्यांच्या कालावधीत महाराष्ट्रातील महापुरुषांचा अवमान करणारी, महाराष्ट्राच्या भूमीचे विभाजन करणारी, महाराष्ट्राच्या स्वाभिमानाशी खेळणारी, महाराष्ट्र हिताशी प्रतारणा करणारी वक्तव्ये, निर्णय, कृती सांविधानिक पदावर असलेल्या व्यक्तींकडून महाराष्ट्रात घडल्या असणे, यामुळे महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला तडा गेल्याची भावना जनमानसात निर्माण झाली असणे, अर्धन्यायिक प्रकरणात पदाचा दुरुपयोग केल्याची तसेच मंत्र्यांची व प्रशासकीय यंत्रणांची अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणे उघडकीस आली असणे, तसेच, राज्य परिवहन महामंडळाच्या जुन्या बसेसची दुरवस्था झाली असून त्याजागी नवीन बस खरेदी करण्याची आवश्यकता, तसेच राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभे करण्याची घोषणा राज्य सरकारने केली असली तरी त्यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद केलेली नसणे, राज्यात काही शैक्षणिक संस्थांनी मान्यता न घेता फिजिओथेरपीचे अभ्यासक्रम सुरू केले असणे, | | |

**विवरण क्रमांक १७—**(पुढे सुरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | राज्यावर करोना महामारीचे संकट पुन्हा घोंगावत असल्याने त्याबाबत तातडीने करावयाच्या उपाययोजना, गत ६ महिन्यात कुपोषणाचे वाढलेले प्रमाण, व्हेंटिलेटर अभावी नागपूरच्या मेडिकल हॉस्पिटलमध्ये १७ वर्षांच्या मुलीचा मृत्यू झाला असणे, जव्हार तालुक्यातील २१ वर्षीय मातेची रस्त्याअभावी जंगलात प्रसूती होणे, स्व.बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्गासारख्या महामार्गावर १०८ च्या रुग्णवाहिका, इंडिकेटर व इतर आरोग्य सुविधा उपलब्ध नसणे, राज्यात शिक्षक पात्रता परीक्षेत (टीईटी) गैरप्रकार झाले असणे, आजही दोषी उमेदवार कार्यरत असणे, कमी पटसंख्येच्या शासकीय शाळा बंद केल्यामुळे ग्रामीण, दुर्गम आदिवासी भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली असणे, शालेय पोषण आहार योजनेमध्ये झालेला गैरव्यवहार, शासनाच्या “ आपले गुरुजी उपक्रमाला शिक्षक व पालकांकडून होत असलेला तीव्र विरोध, आठवी ऐवजी तिसरीपासून परीक्षा घेण्याबाबत राज्याच्या शिक्षण मंत्र्यांनी व्यक्त केलेला मानस, परिणामी शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेली संदिग्धता, राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा स्थगित झाली असणे, सन २०२१-२२ या वर्षाचे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्काराला विलंब होत असणे, राज्यातील खासगी, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व वर्ग तुकड्यांतील ६५ हजार विना आणि अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना माहे जून, २०१४ व नोव्हेंबर, | | |

**विवरण क्रमांक १७—**(पुढे सुरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | २०१५ मधील वेतन अनुदान वितरणाचे सूत्र लागू करण्याची होत असलेली मागणी, तसेच सरकारच्या उदासीन धोरणांमुळे गेल्या सहा महिन्यात वेदान्त फॉक्सकॉन, टाटा एअर बस, बल्क ड्रग पार्क सह अनेक उद्योग महाराष्ट्राबाहेर गेले असणे, महाराष्ट्रात गुंतवणूक होण्यासाठी राजकीय इच्छाशक्तींचा अभाव असणे, परिणामी महाराष्ट्रातील बेरोजगार तरुणांच्या हिरावलेल्या रोजगाराची संधी, उद्योजकांना जमिनी वाटप करण्याच्या एमआयडीसीच्या निर्णयाला स्थगिती दिल्यामुळे हजारो लघु व मध्यम उद्योग उभारण्यात अडथळा निर्माण होणे, तसेच गरीबांसाठी राबविण्यात येत असलेली “ आनंदाचा शिधा ” या योजनेत झालेला भ्रष्टाचार व गैरव्यवहार, मागील सरकारनं यशस्वीपणे राबवलेल्या शिवभोजन थाळी योजनेकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, माहे जून ते ऑक्टोबर, २०२२ या काळात अतिवृष्टी, पूर, सततचा पाऊस व अवकाळी पाऊस यामुळे राज्यातील फळपिकांचे नुकसान झाले असणे, ओला दुष्काळ जाहीर करण्याच्या केलेल्या मागणीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, शेतकऱ्यांना जाहीर केलेली मदत तुटपुंजी असून उक्त मदत अद्याप लाखो शेतकऱ्यांना मिळालेली नसणे, शासनाच्या उदासीनतेमुळे पीक विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांचे लाखो दावे नाकारुन केलेली फसवणूक, लम्पी रोगावर नियंत्रण मिळविण्यास शासनास आलेले अपयश, त्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या पशुधनाचे झालेले नुकसान, त्यासाठी करावयाच्या उपाययोजना याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, राज्यात महागाईचा | | |

**विवरण क्रमांक १७—**(पुढे सुरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | उसळलेला डोंब, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी.” | | |
| | | **म. वि. प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** | | |
| १. | **श्री. प्रविण दरेकर** व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव— | “ महाविकास आघाडी सरकारच्या ३३ महिन्यांच्या कार्यकाळात विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागातील अनेक विकास प्रकल्पांकडे अक्षम्य दुर्लक्ष करण्यात येणे, राज्यात विदर्भ, मराठवाडा व कोकणासह उर्वरित अविकसित भागाचा संतुलित विकास होण्याची आवश्यकता, नैसर्गिक व सेंद्रिय शेती आणि फळबागांच्या लागवडीस प्रोत्साहन देणे, संत्रा उद्योग, दुग्धव्यवसाय, कुकुटपालन, मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन इत्यादी शेतीच्या जोडधंद्यांना प्रोत्साहन देऊन अधिकाधिक रोजगार उपलब्ध करणे, कृषीमालावर आधारीत प्रक्रिया उद्योग उभारणे, धानावर प्रक्रिया उद्योग उभारणे, विदर्भ व मराठवाड्यातील तिर्थक्षेत्र व पर्यटनस्थळांचे जाळे तयार करून रोजगार निर्मिती वाढविणे, विदर्भातील कापूस उत्पादनावर आधारीत सूत गिरण्या व कापूस उद्योगाला चालना देणे, विदर्भ व मराठवाड्यात खनिज व जंगल संपत्ती मोठ्या प्रमाणात असल्याने त्याचा अधिकाधिक फायदा जनतेला मिळण्याच्या दृष्टीने आधुनिक तंत्रज्ञान विकसित करणे, विदर्भातील विशेषतः अमरावती व मेळघाट येथे आधुनिक सोयीसुविधा युक्त रुग्णालयांची निर्मिती करून कुपोषणामुळे होणारे बालकांचे मृत्यू | दिनांक २१, २८ व २९ डिसेंबर, २०२२ | एकत्रित चर्चा झाली. |

**विवरण क्रमांक १७—**(पुढे सुरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | टाळण्याची आवश्यकता, राष्ट्रीयकृत बँकांच्या तुलनेत सहकारी बँकांची जिल्हा-जिल्ह्यांत सहज उपलब्ध होणारी सेवा विचारात घेता सहकारी बँकांवरचे वाढते निर्बंध शिथील करण्याची आवश्यकता, राज्यातील गडकिल्ल्यांचे जतन करून त्यांच्या संवर्धनाकरिता विशेष निधी उपलब्ध करणे व राजे शिवछत्रपतींचा इतिहास पर्यटकांसमोर मांडण्याची आवश्यकता, राज्यातील १२ बलुतेदारांसाठी एमआयडीसीमध्ये कौशल्यविकास केंद्राचे जाळे उभारून ग्रामीण भागातील बलुतेदारांना त्यांच्या व्यवसायांत आयटीआयच्या धर्तीवर तंत्रशिक्षण देऊन त्यांच्या उद्योगात आधुनिकता आणण्याची आवश्यकता, केंद्र शासनाचे नदीजोड प्रकल्प प्रभावीपणे कार्यान्वित करण्याची आवश्यकता, विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांना बारमाही पाणी उपलब्ध करून त्यांच्या उत्पादनास चालना देण्याची आवश्यकता, जलयुक्त शिवार योजनेमुळे शाश्वत सिंचनाच्या सुविधा अधिक प्रभावी करण्याकरिता या योजनेच्या अटी व निकष शिथील करणे, विदर्भ व मराठवाड्यासह राज्यातील बेरोजगार युवकांची वाढती संख्या विचारात घेता मिहान प्रकल्प व अन्यत्र जड उद्योग, कृषी प्रक्रिया उद्योग, ऑटोमोबाईल प्रकल्प सुरू करण्याची आवश्यकता, राज्यातील सर्व जिल्ह्यांत पर्यावरणाचा धोका टाळण्यासाठी अधिकाधिक वृक्ष लागवड करण्याची आवश्यकता, सन २०२२-२३ हे मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृतमहोत्सवी वर्ष म्हणून राज्य शासनाच्या वतीने साजरे करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही.” | | |

**विवरण क्रमांक १७—**(पुढे सुरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| २. | **श्री. अंबादास दानवे व इतर वि.प.स.** यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव | " राज्यात विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील अविकसित भागाचा झपाट्याने विकास होण्याच्या दृष्टीने योजनांच्या अंमलबजावणीत सातत्य दाखविण्याची नितांत आवश्यकता असणे, दरवर्षी नागपूर अधिवेशनात विदर्भ व मराठवाड्याच्या कृषि, सिंचन, शिक्षण इत्यादी अनुशेषाबाबत चर्चा होणे, तथापि, अनुशेष दूर करण्यासाठी ठोस कार्यवाही न होणे, विदर्भातील मुख्य फळपीक असलेल्या संत्रा पिकासाठी अमरावती जिल्ह्यातील वरुड-मोर्शी तालुक्यात अत्याधुनिक संत्रे प्रक्रिया प्रकल्प स्थापन करण्याच्या निर्णयाची, मराठवाडा व आसपासच्या भागातील मोसंबी पिकाची गुणवत्ता व उत्पादकता वाढविण्याकरिता " सायट्रस इस्टेट " स्थापन करण्याच्या निर्णयाची, औरंगाबाद जिल्ह्यातील चिखलठाणा येथे अंडीपुंज निर्मिती केंद्र निर्माण करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याकडे शासनाने विशेष लक्ष देण्याची गरज असणे, विदर्भ व मराठवाड्यातील कापूस व सोयाबीन मूल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजनेची धडक अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, माहे जून ते ऑक्टोबर, २०२२ या काळात अतिवृष्टी, पूर, सततचा पाऊस व अवकाळी पाऊस यामुळे राज्यातील कापूस, सोयाबीन, तूर, मूग या पिकांचे तसेच संत्री, मोसंबी, डाळींब, द्राक्ष या फळपिकांचे नुकसान झाले असणे, ओला दुष्काळ जाहीर करण्याच्या केलेल्या मागणीकडे सरकारने दुर्लक्ष केलेले असणे, त्याऐवजी तुटपुंजी मदत जाहीर करून अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना जाहीर केलेली मदतही अद्याप मिळालेली | दिनांक २९ व ३० डिसेंबर, २०२२ | अंतिम आठवडा प्रस्तावावर व सदर प्रस्तावावर एकत्रित चर्चा झाली. |

**विवरण क्रमांक १७—**(पुढे सुरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | नसणे, सरकारच्या उदासीनतेमुळे पीक विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांचे लाखो दावे नाकारुन केलेली फसवणूक, विदर्भात कापसावर लाला रोगाचा व संत्र्यावर कोळश्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे प्रचंड नुकसान झाले असणे, राज्य व केंद्र सरकारच्या चुकीच्या कृषी धोरणांमुळे व मदतीचा हात आखडता घेतल्याने माहे जुलै, २०२२ पासून ६ महिन्यांच्या काळात सुमारे दीड हजार शेतकऱ्यांनी जीवनयात्रा संपवली असणे, "शेतकरी आत्महत्यामुक्त महाराष्ट्र" ही सरकारची घोषणा हवेत विरली असणे, शेतकऱ्यांच्या आत्महत्या सन २०१५ ते २०२० या कालावधीसाठी एनडीआरएफचे निकष निश्चित केले असताना व सन २०२१ मध्ये निकषात वाढ अपेक्षित असताना २ वर्षांचा काळ उलटून गेल्यानंतरही केंद्र सरकारने निकषात वाढ केली नसणे, परिणामी शेतकऱ्यांना एनडीआरएफ व एसडीआरएफमधून तुटपुंजी मदत मिळत असणे, धान खरेदी केंद्र सुरू करण्यास झालेला अक्षम्य विलंब, धान खरेदीत झालेले घोटाळे, यामुळे अनेक शेतकऱ्यांचा धान विक्रीअभावी पडून असणे, गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड प्रकल्पामुळे आपल्या राज्यातील खनिज प्रक्रिया करण्यासाठी अन्य राज्यात जात असणे, मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करण्यासंदर्भात सरकारकडून बेफिकीरी व अनास्था दिसून आलेली असणे, मागील सरकारने केलेल्या कार्यक्रमाचे नियोजन व निधीची तरतूद याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून कार्यक्रम अंमलबजावणीत उदासीनता दाखवली असणे, मुक्तीसंग्राम | | |

**विवरण क्रमांक १७—**(पुढे सुरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | दिनी महाराष्ट्र शासनामार्फत कोणताही भव्यदिव्य कार्यक्रमाचे आयोजन न केल्यामुळे महाराष्ट्रातील जनतेत तीव्र संतापाची लाट पसरली असणे, मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रलंबित प्रश्नांचा तातडीने निपटारा करण्याची आवश्यकता, एम.आय.डी.सी. अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्यामुळे संबंधित अधिकारी मॅट मध्ये जाऊन उक्त बदल्या रद्द केल्याने यामध्ये शासनास आलेले अपयश, राज्याच्या इतर भागात होणाऱ्या ९२ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीच्या व जमीन वाटपाच्या आदेशाला विद्यमान सरकारने स्थगिती दिल्यामुळे राज्यात येणारे प्रकल्प रखडले असणे, महाराष्ट्राचे उद्योग परराज्यात जाणे हे सरकारवर उद्योग जगताचा विश्वास नसल्याचे स्पष्ट होणे, शासनाच्या उदासिनतेमुळे वेदान्त फॉक्सकॉन, टाटा एअर बस, बल्क ड्रग पार्क अशाप्रकारे बरेच प्रकल्प राज्याबाहेर जाणे, यातून एम.आय.डी.सी च्या उच्चाधिकार समितीची निष्क्रियता दिसून येणे, उद्योग मंत्र्यांनी शासनाचे अपयश लपविण्यासाठी राज्याबाहेर जाणाऱ्या उद्योगाबाबत मागील शासनावर जबाबदारी निश्चित करणे, मिहान प्रकल्पात ५५ गुंतवणुकदारांबरोबर करार झाला असताना फक्त ११ कंपन्या कार्यरत झाल्या असणे व फक्त ५९२५ रोजगार निर्मिती झाली असणे, मिहान प्रकल्पासारख्या महत्वाकांक्षी प्रकल्पाकडे सरकारचे होत असलेले दुर्लक्ष, विदर्भातील बुटीबोरी, मिहान सारख्या औद्योगिक वसाहतींमध्ये उद्योगांची पिछेहाट झालेली असणे, विदर्भ, मराठवाड्यात उद्योग व गुंतवणूक आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज, विदर्भ, मराठवाडा, व उर्वरित | | |

**विवरण क्रमांक १७—**(पुढे सुरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | महाराष्ट्रातील आकांक्षित जिल्ह्यासाठी जलसिंचन सुविधा पुनरुज्जीवीत करण्यासाठी अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेला नियतव्यय प्राधान्याने वितरित करण्याची आवश्यकता असणे, वैनगंगा-पैनगंगा प्रकल्पाचा आराखडा मागील सरकारने पूर्ण करुनही या सरकारने सहा महिन्यात काहीही प्रगती न करणे, बळीराजा योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना इत्यादी जलसंपदा विभागाच्या विदर्भातील योजना गेल्या सहा महिन्यात ठप्प होणे, विदर्भातील सिंचनाच्या सर्व प्रशासकीय बाबी या सहा महिन्यात प्रलंबित राहिल्या असणे, राज्यातील ओबीसी, मागासवर्गीय आणि अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या वसतीगृह व शिष्यवृत्तीचा प्रश्न निर्माण झालेला असणे, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील अतिदुर्गम भागात विशेषतः विदर्भातील अमरावती, गडचिरोली, चंद्रपूर इत्यादी जिल्ह्यात बालमृत्यू व कुपोषणाचे प्रमाण सर्वाधिक असणे, राज्यात महिला व अल्पवयीन मुलीवरील अत्याचारात दिवसेंदिवस होत असलेली वाढ, गत नऊ महिन्याच्या कालावधीत महिलांवरील अत्याचारामध्ये २३५ टक्के तर विनयभंगाच्या घटनांमध्ये १७२ टक्क्यांनी वाढ झाल्याचे समोर येणे, दिवसेंदिवस गुन्ह्यांमध्ये वाढ होत असतानाही याबाबत शासन गंभीर नसणे, परिणामी गुन्ह्यांमध्ये होत असलेली वाढ, तसेच गुन्हे निकाली काढण्यास होत असलेला विलंब वाढत्या गुन्हेगारीस आळा बसण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर तातडीने करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी. ” | | |

**विवरण क्रमांक १७—**(पुढे सुरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ३. | **श्री. प्रविण दरेकर व इतर वि.प.स.** यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव | " केंद्र शासनाने पेट्रोल, डिझेलच्या विक्रीकरात कपात केल्यानंतरही मागील सरकारच्या कार्यकाळात राज्य शासनाने अन्य राज्यांप्रमाणे पेट्रोल व डिझेलच्या दरात कपात करण्यात आडमुठे धोरण अवलंबणे, परिणामी राज्यातील गोरगरीब जनतेला महागाईचे चटके सहन करावे लागणे, विद्यमान शासन सत्तेवर येताच पेट्रोल व डिझेलवरील विक्रीकरात कपात करण्यात येणे, मागील सरकारने प्रामाणिकपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रु.५० हजार देण्याची घोषणा सन २०२० च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात व २०२१ मध्ये करूनही या घोषणेची अंमलबजावणी न होणे मात्र, विद्यमान शासनाच्या कार्यकाळात शेतकरी हित लक्षात घेऊन रु.५० हजारचा निधी तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचा निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलासा दिला असणे, मागील शासनाच्या काळात सरसकट शेतकऱ्यांची वीज कापण्याची मोहीम राबविण्यात आली असताना विद्यमान शासनाच्या काळात उप मुख्यमंत्री महोदयांनी शेतकऱ्यांची वीज कापू नये असे आदेश निर्गमित करून शेतकऱ्यांचा प्राधान्याने विचार केला असणे, मागील सरकारच्या काळात काही विशिष्ट मतदार संघात निधीचे असमान वाटप करण्यात आले असताना विद्यमान शासनाच्या काळात सर्वांना समान निधी वितरित करण्याचे धोरण आखण्यात येणे, शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमाचे प्राध्यापक व ग्रंथपाल यांच्या वेतनवाढीचा विचार होण्याची आवश्यकता, सन २००१ च्या पूर्वीची बीपीएड आणि कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत विचार होण्याची आवश्यकता, म्हाडाकडून पुनर्विकास | दिनांक २१ व २६ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली. |

**विवरण क्रमांक १७—**(समाप्त)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | होणाऱ्या इमारतीतील रहिवाशांना तसेच झोपडीधारकांना विकासकाविरुद्ध महारेरामध्ये अपिल करण्याचा अधिकार देण्याची आवश्यकता, इमारत पुनर्विकास करताना केलेल्या कराराप्रमाणे तेथील भाडेकरुंना पुनर्विकास प्रकल्प पूर्ण होईपर्यंत बऱ्याच विकासकांकडून भाडे देण्यात येत नसल्याची बाब निदर्शनास येणे, पुनर्विकास करावयाच्या इमारतींचा तात्काळ विकास करण्याची आवश्यकता, मुंबईतील नेहरूनगर व टिळक नगर म्हाडा वसाहतीतील पुनर्विकसित इमारतींना १० ते १५ वर्षे उलटूनही अद्याप भोगवाटा प्रमाणपत्र (ओसी) न मिळणे, जिल्हाधिकाऱ्यांच्या हद्दीतील जमिनींवरील धारणाधिकार रुपांतरीत करण्याकरिता आकारण्यात येणारे शुल्क जीर्ण इमारतींच्या बाबतीत २.५ टक्के करण्याची आवश्यकता, पीडब्ल्यूआर-२०१९ योजनेतंर्गत एससी, एसटी, एनटी समाजाला दिलेल्या जमिनी बीहोल्ड करण्याकरीता संबंधित समितीचे गठण तात्काळ होण्याची आवश्यकता, मुंम्रईतील रेल्वे हद्दीतील अनेक वर्षे जुन्या झोपडीधारकांचे त्याच ठिकाणी पुनर्वसन करण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेत काही पदांवर अधिकारी त्याच-त्याच ठिकाणी दिर्घकाळ कार्यरत असल्याची बाब निदर्शनास येणे, अशा भ्रष्ट अधिकाऱ्याची चौकशी करण्याची आवश्यकता, मुंबईचा रखडलेला विकास करण्याकरीता नियोजन आराखड्याची वेगाने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ” | | |

## विवरण क्रमांक १८

## अर्धा-तास चर्चेच्या सूचना (नियम ९२ अन्वये) (सर्वसाधारण)

महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९२ अन्वये सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर प्राप्त झालेल्या (सर्वसाधारण) अर्धा-तास चर्चेच्या सूचना.

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | एकूण आलेल्या सूचनांची संख्या | ... | ४५ |
| (२) | स्वीकृत झालेल्या सूचनांची संख्या | ... | २५ |
| (३) | सदस्यांनी मागे घेतलेल्या सूचनांची संख्या | ... | ० |
| (४) | अस्वीकृत झालेल्या सूचनांची संख्या | ... | २० |
| (५) | चर्चा झालेल्या सूचनांची संख्या | ... | ० |
| (६) | बॅलट मध्ये आलेल्या परंतु चर्चा न झालेल्या सूचनांची संख्या | ... | १० |
| (७) | विभाग/ सदस्य निर्देशित संख्या | ... | ० |
| (८) | मा.सदस्यांनी दिलेल्या परंतु कार्यवाहीत न घेतलेल्या सूचना | ... | ० |
| (९) | व्यपगत झालेल्या सूचना | ... | ० |

सन २०२२ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनात एकूण ४५ अर्धा-तास चर्चेच्या सूचना प्राप्त झाल्या असून त्यापैकी २५ सूचना स्वीकृत झालेल्या आहेत. स्वीकृत सूचनांपैकी बॅलेटमध्ये आलेल्या १० सूचना चर्चेसाठी ठेवण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी एकाही अर्धा-तास चर्चेच्या सूचनेवर चर्चा झाली.

## विवरण क्रमांक १९

## अर्धा-तास चर्चेच्या सूचना (नियम ९२ अन्वये) (प्रश्नातून उद्‌भवलेल्या)

महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९२ अन्वये सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर प्राप्त झालेल्या (प्रश्नांच्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या) अर्धा-तास चर्चेच्या सूचना.

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | एकूण आलेल्या सूचनांची संख्या | ... | २८ |
| (२) | स्वीकृत झालेल्या सूचनांची संख्या | ... | १३ |
| (३) | सदस्यांनी मागे घेतलेल्या सूचनांची संख्या | ... | ० |
| (४) | अस्वीकृत झालेल्या सूचनांची संख्या | ... | १५ |
| (५) | चर्चा झालेल्या सूचनांची संख्या | ... | ० |
| (६) | बॅलट मध्ये आलेल्या परंतु चर्चा न झालेल्या सूचनांची संख्या | ... | ४ |
| (७) | विभाग/ सदस्य निर्देशित संख्या | ... | ० |
| (८) | मा.सदस्यांनी दिलेल्या परंतु कार्यवाहीत न घेतलेल्या सूचना | ... | ० |
| (९) | व्यपगत झालेल्या सूचना | ... | ० |

सन २०२२ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनात एकूण २८ अर्धा-तास चर्चेच्या सूचना प्राप्त झाल्या असून त्यापैकी १३ सूचना स्वीकृत झालेल्या आहेत. स्वीकृत सूचनांपैकी बॅलटमध्ये आलेल्या ०४ सूचना चर्चेसाठी ठेवण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी एकाही अर्धा-तास चर्चेच्या सूचनेवर चर्चा झाली नाही.

# विवरण क्रमांक २०

# विवरण क्रमांक २०

## महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्यासाठी आलेल्या सूचना

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | आलेल्या सूचनांची संख्या | - | १० |
| (२) | स्वीकृत सूचनांची संख्या | - | १० |
| (३) | अस्वीकृत सूचनांची संख्या | - | - |
| (४) | सभागृहात चर्चा झालेल्या सूचना | - | १ |
| (५) | सभागृहात चर्चा न झालेल्या सूचना | - | ९ |
| (६) | सम्मिलित करण्यात आलेल्या सूचना | - | - |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव व विषय | ज्या तारखेस सूचना सभागृहात घेतली ती तारीख | शेरा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | **सर्वश्री अंबादास दानवे,** उद्धव ठाकरे, ॲड. अनिल परब, श्री सुनिल शिंदे, **वि.प.स.**<br>“महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नावर कर्नाटक सरकारकडून महाराष्ट्राबाबत वादग्रस्त विधाने करण्यात येत असणे, त्यावर महाराष्ट्र सरकारची प्रतिक्रिया, सन १९५६ साली झालेली भाषावार प्रांतरचनेमुळे मोठ्या प्रमाणात मराठी भाषिक जनता गेली ६६ वर्ष विविध मार्गांनी महाराष्ट्रात सामील होण्यासाठी अहिंसेच्या मार्गाने आंदोलन करत असणे, कर्नाटक सरकारने पोलिसांच्या मदतीने अनेक खोटे गुन्हे मराठी भाषिकांवर दाखल करण्यात आलेले असणे, सीमावर्ती भागातील मराठी भाषिकांना कृषी, पाणी, वीज, रस्ते, शिक्षण आणि आरोग्य आदी संबंधीच्या समस्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत असणे, मराठी भाषेत | २७ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

कोणतेही कागदपत्र न देणे, सीमावर्ती भागातील मराठी भाषिक जनतेला स्वतंत्र भारतात दुर्लक्षित घटकासारखे जीवन जगावे लागत असणे, मराठी मा. सार्वोच्य न्यायालयात सदर खटला प्रलंबित असतानाही कर्नाटक सरकारने बेळगाववर आपला हक्क सांगण्यासाठी खाजगी संस्थेच्या जागेत सन २००६ पासून अधिवेशन घेण्यास सुरुवात केलेली असणे, राज्यातील मंत्र्यांना व नेत्यांना बेळगावात येण्यास मनाई करण्यात आलेली असणे, काही कर्नाटक संघटनांकडून महाराष्ट्रातील वाहनांनवर दगडफेक करून दहशतीचे वातावरण निर्माण करणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष परिणामी सीमावर्ती भागातील मराठी भाषिक जनतेमध्ये निर्माण झालेला असंतोष."

२. **सर्वश्री अंबादास दानवे,** विलास पोतनीस, किशोर दराडे, **वि.प.स.** स्वीकृत

"मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवी वर्ष साजरा करण्याचा निर्णय महाविकास आघाडी सरकारने घेतलेला असणे, उक्त कार्यक्रमाअंतर्गत विविध उपक्रम राबविण्यासाठी ७५ कोटी रुपयांच्या निधीस मान्यता देवूनही सदरहू निधी विनावापर पडून असणे, तसेच मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन/रुपरेषा निश्चित करण्यासाठी महाविकास आघाडीच्या सरकारने गठीत केलेली मंत्रिमंडळ उपसमिती बरखास्त करून नवीन मंत्रिमंडळ उपसमिती पुनर्गठीत करण्यात आली असणे, परंतू उक्त समितीचे काम अद्याप सुरू नसणे, त्यामुळे मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवी वर्ष साजरा करण्याबाबत शासनाची उदासिनता दिसून येणे, परिणामी मराठवाड्यातील जनतेमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, उक्त प्रकरणी चौकशी करून मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरा करून त्याअंतर्गत विविध उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## विवरण क्रमांक २०—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३. | **सर्वश्री प्रविण पोटे-पाटील,** प्रविण दरेकर, निलय नाईक, प्रसाद लाड, रमेश पाटील, राजहंस सिंह, प्रविण दटके, प्रा.राम शिंदे, **वि.प.स.**<br>“ राज्यात विशेषतः अमरावती, मालेगाव, कोल्हापूर, पालघर जिल्ह्यात अल्पवयीन मुलींना फूस लाऊन, प्रलोभन दाखवून व काही ना काही मार्गाने आकर्षित करून लव-जिहादच्या नावाने मुस्लिम मुलांकडून पळवून नेण्याचे प्रकार किंबहुना १८ ते २१ वयोगटातील बऱ्याचशा मुली खोटया भूलथापांना बळी पडून स्वतःहून घरच्यांच्या नकळत पळून जाण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर निदर्शनास येणे, समोरील व्यक्ती मुस्लिम धर्माची असताना हिंदू धर्मातील नावे धारण करून हिंदू मुलींना आकर्षित करण्याचे प्रकार निदर्शनास येणे, या गुंतलानंतर कालांतराने पश्चाताप होऊन काही मुलींनी आत्महत्या केल्याचे प्रकार निदर्शनास येणे, जेमतेम १८ वर्षाच्या झालेल्या ज्या मुलींना त्यांच्या भविष्याचा अंदाज नाही अशा मुलींचे आयुष्य उध्वस्त होत असल्याची बाब निदर्शनास येणे, या प्रकारातील कित्येक मुली शरमेने व पश्चातापाने घरी न परतताता अवैध धंद्यात गुंतल्या असल्याची बाब उघडकीस येणे, हिंदू धर्माला कलंकित करणाऱ्या मुस्लिम धर्मातील नराधमांपासून हिंदू मुलींना वाचविण्यासाठी हिंदू विवाह अधिनियमात सुधारणा करून १८ ते २१ वर्ष वयादरम्यानच्या मुलींचे विवाह पालकांच्या संमतीने करणे अनिवार्य करण्याची व २१ वर्ष वयानंतरच्या मुलींना स्वेच्छेने विवाह करण्यास मुभा देण्याची आवश्यकता, खाजगी विवाह संस्थांच्या माध्यमातून अशा भुलथापांना हिंदू मुली बळी पडत असल्याने विवाह जुळवून लावून देणाऱ्या संस्थांवर बंदी आणण्याची आवश्यकता, असे विवाह उपनिबंधकाकडे एक महिन्याची पूर्वसूचना देऊन व नोंदणी करून करण्याची आणि अशा विवाहास मुलींच्या आई-वडिलांनी किंवा पालकांनी उपस्थित राहणे | स्वीकृत | |

अनिवार्य करण्याची आवश्यकता, या प्रकारांना कायमस्वरूपी आळा बसण्यासाठी राज्यात धर्मांतर विरोधी अधिनियम तातडीने करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

४. **डॉ मनिषा कायंदे,** सर्वश्री जयंत पाटील, आमश्या पाडवी, **वि.प.स.** स्वीकृत

'' राज्यात महिला व अल्पवयीन मुलीवरील अत्याचारात दिवसेंदिवस होत असलेली वाढ गेल्या नऊ महिन्याच्या कालावधीमध्ये महिलांवरील बलात्कारांच्या २३५ टक्के तर विनयभंगाच्या घटनामध्ये १७२ टक्कयांनी वाढ झाल्याचे समोर येणे, दिवसेंदिवस गुन्हयांमध्ये वाढ होत असतांनाही याबाबत शासनन गंभीर नसणे, परिणामी गुन्ह्यांमध्ये होत असलेली वाढ, तसेच गुन्हे निकाली काढण्यास होत असलेला विलंब, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालण्याची आवश्यकता, वाढत्या गुन्हेगारीस आळा बसण्याच्या दष्टीने शासनस्तरावर तातडीने कार्यवाही करण्याची गरज. ''

५. **सर्वश्री विक्रम काळे,** सतिश चव्हाण, डॉ. सुधीर तांबे, **वि.प.स.** स्वीकृत

'' राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यपकांचे विविध प्रश्न गेल्या अनेक कालावधीपासून प्रलंबित असणे, जसे की, एम.फीलधारक प्राध्यपकांना कॅस चे लाभ देण्यात यावेत, आरसीओसीला मुदतवाढ देण्यात यावी, प्राध्यपकांना पी.एच.डी च्या दोन आगाऊ वेतनवाढी मिळाव्यात, कॅस हे डयू डेट पासून देण्यात यावी, स्टॅटयूटप्रमाणे प्राध्यपकांना १२ रजा मिळाव्यात, सन १९९१ ते २००० कालावधीत सेवेत आलेल्या बिगर नेटसेट अधिव्याख्यात्यांना त्यांच्या सेवा नियुक्ती दिनांकापासूनन ग्राह्य धरुन इतर अनुषंगिक लाभ देण्यात यावेत, तासिका तत्त्वावरील प्राध्यपकांचे मानधनात वाढ करावी, तासिका तत्त्वावरील प्राध्यापक नेमतांना प्रथम प्राधन्य पी.एच.डी/नेट/सेट धारकांना द्यावेत, ते उपलब्ध झाले नाहीत तर इतरांना तासिका तत्त्वावर नियुक्त्या देण्यात याव्यात व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळावे, प्राचार्य व शिक्षक संवर्गातील सर्व रिक्त पदे तातडीने भरुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळावे, यांसारख्या महत्त्वाच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी तत्कालीन मंत्री महोदयांच्या सूचनेनूसार उच्च शिक्षण संचालक यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त होणे, तरीही त्यावरती कोणतीच कार्यवाही

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | होत नसल्याने राज्यभर प्राध्यपकांमध्ये पसरलेला असंतोष व त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |
| ६. | **सर्वश्री विक्रम काळे,** सतिश चव्हाण, डॉ. सुधीर तांबे, **वि.प.स.** “ नुकत्याच झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत विनाअनुदान शाळांच्या अनुदानाबाबत मंत्रीमंडळाने निर्णय घेऊन विनाअनुदान शाळांना अनुदान देण्याबाबत रु. ११६० कोटीचा निधी मंजूर केलेला आहे, या निर्णयात त्रूटी पूर्ण केलेल्या ज्या शाळा २०% मध्ये होत्या त्यांना २०% व ज्या ४०% मध्ये होत्या त्यांना ४०% वेतन अनुदान तसेच अघोषीत प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा तसेच सन २०१२-१३ च्या नैसर्गिक वाढीच्या वर्गतुकड्यांना सरसकट २०% वेतन अनूदान तर २०% वेतन घेत असलेल्यांना पूढील टप्पा ४०% व ४०% घेत असलेल्यांना पूढील टप्पा ६०% वेतन अनूदान देण्याचा निर्णय घेतला असणे, तत्कालीन शासनाने शासन निर्णय दि. १२/१५/२४ फेब्रुवारी, २०२१ नुसार निर्गमित केलेल्या आदेशात २०% व ४०% अनुदानासाठी पात्र म्हणून घोषित करण्यात येणे, परंतु त्यामधील काही शाळांच्या किरकोळ त्रुटी होत्या म्हणून त्यांना २०% व २०% अनुदान घेत असलेल्या शाळांना ४०% चा पुढील टप्पा देण्यात आलेला नसणे, या शाळांनी मंत्रालयीन अधिकाऱ्यांसमोर त्रूटी पूर्ण करणे, त्रुटी पूर्तता करूनही शासन निर्णय लांबल्यामुळे शासन निर्णयात शाळांची नावे असतांनासुद्धा त्यांना वेतन अनुदान मिळाले नसणे, तत्कालीन सरकारने त्यांना अनुदान देण्यासाठीच्या प्रस्तावात मान्यता देणे, त्याबाबतचा शासन निर्णय तयार करणे, परंतु, निर्गमित न होणे, यात त्या शाळा किंवा शिक्षक- कर्मचाऱ्यांचा कोणताच दोष नसणे, या निर्णयानूसार त्रुटी पूर्ण केलेल्या शाळांना २०% वाल्यांना ४०% व ४०% वाल्यांना ६०% अनुदान देण्याबाबतचा निर्णय न होणे, हा त्यांच्यावर फार मोठा अन्याय होणे, यापुढे सर्व | स्वीकृत | |

शाळांना प्रचलित धोरणानूसार अनुदान देण्याचा निर्णय घेण्याची गरज असणे, सन २०१७-१८ पासून ते आजपावेतो व पुढे वेळोवेळी विनाअनूदान किंवा टप्पा अनूदान शाळेवरील शिक्षक कर्मचाऱ्यांना शाळा संहितेप्रमाणे सेवासंरक्षणाचा सूधारीत शासन निर्णय निर्गमित करण्याची गरज असणे, पटसंख्येअभावी व रोष्टरअभावी शाळा अथवा वर्गतुकडी मुल्यांकनास अपात्र ठरत असल्यास त्यापुढील वर्षातील अथवा अनुदान देतेवेळेची पटसंख्या ग्राह्य धरणे गरजेचे असणे, तसेच अनुशेष संवर्गातील जागा रिक्त ठेवून ती शाळा अनुदानास पात्र ठरविणे गरजेचे असणे, एखाद्या संस्थेत विनाअनुदान वर्गतूकडीवर कार्यरत पात्र शिक्षकाला त्या संस्थेत सेवानिवृत्तीमुळे अनुदानित शिक्षक पद रिक्त झाल्यास त्यावर बदली करण्याबाबतच्या आदेशास दिलेली स्थगिती उठविणे, दि १ नोव्हेंबर, २००५ पुर्वीच्या व नंतरच्या शिक्षक-कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयात कार्यभारामुळे वाढलेली शिक्षकांची सन २०११-१२ पासूनच्या वाढीव पदांना मान्यता देणे गरजेचे असणे, वाढती महागाई लक्षात घेता, शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करणे गरजेचे असणे, शिक्षक-कर्मचाऱ्यांना कॅशलेस वैद्यकीय सुविधा लागू करण्याची गरज असणे, जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळांमध्ये वर्ग-२, वर्ग-३ ची मुख्याध्यापकांची व शिक्षकांची पदे भरणे गरजेचे असणे, अनेक शाळांच्या संच मान्यता दुरुस्ती करणे गरजेचे असणे, सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची सर्व रिक्त पदे तातडीने भरणे गरजेचे असणे, वरिष्ठ व निवड श्रेणी देताना २०% ची अट काढणे गरजेचे असणे, कनिष्ठ महाविद्यालयात काळाच्या गरजेनूसार सुरू केलेल्या आयटी विषयास अनुदान देणे गरजेचे असणे, शिक्षकांनी उच्च अर्हता धारण केल्यास त्यांना प्राथमिक मधून माध्यमिक, माध्यमिक मधून उच्च माध्यमिक व उच्च माध्यमिकमधून अध्यापक विद्यालयात जाण्यासाठी वेतन संरक्षणासह बदलीस मान्यता देणे गरजेचे असणे, शिक्षकाने एमफील, पीएचडी अथवा नेटसेट अशा उच्च पदव्या धारण केल्यास त्यांना प्रोत्साहन म्हणून दोन जादा वेतनवाढी देण्याचे गरजेचे असणे, या बाबत शासनाने केलेली करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”

## विवरण क्रमांक २०—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ७. | **सर्वश्री सतीश चव्हाण,** विक्रम काळे, अनिकेत तटकरे, **वि.प.स.**<br>" सन १९७९ मध्ये रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून औरंगाबाद जिल्ह्यातील गंगापूर तालुक्यातील टेंभापूरी मध्यम प्रकल्पाचे काम सुरू होवून १९९५ मध्ये पूर्ण करण्यात येणे, या प्रकल्पावर १७.३० कोटी रुपये खर्च झाले असून सन २००६ पासून प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरत असणे, या प्रकल्पासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी अधिगृहीत करण्यात आल्या त्या बाधीत शेतकऱ्यांना आद्यापही पर्यायी जमिनी देण्यात आलेल्या नसणे, जमीन घेण्यासाठी मिळालेल्या रक्कमेतून ६५ टक्के रक्कम शासनाकडे भरल्यास पर्यायी जमिनी तात्काळ मिळण्याची तरतूद असतांनाही व धरणग्रस्त पैसे भरण्यास तयार असतांनाही त्यांना अद्यापही जमिनी देण्यात न येणे किंवा या बाबतीत शासनाने कोणतीही कार्यवाही केली नसणे, धरणग्रस्त शेतकऱ्यांना पर्याय जमिनी, रहिवाशी प्लॉट व धरणग्रस्त असल्याचे प्रमाणपत्र देण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपायोजना व प्रतिक्रिया." | स्वीकृत | |
| ८. | **सर्वश्री सतीश चव्हाण, विक्रम काळे, अनिकेत तटकरे, वि.प.स.**<br>" औरंगाबाद येथील वाळूज महानगर परिसरात औद्योगिक वसाहतीमुळे झपाट्याने विकास झालेला असणे, देशभरातून नौकरी व्यवसायासाठी लाखो नागरिक खाजगी व विकासकांनी स्वतःच्या जमिनीवर प्लॉट टाकून त्याठिकाणी सामान्य नागरिकांची घरे नोकरी व्यवसायानिमित्त याठिकाणी आलेल्या बाहेरच्या नागरिकांनी व्याजानी पैसे घेऊन घरे बांधलेली असणे, दिनांक १२ जुलै,२०२१ अन्वये नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांनी या ठिकाणी तुकडा बंदीचा आदेश पारीत केल्यामुळे सर्वसामान्य कामगार मोलमजूरी करणाऱ्यांना व व्यवसायीक व नोकरी करणाऱ्या नागरिकांना निर्माण झालेल्या अडचणी व त्यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष, या आदेशाविरुद्ध तेथील नागरिकांनी मा.उच्च न्यायालयात खटला | स्वीकृत | |

दाखल केला असता मा.उच्च न्यायालयाने तुकडा बंदीचा आदेश रदृ ठरवून दस्त नोंदणी करण्याचे आदेश दिलेले असतांना या आदेशाला शासनाने मान्य न करणे, त्यामुळे तेथील नागरिकांत पसरलेले भितीचे वातावरण, मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार शासनाने तात्काळ कार्यवाही करून दस्तऐवज नोंदण्या करण्यासाठी मान्यता देण्याची नितांत आवश्यकता,यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया.''

९. **ॲड. निलय नाईक,** प्रविण दरेकर, प्रसाद लाड, प्रविण पोटे-पाटील, रामराव पाटील, सुरेश धस, निरंजन डावखरे, सौ. उमा खापरे, श्रीकांत भारतीय, वसंत खंडेलवाल, रामदास आंबटकर, रमेश पाटील, नागोराव गाणार, चंदशेखर बावनकुडे, गोपीचंद पडळकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, **वि.प.स.** — स्वीकृत

'' राज्यातील २५० हून अधिक लोकसंख्या असणाऱ्या तांड्यांना एक स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा न दिल्यामुळे तांड्यांचा विकास झाला नसल्याचे निदर्शनास येणे, गट ग्रामपंचायत असल्याने तांड्यांचा विकास होऊ शकत नसणे, त्यामुळे तांड्यांचा सार्वत्रिक विकासात अडचणी निर्माण होणे, ही बाब निदर्शनास येणे, म्हणून २५० हून अधिक लोकसंख्या असलेल्या तांड्यांना एक स्वतंत्र ग्रामपंचायत असणे गरजेचे आहे. जेणेकरून त्यांचा विकास होऊ शकतो. मुख्यतः विदर्भात २५० हून जास्त लोकसंख्या असलेले तांड्यांचे प्रमाण अधिक असल्याचे निदर्शनास येणे, परंतु त्यांचा विकास रखडलेला असणे, तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायत मिळण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

१०. **श्री. अंबादास दानवे,** विलास पोतनिस, सचिन अहिर, **वि.प.स.** — स्वीकृत

'' मानखुर्द द्व शिवाजी नगर (मुंबई) येथील SMS Envoclean Pvt. Ltd. ही कंपनी बायोमेडीकल वेस्ट मेडीसीन ऑपरेशन साहित्य, ऑपरेशन मानवी अंग, नवजात मृत बाल अश्या कित्येक घातक वस्तु सदरहू ठिकाणी नष्ट करीत असणे, तसेच सदरहू कंपनीच्या चिमणीद्वारे निघणाऱ्या धूरामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असणे, गत काही वर्षापासून वारंवार टी.बी. रुग्ण आणि दम्याचे रुग्ण वाढतच जात असणे, एका रिपोर्ट नुसार याठिकाणी राहणाऱ्या लोकांची वयोमर्यादा ३९ वर्षे इतकी झाली

## **विवरण क्रमांक २०**—समाप्त

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | असणे, वातावरण अत्यंत दुषित, घाणीचे आणि दुर्गंधीचे झाले असणे, याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र प्रदूषण महामंडळ आणि केंद्रीय प्रदूषण महामंडळ यांच्याकडे एस.एम.एस. कंपनी हटाओ संघर्ष समितीने कोणतीच कारवाई करण्यात आलेली नसणे, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदरहू कंपनीवर कारवाई करण्याची आवश्यकता, या सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर म.वि.प.नियम ९७ अन्वये दिलेली स्वीकृत करण्यात यावी. ” | | |

# विवरण क्रमांक २१

## विवरण क्रमांक २१

### महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींकडे मंत्र्यांचे लक्ष वेधण्यासाठी आलेल्या लक्षवेधी सूचना

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | प्राप्त झालेल्या एकूण लक्षवेधी सूचना | - | ६०८ |
| (२) | स्वीकृत करण्यात आलेल्या एकूण लक्षवेधी सूचना | - | २०९ |
| (३) | सभागृहात चर्चा झालेल्या एकूण लक्षवेधी सूचना | - | ४३ |
| (४) | सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या एकूण स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र | - | १५० |
| (५) | शेवटच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या सूचना | - | १३ |
| (६) | अस्वीकृत करण्यात आलेल्या एकूण लक्षवेधी सूचना | - | ३९९ |

| अ.क्र. | लक्षवेधी सूचना क्र. | सदस्यांचे नाव व विषय | ज्या तारखेस सूचना सभागृहात घेतली ती तारीख | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. | १५४ | **श्रीमती उमा खापरे,** सर्वश्री प्रविण दरेकर, नागोराव गाणार, प्रसाद लाड, **वि.प.स.**<br>" माटुंगा येथील मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत वर्गातील विद्यार्थी डान्सच्या तासासाठी बाहेर जाताच आठवीत शिकणाऱ्या दोन विद्यार्थ्यांनी तेरा वर्षीय विद्यार्थिनीवर वर्गात लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली असल्याची बाब माहे डिसेंबर २०२२ च्या पहिल्या आठवड्यामध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली असणे, या संदर्भात मुलीच्या तक्रारीवरून पोलिसांनी दोन विद्यार्थ्यांविरोधात गुन्हा नोंदवलेला असणे, त्याचप्रमाणे | २१ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | कल्याण स्टेशन परिसरातील जवळच्या सोसायटीत एका नववर्षाच्या मुलीचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडालेली असणे, या अल्पवयीन मुलीवर आधी बलात्कार करून नंतर तिची हत्या केल्याची प्राथमिक माहिती उघडकीस येणे, यासंदर्भात कल्याण पोलीस स्टेशन मध्ये बलात्कार प्रकरणी गुन्ह्यांची नोंद करण्यात येणे, तसेच लहान वयात हाती आलेले मोबाईल व अश्लील व्हिडीओ सहज उपलब्ध होत असल्याने शरीरासंबंधीच्या विकृत दृष्टिकोन लहान वयातच मुलांमध्ये वाढत असणे यामुळे लहान अल्पवयीन मुले हिंसेचा व सूड घेण्याच्या प्रवृत्तीमुळे गुन्ह्याच्या विळख्यात अडकत असल्याचे मत मानसोपचार तज्ज्ञांनी व्यक्त केले असणे, त्यामुळे शाळा व शाळा परिसरात मोबाईल जामर लावण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे, त्यामुळे राज्यातील शाळकरी विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर झालेला असणे यासाठी शासनाने एक टास्क फोर्स नेमून शाळेतील विद्यार्थिनींना योग्य ते संरक्षण देण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| २. | १६२ | **सर्वश्री अभिजित वंजारी,** राजेश राठोड, डॉ. वजाहत मिर्झा, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, **वि.प.स.**<br>" राज्यामध्ये फक्त विदर्भातील नागपूर आणि अमरावती विभागामध्ये इंग्रजांच्या काळापासून नझूल जमिनी भाडेपट्ट्यावर दिलेल्या असणे, नझूल भाडेपट्ट्याचे हस्तांतरण, व्यापारात बदल, शर्ती भंग, नियमितीकरण इत्यादीकरिता अनअर्जीत रकमेचे दर हे वाजवीपेक्षा जास्त असून इतकी रक्कम शासनाकडे जमा करणे, दर सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर झालेले असणे, नागपुरातील धंतोली, रामदासपेठ आणि ज्या ज्या भागात नझूलच्या जमिनी आहेत, त्या ठिकाणी भाडेपट्टे नुतनीकरण न केल्याने जिल्हा कार्यालयातून दिनांक ३१ डिसेंबर २०२२ पर्यंत संबंधित रहिवाशांनी भाडेपट्टे नुतनीकरण न केल्यास त्या जप्त करण्याचे आदेश देणे, | २१ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | परिणामी सर्वसामान्य नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असणे, यापूर्वी सुद्धा नागपूर विभागामध्ये भाडेपट्ट्याच्या नुतनीकरणामध्ये विलंब केल्यास आणि त्या अटी व शर्ती भंग केल्यास त्या पट्टेधारकाला दोन हजार प्रती स्क्वेअर फूट इतका दंड आकारला जात असणे आणि अशाप्रकारच्या कारवाईमुळे शासनाकडे हजारो कोटी रुपयाचा महसूल जमा होणे, परंतु राज्याच्या इतर विभागामध्ये नझूल भाडेपट्ट्यावर जमिनीच्या कायदा अस्तित्वात नसल्यामुळे तसेच स्वातंत्र्याच्या काळानंतर ब्रिटीशकालीन अनेक कायदे आपण रद्द केलेले नसणे, त्यामुळे नझूल भाडेपट्ट्यावर दिलेल्या संदर्भावर पूर्व विदर्भातील नागरिकांमध्ये पसरलेली तीव्र नाराजीची भावना, याबाबत शासनाने पुनर्विचार करून बाधित लोकांना दिलासा देण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **३.** | **१९६** | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>"केंद्र सरकार कर्मचाऱ्यांनी साई वैभव सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यात येणे, सदर संस्था केवळ कोकण वासियांसाठी गठीत करण्यात येऊन त्यांनी दि.१८.४.२००६ च्या पत्रान्वये मा.अप्पर मुख्य सचिव, महसूल विभाग यांचेकडे मुंबई उपनगर जिल्हा मौजे विक्रोळी, ता.कुर्ला सर्व्हे नं.६५ मधील ७ एकर जागा मिळणेबाबत मागणी करून अद्यापही साई वैभव सहकारी, गृहनिर्माण संस्थेला जागा न देण्यात येणे, सदर संस्थेचे २१२ हून अधिक सदस्य असतानाही संस्थेला जागा न मिळाल्याने घरांचा प्रश्न प्रलंबित राहणे, सदर जागा मिळणेबाबत संस्थेकडून सातत्याने पाठपुरावा करूनही प्रश्न अद्याप निकाली न निघणे, सन २०१३ साली असलेल्या तत्कालीन महसूल मंत्री यांनी याबाबत सोसायटीचे पदाधिकारी व संबंधित अधिकारी | २१ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | यांची एकत्रितपणे बैठक घेऊन त्यातून योग्य तो मार्ग काढून सोसायटीच्या सभासदांना मदत करण्याकरिता प्रयत्न केला जाईल असे आश्वासन देण्यात येणे, परंतु दिलेल्या आश्वासनानुसार अद्याप या विषयासंदर्भात कोणत्याही संबंधित अधिकारी तसेच साई वैभव सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांबरोबर कोणतीही बैठक न होणे, परिणामी संस्थेच्या सदस्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ४. | १० | **सर्वश्री गोपिचंद पडळकर,** अंबादास दानवे, **वि.प.स.**<br>"राज्यात मेंढपाळ बांधवांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून नाहक त्रास बांधवांना सहन करावा लागत असणे, राज्यात गेली अनेक वर्ष धनगर समाज आपला पारंपारिक मेंढीपालन व्यवसाय करून आपली उपजीविका चालवत असणे, या व्यवसायामुळे मेंढपाळ बांधव महाराष्ट्रभर भटकंती करत असणे, परंतु गेल्या काही काळामध्ये मेंढपाळ आणि वन खात्याचे अधिकारी तसेच गावगुंडांमध्ये सातत्याने संघर्षाची परिस्थिती उद्‌भवत असणे, मेंढपाळांना जंगली चराईसाठी खुली करणे, धरण बुडीत क्षेत्र खुले करणे, वृक्ष लागवडीस पाच वर्षे पूर्ण झाल्यानंतर वनीकरणाच्या जमिनीसाठी खुल्या करणे, १००-१०० वर्षापासून लाभक्षेत्र मध्ये मेंढपाळ वास्तव्यास असून त्यांना वन अधिकाऱ्यांकडून नाहक त्रास सहन करावा लागत असणे, गायरानावरती अतिक्रमण झाल्यामुळे मेंढ्यांच्यासाठी जमिनी शिल्लक राहिल्या नसणे, तरी ती अतिक्रमण काढणे, तसेच पावसाळ्यात दूषित पाणी पिल्याने व रस्ते अपघातात शेळ्या मेंढ्या मरण पावतात अशावेळी नैसर्गिक आपत्ती घोषित करून मेंढपाळांना आर्थिक भरपाई देण्यात यावी, अशा अनेक मागणी राज्यातील मेंढपाळ बांधवांच्या शासनाकडे असणे, दिनांक १९ ऑक्टोबर २०२२ रोजी शासनाने मा. वने मंत्री यांनी राज्यातील मेंढपाळ बांधव व लोकप्रतिनिधी यांची संयुक्त बैठक घेऊन याबाबत येणाऱ्या २० दिवसात माहिती सादर करून पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले असणे, | २१ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना निर्देश देऊन एक महिनापेक्षा अधिकचा कालावधी होऊन देखील आजमितीस मेंढपाळ बांधवांच्या प्रश्नाबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, यामुळे राज्यातील मेंढपाळ बांधवांच्या मनात निर्माण झालेली तीव्र असंतोषाची भावना याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| ५. | **२३४** | **श्री. आमश्या पाडवी, वि.प.स.**<br>“ राज्यातील अनुसूचित जमातीच्या राज्य शासकीय, निमशासकीय कर्मचाऱ्यांनी जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र दाखल केलेले नाही तसेच ज्यांचे जातीचे दाखले अवैध ठरलेले आहेत अशा सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालय यांनी सन २०१६, २०१७ मध्ये सेवेतून कमी करण्याची कार्यवाही करण्याबाबत शासनाला दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी आदेशित करणे, सदर आदेशात उपरोक्त कर्मचाऱ्यांवर दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ पर्यंत कारवाई करण्यात यावी असे नमूद करण्यात आलेले असणे, तथापि मा.न्यायालयाच्या आदेशानुसार कोणतीच कार्यवाही न करता अधिसंख्य पदे निर्माण करून त्यांची बिंदूनामावलीत मंजूर कार्यकारी पदावर नियुक्ती करण्यात येणे, तद्नंतर दिनांक २९ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या मंत्रीमंडळ निर्णयान्वये उपरोक्त बोगस प्रमाणपत्रधारक अधिकारी व सद्यःपरिस्थितीत अधिसंख्य पदावर कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना मानवतेचा दृष्टीकोन लक्षात घेत सेवा विषयक लाभ देण्याचा निर्णय घेण्यात येणे, त्यामुळे या प्रकरणी शासनाने मा.न्यायालयाच्या आदेशाची केलेली पायमल्ली, परिणामी मूळ आदिवासी समाजातील होतकरु उमेदवारांवर झालेला अन्याय, तसेच मूळ आदिवासी असलेल्या अधिकाऱ्यांना | २२ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

पदोन्नतीपासून वंचित रहावे लागणे, त्यामुळे त्यांच्यात वाढते नैराश्याचे व असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तात्काळ चौकशी करून जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र दाखल न करणाऱ्यां व बोगस प्रमाणपत्र सादर करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना कार्यकारी पदावरील नियुक्ती रद्द करून सेवेतून कमी करण्याची आवश्यकता, तसेच अनुसूचित जमाती प्रवर्गातील राखीव असलेली रिक्त पदे तातडीने भरण्याच्या अनुषंगाने शासनाने केलेली निर्णयात्मक कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया. ”

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६. | ३६ | **सर्वश्री अमोल मिटकरी,** विक्रम काळे, शशिकांत शिंदे, सतिश चव्हाण, **वि.प.स.**<br>“ यावर्षी विदर्भात १ लाख ७० हजार हेक्टरवर संत्री-मोसंबीची लागवड करण्यात आलेली असणे, परंतु यंदा राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे विदर्भातील संत्री पिकावर त्याचा विपरीत परिणाम झाल्याचे आढळून येणे, या दरम्यान संत्री कोळशी या रोगामुळे काळी पडू लागल्याचे व त्यामुळे संत्री उत्पादनात घट झाल्याचे दिनांक ४ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, कोळशी रोगाचा प्रादुर्भाव झाला असतांना शासकीय यंत्रणांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याचे तसेच संत्रा उत्पादकांना कसलेही मार्गदर्शन करण्यात आले नसल्याबाबत उत्पादक शेतकऱ्यांनी शासनाकडे तक्रारी केल्या असल्याचेही त्याचसुमारास निदर्शनास येणे, काळी पडलेली किंवा डाग असलेली संत्री व्यापारी सुद्धा खरेदी करीत नसल्यामुळे उत्पादकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका बसल्याचे निदर्शनास येणे, यास्तव संत्री उत्पादक शेतकऱ्यांनी शासनाकडे नुकसान भरपाईची मागणी करण्यात येणे, परंतु त्याकडे शासकीय यंत्रणांनी दुर्लक्ष करण्यात येणे, परिणामी, विदर्भातील संत्रा उत्पादकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व उदासिनतेची भावना, त्याबाबत शासनाने चौकशी करून नुकसान भरपाई देण्याप्रकरणी कार्यवाही करण्याची आवश्यकता व त्याबाबतची शासनाची प्रतिक्रिया. ” | २२ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **७.** | **१९** | **श्री. अंबादास दानवे,** डॉ. मनिषा कायंदे, ॲड. अनिल परब, **वि.प.स.**<br>" राज्यात दिवाळी सणानिमित्त शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाने महाराष्ट्र दिवाळी निमित्त फूड किट (चना डाळ, रवा, साखर व पामतेल) पुरवठा करण्याबाबत राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीपूर्वीच ५१३ कोटी २४ लाख रुपयांची निविदा NCDEX Emarkets limited या कंपनीला देण्यात आलेली असणे, दिनांक १ ऑक्टोबर, २०२२ रोजी कंपनीकडून परिपत्रक प्रसिद्ध झाले असून शासनाच्या निकषाप्रमाणे निविदाप्रक्रिया न करता संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी मनमानी पद्धतीने संबंधित कंपनीला कंत्राट देण्यात आलेले असणे, सदर योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता काढण्यात आलेले टेंडर, नेमलेले ठेकेदार ही सर्व कारवाई करत असताना, शासन नियमाप्रमाणे कोणतेही नियम व निकष यांचे पालन करण्यात न आल्याची गंभीर बाब उघडकीस येणे, पुणे, मुंबई, औरंगाबाद तसेच राज्यातील अन्य जिल्ह्यात दिवाळी सणाच्या आधी रेशनकार्ड धारकांना आनंदाचा शिधा मिळाला नसल्याच्या आलेल्या लाखो तक्रारी, जाहीर केलेले पाच जिन्नस एकाच पिशवीतून एकाच वेळी मिळाल्याच्या घटना संपूर्ण राज्यात कोठेही न घडणे, शासनाने शिधापत्रिका धारकांना हा आनंदाचा शिधा देत असताना औरंगाबाद, नाशिक, नगर इ.अनेक जिल्ह्यात बायोमेट्रिक यंत्रणा बंद असल्याने सदर शिधा रेशनधारकांपर्यंत पोहोचविण्यात रेशन दुकानदारांना आलेले अपयश, राज्यातील लाभार्थ्यांना दिवाळी सणानिमित्त स्वस्तात अन्नधान्य मिळावे यासाठी १०० रुपये अशी आनंदाचा शिधाची किंमत शासनाने निश्चित करण्यात आलेली असताना ही आदिवासी भागातील शहापूर तालुक्यात ३०० रुपयात विक्री होत असल्याची घटना | २३ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | निदर्शनास येणे, राज्यात पैठण व इतर भागात शिधावाटपाच्या पिशवीवर राजकीय नेत्यांचे फोटो छापण्यास उशीर झाल्यामुळे दिवाळी सणाच्या दिवशीही आनंदाचा शिधा त्यांच्यापर्यंत पोहोचलेला नसल्याच्या घटना निदर्शनास येणे, सामान्य जनतेची दिवाळी गोड करण्याच्या उद्देशाने निविदा काढण्यात दाखवलेली तत्परता, सर्वसामान्य लाभार्थ्यांना आनंदशिधा मिळण्यासाठी न दाखविल्यामुळे जनतेमध्ये शासनाप्रती असंतोषाची भावना निर्माण झालेली असणे, दिवाळी सणानिमित्त किती आनंदाचा शिधा वितरीत करण्यात आला तसेच सदर विक्रीतून झालेल्या उत्पन्नाच्या लेखाशिर्षाची माहिती लोकप्रतिनिधींनी संबंधित विभागास मागूनही देण्यात आलेली नसणे, सदर प्रकरणाची चौकशी करून नियमांची पायमल्ली करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तसेच सर्व सामान्य नागरिकांची लूट करणाऱ्या दुकानदारांवर कारवाई करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| ८. | १२४ | **डॉ. मनिषा कायंदे,** सर्वश्री प्रसाद लाड, आमश्या पाडवी, नागोराव गाणार, रमेशदादा पाटील, **वि.प.स.**<br>“ राज्यात समाजकल्याण विभागामार्फत ४४१ शासकीय वसतिगृहे असून त्यात जवळपास ५० हजारांहून अधिक गरीब व गरजू विद्यार्थी शिक्षण घेत असणे, परंतु या वसतिगृहात विद्यार्थ्यांना गैरसोयी, अस्वच्छता आणि असुविधेचा अनुभव येणे, तर काही ठिकाणी नोंदवहीत नोंद असून विद्यार्थी गायब असणे, काही वसतिगृहात तर पिण्याचे पाणी तसेच ग्रंथालयाची सोय, मुलींच्या वसतिगृहात सीसीटीव्ही नसल्याचे समोर येणे, वसतिगृहात साधनसामुग्रीचा नियमित पुरवठा होऊनही काही ठिकाणी इन्व्हर्टर, गरम पाण्याची तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही, अश्या आणि अनेक सोयीसुविधांपासून विद्यार्थी वंचित असणे, सन २०२१ मध्ये ६४ कोटी रुपयांचा निधी राज्यातील सर्व शासकीय वसतिगृहाच्या सोयीसुविधांसाठी निधी देण्यात आला होता तर काही वसतिगृहाच्या दुरुस्तीकरिता साडेसात कोटीचा निधी | २३ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | देण्यात आलेला होता असे असतांनाही विद्यार्थ्यांना सुविधांपासून वंचित ठेवण्यात येणे, अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत नसणे, संगणक कक्ष, भोजन कक्ष नसणे, इमारतीतील दारे, खिडक्याच्या काचा, स्नानगृह, स्वच्छतागृह यांची असलेली दुरवस्था, उक्त विभागातर्फे सुरू असलेल्या वसतिगृहात विद्यार्थ्यांना अनेक अडचणीचा सामना करावा लागत आहे त्याचबरोबर गेल्या सहा महिन्यांपासून रखडलेला निर्वाह भत्ता, शाळा महाविद्यालये सुरू होऊनही साहित्य मिळालेले नसणे, परिणामी विद्यार्थी आर्थिक संकटात सापडणे ,निर्वाह भत्ता आणि इतर सुविधा तात्काळ न दिल्यास विद्यार्थ्यांनी आंदोलनाचा दिलेला इशारा, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून तातडीने करावयाची कार्यवाही, यास जबाबदार असणाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. ” | | |
| ९. | ४२५ | **श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.**<br>“ करमाळा तालुक्यातील सिना नदीवर सिना-कोळेगाव प्रकल्पास १९९२ साली प्रशासकीय मान्यता मिळून १९९४ साली करमाळा तालुक्यातील पूर्व भागातील मिरगव्हाण, भालेवाडी, हिवरे,आवाटी,कोळगाव, निमगाव, गौंडरे या गावातील ७३२ शेतकऱ्यांच्या घरांचे व जमिनींचे भूसंपादन करण्यात येणे, धरणग्रस्तांसंबंधी अगोदर पुनर्वसननंतर धरण हे धोरण असताना संबंधित धरणग्रस्तांना पर्यायी जमिनी अद्यापि न मिळणे, गेली २७ वर्षे हा प्रश्न प्रलंबित असणे, संबंधित गावातील धरणग्रस्तांच्या प्रश्नांवर २०१२ साली तत्कालीन पुनर्वसन मंत्री यांचे दालनात बैठक होऊन अन्यायकारक निकष लावल्याने धरणग्रस्तांना जमिनी मिळाल्या | २३ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

नसल्याचे निदर्शनास येणे, त्यानंतर तत्कालीन पुनवर्सन मंत्री महोदयांनी संबंधित शेतकऱ्यांना जमिनी देण्यासाठी दोन महिन्यात प्रस्ताव सादर करून कार्यवाही करण्याचे आदेश देणे, परंतु अद्यापही संबंधित ७३२ शेतकऱ्यांना पर्यायी जमिनीचे वाटप झालेले नसणे, यामुळे सिना-कोळेगाव प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष, याकडे प्रशासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत निर्णय घेऊन करमाळा तालुक्यातील सिना-कोळगाव धरणग्रस्तांना पर्यायी जमिनी मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०. | ३९१ | **सर्वश्री अभिजित वंजारी, अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.**<br>“ टाकळी - डोल्हारी प्रकल्पांतर्गत मौजा उदापूर, ता.नेर, जि. यवतमाळ येथील गावकऱ्यांची दिशाभूल करून, प्रकल्पग्रस्तांना विश्वासात न घेता, बनावट कागदपत्रे बनवून अवैध पद्धतीने ग्रामसभा घेऊन भांडवलदारांच्या हिताकरिता आर्थिक हेतू बोगस, अवैधपणे, बेकायदेशीरपणे राबविण्यात आलेल्या पुनर्वसन प्रक्रिया रद्द करण्याबाबतची मागणी स्थानिक नागरिकांनी शासनाकडे केलेली असणे, उक्त प्रकरणी तत्कालीन मंत्री महोदय, मदत व पुनर्वसन तसेच जलसंपदा व संबंधित विभागाचे प्रधान सचिव यांच्या उपस्थितीत बैठक होऊन ग्रामसभा वैध अथवा अवैध याबाबत जिल्हाधिकारी, यवतमाळ व मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यवतमाळ यांच्याकडून स्वयंस्पष्ट अहवाल मागविण्यात आलेला असणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यवतमाळ यांनी अहवाल शासनास सादर केला असून त्यात त्यांनी ग्रामसभा अवैध असल्याचे स्पष्ट म्हटलेले असणे, जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी सुद्धा याबाबतचा अहवाल शासनास सादर केलेला असणे, असे असताना महसूल व वन विभागाच्या दिनांक १९.१०.२०२२ च्या पत्राच्या अनुषंगाने उक्त विषयी जिल्हा नियोजन व विकास मंडळ यांचेकडून अभिप्राय प्राप्त करण्यासाठी निर्देश देणे व तातडीने दिनांक २०.१०.२०२२ रोजी | २३ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | जिल्हा नियोजनच्या बैठकीत सदर विषय मांडण्यात येणे, परंतू मागील महिन्यापासून बैठकीचे इतिवृत्त तयार केले नसल्याचे संबंधित विभागाकडून सांगण्यात येणे, त्यामुळे या प्रकरणात मोठा आर्थिक घोटाळा झाल्याचे स्थानिकांमध्ये होत असलेली चर्चा, पुनर्वसन व भुसंपादन कायद्यानुसार जिल्हा नियोजन समिती ही घटनात्मक संस्था नसून ग्रामसभेलाच सर्व अधिकार असताना हेतुपुरस्परपणे कायद्याला न जुमानता जिल्हा नियोजन कडे हा विषय देणे गैर असल्याने याची सखोल चौकशी करण्याची नितांत आवश्यकता, तसेच अहवाल सादर करूनही दोषींवर कोणत्याही प्रकारची कारवाई होत नसल्याने स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र स्वरूपाचा असंतोष व संतापाचे वातावरण, टाकळी - डोल्हारी प्रकल्पांतर्गत मौजा उदापूर, ता.नेर, जि. यवतमाळ येथील गावकऱ्यांची दिशाभूल करून, प्रकल्पग्रस्तांना विश्वासात न घेता, बनावट कागदपत्रे बनवून अवैध पद्धतीने राबविण्यात येत असलेली पुनर्वसन प्रक्रिया तातडीने रद्द करून नवीन पुनर्वसन प्रक्रिया राबविण्याबाबचे आदेश त्वरित निर्गमित करण्याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व याबाबतची शासनाची भूमिका. ” | | |
| **११.** | **२४१** | **श्री. सचिन अहिर, वि.प.स.**<br>“ दि. ८ ऑक्टोबर २०२२ रोजीच्या पहाटे ५ च्या सुमारास नाशिक ते औरंगाबाद मार्गावर मिरची हॉटेल जवळ चिंतामणी ट्रॅव्हल्सच्या एका खाजगी बसला झालेला मोठा अपघात, अपघातानंतर या बसमध्ये आग लागून १२ प्रवाशांचा झालेला होरपळून मृत्यू, या अपघातात जवळपास ३८ प्रवासी गंभीर जखमी होणे, तर काहींची प्रकृती चिंताजनक असणे, त्याच दरम्यान नाशिक येथील सप्तषृंगी गड ग्रामपंचायत टोल नाक्याच्या जवळ महाराष्ट्र राज्य | २३ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

परिवहन महामंडळच्या एस.टी.बसला शॉर्ट सर्कीटमुळे लागलेली आग, राज्यात वाढत असलेले वारंवार रस्ते अपघात याबाबत पोलीस यंत्रणा विशेषतः परिवहन विभाग गंभीर नसणे, वाहन चालक बेधडकपणे प्रवासी कोंबून प्रवाशांकडून वाढीव भाडे वसूल करणे याबाबत शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया. ”

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२. | ५० | **श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स.**<br>“ महाराष्ट्र शासनाच्या सर्व शासकीय विभागातील सरळ सेवेची भरती प्रक्रिया सन २०१९ पासून आज अखेरपर्यंत घेण्यात आलेली नसणे, तथापि, त्यासंदर्भात सरळसेवा पदभरतीबाबतची एकही जाहिरात देण्यांत आलेली नसणे, शासनाने सदर परिक्षेकरिता दिनांक १७/१२/२०२१ पर्यंत वयोमर्यादा संपणाऱ्या उमेदवारांना परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यात आलेली असणे, परंतु अद्यापपर्यंत सरळसेवा पदभरतीची जाहिरात आलेली नसल्या कारणाने उमेदवार विद्यार्थी परिक्षेस बसण्यास अपात्र होत असल्याचे निदर्शनास येणे, वास्तविकतः महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २०१९ पासून गेल्या ३ वर्षांच्या कालावधीमध्ये घेण्यात आलेल्या परिक्षांबाबत ज्या ३-४ जाहिराती प्रसिद्ध करण्यात आल्या त्यामध्ये ३० ते ४० जागा दिव्यांगाच्या सर्व संवर्गामध्ये भरण्यात आल्या असल्याचे निदर्शनास आलेले असणे, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्वसाधारण उमेदवारांसाठी दिनांक १७/१२/२०२१ च्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय घेऊन दिनांक १७/१२/२०२१ पर्यंत वय संपलेले उमेदवार यांना दिनांक ३१/१२/२०२२ पर्यंत संधी देण्यात यावी, असे परिपत्रक काढण्यांत आलेले असणे, परंतु शासनाने दिव्यांग उमेदवारांच्या बाबतीत वेगळा निर्णय घेतला असल्याचे निदर्शनास येणे, परिणामी, शासनाने दिनांक १७/१२/२०२१ च्या परिपत्रकामध्ये शुद्धीपत्रक काढून दिनांक ३१/१२/२०२२ पर्यंत विहित वयोमर्यादा संपणाऱ्या उमेदवारांना दिनांक ३१/१२/२०२३ पर्यंत अर्ज करण्याची अनुमती देण्यात यावी म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या भरतीमध्ये त्यांना संधी मिळेल व त्यांच्यावर अन्याय | २७ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | होणार नाही अशी सर्वसाधारण उमेदवारांनी शासनाकडे मागणी करण्यांत येणे, तथापि, अद्यापही शासन स्तरावर कार्यवाही न होणे, त्यामुळे त्याबाबत आंदोलन करण्याची या उमेदवारांवर आलेली पाळी, सदर मागणी प्रकरणी शासनाने कार्यवाही करून सर्वसाधारण (खुल्या) वर्गांतील उमेदवारांना न्याय देणे आवश्यक असणे व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया.'' | | |
| **१३.** | **२४** | **डॉ. वजाहत मिर्झा,** सर्वश्री अभिजित वंजारी, राजेश राठोड, अशोक ऊर्फ भाई जगताप, विक्रम काळे, सतिश चव्हाण, नागोराव गाणार, प्रविण दरेकर, प्रवीण दटके, **वि.प.स.**<br>" राज्यातील इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना ज्यात प्रामुख्याने मुस्लिम, बौद्ध, जैन, पारसी, शिख विद्यार्थ्यांचा समावेश असणे, अशांना प्री-मॅट्रिक स्कॉलरशिप योजनेतून केंद्र सरकारमार्फत दरवर्षी एक हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जात असणे, यावर्षी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर अर्ज भरून घेणे व पडताळणी करून केंद्राकडे पाठविण्याची जबाबदारी शिक्षण संचालक (योजना) कार्यालयाकडे दिली जाणे, सुरुवातीला अत्यल्प अर्ज भरले गेल्याने संचालनालयाने ३१ ऑक्टोबरपर्यंत मुदत वाढवून देणे, त्यानंतर पुन्हा ५ नोव्हेंबरपर्यंत मुदत वाढविण्यात येणे, मात्र आता विद्यार्थ्यांनी भरलेले अर्ज शाळा स्तरावर प्रमाणित झाल्यानंतर नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर अचानक अर्ज रद्द करण्याचे परिपत्रक जारी करणे, या परिपत्रकानुसार पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांना आर.टी.ई. नुसार मोफत शिक्षणाचा लाभ दिला जात असल्याने त्यांना प्री-मॅट्रिक शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाणार नसणे, केवळ नववी आणि दहावीतील विद्यार्थ्यांचेच अर्ज प्रमाणित करणे, त्यामुळे राज्यातील पहिली ते आठवीचे अल्पसंख्याक समाजातील राज्यातील सुमारे १० लाख | २७ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | विद्यार्थी शिष्यवृत्तीला मुकणे, परिणामी अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थी व पालक वर्गात निर्माण झालेली तीव्र असंतोषाची भावना, अल्पसंख्यांक समाजाकडून केंद्र सरकारच्या या निर्णयाविरोधात राज्यभर निदर्शने करण्यात येते, सदर शिष्यवृत्ती योजना पूर्ववत करण्याची सातत्याने मागणी अल्पसंख्यांक समाजाकडून होत असणे,केंद्र सरकारचा हा निर्णय अन्यायकारक असल्याने पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती पूर्ववत सुरू ठेवावी व तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन म्हणून शिष्यवृत्ती रक्कमही वाढविण्यासाठी केंद्र शासनाकडे राज्य सरकारने मागणी करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **१४.** | **४९२** | **श्री. किशोर दराडे, वि.प.स.**<br>“ नाशिक जिल्ह्यातील येवला मर्चंट को. ऑप. बँकेचे दि.१३ नोव्हेंबर, २०२२ रोजी मतदान पार पडणे, सदरील निवडणुकीमध्ये प्रगती पॅनल व समृद्धी हे परस्पर विरोधी पॅनल असणे, सदर मतदान प्रक्रीया सुरू असताना विद्यमान नगरसेवक व माजी नगराध्यक्ष व नगरसेविका हे प्रगती पॅनलचे नेतृत्व करीत असणे, दि.१३ नोव्हेंबर, २०२२ रोजी येवला शहरातील येवला मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक या बँकेच्या मतदान केंद्रावरती पॅनल प्रमुख व इतर कार्यकर्ते उभे राहिले असता येवला शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक व त्यांचे सहकारी यांनी प्रगती पॅनल प्रमुख व इतरांना धक्काबुक्की करत शिवीगाळ करणे, तसेच त्यांना मारहाण करीत जबरदस्तीने मतदान केंद्रातून बाहेर काढून त्यांना मतदानापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आलेला असणे, सदर मतदान केंद्रावर सन्माननीय सदस्य स्वतः उभे असल्याने याबाबत पोलीस निरीक्षक यांनी अडवले असता त्यांनी धक्काबुक्की करण्याचा प्रयत्न करणे, तसेच एकेरी भाषा वापरून सदर ठिकाणाहून निघून जाण्याबाबत दम देणे, त्याच प्रमाणे फायरिंग केली जाईल अशी धमकीही दिलेली असणे, पोलीस निरीक्षक | २७ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | यांच्याकडे सदर निवडणुकीत विरोधी पक्षाकडून मोठ्या प्रमाणात खुले आम पैसे वाटप करण्यात येत असल्याच्या तक्रारी करूनही त्यावर दुर्लक्ष करून उलट समृद्धी पॅनलला पाठिशी घालत प्रगती पॅनल प्रमुख व इतर पदाधिकारी यांना मारहाण करण्यात येणे, तसेच लोकप्रतिनिधी यांचाही पोलीस निरीक्षकांनी अवमान केल्याने येवला शहरात पोलीस निरीक्षकांच्या विषयी मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झालेला असणे, सदर प्रकरणी पोलीस महासंचालक, मुंबई यांच्याकडेही दिनांक १६ नोव्हेंबर २०२२ रोजी तक्रार केलेली असूनही पोलीस महासंचालक यांच्याकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसणे, ज्या शहरात लोकप्रतिनिधीच जर अशा अधिकाऱ्यांपासून सुरक्षित नसतील तर सामान्य जनतेला हे कसे संरक्षण देणार, अशी भावना जनमानसात पसरणे, पोलीस निरीक्षकांनी एका लोकप्रतिनिधीचा अवमान केलेला असल्यामुळे त्यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही. ” | | |
| **१५.** | **२०२** | **प्रा. राम शिंदे, वि.प.स.**<br>“ कर्जत तालुक्यात (जि.अहमदनगर) अनेक अनधिकृत खडीक्रश्चर असून त्यामुळे शासनाच्या करोडो रुपयांच्या महसूलाची हानी होण्याबरोबरच पर्यावरणाचा ऱ्हास होत असणे, सदर प्रकरणी Wild Life Protection Act, १९७२ चेही उल्लंघन होत असल्यामुळे तहसिलदार, कर्जत यांनी चौकशी करून जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना तालुक्यातील अनधिकृत खडीक्रश्चरबाबत व त्यांच्यावर लावलेल्या दंडाबाबतचा अहवाल दिलेला असणे, उक्त प्रकरणी तालुक्यामध्ये एकही अधिकृत खडीक्रश्चर नसताना महसूल अधिकारी यांच्याशी | २७ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

संगनमत करून रात्री अपरात्री मोठ्या प्रमाणावर अनधिकृत उत्खनन केले जात असल्याचे निदर्शनास येणे, कर्जत तालुक्यातील अनधिकृत खडीक्रश्चर प्रकरणाची मा. निवृत्त न्यायाधीश, उच्च न्यायालय यांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरण अधिकारी व खनिजकर्म अधिकारी यांच्यासह त्रिसदस्यीय उच्च समितीमार्फत चौकशी करून दोषींवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३१.१०.२०२२ रोजी बंदरे व खनिकर्म मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे केली असणे, सदर मागणीनुसार चौकशी करून दोषींवर तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाची प्रतिक्रिया."

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६. | ७० | **सर्वश्री विक्रम काळे,** सतिश चव्हाण, नागोराव गाणार, प्रविण दरेकर, प्रसाद लाड, प्रवीण दटके, श्रीमती उमा खापरे, ॲड. निरंजन डावखरे, डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री राजेश राठोड, अभिजित वंजारी, **वि.प.स.** | २७ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

"राज्यातील अशासकीय अनुदानित शाळेतील दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पुर्वी सेवेत आलेल्या परंतु, ती शाळा किंवा वर्गतुकडी विनाअनुदान, अंशतः अनुदान किंवा टप्पा अनुदानावर असणे व दि. १ नोव्हेंबर, २००५ नंतर ती शाळा किंवा वर्गतुकडी १००% अनुदानावर येणे, या शिक्षकांची जुन्या पेन्शन योजनेची खाती उघडणे, त्या खात्यावर जुन्या पेन्शन योजनेप्रमाणे वेतनातून जी.पी.एफ हप्त्याची रक्कम कपात होणे, यामधील सेवानिवृत्त झालेल्या काही शिक्षकांना जुन्या पेन्शन योजनेचा लाभ मिळणे, त्यानंतर काही शिक्षकांची तोंडी आदेशाने जी.पी.एफ कपात बंद करणे, परंतु जुन्या पेन्शनची खाती सुरू ठेवणे, दि. १ नोव्हेंबर, २००५ पासून नवीन पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय शासनाने घेणे असे असतांना नियमानूसार दि. १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत आलेल्या शिक्षकांची शाळा किंवा वर्ग तुकडी दि. १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी १००% अनुदानावर नाही म्हणून त्यांना जुनी पेन्शन योजना लागू न करणे, हे अन्यायकारक असणे, यासाठी शिक्षक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी

## विवरण क्रमांक २१–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | शासनाकडे पाठपूरावा करणे, शासनाने यासंबंधीची काढलेली दि. १० जुलै,२०२० ची अधिसूचना रद्द करणे, शासनाने यासाठी सम्म्यक अभ्यास समितीचे गठन करणे, त्याचा अहवाल शासनास प्राप्त होणे, परंतु तरीही आजपावेतो शासनाकडून सकारात्मक निर्णय न होणे, पेन्शन हा विषय शिक्षकांच्या जीवनाशी व कुटुंबाशी निगडीत असल्यामुळे शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| १७. | ४३६ | **अॅड. निरंजन डावखरे, वि.प.स.** - “ ठाणे शहरातील विविध भागांना जोडणारी रिंग मेट्रो प्रस्तावित असणे, सद्यस्थितीत अस्तित्वात असणाऱ्या मंजूर विकास आराखडा मधील एच. सी. एम. टी. आर. (HCMTR) म्हणजेच हाय कॅपॅसिटी मास ट्रान्झिट रेल (HIGH CAPACITY MASS TRANSIT RAIL) याची आखणी व नव्याने प्रस्तावित एम. आर.टी.एस. (MRTS) म्हणजेच मास रॅपिडट्रान्झिट सिस्टीम (MASS RAPID TRANSIT SYSTEM) (THANE METRO), यांचा तुलनात्मक अभ्यास केला असता त्यामध्ये विविध त्रुटी असणे, उत्तरेला घोडबंदर रस्त्याच्या दुतर्फा वाढलेल्या शहराला जोडण्याकरिता MRTS चा विस्तार कावेसर पर्यंत वाढविला असणे, ठाणे पूर्वेचा भाग संपूर्णपणे MRTS च्या आखणीतून वगळण्यात आला असणे, सिडको बस स्टॉप ते पूर्व द्रुतगतीमहामार्ग यादरम्यान, MRTS ची आखणी नव्याने करण्यात आली असून, MRTS चा हा भागग संपूर्णतः भूमिगत असणार असणे, या ठळक मुद्द्यांपैकी उत्तरेला घोडबंदर रस्त्याच्या दुतर्फा वाढलेल्या शहराला जोडण्याकरिता MRTS चा केलेला विस्तार हा नक्कीच स्वागतार्ह असणे, मात्र नव्याने विकसित होणाऱ्या | २७ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

भागांना जोडणारी मार्गिका तयार करत असताना ठाणे पूर्व सारख्या अत्यंत जुन्या भागाला या मार्गिकेतून वगळणे, सिडको बस स्टॉप ते पूर्व द्रुतगती महामार्ग दरम्यान MRTS च्या नव्याने केलेल्या आखणीनुसार सदर मार्गिका, ठाणे पश्चिमेकडील स्टेशन लगतच्या अत्यंत दाट लोकवस्ती असलेल्या भागातील सुमारे ५० इमारतींना बाधित करत भूमिगत पद्धतीने प्रस्तावित असणे, सर्वांगीण विचार करता सदर प्रस्तावित भूमिगत मार्गिका अत्यंत अव्यवहार्य असणे, भूमिगत मेट्रोचा खर्च हा उन्नत मेट्रोच्या खर्चाच्या सुमारे चार पट जास्त असतो व त्यामुळे वाढीव खर्चाचा बोजा सदर प्रकल्पावर येत असणे, त्याचबरोबर सदर प्रस्तावित भूमिगत मार्गाचा अभ्यास केला असता असे निदर्शनास येते की, सदर मार्ग अस्तित्वातील रस्त्याच्या खालून न जाता, अस्तित्वातील सुमारे चाळीस वर्ष जुन्या, जवळपास ५० इमारतींच्या खालून जात असणे, या बाधित, जुन्या आणि मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास, हा देखील या भूमिगत मेट्रोच्या प्रस्तावित मार्गीकेमुळे अडचणीत आला असणे, भूमिगत मेट्रो मार्गामुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नांवर सखोल अभ्यास करण्यासाठी व त्यातून मार्ग काढण्यासाठी लोकप्रतिनिधींना सोबत घेऊन समिती तयार करणे आवश्यक असणे, तसेच मेट्रोचे काम कुठल्याही परिस्थितीत थांबू न देण्यासाठी लवकरात लवकर उपरोक्त प्रश्नांवर तोडगा काढून नागरिकांना देखील दिलासा देण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही. ”

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८. | १४१ | **सर्वश्री महादेव जानकर,** नागोराव गाणार, प्रसाद लाड, **वि.प.स.**<br>“ शासनाने सहायक प्राध्यापक पदभरती संदर्भात दिनांक १२ नोव्हेंबर, २०२१ व एप्रिल, २०२२ च्या शासन निर्णयानुसार २०८८ पदांच्या भरतीला त्वरित परवानगी देण्याबाबत व २०२२ पर्यतची सर्व रिक्त पदे १०० टक्के भरण्यात यावी, तसेच तासिक तत्वावरील मानधन वाढीसंदर्भात, व दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ च्या आकृतीबंधाला अंतिम मान्यता देऊन १०० | २७ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | टक्के प्राध्यापक पदभरती करण्याबाबतच्या प्रमुख मागण्या अद्यापी प्रलंबित असल्याचे नुकतेच माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये उघडकीस येणे, राज्यात गेल्या १० वर्षांमध्ये प्राध्यापक पदभरती नियमित व पुर्ण क्षमतेने झालेली नसल्याचे उघडकीस येणे, ७५ टक्के भरतीला परवानगी असतानाही नियमित भरती केलेली नसणे, सन २०१४ पासून आजपर्यंत प्राध्यापक पदभरती सातत्याने कपात करण्यात येणे, सन २०१७ पासून महाराष्ट्र नवप्राध्यापक संघटनेने महाराष्ट्रातील उच्चशिक्षित तरुण **NET, SET, PHD** पात्रता धारकांना न्याय मिळावा, विद्यार्थ्यांना गुणवत्तापुर्ण शिक्षण मिळावे याकरिता रस्त्यावर उतरुन आंदोलने केलेली असणे, आतापर्यंत केवळ २ ते ३ हजार प्राध्यापकांची भरती शासनाने केलेली असणे, अद्याप हजारो जागा रिक्त असणे, दिनांक २५ मे, २०१७ ला आकृतीबंधाच्या नावाखाली प्राध्यापक पदभरतीवर बंदी घालण्यात येणे, उच्च शिक्षणातील अशासकीय, शासकीय, अकृषी विद्यापीठातील आकृतीबंध मंजुरीसाठी भरती बंद केली त्यानंतर दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ चा आकृतीबंधानुसार दिनांक ३ नोव्हेंबर, २०१८ साली दिनांक १ ऑक्टोंबर, २०१७ च्या आकृतीबंधाला उच्च स्तरीय सचिव समितीने तत्वता मान्यता देण्यात येणे, त्यानुसार अध्यापक संवर्गातील (सहायक प्राध्यापक) एकूण रिक्त पदांच्या ४० टक्केनुसार ३५८० पदांच्या भरतीला मान्यता देण्यात येणे, व या पदांची भरती सुरू होती परंतु कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर दिनांक ४ एप्रिल, २०२० रोजी या भरतीला देण्यात आलेली स्थगिती, परंतु कोव्हिड-१९ संपल्यानंतरही भरती सुरू होत नसल्याने दिनांक १९ एप्रिल, ते १६ सप्टेंबर, २०२१ दरम्यान नवप्राध्यापक संघटनेच्या वतीने शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे यांच्या कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन | | |

करण्यात येणे, सदर आंदोलनादरम्यान तत्कालिन उच्च शिक्षणमंत्री यांनी दोन महिन्यांत प्राध्यापक पदभरती सुरू करण्याचे दिलेले आश्वासन, कोव्हिड-१९ मध्ये बंद पडलेली भरती सुरू करण्यांसदर्भात दिनांक ३ नोव्हेंबर, २०१८ ला २०८८ उर्वरित पदांच्या भरतीला परवानगी देऊन शासन निर्णय पारित करण्यात येऊन पाच वर्षाहून अधिक कालावधी उलटूनही अद्याप पदे भरण्यात आलेली नसणे, त्यामुळे विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुसार, प्राध्यापकांच्या प्रमुख मागण्यांसदर्भात महाराष्ट्र नव प्राध्यापक संघटनेने अनेक आंदोलन व उपोषणे, करूनही याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने सहा.प्राध्यापक पदभरती संदर्भात दिनांक १२ नोव्हेंबर, २०२१ व एप्रिल, २०२२ च्या शासन निर्णयानुसार २०८८ पदांच्या भरतीच्या त्वरित देण्याबाबत व २०२२ पर्यतची सर्व रिक्त पदे १०० टक्के भरण्यात यावी, तसेच तासिक तत्वावर मानधन वाढीसंदर्भात, व १ ऑक्टोबर, २०१७ च्या आकृतीबंधाला अंतिम मान्यता देऊन १०० टक्के प्राध्यापक पदभरती करण्याबाबत सत्वर निर्णय घेऊन प्राध्यापकांच्या प्रमुख मागण्या मान्य करण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रीया व भूमिका. ”

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **१९.** | **३००** | **सर्वश्री प्रवीण दटके,** चंद्रशेखर बावनकुळे, नागोराव गाणार, **वि.प.स.**<br>“ हाफकीनच्या कार्यप्रणालीमुळे रुग्णालयांना अडचणींचा सामना करावा लागत असणे, दैनंदिन सर्जिकल साहित्य मागणीनंतर पुरवठ्यामध्ये साधारण वर्षभराचा फरक वाढल्याने तुटवडा होऊन रुग्णसेवेत अडचणी येत असणे , हाफकीनची खरेदी प्रणाली अत्यंत वेळ खाऊ असून संचालनालय येथे करण्यात येणारी मागणी ते डीएमई मार्फत पडताळणी होऊन प्रशासकीय मान्यतेसाठी पाठवणे, नंतर हाफकिन महामंडळाद्वारे निविदा प्रक्रिया राबवणे अशा किचकट प्रक्रियेमुळे प्रत्यक्ष पुरवठ्यात विलंब होत असणे, संस्था स्तरावर वस्तू व पुरवठा लेखाशीर्ष २९ मधून प्राप्त निधीतून ९०% निधी हाफकीन महामंडळाकडे वर्ग झाल्यानंतर | २७ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | ८०% साहित्य प्राप्त होणे अपेक्षित असताना उर्वरित १०% टक्के निधीतून औषधी तसेच सर्जिकल साहित्य प्राप्त होण्यास अडचणी येत असणे, रुग्णांची गैरसोय होत असल्यास निदर्शनास येत असणे, याबाबत लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे तक्रार केलेली असणे, सदर मंडळाचे बळकटीकरण करणे, मनुष्यबळाची अडचण दूर करून ऑनलाइन प्रणाली गतिशील करणे, वस्तू पुरवठा अबाधित राहण्यासाठी अंदाजपत्रक रुग्णसंख्या व प्रत्यक्ष खाटाच्या संख्येवर ठरवणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाय योजना. ” | | |
| **२०.** | **५३३** | **सर्वश्री प्रविण दरेकर,** प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री प्रवीण दटके, गोपिचंद पडळकर, रमेशदादा पाटील, सुरेश धस, निलय नाईक, नागोराव गाणार, **वि.प.स.** “ मुंबई घाटकोपर येथील रेल्वे पोलीस वसाहतीच्या सीटीएस क्रमांक १९४A/६ व १९४A/७ या आरक्षित भुखंडावर गृह खात्याची व महसूल खात्याची परवानगी न घेता अनधिकृत पेट्रोलपंप उभारला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारात निदर्शनास येणे, सदर मौजे घाटकोपर येथील भुखंड गृह विभाग, रेल्वे पोलीस वसाहत व रेल्वे हेडक्वाटर्स यांच्या वापरासाठी मे.क.सो यांचेकडील ऑर्डर नं. C/LND/SR-V/७५५, दिनांक २१/०२/१९६४ नुसार पोलीस वसाहतीसाठी देण्यात येणे, सदर जागेचा अन्य कामासाठी उपयोग करावयाचा नाही, जर गृह विभागाला सदर जागा नको असेल तर ती महसूल खात्याकडे परत देण्याची आहे, असे स्पष्ट आदेश देण्यात येणे, या संदर्भात विविध संघटनांनी तलाठी, घाटकोपर यांच्या अहवालानुसार अभिलेख अहवाल तपासले असता सदर पेट्रोल पंपासाठी परवानगी दिल्याची कागदपत्रे राज्य शासनाकडील/ | २७ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

जिल्हाधिकारी यांच्याकडील ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आल्याची नोंद नसल्याची बाब आढळणे, सदर जागेवर भारत पेट्रोलियम यांच्या पंपाचे काम पूर्ण होऊन पंप विनापरवाना चालू असणे, याबाबतीत सदर आरक्षित भुखंडावर बृहन्मुंबई महानगर पालिका विकास नियंत्रण नियमावली २०३४ नुसार राखीव जागेसंदर्भातील आरक्षण बदलण्यासाठी महापालिका आयुक्त यांची परवानगी तसेच महसूल खाते व गृह खात्याची ना-हरकत प्रमाणपत्र न सादर करता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव (विशेष) यांनी बांधकामाच्या परवानग्या कशाच्या आधारावर दिल्या हे अनाकलनीय असणे, त्यामुळे मुंबई घाटकोपर येथील रेल्वे पोलीस वसाहतीच्या सीटीएस क्रमांक १९४A/६ व १९४A/७ या आरक्षित भुखंडावर गृह खात्याची व महसूल खात्याची परवानगी न घेता अनधिकृत पेट्रोलपंप उभारणे, यावर शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. ”

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **२१.** | **४४२** | **श्री. कपिल पाटील, वि.प.स.**<br>“ महापालिकेच्या मालमत्ता करातून राज्यातील सर्व खाजगी शिक्षण संस्थांना अनुदानित, विनाअनुदानित असा भेदभाव न करता वगळण्याची आवश्यकता असणे, एसआरए अंतर्गत शाळांच्या पुनर्विकासाठी शासनाने एफएसआय संदर्भात केलेली तरतूद मुंबईच्या नवीन विकास नामावलीत पुनर्स्थापित करण्याची आवश्यकता असणे, महापालिकेच्या शालेय इमारतीमध्ये खाजगी शाळांच्या वर्गाकरिता भाडेतत्वावर घेतलेल्या वर्गखोल्यांसाठी सवलतीच्या दरात वार्षिक भाडे आकारण्याची आवश्यकता असणे, महापालिकेच्या वर्गखोल्यात भरणाऱ्या रात्रशाळांना भाडे पूर्णपणे माफ करण्याची गरज असणे, मुंबईतील खाजगी प्राथमिक अनुदानित शाळेतील शिक्षकांना एमईपीएस अथवा ग्रँटीनियन कोड लागू करून मुंबई महानगरपालिकेतील मान्यताप्राप्त १०४ खाजगी प्राथमिक शाळांना १०० टक्के अनुदान देण्याची आवश्यकता असणे, मुंबई महापालिका व खाजगी शिक्षण संस्था संचलित प्राथमिक शाळांना सातवा वेतन | २७ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | आयोग लागू करणे, सन २०२२ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात लक्षवेधी सूचनेवर दिलेल्या आश्वासनांची पूर्तता न करणे, महापालिकेत १० वर्षे पूर्ण करणाऱ्या लिपीक व लेखा परीक्षकीय कामगारांना विनाअट कालबद्ध रिक्त पदावर नियमित पदोन्नती देणे, मुंबई महापालिकेतील कामगार, कर्मचारी, अधिकाऱ्यांना आणि त्याच्या कुटुंबियांना रु. १० लाख संरक्षण असलेली वैद्यकीय गटविमा योजना लागू करणे, महापालिकेतील विविध संवर्गातील ४७ हजार रिक्त पदे भरण्याची गरज, तसेच इंडियन कौन्सिल अथवा इंडियन मेडिकल कौन्सिलने प्रस्तूत केलेल्या सर्व आस्थापनेवर परिचारिकांची पदे निर्माण करून रिक्त पदे भरणे, सफाई खाते, मलनिःसरण खाते, बाजारखाते व रुग्णालयातील कामगार मानवी मलमूत्र व इतर घाणीशी संबंधित कामकाज करत असल्याने त्यांच्या वारसांना शैक्षणिक अर्हतेमुळे पालिकेत नोकरी आणि मोफत हक्काची घरे देण्याची आवश्यकता असणे, यामुळे महानगरपालिकेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सफाई कामगार, कर्मचारी आणि अधिकारी यांच्यामध्ये पसरलेला प्रचंड असंतोष आणि संताप याबाबत शासनाची भूमिका आणि करावयाची कार्यवाही. ” | | |
| **२२.** | **५२९** | **डॉ. सुधीर तांबे,** सर्वश्री राजेश राठोड, अभिजित वंजारी, जयंत आसगावकर, अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ. वजाहत मिर्झा, **वि.प.स.**<br>“ राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना डीसीपीएस योजना लागू असून नगरपालिका संचालित माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना डीसीपीएस योजना लागू नसल्यामुळे निवृत्तीनंतर शासनाचे लाभ व विमा यापासून सदरचे | २७ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

नगरपालिका शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वंचित राहणार असून शासनाचा कोणताही लाभ त्यांना मिळणार नसणे तसेच, नाशिक जिल्ह्यातील मालेगाव महानगरपालिका शिक्षण मंडळाचे सेवानिवृत्त कर्मचारी कुटुंब सेवानिवृत्त वेतनधारकांचे ७ व्या वेतन आयोगाच्या फरकाची शासनाच्या हिस्स्याची ५० टक्के रक्कम पहिला, दुसरा, तिसरा हप्ता तसेच मागील दोन वर्षाचे महागाई भत्त्याचे सर्व फरक उत्पन्नाची रक्कम अद्यापही शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांच्या कार्यालयाकडून मालेगाव महानगरपालिका शिक्षण मंडळ यांना प्राप्त झालेली नसल्यामुळे सेवानिवृत्त सर्व शिक्षकांना निवृत्तीवेतनाच्या रकमेपासून वंचित राहावे लागल्यामुळे त्यांच्यावर आलेली उपासमारीची पाळी त्यामुळे त्यांच्यात पसरलेले तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत दोन्ही विषयांबाबत चौकशी करून नगरपालिका संचलित शाळांमध्ये शिक्षक व शिक्षक पत्र कर्मचारी योजना लागू करण्याबाबत व महानगरपालिकेतील सेवानिवृत्त कर्मचारी व कुटुंब सेवानिवृत्तत वेतनधारकांचे निवृत्तीवेतनाचे कमी मिळालेले अनुदान व ऑक्टोबर २०२२ पासून पेन्शन तातडीने मिळणेबाबत करावयाची कार्यवाही, याबाबत राज्य शासनाचे प्रतिक्रिया.”

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २३. | ४९३ | **सर्वश्री. अमोल मिटकरी,** विक्रम काळे, शशिकांत शिंदे, सतिश चव्हाण, अंबादास दानवे, **वि.प.स.**<br>“ सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर नगरपरिषदेने प्रारूप विकास आराखडा (कॉरिडॉर) प्रकल्प तयार केला असून त्यास शासनाने सन २०१२ मध्ये मंजुरी दिलेली असणे, या आराखड्यात पंढरपूर येथील अनेक भूखंड विविध प्रयोजनासाठी आरक्षित ठेवण्यात आले असून, अनेक रस्त्यांच्या रुंदीकरणाचे तसेच मंदिरापाशी यायला मोठे दोन रस्ते असताना चौफाळा व महाद्वार घाट यांचे नियंत्रण करणे अवघड असतांना अजून मंदिरापाशी यायला दोन मोठे रस्ते करण्याचा प्लॅन करत असल्याने सर्व गर्दी एकाच ठिकाणी एक झाल्यावर गोंधळ होऊन | २७ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

**विवरण क्रमांक २१–**पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | नियंत्रण करणे कठीण होण्याची भिती व्यक्त होत असणे, नवीन आराखड्यात सर्व उपदेव मंदिर, काळभैरव, नवग्रह मंदिर, खंडोबा मंदिर, रेणूका माता मंदिर, मल्लिकार्जुन महोदव मंदिर, अकरा रुद्र मारुती मंदिर, संत नामदेवांचे वास्तव्य ठिकाण, संत तुकोबारायांच्या वंशज यांचे घर, काल्याचा वाडा, ताकपिठ विठोबा मंदिर, अनेक परंपरांगत मठ, संत महात्मे राहून गेलेली घरे ही ऐतिहासिक धरोधर असलेल्या वस्तू पुरातत्व विभागाकडून दुर्लक्ष करून पाडण्याचा निर्णय होणे, मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांचा ड्रीम प्रोजेक्ट असल्याने त्यांच्या दबावामुळे अधिकारी व प्रशासकीय यंत्रणेकडून दुर्लक्ष होणे, प्रस्तावित कॉरिडॉरमध्ये अनेक सुविधा प्रस्तावित केलेला असणे, या सगळ्या सुविधा सध्या मंदिरात असताना कॉरिडॉर उभारण्याची आवश्यकता नसल्याच्या भावना नागरिकांकडून व्यक्त होत असणे, कॉरिडॉर ही योजना रद्द करण्याबाबत तेथील नागरिकांची होत असलेली मागणी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **२४.** | **२०८** | **श्री. नरेंद्र दराडे, वि.प.स.**<br>“ मौजे राजापूर, ता.येवला, जि.नाशिक येथील युवकांनी गावातील चौकामध्ये महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा दिनांक २१/११/२०२० रोजी बसविणे, छत्रपती शिवाजी महाराज संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत असून सर्वधर्मियांचे श्रद्धास्थान असल्याने गावातील युवकांनी महाराजांप्रती आदर व्यक्त करण्याच्याहेतूने गावातील चौकात पुतळा स्थापन करणे, परंतू गावातील काही युवकांवर परवानगी न घेता पुतळा स्थापन केल्यामुळे येवला पोलीस स्टेशनमध्ये भादंवी क, १४३, १४९, ४४७ सह महाराष्ट्र पुतळ्यांच्या | २७ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

विटंबनेस अधिनियम, १९९७ चे कलम ११ प्रमाणे मुंबई पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) चे उल्लंघन १३५ प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात येणे, राज्याचे माजी मुख्यमंत्री महोदयांनी सदरील गुन्हे मागे घेण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात येणे, तथापि सदर गुन्हे मागे घेण्यात आलेले नसणे, तसेच विद्यमान मुख्यमंत्री महोदयांनीही येवला येथे दिनांक ३०/०७/२०२२ रोजी दौऱ्यावर असतांना सदर गुन्हे मागे घेण्याबाबतची घोषणा केलेली असणे, महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा गावात बसविणाऱ्या युवकांवरील गुन्हे तात्काळ मागे घेण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया.''

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २५. | १५९ | **सर्वश्री अभिजित वंजारी,** राजेश राठोड, डॉ. वजाहत मिर्झा, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, **वि.प.स.**<br>'' राज्यातील काही राईस मिलकडून मानवी खाण्यास अयोग्य असलेल्या तांदळाचा पुरवठा करून शासनाचे करोडो रुपयांचे नुकसान करण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरू असून यामध्ये प्रामुख्याने गडचिरोली जिल्ह्यातील मिलधारकाकडून अशाप्रकारचा घोटाळा सातत्याने एक वर्षापासून सुरू असल्याचे निदर्शनास येणे, गडचिरोली जिल्ह्यातील मेसर्स देवीकमल राईस मिल, वडसा, देसाईगंज या गिरणीधारकाकडून जमा केलेला तांदूळ (लॉट नं. टीडीसी गडचिरोली/४) माहे मे, २०२२ च्या दरम्यान केंद्रशासनाच्या गुणनियंत्रण पथकाद्वारे दौरा कार्यक्रम असतांना शासकीय अधिकाऱ्यांनी हा लॉट जप्त करून पंचनामा करून त्याचे नमुने तपासले असता मनुष्याकरिता खाण्यास अयोग्य असल्याचे आढळून येणे, केंद्रशासनाच्या पथकाकडून बेस्ट गोदाम टीडीसी, आरमोरी येथील तांदळाच्या तपासणीचा अहवाल जिल्हाधिकारी (पुरवठा शाखा) गडचिरोली यांच्याकडे मानवी खाण्यास अयोग्य असल्याचा अभिप्राय आला असून अशा गिरणी धारकांवर जीवनावश्यक कायदा १९८० / १९५५(कलम ३ (i) व त्यामुळे सुधारणा, २०२० यानुसार काळ्या यादीमध्ये टाकणे आवश्यक असूनन प्रत्येक | २७ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | जिल्ह्यातील भात भरडाईकरिता अभिकर्ता संस्था यांच्याद्वारे आधारभूत खरेदी योजना अंतर्गत खरेदी झालेल्या धानाच्या भरडाईकरिता ज्या-ज्या राईस मिल जबाबदार असणे, त्यांच्यावर केवळ तीन वर्षाकरिता काळ्या यादीमध्ये नांव टाकून शिक्षा देणे पुरेसे नसून राज्य शासनाच्या योजनेचा अपहार केल्याप्रकरणी अशा प्रकारचा गैरव्यवहार करणाऱ्या सर्व राईस मिल मालकांच्या विरोधात फौजदारी गुन्हा दाखल करून त्यांच्यावर कठोर स्वरूपाची कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| **२६.** | **५५८** | **श्री. श्रीकांत भारतीय,** प्रा. राम शिंदे, **वि.प.स.**<br>“ अठरा वर्षावरील अनाथांचे कल्याण, पुनर्वसन व त्यांच्या विरोधी होणारे अत्याचार हा विषयय महाराष्ट्र शासनाचा कोणत्याही विभागाच्या अंतर्गत न येणे, १८ वर्षावरील अनाथांच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाचा स्वतंत्र विभाग स्थापन करण्याची तसेच अनाथ कल्याण महामंडळ स्थापन करण्याची आवश्यकता असणे, दिनांक ११/२/२०२० व २१/१०/२०२० रोजी महिला बाल विकास विभाग अंतर्गत अनाथांच्या कल्याणासाठी प्रलंबित विविध मागण्यासंबंधी बैठक आयोजित होणे, या बैठकीत अनाथ मुले व मुली कल्याणासाठी खालील मागण्या जसे की अनाथ प्रमाणपत्र पडताळणीसाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करावी, अठरा वर्षानंतरच्या अनाथ मुलांच्या पुनर्वसनासाठी विशेष विभाग स्थापन करावा, अनाथ विकास महामंडळाची स्थापना करावी, प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी १८ वर्षानंतरच्या उच्च शिक्षण घेणाऱ्या अनाथ मुलांसाठी स्वतंत्र वसतिगृहाची आवश्यकता, अनाथ मुलांना शालेय महाविद्यालयीन शिक्षणामध्ये शिक्षण मोफत द्यावे, शासनाच्या सर्व कल्याणकारी योजनांमध्ये अनाथांसाठी एक टक्का | २७ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | आरक्षण राखीव ठेवावा, अनाथ मुलांना शहर विकास आराखड्यामध्ये दिव्यांगांच्या धरतीवर भूखंड राखीव ठेवण्यात यावा, राज्य लोकसेवा आयोग व शासनामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षेमध्ये खेळाडू व दिव्यांग यांना लागू असलेल्या पर्सेंटाईल गुण पद्धती अनाथांना देखील लागू करण्यात यावी या व इतर मागण्या सादर करण्यात येणे, सद्यस्थितीमध्ये अनाथांना केवळ शिक्षण व नोकरी यामध्ये आरक्षण लागू असून सदर आरक्षण शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये लागू करण्यात येण्याची आवश्यकता असणे, सद्यस्थितीत अनाथांसाठी उपलब्ध असणाऱ्या आरक्षण पद्धतीत सुधारणा करणे, शासनाच्या विशेष सहाय्य योजनेअंतर्गत १८ वरील सर्व अनाथांना लाभ देण्यासाठी शासनाने विशेष शिबिर आयोजित करण्याची आवश्यकता असणे याबद्दल शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **२७.** | ५४ | **सर्वश्री सुनिल शिंदे,** विलास पोतनीस, **वि.प.स.**<br>“ बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून सन २०२१-२२ या वर्षात केवळ २४ टक्के विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली असून तब्बल ७६ टक्के विद्यार्थी अद्यापही आरोग्य तपासणीपासून वंचित राहिले असल्याची बाब प्रजा फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेने दि. ५ डिसेंबर, २०२२ रोजी प्रसिद्ध केलेल्या अहवालावरून समोर आली असणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून होणारी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी हा विभागाचा सर्वोत्तम उपक्रमांपैकी एक असणे, तरीदेखील बृहन्मुंबई महानगरपालिका शाळेत शिक्षण घेत असलेल्या तीन लाख अठरा हजार दोन विद्यार्थ्यांपैकी केवळ ८४ हजार २४७ विद्यार्थ्यांची आजतागायत आरोग्य तपासणी करण्यात आलेली असणे, तसेच सन २०१४ - २०१५ ते सन २०२१-२०२२ दरम्यान शिक्षण विभागाकडून होणाऱ्या आरोग्य तपासणी उपक्रमात ५८ टक्क्यांची घट दिसून आली असणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण | २८ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | विभागाकडे आरोग्य तपासणीसाठी आवश्यक असलेल्या निधीची तरतूद असतानाही विद्यार्थ्यांच्या आरोग्याची होत असलेली हेळसांड, कोविड काळानंतर आणि मुंबईत पसरलेल्या विविध साथ रोगांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने असलेली आरोग्य तपासणीची असलेली नितांत आवश्यकता, परंतु शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी आणि पालकांत शासनाप्रती पसरलेली तीव्र नाराजीची आणि संतापाची भावना, यास्तव बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची नियमित आरोग्य तपासणी करण्याबाबत शासनाने तत्काळ करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **२८.** | **५७१** | **श्री. जयंत आसगावकर,** नागोराव गाणार, **वि.प.स.**<br>“ राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील गुणवत्तेचा दर्जा कमी होत जाणे, अजूनही साडेतीन लाखाहून अधिक मुले शाळाबाह्य असणे, संचमान्यतेचे निकष बदलून गणित, विज्ञान, इंग्रजी, हिंदी-उर्दू, मराठी, समाजशास्त्र विषयांना स्वतंत्र शिक्षक मिळण्याची आवश्यकता असणे, कला-क्रीडा शिक्षकांची पदे पुनर्स्थापित करण्याची आवश्यकता असणे, दुर्गम व मागास भागातील कमी पटसंख्येच्या शाळांना संरक्षण देण्याची आवश्यकता असणे, कार्यानुभव विषयांतर्गत संगणक साक्षरतेचे महत्त्व लक्षात घेऊन प्रत्येक शाळेत ICT शिक्षक पद निर्माण करण्याची आवश्यकता असणे, शाळेतील अर्धवेळ ग्रंथपाल पदांवरील कार्यरत कर्मचाऱ्यांना विषयभार देऊन पूर्णवेळ शिक्षक (ग्रंथपाल) किंवा मोठ्या शाळांमध्ये पूर्णवेळ शिक्षक (ग्रंथपाल) पदाचा संचमान्यतेत समावेश | २८ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

करण्याची आवश्यकता असणे, अशैक्षणिक कामांसाठी अधिग्रहित करण्यात आलेल्या शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना रिक्त पदांवर पाठवण्याची आवश्यकता असणे, अनुकंपा तत्वावरील भरती तत्काळ सुरू करण्याची आवश्यकता असणे, विनाअनुदानित शाळा व तुकड्यांची त्रुटी पूर्तता करून १०० टक्के वेतन सुरू करणे, चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची कंत्राटी पद्धतीने सुरू केलेली नेमणूक रद्द करून कायमस्वरूपी वेतनश्रेणीवर नियुक्ती करण्याची आवश्यकता असणे, या प्रश्नांच्याबाबत तातडीने सोडवणूक न झालेल्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, याबाबत तातडीने दखल घेऊन शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही आणि यावर शासनाची प्रतिक्रिया. ”

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **२९.** | **१८४** | **श्री. प्रसाद लाड, वि.प.स.**<br>“ धोकादायक म्हणून जाहीर केलेला अंधेरी पूर्व आणि पश्चिमेला जोडणारा गोपाळ कृष्ण गोखले पूल पुर्नबांधणीसाठी दिनांक ७ नोव्हेंबर, २०२२ पासून संपूर्णतः बंद करण्यात आल्यामुळे अभूतपूर्व वाहतूक कोंडीसह परिसरातील नागरिकांना असंख्य गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने सदरहू पूलाचे पुर्नबांधणीचे काम युद्धपातळीवर हाती घेऊन लवकरात लवकर पुनर्रचित पूल वाहतुकीसाठी कार्यान्वित करण्यात यावा, अशी मागणी नागरिकांनी लोकप्रतिनिधींना केली असणे, सदरहू पूल वाहतूकीसाठी संपूर्णतः बंद केल्यामुळे वाहतुक कोंडीचा परिणाम औषध खरेदी करणारे, शाळकरी-महाविद्यालयीन विद्यार्थी परिसरातील रुग्णालयामध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना तसेच सर्वसाधारण नागरिकांना होत असल्याने ही कोंडी सुटण्यासाठी शासनाने पर्यायी उपाययोजना करीत नसणे, सदरहू पूलांच्या पुनर्बांधणीच्या कामास प्रत्यक्षात सुरुवात करण्यास शासनाकडून होत असलेले दुर्लक्ष, या पूलाचे काम पूर्ण होऊन हा पूल वाहतुकीसाठी कार्यान्वित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | २८ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **३०.** | **३५२** | **श्री. सचिन अहिर, वि.प.स.**<br>“ मुंबई शहरातील माजगाव ताडवाडी लवलेन मुंबई सेंट्रल आग्रीपाडा परळ इत्यादी भागात वसलेल्या बीआयटी चाळी असणे, सदर चाळींमध्ये भाडेकरून सोबत पोलीस कर्मचारी तसेच मुंबई महापालिकेचे कामगार वर्षानुवर्षेत राहत असणे, सदर चाळी सुमारे १०० वर्षाच्या असून त्या चाळी मोडकळीस आलेल्या असणे, सदर चाळींचा पुनर्विकास प्रक्रिया गेल्या अनेक वर्षांपासून चर्चेत असणे प्रत्यक्षात कोणतीच समक्ष कारवाई अद्याप न होणे, चाळींची दुरवस्था झाल्याने तेथील हजारो रहिवासी जीव मुठीत धरून वास्तव्यात असणे, मुंबईतील चाळींचे पुनर्विकास धोरण शासनाने घेतल्याने त्याच गतीवर बीआयटी चाळींचा पुनर्विकास करण्याची नितांत आवश्यकता असणे, याबाबत लोकप्रतिनिधीनी रहिवाशांनी शासनाकडे केलेली वारंवार मागणी, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया “ | २८ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |
| **३१.** | **५८४** | **सर्वश्री अनिकेत तटकरे,** शशिकांत शिंदे, सतिश चव्हाण, अमोल मिटकरी, विक्रम काळे, डॉ. मनिषा कायंदे, **वि.प.स.**<br>“ पेण जि.रायगड येथे २८ डिसेंबर, २०१७ रोजी बाळगंगा प्रकल्पग्रस्त शेतकरी समितीने अन्यायाविरोधात वाचा फोडण्यासाठी लोकशाही मार्गाने आंदोलन केलेले असणे, या आंदोलनात सर्व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी एकत्र येऊन खरोशी फाटा दरम्यान मुंबई गोवा हायवे रास्ता रोखो आंदोलन केलेले असणे, या आंदोलनात प्रकल्पग्रस्त शेतकरी, आदिवासी बांधव व स्थानिक नागरिकांनी सहभाग नोंदविलेला असणे, लोकशाही मार्गाने शांततेत आंदोलन पार पाडण्याची प्रकल्पग्रस्तांनी खबरदारी घेतलेली असणे, मात्र प्रशासनाने बळजबरीने आंदोलन | २८ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | चिरडून प्रकल्पग्रस्तांना अटक करणे, त्यांचेवर गुन्हे दाखल करणे, अन्यायकारक गुन्हे दाखल झाल्याने स्थानिकांमध्ये नाराजी पसरणे, चुकीच्या पद्धतीने दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याविषयी त्यांनी वेळोवेळी लेखी निवेदने देऊनही शासनाने त्याची कोणतीच दखल न घेणे, जवळपास ६५ जणांवर गुन्हे दाखल झालेले असून यामध्ये सामाजिक कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांचाही समावेश असल्याने स्थानिक गावांमध्ये या विषयी नकारात्मक वातावरण निर्माण झालेले असणे, एकूणच प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांवर चुकीच्या पद्धतीने दाखल झालेले गुन्हे त्वरित मागे घेण्याविषयी वारंवार होत असलेली मागणी, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका “ | | |
| **३२.** | **४६१** | **सर्वश्री रामराजे नाईक-निंबाळकर,** जयंत पाटील, कपिल पाटील, अनिकेत तटकरे, **वि.प.स.**<br>“ महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ (१९७८ च्या दुरुस्तीसह) च्या प्रशासकीय स्तरावरील अंमलबजावणीमध्ये संदिग्धता असणे, व त्यामुळे सामाजिक, आर्थिक व भौतिक नुकसान होणे, वन व्यवस्थापन, पर्यावरण, शेती सुधारणा व शेतीची कमाल धारणा इत्यादीचा व्यापक दृष्टीकोनातून महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ (१९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक -२९) राज्यात अंमलबजावणी करण्यास विधीमंडळाने मान्यता दिलेली असणे, सदर कायद्याद्वारे दिनांक ३०.८.१९७५ पासून राज्यातील सर्व खाजगी वने संपादित करण्यात आलेली असणे, वन विभागांतर्गत सदर कायाद्यातील तरतुदींच्या अधीन राहून एका प्रकरणामध्ये निर्णय देणे, त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांस शासनाने निलंबित करणे, परंतु सदर प्रकरण न्यायालयात गेले असता न्यायालयाने त्या अधिकाऱ्याचा निर्णय कायम ठेवणे त्याअनुषंगाने महसुल, वन, विधी व न्याय विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना उक्त कायद्यातील तरतुदींचा अर्थ न समजल्यामुळे अशा प्रकारची अनेक प्रकरणे न्यायालयाने निकाली काढताना शासनाच्या विरोधात निर्णय दिल्याचे निष्पन्न होणे, यामुळे शासनाच्या | २८ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | विभागातील उच्चस्तरीय अधिकाऱ्यांना या कायद्यातील तरतुदींचा अर्थ समजून घेण्याची नितांत गजर लागणे, तसेच सदर शासकीय अधिकारी आपल्या पदाचे कर्तव्य व्यवस्थित पार पाडत नसल्याने सामान्य जनतेला आपल्या न्यायासाठी न्यायालयात जावे लागत असणे व त्यामुळे अशा बहुतांश प्रकरणामध्ये न्यायालयात शासन प्रतिवादी असणे, या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरिता महाराष्ट्र खाजगी वन प्राधिकरण निर्माण करण्याची मागणी, तसेच खाजगी वन म्हणून शासनाकडे विहीत झालेल्या जमिनीचा रोख मोबदला सध्या प्रचलित असलेल्या कार्यप्रणाली प्रमाणे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून प्राधान्याने अदा करण्याबाबत शासनाने निश्चित करावयाचे ठोस धोरण करण्याची मागणी होणे, यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ” | | |
| **३३.** | **२७२** | **श्री. रामदास आंबटकर, वि.प.स.**<br>“ गडचिरोली जिल्ह्यात एटापल्ली, ता. सुरजागड हा लोह प्रकल्प सुरू करण्यात येणे, सदर प्रकल्प जंगलव्याप्त डोंगराळ भागात असून २०० वर्षे पुरेल असा लोह खनिज साठा उपलब्ध असणे, सदर लोह खनिज उत्खनन १ कोटी टन ऐवढा उपलब्ध होणे, सदर प्रकल्प सुरू करण्याकरिता तत्कालीन मुख्यमंत्री यांच्या पुढाकारात उभा होणे, त्यातच एटापल्ली तालुक्यातील व परिसरातील बहुतेक ग्रा.प. पेसा क्षेत्रात येत असून मा. प्रधानमंत्री यांनी जल जंगल जमिनीवर स्थानिक अधिवासीना रोजगार व अधिकार देण्याचा मानस असल्यामुळे सदर लोह प्रकल्पात स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणे आवश्यक असणे, त्यातच सदर लोह खनिजांचा वाहतुकीमुळे आलापल्ली-आष्टी-गोंडपिपरी रस्त्यांची पुर्णतः दुर्दशा झाली असणे, वास्तविकता | २८ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

करारानुसार रस्ते दुरुस्ती कामे कंपनीद्वारे होणे आवश्यक असणे, त्यातच सदर वाहतुकीमुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागणे, त्यामुळे सदर कंपनीद्वारे स्थानिकांना रोजगार उपलब्ध होण्याची आवश्यकता, शासनाने यावर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ”

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३४. | ५८७ | **ॲड. अनिल परब, वि.प.स.**<br>“ वांद्रे (पूर्व ) येथील शासकीय वसाहतीचा पुनर्विकासाचा प्रकल्प अद्याप रखडला असल्याचे नुकतेच माहे डिसेंबर,२०२२ मध्ये निदर्शनास येणे, शासकीय वसाहतीतील रहिवाश्यांना मालकी हक्काच्या सदनिका देण्यासाठी भूखंड उपलब्ध करण्याच्या प्रस्तावास महाविकास आघाडी सरकारने सन २०२२ मध्ये दिलेली तत्वतः मान्यता, प्रस्तावास तत्वतः मान्यता मिळूनही अद्याप वसाहतीच्या पुनर्विकासाचा प्रकल्प रखडलेला असणे, परिणामी स्थानिक रहिवाश्यांना जीव मुठीत घेऊन रहावे लागत असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, वांद्रे शासकीय वसाहत ही ९६ एकर शासकीय भूखंडावर सन १९५९ ते १९७५ दरम्यान तत्कालिन विनिदेशानुसार बांधण्यात येणे, सदर वसाहतीमध्ये एकूण ३७० इमारती असून ४७८२ सदनिका असणे, सदरहू इमारतीचे आयुष्यमान हे केवळ ५० ते ६० वर्षांचेच असल्याचे सद्यस्थितीत इमारतीची अवस्था अत्यंत बिकट असणे, इमारतीच्या काही भाग कोसळलेला, तर काही भागांच्या छताचा भाग पडलेला असणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिंनी सातत्याने शासनाकडे विविध आयुधांद्वारे लक्ष वेधूनही कोणतीच कार्यवाही होत नसणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, सद्यस्थितीत वसाहतीतील निवासस्थानाची दुरावस्था पाहता व सदर इमारतीमध्ये वास्तव्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांची मानसिकता पाहता शासकीय वसाहतीचा पुनर्विकास तातडीने घेण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. ” | २९ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **३५.** | **५८६** | **श्री. गोपिचंद पडळकर, वि.प.स.**<br>“ महाराष्ट्र राज्यातील कोळी, महादेव कोळी, मल्हार, कोळी ढोर, आणि टोकरे कोळी, या जमातींच्यावर अन्याय होत असणे, कोळी समाज एसटी आणि एसबीसी असे दोन कॅटेगिरीमध्ये विभागले गेले असणे, ज्यामध्ये केव्हा समुद्रकिनारी राहून वंशपरंपरेने मासेमारीचा व्यवसाय करणारे सोन कोळी किंवा मच्छीमार कोळी समाजातील लोकांना एसबीसी मध्ये समाविष्ट करण्यात आलेले असणे असे असताना सुद्धा समुद्रकिनाऱ्या व्यतिरिक्त इतर प्रत्येक जिल्ह्यातील महादेव कोळी, मल्हार कोळी, टोकरे कोळी, ढोर कोळी, डोंगर कोळी यांना एसटीच्या सवलती देण्यात येत नसणे, जर आदिवासी क्षेत्राबाहेर राहणाऱ्या आदिवासींना आदिवासी विकास विभाग बोगस समजत असेल तर राज्यामध्ये अनुसूचित जमातीच्या एकूण लोकसंख्या ९.३५% (१,०५,१०,२१३) असणे ज्यामध्ये आदिवासी क्षेत्रामध्ये (STP) ३.९% (४३,७२,००७ तर आदिवासी क्षेत्राबाहेर (OTSP) ५.४% (६१,३८,२०६ ) लोकसंख्या असणे, महाराष्ट्र मध्ये एकूण ९.३५ % लोकसंख्या असल्याकारणाने अनुसूचित जमातीच्या आरक्षणापासून एकूण २५ आमदार आणि चार खासदार निवडून येत असणे, ज्यामध्ये आदिवासी क्षेत्रातील ३.९% लोकसंख्येमुळे ११ आणि २ खासदार तर आदिवासी क्षेत्राबाहेरील ५.४% लोकसंख्येमुळे १४ आमदार आणि दोन खासदार निवडून येत असणे, जर आदिवासी क्षेत्राबाहेर राहणारे ५.४ % लोक ३० ते ३३ जमाती बोगस असल्यास, त्यांच्या लोकसंख्येच्या आधारावर निवडून येणारे १४ आमदार आणि दोन खासदार सुद्धा नैसर्गिकपणे बोगस ठरत असणे, त्यामुळे राज्यातील कोळी, महादेव कोळी, मल्हार कोळी, ढोर आणि टोकरे कोळी या | २९ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

जमातीवर होत असलेला अन्यायाविषयी तोडगा काढण्याची मागणी निवेदनाद्वारे दिनांक १६/९/२०२२ रोजी राज्याचे आदिवासी विकास मंत्री यांना आदिवासी कोळी जमात सामाजिक संस्था, खानापुरे यांच्या कडून करण्यात येणे, उक्त मागणीच्या अनुषंगाने योग्य ती उपाययोजना करण्याची आवश्यकता.''

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **३६.** | ६४ | **सर्वश्री सतिश चव्हाण,** विक्रम काळे, **वि.प.स.**<br>" गंगापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील तुर्काबाद खराडी येथून नागझरी नदी वाहत असणे, सदर नदीचे पात्र किमान १०० फुटाचे असणे, सदर नदी पात्र बारामाही वाहत असून पावसाळ्यात पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने परिसरातील नागरिकांना नदी ओलांडणे अवघड जात असणे, तुर्काबाद, राजुरा, शेरोडी, मलकापुर, डोमेगांव, बोरगांव सह येसगांव येथील लोकसंख्या किमान २५ हजार असणे, सदर परिसरातील ग्रामस्थांना वाळुज औद्योगिक परिसरात जाण्यासाठी हाच एकमेव रस्ता असणे, नदी पात्रात पाणी असल्याने पादचारी व दोन चाकी वाहनास नदी ओलांडून जाण्यासाठी त्रास सहन करावा लागत असणे, मागील दोन वर्षापुर्वी शेतातून घरी पायी येत असतांना नदी ओलांडतांना पाण्याचा अंदाज न आल्याने ३५ वर्षीय एका शेतकऱ्याला जीव गमवावा लागला असणे, सततच्या पावसाने नदीपात्रात नेहमी मोठ्या प्रमाणावर पाणी वाहत असणे, वाळूज औद्योगिक वसाहतीत कामगारांना जाण्यासाठी कायमच अडचणी येत असणे, तुर्काबाद खराडी परिसरातील शेतकरी,कामगार व शाळेकरी मुलांना येण्याजाण्यासाठी सदर नागझरी नदीवर पुल बांधणे अत्यंत गरजेचे असणे, सदर ठिकाणी पुलाचे बांधकाम करण्यासाठी होत असलेली मागणी, याबाबतीत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. '' | २९ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

**विवरण क्रमांक २१**–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| **३७.** | **५१८** | **श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स.**<br>“ सातारा जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या उभारणी करण्यासाठी कृष्णानगर पाटबंधारे वसाहतीमध्ये कृष्णा खोरे विकास महामंडळाची सुमारे ६३ एकर जागा या महाविद्यालयासाठी देण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, जून २०२२ मध्ये पोलीस प्रशासन व कार्यकारी अभियंता धोम कालवे विभाग क्र. २ यांनी व काही अधिकारी व बाहेरच्या लोकांनी संयुक्त मोहिम राबवून या जागेत असलेल्या सुमारे ४५ वर्षापासूनचे व्यापारी गाळे, ४७ कार्यालयीन इमारती, १२ तात्पुरते गोडाऊन व १२३ निवासी इमारतीचा समावेश असलेल्या या वास्तु पाडण्यास सुरुवात करणे, जुन्या इमारती, गोडाऊन व दुकाने पाडल्यानंतर लोखंडी स्टील, विटा व अन्य बांधकाम साहित्याची निविदा प्रक्रिया न काढता किंवा लिलाव न करता या भंगार मालाची अनधिकृतपणे विक्री करून कोट्यवधी रुपयाचा केलेला भ्रष्टाचार या संदर्भात काही सामाजिक संघटनांनी चौकशी करून संबंधितांविरुद्धदकारवाई करण्याची जिल्हाधिकारी, सातारा यांना दिलेले निवेदन, या संदर्भात चौकशी करून संबंधिताविरुद्ध कारवाई करण्याची तेथील लोकप्रतिनिधींसह इतर सामाजिक संघटनांनी केलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना.” | २९ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |
| **३८.** | **७१** | **सर्वश्री विक्रम काळे,** सतिश चव्हाण, नागोराव गाणार, प्रविण दरेकर, प्रसाद लाड, प्रवीण दटके, ॲड. निरंजन डावखरे, **वि.प.स.**<br>“ राज्यातील कायम शब्द वगळलेल्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व वर्गतुकड्यांची पुन्हा मंत्रालय स्तरावरुन तपासणी करणे, तपासणीअंती त्रुटी पूर्ण केलेल्या | २९ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | शाळांची यादी घोषित करण्यासाठी शिक्षक लोकप्रतिनिधींनी वारंवार पाठपुरावा करणे, तत्कालीन सरकारने या याद्या घोषित करण्यासाठी मान्यता देणे, त्या सर्व शाळांचे शासन निर्णय शिक्षण विभागाकडून तयार होणे, तरीही शासन निर्णय निर्गमित न होणे, तत्कालीन आघाडी सरकारने सन २०११ मध्ये विनाअनुदान शाळांना अनुदान देण्यासाठी मान्य केलेले प्रचलित धोरण पहिल्या वर्षी २०%, दुसऱ्या वर्षी ४०%, तिसऱ्या वर्षी ६०% व चौथ्या वर्षी ८०% व पाचव्या वर्षी १००% अनुदान याप्रमाणे वेतन अनुदान देण्याचा निर्णय न होणे, मुल्यांकन निकषानुसार तपासणीअंती अनुदानास पात्र ठरणाऱ्या अघोषित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा तसेच सन २०१२-१३ च्या वर्गतुकड्यांना वेतनअनुदानासाठी पात्र ठरवून शिक्षण आयुक्तांमार्फत प्रस्ताव शासनास सादर होणे, तरीही शासन स्तरावरुन सदरील शाळा व वर्ग तुकड्या अनुदानासाठी घोषित न होणे, या सर्व कायम शब्द वगळलेल्या शाळेतील शिक्षक-कर्मचाऱ्यांना सेवासंरक्षण देणे, यासाठी शिक्षक लोकप्रतिनिधी सातत्याने शासनाकडे पाठपूरावा करणे, राज्यातील शिक्षक-कर्मचारी आझाद मैदानावर वेळोवेळी आंदोलन करणे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ” | | |
| ३९. | १८५ | **श्री. किरण सरनाईक, वि.प.स.**<br>“ राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अनेक समस्या असून यामुळे हे कर्मचारी तणावपूर्ण वातावरणात काम करत असणे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी पद भरती रखडलेली असणे, राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन व कोविड काळापासून प्रलंबित असलेले वैद्यकीय देयकासाठीच्या निधीची तरतूद अद्याप केलेली नसणे, डी.सी.पी.एस/ एन.पी.एस. खाते नसणाऱ्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाचा हप्ता रोखीने मिळत नसणे, डी.सी.पी.एस/एन.पी.एस. खाते धारकांना ६ व ७ व्या वेतन आयोगाची थकबाकी मिळत नसणे, राज्यातील ० ते २० पट संख्या असलेल्या | २९ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | शाळा बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, यामुळे विद्यार्थी व शिक्षक दोघांचेही नुकसान होणार असणे, तरीही शासन हा निर्णय मागे न घेणे, नगर परिषद माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती योजनाचा लाभ मिळत नसणे, राज्यातील मान्यताप्राप्त अनुदानित शाळामधील पूर्णवेळ शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रत्येकी २ मुलांना निःशुल्क शिक्षण देण्याबाबत अद्याप निर्णय न होणे, राज्यात बृहत आराखडा शिवाय कुठल्याही स्वयंअर्थसहाय्यित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयांना मान्यता न देण्याबाबतही शासनामार्फत कोणताही निर्णय अद्याप न होणे, परिणामी राज्याचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी-पालकांमध्ये शासनाच्या या शैक्षणिक उदासीन धोरणामुळे शासनाप्रती चिडीची व संतापाची भावना निर्माण होणे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या या विविध समस्या तातडीने सोडवण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया “ | | |
| **४०.** | **५५९** | **श्री. राजेश राठोड, वि.प.स.**<br>“ अखिल बंजारा समाजाचे तिर्थक्षेत्र असलेले वाशिम जिल्ह्यातील पोहरादेवी हे स्थान बंजारा समाजासाठी श्रद्धास्थान असणे, पोहरादेवी या ठिकाणी बंजारा समाजातील नागरिक मोठ्या संख्येत दररोज दर्शनासाठी येत असून या ठिकाणी बंजारा कुंभ घेणे आवश्यक असतांना अखिल भारतीय धर्मजागरण समन्वय या संघटनेद्वारे जानेवारी, २०२३ मध्ये गोद्री ता. जामनेर जिल्हा जळगांव येथे कुंभमेळयाचे आयोजन करण्यात आलेले असणे, शासनाने | २९ डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | हिंदुगोर बंजारा व लबाना नायकडा कुंभकरिता पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा व मलनिस्सारण शौचालय व स्नानगृह यासाठी सुमारे ४ कोटीपेक्षा जास्त निधीची मंजुरी दिलेली असून शासनाचे १०० कोटी पेक्षा जास्त निधी खर्च करण्याची तयारी असणे, वास्तविक हिंदु कुंभमेळा अलाहाबाद, नाशिक, हरिद्वार, उज्जैन अशा ठराविकच तीर्थक्षेत्रामध्ये भरविला जात असणे, असे असताना गोद्री जामनेर या ठिकाणची निवड कोणत्या आधारे करण्यात आली तसेच केवळ हिंदु धर्म व्यापक असल्याने हिंदु बंजारा कुंभ आयोजित करून बंजारा जमाती करिता मर्यादित का ठेवण्यात आला याबाबत जनमानसात होत असलेली चर्चा, शासनाच्या निधीची तरतूद करताना कशाच्या आधारे कामाची निवड केली गेली, गावाची संख्या कमी भौतिक सुविधांसाठी जास्त निधी अशा प्रकारे जनतेच्या पैशाचा गैरवापर केला जात असल्याची नागरिकांमध्ये निर्माण होत असलेली शंका, या प्रकारातून पोहरादेवी या ठिकाणचे महत्त्व कमी करण्याचे होत असलेले प्रयत्न, सदरच्या कुंभमेळाच्या आयोजनामुळे हिंदू बंजारा असे नवीन नामकरण आयोजकांकडून करण्यात येणे, पोहरादेवी येथे पायाभूत सुविधा स्वच्छतागृह, रस्ते, पिण्याचे पाणी इत्यादीची व्यवस्था होणे गरजेचे असताना जाणीवपूर्वकपणे गोद्री येथे कुंभ भरविण्यात येत असल्याने बंजारा समाज बांधवात निर्माण झालेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून करावयाची आवश्यक कार्यवाही याबाबत शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| ४१. | ५९७ | **श्री. अंबादास दानवे,** ॲड.अनिल परब, श्री. अभिजित वंजारी, **वि.प.स.**<br>“मौजे तुडाळ येथील सर्व्हे नं.१४/१, सर्व्हे नं.१३/२/१, १६/२, ही जमीन सरकारी अकारीपड असून महसूल व वन विभाग यांच्याकडील शासन निर्णय दि.२३.१.२०१९ अन्वये शासकीय जमिनीवर लिलाव पद्धतीने खारपट्टा देण्याची तरतूद असणे, मौजे तुडाळ येथील स.नं.ग.नं.१६/१, एकूण क्षेत्र १४.४७.० हेक्टर आर पैकी १.००.० हेक्टर आर या खाणपट्टा जमिनीकरिता | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | दि.३१.३.२०१६ अन्वये मंजूर करण्यात येणे, परंतु लिलाव पद्धतीने खाण धारकाबाबत खनिज खाणपट्टा नुतनीकरणाचे आदेश व्यपगत झालेले असणे, याबाबतची टिपणी जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी मंजूर केलेली असून मा.अप्पर जिल्हाधिकारी यांचेकडे स्वाक्षरीकरिता दि.३१.१२.२०१९ करीता सादर करण्यात येणे, याबाबत अप्पर जिल्हाधिकारी यांनी आजतागायत ती अनिर्णीत ठेवण्यात येणे, जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी केलेल्या मोजणीच्या अनुषंगाने खाणधारकाने एकूण १,०६,८८३ ब्रास उत्खनन केल्याचे निदर्शनास येणे, सदर खाणीमध्ये उत्खननाकामी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांचेकडील माहे मार्च, २०२० पर्यंत विद्युत देयक व होणारा वीज वापर यांचे विवरणपत्र सादर करण्यात येणे यावरून सदर अनधिकृत उत्खनन आजमितीस सुरू असणे, त्यानुषंगाने खाणधारकास दंडात्मक आदेश काढून तात्काळ दंडात्मक रक्कम शासनास जमा करण्याबाबत कळविलेले असणे, जिल्हाधिकारी रायगड यांजकडील पत्र जा.क्र.खशा/कात-१/ईटीएस मोजणी/तुडाळ/२०१८, दि.२.०८.२०१८ व पत्र क्र.गौखशा/कात-१/तुडाळ/मा.म.दळवी/अन.उत्खनन/२०२०, दि.१९.०५.२०२० अन्वये सदर प्रकरणी सुनावणी घेण्याकामी उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांना प्राधिकृत करण्यात आले असणे, तद्नंतर मा.अप्पर जिल्हाधिकारी रायगड यांजकडील पत्र क्र.गौखशा/कात-१ / तुडाळ / दळवी / अन.उत्खनन/ २०२०, दि.१५.१०.२०२० अन्वये (परिशिष्ट-२४) सदर प्रकरणी या कार्यालयाकडील मूळ संचिकासह उपविभागीय अधिकारी पेण यांच्याकडे वर्ग करण्याबाबत आदेशित केलेले होते. सद्यःस्थितीत सदरचे प्रकरणे या कार्यालयाकडील पत्र दि.२०.११.२०२० अन्वये उपविभागीय अधिकारी, पेण यांचे कार्यालयात वर्ग करण्यात | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | आली असणे, परंतु सदर प्रकरण हे उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांच्याकडे पुन्हा वर्ग करण्यात येणे, सबब याबाबत कोणताही आदेश न झाल्याने महाराष्ट्र शासनाचा १५ कोटी ३१ लाख ११ हजार ३२५ हून अधिक दंडात्मक रक्कम खाणधारकाने न भरल्याने शासनाचा महसूल वसूली कामी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| **४२.** | **२८** | **सर्वश्री विलास पोतनीस,** सुनिल शिंदे, **वि.प.स.**<br>" अंधेरी, मुंबई येथील साकीनाका परिसरात प्लेसमेंट कार्यालय उघडून परदेशात नोकरीसाठी पाठवण्याचे प्रलोभन दाखवून बेरोजगार तरुणांना फसविणारी टोळी कार्यरत असल्याची बाब दि. ७ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास उघडकीस येणे, या टोळीने आलिशान कार्यालय उघडून मुंबईतील अनेक बेरोजगार तरुणांना लाखो रुपयांना गंडा घातलेला असणे, या टोळीकडून एका प्लेसमेंट एजंटला माहे डिसेंबर, २०२० मध्ये फारइस्ट ड्रिलिंग प्रा. लि. कंपनीकडून परदेशांत नोकरीच्या संधी उपलब्ध असल्याचा ई मेल पाठविण्यात आला असणे, अनेक बेरोजगार तरुण संपर्कात असलेल्या या एजंटने सर्व बेरोजगार तरुणांची कागदपत्रे, पासपोर्ट व विविध शुल्कापोटी रोख रक्कम साकीनाका परिसरातील प्लेसमेंट कार्यालयात जमा केली असणे, परंतु गेल्या वर्षभरापासून या बेरोजगार तरुणांना परदेशात नोकरीस पाठविण्यास सदरहू कार्यालयाकडून टाळाटाळ सुरू असणे, त्यामुळे सरतेशेवटी रोख रक्कम परत मिळविण्यासाठी बेरोजगार तरुणांनी सदरहू प्लेसमेंट कार्यालय गाठले असता कार्यालय बंद करून टोळी गायब झाल्याची धक्कादायक बाब समोर येणे, त्यामुळे हवालदिल झालेल्या संबंधित बेरोजगार युवकांनी साकीनाका पोलीस ठाण्यात तक्रार दिलेली असणे, या टोळीने मुंबई शहराच्या विविध भागात प्लेसमेंट कार्यालये उघडून अशाच प्रकारे अनेक बेरोजगार तरुणांची फसवणूक केली असल्याची दाट शक्यता असणे, त्यामुळे सदर प्रकरणाच्या तपासासाठी विशेष पथक नेमून सखोल चौकशी करून बेरोजगार तरुणांना फसवणूक | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | करणाऱ्या टोळीस तातडीने अटक करण्याची असलेली नितांत आवश्यकता, त्यामुळे सदरहू प्रकरणाचा तपास जलद गतीने करून दोषींना कठोर शासन करण्यास अशाप्रकारे बेरोजगार तरुणांना नोकरीची प्रलोभने दाखवून त्यांची आर्थिक लुट करण्यासाठी मुंबईत जागोजागी उघडण्यात आलेल्या प्लेसमेंट कार्यालयांवर अंकुश ठेवण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **४३.** | **५७८** | **श्रीमती उमा खापरे, वि.प.स.**<br>“ शासकीय सेवेत असताना किंवा निमशासकीय सेवेत असताना अथवा सेवानिवृत्त वेतनाचा लाभ घेत असलेल्या आई-वडिलांच्या निधनानंतर वारसा हक्काने त्यांच्या पश्चात अविवाहित किंवा घटस्फोटीत किंवा दिव्यांग / मानसिक दृष्ट्या सक्षम नसणाऱ्या मुलींना त्यांच्या आई-वडिलांची पेन्शन मिळत नसल्याने अशा कुटुंबीयांचे होत असलेले आर्थिक हाल, यामुळे आई-वडिलांच्या निधनानंतर वारसा हक्काने त्यांच्या पश्चात मुलींना पेन्शन मिळण्याबाबतचे केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे राज्य शासनाकडून कार्यवाही होण्याबाबतची होत असलेली मागणी, याबाबत तातडीने कार्यवाही होऊन अशा मुलींना आर्थिक आधार देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली |
| **४४.** | **५५६** | **ॲड. अनिल परब, वि.प.स.**<br>“ अंधेरी पूर्व, मरोळ, सहार आंतरराष्ट्रीय हवाई अड्डा रोड, येथील व्यावसायिक विकास न.भू.क्र. (पैकी) १४२६, १५९० (पैकी ), १५४८, १५८८, १४६६, १४७७, १४५९, १४६२, | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

१४७८, १४८२, १४९२, १४४९, १४८१ १४९४, १४९३, १४५५, १४६०, १४८०, १४६५, १४७४, १४५८, १४३२, १५५२, १५४९, १४७५, १४५४, १४५१, १४६१, १४२९, १४३१, १४७६, १५५०, १४२८, १४६३, १४५६, १४५३, १४३०, १४५२, १४६४ वरील भूखंडावर मे.मार्स हॉटेल आणि रिसॉर्ट प्रा.लि. यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पामध्ये मोठ्या प्रमाणात घोटाळा झाल्याचे नुकतेच माहे डिसेंबर, २०२२ मध्ये उघडकीस येणे, सदरहू भूखंड हा मुंबईच्या विकास नकाशामध्ये सन १९९२ च्या पूर्वीपासून मनोरंजन मैदानाकरिता आरक्षित असणे, आरक्षणामध्ये उक्त भूखंड हा ५० टक्के मनोरंजन, ५० टक्के हॉटेलकरिता राखीव असतांना मे. मार्स हॉटेल आणि रिसॉर्ट प्रा.लि. यांनी जमीन कमाल नागरी कायद्यांतर्गत शासनाच्या अखत्यारितील भूखंडाला ना हरकत प्रमाणपत्राकरिता केलेला अर्ज, त्याकरिता प्रिमियम शुल्क शासनाला भरल्यानंतर सदर हॉटेलचे बांधकाम सुरू करण्याची घातलेली बंधनकारक अट, परंतु मे.मार्स हॉटेल आणि रिसॉर्ट प्रा.लि. च्या मालकांनी शासनाचा प्रिमियम न भरता शासनाची अधिकृत परवानगी न घेता हॉटेलचे पूर्ण केलेले बांधकाम व महानगरपालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे, मे.मार्स हॉटेल आणि रिसॉर्ट प्रा.लि. यांच्या भूखंडामधून ३.५ मीटरचा मोठा नाला असतांना मे.मार्स हॉटेल आणि रिसॉर्ट प्रा.लि. च्या मालकांनी महानगरपालिकेचे अधिकारी, युएलसीचे अधिकारी यांच्या संगनमताने गेल्या २२ वर्षांपासून शासनाचे प्रिमियम पोटी भरावयाचे शुल्क बुडविले असणे, शासनाचे एकूण रुपये १,२५,५४,९५,०२१/- प्रिमियम शुल्क भरले नसल्याचे उघड होणे, जिल्हाधिकारी यांनी यासंदर्भातील आपला अहवाल शासनास सादर केल्यानंतर त्या आधारावर कायदा व सुव्यवस्था विभागांनी देखील आपला अहवाल शासनास सादर करणे, तदनंतर शहर विकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी मंत्रीमहोदयांची मान्यता घेऊन जमीन कमाल नागरी धारणा (युएलसी) प्रिमियमची एकूण रुपये १,२५,५४,९५, ०२१/- माफ केलेली असणे, मे.मार्स हॉटेल आणि

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | रिसॉर्ट प्रा.लि. च्या मालकांला युएलसी ची अट व शर्ती लागू होत्या त्याच अटी व शर्ती शेजारी असलेल्या भूखंडावरील हॉटेलवर असणे, आणि त्यांनी त्या अटीची पुर्तता केलेली असणे, शेजारच्या भूखंडामधून सुद्धा नाला जात होता पण त्यांनी महानगरपालिकेकडे रितसर परवानगी मागून ६.० मीटर रुंदीचा मार्ग सोडण्याची परवानगी घेणे, सदर भूखंड एअरपोर्ट ऑथोरिटी ऑफ इंडियाच्या जागेमधून जात असून वापरण्याकरिता करारनामा सादर केलेला नसणे, मे.मार्स हॉटेल आणि रिसॉर्ट प्रा.लि. च्या मालकांनी शासनाची व महानगरपालिकेची फसवणूक केलेली असणे, शासनाच्या नियमाचे उल्लंघन करून केलेल्या बांधकामाची शासनाने सखोल चौकशी करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत स्थानिक नागरिकांच्या आलेल्या अनेक तक्रारी, याबाबत शासनाने सखोल चौकशी करून यास जबाबदार असणाऱ्या मे.मार्स हॉटेल आणि रिसॉर्ट प्रा.लि. चे मालक, महापालिकेचे अधिकारी, तसेच शासनाचे अधिकारी यांच्याकडे कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. ” | | |
| **४५.** | **१२६** | **श्री. नागोराव गाणार, वि.प.स.**<br>“ सामाजिक न्याय विभागांतर्गत मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह येरवडा(नवीन), पुणे येथे सीसीटीव्ही खरेदीबाबत झालेल्या गैरप्रकारानंतर ई-लायब्ररी साहित्य खरेदीतही मोठा गैरप्रकार झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेले असणे, लायब्ररीसाठी खरेदी करण्यात आलेल्या साहित्याची जेम पोर्टलवर तपासणी केली असता | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

प्रत्यक्षात चढ्या दराने खरेदी झाली असल्याचे समोर आलेले असणे, मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या निवासी शाळा व वसतिगृहांच्या सोयीसुविधेत वाढ करण्यासाठी नावीन्यपुर्ण योजनेअंतर्गत ३ टक्के निधी समाजकल्याण विभागाला उपलब्ध करून देण्यात आला असणे, त्या निधीतून सीसीटीव्ही कॅमेरे संच खरेदी करण्यात आले असणे, त्यामध्ये जवळपास ५० ते ५५ लाख रुपयांचा घोटाळा झाला असल्याचे प्राथमिकदृष्ट्या समोर आले असणे, या संदर्भात दिनांक ४ जानेवारी, २०२२ रोजी अतिरिक्त आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय यांनी सहायक आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचे कार्यालयास भेट दिली असता त्यांनी सीसीटीव्ही खरेदीसंदर्भात आक्षेप नोंदविणे, शासन निर्णयातील तरतुदीनुसार सदर योजनेचा समावेश, नावीन्यपुर्ण योजनेमध्ये होत नसल्याबाबत एकूण १२ निवासी शाळा/वसतिगृहांसाठी सुमारे ७४ लाख इतक्या रकमेचा पुरवठा आदेश देण्यात येणे म्हणजेच एका वसतिगृहाला सीसीटीव्हीसाठी रु. ६ लाखापेक्षा जास्त खर्च करण्यात येणे, सदरचा खर्च अवाजवी व बाजारभावाप्रमाणे नसल्याचे आक्षेप उपरोक्त भेटीदरम्यान नोंदविण्यात आले असणे, असे असताना पुन्हा सुमारे ४७ लाख रुपये खर्च करून ई-लायब्ररीसाहित्य खरेदीतही घोळ झाल्याचे प्रकरण समोर येणे, ही खरेदी करतानासुद्धा सर्व नियमांची पायमल्ली करून अवास्तव दराने खरेदी करण्यात आली असल्याचा प्रकार समोर येणे, नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत खरेदी केलेल्या इतर वस्तू जसे की सामान्य सेंटर इ. खरेदीत मोठा घोटाळा झाला असण्याची शक्यता व्यक्त केली जात असणे, सीसीटीव्ही खरेदी प्रकरणी चौकशी समिती नेमण्यात आली असतानाही अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, तसेच सदरबाबत इतर संसदीय आयुधांमार्फत माहिती विचारण्यात आलेली असणे, परंतु तरीही विभागाने अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, नावीन्यपूर्णणयोजनेअंतर्गत प्राप्त निधीबाबत सहायक आयुक्त यांनी शासनाची फसवणूक केलेली असणे, सहायक आयुक्त, पुणे यांनी जिल्ह्यातील वसतिगृहातील प्रवेशाचा

## विवरण क्रमांक २१–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | विशेष कोटा भरताना उघडपणे गैरप्रकार केलेला असणे, सहायक आयुक्त, पुणे यांनी स्वाधार योजनेअंतर्गत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मुद्दाम लाभापासून वंचित ठेवलेले असणे, सहायक आयुक्त पुणे यांनी स्कॉलरशीप वितरणाची मुद्दाम अडवणूक केलेली असणे, त्यामुळे शासनाने या विषयी करावयाची तातडीची कार्यवाही व उपयायोजना." | | |
| **४६.** | **४२४** | **श्री. महादेव जानकर, वि.प.स.**<br>"माहे नोव्हेंबर,२०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास कल्याण (पूर्व) चेतना शाळा ते नेवाळी नाका श्रीमलंग रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून, त्यास जबाबदार असलेले संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांनी संगनमताने ३० ते ४०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचे गंभीर आरोप तसेच कंत्राटदाराला काळया यादीत टाकून जबाबदार अधिकाऱ्यांविरोधात कडक कारवाई करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मनपा आयुक्त तसेच कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग यांचेकडे दिनांक ४/१०/२०२१ पासून वारंवार केलेली लेखी मागणी, सदर रस्त्याचे काम मनपा कडून मे.रेल्कॉन इन्फ्रा प्रोजेक्टस प्रा.लि. या कंपनीला देण्यात येणे. मुंबई मनपाने ब्लॅक लिस्टेड केलेल्या कंपनीला सदर काम दिल्याची बाब उघडकीस येणे, दि. १३/४/२०१७ रोजी काम दिल्यानंतर दि. १२/९/२०१८ पर्यंत काम पूर्ण करण्याचे आदेश असतांनाही दि. ३१/०५/२०२१ पर्यत देण्यात आलेली मुदतवाढ, मूळ रकमेत ४ कोटी रुपये कंत्राटदाराला वाढवूनन देणे, सदर रस्त्याचे करण्यात आलेले काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून संपूर्ण कामाची चौकशी तातडीने करण्यात यावी व काळया यादीतील कंत्राटदाराला काम मंजूर करणाऱ्याना मनपा तसेच सा.बां.विभागातील संबंधित | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

अधिकाऱ्यांनी कंत्राटदार कंपनीबरोबर आर्थिक हातमिळवणी केल्यामुळे या रस्त्याचे काम न करताच सदर ४६ कोटी रुपये इतक्या रकमेचा अपहार या ठेकेदार कंपनीने केल्याचे उघडकीस आल्यामुळे कल्याण-डोंबिवलीमधील लाखो नागरिक, या रस्त्यावरुन प्रवास करणारे प्रवासी व वारंवार तक्रार करणारे लोकप्रतिनिधी यांचे मनात कल्याण-डोंबिवली मनपा प्रशासन व कार्यकारी अभियंता यांनी ठेकेदारांशी आर्थिक हातमिळवणी केल्याबददल निर्माण झालेला ठाम विश्वास, चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ”

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४७. | ५२० | **श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स.**<br>“जळगाव जिल्ह्यातील भुसावळ औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र दिपनगर येथे युनिट क्र. ४ व ५ चे बांधकाम पूर्ण होऊन वीज निर्मितीला सुरुवात झालेली असून त्याद्वारे मोठ्या प्रमाणात प्रदुषण होत असणे, या संदर्भात दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी अध्यक्ष एम.पी.सी.बी. व प्रधान सचिव, ऊर्जा विभाग यांचेकडे केलेली तक्रार, त्याचप्रमाणे या केंद्रातून राखेच्या पाईपलाईनद्वारे राख मिश्रीत पाणी सोडून पाणी प्रदुषण होत असल्यामुळे त्या परिसरातील सिंचन योजना उध्वस्त होत असल्याची तेथील नागरिकांनी केलेल्या तक्रारी, येथील युनीट क्र. ३ ची प्रकल्प मर्यादा संपलेली असूनही सदर केंद्रातून होत असलेली वीज निर्मिती, त्यामुळे मोठ्या प्रमाणावर हवेतील प्रदुषण होत असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे निदर्शनास येणे, परिणामी या कामी पर्यावरण पूरक आराखडा तयार करण्याची आवश्यकता, येथील राख साठवणूक स्थळ क्र. ३ चे दुरुस्तीचे कामासाठी मोठ्या प्रमाणावर गौण खनिजाचे उत्खनन व चोरी करून वन विभागाचे हद्दीतून गौण खनिज उत्खनन व वाहतूक करून शासनाचे कोट्यवधीचे नुकसान केल्याबाबत वेल्हाळे ता.भुसावळ येथील ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केलेली तक्रार, याबाबत या सर्व बाबीचा विचार करता शासनाने यासंदर्भात निर्णय | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | घेऊन या भुसावळ औष्णिक विद्युत केंद्राद्वारे होत असलेले प्रदुषण बंद करण्याबाबत केलेली वा करावयाची उपाययोजना, तेथील नागरिकांमध्ये निर्माण झालेली संतापाची भावना, याबाबत शासनाची भूमिका व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **४८.** | **७२** | **सर्वश्री विक्रम काळे,** सतिश चव्हाण, कपिल पाटील, डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री जयंत आसगावकर, किरण सरनाईक, बाळाराम पाटील, किशोर दराडे, **वि.प.स.**<br>“ राज्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर केंद्रिय निवासी २८८ आश्रमशाळांना शासनाने मान्यता देणे, या सर्व शाळा नियमित सुरू असून त्यामधून हजारो विद्यार्थी शिक्षण घेत असणे, या सर्व शाळांना शासनाने अनुदान द्यावे, ही सातत्याने मागणी होत असणे, मराठवाड्याच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी यापूर्वी प्रत्येक अधिवेशनामध्ये याविषयी शासनाचे लक्ष वेधणे, तत्कालीन मंत्रीमहोदयांनी या सर्व शाळांची तपासणी करून अनुदान देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल असे आश्वासित करणे, त्यानुसार वारंवार तपासणी करून अ, ब, क, ड अशी श्रेणी करणे, या श्रेणीनूसार शाळांना २० टक्के वेतन अनुदान देण्याचा तत्कालीन शासनाने निर्णय घेणे, अनेक वर्षाचा कालावधी उलटूनही अद्याप या शाळांना प्रत्यक्षात वेतनअनुदान मिळत नसणे, यामुळे शिक्षक-कर्मचाऱ्यांची होत असलेली उपासमार व उर्वरित सर्व शाळांना वेतन अनुदान देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |
| **४९.** | **५७२** | **श्री. अंबादास दानवे, वि.प.स.**<br>“ सोलापूर जिल्ह्यातील एका लोकप्रतिनिधींनी अन्याय, अत्याचार केल्याचा गंभीर आरोप एका महिला तक्रारदाराने पुण्यात पत्रकार परिषदेत केला असणे, महिला तक्रारदाराच्या | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | पतीचे लोकप्रतिनिधींसोबत आर्थिक व्यवहार असणे, ते समाजकारणात सक्रिय असल्यामुळे व प्रगतीला अडथळा निर्माण करून पतीला पोलिसांच्या मदतीने अनेक खोट्या गुन्ह्या मध्ये अडकवून अन्याय केला असल्याचे महिला तक्रारदाराने मांडणे, सत्ताधारी असल्यामुळे पोलिसांकडे तक्रार करूनही न्याय मिळत नसल्याचा आरोप तक्रारदार यांनी केला असणे, खोट्या प्रकरणांमध्ये अडकवत पोलिसांकडे खोट्या तक्रारी करत पदाचा गैरवापर करून तक्रारदार यांनी त्यांच्या पतीला गुन्ह्यांमध्ये अडकवले असल्याचे पत्रकारांशी बोलताना सांगितले असणे, या सर्व प्रकारामुळे तक्रारदार व त्यांच्या मुलींचे आयुष्य खराब झाले असणे, मुलीने सर्व प्रकाराला कंटाळून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला असणे, एका प्रकरणात मा. न्यायालयाने या आरोपीच्या विरोधात गुन्हा नोंद करण्याचा आदेश दिला असूनही पोलिसांनी उक्त आदेशाकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे गंभीर आरोप करणे, शासन दरबारी मदत मिळत नसल्याने त्यांनी पुण्यात पत्रकार परिषद घेऊन सदरहू बाबीचा खुलासा केला असणे, उक्त प्रकरणी शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी महिला तक्रारदाराच्या कुटुंबियांमध्ये निर्माण झालेले भितीचे वातावरण, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही.” | | |
| ५०. | १५६ | **श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी, वि.प.स.**<br>“ पाथरी (जि. परभणी) येथील आठवडी बाजार नवीन झालेल्या राजमाता अहिल्याबाई होळकर या आठवडी बाजारात भरविण्याबाबत दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी पाथरी जि. परभणी येथील मुख्याधिकारी व प्रशासक आदेशित करणे, त्या आदेशाप्रमाणे नगर परिषदेचे चार कर्मचारी यांनी दिनांक २७ ऑक्टोबर, २०२२ रोजी पोलीस बंदोबस्तात नवीन आठवडी बाजारात भाजी, फळ विक्रेते यांना बसविण्याची प्रकिया सुरू करणे, परंतु आरोपी अजीम तांबोळी व इतर चार जणांनी त्या नगर परिषद कर्मचारी यांना शिवीगाळ करणे, | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | धमकावणे, असे प्रकार करीत शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, त्यामुळे त्या नगर परिषद कर्मचारी यांनी अजीम तांबोळी व इतर विरुद्ध पाथरी पोलीस स्टेशनमध्ये दिनांक २७ ऑक्टोबर, २०२२ रोजी दुपारी दोन वाजता तक्रार नोंदवणे, त्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपीवर गुन्हा नोंद करून त्यांना अटक करणे, त्यात आरोपींना PCR मिळणे, गुन्हा नोंद केला याचा राग मनात धरून अजीम तांबोळी याने पोलीस कस्टडी मध्ये असताना सुद्धा दिनांक २८ ऑक्टोबर रोजी दुपारी तीन वाजता नगर परिषद कर्मचारी यांचे विरुद्ध लेखी तक्रार नोंद करणे, व कस्टडीत असलेल्या आरोपीच्या तक्रारीवरून पोलिसांनी नगर परिषद कर्मचारी यांचे विरुद्ध खंडणी मागितली या कलमानुसार खोटा गुन्हा नोंद करून त्या कर्मचाऱ्यांना अटक करणे, आरोपींनी दिलेल्या तक्रारीची शहानिशा न करता तसेच वरिष्ठ अधिकारी यांची पूर्व परवानगी न घेता थेट गुन्हा नोंद करून अटक करणे, शासकीय कर्मचारी यांना अटक करताना बंधनकारक असलेल्या फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१A चा अवलंब न करणे, सर्वोच्च न्यायालयाने अर्निषकुमार विरुद्ध बिहार राज्य सरकारचे प्रकरणात दिलेल्या निर्देशाचे पालन न करणे, भारतीय संविधान कलम २१ प्रमाणे सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार असताना शासकीय कर्मचारी यांचा तो अधिकार हिरावून घेणे, या सर्व प्रकरणात स्थानिक पोलीस अधिकारी व वरिष्ठ अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद, पदाचा व कायद्याचा दुरुपयोग करणारी असणे, त्या सर्व पोलीस अधिकारी यांनी सर्वोच्च न्यायालय, फौजदारी संहीता व भारतीय संविधान यांचा अवमान करणे, याप्रकरणी राज्य सरकारने अप्पर मुख्य सचिव गृह यांच्या स्तरावरून चौकशी करून दोषी पोलीस अधिकारी यांना निलंबित करण्याची गरज, यावर शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया.” | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **५१.** | **३५६** | **श्री. सचिन अहिर, वि.प.स.**<br>" मुंबई शहरातील राज्यातील दूध विक्रेत्या संघटनेने दूध विक्री मोबदल्यात मिळणाऱ्या कमिशन व इतर प्रलंबित मागण्याबाबत लोकप्रतिनिधी मार्फत शासनाकडे सादर केलेल्या मागण्या, दूध व्यवसायात दूध उत्पादन, संकलन, वितरण, विपणन आणि विक्री ही महत्वाची साखळी असून, आज महाराष्ट्रात दूधाची जी विक्री होते ती प्रामुख्याने हजारो असंघटीत दूध विक्रेत्यांकडून होत असणे, मुंबई सारख्या शहरात अखंडीतपणे अंदाजे १ कोटी किंवा १.२५ कोटी लिटर दूध विक्री होत असणे, यामधील ८० ते ९० टक्के विक्री सकाळी पहाटे ४ ते ६ वा. पर्यंत होत असणे, ती प्रामुख्याने फुटपाथ वरून कोणत्याही पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध नसताना गेल्या १० ते १२ वर्षात दूध दरवाढ ही प्रति लिटर २५.०० एवढ्या मोठ्या प्रमाणात झालेली असणे, परंतू दूध विक्रेत्यांना वाढ फक्त ०.२० प्रति लिटर एवढीच मिळते, आज दूध विक्री मधून तुटपुंजा मिळणारा मोबदला उदर निर्वाह करणे, जिकरीचे जाणे, याबाबत त्यांच्यात पसरलेला कमालीचा तीव्र असंतोष याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रीया," | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |
| **५२.** | **३२** | **डॉ. वजाहत मिर्झा,** सर्वश्री अभिजित वंजारी, राजेश राठोड, अशोक ऊर्फ भाई जगताप, **वि.प.स.**<br>" यवतमाळ जिल्ह्यातील पुसद येथे दि. २६ नोव्हेंबर २०२२ रोजी शिवाजी चौकातील प्रवासी निवाऱ्यासमोर एका ट्रकने मोटारसायकलला दिलेल्या धडकेत १९ वर्षीय कु. वैष्णवी संजय गोरे, रा. पार्डी हिचा मृत्यू होणे, या घटनेला आठ दिवस उलटले नाही तोच दि. २ डिसेंबर, २०२२ रोजी विठाळयावरील पूसद नदीच्या पुलाजवळ ईगल कंन्स्ट्रक्शन कंपनीच्या टिप्परने मोटारसायकलला धडक दिल्याने मोटारसायकलस्वार संदीप कृष्णराव खंडार हा ३८ वर्षीय तरुण जागीच ठार होणे, या दोन्ही घटनांमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत असणे, सध्या | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालय ते दिग्रस रोडवरील विठाळा पर्यंत ईगल कन्स्ट्रक्शन कंपनीकडून रस्त्याचे काम सुरू असून सदर काम रात्रीच्या वेळी करणे आवश्यक असणे, परंतु हे काम दिवसा सुरू असल्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असणे, त्यामुळे एकाच आठवड्यात दोन अपघात होऊन दोघांचा जीव गेलेला असणे, वास्तविक हा रस्ता २४ मीटरचा असणे गरजेचे असताना फक्त ६-६ मीटरचा होत असल्याने तो अरुंद झालेला असणे, त्यामुळे वाहतूक कोंडी होऊन या घटना होत असल्याने याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून सदर रस्ता बांधकाम करण्याऱ्या संबंधित कंत्राटदारांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून मृत्यू झालेल्या कुटुंबांना आर्थिक भरपाई देण्याची व सदर रस्ता तातडीने योग्यरित्या तयार करण्याची आवश्यकता, याबाबत राज्य शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **५३.** | **५६०** | **श्री. रामराव पाटील, वि.प.स.**<br>“ राज्यातील विधवा महिलांच्या समान अधिकारांवर व स्वतंत्र अस्तित्वावर गदा येत असल्याचे नुकतेच दिसून येणे, या अनिष्ट, क्रुर, व जाचक प्रथेतून मुक्त करण्यासाठी महाविकास आघाडी सरकारने दि. १७/५/२०२२ रोजी हेरवाड,ता. शिरोळ, जिल्हा कोल्हापूर पॅटर्न संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्यात यावा म्हणून परिपत्रक काढून ही प्रथा बंद करण्याबाबत ग्रामसभेत ठराव मंजूर करणे, महिलांना सन्मानाची व सौजन्याची वागणूक मिळण्याकरिता त्यामुळे शासनाने तातडीने राज्यात विधवा महिला सन्मान व संरक्षण कायदा करण्याची | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | अत्यंत आवश्यकता, शासनाने याबाबत तातडीने दखल घेऊन न्याय देण्याची आवश्यकता व करावयाची उपाययोजना. ” | | |
| **५४.** | **३९** | **श्री. अमोल मिटकरी, श्री.** विक्रम काळे, श्री. शशिकांत शिंदे, श्री. सतिश चव्हाण **वि.प.स.** “ महाराष्ट्राच्या सीमा भागातील बेळगाव-कारवार या भागातील नागरिकांनी महाराष्ट्रात सामील होण्यासाठी शांततेच्या मार्गाने सुमारे ६९ वर्षापासून सुरू असलेले आंदोलन हे जगाच्या पाठीवर एकमेव असणे, असे असतांना कर्नाटक सरकारने महाराष्ट्रातील सोलापूर, अक्कलकोट, जत तालुक्यातील भाग कर्नाटकात सामील करून घेण्याची वल्गना दि.२२ नोव्हेंबर, २०२२ रोजी केलेल्या असल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, सीमा भागातील लाखो मराठी भाषिकांवर तेथील प्रशासनाकडून वर्षानुवर्षे अन्याय, अत्याचार केले जात असणे, मराठी भाग कर्नाटकमध्ये समाविष्ट केल्याच्या निषेधार्थ नोव्हेंबर,२०२२ मध्ये कर्नाटकातील बेळगाव, निपाणी, खानापूर, कारवार, बिदर, भालकीसह महाराष्ट्राच्या सीमाभागातील कोल्हापूर, सांगली भागामध्ये उपोषण, पदयात्रा काढून शांततेच्या मार्गाने आंदोलने केलेली असणे, महाराष्ट्राच्या स्थापनेपासून महाराष्ट्रात सामील करून घ्यावे व आपल्या न्याय हक्कांसाठी शांततेच्या मार्गाने येथील मराठी भाषिक नागरिकांची आंदोलने सुरू असणे, येथील मराठी भाषिकांनी आतापर्यंत शांततेने काढलेल्या अनेक पदयात्रांवर कर्नाटक पोलिसांनी यापूर्वी अमानुषपणे लाठीमार करून आंदोलने चिरडलेली असणे, अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाच्या प्रत्येक संमेलनामध्ये ठराव, मागण्या, सूचना, निवेदने वर्षानुवर्षे महाराष्ट्र सरकारकडे पाठविण्यात येणे, मराठी भाषा, साहित्य, संस्कृतीचे केलेले जतन, संवर्धन या पार्श्वभुमीवर सीमा भागातील प्रश्न तेथील मराठी भाषिकांना मिळत असलेली दुय्यम वागणूक याचे महाराष्ट्र सरकारचे अक्षम्य दुर्लक्ष होत असणे, सीमा भागातील मराठी भाषिकांना न्याय देण्यासाठी लवकरात लवकर कार्यवाही करण्याची राज्यातील लोकप्रतिनिधी तसेच सामाजिक | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | संघटनांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दि. ९ डिसेंबर,२०२२ तसेच अलिकडील काळात वारंवार मागण्या केलेल्या असणे, सदर मागण्यांवर निर्णय घेण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील कोट्यवधी नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, सीमा भागातील मराठी भाषिकांवर स्थानिक प्रशासकांकडून मोठ्या प्रमाणात अत्याचार केले जात असून त्यांच्या न्याय्य मागण्यांसंदर्भात युद्धस्तरावर कार्यवाही केली जात नसल्याने राज्यातील जनतेने पुढील काळात अधिक तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिलेला असणे, प्रशासनाच्या असंवेदनशीलतेमुळे सदरचा प्रश्न एवढ्या काळापासून रखडलेल्या स्थितीत असून अन्यायपिढीत मराठी भाषिकांच्या समस्या मार्गी लावण्याची नितांत आवश्यकता, याबाबत प्रशासनाचे हेतुपुरस्पर दुर्लक्ष होत असल्याने, सदर गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **५५.** | **४०** | **श्री. अमोल मिटकरी,श्री.** विक्रम काळे,श्री. शशिकांत शिंदे,श्री. सतिश चव्हाण, **वि.प.स.** “ कर्नाटकातील हिरेबागवाडी येथील टोलनाक्यावर महाराष्ट्र पासींग असलेल्या राज्यातील ट्रकवर कन्नड रक्षक वेदिका संघटनेच्या कार्यकर्त्यांनी हल्ला करून ट्रक्सची केलेली मोडतोड, याचे पडसाद राज्यात ठिकठिकाणी उमटत असून राज्यातील जनतेने या घटनेचा केलेला निषेध, जत तालुक्यातील गावांचा कर्नाटकात समावेश करण्याचे विधान कर्नाटकच्या मा. मुख्यमंत्र्यांनी केल्यामुळे राज्यातील जनतेमध्ये संताप पसरलेला असतांना या घटनेमुळे राज्यात पसरलेली संतापाची लाट, राज्याच्या सीमावर्ती भागातील गावांची नाराजी कमी करण्यासाठी | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | त्या परिसरातील विकास कामांवरील स्थगिती राज्य शासनाने तातडीने मागे घेण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| ५६. | ३५० | **श्री. सचिन अहिर, वि.प.स.**<br>“ महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (एम. ए. डी. सी.) मिहान, नागपूर मध्ये मोठ्या स्वरूपातील नवीन गुंतवणूक आणण्यात राज्य शासन अपयशी ठरत असणे, मिहानला डिफेन्स एव्हिएशन हब म्हणून विकसित करण्याचे स्वप्न दाखवीत येत असतानाच, राज्य प्रशासनाच्या दिरंगाईमुळे सदर प्रकल्प दुसऱ्या राज्यात परत जाणे, विमान तसेच रॉकेटचे इंजिन बनवणारी फ्रेंच बहुराष्ट्रीय कंपनी सॅफ्रॉन ग्रुप मिहानमध्ये येण्यास उत्सुक होती, परंतु प्रशासकीय आडमुठे धोरण व विलंबामुळे सुमारे ११८५ कोटींची प्राथमिक गुंतवणूक असलेला प्रकल्प आता हैदराबादला गेलेला असून ११८५ कोटींची थेट परदेशी गुंतवणूक असल्याने या एम आर ओ मुळे प्रत्यक्ष ५००-६०० उच्च कुशल रोजगार निर्माण होणार होता, परंतु राज्य शासनाच्या नाकर्तेपणामुळे हा प्रकल्प हैदराबादला जाणे, त्यामुळे जनमानसात पसरलेले कमालीचे संतापाचे वातावरण याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |
| ५७. | ४५२ | **श्री. बाळाराम पाटील, श्री.** किशोर दराडे, श्री. विक्रम काळे, डॉ. सुधीर तांबे, **वि.प.स.**<br>“ राज्य शासनाच्या सेवेत सन २००५ नंतर दाखल झालेल्या सरकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, अशी मागणी सरकारी अधिकारी कर्मचारी संघटनांकडून पत्राद्वारे शासनाकडे करण्यात येणे, राजस्थान, पश्चिम बंगाल, छत्तीसगढ, छत्तीसगड, पंजाब सरकारने त्या त्या राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय घेतला असणे, त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाने याबाबत तातडीने धोरणात्मक निर्णय घ्यावे, अशी सरकारी अधिकारी कर्मचारी संघटनांची मागणी असणे,दि.१ नोव्हेंबर २००५ नंतर शासकीय सेवेत रुजू झालेल्या सर्व कर्मचारी अधिकारी यांना शासनाने | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | डी.सी.पी.एस.ए.न.पी.एस ही योजना लागू केली असून सदर योजनेत कुटुंब निवृत्ती वेतन, उपदान या सुविधा नसणे, राज्यामध्ये आजमितीस साधारणतः ३००० कर्मचारी मृत झाले असल्याने जुन्या पेन्शन अभावी मृतांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ येणे, गेल्या दीड दशकापासून २००५ नंतर नियुक्त कर्मचारी यांचेकडून आंदोलन,पदयात्रा, धरणे आंदोलन, कामबंद आंदोलन, सायकलवारी, थाळीनाद, उपोषण अशा संवैधानिक मार्गाने लढा देण्यात येणे, महाराष्ट्रात १ नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत आलेल्या सरकारी अधिकारी-कर्मचाऱ्यांना नवीन पेन्शन योजना लागू असून अशा सरकारी अधिकारी कर्मचाऱ्यांचे प्रमाण सुमारे ४० टक्के असणे, राज्य सरकारची नवीन पेन्शन योजनेची सदोष अंमलबजावणी, गुंतवणूक आणि परतावा याबाबत शाश्वती नसल्यामुळे २००५ नंतरच्या सरकारी कर्मचारी-अधिकाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण असणे,यास्तव राज्य शासनाने अधिकाऱ्यांना राजस्थान दौऱ्यावर पाठवून तेथील पेन्शन योजनेचा अभ्यास करून महाराष्ट्रातही जुनी पेन्शन योजना सर्वांना लागू करणेबाबत आग्रही मागणी केली असणे, यास्तव राज्यातील २००५ नंतर शासन सेवेत नियुक्त झालेल्या सरकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणेबाबत शासनाने केलेली कार्यवाही,उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया. ” | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५८. | ५३८ | **श्री. नागोराव गाणार, श्री.** प्रविण दरेकर, श्री. प्रसाद लाड, श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री. रमेशदादा पाटील, श्री. रमेश कराड, श्री. रामदास आंबटकर, श्री. प्रवीण दटके, श्रीमती उमा खापरे, श्री. चंद्रशेखर बावनकुळे, ॲड. निरंजन डावखरे, **वि.प.स.**<br>“ विदर्भाचा चेहरा मोहरा बदलण्याची क्षमता असलेला मिहान प्रकल्प मोठ्या प्रमाणावर उद्योजकाने भूखंड खरेदी केले पण त्यापैकी फारच कमी संखेत उद्योग स्थापन झाले असल्याची बाब माहे डिसेंबर २०२२ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास येणे, त्यामुळे उद्योजकांनी खरेदी केलेल्या पण त्यावर उद्योग सुरू न केल्यामुळे रिक्त असलेल्या भूखंडासंदर्भातील निर्णय शासन किंवा एमआयडीसी स्तरावर कधी होणार हा प्रश्न निर्माण होणे, मिहान प्रकल्पाच्या निर्मितीसाठी नागपूर शहरालगत असलेल्या अनेक गावातील शेतकऱ्यांच्या शेती जमिनी अधिगृहीत करण्यात आल्या असणे, मिहानच्या बहुतांश भागात अजूनही जमिनीवर सिमेंटचा मलबा टाकल्याने त्या जमिनीचा कोणताही वापर आणि उत्पादक त्या ठिकाणी होताना दिसत नसणे, त्यामुळे मिहान मध्ये जमीन खरेदी करून उद्योग सुरू न करता उद्योजकांनी अडवून ठेवलेल्या जमिनीवर उद्योग सुरू करण्यासाठी आतापर्यंत तीन वेळा मदत कर देण्यात येणे, त्यामुळे नवउद्योजकावर अन्याय होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |
| ५९. | ५६८ | **श्री. नागोराव गाणार,श्री.** प्रविण दरेकर,श्री. प्रसाद लाड,श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री. रमेशदादा पाटील,श्री. रमेश कराड,श्री. रामदास आंबटकर,श्री. प्रवीण दटके,श्रीमती उमा खापरे,श्री. चंद्रशेखर बावनकुळे,ॲड. निरंजन डावखरे **वि.प.स.**<br>“ बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सहायक आयुक्त वार्ड ऑफिसरच्या रिक्त असलेल्या पदासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सुमारे वर्षभरापूर्वी परीक्षा घेण्यात येणे यात ९० लोकांची मुलाखतीकरिता निवड झाली होती मात्र परीक्षा होऊन १४ महिन्याचा कालावधी | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

## विवरण क्रमांक २१–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | लोटला तरी कुठलीही कार्यवाही एम पी एस सी च्या माध्यमातून झालेली नसणे एमपीएससीच्या उदासीन धोरणामुळे तरुणांना रोजगार देणाच्या सरकारच्या हेतुला हरताळ फासला जात असणे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत अलीकडील काळात रोज नव्या पदासाठीच्या जाहिराती प्रसिद्ध होताना दिसत असणे नव्या भरतीसाठी परीक्षा घेण्याच्या प्रक्रिया राबवायला वेळ असणाऱ्या एमपीएससीच्या अगोदर घेतलेल्या परीक्षा आणि त्यातील पात्र उमेदवारांना न्याय दिला पाहिजे विविध परीक्षेतील पात्र विद्यार्थी मागील काळात मुंबईच्या आझाद मैदानावर आणि पुण्यात देखील नियुक्तीच्या मागणीसाठी आंदोलन करताना दिसणे, त्यामुळे नुसत्या परीक्षा घेऊन नी त्या होत नसतील तर त्या परीक्षा अर्थ तरी काय, असा सवाल उपस्थित होत असणे, त्यामुळे राज्यातील शेकडो गरजू विद्यार्थ्यांना वर्षभरापासूनच्या नियुक्तीच्या प्रतीक्षा निकाली काढून त्यांना तातडीने न्याय देण्याची गरज असणे एकीकडे केंद्र आणि राज्य सरकारने तरुणांना रोजगार देण्याचा धुमधडाका लावला असताना राज्य सरकारने अलीकडेच मोठ्या प्रमाणात सरळ सेवा भरती प्रक्रिया राबवयला सुरुवात करून रोज नवनवीन रोजगाराच्या संधी सरकार उपलब्ध करून देत असताना दुसरीकडे लोकसेवा आयोगाकडून अशा पद्धतीने भरती प्रक्रिया विषयी उदासीनता दाखवल्यामुळे सरकारच्या स्वच्छ हेतूला हरताळ फासला जात असून त्यात सरकारची प्रतिमा मलिम होताना दिसत असणे तसेच राज्यातील शेकडो सुशिक्षित बेरोजगारांना न्याय देण्यासाठी एमपीएससी चे कामकाज सक्षमपणे चालविण्याची गरज असतानाही न करणे त्यामुळे हजारो विद्यार्थी पालकांमध्ये एमपीएसी | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | आणि शासनाच्या विरोधात नाराजी व्यक्त होत असणे, यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना. ” | | |
| ६०. | २५१ | **ॲड. निरंजन डावखरे,श्री.** प्रविण दरेकर,श्री. प्रसाद लाड,श्री. रमेशदादा पाटील,श्री. नागोराव गाणार, श्री. चंद्रशेखर बावनकुळे **वि.प.स.**<br>“ राज्य परिवहन (एसटी) कर्मचाऱ्यांना महामंडळाकडून वैद्यकीय खर्चासाठी देण्यात येणारी रक्कमम ही एकूण वैद्यकीय खर्चाच्या १० ते १५ टक्केच असणे, गेल्या २५ वर्षांपासून कर्मचारी हे नुकसान सोसत असणे, एसटी महामंडळामध्ये सध्या जवळपास ९० हजार कर्मचारी काम करीत असणे, यापैकी सुमारे चालक ३८ हजार, वाहक ३४ हजार आणि यांत्रिक १६ हजार असणे, या कर्मचाऱ्यांचा पगार आणि भत्ते कमी असल्याने आधीच त्यांना अनेक चिंतेचा सामना करावा लागणे, पोलिसांच्या धर्तीवर एसटी कर्मचाऱ्यांना आरोग्यकार्ड देण्याचा प्रस्ताव महामंडळात धूळ खात असणे, १९९७ च्या दरपत्रकानुसार कर्मचाऱ्यांचा वार्षिक वैद्यकीय खर्च हा ३५ ते ४० कोटी होणे, आरोग्यकार्ड काढल्यावर हा खर्च वाढण्याची शक्यता असणे, त्यामुळे महामंडळ तोट्यात असल्याचे कारण देत गेली २५ वर्षे हा प्रश्न निकाली काढला गेला नसणे, त्यामुळे एसटी कर्मचारी यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष व चीडेची भावना, शासनाने तातडीने याबाबीचा गांभीर्याने विचार करून वैद्यकीय खर्च कर्मचाऱ्यांना देण्याकरिता करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |
| ६१. | ३६१ | **श्री. विलास पोतनीस,श्री.** सुनिल शिंदे **वि.प.स.**<br>“ मद्यधुंद अवस्थेत स्कूलबस चालवून ४० विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात घालण्यात आला असल्याची गंभीर घटना नवी मुंबई येथील उलवे येथे दि. १४ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास झाली असणे, उलवे येथे आयएमएस या खासगी शाळेच्या बसने एका रिक्षाला धडक दिली असणे, सदरहू स्कूलबसने रिक्षाला धडक दिल्यानंतर नागरिकांनी बसमध्ये | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | डोकावले असता स्कूलबसचा चालक मद्यधुंद अवस्थेत डुलत असल्याचे आढळून येणे, त्याला बसतादेखील येत नसल्याचे स्पष्ट होणे, अशा अवस्थेत त्याच्याकडून अति वेगात बस पळवली जावून नियंत्रण सुटून मोठी दुर्घटना होण्याची असलेली दाट शक्यता, परंतु बस रिक्षाला धडकल्याने वेळीच हा प्रकार लक्षात येणे, सदरहू घटनेमुळे शालेय वाहतूक करणाऱ्या स्कूलबस चालकांकडून नियमांचे उल्लंघन करून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेशी खेळ करण्यात येत असल्याचे अधोरेखित होणे, त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांत पसरलेले चिंतेचे आणि भीतीचे वातावरण, यास्तव विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी स्कूल बस वाहतुकीच्या नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| **६२.** | **३९०** | **डॉ. (श्रीमती) मनिषा कायंदे वि.प.स.**<br>“ कोरोना काळापासून राज्य परिवहन मंडळाची विस्कटलेली आर्थिक घडी अद्यापही नीट झालेली नसणे, त्यानंतर कर्मचाऱ्यांच्या संपामुळे आणखी परिस्थिती बिघडणे, मागील अडीच वर्षात महामंडळाचे जवळपास अडीच हजार कोटी रुपयांची विविध कंपन्या, संस्थांना देणी बाकी असणे, त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीचे हप्ते- ग्रॅज्युएटीचे हप्ते भरण्यात अनियमितता येणे, महामंडळाकडून जुलै २०१९ पासून आज पर्यंत निवृत्त झालेल्या ८५०० कर्मचाऱ्यांच्या रजा रोखीकरणाचेही तब्बल अडीचशे कोटी रुपये देणी बाकी असल्याने मानवी हक्क आयोगाने राज्य शासनाला नोटीस पाठवणे, एसटी महामंडळाला अध्यक्ष नसल्याने दैनंदिन प्रशासकीय कामकाजात अनेक अडचणी येत असणे, संचालक मंडळाची | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

मागील एक वर्षापासून बैठक न झाल्याने महामंडळाच्या महाराष्ट्र वाहतूक भवनाच्या पुनर्विकास लांबणीवर जाणे, महामंडळातील एसटी प्रवाशांना डिजिटल तिकीट देण्यासाठी आवश्यक असणाऱ्या तिकीट मशीन खरेदी रखडणे, राज्यात मागील काही वर्षांमध्ये घेतलेल्या धोरणात्मक निर्णयामुळे जवळपास ६,२८९ गाड्यांचे आयुर्मान बारा वर्षांहून अधिक असणे, महामंडळात सध्या ४००० नवीन गाड्यांची आवश्यकता असणे, अशा बिकट आर्थिक परिस्थितीमध्ये एसटी महामंडळास कर्मचाऱ्यांच्या नियमित वेतनापोटी मागील पाच महिन्यात जवळपास ७९० कोटी रुपयांची आवश्यकता असताना शासनाकडून मागील आठवड्यात फक्त २०० कोटी रुपये मंजूर करून आश्वासित केलेला मदतीचा हात आखडणे, महागाई भत्ता वाढीची फाईल शासनाकडे प्रलंबित असून पगार देखील वेळेवर न होणे, महामंडळाला पूर्णवेळ मंत्री व अध्यक्ष नसल्याने ५११०० विद्युत बस घेणे, सीएनजी ऐवजी २००० डिझेल वाहनांचा समावेश करणे, वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती, नोकर भरतीस परवानगी यांच्यासह २८ महत्त्वाचे विषय पटलावर असताना देखील संचालक मंडळाची बैठक दोन वेळा रद्द होणे, एसटी महामंडळाकडून वैद्यकीय खर्चासाठी कर्मचाऱ्यांना हक्काचा पैसाही मिळत नसून देण्यात येणारी रक्कम म्हणजे निव्वळ चेष्ठा ठरणे, कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चापोटी देण्यात येणारे शुल्क हे बाजारभावाच्या ५% ते १०% असल्याने कर्मचाऱ्यांना नुकसान सोसावे लागणे, परिणामी एसटी कर्मचारी सावकारी चक्रव्यूहात अडकणे, एसटी महामंडळाच्या विविध मध्यवर्ती कार्यशाळांमध्ये लागणाऱ्या सामानाचा नियमित पुरवठा होत नसल्याने साहित्यां अभावी मनुष्यबळाचे मानवी तास वाया जात असून चांगली वाहने प्रवाशांकरिता उपलब्ध करून देणे शक्य होत नसल्याने महामंडळाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होणे, महामंडळाच्या भांडार शाखेकडून मे. केवीन यांचे निकृष्ट दर्जाचे मटेरियल खरेदी केले जात असून बिलापोटी १८५२७६६ रुपये देण्यात येणे, यामध्ये कार्यशाळा व्यवस्थापक, वरिष्ठ भांडार

**विवरण क्रमांक २१**–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | अधिकारी, सहायक भंडार अधिकारी, उप अधीक्षक व अधीक्षक तपासणी यांनी खरेदी आदेश व खरेदी आदेश नोंदवहीत हेतू पुरस्सर गैर प्रकार केल्याचा महामंडळाने चौकशी कामी नियुक्त केलेल्या श्री. गुरव, वरिष्ठ भांडार अधिकारी यांचा अहवाल असणे,याबाबत सखोल चौकशी करून भांडार व खरेदी खात्याअंतर्गत दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर तातडीने कारवाई करणे आवश्यक असणे, या सर्व बाबींमळे एसटी कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड असंतोषाची भावना असून याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ” | | |
| **६३.** | **५८३** | **श्री. अनिकेत तटकरे वि.प.स.**<br>“ रायगड जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या श्रीवर्धन डेपोकडून सातारा नाशिक मुंबई ठाणे बोरवली पुणे नालासोपारा तसेच लोकल फेऱ्या नेहमी चालू असते वाहतुकीचे नियोजन तसेच गाड्यांचे देखभाल व्यवस्थित होत नसल्याने प्रवासी वर्गाला त्रास सोसावा लागत असणे, डेपो व्यवस्थापक यांची इतरस्त ठिकाणी बदली झाल्याने त्यांच्या जागी अजून पर्याय कोणीही हजर झाले नसणे, याची झळ श्रीवर्धन आगाराला (डेपोला) बसत असणे, एस.टी. महामंडळाचे नियोजन व्यवस्थित नसल्याने अवैद्य वाहतुकीला प्रोत्साहन मिळत असणे, अवैद्य वाहतूक कारवाईसाठी एक गाडी तसेच काही अधिकाऱ्यांची निवड ही करण्यात आली असणे, त्यांच्याकडून कोणतीच कारवाई करण्यात येत नसणे, यावर खर्च करण्यापेक्षा महामंडळ श्रीवर्धन डेपोची सेवा सुधारण्यावर लक्ष दिल्यास त्याचा फायदा महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाला नक्कीच होईल याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६४. | २३ | **श्री. अमोल मिटकरी,श्री.** विक्रम काळे,श्री. शशिकांत शिंदे,श्री. सतिश चव्हाण,डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे **वि.प.स.**<br>" राज्यातील विदर्भ,मराठवाडा,खान्देश, पश्चिम महाराष्ट्रासह कोकणातील अनेक जिल्ह्यांमध्ये ऑगस्ट ते आक्टोबर,२०२२ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असणे, हाताशी आलेल्या पिकांचे हजारो कोटी रुपयांचे नुकसान झालेले असल्यामुळे गोरगरिब शेतकरी प्रचंड अडचणींत सापडलेला असणे, लाखो हेक्टर शेतीमधील पिकांची वाताहात झाल्याने त्यांच्या समस्यांमध्ये वाढ झालेली असणे, शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालेले असतांनाही त्यांना अत्यंत तुटपुंजी मदत जाहीर केलेली असून सर्वसामान्य शेतकऱ्यांना आवश्यक मदत उपलब्ध करून दिलेली नसणे, शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणींमध्ये वाढ होत असल्याने आतापर्यंत अनेक शेतकऱ्यांनी व त्याच्या कुटूंबातील सदस्यांनी आत्महत्या केलेल्या असून बहुतांश शेतकरी विमनस्क स्थितीत असणे, ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने उभारी देण्यासाठी लवकरात लवकर कार्यवाही करावी यासाठी लोकप्रतिनिधी, शेतकरी संघटनांनी मा.मुख्यमंत्री, मा.मदत व पुनर्वसनमंत्री तसेच संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे दि.०७ डिसेंबर, २०२२ रोजी तसेच अलिकडील काळात वारंवार मागण्या केलेल्या असणे, सदर मागण्यांवर निर्णय घेण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी आपदग्रस्त शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, विमनस्क स्थितीत असलेल्या शेतकरी व त्यांच्या कुटूंबियांकडून आत्महत्येचा मार्ग स्विकारण्याची स्थिती निर्माण झालेली असणे, आपल्या न्याय्य मागण्यांसाठी दि.१९ डिसेंबर,२०२२ पासुन नागपूर येथे सुरू होणाऱ्या विधिमंडळ अधिवेशन काळात तीव्र आंदोलन करण्याचा निर्णय घेतलेला असणे, प्रचंड अडचणींत सापडलेल्या सर्वसामान्य शेतकऱ्यांचे प्रश्न तातडीने सोडवुन त्यांना आवश्यक मदत देण्याची नितांत आवश्यकता, | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | याबाबत प्रशासनाचे हेतुपुरस्सर दुर्लक्ष होत असल्याने, सदर गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **६५.** | **२६९** | **श्री. अमोल मिटकरी,श्री.** विक्रम काळे,श्री. शशिकांत शिंदे,श्री. सतिश चव्हाण **वि.प.स.** “ अकोला जिल्ह्यातील खरीप हंगामातील (सन २०२२) च्या खरीप हंगामातील पिकांची सुधारित पैसेवारी दि.३१ ऑक्टो.२०२२ रोजी जाहीर करणे, त्यानुसार लागवडी योग्य ९९० गावांतील खरीप पिकांची सुधारित पैसेवारी ५३ पैसे असल्याचे प्रशासनामार्फत जाहीर करण्यात आलेले असणे, यावर्षीच्या पावसाळयात जून ते सप्टेंबर अखेरपर्यंत चार महिन्यांच्या कालावधीमध्ये जिल्ह्यात संततधार पाऊस, कधी अतिवृष्टी आणि पुराच्या तडाख्यात खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान व पिकांच्या लागवडीसाठी केलेला खर्च पाण्यात बुडल्याने शेतकरी संकटात सापडलेला असणे, सदर सुधारित पैसेवारी फी ५० पैशापेक्षा जास्त दाखविण्यात आल्यामुळे ९९० गावांतील शेतकरी दुष्काळी आर्थिक मदत मिळण्यापासून वंचित असणे, यावर्षीच्या झालेल्या अतिवृष्टी,संततधार पाऊस, पूर यामध्ये जिल्ह्यातील खरीप पिकांचे नुकसान मोठ्या प्रमाणात असताना खरीप पिकांची पैसेवारीही ५० पैशांपेक्षा जास्त असणे, परिणामी शेतकऱ्यांना त्याअनुषंगाने सोयीसुविधा व मदतीचा निर्णय घेण्यात येत असणे, मात्र ९९० गावांतील नुकसानग्रस्त, अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांकडून विशेष बाब म्हणून आर्थिक मदत मिळण्याबाबत शासनाकडे मागणी होत असणे, मात्र याबाबत निर्णय घेण्यासंदर्भात होत असलेल्या दुर्लक्षाबाबत शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व संतापाची भावना, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६६. | ३७७ | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.**<br>“ राज्यात नैसर्गिक संकटामुळे शेती उत्पादनात होणारी घट, शेतमालाला योग्य भाव न मिळाल्यामुळे कर्जाचा वाढता डोंगर, बॅंकाकडून अर्थसहाय्यात येणाऱ्या अडचणी, कर्जावरील व्याज, सावकारांकडून होत असलेला छळ, हाताशी आलेल्या पिकांचे अतिवृष्टी व दुष्काळामुळे होणारे नुकसान, खते, बी-बियाणे, कीटक नाशके इत्यादींचा ताळमेळ न बसणे, कुटुंब, संसार, मुलांच्या शिक्षणाचा खर्च सांभाळणे शेतकऱ्यांना डोईजड होणे अश्या कारणामुळे शेतकरी आत्महत्या करीत असल्याचे निदर्शनास येणे, माहे जुलै, २०२२२ ते माहे नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत राज्यात १२३७ शेतकरी, शेतमजुरांनी आत्महत्या केलेली असणे, पिकाला किमान आधारभूत किंमत न मिळाल्याबद्दल जुन्नर तालुक्यातील वडगाव आनंद येथील ४५ वर्षीय शेतकरी दशरथ लक्ष्मण केदारी यांनी महाराष्ट्र सरकार व केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या दुरवस्थेकडे दुर्लक्ष केल्याचा ठपका ठेवत शेततळ्यात उडी मारुन आत्महत्या करणे, राज्यात शेतकरी-शेतमजूरांच्या वाढत्या आत्महत्या रोखण्यासाठी शासनाला अपयश आलेले असणे, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी शासनाने ठोस पावले उचलणे गरजेचे असणे, त्यामुळे सर्व वर्गातील शेतकऱ्यांना नैसर्गिक संकटावेळी झालेल्या पिकांच्या नुकसानीचा संपूर्ण खर्च मिळावा, नैसर्गिक संकटामुळे नुकसान झाल्यास बॅंकांकडून व्याजमाफी मिळावी, शेतकऱ्यांसाठीच्या शासकीय योजनांचा लाभ तात्काळ मिळावा, शेतकऱ्यांनी वैविध्यपूर्ण पिके घ्यावी, शेतीसोबतच कुक्कुटपालन, बकरीपालन, दुग्धव्यवसाय अशा प्रकारच्या अन्य शेती जोड उद्योगांच्या योजना प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता असूनही उक्त प्रकरणी शासनास आलेले अपयश, अपयशामुळे शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रती असंतोष निर्माण होणे, त्यामुळे शासनाकडून शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **६७.** | **३१** | **श्री. विलास पोतनीस,श्री.** सुनिल शिंदे **वि.प.स.**<br>" जोगेश्वरी (पश्चिम) येथील गुलशननगरमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत सहयोग होम्स या विकासकाने बांधलेल्या इमारतीत अग्निसुरक्षा नियमांचे उल्लघन झाले असल्याने रहिवाश्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला असल्याची गंभीर बाब दि. ५ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास उघडकीस येणे, सदरहू इमारतीत एकूण १८९ सदनिका असून इमारतीची अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित नसल्याने आग लागल्यास मोठ्या प्रमाणावर जीवित आणि मालमत्ता हानी होण्याची दाट शक्यता निर्माण झाली असणे, इमारतीच्या जिन्यावर आणि लॉबीत मोठ्या प्रमाणावर भंगार साठविण्यात आल्याने आगीचा धोका वाढला असणे, फायर एक्सटीग्वीशर देखील रिकामे असणे, तसेच रेफ्युजी मजला आणि गच्ची बंद करण्यात आली असल्याने आपातकालीन परिस्थितीत रहिवाश्यांना जीव वाचविणे अशक्यप्राय असणे, मुंबईत सद्यस्थितीत निवासी इमारतींना आगी लागण्याच्या घटनांत वाढ होत असल्याने सदरहू इमारतीची अग्निशमन यंत्रणा प्रभावीपणे कार्यान्वित करण्याची असलेली नितांत आवश्यकता, परंतु याकडे संबंधित विकासकाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी सदरहू इमारतीतील रहिवाशांच्या जीवितास निर्माण झालेला धोका, यास्तव सदरहू इमारतीचे तातडीने फायर ऑडीट करून इमारतीतील अग्निशमन यंत्रणा तातडीने कार्यान्वित करण्यासह याकडे दुर्लक्ष करणाऱ्या विकासकावर कठोर कार्यवाही करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया. " | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६८. | ५५ | **श्री. सुनिल शिंदे, श्री.** विलास पोतनीस **वि.प.स.** “ सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या वाढली असली, तरी या शैक्षणिक वर्षात पालिकेच्या १ हजार १४६ शाळांपैकी केवळ २५५ शाळांमध्ये दहावीचे वर्ग उपलब्ध असल्याची धक्कादायक माहिती दि. ९ डिसेंबर, २०२२ रोजी उघडकीस येणे, त्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या केवळ २२ टक्के शाळांमध्येच विद्यार्थी दहावीपर्यंतचे शिक्षण घेवू शकत असल्याचे स्पष्ट होणे, शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी केवळ ४० टक्के विद्यार्थी सन २०२१-२२ पर्यंत महानगरपालिकेच्या शाळेत टिकून असल्याची माहिती समोर येणे, बृहन्मुंबई महानगरपालिका शाळांची विद्यार्थी संख्या वाढत असली तरी मुलांना दहावी पर्यंत शिक्षणासाठी वर्गच उपलब्ध नसल्यास महानगरपालिका शाळांत विद्यार्थ्यांना टिकवून ठेवण्याचे मोठे आव्हान महानगरपालिका शिक्षण विभागासमोर असणे, बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागात पहिली ते पाचवी, पहिली ते दहावी, नववी-दहावी, पहिली ते आठवी आणि सहावी ते दहावी अशा विविध विभागात विद्यार्थ्यांसाठी ८ विविध माध्यमातील महानगरपालिका शाळा उपलब्ध असणे, अनेक महानगरपालिका शाळेत केवळ सातवीपर्यंत वर्ग उपलब्ध असल्याने विद्यार्थ्यांसमोर माध्यमिक शिक्षणाचा यक्ष प्रश्न उभा ठाकला असणे, परिणामी पहिली ते आठवी पर्यंतच्या शिक्षणानंतर नववीपासून पालिका शाळेतील विद्यर्थी संख्येत मोठ्या प्रमाणावर लागलेली गळती, तरीदेखील शासनाचे सदरहू गहन प्रकरणाकडे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी गोर-गरीब विद्यार्थी माध्यमिक शिक्षणापासून वंचित राहण्याची निर्माण झालेली शक्यता, यास्तव बृहन्मुंबई महानगरपालिका शाळेतील माध्यमिक शिक्षणावर शासनाने विशेष भर देवून वर्ग शिक्षक आणि सुविधांची उपलब्धता देण्याबाबत करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया.” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **६९.** | **१०९** | **डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे वि.प.स.**<br>" राज्यात सर्व शहरात दिनांक २५ जून २०१५ रोजी मा.पंतप्रधानांनी स्मार्ट सिटी मिशन सुरू केलेले असणे, या मिशनचा मुख्य उद्देश " स्मार्ट सोल्यूशन्स च्या माध्यमातून शहरातील नागरिकांना मूलभूत पायाभूत सुविधा, स्वच्छ आणि शाश्वत वातावरण आणि एक सभ्य जीवनमान प्रदान करणाऱ्या शहरांना प्रोत्साहन देणे " हा असणे, शहराच्या सामाजिक, आर्थिक, भौतिक आणि संस्थात्मक घटकांवर सर्वसमावेशक काम करून नागरिकांची आर्थिक उन्नती व जीवन मानाचा दर्जा सुधारणे हे या मिशनचे उद्दिष्ट ठेवण्यात येणे, तसेच यामध्ये इतर विकसनशील शहरांसाठी आदर्श ठरू शकतील अशी शहरे निर्माण करून शाश्वत आणि सर्वसमावेशक शहरी विकासावर लक्ष केंद्रित करण्यात येणे, दोन टप्प्यातील स्पर्धेद्वारे स्मार्ट सिटी म्हणून विकसित करण्यासाठी महाराष्ट्रातून छत्रपती संभाजीनगर, कल्याण-डोंबिवली, सोलापूर, पुणे, नागपूर, पिंपरी चिंचवड, ठाणे आणि नाशिक या ८ शहरांची निवड करण्यात आलेली असणे, याकरिता प्रत्येक शहराला प्रतिवर्षी १०० कोटी रुपये केंद्रीय गृहनिर्माण व शहरी विकास मंत्रालयाकडून दिले जाणे, वरील प्रत्येक शहराला २०१६-२०२१ मध्ये प्रत्येकी ५०० कोटी रुपये वितरित करण्यात आलेले असणे, वरीलपैकी एकाही शहरांमध्ये स्मार्ट सिटी स्कीमच्या संकल्पनेची प्रतिपूर्ती झाल्याचे आढळत नसणे, वरील सर्व शहरांचा बकालपणा यापूर्वी पेक्षा जास्त वाढलेला असून नागरिकांना मोठ्या प्रमाणावर दैनंदिन समस्यांना तोंड द्यावे लागत असणे, केंद्र सरकारच्या माध्यमातून स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत देण्यात येणाऱ्या मोठ्या प्रमाणातील पैशाचा नेमका कुठे व कसा वापर केला गेला | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | याची चौकशी होण्याची नितांत आवश्यकता असणे, शहरातील स्मार्ट सिटी स्कीम अंतर्गत करण्यात आलेल्या सर्व कामांबाबत शहरी नागरिकांमध्ये प्रचंड असंतोषाची भावना असून याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ” | | |
| **७०.** | **११२** | **डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे वि.प.स.**<br>“ मुंबई शहरामध्ये एकूण ४४८ पूल असून पैकी ३४० पूलांचे मुंबई महानगरपालिकेतर्फे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येणे, यामध्ये फक्त एक तृतीयांश (१०१) पूल हे चांगल्या स्थितीत असून ५४ पूल हे प्रचंड धोकादायक स्थितीत असणे, अनेक पूल हे ५० वर्षापेक्षा जुने असून त्यांची पुनर्बांधणी करण्याची गरज असणे, ३४० फुलांपैकी १४३ फुलांची किरकोळ दुरुस्ती करण्याची गरज उघड होणे, धोकादायक पुलांमध्ये दक्षिण मुंबईतील ५, पूर्व उपनगरांमधील ३१, पश्चिम उपनगरांमध्ये १४ धोकादायक पूलांचा समावेश असून असे धोकादायक पूल नव्याने बांधण्याची गरज असणे, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील हिमालय पूल आणि अंधेरी पश्चिमेकडील गोखले पुलाचा भाग कोसळल्यानंतर पूलांच्या नियमित स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची गरज उघड होणे, त्याकरिता महापालिकेने पावसाळ्यापूर्वी व पावसाळ्यानंतर करावयाच्या स्ट्रक्चरल ऑडिट साठी नेमलेल्या सल्लागार कंपनीने केलेल्या ऑडिट नुसार अनेक रहदारीच्या पुलांवर मुंबई शहरातील नागरिकांना जीव मुठीत घेऊनच चालावे लागणार असल्याने नागरिकांमध्ये तीव्र असंतोषाची भावना निर्माण होत असून याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

## विवरण क्रमांक २१–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **७१.** | **१४३** | **श्री. महादेव जानकर,श्री.** अंबादास दानवे,श्री. नागोराव गाणार,श्री. रमेशदादा पाटील,श्री. प्रविण दरेकर,श्री. सचिन अहिर,ॲड. अनिल परब,श्री. विलास पोतनीस,श्री. सुनिल शिंदे **वि.प.स.**<br>“ मुंबई शहरात गोवरचा दिवसेंदिवस प्रादुर्भाव होत चालेली वाढ, शहरातील भायखळा,वरळी, वडाळा, धारावी, पश्चिम उपनगरातील वांद्रे पूर्व, अंधेरी पूर्व मालाड उत्तर, पूर्व उपनगरातील गोवंडी-चेंबूर-कुर्ला, भांडूप या भागात गोवरचा झालेला उद्रेक, वडाळा येथील ५ महिन्यांचा बालकाचा झालेला मृत्यू, शहरातील मृत्यूचा आकडा १५ च्या वर जाणे, मुंबईत गोवरबाधित रुग्णांची संध्या ३०८ वर पोहोचलेली असणे, गोवरचा वाढता प्रादुर्भाव पाहता केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने एक उच्चस्तरीय पथक मुंबईत नियुक्त करण्याचा घेतलेला निर्णय, गोवरचा झपाट्याने होत असलेला प्रसार रोखण्याकरिता शासनाने युद्ध पातळीवर कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रीया व भूमिका. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |
| **७२.** | **१६७** | **श्री. अभिजित वंजारी,श्री.** राजेश राठोड,डॉ. वजाहत मिर्झा,डॉ. सुधीर तांबे,डॉ. प्रज्ञा सातव, श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील,श्री. जयंत आसगावकर,श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप **वि.प.स.**<br>“ नागपूर शहरातून निघणाऱ्या कचऱ्याने भांडेवाडी येथे कचरा प्रक्रिया बंद असल्याने कचऱ्याचे ढिगारे वाढत असल्याचे दि.१/११/२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, ७७ एकर क्षेत्रात पसरलेल्या भांडेवाडी डम्पिंगयार्ड मधील ५२ एकर जागेत सांडपाणी प्रक्रिया केंद्र असणे, येथे कचऱ्यावरील प्रक्रियेसाठी हजर या कंपनीची नियुक्ती असणे, परंतु काही वर्षापूर्वी या कंपनीने कचरा प्रक्रियेचे काम बंद करणे, यातून सुटका व्हावी म्हणून पालिकेने | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | बायोमायनिंगच्या प्रकल्पावर काम सुरू करणे, १० लाख मेक्ट्रिक टन कचऱ्यावर बायोमायनिंग करण्याच्या प्रकल्पासाठी ४२.८० कोटींच्या प्रकल्पाला राज्य शासनाने मंजुरी देणे, मात्र या प्रकल्पासाठी शासनाचा निधी अप्राप्त असणे, त्यामुळे पालिकेच्या कचरा प्रक्रिया कामांसाठी मर्यादा येत असणे, त्यामुळे येथे चिंता व्यक्त होत असतानाही त्याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **७३.** | **१८७** | **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप,श्री.** सचिन अहिर **वि.प.स.**<br>“ मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची निर्मितीनंतर सन १९७० पासून मुंबई शहरातील सुमारे २५००/३००० जुन्या उपकर प्राप्त इमारतीं पाडून मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने म्हाडांतर्गत ३८८ इमारती तसेच पंतप्रधान अनुदान निवारा प्रकल्पांतर्गत ६६ इमारती अशा एकूण ४५४ इमारतींची पुनर्रचना करणे, सदर पुनर्रचित केलेल्या इमारतींमध्ये १२०, १६० व १८० चौरस फुटांच्या सदनिकांचे बांधकाम करण्यात येऊन, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सुमारे ३८ ते ४० हजार तर पंतप्रधान अनुदान निवारा प्रकल्पाचे सुमारे ६,३०० सदनिकाधारक म्हणजेच सुमारे तीन ते सव्वा तीन लाख रहिवाशी सदस्य या इमारतींमध्ये वास्तव्यास असणे, म्हाडाने पुनर्रचित केलेल्या या इमारतींचे आयुष्यमान ३०-४० वर्षे झाले असणे, विशेष म्हणजे म्हाडामार्फत गेल्या १० / १५ वर्षात या इमारतींच्या बांधकामावर झालेल्या खर्चाच्या दोन ते अडीच पट खर्च हा केवळ दुरुस्तीसाठी करण्यात येणे, सद्यस्थितीत या इमारती दुरुस्तीपलिकडे गेल्याने भविष्यात जिवीत व वित्तहानी होण्याची दाट शक्यता निर्माण होणे, या इमारतींचा तातडीने पुनर्विकास करणे अत्यंत आवश्यक असल्याचे म्हाडा अधिकाऱ्यांचे म्हणणे असणे, या इमारतींच्या पुनर्विकासांबाबत यापूर्वी मुंबईतील अनेक लोकप्रतिनीधींनी वेगवेगळ्या आयुध्यांच्या माध्यमातून हा गंभीर प्रश्न सार्वभौम | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | सभागृहात मांडणे, परंतु यावर कोणतीही कार्यवाही होत नसल्यामुळे यासंदर्भात लोकप्रतिनीधींची एक शासकीय कमिटी निर्माण करून या इमारतींच्या पुनर्विकासाबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत शासनस्तरावर प्रस्ताव सादर केलला असणे, परंतु यावर शासनाचा अद्यापही ठोस निर्णय झाला नसणे, आघाडी शासनाच्या काळात मा. नगरविकास मंत्र्यांनी ऐतिहासिक निर्णय घेत दि. २२ फेब्रुवारी, २०२२ रोजी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये ३३ (२४) नुसार पुनर्विकास करतांना ३३/७(१कक) हे नवीन उपकलम टाकून ३८८ इमारतींच्या पुनर्विकास करण्याला मंजुरी देऊन सुधारित अधिसूचना/ अध्यादेश काढण्यात येईल, असे आश्वासित करणे, परंतु आठ महिन्याहून अधिक कालावधी लोटूनही अद्यापही शासनामार्फत ठोस निर्णय घेण्यात न येणे, परिणामी, धोकादायक झालेल्या ४५४ इमारतीमधील सुमारे साडेतीन लाख रहिवाशी सदस्य आपला जीव मुठीत ठेवून सदर धोकादायक इमारतींमध्ये अद्यापही वास्तव्य करीत असणे, सदर धोकादायक इमारती पडून भविष्यात जिवीत व वित्तहानी टाळण्याकरिता वेळोवेळी म्हाडा संघर्ष कृती समिती (पुनर्रचित इमारत) मुंबई व अखिल मुंबई राजीव गांधी निवारा प्रकल्प मध्यवर्ती सह. गृह. संघटना त्याचप्रमाणे माजी लोकप्रतिनीधींनी मा. मुख्यमंत्री तसेच उप मुख्यमंत्री महोदयांकडे माहे नोव्हेंबर, २०२२ रोजी निवेदन देऊन शासनाकडे प्रलंबित असलेल्या पुनर्विकास प्रस्तावावर अंतिम धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत शासन दरबारी बैठक घेण्याचे निवेदन सादर करणे, त्याअनुषंगाने माहे नोव्हेंबर, २०२२ दरम्यान महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री महोदयांनी ३० वर्षे जुन्या असलेल्या म्हाडा इमारतींचा पुनर्विकास केला जाणार असल्याचे तसेच त्याबाबत आठवडाभरात अधिसूचना जारी करून ठोस निर्णय | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | घेणार असल्याचे मुख्यमंत्री कार्यालयाने माहिती देणे, परंतु शासनामार्फत या प्रकरणी वारंवार होत असलेली दिरंगाई, मुंबईतील धोकादायक झालेल्या ४५४ इमारतींचा तातडीने पुनर्विकास करणेबाबतच्या प्रस्तावासंदर्भात शासनामार्फत तातडीने अंतिम अधिसूचना जारी करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |
| **७४.** | **२१४** | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.**<br>“ पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमार्फत भामा-आसखेड धरणाजवळ जॅकवेल बांधावयाच्या निविदेत ३० कोटी रुपयांचा अनियमितता झाली असल्याचे निदर्शनास आले असणे, उक्त कामाचे कंत्राट हे गोंडवाना इंजिनीअरिंग कंपनीला दिले असून सदरहू कंपनीने अमृत योजनेंतर्गत निकृष्ट दर्जाचे काम केल्याने या कंत्राटदारावर मध्यप्रदेश व छत्तीसगड सरकारने कारवाई केलेली असून सदर कंत्राटदारालाच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने कंत्राट दिलेले असणे, मुळ निविदा रुपये १२० कोटींची असताना रुपये १६७ कोटी रुपयांची निविदा कंत्राटदाराने सादर केली असून व महापालिकेने तडजोड करून रुपये १५१ कोटी रुपयांना सदरहू काम दिलेले असणे, त्यामुळे मुळ निविदा रुपये १२० कोटी असताना सदरहू कंत्राटदारास रुपये १५१ कोटी रुपयांना दिली असल्याने उक्त निविदेत ३० कोटी रुपयांची अनियमितता झालेली असणे, तसेच निविदेतील अटींची पुर्तता तसेच बांधकाम साहित्याचे दर इतर निविदेशी सुसंगत नसल्याचेही निदर्शनास आले असणे, तसेच सदरहू अनियमततेची जबाबदारी लेखापरिक्षण विभागाने महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागावर निश्चित केली असणे, याबाबत शासनाकडे तक्रार करूनही शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१–**पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **७५.** | **२८२** | **श्री. प्रविण पोटे-पाटील,श्री.** रामदास आंबटकर,डॉ. रणजित पाटील **वि.प.स.**<br>" अमरावती शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी सिंभोरा (मोर्शी) धरणापासून ते अमरावती येथील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत मुख्य जलवाहिनीचे आयुष्यमान स.न. २०२४ पर्यंत असणे, सदर मुख्य जलवाहिनी नेरपिंगलाई ते अमरावती शहर पर्यंत १५०० मिली मीटर व्यासाची ३३ किमी असणे, पाईप लाईन चे आयुष्यमान संपुष्टात आल्याने ती वारंवार फुटण्याचे प्रमाण दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढलेले असणे, मागील वर्षांपासून पाईप लाईन फुटण्याचा प्रकार ४-५ वेळा झाल्याने नागरिकांना पिण्याची पाण्याची दुसरी कोणतीच व्यवस्था नसल्याने ८-८ दिवस पिण्याच्या पाण्याची पर्यायी व्यवस्था शोधावी लागणे, यामुळे शासनाप्रती नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला असणे, पाईप लाईनच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामात शासनाला आगाऊ वेळोवेळी खर्चाची तरतूद करावी लागणे, पाणीपुरवठा विभागाने तथा नगरविकास विभागाने नेरपिंगलाई ते अमरावती शहरापर्यंत नव्याने जलवाहिनीचा अंदाजे ९.५ कोटींचा प्रस्ताव शासनाच्या अमृत-२ योजनेमधून मिळण्याकरिता शासनाला पाठविला असणे, याबाबत शासनाने तात्काळ करावयाची निधीची तरतूद, कार्यवाही व प्रतिक्रिया. " | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |
| **७६.** | **३०७** | **श्री. प्रवीण दटके,** श्री. चंद्रशेखर बावनकुळे, श्री. नागोराव गाणार **वि.प.स.**<br>"नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात मागील २० वर्षापेक्षा जास्त कार्यरत ऐवजदार सफाई कर्मचाऱ्यांना दिनांक २०/९/२०१९ च्या परिपत्रकानुसार स्थायी करण्यात आले असणे, परंतु त्यांना सेवेनुसार कोणतेच लाभ दिले जात नसणे, स्थायी कर्मचाऱ्यांना उचित लाभ देण्याबाबत व परिपत्रकातील अट क्र. १,२,४ तसेच क्र ८ मध्ये सुधार होणेकमी लोकप्रतिनिधींनी | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | दिनांक १८.१.२०२२ च्या पत्राद्वारे लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली असणे, सफाई कर्मचाऱ्यांना काम करीत असताना २० वर्षे पूर्ण झाले असल्यास त्यांना तात्काळ स्थायी करणे, तसेच सफाई कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्यास त्यांच्या नातेवाईकास नवीन प्रमाणे एवजदार कार्ड वितरित करणे, कर्मचाऱ्यांचे मृत्यू किंवा सेवा निवृत्ती नंतर पद व्यपगत न करता त्यांच्या नातेवाईकास लाड समितीच्या शिफारशीचा लाभ देणे, आदि प्रलंबित निर्णयामुळे कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत एवजदार सफाई कामगारांबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना**.**” | | |
| **७७.** | **३१९** | **डॉ. सुधीर तांबे,** श्री. राजेश राठोड, श्री. अभिजित वंजारी, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री. जयंत आसगावकर, डॉ. वजाहत मिर्झा **वि.प.स.**<br>“ राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना डी सी पी एस ही योजना लागू असून नगरपालिका संचालित माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना ही डी सी पी एस योजना लागू नसल्यामुळे निवृत्तीनंतर शासनाचे लाभ व विमा यापासून सदरचे नगरपालिका शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वंचित राहणार असून शासनाचा कोणताही लाभ त्यांना मिळणार नसणे, त्यामुळे सदर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अन्याय होणार असल्याने त्यांच्यात पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून नगरपालिका संचालित शाळांमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना डीसीपीएस योजना लागू करण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |
| **७८.** | **३५१** | **श्री. सचिन अहिर वि.प.स.**<br>“ मुंबई महानगरपालिकेने नुकतीच कुष्ठरोगांचा शोध घेण्यासाठी राबविलेल्या विशेष मोहिमेत मुंबईमध्ये ८८ संशयीतांपैकी १२ बालकांमध्ये कुष्ठरोगाची लक्षणे आढळली तर ठाणे | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

## विवरण क्रमांक २१–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | महानगरपालिकेच्या वतीने राबविलेल्या आरोग्य शिबिरातही १५ जणांना कुष्ठरोगाची लागण झाल्याची बाब समोर आलेली असणे त्यामुळे कुष्ठरोग बाधित रुग्णांची संख्या आता मुंबईसाठी धोक्याची घंटा मानली जाणे महापालिकेचे दिलेल्या माहितीनुसार कुष्ठ रुग्णांची गेल्या पाच वर्षातील ही सर्वाधिक संख्या असणे आढळलेल्या ८८ संशयीतांपैकी आठ टक्के रुग्णांना ग्रेड दोन कुष्ठरोगाची लागण झाल्याचे दिसणे त्यामुळे निर्माण झालेली गंभीर परिस्थिती व जनमानसात पसरलेले कमालीचे भीतीचे वातावरण याबाबत शासनाची भूमिका ´É|ÉÉÊ´ÉiÉE ” | | |
| **७९.** | **३७०** | **श्री. सुनिल शिंदे,श्री.** विलास पोतनीस **वि.प.स.**<br>“ दादर, मुंबई येथील मैदानासाठी आरक्षित असलेला भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेने वेळेत ताब्यात न घेतल्याने मा. मुंबई उच्च न्यायालयाने शासनास या भूखंडावरील आरक्षण रद्द करण्याचे आदेश दि. १४ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास दिले असणे, परिणामी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिरंगाईचा फटका मुंबईकरांना बसला बसून त्यांना मैदानाला मुकावे लागणे, दादर येथील दादासाहेब फाळके मार्गावरील सुमारे दोन हजार चौरस मीटरच्या मोकळ्या भूखंडावर सन १९९२ मध्ये मैदानाचे आरक्षण टाकण्यात येणे, परंतु गत दहा वर्षात सदरहू भूखंड ताब्यात घेण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, त्यामुळे जमिनमालकाने माहे में, २००३ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेला खरेदी सूचना बजावलेली असणे, तदनुसार महापालिका प्रशासनाने सुधार समितीकडे माहे जून २००३ मध्ये प्रस्ताव पाठवल्यानंतर हि जमीन तत्कालीन बाजारभावानुसार ८.५१ कोटी | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

रुपयांना विकत घेण्याबाबतचा ठराव मंजूर करण्यात येणे, त्यास महापालिका महासभेनेही मंजुरी दिली असणे, परंतु त्यापुढील कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिका अधिकाऱ्यांना वेळेत पूर्ण करण्यात आलेले अपयश, मुंबईतील मोक्याच्या ठिकाणचा भूखंड ताब्यात घेण्यात पालिका अधिकाऱ्यांनी चालढकल केल्याने सुमारे दीडशे कोटींचा घोटाळा करण्यात आल्याचा माजी लोकप्रतिनिधींनी केलेला आरोप, त्यामुळे मुंबईकर नागरिकांत शासनाप्रती पसरलेली तीव्र संतापाची भावना, यास्तव सदरहू प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करून हेतुपुरस्सर दिरंगाई करणाऱ्या पालिका अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यासह सदर प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया. ”

८०. ३८६ **श्री. जयंत पाटील वि.प.स.** — ३० डिसेंबर, २०२२ — चर्चा झाली नाही

“ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सदनिका हस्तांतरण प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असून ठाणे ते दिवा पाचव्या आणि सहाव्या रेल्वे मार्गिका विस्तारीकरणामध्ये मोफत सदनिका मिळविण्यासाठी काही बनावट झोपडीधारकांनी खोटे दस्तऐवज बनवून शासनाची दिशाभूल करत फसवणूक करण्यात येत असणे, सन २०१५ मध्ये एमएमआरडीएने ठाणे ते दिवा पाचव्या आणि सहाव्या रेल्वे मार्गिका विस्तारीकरणामध्ये आवश्यक जागा ताब्यात घेत ती संबंधित प्रशासनाकडे हस्तांतरीत केली असणे व निष्कासन कारवाई होण्याआधी आणि कारवाई नंतर संबंधित प्रशासनाकडून झालेल्या जागेचा सर्व अहवाल, पंचनामा, झोपडपट्टीधारकांच्या नावे क्षेत्रीय तक्रार निवारण समितीकडे अर्ज करून सुनावणी आयोजित करून खोटे दस्तऐवज बनवून मोफत सदनिका लाटण्याचा प्रयत्न केला जात असणे, मोफत सदनिका लाटण्यासाठी दलालांपासून झालेली साखळी वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत जात असून अशा मोफत सदनिकांसाठी लाखोंची बोली लागत असणे, मात्र प्रकल्पांत बाधित

## विवरण क्रमांक २१–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | झालेला गरजू माणूस शेवटपर्यंत हक्काच्या घरापासून वंचित राहणे, मात्र प्राधिकरणाकडून याबाबत काहीच कारवाई केली जात नसणे, सदर प्रशासकीय यंत्रणेतील या भ्रष्टाचाराबाबत कित्येक तक्रारी येऊनही तसेच प्रकल्प बाधितांची आंदोलने होवूनही ज्यांच्यावर कारवाई होणे अपेक्षित असते त्यांच्यावर कारवाई न होणे, परिणामी संबंधित दोषी अधिकारी तथा दलालांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची तसेच मोफत सदनिका वितरित करण्याचे दिलेले आदेश रद्द करावेत अशी मागणी सातत्याने करण्यात आली असणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |
| **८१.** | **३९३** | **ॲड. अनिल परब वि.प.स.**<br>“ माहे नोव्हेंबर २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास, पुणे शहरातील वारजे येथील मनपाच्या डॉ. अरविंद बारटक्के दवाखान्यात करोना काळात स्वॅब सेंटर मधून रुग्णालय प्रशासनाला हाताशी धरुन केलेल्या भ्रष्टाचारात ८० ते ९० लाख रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याबाबत डॉ. सतीश कोळसुरे, वैद्यकीय अधिकारी, बारटक्के दवाखाना तसेच तक्रारदार यांनी वारजे पोलिसांकडे सदर प्रकरणा विरोधात केलेली लेखी तक्रार,रसदर तक्रारीनुसार वारजे पोलीस ठाण्यातील पोलिसांनी तपास पूर्ण करून आपला लेखी अहवाल सप्टेंबर २०२२ मध्ये पुणे मनपा प्रशासनास पाठविणे, पोलिसांनी आपल्या अहवालात तक्रारीत तथ्य असून त्या आरोपांशी पुरक असणे, पुणे मनपाची ८० ते ९० लाखांची आर्थिक फसवणूक करण्यात आल्याची बाब व या अहवालावरुन पोलीस ठाण्यात रितसर तक्रार दाखल करावी असे वारजे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पो. निरीक्षक, डी.एस.हाके यांनी मनपा | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | आयुक्त व आरोग्य प्रमुख, आशिष भारती यांना २७ सप्टेंबरला देऊनही अद्यापी पुणे मनपाने पोलिसांच्या तपास अहवालानुसार कोणतीच तक्रार दाखल केली नसल्याची गंभीर बाब उघडकीस येणे, डॉ.सतीश कोळसुरे यांनी वारजे पोलीस स्टेशनमध्ये केलेल्या तक्रारीत नमूद केलेले अतिशय गंभीर आरोप पोलीस यंत्रणेने तपास करून यात शंभर टक्के तथ्य असल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्याचे दिलेली कबुली, तरीही पुणे मनपा प्रशासन संबधित दोषी भ्रष्टाचारी अधिकारी, कर्मचारी यांचेविरोधात कोणतीच कारवाई करण्यास पोलिसांना परवानगी देत नसल्याने, उच्च पदस्थ वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सहकार्यामुळे हा गैरकारभार व भ्रष्टाचार वारजे येथील बारटक्के रुग्णालयात झाला असल्याबद्दल नागरिकांच्या मनात निर्माण झालेला विश्वास, तीव्र चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ” | | |
| ८२. | ४१९ | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.**<br>“ नवी मुंबई महानगरपालिकेचा विकास आराखडा प्रकाशित करताना महासभेने मान्यता दिलेल्या २२६ सूचनांचा समावेश विकास आराखड्यामध्ये केला असणे, सदरहू विकास आराखड्यामध्ये शासनाच्या नगरविकास विभागाचे दिनांक १४ जून, २०२१ व दिनांक ६ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या शासन आदेशामध्ये भुखंडावरील आरक्षणाबाबत उल्लेख नसणे, परंतु दिनांक ३ जानेवारी, २०२२ रोजीच्या शासन आदेशामध्ये उक्त आरक्षणाबाबत उल्लेख केला नसणे, तसेच सदर विकास आराखड्यामध्ये प्रकरण ९.२.६ मध्ये रेल्वे स्टेशन परिसरात वाहनतळाकरिता सार्वजनिक पार्कींगची आवश्यकता असल्याचे नमूद केले असणे, तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार सार्वजनिक वाहनतळाबाबत आय. आय.टी. मुंबई यांनी केलेल्या सर्वेक्षण अहवालात सार्वजनिक वाहनतळ/पार्कींग व्यवस्था वाढविण्याबाबत नमूद केले असणे, परंतू नेरुळ नोड येथील रेल्वे स्टेशन परिसरात तत्कालीन महासभेने मंजूर | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | केलेल्या विकास आराखड्यामध्ये सदर भुखंड क्र.३२ से १०A हा ट्रान्सपोर्टेशन झोन असूनही नवी मुंबई महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने सिडको व पिरॅमिड विकासक यांच्या संगनमताने रहिवास आणि वाणिज्य वापराकरिता असा बदल केला असणे, सदर नेरुळ स्टेशन परिसरात पार्किंगची समस्या गंभीर असताना नवी मुंबई महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने सदर भुखंडाच्या आरक्षणामध्ये बदल केल्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, उक्त प्रकरणी चौकशी करून आरक्षणात बदल करून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करून सदर भुखंड सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेकरिता आरक्षित ठेवण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **८३.** | **४२०** | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.**<br>“ बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित असलेल्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापालिका सर्वसाधारण रुग्णालय, कांदिवली (प.) येथे PGMO तसेच वैद्यकीय अधिकारी यांची अनेक पदे रिक्त असणे, पदे भरण्यास आयुक्त महानगरपालिकांनी आदेश दिले असतानाही सदर रुग्णालयातील वैद्यकीय अधिक्षक आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करूनन PGMO तसेच वैद्यकीय अधिकारी यांची पदे न भरता खाजगी पॅनलच्या माध्यमातून काम करून घेताना तसेच ६ महिन्यांसाठी भरण्यात येणाऱ्या वैद्यकीय अधिकारी वर्गाच्या पदांसाठी सदर काम देताना अनियमितता होत असल्याच्या तक्रारी कन्झ्युमर वेल्फेअर असोसिएशनच्या अध्यक्षांकडून आरोग्य विभागाच्या सचिवांकडे करण्यात आलेली असणे, ६ महिन्यांसाठी | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | नियुक्त केलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांशी रुग्णालयातील वैद्यकीय अधिक्षक यांच्याशी जवळीक असल्याने अधिकारी रुग्णालयात तीन चार महिने उपस्थित राहत नसल्यामुळे अन्य वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कामाचा ताण निर्माण होणे, अनुपस्थित राहणाऱ्या अधिकाऱ्यांबाबत अन्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तक्रार केल्यास त्यांना नाहक त्रास देण्यात येत असणे, रुग्णालयासाठी प्राप्त झालेल्या महानगरपालिकेचा निधी हा रुग्णालयातील देखभाल-दुरुस्ती, रंग काम करणे, मशीन खरेदी करण्यासाठी वापरण्यात येऊन वारंवार तीच दुरुस्तीची कामे त्याच मशीन खरेदी केल्याने अनेक मशीन वापराविना पडून असणे, रुग्णालयातील रुग्णांच्या औषध उपचारासाठी प्राप्त होणाऱ्या निधीचा दुरुपयोग होत असल्याच्या तक्रारी करून सुद्धा कोणतीही कार्यवाही करण्यात येत नसल्याने अन्य वैद्यकीय अधिकारी यांच्या मध्ये शासनाप्रती नाराजीची भावना निर्माण होणे, याबाबत शासनाने सदर तक्रारीच्या अनुषंगाने वैद्यकीय अधिक्षक यांची चौकशी करून चौकशीच्या अनुषंगाने कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| ८४. | ४३५ | **ॲड. निरंजन डावखरे वि.प.स.**<br>" महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ५ जुलै, २०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे विकास नियंत्रण नियमावली मधील, नियम क्रमांक १६५ अंतर्गत " नागरी पुनरुत्थान योजना " (URBA RENEWAL SCHEME) मंजूर करण्यात आली असणे, त्यास अनुसरून ठाणे महानगरपालिकेच्या दिनांक २७ एप्रिल, २०१८ रोजी च्या अधिसूचनेद्वारे ठाणे शहरा अंतर्गत, एकूण ४४ नागरी पुनरुत्थान अभिन्यास (URBA RENEWAL SCHEME) जाहीर करण्यात आली असणे, तदनंतर त्यापैकी ६ अभिन्यासांना दिनांक ९ फेब्रुवारी २०१९ रोजी शासनाची मान्यता प्राप्त झाली असणे, URC म्हणजेच " (URBA RENEWAL SCHEME) " चे अनेक फायदे आहेत, परंतु कुठलाही क्लस्टर हा कमीतकमी १०,००० चौरस मीटर क्षेत्रफळावर राबवता येईल, ही अट जाचक ठरत असणे, विशेषतः शहरी | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१–**पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | भागात इतक्या मोठ्या क्षेत्रफळा करिता भूखंडांचे एकत्रीकरण करणे हे व्यावहारिकदृष्ट्या अशक्य असणे, मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर ठाणे शहरात देखील छोट्या आकाराचे क्लस्टर राबवली जाऊ शकतात, जेणेकरून काही इमारती एकत्र येऊन सामूहिक विकास साध्य करू शकतात व त्या अनुषंगाने शहराचा विकास अधिक सुसह्य होऊ शकणे, एकीकडे क्लस्टरच्या माध्यमातून अनधिकृत इमारतींना संरक्षण मिळत असताना त्यांना मिळणारा अधिकचा भू निर्देशांक (FSI), तर दुसरीकडे अधिकृत जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींना तसा अधिकचा भू निर्देशांक (FSI) मिळत नसणे, त्यामुळे जर मुंबईच्या धर्तीवर लहान क्लस्टररमान्य करण्यात आले तर त्यांनादेखील या योजनेचा लाभ घेता येऊ शकणे, ठाणे शहरातील एकंदर भौगोलिक विकासाची मांडणी पाहता, गावठाण भागात झालेला विकास व नवीन शहरात झालेले ग्रीनफिल्ड प्रोजेक्ट अशी परिस्थिती आपल्या लक्षात येणे, दाटीवाटीच्या जुन्या ठाण्यातील भागात व तुलनात्मक रित्या नव्याने तयार करण्यात आलेल्या निवासी भागांमध्ये एक सारखे नियम लावूनन विकास करत असताना अनेक तांत्रिक समस्या निर्माण होण्याची शक्यता असणे, जुन्या ठाण्यातील इमारतींच्या विकासाकरिता लहान क्लस्टरची निर्मिती करून त्यांनादेखील प्रोत्साहनात्मक निर्देशांक देण्यात यावा व त्यासाठी योजना तयार करण्याकरिता तज्ज्ञ वास्तुविशारद, लोकप्रतिनिधी, व प्रशासकीय अधिकारी अशी समिती तयार करण्याची आवश्यकता असणे, शासनाने उक्त प्रकरणी निर्णय घेऊन कार्यवाही करण्याची आवश्यकता, यावर शासनाची प्रतिक्रिया. ” | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८५. | ४६० | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.**<br>" वडाळा (मुंबई) येथील " Vertu " या इमारतीचे ३५ मजल्याचे बांधकाम अनधिकृतरित्या केलेले असणे, इमारत बांधण्यास २७ मजल्यांची परवानगी असताना सदरहू विकासकाने ३५ मजल्याचे बांधकाम केले असणे, शासनाकडून देण्यात आलेल्या भोगवटा प्रमाणपत्रामध्ये (OC) देखील २७ मजल्याकरिता परवानगी देण्यात आल्याचे नमूद केले असणे, सदरहू इमारतीच्या बांधकामाकरिता शासनाकडून २.५ ते ३ चे चटई क्षेत्रफळ निर्देशांकाची (F.S.I) मान्यता देऊनही उक्त विकासकाने ५ चा चटई क्षेत्रफळ निर्देशांक (F.S.I) वापरला असणे, इमारतीच्या बांधकामासंदर्भात शासनाच्या अग्निसुरक्षा प्रतिबंधात्मक नियमावलीनुसार मुंबईतील उंच इमारतीत अग्निसुरक्षा यंत्रणा तसेच अग्निसुरक्षा प्रतिबंधात्मक तंत्रज्ञानाची तपासणी अग्निशमन विभागाकडून प्रमाणपत्र अनिवार्य असतानाही अद्यापी प्राप्त करून घेतलेले नसणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी नागरिकांची सदनिका घेताना फसवणूक होण्याची शक्यता, याबाबत शासनाने चौकशी करून अनधिकृत बांधकामास परवानगी देणारे अधिकारी व अनधिकृतपणे बांधकाम करणाऱ्या विकासकावर कारवाई करून अनधिकृत मजल्यांचे बांधकाम निष्कासीत करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. " | | |
| ८६. | ४८० | **ॲड. अनिल परब वि.प.स.**<br>" मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी सन २०२२ मध्ये राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याची गंभीर बाब माहे डिसेंबर २०२२ मध्ये निदर्शनास येणे, सदरहू प्रकल्पासाठी २०१८ मध्ये राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये सेकलिंक टेकनॉलॉजी कंपनी सर्वात जास्त म्हणजेच रुपये ७२०० कोटी रुपयांची बोली लावत प्रथम क्रमांकावर असणे तर अदानी समूह दुसऱ्या क्रमांकावर असणे, तथापि सदरहू प्रकल्पासाठी | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | रेल्वेची अतिरिक्त ४५ एकर जमीन उपलब्ध झाल्याचे सांगून सन २०१८ मधील निविदा प्रक्रिया रद्द करणे, राज्य शासनाद्वारे अशा प्रकारे मनमानी पद्धतीने व कुहेतूपूर्वक सन २०१८ मधील निविदा प्रक्रिया रद्द करणे म्हणजे राज्य शासनाने प्रॉमिसरी एस्पॉटल नैसर्गिक न्यायाचे तत्त्वांचे भंग झाला असल्याचे कायदे तज्ज्ञांचे म्हणणे असणे, सन २०२२ मध्ये नव्याने राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये सेकलिंक टेक्नोलॉजी कंपनीला सहभागी होता येणार नाही यादृष्टीने निविदेच्या व अटींमध्ये व शर्थीमध्ये बदल करणे, त्यामुळे सन २०२२ मध्ये राबविण्यात आलेल्या निविदाप्रक्रियेत अदानी समूहाने रुपये ५०६९ कोटी रुपयांची बोली लावत प्रथम क्रमांक असणे, परिणामी सन २०१८ मध्ये राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत सेकलिंक टेक्नोलॉजी कंपनीने रुपये ७२०० कोटींच्या बोलीच्या तुलनेत अदानी समूहाच्या रुपये ५०६९ कोटींच्या प्राप्त बोलीमुळे राज्य शासनाचे २१३१ कोटी रुपयांचे नुकसान होणे, सदरहू निविदेमध्ये शासन निर्णय विकास नियंत्रण नियमावली यात फेरबदल करण्यात न येणे, पुनर्विकासानंतर राहत्या जागेत घर मिळण्याची शक्यता कमी असणे, तसेच सभासदांना मोफत पार्किंग व जेथे आहे त्याच ठिकाणी संक्रमण शिबिर बांधून त्यांचे स्थलांतरण करण्यात येणार नसणे, कॉरपस फंड २००० प्रति चौ.फू. न मिळणे, पुनर्विकास झाल्यानंतर घर मालकी हक्काने देण्यात येणार नसणे, तसेच व्यावसायिक गाळेधारकांचा पुनर्विकास नियमाप्रमाणे न होणे, सदरहू पुनर्विकास प्रकल्प राबविताना , मूळ रहिवाशांना विश्वासात न घेणे, त्यांचे म्हणणे ऐकून न घेणे, परिणाम स्थानिकांमध्ये. शासनाविषयी प्रचंड नाराजी असणे. सदरहू प्रकल्प शासनाचा व स्थानिक जनतेच्या हिताचा होईल या दृष्टीने सन | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | २०२२ मध्ये काढण्यात आलेली निविदा प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्याची नितांत आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया. ” | | |
| **८७.** | **४८५** | **श्री. सुनिल शिंदे,श्री.** विलास पोतनीस **वि.प.स.**<br>“ माहे नोव्हेंबर २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास, पुणे मनपाच्या पाणीपुरवठा, पथ, घनकचरा व्यवस्थापन, प्रकल्प विभाग, ड्रेनेज, विद्युत प्रकल्प इ.विभागांसाठी नियुक्त केलेल्या सल्लागारांना ६७ कोटी रुपये फी देण्यात आल्याचे उघडकीस येणे, पथ विभागाने ३३ कोटी, प्रकल्प विभागाने १० कोटी, ड्रेनेज विभागाने १४ कोटी सल्लागारांवर खर्च करणे, वैकुंठ स्मशानभूमीतील शवदाहीनीमुळे होणारे प्रदूषण कमी करण्याकरिता ३५ लाख रुपये खर्च करून एक ईपीसी सिस्टीम बसविण्यात येणार आहे, या सल्ल्यासाठी मनपाने १५ लाख रुपये सल्लागाराला दिल्याचे उघडकीस येणे, पुणे मनपामध्ये मनपा आयुक्त, अतिरिक्त आयुक्त तसेच अन्य शेकडो अधिकारी हे उच्च शिक्षित असून गेली अनेक वर्षे महापालिकेत काम केलेले असताना, बाहेरच्या व्यक्तीला सल्लागार म्हणून नेमून त्यांच्यावर करण्यात आलेला खर्च, यामध्ये सल्लागार नेमणेबाबत शिफारस केलेले राजकीय पक्ष व प्रशासकीय अधिकारी यांचे सल्लागार पुरविणाऱ्या कंपन्या वा सल्लागारांशी असलेले आर्थिक हितसंबंध यामुळे गेल्या दहा वर्षात सल्लागार नेमून त्यावर ६५ कोटी रुपये खर्च करण्यात आल्याने पुणे मनपाला कर भरणाऱ्या लाखो करदात्यांच्या मनात मनपाच्या या भोंगळ व बेहिशोबी कारभाराबद्दल निर्माण झालेली तीव्र चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |
| **८८.** | **५००** | **श्री. अमोल मिटकरी,श्री.** विक्रम काळे,श्री. शशिकांत शिंदे,श्री. सतिश चव्हाण **वि.प.स.**<br>“ नागपूर येथील अंबाझरी तलावाशेजारील नागपूर महानगरपालिकेस अंदाजे ६० वर्षांपूर्वी आंवटीत ४४ एकर जमिनीवर बांधलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक व उद्यान | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | परिसरातील जमीन, जिल्हाधिकारी, नागपूर यांनी महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांना दि.२० सप्टेंबर,२०१७ रोजीच्या आदेशान्वये देण्यांत येणे, तथापि भाडे पट्टयावर देण्याचा आदेशाचे अटी व शर्थीचा भंग झाल्याचे निदर्शनास येणे, या आदेशातील अटी व शर्थीचा भंग करून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांनी कोणतीही शासन मान्यता नसताना खाजगी कंपनीला अनुचित लाभ मिळवून देण्यासाठी बेकायदेशीरपणे शासनाची दिशाभूल व फसवणूक करून मेसर्स गरुडा अम्युझमेन्ट पार्क या खाजगी कंपनीस हस्तांतरित केल्याचे आढळून येणे, मेसर्स गरुडा अम्युझमेन्ट पार्क या कंपनीने देखील कोणत्याही शासकीय अधिकाऱ्यांची परवानगी न घेता अचानकपणे अंबाझरी तलाव परिसरातील जुने डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन उध्वस्त केल्याचे आढळून येणे, त्यामुळे मेसर्स गरुडा अम्युझमेन्ट पार्क या कंपनीच्या संचालकांवर गुन्हे दाखल करून त्यांना अटक करण्याची तेथील नागरिकांकडून मागणी करणे, तथापि शासनाने अद्याप कारवाई केलेली नसणे, परिणामी त्या परिसरातील मागासवर्गीय संविधान प्रेमी,प्रबुद्ध नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व शासनाप्रति चिडीची भावना,तसेंच त्यासंदर्भात दिनांक २० मार्च, २०२२ रोजी विधान भवन, नागपूर येथे जनमोर्चा काढण्याचा घेतलेला निर्णय, त्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| **८९.** | **५१०** | **श्री. श्रीकांत भारतीय वि.प.स.**<br>“ नागरी जमीन कमाल धारणा कायदा व विनिमय अधिनियम, १९७६ हा कायदा रद्द झाल्यानंतर या अधिनियमाच्या कलम २० अन्वये रेडीरेकनरच्या १५ टक्के रक्कम भरून या | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | अंतर्गत येणारी जमीन ही फ्री होल्ड प्रॉपर्टी करता येणे, या अधिनियमाच्या अंतर्गत राज्यात असणाऱ्या नऊ ठिकाणच्या जमिनीपैकी अनेक जमिनी २०१९ च्या शासन निर्णयानुसार रेडीरेकनरच्या १५ टक्के रक्कम भरून फ्री होल्ड करून घेत नसणे, या अधिनियमांतर्गत येणाऱ्या जमिनींना कलम २० अन्वये (ULC) ची परवानगी न घेता हस्तांतरित अथवा विकसित करण्याकरिता स्थानिक नागरी स्वराज्य संस्थांकडून बेकायदेशीररित्या बांधकाम परवानगी मिळाली असणे, कलम २० अन्वये पैसे न भरता बांधकाम परवानगी देणाऱ्या संबंधित संस्था अथवा व्यक्तीवर शासनाकडून कोणत्याही कारवाई न होणे, यामुळे शासनाचा हजारो कोटींचा महसूल बुडणे, बुडालेला महसूल शासनाने संबंधित कंपनी अथवा व्यक्तिद्वारे वसूल न करणे, यामुळे भविष्यात (ULC) अधिनियमाच्या कलम २० अंतर्गत परवानगी न घेता जमीन हस्तांतरण व बांधकाम करणाऱ्यासंबंधी तातडीने शासनाचे धोरण आखण्याची आवश्यकता, व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ” | | |
| ९०. | ५२५ | **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप वि.प.स.**<br>“ मुंबई महानगरपालिकेतील प्रशासनाकडून येथील सफाई कामगारांची फसवणूक केली जात असणे, या मृत निवृत्त कामगारांच्या वारसांना वारस हक्काप्रमाणे नोकरी दिली जात नसणे, या कामगारांना भविष्य निर्वाह निधी पेन्शन, ग्रॅच्युइटीचे पैसे दिले जात नसणे, तसेच या कामगारांना या विम्याचे एक लाख रुपयेही देण्यात न येणे, या संदर्भात कामगार काही वर्षापूर्वी मा. सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यासाठी जाणे, त्यावेळी मा. सर्वोच्च न्यायालयाने या कामगारांच्या बाजून निवाडा देणे, मात्र आदेश दिल्यानंतरही अद्याप या मा. न्यायालयात दाद मागण्यासाठी गेलेल्या २७०० कामगारांना कायम करण्यात आलेले नसणे, हा सर्वोच्च आदेशांचा भंग असणे, सदर कर्मचारी पालिका प्रशासनाला सातत्याने अर्ज-विनंत्या, निवेदने देत असणे, विविध आंदोलने करीत असणे, मात्र या कामगारांना न्याय देणेबाबत शासनाकडून | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

## विवरण क्रमांक २१–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी या कामगारांत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्यशासनाची [illegible] ” | | |
| ९१. | ५३६ | **श्री. नागोराव गाणार,श्री.** प्रविण दरेकर,श्री. प्रसाद लाड,श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री. रमेशदादा पाटील,श्री. रमेश कराड,श्री. रामदास आंबटकर,श्री. प्रवीण दटके,श्रीमती उमा खापरे,श्री. चंद्रशेखर बावनकुळे,ॲड. निरंजन डावखरे **वि.प.स.**<br>“ राज्यात पुणे जिल्ह्यातील पिंपरी चिंचवड शहरात लहान मुलांना बालशिक्षण हा विषय डोळ्यासमोर ठेवून उभारण्यात येणारा बालनगरी प्रकल्पाच्या एका टप्प्याचे काम पूर्ण झाल्यावर गुंडाळण्यात आल्याची बाब माहे डिसेंबर २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास येणे ,त्यामुळे करदात्यांच्या २० कोटी रुपयांचा चुराडा होणार असणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने बालनगरी प्रकल्पावर केलेला कोट्यावधी रुपयाचा खर्च वाया जाणार असने, भोसरी एमआयडीसीतील जे ब्लॉक अंतर्गत मोकळ्या जागेतील भूखंड हा ताबा पावती द्वारे सन १९८४ मध्ये महापालिकेकडे एमआयडीसी कडून हस्तांतरित झाला त्याचे क्षेत्रफळ ६० हजार ३७८चौरस मीटर (सुमारे १५ एकर )असणे ,या भूखंडावर आरक्षण विकासाच्या अनुषंगाने बालनगरी प्रकल्प करण्याचे ठरले त्याप्रमाणे महापालिकेने खर्च करणे, त्यामुळे लहान मुलांना बालशिक्षण मिळणार असतानाही प्रशासन कडून त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने पालकांच्या मनामध्ये नाराजी व्यक्त होत असणे ,यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९२. | ५४२ | **डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे वि.प.स.**<br>“ पाचोरा जि.जळगांव येथील पाचोरा नगरपरिषदेच्या हद्दीतील शहर विकास आराखड्यास दिनांक २०/२/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार मंजुरी देऊन विकास आराखडा पाचोरा शहरासाठी शासन निर्णय प्रसिद्ध झाल्यानंतर नगरपरिषद अंमलात आलेला असणे, नगरपालिका प्रशासन व नगररचना यांच्यामार्फत प्रत्येक वीस वर्षानंतर शहराच्या गरजा व शहर विकासाच्या अनुषंगिक बाबीचा विचार करून नागरिकांचे जीवनमान उंचविण्याकरिता विकास आराखडा तयार करणे गरजेचे असणे, विकास आराखड्यात शहरासाठी आवश्यक आरक्षणे महाराष्ट्र नगररचना अधिनियम, १९६६ नुसार आखुन दिलेल्या विविध प्रक्रियेतून जाऊन मगच त्यास अंतिमतः मान्यता शासनाकडून मिळणे आवश्यक असणे, त्यानुसार सदर विकास आराखड्यास अंतिम मंजुरी देतांना कायद्याच्या सर्व प्रक्रिया पार पाडल्या जात असणे, सदर विकास आराखड्याच्या प्रारुप रचनेस जाहीर प्रसिद्धी देऊन जनतेच्या व जमीन मालकांच्या हरकती मागविण्यात येणे. नियोजिन प्राधिकरणाने त्यावर विहित मुदतीत आक्षेप व हरकती स्वीकारण्यात येणे, अंतिम विकास आराखडा व त्यात आरक्षित केलेल्या जमिनीवर पुढील वीस वर्षाच्या काळातील शहर विकासाचे साचेबद्ध नियोजन करूनच सदरचा आराखडा कायद्याने संमत करून त्यानुसार पाचोरा नगरपरिषद सद्यस्थितीमध्ये त्याची अंमलबजावणी करीत असणे, महाराष्ट्र नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ मध्ये विकास आराखड्यातील कांही आरक्षणे व्यपगत करण्याची तरतूद करण्यात येणे, मात्र सदरची आरक्षणे व्यपगत करतांना शहर विकासासाठी पुढील वीस वर्षाचे विकासाचे नियोजनाला बाधा येईल असे बदल करता येत नसणे, एकाच वेळेस सुमारे ९ ते १० आरक्षणे वगळून शहराच्या विकासासाठी ज्या उद्देशांसाठी सदर जमिनीवर आरक्षण टाकले होते त्या उद्देशासाठी भविष्यात कोणत्याही इतर जमिनी आरक्षित न करता ते आरक्षणे व्यपगत करणे बेकायदेशीर | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | व विकासाच्या विरोधात केलेले कृत्य असणे, त्यामुळे महाराष्ट्रातील इतर अनेक नगर परिषदांच्या अश्याच चुकीच्या आरक्षण व्यपगत करण्याच्या प्रस्तावाना विरोध केलेला असणे ,वास्तविक सर्व कायदेशीर तरतुदी व प्रस्तुच्या विकास आराखड्यातून लोककल्याण व सार्वजनिक उद्देशांसाठी कायदेशीर मार्गाने आरक्षित केलेले जमिनीवरील आरक्षण हे तसेच अत्यंत महत्वाचे कारण असल्याशिवाय व्यपगत करू नये असे मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालये यांचे अनेक स्पष्ट न्यायालयीन निकाल असतांना उक्त कायद्याच्या तरतुदीच्या विरुद्ध जाऊन दिलेला निर्णय, कोविड-१९ चा फायदा घेऊन ऑनलाईन सभांच्या नावाखाली खोटे व चुकीचे ठराव करून सदरहू जमिनीवरचे आरक्षण व्यपगत करून सुमारे २०० कोटीचा आर्थिक फायदा मिळविण्याकरिता मुख्याधिकारी, तत्कालिन नगराध्यक्षष यांच्या संगनमताने सदरहू बेकायदेशीर गैरकारभार करण्यात येणे, विकास आराखडा मंजूर केल्यावर त्यात बदल करण्यासाठी नियोजन प्राधिकरणाने लोकांचे आक्षेप मागविणे अग्रप्राप्त असणे, विदयमान आरक्षणे रद्द करण्याच्या प्रक्रियेत लॉकडाऊनचा गैरफायदा घेऊन कमी खपाच्या वर्तमानपत्रात जाहिराती देऊन हे सर्व कारस्थान गोपनीय ठेवण्याचा केलेला प्रयत्न, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबात शासनाने गांभीर्याने सखोल चौकशी करून मौजे पाचोरा, जि.जळगाव शहराच्या नगरपरिषद हद्दीतील शहराच्या शहर विकास आराखड्यातील शहर विकासासाठी राखीव केलेले सुमारे ८ ते १० आरक्षणे महाराष्ट्र नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ नुसार व्यपगत कररण्याच्या बेकादेशीर प्रक्रियेस तातडीने रद्द करण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. ” | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९३. | ५५१ | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.**<br>“ नाशिक महानगरपालिकेने गेले तीन वर्षात रस्त्याचे बांधकाम व डांबरीकरणाच्या कामात सुमारे २७ कोटी रुपये खर्च करूनही सदरहू रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे बांधकाम व यामध्ये करण्यात आलेल्या भ्रष्टाचारामुळे अल्पावधीतच शहरातील संपूर्ण रस्त्यावर असंख्य खड्डे पडल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणात शहरात सुमारे सहा हजार खड्डे आढळून येणे, म्हणजेच महापालिका प्रशासनाने आपत्कालीन निधी म्हणून तरतूद केलेल्या निधीतून एक खड्डा बुजविण्यासाठी जवळपास सुमारे ४५ हजार रुपये इतका शासकीय निधी खर्च करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, महापालिकेने खड्डे बुजविण्यावर निधी खर्च करणे, परंतु शहर अभियंता यांनी रस्त्याची डागडुजी करताना निकृष्ट दर्जाचे बांधकाम करून भ्रष्टाचार केलेल्या एकाही ठेकेदारावर कारवाई न करणे, शहरातील असंख्य खड्डयांमुळे शहरातील नागरिकांचे आणि वाहनचालकांना नाहक त्रास सहन करावा लागणे, त्यांना कमरेचे व मणक्याचे आजार होऊन त्यांचे स्वास्थ्य बिघडणे, तसेच खड्डयांमुळे वाहतुकीची कोंडी होऊन प्रवासी जनतेच्या वेळेचा प्रचंड अपव्यय होऊन त्रासदायक ठरणे, कारवाई पासून वाचविणाऱ्या पालिकेच्या सबंधित अधिकारी आणि दोषी ठेकेदारांवर शासनाने उच्च स्तरावरुन दखल घेऊन कारवाई करण्याची आवश्यकता, शासन तथा महापालिका प्रशासनाने दोषी ठेकेदारावर कारवाई न केल्याने शासनाचा रस्त्याच्या बांधकामांवर खर्चच झालेल्या कोटयवधी रुपये निधीचा झालेला अपव्यय, यास्तव सदर ठेकेदाराला तात्काळ काळ्या यादीत टाकून त्याचा परवाना रद्द करण्याची व सबंधित शहर अभियंता/उपअभियंता यांना ताबडतोब निलंबित करून त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | शहरातील त्रस्थ जनतेत निर्माण झालेले तीव्र संतापाचे व असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ” | | |
| **९४.** | **५७४** | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.** | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |
| | | “ नागपूर सुधार प्रन्यास (एनआयटी) च्या माध्यमातून गुंठेवारी कायद्यानुसार सुरू असणाऱ्या नियमितीकरणात आर्थिक गैरव्यवहार झाला असून अनधिकृतपणे मागील दिनांकाचे स्टॅम्प पेपर घेऊन जमीन मालक व भूखंड धारक यांचे खोटे करार दाखवून भूखंड वाटप करण्यात आलेले असणे, नागपूर सुधार प्रन्यासमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मालमत्तेचे लेखापरीक्षण करून गुंठेवारी कायद्यान्वये अंमलबाजावणी करत भूखंड वाटप करण्यात येत असल्याबाबत लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे तक्रारी करण्यात आलेल्या असणे, सदर तक्रारींच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसणे, महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम, २००१ मधील तरतुदीच्या अगोदरची कागदपत्रे सादर करून करण्यात आलेल्या खोट्या कराराबाबत शासनाकडून कोणतीही चौकशी करण्यात येत नसल्याने जनतेत नाराजीची भावना निर्माण होणे, याबाबत सदर कागदपत्रांची तपासणी करून करार कधी दाखविण्यात आला, कोणत्या वर्षाचे स्टॅम्प पेपरचा वापर करण्यात इ.बाबतची सखोल चौकशी करून संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९५. | ५७९ | **श्री. प्रवीण दटके वि.प.स.** यांच्या **लक्षवेधी सूचना क्र.** वरील निवेदन **मुख्यमंत्री** सभागृहासमोर ठेवतीलः-<br>“ नागपूर शहरात भाडेपट्टे सन १९१० पासून देण्यात आले असणे, मूळ भाडेपट्ट्यांचे अवलोकन केल्यास १०० वर्षांपूर्वी रु.२१५० इतके प्रीमियम घेऊन स्थायीभाडे पट्टे देण्यात आले असणे, सदर भाडेपट्यात हस्तांतरणाची मुभा दिलेली असणे, यावरून सर्व भाडेपट्टे मालकी स्वरूपाचे असल्याचे स्पष्ट असणे, रेडिरेकनर दराने सुरुवातील ०.०२% असणारे भूभाडे रकमेत ८० पट इतकी प्रचंड वाढ करून प्रचलित ०.०२% असताना त्यात ८% टक्के इतकी वाढ होणे अन्यायकारक असणे, अनधिकृत हस्तांतरण, अनधिकृत वापरात बदल, नुतनीकरणाचा अर्ज उशिरा करणे आणि बांधकाम पूर्वपरवानगी न घेतल्यास करण्यात येणारा दंड आदी विषयांकरिता भूखंड परत घेण्याची तरतूद चुकीची असणे, संदर्भित विषयांवर भूखंडधारकांचे कोणतेही हित न लक्षात घेता अटी व शर्तीमध्ये बदल होत असल्याने भूखंडधारकांमध्ये वाढत जाणारा तीव्र असंतोष, भूखंड धारकांवर अन्याय न होता भूभाडे आकारणीबाबत भूखंड धारकांचे हित लक्षात घेऊन सुधारित धोरण जाहीर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |
| ९६. | ६०९ | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.**<br>“ सिन्नर नगरपरिषदेने पाणीपुरवठा योजनेच्या दुरुस्ती करिता रु.७२ लक्ष खर्चाला सर्वसाधारण सभेत मान्यता देऊन दिलेली मंजुरी, सदरचा खर्च हा अवास्तव व लोकसंख्येच्या प्रमाणात झालेला नसणे, सदरची योजना ही पूर्णत्वास आलेली नसताना ठेकेदारास बिल अदा करणे ही बाब संशयास्पद असल्याचे निदर्शनास येणे, तसेच घनकचरा व्यवस्थापनासाठी कुठल्याही प्रकारच्या निविदा प्रक्रियेचा अवलंब न करता मर्जीतल्या लोकांच्या जमिनी बाजारमूल्य दरापेक्षा अधिक दराने खरेदी करणे, याबरोबरच शहरातील सरस्वती नदीपात्राचे सौंदर्यीकरण | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | व सुशोभिकरण करणेकरिता वैशिष्ट्यपूर्ण निधीतून १.७५ कोटींची मान्यता मिळालेली असताना प्रत्यक्षात कुठलेही काम झालेले नसणे, याउलट नदीपात्रात बाहेरुन माती, मुरुम आणून नदीपात्राची रुंदी कमी करणे, कामाची बिले ही संबधित ठेकेदारास अदा केल्याची बाब समोर येणे, अशाच पद्धतीने दयानंद बारादारी मठ बांधणे हे काम देखील पूर्ण झालेले नसताना ठेकेदारास बिले अदा केलेले असणे, नगरपरिषद हद्दीत सुर्वोदय संकुलाचे इमारतीस पार्किंगची व्यवस्था न करता आर्थिक संगनमत करून बांधकाम करण्यास परवानगी देणे व पूर्णत्वाचा दाखला देणे, याबाबतची चौकशी होऊन मुख्याधिकारी यांचेवर कार्यवाही करण्याची आवश्यकता, वरील सर्व बाबींचे ऑडिट करताना जबाबदारी निश्चित करण्याची गरज, तसेच गैरव्यवहाराची चौकशी करून संबधितांकडून वसुली होणे गरजेचे असणे, तसेच अतिवृष्टीमुळे शहराच्या मध्यवर्ती भागातून वाहणाऱ्या सरस्वती नदीला महापूर येऊन नदी काठावर असणाऱ्या झोपडीधारकांची १९५ घरे व दुकानदारांची १८४ दुकाने वाहून जाणे, अतिक्रमित झोपडपट्टीधारक व दुकानदार या सर्वांना नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता, त्याचप्रमाणे महिला नगरसेविका व कर्मचारी यांचेशी अत्यंत उद्धट व बेजबाबदारपणे बोलणे, या संदर्भात राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडे प्रत्यक्ष भेटून दिलेली निवेदने, या संदर्भात मुख्याधिकारी यांना तातडीने बडतर्फ करून त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक खात्यामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी व याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ” | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९७. | ३९४ | **अॅड. अनिल परब वि.प.स.**<br>“ पुणे शहरातील मुंबई-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावर कात्रज जवळ असलेल्या नवले पुल या अत्यंत उताराच्या रस्त्यावर कात्रजकडून शहरात येणाऱ्या एका मालवाहू ट्रकने दि.२०/११/२०२२ रोजी ४० ते ५०२, ३ व ४ चाकी वाहनांना ठोकरल्याने अनेक नागरिक जखमी, त्यामध्ये एका व्यक्तीचे झालेले निधन, त्यानंतर सलग सहा ते आठ दिवसांत त्याच रस्त्यावर व नवले पुलाच्या आसपास दररोज कमीत कमी एक व जास्तीत जास्त तीन अपघात घडून अनेक वाहनांचे झालेले नुकसान, तसेच चालक व प्रवासी जखमी झाल्याच्या घडलेल्या घटना, चांदणी चौकात दररोज होत असलेल्या वाहतूक कोंडीचा फटका मा. मुख्यमंत्री यांना बसल्यानंतर तेथील वाहतूकीत सुधारणा करण्याच्या उपाययोजना करूनसुद्धा सकाळ, संध्याकाळ होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे पुणे शहरातील शेकडो २, ३ व ४ चाकी वाहनचालक या वाहतूक कोंडीत सापडत असल्याने त्यांचा वेळ, पेट्रोल, डिझेल इ. ची लाखो रुपयांची रोज होत असलेली हानी, २० तारखेच्या भिषण अपघातानंतर सर्व्हीस रोडवरील टपऱ्या, हॉटेल्स, बार, गॅरेज इ.ची अतिक्रमणं हटविण्याचे प्रशासनाला सुचलेले शहाणपण, अतिक्रमणं होत असताना त्याकडे हेतूत : करण्यात आलेले अक्षम्य दुर्लक्ष, नवले पुल ते कात्रज घाट या परिसरात सुमारे ५० ते ६० हॉटेल्स, ३० ते ३५ लॉज व २२ ते २५ बार सुरू असल्यामुळे वाहतूक कोंडीत पडणारी भर, नवले पुलाजवळील कात्रज भोकद्याच्या दिशेने रस्त्याला असलेला उतार तातडीने कमी करणे अथवा अन्य उपाययोजना करून दैनंदीन अपघात रोखण्याकरिता पोलीस, सार्वजनिक बांधकाम इ. विभाग करत असलेल्या तुटपुंज्या कारवाई बद्दल पुणे शहर व जिल्ह्यातील तसेच या मार्गावरून प्रवास करणाऱ्या लाखो प्रवासी व वाहनचालकांच्या मनात निर्माण झालेला तीव्र असंतोष, चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **९८.** | **५१२** | **श्री. सुनिल शिंदे,** श्री. विलास पोतनीस **वि.प.स.**<br>“ मुंबई- नागपुर हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेसमृद्धी महामार्गावरील शिर्डी ते नागपूर या टप्प्याचे लोकार्पण माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते दि. २३ डिसेंबर २०२२ रोजी होणे, तथापि सदरहू महामार्गावर काही ठराविक अंतरावर पेट्रोल-डिझेल पंप, हॉटेल, रेस्टॉरंट, स्वच्छता गृह, आपतकालीन स्थितीत लागणाऱ्या वैद्यकीय सुविधा यांसारख्या मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध नसणे, प्रवाशांच्या मदतीसाठी देण्यात आलेले गस्ती पथक अपर्याप्त असणे, शिर्डी नागपूर या ५२० कि.मी. महामार्गावर संपूर्ण प्रवासात केवळ एक पेट्रोल पंप उपलब्ध असून तो देखील प्रत्यक्ष महामार्गवर नसणे, उक्त मूलभूत सुविधा उपलब्ध करून न देता सदरहू महामार्ग वाहतूकीसाठी सुरू करण्याचा राज्य शासनाने घेतलेला निर्णय प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिने अयोग्य असणे, परिणामी सदरहू महामार्गावर प्रवास करणारे मुले, ज्येष्ठ नागरिक, महिला, अपंग व्यक्ती इ. यांची गैरसोय होणे, सदरहू महामार्गावर भविष्यात घडणारे संभाव्य अपघात विचारात घेऊन व प्रवाशांची एकूण सुरक्षा विचारात घेऊन त्या ठिकाणी काही ठराविक अंतरावर वैद्यकीय सुविधांसह इतर मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याची नितांत आवश्यकता, तसेच उवरित महामार्ग लवकरात लवकर पूर्ण करण्याची गरज, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९९. | ४२६ | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.**<br>" तारापूर येथील औद्योगिक वसाहती मध्ये सद्यःस्थितीमध्ये १५०० पेक्षा जास्त कारखाने सुरू असणे, उक्त कारखान्यांमधून निघणारे सांडपाण्याचे व्यवस्थापनेसाठी तारापूर पर्यावरण संरक्षण संस्था (TEPS) या कंपनी कायद्यांतर्गत नोंदणीकृत संस्थेमार्फत २५ mld व ५० mld असे दोन प्रकल्प तयार करण्यात आले असून २५-MLF प्रकल्प हा औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया करण्याकरिता सक्षम नसल्याने ५० mld प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली असणे, प्रकल्प उभारण्याकरिता महाराष्ट्र औद्योगिक वसाहतीतील २१ एकर भूखंडावर परवानगी देण्यात आली असून उक्त भुखंडापैकी १४ एकर जमिनीवर सदरहू प्रकल्प उभा करण्यात आला असून ७ एकर हरित पट्ट्यासाठी राखीव ठेवण्यात येणे, सदर प्रकल्पासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून २०% अनुदान देण्यात आले असणे, परंतू उक्त प्रकल्पाचे काम तारापूर पर्यावरण संरक्षण संस्थेने (TEPS) कोणत्याही प्रकारचे निविदा व अंदाजी अभिप्राय न मागविता सदरहू प्रकल्पातील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याचे कंत्राट एरनेस्ट ॲण्ड यंग एलएलपी या कंपनीस दिलेले असणे, त्यासाठी उक्त कंपनीस तारापूर पर्यावरण संरक्षण संस्था (TEPS) यांचेकडून दरमाहा ९ लाख रुपये देण्यात येणे, तसेच एरनेस्ट ॲण्ड यंग एलएलपी या कंपनीत काम करणाऱ्या संबंधितांना तारापूर औद्योगिक वसाहत क्षेत्रात असलेल्या पंचतारांकित हॉटेल मधील दर महिन्याचे २.२५ ते २.५० लाख इतके देयके तारापूर एन्व्हायर्नमेंट प्रोटेक्शन सोसायटी (TEPS) यांचेकडून देण्यात येणे, सदरहू कंपनीचे कर्मचारी हे तारापूर औद्योगिक वसाहतीतील मधील रासायनिक कारखाने व हाय सीओडी च्या नावाखाली कारखान्याना धमकावून पैशाची मागणी करीत असणे, कारखानदार देखील आपल्या कंपनीला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कंपनीस बंद करण्याचे निर्देश येऊ नये यासाठी तडजोड करीत असणे, तसेच सद्यःस्थितीमध्ये मे.बजाज हेल्थ केअर | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | प्रा.लि. या कंपनीने नाल्यात रासायनिक सांडपाणी सोडल्याच्या कारणावरुन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेकडून कारवाई होऊ नये याकरिता सदरहू कंपनीच्या कर्मचाऱ्याने मध्यस्थी केल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे उक्त परिसरातील उद्योगधंदे परराज्यात जाण्याची शक्यता निर्माण होणे, तसेच तारापूर पर्यावरण संरक्षण संस्था (TEPS) यांचेकडे सदरहू कामासाठी दोन अधिकारी असताना नवीन कंत्राटट दिलेले असणे, तारापूर एन्व्हायर्नमेंट प्रोटेक्शन सोसायटी (TEPS) व एरनेस्ट ॲन्ड यंग एलएलपी सारखी कंपनी असताना देखील दररोज कोणत्यातरी कंपनीचे नमुने हाय सीओडी असल्याचे सांगून तारापूर पर्यावरण संरक्षण संस्थेच्या (TEPS) बोर्डाकडे तक्रार दाखल करण्याचे काही दलाल करीत असणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी उद्योजकांमध्ये तसेच स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, तारापूर पर्यावरण संरक्षण संस्था (TEPS) यांचेकडे सदरहू कामासाठी दोन अधिकारी असताना नवीन कंत्राट दिल्याची चौकशी करून त्यांचेवर कारवाई करून करार रद्द करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **१००.** | **५९१** | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.** “ तारापूर औद्योगिक वसाहतीमधील कंपन्यामधून प्रक्रिया न केलेले प्रदूषित रसायनयुक्त सांडपाणी छुप्या पद्धतीने समुद्रात सोडले जात असणे, जुन्या पाईपलाइन मधून किनाऱ्यालगत हे प्रदुषित पाणी सोडले गेल्याचे दिनांक २४ डिसेंबर, २०२२ रोजी निदर्शनास येणे, गत अनेक वर्षापासून तारापूर औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांमधून ३५ ते ४० एमएलडी इतके प्रदूषित सांडपाणी सोडले जाणे, यामुळे सातपाटी, नवापूर, दांडी, उच्छेळी व मुरबे या | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

परिसरातील खाड्यांमधील जैवविविधता नष्ट होत असून शेतीही नापिक झाली असणे, देशातील सर्वात जास्त प्रदूषण करणारी औद्योगिक वसाहत म्हणून तारापूर औद्योगिक वसाहतीची ओळख असणे, प्रदुषणकारी कारखानदार आणि त्याला असलेला काही स्थानिक व प्रदुषण महामंडळाच्या अधिकाऱ्यांचा असलेला पाठिंबा, रासायनिक पाण्याविरोधात स्थानिक नागरिकांनी एमपीसीबी, एमआयडीसी व सीईटीपीच्या कार्यालयावर मोर्चे व आंदोलन केले असणे, परंतू उक्त कार्यालयाच्या अधिकाऱ्यांचे होत असलेले जाणीवपुर्वक दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरिकांच्या आरोग्याचा निर्माण झालेला प्रश्न, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून प्रदूषण करणाऱ्या कारखान्यावर व त्यांना पाठिंबा देणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

१०१. १३७ **श्री. अनिकेत तटकरे वि.प.स.** — ३० डिसेंबर, २०२२ — चर्चा झाली नाही

“ चिपळूण तालुक्यातील तिवरे धरण (जि.रत्नागिरी) फुटून तीन वर्षांचा कालावधी होऊनही ३६ कुटुंबांना अद्यापही शासनाने घरे दिली नसल्याचे दि.१७ नोव्हेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, तसेच धरण फुटीनंतर माहे जानेवारी,२०२२ मध्ये वा त्यासुमारास त्याठिकाणी नवीन धरण बांधण्याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे प्रस्ताव दिल्यानंतर तत्कालीन शासनाने त्यासाठी ९ कोटी रुपये निधीची तरतूद देखील करण्यांत येणे, तथापि विद्यमान शासनाने कामांना स्थगिती दिल्यामुळे धरण प्रकल्प उभारणीबाबत पुढे कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे तेथील दसपटीतील तिवरे,आकले, कादवड आदिं गावांना पाणीटंचाईचा सामना करावा लागणे, परिणामी घरे मिळण्याच्या प्रतिक्षेत असणाऱ्याविरुद्ध धरणग्रस्त कुटुंबियांसह त्यापरिसरातील जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व नैराश्याची भावना, त्यामुळे अद्याप घरे देण्यांत न आलेल्या उर्वरित धरणग्रस्तांना तातडीने घरे देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत तसेंच नवीन धरण बांधकामास

**विवरण क्रमांक २१–**पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **१०२.** | **३८** | **श्री. अमोल मिटकरी,श्री.** विक्रम काळे,श्री. शशिकांत शिंदे,श्री. सतिश चव्हाण,श्री. कपिल पाटील, डॉ. सुधीर तांबे,श्री. जयंत आसगावकर,श्री. किरण सरनाईक,श्री. बाळाराम पाटील,श्री. किशोर दराडे **वि.प.स.**<br>“ मुंबईतील दादर येथील इंदू मिलच्या जागेवर महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारकाचे काम सुरू करून बराच काळ लोटलेला असणे, प्रकल्पाच्या खर्चामध्ये दिवसेंदिवस वाढ होत असतांना आतापर्यंत केवळ २४ टक्केच काम पूर्ण झालेले असल्याचे डिसेंबर,२०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात उघडकीस येणे, स्मारकाची उभारणी केली जावी यासाठी आंबेडकर प्रेमींनी वारंवार केलेल्या आंदोलन व पाठापुराव्यामुळे स्मारकाची उभारणी केली जात असणे, स्मारकाच्या उभारणीचे काम अत्यंत संथगतीने सुरू असणे, स्मारकातील अनेक कामे अपूर्णावस्थेत असून सदरची कामे युद्धपातळीवर पुर्ण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही केली जात नसणे, स्मारकाच्या कामासंदर्भात चालढकल तथा दिरंगाई होत असल्याने कोट्यावधी आंबेडकरप्रेमींमध्ये संतापाचे वातावरण पसरलेले असणे, स्मारकाचे काम त्वरित पुर्णत्वास नेऊन सदरचे स्मारक लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची लोकप्रतिनीधी, सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दि.०७ डिसेंबर,२०२२ तसेच अलिकडील काळात वारंवार मागण्या केलेल्या असणे, सदर प्रकरणी | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी महाराष्ट्रासह देशविदेशातील कोट्यावधी आंबेडकरप्रेमी नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, प्रशासनाच्या दुर्लक्षपणामुळे सदर स्मारकाचे काम रखडलेल्या स्थितीत असल्याने कोट्यावधी आंबेडकरप्रेमीं पुन्हा आंदोलन करण्याच्या मनःस्थितीत असणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या सामाजिक कार्याची महती पुढील पिढीला व्हावी याकरिता भव्यदिव्य स्मारकाचे काम लवकरात लवकर होणेकामी युद्धस्तरावर उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, सदर गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **१०३.** | **१०१** | **श्री. नागोराव गाणार,** श्री. प्रविण दरेकर,श्री. प्रसाद लाड,श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री. रमेशदादा पाटील,श्री. रमेश कराड,श्री. रामदास आंबटकर,श्री. प्रवीण दटके,श्रीमती उमा खापरे,ॲड. निरंजन डावखरे **वि.प.स.**<br>“ मुंबई जोगेश्वरी येथील महात्मा फुले वस्तीगृहातील विद्यार्थ्यांनी माहे नोव्हेंबर २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात उपोषण केले असल्याची बाब निदर्शनास येणे, जोगेश्वरी येथील महात्मा फुले वस्तीगृहाची क्षमता १०४ विद्यार्थ्यांची असून येथे केवळ ६४ विद्यार्थीच असणे, या वस्तीगृहाच्या स्लॅब कोसळल्याने सदर इमारत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक बनलेली असणे, त्यांना शिक्षणाच्या दृष्टीने सर्व विद्यार्थ्यांना एकाच वस्तीगृहात राहण्याची व्यवस्था करण्याची आवश्यकता असतानाही प्रशासन त्यांना भिवंडी, कल्याण, कांदिवली अशा वेगवेगळ्या ठिकाणी स्थलांतर करीत असल्याने विद्यार्थ्यांचा शिक्षणावर विपरीत परिणाम होत असताना प्रशासन त्यावर कोणतीच कारवाई करत नसल्याने विद्यार्थ्यांमध्ये असंतोष व्यक्त होत असणे त्यासाठी या सर्व विद्यार्थ्यांना एका वस्तीगृहात स्थलांतरित करून | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

## विवरण क्रमांक २१–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | तेथे शिक्षणाची व्यवस्था करावी आणि या इमारतीचे केवळ स्ट्रक्चरल ऑडिट करून वेळ घालवून दुरुस्ती न करता सदर इमारतीची पुनर्बांधणी करावी या व अन्य मागण्या या विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी केलेल्या असणे, यावर शासनाने करावयाची कारवाई उपाययोजना." | | |
| **१०४.** | **१६४** | **श्री. अभिजित वंजारी,श्री.** राजेश राठोड,डॉ. वजाहत मिर्झा,डॉ. सुधीर तांबे,डॉ. प्रज्ञा सातव, श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील,श्री. जयंत आसगावकर,श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप **वि.प.स.** " समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या अनेक मागण्या गेल्या दहा वर्षापासून सातत्याने प्रलंबित असल्याने त्या कर्मचाऱ्यांच्या कुटूंबावर त्याचा परिणाम मोठ्या प्रमाणावर होत असणे, सातव्या वेतन आयोगाची अधिसूचना व बक्षी समितीचा अहवाल त्यानुसार समाजकार्य महाविद्यालयामधील कर्मचाऱ्यांना १०-२०-३० अशी आश्वासित प्रगती योजना लागू करणे आवश्यक असताना ती अद्याप लागू करण्यात आलेली नसणे, तसेच समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना नियमित वेतन मिळत नसणे, तसेच त्यांच्या अर्जीत रजेचे रोखीकरण, वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकाचा लाभ, अनुकंपा तत्वावर नियुक्ती व जुनी पेंशन योजना अशा अनेक समस्यांना आजही तोंड द्यावे लागणे, त्यामुळे या सर्व लोकांमध्ये निर्माण झालेला रोष व असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन आश्वासित प्रगती योजना तात्काळ स्वरूपामध्ये लागू करण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया. " | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०५. | ४४४ | **श्री. कपिल पाटील वि.प.स.**<br>" राज्यातील तसेच मुंबई शहर व उपनगरामधील विविध प्रकारच्या दिव्यांगांच्या विशेष शाळेतील कर्मचाऱ्यांचे पगार वेतननिधी उपलब्ध नसल्यामुळे नियमित न होणे, कर्जाचे हप्ते चुकणे, EMI वेळेवर न भरल्याने बँकेची पेनल्टी बसणे, विशेष शाळेतील शिक्षकांना सातव्या वेतन आयोगाच्या फरकाच्या रकमा ३६ महिने होऊनही अद्यापी मिळालेल्या नसणे, विशेष शाळेतील कंत्राटी कर्मचारी पाचव्या, सहाव्या आणि सातव्या वेतन आयोगापासून वंचित असणे, १२ व २४ वर्षे सेवा केलेल्या शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी आणि निवडश्रेणी सहा ते सात वर्षे होऊनही मिळत नसणे, आयटीआयच्या धर्तीवर व्यवसायपूर्व प्रशिक्षणाची कार्यशाळेची आवश्यकता असणे, प्रस्तावित स्वतंत्र दिव्यांग मंत्रालयाच्या अंतर्गत इ. ७वी पर्यंत असलेली मान्यता व अनुदान वाढवून १२ वी पर्यंत मिळत नसणे, मुंबईत सर्व विशेष शाळा सुरू करण्याच्या नियमात एकसमानता नसणे, विशेष शाळेतील विद्यार्थ्यांना शालांतपूर्व तुटपुंजी शिष्यवृत्ती मिळत असणे, मुंबई समाजकल्याण विभागात एक अधिकारी मुंबई शहर, मुंबई उपनगर आणि पालघर अशा तीन विभागाचे काम पहात असणे, सदर विभागाला पूर्णवेळ अधिकारी आणि कर्मचारी नसल्यामुळे शिक्षक सेवानिवृत्त होऊन ही पेन्शन, ग्रॅच्युएटी मिळत नसणे, सेवानिवृत्त झाल्यानंतर पेन्शन व इतर मिळणाऱ्या फायद्यांसाठी त्यांना वारंवार समाजकल्याण विभागाकडे फेऱ्या माराव्या लागणे, अनेक महिने प्रकरणे प्रलंबित असणे, शिक्षकांना पेन्शनची वाट पहावी लागणे, त्यामुळे शिक्षक व सेवानिवृत्त शिक्षकांचे आर्थिक नुकसान होत असून नाहक त्रास सहन करावा लागणे, यामुळे विशेष शाळांतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेला प्रचंड असंतोषष आणि संताप. याबाबत शासनाची भूमिका आणि करावयाची कार्यवाही. " | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

## विवरण क्रमांक २१–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **१०६.** | **५२३** | **श्री. श्रीकांत भारतीय वि.प.स.**<br>“ महाराष्ट्र शासन तसेच भारत सरकार यांच्या वतीने राज्यात दिव्यांग, वयोवृद्ध, विधवा, परितकत्या इ. संवर्गातील लाभार्थ्यांकरिता राष्ट्रीय सामाजिक सहाय्य योजनेमार्फत लाभ पुरवण्यात येतो, सदर योजनेचा लाभ पुरविताना शासनातर्फे उपलब्ध होणारी रक्कम लाभार्थ्याच्या बँक खात्यावरती जमा केली जाणे, ग्रामीण भागात प्रत्येक गावामधे बँक नसल्यामुळे सदर रक्कम काही वेळा दलालांमर्फत काढली जात असल्याचे आढळून येणे, बँकेतून सदर रक्कम काढताना दलालांमार्फत लाभार्थ्यांना त्रास देणे, मयत लाभार्त्यांची रक्कम काढणे यासारखे चुकीचे प्रकार बऱ्याच ठिकाणी निदर्शनास येणे, त्यामुळे सदर रक्कम पोस्ट खात्यामार्फत लाभार्त्यांना वितरित केल्यास प्रत्येक गावामध्ये पोस्ट ऑफिस असल्याकारणाने पोस्ट ऑफिस मधून लाभार्थी रक्कम मिळवू शकणे अथवा पोस्टमनन स्वतः जाऊन बायोमेट्रिक पद्धतीने लाभार्थ्याला रक्कम देऊ शकणे, पोस्ट ऑफिस मार्फत लाभार्थ्यांची पैसे मिळवण्यासाठी ची फरपट बंद होऊन अशा प्रकरणांमध्ये दलाली करणाऱ्या असामाजिक घटकांवरती चाप बसेल तसेच शासनाच्या पोस्ट खात्याचे बळकटीकरण होईल, असा प्रयोग नांदेड जिल्ह्यातील काही तालुक्यांत केला गेला असणे, या पार्श्वभुमीवर संपूर्ण महाराष्ट्रात राज्य सरकार व केंद्र सरकारच्या राष्ट्रीय सामाजिक सहाय्य योजनेचे मानधन IPPB (पोस्ट खात्यामार्फत) वितरित करण्याबाबत शासनाचे धोरण निर्माण करणेबाबत कार्यवाही, उपाययोजना व या अनुषंगाने शासनाची प्रतिक्रिया. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०७. | ५३१ | **श्री. प्रविण दरेकर,** श्री. प्रसाद लाड,अॅड. निरंजन डावखरे,श्री. रमेशदादा पाटील,श्री. सुरेश धस,श्री. निलय नाईक,श्री. नागोराव गाणार,श्री. गोपिचंद पडळकर,श्री. प्रवीण दटके **वि.प.स.** “ डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) ही संस्था पुणे येथे असून ती पूर्णपणे महाराष्ट्र शासनाच्या आखत्यारित आहे. शासनाने या संस्थेला स्वायत्त संस्था असा दर्जा संशोधन व प्रशिक्षण याबाबतीत दिला असणे परंतु या ठिकाणी स्वायत्ततेच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात आर्थिक अनियमितता चालू असणे, बार्टीचे महासंचालक पोस्ट (टपाल) खात्याचे बेजबाबदार अधिकारी प्रतिनियुक्तीने आलेले असणे, त्यांच्या बदलीची सतत मागणी होणे, बार्टी कार्यालयासमोर आंदोलन होणे, त्यामुळे शासनाची प्रतिमा मलिन होणे. विना निविदा पाच पाच वर्षांचे कंत्राट मर्जीतील व्यक्ती, संस्था यांना देणे, प्रशिक्षण संस्थांकडून मलिदा गोळा करणे, जाणीवपूर्वक पाली भाषा व त्रिपिटक प्रकल्प बंद करणे, चांगली पुस्तक वितरण केंद्र बंद पाडणे, मोठ्या प्रमाणात आर्थिक अनिमियतता करणे. मर्जितल्या बिना पात्रता लोकांना नियुक्ती देणे, अधिकार नसताना कार्यरत अधिकारी यांची एकतर्फी कामावरून मुक्तता व प्रतिनियुक्ती बदली, पदस्थापना करणे, एकाच संस्थेस वारंवार बाह्य स्त्रोतांचे कंत्राट /मुदतवाढ देणे, सभा, समारंभ व इतर कार्यक्रमांचे कंत्राट विना निविदा प्रसिद्ध करणे व आर्थिक लूटमार करणे, शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची (विशेषतः महिला) छळवणूक करणे व त्या संदर्भात विविध अधिकारी कर्मचाऱ्यांनी शासनाकडे गंभीर स्वरूपाच्या तक्रारी करणे, आयबीपीएस व एमपीएससी विद्यार्थी निवडीच्या परीक्षेची प्रश्नपत्रिका खाजगी ठिकाणी छापणे व ती अधिकाऱ्यांच्या व्हाट्सअप वर पाठवून परीक्षा घेण्यास भाग पाडणे/ परीक्षेच्या गोपनीयतेचा भंग करणे, फेलोशीप व रिसर्च विद्यार्थ्यांचे फेलोशिप चे पैसे जाणीवपूर्वक थकीत ठेवणे व त्यांची निवड मुदतीत न करणे, त्यासंदर्भात विविध विद्यार्थी संघटनांनी शासनाकडे | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१–**पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | वारंवार तक्रारी करणे, पात्र व्यक्तींची रिसर्च या कारणासाठी निवड न करता अपात्र व्यक्तींची निवड करून रिसर्च विषयक प्रकल्प बंद पाडण्याचा घाट घालणे, शासनाच्या पूर्व मान्यते शिवाय प्रतिनियुक्तीने संस्थेमध्ये घेण्यासाठीचे अर्ज मागवणे, त्याबाबत तत्कालीन मंत्री महोदयांनी कारणे दाखवा नोटीस बजावणे, शासनाच्या मान्यतेने महत्त्वकांक्षी प्रकल्प सुरू केल्यानंतर स्वार्थापोटी व स्वतःच्या फायद्यासाठी समता प्रतिष्ठान बंद पाडणे, यूपीएससी प्रशिक्षण केंद्र अद्यापही येरवडा येथे सुरू न करणे, जात वैधता पडताळणी बाबत अत्यंत बेजबाबदार धोरण राबवून अधिकारी कर्मचारी यांची छळवणूक पिळवणूक करणे, त्याबाबत विविध अधिकाऱ्यांनी शासनाकडे गंभीर स्वरूपाच्या तक्रारी करणे, या प्रकरणी शासनाने केलेली कार्यवाही, यावर शासनाने करावयची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **१०८.** | **५६७** | **श्री. राजेश राठोड,श्री.** अशोक ऊर्फ भाई जगताप,श्री. अभिजित वंजारी,डॉ. वजाहत मिर्झा, डॉ. सुधीर तांबे,श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील **वि.प.स.**<br>“ तमाम बंजारा समाजाचे तिर्थक्षेत्र असलेले वाशिम जिल्ह्यातील पोहरादेवी हे स्थान बंजारा समाजासाठी श्रद्धास्थान असणे, पोहरादेवी या ठिकाणी बंजारा समाजातील नागरिक मोठ्या संख्येत दररोज दर्शनासाठी येत असुन या ठिकाणी बंजारा कुंभ घेणे आवश्यक असतांना अखिल भारतीय धर्मजागरण समन्वय या संघटनेद्वारे जानेवारी, २०२३ मध्ये गोद्री, ता. जामनेर, जिल्हा जळगांव येथे कुंभमेळयाचे आयोजन करण्यात आलेले असणे, शासनाने हिंदुगोर बंजारा व लबाना नायकडा कुंभ करिता पायाभूत सुविधा , पाणीपुरवठा व मलनिस्सारण शौचालय व स्नानगृह यासाठी सुमारे ४ कोटीपेक्षा जास्त निधीची मंजुरी दिलेली असुन | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | शासनाचे १०० कोटी पेक्षा जास्त निधी खर्च करण्याची तयारी असणे,वास्तविक हिंदु कुंभमेळा अलाहाबाद,नाशिक ,हरिद्वार ,उज्जैन अशा ठराविकच तीर्थक्षेत्रामध्ये भरविला जात असणे, असे असताना गोद्री जामनेर या ठिकाणीच निवड कोणत्या आधारे करण्यात आली तसेच केवळ हिंदु धर्म व्यापक असल्याने हिंदु बंजारा कुंभ आयोजीत करून बंजारा जमाती करिता मर्यादीत का ठेवण्यात आला याबाबत जनमानसात होत असलेली चर्चा, शासनाच्या निधीची तरतूद करतांना कशाच्या आधारे कामाची निवड केली गेली, गावाची संख्या कमी भौतिक सुविधांसाठी जास्त निधी अशा प्रकारे जनतेच्या पैशाचा गैरवापर केला जात असल्याचे नागरिकांत निर्माण होत असलेली शंका, या प्रकारातून पोहरादेवी या ठिकाणचे महत्व कमी करण्याचे होत असलेले प्रयत्न,सदरच्या कुंभमेळाच्या आयोजनामुळे हिंदु बंजारा असे नवीन नामकरण आयोजकांकडून करण्यात येणे, पोहरादेवी येथे पायाभूत सुविधा स्वच्छतागृह , रस्ते ,पिण्याचे पाणी इत्यादीची व्यवस्था होणे गरजेचे असताना जाणीवपूर्वकपणे गोद्री येथे कुंभ भरविण्यात येत असल्याने बंजारा समाज बांधवात निर्माण झालेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना याबाबत राज्यशासनाने तातडीने चौकशी करून करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **१०९.** | **२६३** | **ॲड. निरंजन डावखरे,श्री.** प्रविण दरेकर,श्री. प्रसाद लाड,श्री. रमेशदादा पाटील,श्री. नागोराव गाणार, श्री. चंद्रशेखर बावनकुळे **वि.प.स.**<br>“ राज्यातील नवीमुंबई येथील कृषि उत्पन्न बाजार समिती ही आशिया खंडातील सर्वात मोठी बाजार पेठ असून या बाजार पेठेत कोट्यावधी रुपयांची उलाढाल होत असणे, मात्र १९८२ साली बांधलेल्या नवी मुंबईतील कांदा-बटाटा मार्केट, फळे व भाजीपाला मार्केट, मसाला मार्केट आणि दाणाबंदर मार्केट ह्या पाचही बाजार पेठा निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे धोकादायक घोषित केल्या असून बाजार पेठांच्या पुनर्बांधणीसाठी व्यापाऱ्यांसह बाजार समितीच्या | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | संचालक मंडळाने वाढीव एफएसआय ची मागणी केली असल्याची बाब माहे नोव्हेंबर २०२२ च्या प्रथम सप्ताहात उघडकीस येणे, मात्र भ्रष्टाचारी संचालक मंडळाच्या ठरलेल्या स्क्रिप्टनुसार बाजार समितीकडे पुनर्बांधणीकरिता पुरेसा निधी उपलब्ध नसल्यान 'बांधा, वापरा व हस्तांतरीत करा' या तत्त्वावर पुनर्विकास करून त्याकरिता सल्लागार नेमण्यात आलेला असून त्यांच्यामार्फत बाजारपेठांचा आराखडा तयार करण्यात येणार असणे, सदर पुनर्बांधणीमध्येही भ्रष्टाचार होण्याची दाट शक्यता असल्याने राज्य शासनाने सदर पाचही बाजारपेठांच्या पारदर्शित पुनर्बांधणीसाठी एक स्वतंत्र समिती गठीत करणे किंवा प्रशासक नेमण्याची आवश्यकता असणे, तसेच यापूर्वीही सर्व बाजारपेठांमध्ये फार मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून अद्यापही तेथे मुलभूत सुविधांची वानवा असणे, उदा. रस्त्यांची देखभाल, पाण्याचा निचरा, घनकचरा व्यवस्थापन तसेच इमारतींची डागडुजी व शौचालय अशा अनेक बाबींवर दरवर्षी खर्च केला जातो मात्र सदर खर्च फक्त कागदावरच दिसत असणे, काही बाजार समिती कर्मचारी कर्तव्य आणि जबाबदारीची कामे सोडून आज दलाल म्हणून वावरताना दिसत असणे, त्यातील काही महाशयांनी बाजार आवाराच्या आजुबाजूला गोदामे घेतली असून त्यामध्ये विविध मालाची साठवणूक करून ठेवणे व कालांतराने तोच माल ज्यादा दराने विकुन काळाबाजार केला जात असणे, ह्यात काही बाजार समिती संचालकांचाही समावेश असणे, तसेच नवीमुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती ही भ्रष्टाचाराचा मोठा अड्डा बनल्याची बोंब सर्वत्र पसरलेली असणे, त्यामुळे नवीमुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती संचालक मंडळाच्या गैरव्यवहाराची तातडीने चौकशी करण्याची होत असलेली मागणी याबाबत शासानाने केलेली कार्यवाही व शासनाची भूमिका. " | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११०. | ५९ | **श्री. शशिकांत शिंदे,** श्री. गोपिचंद पडळकर,श्री. अनिकेत तटकरे **वि.प.स.**<br>" राज्यातील पोलीस पाटील पदाच्या अनेक वर्षांपासून १५,००/- रु.दरमहा मानधन (किमान वेतन) आधारावर लागू करावे, सरकारी कर्मचारी यांच्याप्रमाणे १०० टक्के वैद्यकीय सेवा लागू करावी, पोलीस पाटील पदाची वयोमर्यादा ६ वरुन ७० वर्षे करणेत यावी, २०/३० वर्ष सेवा बजावून (कार्यमुक्त) झालेल्यांना दरमहा ७०००/- रु.पेन्शन योजना लागू करावी. यात भेदभाव न करता सरसकट देण्यांत यावी, अनेक जिल्ह्यात ३/४ महिन्याशिवाय मानधन मिळत नसणे, इत्यादिं महत्वपूर्ण मागण्यां शासनाकडे प्रलंबित असणे, सदर मागण्यांबाबत शासनस्तरावर संबंधित अधिकारी यांना प्रत्यक्ष भेटूनही अद्याप कार्यवाही न होणे, अशा विविध याबाबत इतरांच्या प्रमाणे महिन्याच्या महिन्याला मानधन मिळणेसाठी योग्य ती उपाययोजना करणेत यावी, त्यामुळे प्रलंबित राहिलेल्या सदर मागण्यांविषयी कार्यवाही करून पोलीस पाटीलांना न्याय द्यावा अशी महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील महासंघाकडून मागणी करण्यांत येणे, परंतु अद्याप त्याबाबत कार्यवाही न होणे, परिणामी पोलीस पाटील यांचेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व नैराश्याची भावना, त्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची भुमिका. " | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |
| १११. | १६० | **श्री. अभिजित वंजारी,** श्री. राजेश राठोड,डॉ. वजाहत मिर्झा,डॉ. सुधीर तांबे,डॉ. प्रज्ञा सातव, श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील,श्री. जयंत आसगावकर,श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप **वि.प.स.**<br>" मेक इन गडचिरोलीच्या नावाखाली गडचिरोली जिल्ह्यातील अनेक युवकांकडून अगरबत्ती, मत्सोत्पादन, राईस मिल पोल्ट्री फॉर्म, पोल्ट्री लेअर, ट्रॅक्टर, जेसीपी अशाप्रकारचे अनेक उद्योग शासकीय योजनेद्वारे मिळवून देण्याच्या नावाखाली अनेक तरूणांकडून आणि महिलांकडून स्थानिक दलालांनी १ लाख, २ लाख आणि १० लाख असा करोडो रुपयाचा अपहार करून लोकांची फसवणूक केल्याचे निदर्शनात आले असणे, मत्सोत्पादनाकरिता नीलक्रांती योजनेच्या | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

## **विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | नावाने गरीब, आदिवासी, बेरोजगार लोकांकडून कर्जाचा पैसा उकळून त्यांच्या जमिनी राष्ट्रीयकृत बँकेकडे गहाण ठेऊन आणि त्या बँकेद्वारे जमा झालेली रक्कम अन्य व्यक्तीच्या नावाने वळते करून घेऊन अशाप्रकारे स्थानिक तरूणांना मोठ्या प्रमाणामध्ये त्यांची फसवणूक करणे, नीलक्रांतीच्या नावाने मत्सोत्पादन या योजनेमध्ये शेतामध्ये पाँड तयार करून त्यामध्ये पाण्याची सोय करून माशांचे बीज टाकून त्याचे उत्पादन झाल्यानंतर त्या माशांची विक्री करून देण्याची जबाबदारी या शासकीय योजनेमध्ये असताना सुद्धा असे प्रत्यक्षात काही न करता अनेकांची फसवणूक करणे, तसेच अगरबत्तीच्या व्यवसायाच्या नावाखाली पुण्यातील जयहिंद एम.एफ.सी.जी. प्रॉडक्ट या कंपनीने साधारणतः ३५-५० हजार किंमतीची अगरबत्ती मेकिंगची मशिन रू. १,१८,०००/- आणि इतर गोष्टींकरिता रू.८०,०००/- असा रू. २ लाखाचे कर्ज तेथील स्थानिक लोकांच्या नावाने चढविल्यामुळे सर्वसामान्यांची शासकीय योजनेच्या नावाखाली गडचिरोली जिल्ह्यातील अनेक महिला, तरूणांना लाखो करोडो रुपये गमवावे लागणे, त्यांना त्याचा प्रत्यक्ष लाभ न मिळता दलालाला व कंपनीला मिळाला असणे, सबसिडी सोडून इतर रक्कमेचा बोजा कर्ज स्वरूपात स्थानिक लोकांवर आल्यामुळे गडचिरोली जिल्ह्यातील शासनाच्या योजनेच्या माध्यमातून फसवणूक झालेल्या लाभार्थ्यांमध्ये पसरलेली असंतोष भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून फसवणूक करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया.” | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११२. | २१२ | **श्री. नरेंद्र दराडे वि.प.स.**<br>" महिलांवरील अत्याचार व असुरक्षितता याबाबत देशभर चर्चा होत असतांना त्यावर कोणतीही ठोस उपाययोजना होताना दिसत नसणे, देशामध्ये एकूण लोकसंख्ये पैकी ५० टक्के लोकसंख्या महिलांची असतांनाही त्यांना गुलामगिरीची वागणूक मिळणे, ही बाब खूप गंभीर स्वरूपाची असणे, महिलांवरील बलात्कार, विनयभंग, अपहरण इत्यादी मानुसकीला काळीमा फासणाऱ्या घटनांमध्ये वाढ तो असणे, काही दिवसा पूर्वी मुंबईतील श्रद्धा वालकर हिच्यावर अमानुष अत्याचार करून तिच्या शरीराचे ३२ तुकडे करून हत्या करण्यात आल्याची गंभीर घडना घडल्याचे निदर्शनास येणे, गोंदिया जिल्ह्यात एका महिलेवर नराधमांनी वारंवार आत्याचार करणे, तसेच पुणे जिल्ह्यात मावळ येथे एका अल्पवयीन मुली वर अमानुष अत्याचार करून मृतदेह झुडपात फेकून देणे, काही वर्षा पूर्वी दिल्ली मध्ये निर्भया प्रकरणाने जगाचे लक्ष वेधले, त्यावेळी मोठे आंदोलने करण्यात आल्यानंतर काही कालावधीनंतर गुन्हेगारांना शिक्षाही देण्यात आली असणे, तथापि त्यानंतरही महिलांवरील अत्याचार काही थांबलेले नसणे, राज्य शासनाने महिलांवरील अत्याच्यार व त्यांची सुरक्षा याकरिता प्रबळ आणि कठोर शासन याकरिता लोकमानस जाणून "शक्ती क्रिमिनल लॉ" महाराष्ट्रात सुधारणा ॲक्ट, २०२० मध्ये तयार करणे, सदर कायदा तयार करण्यात आल्यानंतर या कायद्यावर राष्ट्रपतींनी स्वाक्षरी केल्याच्या बातम्याही समाजमाध्यमातून येणे, तथापी त्याची अंमलबजावणी झालेली दिसत नसणे, शासनाने महिलांच्या सुरक्षितेच्या दृष्टीकोणातून तातडीने ठोस उपाययोजना करण्याची आवश्यता." | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |
| ११३. | २८५ | **श्री. प्रविण पोटे-पाटील,** श्री. रामदास आंबटकर,श्री. गोपिचंद पडळकर **वि.प.स.**<br>" राज्यातील लव जिहाद च्या घटना दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात उघडकीस येत असणे, राज्यातील प्रमुख शहर जसे कोल्हापूर, मालेगाव, अमरावती इतर शहरांमध्ये लव्ह जिहाद | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | प्रकरणावर गुन्हे दाखल झालेले असणे, खोटे नाव व खोटी ओळख सांगून फसविणे, महागडी गिफ्ट देऊन मुलींना प्रेम जाळात ओढणे, चांगली वेशभूषा, राहणीमान या माध्यमातून हिंदू युवतीवर प्रेम करून त्यांना धर्मांतर करून निकाह करणे, त्यानंतर मुलीचे भयंकर शोषण करून त्यांच्यावर निर्दयीची सीमा पार करून अत्याचार करणे, मोठ्या प्रमाणात देशातील इतर राज्यासह जवळपास चार-पाच हजार अशा प्रकारचे प्रकरण होऊन मुलींचा जीव धोक्यात आला असने, मोठ्या घरच्या मुलींना फसवणूक करून पळून ने, बलात्कार करणे, इतर राज्यात विकणे अशी बरीच प्रकरणे उघडकीस आलेली असने, राज्य शासनाने लव्ह जिहाद या मुद्द्यावर कठोर कार्यवाही करणे आवश्यक असणे, या गंभीर विषयी शासनाने [illegible]” | | |
| **११४.** | **३६०** | **श्री. विलास पोतनीस,** श्री. सुनिल शिंदे **वि.प.स.** | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |
| | | “ मुंबईच्या रस्त्यांवर खुलेआम ड्रग्ज विक्री सुरू असल्याची धक्कादायक बाब दि. १५ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास उघडकीस येणे, सद्यस्थितीत मुंबई शहरातील नशेबाजांमध्ये ‘न्याहरी’ हा कोडवर्ड वापरला जाणे, सदरहू कोडवर्ड कानांत सांगितल्यास मुंबई शहरातील रस्त्यांवरील टपऱ्यांवर विकला जाणारा गांजा सहज नशेबाजांना उपलब्ध होणे, माटुंगा रोड रेल्वे स्थानकाजवळील सेनापती बापट मार्गावरील उड्डाणपुलाखाली एक महिला खुलेआम ड्रग विक्री करीत असल्याचा व्हिडीओ नुकताच समाजमाध्यामातून प्रसारित झाला असणे, ही महिला गांजाची विक्री करीत असणे, पोलिसांनी या महिलेवर कारवाई करून देखील तिचा गोरखधंदा सुरू असणे, तसेच ३१ डिसेंबर, २०२२ रोजी थर्टी फर्स्टला आयोजित एका | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | कार्यक्रमात विकण्यासाठी तब्बल ५० लाख रुपयांचे हेरोइन मुंबईत विक्रीसाठी आणण्यात येत असल्याप्रकरणी एकाला मालवणी पोलिसांनी नुकतीच केलेली अटक, अशाप्रकारे मुंबई शहर हे ड्रगच्या विळख्यात सापडत चालल्याने तरुणीचे भवितव्य धोक्यात सापडले असणे, मुंबई शहराला ड्रगच्या विळख्यातून सोडविण्यासाठी शासनाने कठोर पावुले उचलण्याची असलेली नितांत आवश्यकता, यास्तव मुंबईच्या रस्त्यांवर खुलेआम सुरू असलेल्या ड्रग्जज विक्रीस आळा घालण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **११५.** | **३८७** | **श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी वि.प.स.**<br>“ मे. वेदांत प्रॉपर्टीज तर्फे भागीदार श्री. राहुल प्रेमप्रकाश गोयल व श्री. आकाश प्रेमप्रकाश गोयल यांनी नोंदणीकृत दस्तानेपीएमसी हद्दीतील गाव मौजेहडपसर, हांडेवाडी रोड, पुणे येथील शेतमालक श्री. फारूक यासिन सय्यद इनामदार यांची जमीन २०१२ मध्ये नोंदणीकृत विकसन करारनामा दस्ताने रेव्हेन्यू शेअरींगवर आधारीत विकसनासाठी घेतली असणे, सदर करारामधील अटी व शर्ती मध्ये प्रामुख्याने रेव्हेन्यू शेअरींगवर म्हणजे विकसकाने परवानगी घेऊन बांधकाम करून विक्री करून आलेल्या ग्रॉस सेल प्रोसिडच्या रकमेतून काही भागासाठी ४२% व काही भागासाठी ४५% बांधकाम विक्री करून आलेली रक्कम श्री. इनामदार यांना देण्याचे दस्त क्रमांक ४६२६/२०१२, दिनांक ३१/०५/२०१२ अन्वये ठरले होते परंतु पुढे सदर दस्तामध्ये बदल करून त्याच प्रमाणात बांधकाम पूर्ण करून देण्याचे २०१३ च्या नवीन दस्त क्रमांक ११९९५/२०१३ व ११९९५/२०१३, दिनांक २३/१०/२०१३ अन्वये ठरले असणे, सदर २०१२ च्या करारनाम्यात रेव्हेन्यू शेअरींगवर ठरलेले असताना काही ना काही कारण देऊन सदर करारनाम्यात एरिया शेअरिंग चा बदल केल्यानंतर देखील सदर मे. वेदांत प्रॉपर्टीज तर्फे भागीदार श्री. राहुल प्रेमप्रकाश गोयल व श्री. आकाश प्रेमप्रकाश गोयल | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | यांनी नोंदणीकृत करारनाम्यातील अटी व शर्ती प्रमाणेन वागता गैरइराद्यानें व गैरहेतूने व श्री. इनामदार यांची विश्वासघात करून फसवणूक करण्याच्या इराद्याने स्वतःच्या मर्जी प्रमाणे वागून अटी व शर्तीचा भंग केला व केलेल्या बांधकामाची अटी व शर्ती प्रमाणे विभागणी न करता दर्शनी भागातील व सहज विक्री होतील असे फ्लॅट्स स्वतः श्री. इनामदार यांच्या संमती शिवाय तिऱ्हाईत इसमांना विक्री केले व जागा मालकाला अडगळीच्या फ्लॅट, दुकाने व ऑफिसेस दिल्याने व जागा मालकाला द्यावयाच्या बांधकामाचे आतील बाजूचे काम निकृष्ट दर्जाचे करून दिल्याने त्यांना ते कमी किमतीने विक्री करावे लागले, करारनाम्यामध्ये असे ठरलेले असताना कि सर्व बांधकामाची गुणवत्ता एकसारखीच राहील तसे न करता पुन्हा त्यामध्ये फरक करत असून अश्याप्रकारे सदर इसम व भागीदारी संस्था हे शेतमालकाची वारंवार फसवणूक करत असणे, तसेच सदर विकसक जागामालकाकडून वेगवेगळ्या हेड खाली कारनाम्यांपेक्षा देणे असलेल्या रकमेपेक्षा जास्त रकमेची मागणी करून फसवणूक करत आहे व जागामालकाला देऊ केलेल्या बांधकामाच्या बाबतीत अनेक अडचणी उत्पन्न करून त्याची विक्री होणार नाही असा प्रयत्न करून विश्वासघात केला व करत आहे, या शिवाय सदर विकसकाने पुरवणी करारनामा नोंदणी करताना दस्त नोंदणी झाल्यानतंर स्कॅनिगं पूर्वी त्यामध्ये खाडाखोड केलेली असणे, असाच प्रकार सदर विकसक अनेक शेतकऱ्यांसोबत पुणे परिसरात करत आहे व अशा बेकायदेशीर कमावलेल्या पैशातून सदर विकसकाने पुणे आणि परिसरात बऱ्याच मिळकती हस्तगत करण्याकरिता गुन्हेगार लोकांचा ठरत संबंध ठेऊन त्यांचा वापर करत आहे तसेच राजरोसपणे त्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री | | |

यांचे केंद्रीय गृहमंत्री यांच्या सोबत त्याच्या मर्जीतील असल्याचे अधिकाऱ्यासमक्ष बोलत आहे व शेतकऱ्यांना अधिकारी माझ्या मर्जी प्रमाणेच वागतील त्यामुळे तुम्ही माझ्या नादाला लागू नका असे सांगत सांगण धमकावणे, सदर विकासकानेबांधकाम ४८ महिन्या मध्येकरून देण्याचे कबुल केलेले असताना ते पूर्ण केले नाही व करारनामा संपलेला असताना जबरदस्तीने बांधकाम करून फसवणूक करत असणे, पुणे महानगपालिकांमध्ये मंजूर नकाशे तपासले असता सदर विकासकाने आतापर्यंत झालेल्या बांधकामापैकी १२ ते १५ कोटी रुपयांचे कमी बांधकाम सदर जागा मालकाला दिले आहे. सामान्य शेतकरी अथवा जागा मालक अशाप्रकारे विकसकाबरोबर प्रत्येक गोष्टीची शहनिशा करू शकत नाही याचा गैरफायदा घेऊन सदर विकसक प्रचंड मोठ्या प्रमाणावर फसवणूक करत असणे, सदर विकसका विरोधात श्री. इनामदार यांनी दिलेल्या २३/०९/२०२१ रोजीच्या तक्रारीची पोलिसांनी दखल तर घेतली नाहीच शिवाय विकसकाकडून पैसे घेऊन कसलीही चौकशी न करता सदर इनामदार यांच्या विरुद्ध कोंढवा पोलीस ठाण्यात एफआयआर क्रमांक ८७४/२०२२ बेकायदेशीरपणे व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना हाताशी धरून नोंदवून घेतला आहे. आणि सदर श्री. इनामदार यांनी १७/१०/२०२२ रोजी पोलीस उपायुक्त यांच्याकडे दाखल केलेल्या तक्रारीची चौकशी आर्थिक गुन्हे शाखेकडे दिल्यानंतर तेथील डी सी पी श्रीमती भाग्यश्री नवटक्के यांनी सदर विकसकाला बेकायदेशीरपणे मदत करण्यात काहीच कसूर केलेला नाही. याशिवाय सदर श्रीमती भाग्यश्री नवटक्के यांनी सदर विकसका विरुद्ध तक्रारीचा तपास त्यांच्याकडे असताना सदर विकासकाच्या गाडीतून सदर विकसकासोबत मुंबई येथे स्वतःची बदली चांगल्या ठिकाणी व जिल्हा पोलीस अधीक्षक म्हणनू व्हावी म्हणून प्रवास केला आहे तसेच सदर विकसकाने चांगल्या ठिकाणी बदली होण्यासाठी येणाऱ्या सर्व खर्चाची जबाबदारी देखील घेतली होती अशी बाहेर चर्चा असून याची चौकशीहोणे गरजेचे

**विवरण क्रमांक २१**–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | असणे, श्री. राहुल प्रेमप्रकाश गोयल व श्री. आकाश प्रेमप्रकाश गोयल यांनी केलेल्या विश्वासघात व फसवणूकीबाबत आर्थिक गुन्हे शाखा पुणे येथे पोलीस तक्रार केली असता पोलिसांच्या गुन्हा घडल्याचे स्पष्ट लक्षात आल्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल न करता सदर श्री.इनामदार यांना समजावून सांगण्याचा आणि गुन्हा दाखल केला तर तुम्हाला पैसे मिळणार नाहीत त्यापेक्षा आम्हीच पैसेकाढून देतो बिल्डरकडून असा पवित्रा घेऊन बिल्डरला मदत करायला सुरुवात केली असणे, बिल्डरने पोलिसांच्या आणि विशेष करून डीसीपी भाग्यश्री नवटक्के यांच्या मेहेरबानीचा पुरेपूर फायदा घ्यायला सुरुवात केली आणि विकसकाने समन्स देऊनही कागदपत्र दिले. नाही म्हणून एन सी दाखल करण्याऱ्या व कायद्याप्रमाणेकाम करणाऱ्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकास हटवून मॅडम च्या मर्जी तील सहायक पोलीस निरीक्षकास सदर फिर्यादींचा तपास वर्ग केला, यामध्ये सर्वांची भूमीका ही एफआयआर दाखल करण्यास दिरंगाई करण्याची आणि विकसकाला वेळ देण्याची व पुरेपूर मदत करण्याची भूमिका स्पष्ट दिसून येणे, श्री. इनामदार यांच्या फिर्यादी वरून विकसकाने विश्वासघात करून फसवणूक केल्याचे व खोटेनाटे दस्तऐवज बनविल्याचे स्पष्ट असताना व विकसक पोलिसांनी मागितलेले दस्तऐवज देण्यास असमर्थ ठरलेला असताना त्याच्यावर गुन्हा दाखल होऊन योग्य ती कारवाई का होत नाही याची देखील चौकशी होणे गरजेचे असणे, याबाबत चौकशी समिती नेमून दोषी पोलीस कर्मचाऱ्यावर व अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई होऊन तातडीने सदर विकसका विरोधात एफआयआर दाखल होणे गरज निर्माण होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११६. | ४६२ | **श्री. सचिन अहिर वि.प.स.**<br>" नवी मुंबई नेरूळ येथील बालाजी टेकडी परिसरात दि. १४/१२/२०२२ रोजी रात्रीच्या सुमारास मित्रासह फिरण्यासाठी गेलेल्या एका १६ वर्षीय महाविद्यालयीन तरूणीसह असलेल्या तरूणाला त्या ठिकाणावरून दमदाटी व मारहाण करून पिटाळून लावून या अल्पवयीन तरूणीवर पोलिसाकडूनच पाशवी लैगिंक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच उघडकीस येणे, या घटनेतील १६ वर्षीय अल्पवयीन पीडीत तरूणी ही विज्ञान शाखेची विद्यार्थीनी असणे, पोलिसानेच पीडीत तरूणीवर लैगिंक अत्याचार केल्याचे पीडीत तरूणीने आपल्या तक्रारीत म्हणटलेले असणे, कायद्याचेच रक्षकच भक्षक झाल्याने जनमाणसांत पसरलेले कमालीचे संतापाचे वातावरण या बाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया. " | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |
| ११७. | २२७ | **श्री. रामदास आंबटकर,** श्री. नागोराव गाणार,श्री. चंद्रशेखर बावनकुळे,श्री. प्रवीण दटके, श्री. प्रविण पोटे-पाटील,डॉ. रणजित पाटील,श्री. रमेशदादा पाटील **वि.प.स.**<br>" वर्धा नदीवर (जि.वर्धा) आजनसरा गावाजवळ आजनसरा बॅरेज नदीच्या पात्रात दगडी बांधकामास सन १९९६-९७ मध्ये शासनाने मंजुरी देवून दिनांक १३ एप्रिल २००० रोजी शासन निर्णयान्वये सन १९९६-९७ च्या दरसुचीनुसार रू. १५८.२२ कोटीची प्रशासकीय मान्यता प्रदान करून मान्यतेनंतर ५ वर्षे सदर प्रकल्पास निधी प्राप्त न झाल्याने मान्यता रद्द होवून सन २००६ च्या दरसूचीनुसार रू. २०८.४२ कोटी नव्याने प्रशासकीय मान्यता प्रदान केली जाणे, प्रकल्पाचा प्रादेशिक आराखडा तयार करून ३१.५६ हेक्टर वनजमीन प्रकल्पा अंतर्गत बाधीत होत असल्याने तेथील निर्वानीकरण प्रस्ताव केंन्द्र शासनाकडून सन २००८ मध्ये तत्वातः मान्यता घेवून त्यानुसार ६३.१२ हे.आर जमीन वनविभागाचे नावाने वर्ग होवून त्याबाबत ४८४.३६ लक्ष रुपयाचा भरणा वनविभागाच्या CAMPA खात्यामध्ये सन २००६ ला करण्यात येऊनही अद्यापही भुसंपादन व पूनर्वसना बाबतची प्रक्रिया राबविण्यात | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | न येणे, तसेच कॅट प्लॅन करिता आवश्यक रू. ३६८.२८ लक्ष वनखात्यास माहे मार्च २०१९ मध्ये भरण्यात आले असून सदर प्रकल्पाच्या धरण पाळीच्या कामासाठी ४२.८२ हे.आर खाजगी जमीन संपादनाचा प्रस्ताव राजस्व विभागाकडे पाठविण्यात येऊनही संयुक्त मोजणीचे काम पूर्ण न होणे, या प्रकल्पामूळे १०४४.६३ हे.आर जमीन सिंचनाखाली येणार असणे, त्यांनतर केन्द्रीय जल आयोग व पर्यावरण विभागाची मान्यता दि. २७/५/२०२२ ला राज्य शासनाला प्राप्त होणे, याबाबत जून, २०१९ च्या अधिवेशनात अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून मुद्दा उपस्थित केला असता मान.जलसंपदा राज्यमंत्री यांनी दिलेल्या उत्तरात प्रकल्पाकरिता केंन्द्रीय जल आयोगाची मान्यता प्राप्त करण्याची कार्यवाही प्रगतीवर असून पर्यावरण मंत्रालयाने ११/७/२०१७ च्या पत्रान्वये काही अटीच्या अधीन राहून मान्यता दिली गेली असणे, त्यातच दि. ३१/१/२०२० ला आजनसरा गावात पर्यावरणा संमधात पाटबंधारे विभागाकडून जनसुनावनी घेतली जाणे, सदर प्रकल्पाच्या कामाला ५ कोटी रुपये मंजूर असूनही अद्याप बॅरेजच्या कामाला सुरवात न झाल्याने परिसरातील स्थानिक नागरिकांमध्ये असंतोश निर्माण होणे, त्यामूळे शासन स्तरावरील सर्व बाबीची तातडीने पूर्तता करून सदर बॅरेजच्या कामाला सुरू करण्याची आवश्यकता, शासनाने यावर तातडीने करावयाची कार्यवाही.” | | |
| **११८.** | **२४२** | **ॲड. निरंजन डावखरे,** श्री. प्रविण दरेकर,श्री. प्रसाद लाड,श्री. रमेशदादा पाटील, श्री. नागोराव गाणार, श्री. चंद्रशेखर बावनकुळे **वि.प.स.**<br>“ पालघर जिल्ह्यात उन्हाळयाच्या काळात भेडसावणाऱ्या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी तसेच जमिनीच्या भूगर्भातील पाणीसाठ्यात वाढ व्हावी या उद्देशाने पाणी अडवा, पाणी | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | जीरवा ही संकल्पना राबविण्यात येत असणे, यातूनच पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यातील डोमिहीरा नदीवर जलसंपदा विभाग प्रकल्पांतर्गत धरण बांधण्यात आले असणे, या प्रकल्पांतर्गत बांधलेल्या धरणातील भिंतीतून पाण्याची मोठी गळती सुरू असणे, ही गळती बंद करण्यासाठी दोन वर्षांपूर्वी दीड कोटी रुपये खर्च करूनही गळती बंद झाली नसणे, वेळीच या धरणाची गळती व डागडुजी केली नाही तर हे धरण फुटून दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण होणे, या धरणावर १३२ कोटी खर्च केले असतानाही पाणी गळती थांबत नसल्याने सदरहू धरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत नागरिकांकडून होत असलेले आरोप, यावर शासनाने तात्कळ चौकशी करून संबंधितांवर करावयाची कारवाई व धरणाची डागडुजी तात्काळ करून पाणीगळती थांबविण्याकरिता करावयाची उपाययोजना, यावर शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| ११९. | ३३६ | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.**<br>“ संभाजीनगर (औरंगाबाद) जिल्ह्यातील जायकवाडी धरणाच्या वरील बाजूस गोदावरी नदीवर किंवा खोऱ्यात कोणतेही नवीन प्रकल्प उभारता येणार नाही असे मा.उच्च न्यायालयाचे आदेश असतानाही नाशिक जिल्ह्यात दोन नवीन प्रकल्प उभारण्यास मंजुरी प्रक्रिया व निधी उपलब्ध करून देण्यास शासनाने प्राथमिक मान्यता देण्यात आलेली असणे, वैतरणा व कादवा या सिन्नर या प्रकल्पांतर्गत मराठवाड्याच्या हक्काचे पाणी अतिरिक्त सिंचनासाठी उपलब्ध करून देण्यात येत असणे तसेच दमणगंगा, एकदरे व वाघाड या प्रकल्पाची क्षमता वाढविण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या विरोधात काम करण्यात येत असल्याने मराठवाड्यातील जनतेमध्ये शासनाप्रती नाराजी पसरणे, जनहित याचिका १७३/२०१३ मधील पृष्ठ क्रमांक १२७ कलम १९७ चे उप कलम (n) नुसार महाराष्ट्र राज्य जल नीती, २००३ नुसार, सदरील न्याय निर्णय २०१६ च्या दिनांका पासून ६ आठवड्यात राज्य जल स्त्रोत आराखडा लागू करणे आवश्यक असतानाही शासनाकडून कालमर्यादेचे पालन | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | करण्यात आलेले नसणे, वरील याचिकेतील निर्णयाच्या पृष्ठ क्र. १२६ नुसार पश्चिम वाहिनी नद्यांचे समुद्रात वाहून जाणारे पाणी हे गोदावरी व तापी खोऱ्यात वळवून गुरुत्वाकर्षण (ग्रॅव्हिटी) तत्वाचा वापर करणे आवश्यक असतानाही मराठवाड्याचा जल अनुशेष भरुन काढण्यासाठी व शेतीसाठी सिंचनासाठी पाणी उपलब्ध होण्यासाठी जायकवाडी प्रकल्प सीमेत पाणी वाटप संस्था वाढीसाठी शासनास प्रयत्न करूनही अपयश आलेले असणे, संभाजीनगर जलसंधारण विभागातील तत्कालीन अभियंता श्री.अरुण घाटे यांनी एकात्मिक जल प्रकल्प सादर केला असून त्या एकात्मिक जल प्रकल्पास मान्यता देण्यात येवूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसणे, याबाबत मा.उच्च न्यायालयाने जनिहित याचिका क्र.१७३/२०१३ मधील दिलेल्या वरील आदेशानुसार मराठवाड्याला जास्तीचे पाणी मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ” | | |
| **१२०.** | **३३७** | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.**<br>“ गोदावरी खोऱ्याच्या एकात्मिक जल आराखडा मंजूर करून पश्चिम वाहीनी नद्यांचे अरबी समुद्रात वाहून जाणारे १६८ टीएमसी पाणी दुष्काळग्रस्त मराठवाड्यातील गोदावरी खोऱ्यात वळविण्याचा निर्णय तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३० नोव्हेंबर, २०१७ रोजी घेतला असणे, प्रवाही वळण योजना, पार गोदावरी उपसा जोड योजना क्र. ३ व ४ दमणगंगा एकदरे गोदावरी आणि दमणगंगा वैतरणा गोदावरी नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून हे पाणी मराठवाड्यात वळविण्यात येणार असणे, सदर १६८ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याच्या निर्णयास ४ वर्ष पूर्ण झाली असूनही जलसंपदा विभागाने ३० प्रवाही | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | वळण योजनांपैकी २४ प्रवाही वळण योजना नाशिक जिल्ह्यातील व उर्वरित योजना नगर जिल्ह्यातील असून नाशिक जिल्ह्यातल्या २४ पैकी १४ प्रवाही वळण योजना पूर्ण झालेल्या असतानाही पहिल्या टप्प्यातील २१.१७ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणे आवश्यक असताना सद्यःस्थितीत १ टीएमसी पाणी वळविण्यात आलेले असणे, नदीजोड प्रकल्प विविध महामंडळाच्या कार्यक्षेत्रात विभागले गेल्यामुळे सदर प्रकल्पाच्या एकत्रित अंमलबजावणीसाठी थेट शासनाअंतर्गत स्वतंत्र मुख्य अभियंता कार्यालय (मुख्य अभियंता, नदीजोड विशिष्ट प्रकल्प) स्थापन करण्यात यावे व यासाठी मुख्य अभियंता (नदीजोड प्रकल्प) या पदाची निर्मिती करणे बाबत दिनांक १९ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णय निर्गमित करण्यात आले असूनही अद्यापि सदरहू निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आलेली नसणे, उक्त बाबीकडे शासनाचे होत असलेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष, तद्नुषंगाने उक्त प्रकरणी चौकशी करून शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| **१२१.** | **२०७** | **श्री. नरेंद्र दराडे वि.प.स.**<br>" शिर्डी साईबाबा संस्थान (जि.अहमदनगर) येथील श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयांमध्ये औषध खरेदीमध्ये अनियमितता व गैरव्यवहार होत असणे, सदर रुग्णालयात वैद्यकीय साहित्य व औषधे खरेदीबाबत संस्थेकडून १०० टक्के औषध खरेदीची ऑर्डर देण्यात आलेली असतांनाही संबंधित अधिकारी कांही पुरवठादार कंपनीकडून केवळ ३० टक्केच औषध मागविली जाणे, परिणामी रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना बाहेरुन औषधे खरेदी करावी लागणे, त्यामुळे त्यांची होणारी आर्थिक पिळवणूक, याबाबत विधानसभा सभागृहात अतारांकित प्रश्न क्रमांक २७१७२ च्या उत्तरात ऑडिट करण्याबाबत नमूद करण्यात येणे, परंतू अद्यापही या अनियमितते प्रकरणी ऑडिट करण्यात न येणे, शासनाने याप्रकरणी | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१–**पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | तातडीने चौकशी करून वैद्यकीय साहित्य खरेदी व औषध खरेदीमध्ये अनियमितता व गैरव्यवहार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता वा शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **१२२.** | **१८७** | **श्री. जयंत पाटील वि.प.स.**<br>“ उरण (जि.रायगड) येथील महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीच्या वायु विद्युत केंद्रात रविवार, दि.९ ऑक्टोबर २०२२ रोजी दुपारी २.१५ वाजता केंद्रातील गॅस टरबाईन हे युनिट कार्यरत असताना तांत्रिक दोष निर्माण होवून प्रचंड स्फोट होणे, या स्फोट अपघातात महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीच्या सेवेत असलेले विवेक धुमाळ इंजिनिअर, कुंदन पाटील बॉयलर, तंत्रज्ञ, प्रदिप सिंग आणि कंत्राटी मदतनीस विष्णु यशवंत पाटील यांचा या स्फोटात गंभीररित्या भाजून मृत्यू होणे, वीज निर्मिती कंपनीमार्फत चारही कामगारांना रूग्णालयात दाखल करण्यात येणे, उपचारादरम्यान उपरोक्त चारही कर्मचाऱ्यांचा २४ तासांच्या आत मृत्यू होणे, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीमध्ये कायमस्वरूपी कार्यरत असलेले इंजिनिअर विवेक धुमाळ, कुंदन पाटील व प्रदिप सिंग बॉयलर तंत्रज्ञ यांना वीज निर्मिती कंपनीकडून नियमानुसार आर्थिक सहाय्य होणे, तसेच विष्णू यशवंत पाटील हे प्रकल्पग्रस्त गेली २२ वर्षे कंत्राटी मदतनीस म्हणून कंपनीमध्ये कार्यरत असणे, मात्र कंत्राटी मदतनीस असल्याने त्यांना वीज निर्मिती कंपनीकडून आर्थिक सहाय्य न होणे, तसेच अनुकंपा तत्वावर सेवेत सामावून घेणे संदर्भात कोणतीही कार्यवाही न होणे, यामुळे परिसरातील जनतेमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण होणे, यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२३. | २४९ | **ॲड. निरंजन डावखरे,** श्री. प्रविण दरेकर,श्री. प्रसाद लाड,श्री. रमेशदादा पाटील, श्री. नागोराव गाणार, श्री. चंद्रशेखर बावनकुळे **वि.प.स.**<br>“ ओरोस-सिंधुदुर्गनगरी हे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राजधानी शहर असूनही आज शहारा सेवा सुविधा अपुऱ्या स्वरूपात मिळत असणे, ओरोस जिल्हा मुख्यालयाला २४ तास वीजपुरवठा राहण्यासाठी ११ केव्ही एक्सप्रेस फिडर केला असणे, सदर फिडर वरून २४ तास वीज पुरवठा सुरू असणे, परंतु पावसाळ्यात ३३ केव्ही वीजपुरवठा खंडीत होणे, कारण ३३/११ केव्ही ओरोस उपकेंद्राला ३३ केव्ही वीजपुरवठा १३२ केव्ही सबस्टेशन कणकवली व १३२ केव्ही सबस्टेशन कुडाळ वरून होणे, सदर दोन्ही ३३ केव्ही सप्लाय जंगल भागातून २० ते २५ कि.मी. अंतराचे असणे, परिणामी पावसाळ्यात झाडे पडणे, वायर्स सुटणे, पोल मोडणे, इन्सुलेटर्स फुटणे यामुळे वीजपुरवठा वेळोवेळी खंडीत होत असणे, ओरोस मुख्यालय व सर्व सरकारी कार्यालयांना वीजपुरवठा अखंडीत होण्यासाठी ३३/११ केव्ही ओरोस उपकेंद्र नजीक महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या असलेल्या राखीव जागेत १३२ केव्ही पारेषण सबस्टेशन होणे आवश्यक असणे, सदर १३२ केव्ही पारेषण झाल्यास ३३/११ केव्ही ओरोस सबस्टेशनवरी ओव्हर लोड कमी करता येईल व आजूबाजूच्या इतर गावांनाही त्याचा फायदा होऊ शकणे, त्याचबरोबर मालवण शहरातही वीज पुरवठ्याने नागरिक हैराण असणे, या ठिकाणी कुंभारमाठ परिसरात १३२ केव्ही पारेषण सबस्टेशन होणे गरजेचे असणे, पर्यटन व्यवसाय सिंधुदुर्ग जिल्ह्यात असल्याने सुरक्षित वीजपुरवठ्याची आवश्यकता असणे, त्याचबरोबर वेंगुर्ला, ओसरगाव/हिवाळे, आंब्रड/जांभवडे, पणदूर/बांबर्डे, चौक येथे सबस्टेशन उभारण्याची आवश्यकता असणे, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वीज समस्या दूर करण्याकरिता शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व उपाययोजना, यावर शासनाची प्रतिक्रिया. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **१२४.** | **३४४** | **श्री. सचिन अहिर वि.प.स.**<br>" राज्यातील बहुतेक जिल्ह्यातील शेतकऱ्याकडे वर्षानुवर्षे वीजबिले थकीत असून, शेतकऱ्याकडे सध्याची वीजबिलांची थकबाकी तब्बल ४८ लाख ७५ हजार ५७१ कोटी इतकी प्रचंड असल्याने नुकतेच समोर येणे, शेतकऱ्यामध्ये वाहने, टॅक्टर, बंगला, फार्म हाऊस असल्याने सधन शेतकरी म्हणून गणले जाणे, त्यांच्याकडून कृशी पंपाचे वीजबिल वर्षानुवर्षे भरले जात नसल्याने नियमित वीज बिले भरण्याऱ्या गोरगरिबांना शेतकऱ्यावर होत असलेल्या अन्याय राज्यात सुमारे ४४ लाख ३८ हजार ७३४ कृषीपंप धारक शेतकरी असून, मागील एका वर्षापेक्षा जास्त कालावधीमध्ये १० लाख २४ हजार ६०० शेतकऱ्यांनी एकाही वीज बिले भरलेले नसणे, या प्रचंड थकबाकीमुळे महावितरणच्या दैनदिन कारभारावर होत असलेला परिणाम याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया. " | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |
| **१२५.** | **१४४** | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.**<br>" संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाल्याला आता सहा दशके होवूनही आजही विदर्भ आणि मराठवाडा यांच्यावरचा अन्याय दूर झालेला नसणे, सन १९८३ मध्ये ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. वि. म. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या अहवालानुसार सर्वाधिक अनुशेष हा विदर्भाचा ३९.१२ टक्के, तर उर्वरित महाराष्ट्राचा ३७.३२ टक्के आणि मराठवाड्याचा २३.५६ टक्के इतका होता त्यामुळे पुढील पाच वर्षांसाठी ८५ टक्के निधी हा अनुशेष निर्मूलनासाठी, तर उर्वरित १५ टक्के निधी हा चालू कामांवर खर्च व्हावा व दर पाच वर्षांनी अनुशेषांचा आढावा पुन्हा घेतला जावा, अशीही सूचना केलेली असणे, परंतु त्यानंतर | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | आजतागायत शासनाने विविध समित्यांचे अहवाल तसेच विदर्भातील जनतेचे आंदोलने सुरू असताना दर पाच वर्षांनी मंडळांना मुदतवाढ देण्यात आलेली असणे, परंतु मंडळांना आवश्यक निधी शासनाकडून मिळालेला नसणे, त्यामुळे शासनाप्रती जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, शासनाने तात्काळ डॉ. वि.म.दांडेकर यांच्या समितीने दिलेल्या अहवालानुसार विदर्भ आणि मराठवाड्यातील अनुशेष देण्याची आवश्यकता, त्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| १२६. | ६६ | **श्री. विक्रम काळे वि.प.स.**<br>“ औरंगाबाद शहरात महानगर पालिकेने प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सुमारे ३६ हजार घरे बांधण्याचा डीपीआर (सविस्तर प्रकल्प अहवाल) तयार करण्यात येणे, त्यासाठी ऑनलाईन पद्धतीने नागरिकांकडून अर्ज मागविण्यात येणे, त्यानुसार ५२ हजार जणांचे अर्ज पात्र ठरले असल्याचे निदर्शनास येणे, सदरील प्रकल्पासाठी शासनाने महापालिकेस जागा देण्यात येणे, त्यानंतर महापालिकेने निविदा प्रक्रिया राबवून कामाचे कंत्राट समर्थ कन्स्ट्रक्शन कंपनीस देण्यात येवून ५ हजार कोटी रुपयांच्या सदर प्रकल्पासाठी कंपनीस कार्यारंभ आदेश देखील देण्यात येणे, तथापि सदर कंत्राटदार कंपनीने देखील निविदेतील अटींनुसार बँक गॅरंटीची एक टक्का म्हणजे रक्कम रुपये (४० कोटी) भरणा करण्यात न आल्यामुळे प्रकल्पाचे काम रखडले असल्याचे दि. ३ नोव्हेंबर, २०२२ रोजी निदर्शनास येणे, याबाबत नागरिकांनी केलेल्या तक्रारींमुळे मा. केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री यांनी चौकशी करून १५ दिवसांत त्याबाबतचा अहवाल सादर करण्याचे महापालिका आयुक्त यांना त्याचसुमारास आदेशित करण्यात आल्याचेही निदर्शनास येणे, तथापि अद्याप अहवाल सादर न होणे, याबाबत शासनाने चौकशी करून कार्यवाही करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची भुमिका. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **१२७.** | **३६८** | **श्री. सुनिल शिंदे,** श्री. विलास पोतनीस **वि.प.स.**<br>" मुंबईतील धोकादायक स्थितीत असलेल्या सुमारे १४ हजार उपकरप्राप्त (सेस) इमारतींतील रहिवाशांना संरक्षण देणाऱ्या म्हाडाच्या सुधारित कायद्यास राष्ट्रपतींनी नुकतीच मंजुरी दिली असणे, त्यामुळे पुनर्विकासाच्या प्रतीक्षेत असलेल्या हजारो रहिवाशांना दिलासा मिळालेला असणे, मात्र, मुंबई शहर, उपनगर आणि राज्यातील खासगी भूखंडावर असलेल्या भाडेतत्त्वाच्या इमारतींतील भाडेकरूंसह पागडी पद्धतीने राहणाऱ्या जुन्या, जीर्ण इमारतीतील रहिवाशांच्या संरक्षणासाठी कोणतेही धोरण नसणे, त्यामुळे इमारत धोकादायक होताच रहिवाशी बेघर होत असणे, मुंबईतील अशा भाडेकरूंची संख्या मोठी असणे, या रहिवाशांना म्हाडाच्या नवीन कायद्याप्रमाणेच संरक्षण देण्याची होत असलेली मागणी, मात्र राज्यासह मुंबईतील खासगी भूखंडावर भाडेतत्त्वावर राहत असलेल्या जुन्या, जीर्ण इमारतींमधील भाडेकरू आणि पागडी पद्धतीने राहणाऱ्या रहिवाशांच्या समस्येकडे सरकारचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी सदरहू रहिवाशांत शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष आणि नाराजीची भावना, यास्तव या भाडेकरूंना म्हाडाच्या नवीन कायद्याप्रमाणेच संरक्षण देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया. " | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |
| **१२८.** | **४७१** | **श्री. विलास पोतनीस,** श्री. सुनिल शिंदे **वि.प.स.**<br>" मुंबईतील ग्रँटरोड येथील शितल इस्टेटचे घरमालक दामजीशहा यांच्या ब्राम्हण वाडीतील चाळीत सुमारे २३० भाडेकरु असणे, सदर भाडेकरूंच्या पुनर्विकासासाठी गृहनिर्माण (म्हाडा) यांनी शितल इस्टेटचे घरमालक दामजीशहा यांना सन २०१२ साली ना हरकत प्रमाणपत्र तर | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

मुंबई महानगरपालिकेने २०१४ साली (Intimation of Disapproval) विकासकासाठी अत्यावश्यक परवानगी दिलेली असणे, सदरच्या ब्राम्हण वाडीतील चाळी २०१४ साली पाडण्यात येऊनही विकासकांने सदरच्या जागेत इमारतीच्या बांधकामाला सुरुवात न करणे, त्यामुळे पिढ्यान पिढ्या राहणाऱ्या ब्राम्हण वाडीतील चाळीतल्या सुमारे २३० भाडेकरूंना बेघर करून घरमालक दामजी शहा, धीरेंद्र शहा यांच्याकडून सतत खटलेबाजी करून भाडेकरूंना नाहक त्रास देणे, ना हरकत प्रमाणपत्र देताना (म्हाडा) गृहनिर्माण संस्थेला दिलेल्या इंडिम्निटी बाँडची (म्हाडा) गृहनिर्माण विभागाने अंमलबजावणी न करणे, विकासकाकडून घरे देण्यासाठी (म्हाडा) गृहनिर्माण अधिकाऱ्यांना अनेकवेळा भेटून मागणी करूनही म्हाडा अधिकाऱ्यांनी कार्यवाही न करता दुर्लक्ष करणे, तसेच दामजी आणि धीरेंद्रर शहा यांनी दादर पश्चिम, भवानी शंकर रोडला झोपडपट्टी पुनवर्सन प्रकल्पातील २०१४ मध्ये तोडून ठेवलेल्या बेघर रहिवाशांना भाड्यासाठी खटलेबाजी सुरू करणे, तर ग्रॅण्टरोड शितल इस्टेटला लागून असलेल्या गुरुनानक मार्केट मधील मोटार स्पेअर्स पार्ट विकणाऱ्या शीख व्यापाऱ्यांना दहशतीने विकासक संमती घेत असणे, या तीन ठिकाणी पाचशेच्या दरम्यान भाडेकरूना असुरक्षित, भितीच्या दडपणाखाली जगावे लागत असल्यामुळे याबाबत तेथील चाळीतील काही रहिवाशांनी दिनांक २ डिसेंबर २०२२ रोजी मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाचे मुख्यधिकाऱ्यांना, विकासकासंबंधी येणाऱ्या अडी-अडचणीच्या बाबतीत लेखी निवेदन देण्यात येणे, विकासकाची दहशत तीन प्रकल्पांतील भाडेकरुंमध्ये असहाय्यता, असुरक्षितता व असंतोषाची भावना व्यक्त होत असल्याने यासंदर्भात उच्चस्तरीय चौकशी करून शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया.”

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **१२९.** | **४९८** | **श्री. सुनिल शिंदे,** श्री. विलास पोतनीस **वि.प.स.**<br>“ सन १९२१ ते १९२५ दरम्यान मुंबई विकास विभागाने (बी.डी.डी.) मुंबईतील वरळी, नायगांव, ना.म.जोशी मार्ग व शिवडी येथे बांधलेल्या २०७ चाळींच्या पुर्नविकासात वाढीव चटई क्षेत्रफळासह ५०० चौ. फु. क्षेत्रफळाच्या सदनिका देण्याबाबत गृहनिर्माण विभागाने दिनांक १८ ऑगस्ट, २०२१ रोजी शासन निर्णय निर्गमित करणे, या चाळींच्या परिसरात झोपडपट्टीसदृश्य बांधकामे, न्हाणीगृह, स्टॉल्स, दुकाने, सामाजिक/शैक्षणिक संस्था यांचा पुर्नविकास प्रकल्पात समावेश असणे, राज्य शासनाच्या या महत्वाकांशी व विशेष स्वरूपाच्या ९५ एकर पेक्षा अधिक क्षेत्रात पसरलेला हा १६ हजार पेक्षा जास्त घरांची निर्मिती होणारा मुंबईमधील एकमेव प्रकल्प असल्याने या प्रकल्पात पुर्नविकसित करावयाच्या भूखंडावर वास्तव्यास असलेल्या प्रत्येक कुटुंबाला या प्रकल्पात समावून घेण्याकरिता पात्रतेच्या निकषात (दिनांकासह) वेळोवेळी बदल करणे, प्रकल्पाची गरज म्हणून सदर प्रकल्पातंर्गत भूखंड क्रमांक १५३९ वरील सावली या निवासी इमारतीच्या पुर्नविकास करण्याबाबत देखील दिनांक २८ जानेवारी, २०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित झालेला असणे, या इमारतीमध्ये वास्तव्यास असलेल्या रहिवाशी यांचे कार्यालयीन प्रवास, मुलांचे शैक्षणिक भवितव्य, कुटुंबियांचे वैद्यकीय उपचार या परिसरात सुरू असल्याने त्यांना ही इमारत वास्तव्याच्या दृष्टीने सोयीची असणे, सदर शासन निर्णयातील जाचक अटीमुळे या इमारतीमधील केवळ १८ रहीवाशांचाच समावेश करण्यात आला असून इतर २८ रहीवाशी सदर प्रकल्पात सामावेश होण्यापासून वंचित असणे, याबाबत लोकप्रतिनीधी समन्यायी तत्त्वावर सदर प्रकल्पात सामावून घेण्याबाबत | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | तसेच या इमारतीमधील कुटुंबांनी प्रकल्पात सामावून घेण्याबाबत वारंवार शासनाकडे विनंती करणे, याबाबत वारंवार विनंती करून देखील शासनाने या इमारतीमधील रहिवाशांचा १६ हजार घरांच्या या प्रकल्पात सामावेश करणे शक्य असतानाही समन्यायी तत्त्वाने मानवतावादी दृष्टीकोनातून समावेश न करणे, शासनाच्या उदासिनतेमुळे सावली या इमारतीमध्ये वास्तव्यास असलेल्या रहीवाशांच्या मनात निर्माण झालेले चिंतेचे वातावरण, समन्यायी तत्त्वाचा मानवतेच्या दृष्टीकोनातून सकारात्मक विचार करून सावली इमारतीमधील २८ कुटुंबियांना पुनर्विकास प्रकल्पात सामावून घेण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व आवश्यक ती उपाययोजना.'' | | |
| १३०. | ५९२ | **ॲड. अनिल परब वि.प.स.**<br>'' मौजे वांद्रे, ता. अंधेरी, जि. मुंबई उपनगर येथील खार-सांताक्रुज येथील केंद्र सरकारच्या संरक्षण विभागाच्या अखत्यारीतील जागेवर ५० वर्षांहून अधिक काळ वास्तव्यास असलेल्या झोपडपट्टीधारकांचा पुनर्विकास रखडलेला असणे, याबाबत विविध आयुधांद्वारे लक्ष वेधून देखील कार्यवाही होत नसणे, सदर जागेबाबत संरक्षण मंत्री भारत सरकार व मा. मुख्यमंत्री यांच्यात २०१७ साली झालेल्या बैठकीत ५०% जागा केंद्र सरकारच्या संरक्षण विभागास तर ५०% जागेवर झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गत तेथील झोपडपट्ट्यांचे पुनर्विकास करण्याचे प्राथमिक धोरण निश्चित झालेले असणे, तसेच सदर पुनर्विकासाठी केंद्र सरकारच्या संरक्षण विभागाची बायोमेट्रिक सर्वेक्षण करण्यास हरकत नसणे, तत्कालीन सरकारने याबाबत त्रिसदस्यीय समिती गठीत न करणे परंतु सदर झोपडपट्टीच्या लगत असलेल्या जिल्हाधिकारी यांच्या अखत्यारीतील तसेच खाजगी मालकीच्या जागेवर पुनर्विकास करण्यास मंजुरी देणे, परंतु संरक्षण विभागाच्या मालकीवरील पुनर्विकासाबाबत आजतागायत अतिशय संथगतीने सुरू असलेल्या कार्यवाहीमुळे तेथील नागरिकांमध्ये असलेल्या असंतोषाबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना याबाबत शासनाची भूमिका. '' | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१–**पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **१३१.** | **६०** | **श्री. सतिश चव्हाण,** श्री. विक्रम काळे **वि.प.स.**<br>" गंगापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यात सन १९७९ ला रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून टेंभापूरी मध्यम प्रकल्पाचे काम सुरू होऊन सन १९९५ मध्ये पूर्ण झाले असणे. टेंभापूरी मध्यम प्रकल्पाची साठवण क्षमता २१.२७ द.ल.घ.मी असणे, सदर प्रकल्पासाठी रु.१७.३० कोटी खर्च झाले असणे, सन २००६ पासून धरणात काही प्रमाणात पाणीसाठा उपलब्ध होत असणे. मागील २ वर्षापासून प्रकल्प पुर्ण क्षेमतेने भरत असणे, सदर प्रकल्पात बाधीत गावाची संख्या ९ असून बाधीत क्षेत्र ७८५ हेक्टर असणे. तर बाधीत शेतकऱ्यांची संख्या ३७१ असणे, धरणग्रस्तांना अद्याप पर्यायी जमिनी मिळाल्या नसणे, पुर्नवसीत गावात अद्याप सोयी सुविधा नसणे, लाभक्षेत्राच्या गावाची संख्या २३ असून ४७९ हेक्टर जमीन सिंचन क्षेत्र प्रस्तावित असणे, सदर धरणातून २५ गावाला पाणी पुरवठा योजना असणे. सन १९९० मध्ये कॅनालचे काम पुर्ण झाले परंतु बाधीत शेतकऱ्यांना जमिनीचा मावेजा अद्यापपावेतो मिळाला नसणे, तसेच कॅनालही खराब झाले असून उपचाऱ्यांना पाणी उपलब्ध होत नसणे, धारीच्या भिंतीला तडे गेलेले असून पाण्याचे फवारे उडत असणे, त्यामुळे त्यांचे स्ट्रक्चर ऑडीट होणे गरजेचे असणे, धारी (भिंत) च्या खाली ५०० मीटरवर टेंभापुरी, धामोरी, शेंदुरवादा व शिवपूर ही गावे असणे, या गावाची लोकसंख्या जवळपास १५ हजार असून ते गावे असुरक्षित असणे, शासन निर्णय दिनांक १८ मे २०१८ नुसार धरणग्रस्तांना पुर्नवसनासाठी भुखंड देण्याची तरतूद असून सुद्धा धरणग्रस्तांना भुखंड मिळाले नसणे, धरणग्रस्तांना पर्यायी जमीन घेण्यासाठी मिळालेल्या मावेजाच्या रकमेतून ६५ टक्के रक्कम शासनाकडे भरल्यास | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | पर्यायी जमीन तात्काळ मिळण्याची तरतूद असतांनाही शासनाने यावर काहीही कार्यवाही केलेली नसणे, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची औरंगाबाद, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यात अंदाजे ४६ हजार एकर जमीन उपलब्ध असणे, या जमिनीतून धरणग्रस्तांना तात्काळ पर्यायी जमिनी उपलब्ध करून देण्यासाठी दि.२७ डिसेंबर २०१६ रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेतला असणे, तरीही याबाबतीत अद्याप काहीही कार्यवाही झालेली नसणे, धरणग्रस्त शेतकऱ्यांना पर्यायी जमिनी, रहिवाशी प्लॉट, धरणग्रस्त प्रमाणपत्र देण्यासाठी होत असलेली मागणी व धारीचे स्ट्रक्चर ऑडीट तात्काळ करणेसाठी होत असलेली मागणी [illegible] ” | | |
| १३२. | २३२ | **श्री. आमश्या पाडवी वि.प.स.**<br>“ सुरत-नागपुर महामार्गा क्र. ६ चे विस्तारीकरण व चौपदरीकरणात भुसंपादन संपादीत क्षेत्राकरिता शेतकऱ्यांना मिळालेल्या मोबदल्यातून १० टक्के नजराणा रक्कम सरकार जमा करण्यात येणे, मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने आदिवासी बहुल भागातील शेतकऱ्यांची सरकार जमा केलेली १० टक्के नजराणा रक्कम परत करण्यात यावी असा निर्णय माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये दिलेला असणे, नवापुर तालुक्यातील (जि.नंदुरबार) बेडकी व मोरकंरजा हा भाग आदिवासी बहुल असून पेसा क्षेत्रात मोडत असल्याने सदर गावातील भुसंपादन करण्यात आलेल्या शेतकऱ्यांची १० टक्के नजराणा रक्कम शेतकऱ्यांना परत मिळावी अशी मागणी ग्रामस्थांनी तसेच स्थानिक लोकप्रनिधींनी वारंवार शासनाकडे केलेली असणे, मागणीच्या अनुषंगाने अद्याप कोणतीच निर्णयात्मक कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी भुसंपादनग्रस्त नागरिकांमध्ये तीव्र नैराश्याचे व असंतोषाचे वातावरण पसरणे, शासनाने यासंदर्भात तात्काळ निर्णयात्मक कार्यवाही करून उक्त गावातील शेतकऱ्यांची १० | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

## विवरण क्रमांक २१–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | टक्के नजराणा रक्कम परत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| १३३. | ५५४ | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.** “ मौजे चोची व मौजे कोंढाणे, ता.कर्जत, जि. रायगड येथे धरण बांधणे प्रस्तावित असणे, या ठिकाणच्या आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी भूसंपादीत करण्यात येणार असणे, मौजे चोची व कोंढाणे येथील मिळकती अस्तित्वात असल्यापासून आदिवासी शेतकरी सदर मिळकतीचे कुळ म्हणून असणे, या जमिनीवर सर्व आदिवासी शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह असणे, सर्व आदिवासी शेतकऱ्यांना जिल्हाधिकारी कार्यालयात सुणावणीसाठी हजर राहण्याचे कळविण्यात आलेले असणे, या संदर्भात सर्व आदिवासी शेतकऱ्यांनी लेखी अर्जाद्वारे जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे लेखी खुलासा कळविलेला असणे, या मिळकती भूसंपादीत होणार असल्याची माहिती मिळाल्यावर महसूल विभागाचे अधिकारी यांचेकडून कुळाचे सावकारांशी संधान साधणे, शेतकऱ्यांना भूसंपादनाच्या नोटीसा आल्यावर कूळ बदलण्याचा प्रयत्न करणे, सावकारांना कूळाच्या जमिनीवर हक्क सांगण्यासाठी प्रवृत्त करणे, या जमिनी शासकीय अधिकाऱ्यांचे नातेवाईक यांच्या नावांवर करण्याचा प्रयत्न करणे, शासकीय नियमांची पायमल्ली व आपल्या अधिकारांचा दुरुपयोग करून आदिवासी शेतकऱ्यांवर दबाव टाकणे, त्यांची फसवणूक करणे, एकुणच या जमीन भूसंपादनामध्ये आदिवासी बांधवांची फसवणूक करून शासकीय अधिकारी जमिनीचा गैरव्यवहार करत असणे, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी व या विषयी शासनाची भूमिका. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३४. | ६०८ | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.**<br>" जिल्हा व तालुका नाशिक येथील चांदशी गावातील गट नं.६९/१, क्षेत्र ०२ हेक्टर आर या क्षेत्राची हिंदू महादेव कोळी महादु दगु धोंगडे नामक आदिवासीच्या नावे असलेली जमीन श्रीमती स्वाती सागर शिंदे, संदीप पाटणकर, सागर जाधव, राजेंद्र गोरडे या चार व्यक्तींनी आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेऊन शासन परवानगी न घेता, खोटी कागदपत्रे बनवून जमीन नावे केल्याचा गंभीर गैरप्रकार नुकताच निदर्शनास येणे, सदरहू चारही व्यक्ती आदिवासी जातीचे नसताना, शासनास अंधारात ठेवून व शासनाची दिशाभूल करून चांदशी गावचे तलाठी, मंडळ अधिकारी आणि संबधित अधिकारी यांचेबरोबर अर्थपूर्ण व्यवहार करून आदिवासींची कोट्यावधी रुपये किंमतीची जमीन, नजराणा बुडवून व सर्वसाधारण गटातील दाखवून खोट्या दस्तावेजाद्वारे शासन परवानगी न घेता परस्पर बेकायदा नावे केल्याचा प्रकार घडणे, मूळ आदिवासीचे निधन झाल्यानंतर वारसाची नावे दाखल करण्यास गेले असता मयताच्या वारसांना सदर जमीन वडिलांच्या नावेच नसल्याचा प्रकार निदर्शनास येणे, आदिवासींची बेकायदा जमीन खरेदी प्रकरणातील श्रीमती स्वाती सागर शिंदे या शासनातील नाशिक येथील जलसंपदा विभागातील, अधीक्षक अभियंता सागर शिंदे यांच्या पत्नी असणे, सदरहू जमिनीवर झालेल्या फेरफार नोंदीमधील नोंद क्र.१७३४ या नोंदीने आदिवासी शेरा कमी करून जमीन बक्षीसपत्र दाखवून खरेदी करण्यात येणे, या संदर्भात तक्रार अर्ज दाखल करणाऱ्या श्रीमती लंकाबाई जानकीराम बगर व श्री.विजय जानकीराम बगर, रा.पंचवटी, नाशिक यांनी शासनास निवेदन देऊन सदरहू झालेला बेकायदा जमीन हस्तांतरण व्यवहार शासनाने चौकशी करून त्वरित रद्द करून जमिनीच्या सातबारा उताऱ्यावरील बिगर आदिवासींची नावे रद्द करून मूळ आदिवासींना जमीन परत करण्याकरिता शासनाकडे मागणी करणे, सदर प्रकरणात सदरहू चार व्यक्तींनी आदिवासींची कोट्यावधी रुपये किंमतीची | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | जमीन तलाठी, सर्कल, तहसिलदार यांनी आर्थिक संगनमताने परस्पर हडप करून आदिवासींची फसवणूक करून त्यांना बेदखल केल्याचा घडलेला अमानुष प्रकार, यामुळे आदिवासींवर झालेला गंभीर अन्याय, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे आदिवासींमध्ये निर्माण झालेले तीव्र संतापाचे व असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ” | | |
| **१३५.** | **१०२** | **श्री. नागोराव गाणार,** श्री. प्रविण दरेकर,श्री. प्रसाद लाड,श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री. रमेशदादा पाटील,श्री. रमेश कराड,श्री. रामदास आंबटकर,श्री. प्रवीण दटके,श्री. महादेव जानकर,श्रीमती उमा खापरे,ॲड. निरंजन डावखरे,डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे,श्री. चंद्रशेखर बावनकुळे,श्री. प्रविण पोटे-पाटील,डॉ. रणजित पाटील,श्री. अरुण लाड **वि.प.स.**<br>“ राज्यात जळगाव, अकोले, अहमदनगर, पुणे, उसमानाबाद या सारख्या जिल्ह्यासह २० जिल्हे ८६ बाधित तालुके ३१० गावे मोठ्या प्रमाणात लम्पी आजाराने जनावरे बाधित होत असून लम्पी रोगाचा प्रसार झपाट्याने होत असल्याने हजारो जनावरे मृत्युमुखी पडले असल्याची बाब माहे नोव्हेंबर २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात व त्या सुमारास निदर्शनास येणे, लम्पी आजार गोवंश गाई, बैल यांना मोठ्या प्रमाणात होत असून जनावरांना मोठ्या प्रमाणात गाठी येणे, ताप येणे, यामुळे जनावरे अन्न न खाणे, लम्पी विषाणूजन्य रोग असणे, तो दीड ते दोन महिन्यात बरा होणारा असल्याने त्यासाठी सर्व गोवंश जनावरांना आणि इतर जनावरांनाही लस देण्याची मोहीम राबविण्यात येत असणे, तसेच गडचिरोली जिल्ह्यात कोरोंना कालावधीत हा आजार आता असतांनाही त्याचवेळीच दखल घेतली असती तर ही | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | परिस्थिति निर्माण झाली नसती असे पशुपालक व्यक्त करत असणे, त्यामुळे मागील तीन महिन्यांपासून जनावरांसाठी होत असलेले लसीकरणात वाढ करण्याची आवश्यकता असणे, राज्यात ४८५० दवाखाने असून येथे डॉक्टरांची कमतरता असल्याने ५० टक्के रिक्त पदे असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे पशुपालकांना खाजगी पशुवैद्यकीय डॉक्टरांकडून उपचार करावे लागत असल्याने मोठा आर्थिक भुर्दंड बसत असणे, त्यामुळे खाजगी डॉक्टरांकडुनही देण्यात येणारी लस आणि औषध उपचार मोफत करण्याची गरज निर्माण होणे, त्याचबरोबर मागील चार महिन्यापासून जनावरांचे बाजार बंद असल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक समस्येत आलेला असणे, लम्पी आजाराने मृत्युमुखी पडलेल्या पशुधनाच्या नुकसानाची भरपाई शेतकऱ्यांना देऊन जी जनावरे उपलब्ध आहेत. त्यांना योग्य उपचार करण्यासाठी शेतकऱ्यांना आर्थिक मदतीची गरज असून त्यासाठी शासनाने एक आकृतीबंध कार्यक्रम करण्याची आवश्यकता असणे, राज्यातील पशुसंवर्धन विभागातील सर्व रिक्त पदे उदा. डॉक्टर मदतनीस व इतर आवश्यक असणारी पदे भरण्याची गरज असणे, यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना. ” | | |
| **१३६.** | ४५९ | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.**<br>“ राज्याच्या शेतकऱ्यांच्या हितासाठी दुग्धव्यवसायाला चालना मिळण्याच्या उद्देशाने माहे जुन, १९६७ रोजी स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र राज्य सहकारी दुध महासंघ मर्यादित (महानंद दुग्धशाळा) संघामध्ये दिनांक १८ ऑगस्ट, १९८३ साली महानंद दुग्धशाळेची स्थापना करण्यात आलेल्या दुग्धशाळेवर संचालकाची नियुक्ती केल्यापासून दुग्धशाळा आर्थिक तोट्यात आलेली असणे, सन २००४-०५ मध्ये ८ लक्ष लिटर दुधविक्री असलेला महासंघ तोट्यात गेला असून सन २०२१-२२ मध्ये दूध महासंघाची दैनिक सरासरी दूध विक्री १४५००१ लि. होवून वार्षिक उलाढाल रु.३०७.९३ कोटी होवूनही रु.२४.३० कोटीचा तोटा झालेला असून | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

## विवरण क्रमांक २१–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | सन २०१६ ते सन २०२२ पर्यंत रुपये १०२,६८,९८,५७१.३५ कोटीचा तोटा महासंघाला झालेला असणे, शासनाने महासंघाला दिलेल्या रु.७०.०० कोटी चे दिलेले भांडवलापैकी रु.४३.६२ कोटी दैनंदिन खर्च करण्यात येत असून माहे, एप्रिल, २०२२ पासून सुरक्षारक्षक व कर्मचारीवृंद, साहित्य पुरवठादार, वार्षिक देखभाल दुरुस्ती ठेकेदारांनी केलेल्या कामांची देयके निधी अभावी थकित राहिलेली असणे, परराज्यातील दुध महासंघाचा राज्यात विस्तार होत असून स्पर्धात्मक तयारी करण्यासाठी शासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात येत नसणे, शासनाने महानंदामधील आरे दुग्ध पदार्थ बनविण्याचे काम दिनांक १३ ऑगस्ट, २०२२ पासून बंद करण्यात येणे, उत्पादन वाढविण्यासाठी अधिकारी/कामगारांची भरती करण्यात न येणे, असेप्टिक प्रकल्पामध्ये इतर ब्रँडचे पॅकेजिंग केले जात असून कर्मचारी कमतरता दाखवून प्रकल्पाचा २० टक्केच वापर करण्यात येत असणे, दुध महासंघाला आवश्यकतेनुसार दुध पुरवठा होत नसल्याने नियमित दुध पुरवठा करण्यासंदर्भात विनंती शासनाला महासंघाकडून करूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसणे, महासंघाच्या संचलकांनी घेतलेल्या चुकीच्या निर्णयामुळे व गैरव्यवहारामुळे महासंघाची आर्थिक स्थितीनिर्माण झाली असून त्याबाबत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत विधानपरिषद सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने मा.पिठासीन अधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्देशानुसार गठित करण्यात आलेल्या चौकशीचा अहवाल एक महिन्यात सादर करण्याचे निर्देश देण्यात आलेले असणे, सदर चौकशीच्या अनुषंगाने शासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने महानंदा दुधसंघाच्या कर्मचाऱ्यांन मध्ये शासनाप्रती नाराजीची भावना निर्माण झालेली असणे, | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | याबाबत महानंद दुधसंघाला तोट्यातून बाहेर पडण्यासाठी लोकप्रतिनिधींनी तसेच कर्मचारी संघटनांनी विविध उपाययोजना करण्याबाबत विनंती केली शासनास केलेली असणे, सदर मागण्यांच्या अनुषंगाने दुग्ध महासंघाला तोट्यातून बाहेर काढण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **१३७.** | **१५१** | **श्रीमती उमा खापरे,श्री.** प्रविण दरेकर,श्री. नागोराव गाणार,श्री. रमेशदादा पाटील,श्री. रमेश कराड, श्री. प्रसाद लाड,श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर,श्री. सचिन अहिर **वि.प.स.**<br>“ राज्यात पालघर जिल्ह्यातील जव्हार वाडा व मोखाडा या आदिवासी तालुक्यात सामाजिक वनीकरण विभागामार्फत काम करण्यात आलेल्या निधीचा योग्य वापर न झाल्याने कोट्यावधी अनिमिता झाली असल्याचे बाब माहे ऑक्टोबर २०२२ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास येणे, यामुळे या तालुक्यामधील आदिवासी नागरिक शेतकरी व सामान्य नागरिक आपल्या हक्काच्या विकासापासून कोसो दूर राहत असतानाच होणारा विकास खुंटत असणे त्यासाठी शासनाने सामाजिक वनीकरणाच्या सर्व कामाची सखोल चौकशी करून जिल्ह्यातील आदिवासी शेतकरी, नागरिक आणि बिगर आदिवासी यांना न्याय देण्याची व विशेष योजना तयार करण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |
| **१३८.** | **२७६** | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.**<br>“ नैसर्गिक आपत्ती मध्ये तसेच सुमद्राच्या पाण्यापासून जमिनीची धुप रोखण्यासाठी पर्यावरणाच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या कांदळवनाच्या जागेत खारफुटीची मोठ्या प्रमाणात कत्तल करण्याच्या घटना वाढत असून, मुंबई शहरालगत असलेल्या नवी मुंबई शहराला विस्तीर्ण असा खाडी किनारा लाभला असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणात कांदळवन खारफुटीवर भूमाफियांकडून खारफुटीची सर्रास कत्तल केली जात असणे भूमाफियांकडून वाशी खाडीत | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१–**पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | सर्व्हे क्रमांक १७ वर सिडकोच्या जागेत भराव टाकून तेथील कांदळवन नष्ट करून मोठ्या प्रमाणात अनधिकृत झोपड्या बांधून राहणाऱ्या झोपडीधारकांकडून अवैधरित्या पैसे वसूल करणे, अवैध सुरू असणे, जुई नगर येथील रेल्वे वसाहती मध्ये इमारत तोडताना निघालेले डेब्रिज मागील बाजूस असलेल्या कांदळवनावर टाकण्यात येत असून भूमाफियांकडून पाच एकर परिसरातील खारफुटीची झाडे तोडून जमीन तयार करण्यात येत असल्याची घटना निदर्शनास येणे, भूमाफियांकडून वाशी खाडीत राखीव कांदळवनात तसेच एकुण ३.८८ हेकटर क्षेत्रावर अंदाजे १७, २४२ कांदळवन वृक्षांची कत्तल करून पर्यावरणात्मक दृष्ट्या १ कोटी २६ लाखांचे प्रति वर्ष नुकसान होत असणे, कांदवळण क्षेत्रात होणारे अतिक्रमण रोखण्यासाठी सीसीटीव्ही बसवण्याचा निर्णय तत्कालीन मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये घेण्यात आलेला असणे, सदर प्रकल्प तीन टप्प्यात राबविण्याचे निश्चित करण्यात आले असून पहिल्या टप्प्यात भिवंडी, दुसऱ्या टप्प्यात पश्चिम व मध्य मुंबई व तिसऱ्या टप्प्यात नवी मुंबई व ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्याचा समावेश असून पर्यावरणाच्या तसेच कांदळवनाचे रक्षण करण्याच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या प्रकल्पाबाबत शासनाने निविदाच काढण्यात आलेली नसणे, कांदळवनातील खारफुटीच्या जंगलावर करण्यात येणारे अतिक्रमण रोखण्याबाबत नागरिकांकडून करण्यात आलेले तक्रारीबाबत शासनाकडून कोणतीही कार्यवाही होत नसल्याने जनतेमध्ये शासनाप्रती नाराजीची भावना निर्माण होणे, पर्यावरणाचा समातोल राखणाऱ्या कांदळवनातील खारफुटीचे रक्षण करण्यासाठी तसेच खारफुटीची तोड करणाऱ्या भूमाफिया व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकारी व | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **१३९.** | **४९७** | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.**<br>“ राष्ट्रीय हरित लवादाने पर्यावरण विषयक नियमांच्या उल्लंघनाबाबत एकीकडे राज्याला १२००० कोटी रुपयांचा दंड ठोठावल्याच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या वनविभागात ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील सतरा हजार झाडांचा बळी देण्याचा निर्णय वनमंत्र्यांच्या उपस्थितीत घेतला असल्याची बाब नुकतीच उघडकीस येणे, एकीकडे राज्यात १८ नवीन आणि सात प्रस्तावित संवर्धन राखीव वनक्षेत्रे घोषित करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असताना त्याच वेळेस यवतमाळ मधील पांढरकवडा वनविभागात लाईम-स्टोन उत्खननासाठी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या व्याघ्रभ्रमण मार्गातील तब्बल १७००० झाडांचा बळी घेण्याच्या प्रस्तावाला मंजुरी मिळणे, व्याघ्र भ्रमण मार्गात ज्या खाजगी प्रकल्पांना वन्यजीव मान्यता आवश्यकता आहे त्यांच्याकडून बाधित क्षेत्रातील प्रकल्प किमतीच्या दोन टक्के रक्कम वन्यजीवांच्या संवर्धनासाठी जमा करणे आवश्यक असणे परंतु सदरहू यंत्रणांकडून चार टक्के रक्कम घेण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला असणे, पैशा पेक्षा वने आणि वन्यजीव पर्यावरण महत्वाचे असताना या प्रकल्पासाठी झाडांवर कुल्हाड चालवण्याच्या निर्णयामुळे राज्यातील पर्यावरण वाद्यांमध्ये पसरलेली नाराजीचे वातावरण, पर्यावरण प्रेमींकडून खाण प्रकल्प टाळण्याबाबत केल्या जात असलेल्या सूचनांकडे व प्रकल्पाचे क्षेत्र व्याघ्र भ्रमणात येत असल्यामुळे या भागात खाणकाम सुरू करण्यापूर्वी खाणकामाचे क्षेत्र पुनर्भरण करणे आवश्यक असताना हिंदुस्तानी वन्यजीव संस्थेच्या अभ्यासानुसार परिसरातील वाघांचे अस्तित्व असलेल्या क्षेत्राचे संवर्धन करण्यासाठी आराखडा तयार करण्याच्या शिफारशीकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१—**पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **१४०.** | **५५०** | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.**<br>" राज्य शासनातर्फे सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात ठाणे वन विभागात रोपवने, रोपवाटीका, जल व मृद संधारण, वनातील प्रतिबंधात्मक योजना, वनातील इमारती तसेच पर्यावरण विषयक कामात कोटयावधीच्या पुरविण्यात आलेल्या शासकीय निधीतून बोगस व निकृष्ट कामे करून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केल्याचे प्रकरण दि.३०/९/२०२२ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, तसेच अनेक ठिकाणी प्रत्यक्षात कामे न करता, बोगस बिले सादर करून कोटयावधी रुपयांचा शासकीय निधी हडप केल्याचा प्रकार घडणे, सदरहू भ्रष्टाचाराची माहिती मिळाल्यानंतर माहिती अधिकाराखाली मागणी केली असता, ठाणे वनपरिक्षेत्राच्या सबंधित वन अधिकारी यांनी माहिती न देणे, ठाणे वन विभागात विविध वनपरिक्षेत्रात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याची तक्रार दाखल झाल्यानंतर, कागदोपत्री पुराव्यांसह सादर झालेल्या गैरव्यवहार व भ्रष्टाचार प्रकरणाची, मुख्य वनसंरक्षक व उपवन संरक्षक दक्षता व गुणनियंत्रण विभाग यांनी चौकशी न करता, ज्या विभागाची तक्रार आहे त्या ठाणे विभागाकडे प्रकरण पाठविण्यात आल्याचा घडलेला आश्चर्यजनक प्रकार, यामुळे सदर भ्रष्टाचार प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असल्याचे सिद्ध होणे, अशा प्रकारचा गैरव्यवहार व भ्रष्टाचार दरवर्षी होऊन शासकीय निधी हडप करण्याचा प्रकार घडत असणे, सदर बाब शासनाच्या निदर्शनास येऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येता प्रकरण दडपून टाकण्यात येणे, यामुळे मोठ्या प्रमाणात शासकीय निधीचा झालेला अपव्यय, यास्तव ठाणे वनविभागातील उपवनसंरक्षक, वनपरिक्षेत्र अधिकारी यांना तात्काळ निलंबित करून | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ” | | |
| **१४१.** | **६०२** | **श्री. प्रसाद लाड,श्री.** अंबादास दानवे **वि.प.स.**<br>“ पालघर जिल्ह्यातील, वनक्षेत्र विभागा अंतर्गत येणाऱ्या कुडे गावातील राष्ट्रीय महामार्गा लगतची सुमारे ४३ गुंठे वनजमीन विकासकाने प्रकल्पाच्या उद्देशाने संपर्क रस्ता ( अप्रोच रोड ) म्हणून बळकावण्यात आली असणे. वन जमीन असलेल्या जागेत ५० मोठी वृक्ष इतर झाडे-झुडपे असताना सदर जमिनीवर गवत, भातशेती असल्याचा दाखला महसूल विभागाने दिलेला असणे. त्याच बरोबर गावातील दुरच्या भूधारकाला हाताशी घेऊन भूखंड क्रमांक १२२/अ/४४ ची खरेदी करून वनविभागाच्या जमिनीच्या ठीकाणी हा भूखंड असल्याचे भासविण्यात येऊन या ४३ गुंठे असलेल्या वादग्रस्त जमिनीचा नकाशा काढताना त्याठीकाणी असणाऱ्या पाटाची सलगता राखण्यात आलेली नसणे. पाटाच्या उभारणीच्या काळात तसेच राष्ट्रीय महामार्ग जुना (एन्एच्-८) रुंदीकरणाच्या प्रक्रीयेत जमीन अधिग्रहण करताना संबंधित मालकाची कुठेही नोंद नसल्याची ग्रामस्थांचे म्हणणे असणे. सदर सर्वे क्रमांक १२२/अ/४४ ची खरेदी करताना ७/१२ उताऱ्यावर भात शेती व गवत असल्याचा उल्लेख असून वादीत ठीकाणी ५० मोठी वृक्ष होती, या झाडांमध्ये ड्रीलद्वारे छिद्र करून त्यात रसायने टाकून वृक्ष मारुन टाकणाऱ्या टोळीला गावकऱ्यांनी पकडलेले असणे. ७/१२ उताऱ्यावर गवत व भात शेती असा उल्लेख असलेला हा ७/१२ भूखंड क्रमांक १२२/अ/४४ चा असणे हे शक्य नसल्याचा ठाम विश्वास कुडे गावातील ग्रामस्थांनी केला असणे. कुडे ग्रामपंचायतीने ३१ ऑगस्ट २०२० रोजी झालेल्या ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत सर्वे नंबर ७०/१ व १२२/अ/४४ या जागांना बिनशेती करण्यासाठी ना हरकत परवाना दाखला बनावट दिल्याचे समजणे, मात्र | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | या काळात कोव्हीड टाळेबंदीमूळे ग्रामसभांना स्थगिती असल्याने या काळात कोणतीही ग्रामसभा आयोजित करण्यात आलेली नसल्याने तसेच बिनशेती चा परवाना बनावट असल्याचे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अहवाल दिलेला असणे. सदर संवेदनशील क्षेत्रातील वनजमीन वनविभाग, महसूल तसेच ग्राम विभागानी भात शेतीची जमीन दाखवून बिनशेतीचा बेकायदेशीपणे बनावट दाखला देऊन परस्पर विकासकाला विकण्यात आलेली असणे. पालघर जिल्हा प्रशासनाने केलेले कृत्य हे बेकायदेशीर व अतिशय गंभीर स्वरूपामूळे कुडे ग्रामस्थांच्या मनात प्रशासनाबाबत चिडीची व संतापाची भावना निर्माण झाली असल्याकारणाने सबंधित ग्रामसेवक, व सरपंच विकासक यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई आणि याबाबत शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **१४२.** | **८६** | **श्री. विक्रम काळे,श्री.** सतिश चव्हाण,श्री. कपिल पाटील,डॉ. सुधीर तांबे,श्री. जयंत आसगावकर, श्री. किरण सरनाईक,श्री. बाळाराम पाटील,श्री. किशोर दराडे,डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे **वि.प.स.**<br>“ तंत्रशिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी संसदेच्या निर्देशानुसार प्रत्येक राज्यात आणि काही प्रमुख शहरांमध्ये तंत्रशिक्षण परिषदेची विभागीय कार्यालये स्थापन करण्यात येणे, त्यानुसार मुंबईतील चर्चगेट येथे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे विभागीय कार्यालय, मुंबई येथे १९८७ मध्ये व त्यानंतर जागेची समस्या निर्माण झाल्याने ते पवई येथे स्थलांतरीत करण्यात येणे, राज्यातील १५०० तंत्र महाविद्यालये या कार्यालयाशी जोडली गेले असणे, तथापि | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | अखिल भारतीय तंत्रपरिषदेचे नव्याने नेमण्यात आलेल्या प्रभारी अध्यक्षांनी मुंबई येथील सदरचे विभागीय कार्यालय,मुंबई ऐवजी दिल्ली येथे महिनाभरात हलविण्यात येणारे असल्याचे दिनांक २३ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, त्यामुळे महाविद्यालय परवानग्या, विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्रांच्या दुरुस्तीसाठी दिल्लीला फेऱ्या माराव्या लागण्याची तंत्रशिक्षण महाविद्यालयाचे अधिकारी-कर्मचाऱ्यांवर अकारण आलेली पाळी, यातील अनेक कर्मचाऱ्यांचा पगार तुटपुंजा असल्याने दिल्ली येथे जाऊन कुटुंब चालविण्याचा व स्थायिक होण्याचा त्यांच्यापुढे निर्माण झालेला प्रश्न, त्यामुळे विभागीय कार्यालय,मुंबई हे येथेच ठेवावे अशी त्यांची असलेली आगग्रही व न्यायोत्रित मागणी, परिणामी, मुंबईतील कार्यालय स्थलांतराप्रकरणी अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेले नैराश्याचे वातावरण व उदासिनतेची भावना, शासनाने याप्रकरणी लक्ष घालून, मुंबईतील विभागीय कार्यालय,मुंबई येथेच ठेवण्याबाबत केंद्र शासनाकडे मागणी करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **१४३.** | १४५ | **श्री. प्रसाद लाड,श्री.** अभिजित वंजारी,श्री. राजेश राठोड,डॉ. वजाहत मिर्झा,डॉ. सुधीर तांबे, डॉ. प्रज्ञा सातव,श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील,श्री. जयंत आसगावकर,श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री. नागोराव गाणार **वि.प.स.**<br>“ खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थामधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसूचीत जाती, विमुक्त जमाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास वर्गातील विद्यार्थ्यांनी संस्था स्तरावरील फेरीत प्रवेश घेतल्यास त्यांना शिष्यवृत्ती व शैक्षनिक शुल्क प्रतिपूर्ति योजनांचा लाभ राज्याच्या तंत्रशिक्षण संचालनाकडून नाकारला जात असल्याने या विद्यार्थ्यांना राज्य शासनाच्या चुकीच्या धोरनाचा फटका बसणे, व्यावसायिक अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रियाही विविध फेऱ्यांच्या माध्यमातून सुरू असणे, | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१–**पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | प्रवेशाच्या सर्व फेऱ्या संपल्यावरही महाविद्यालयामध्ये रिक्त असलेल्या जागावरील प्रवेश हे संस्था स्तरावर होणे, हे प्रवेशही प्रवेश फेरीच्या अधीन राहून गुणवत्ता यादिनुसार घेतले जाणे, मात्र ही प्रवेश फेरी संस्थास्तरावर होत असल्याने या फेऱ्यामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती संबंधित योजनांचा लाभ नाकारला जाणे, त्यामुळे शेवटच्या फेरीमध्ये रिक्त असणाऱ्या जागावर प्रवेश घेणाऱ्या मागासवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृतीसाठी पात्र असतांनाही शिक्षण विभागाच्या चुकीच्या धोरणामुळे पूर्ण शुल्क भरून शिक्षण घ्यावे लागणे, या संदर्भात विद्यार्थी तसेच सामाजिक संघटनाकडून सातत्याने ही बाब शासनाचे निदर्शनास आणूनही या प्रकरणी शासनांकडून केवळ आश्वासन देणे, आश्वासनाऐवजी शासनाने विनाविलंब निर्णय घ्यावा अशी मागणीही करण्यात येऊनही अद्याप कोणताच निर्णय घेण्यात आलेला नसणे, व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी अखेरच्या फेरीत प्रवेश घेणाऱ्या व शिष्यवृत्तीसाठि पात्र असणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यावर होणारा अन्याय तातडीने दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **१४४.** | **२४०** | **ॲड. निरंजन डावखरे,श्री.** प्रविण दरेकर,श्री. प्रसाद लाड,श्री. रमेशदादा पाटील,श्री. नागोराव गाणार, श्री. चंद्रशेखर बावनकुळे **वि.प.स.**<br>“ व्यावसायिक अभ्यासक्रम बी.ई. एम. ई. बी. फार्म. एम. फार्म, हॉटेल मॅनेजमेंट, इ. अभ्यासक्रमांचे प्रवेश हे महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेद्वारे होत असणे, सदर प्रवेशप्रक्रियेमध्ये प्रवेशासाठी तीन फेऱ्या असणे, ह्या फेऱ्यामध्ये | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | असणारे बेटरमेंट ह्या ऑप्शनमुळे महाविद्यातयातील प्रवेश रिक्त राहत असून विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित राहत असणे, पहिल्या फेरित विद्यार्थ्यांना पंसतीनुसार एक महाविद्यालय लागणे, ह्या परिस्थितीत विद्यार्थी प्रवेश निश्चित न करता बेटरमेंट पर्याय निवडतो व दुसरा राऊंड खेळणे, त्यामुळे त्याची हि जागा निश्चित राहून ती जागा दुसऱ्या राऊंडला भरल्या जात नसणे, दुसऱ्या वेळेमध्येसुद्धा हा विद्यार्थी बेटरमेट पर्याय निवडतो व तिसरा राउंड खेळणे, ह्यावेळेसुद्धा त्याची जागा निश्चित राहते व तिसऱ्या राऊंडसाठी विद्यार्थी पात्र राहणे, तिसऱ्या वेळेस विद्यार्थीस पहिले महाविद्यालय अलॉट झाल्यानंतरसुद्धा विद्यार्थी प्रवेश घेत नसणे व त्याला पाहिजे त्या दुसऱ्या महाविद्यालयात अगेंस्ट कॅप प्रवेश घेणे, त्यामुळे त्याला शिष्यवृत्ती मिळत नसणे, किंवा ड्रॉप घेवून प्रवेशासाठी पुढील वर्षाची प्रतिक्षा करणे, तसेच पहिल्या महाविद्यालयात प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याला सुद्धा दुसऱ्या महाविद्यालयाची रिक्त जागा अगेंस्ट कॅप घ्यावी लागणे, त्यामुळे त्यालासुद्धा शिष्यवृत्ती मिळता नाही पर्यायाने दोन्ही विद्यार्थ्यांचे नुकसान होणे, याकरिता शासनाने एक तर बेटरमेंट हा पर्याय वापरण्याची मर्यादा एका फेरीपुरतीच मर्यादित ठेवण्याची गरज, किंवा एक अतिरिक्त फेरी घेवून दोन फेऱ्या बेटरमेंटसह व दोन फेऱ्या बेटरमेंट पर्यायरहित ठेवल्यास यामुळे विद्यार्थ्यांना कॅपअंतर्गत प्रवेश मिळून शासनाच्या शिष्यवृत्तीच्या सवलती विद्यार्थ्याला मिळू शकेल आणि त्यामुळे शासनाचे १०० टक्के प्रवेशाचे उद्दिष्ट पूर्ण होण्यास मदत होईल, याकरिता शासनाने घ्यावयाचा निर्णय व उपाययोजना. ” | | |
| **१४५.** | **२५३** | **श्री. रामदास आंबटकर,श्री.** नागोराव गाणार,श्री. चंद्रशेखर बावनकुळे,श्री. प्रवीण दटके, श्री. प्रविण पोटे-पाटील,डॉ. रणजित पाटील,श्री. रमेशदादा पाटील **वि.प.स.**<br>“ गडचिरोली जिल्हा हा आदिवासी बहुल व अतिदुर्गम असून गोंडवाणा विद्यापीठ द्वारे गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील १२०० विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षण घेत | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | असणे, गोंडवाणा विद्यापीठ गडचिरोली येथे विविध अभ्यासक्रम प्रवेशित असणे, त्यातच सदर प्रवेशित विद्यार्थी अतिदुर्गम, नक्षलग्रस्त भागातील व गरीब परिस्थितीतून शिक्षण घेत असल्यामुळे त्यांना गडचिरोली येथे वास्तव्याकरिता भाडे तत्वावर राहण्याचा खर्च परवडण्यासारखे नसणे, त्यामुळे विद्यार्थीचे शैक्षणिक नुकसान टाळण्याकरिता व अतिदुर्गम ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक व भौतिक सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने ५०० विद्यार्थी क्षमतेने वस्तीगृह विद्यापीठामध्ये आवश्यक असल्याने त्याबाबची मागणी जिल्हाधिकारी गडचिरोली यांच्याकडे कुलसचिव गोंडवाणा विद्यापीठ यांनी दि. ७-७-२०२२ निवेदनाद्वारे केली जाणे, सदर वस्तीगृहाकरिता सात एकर जमिनीची आवश्यकता असणे, त्याकरिता शासनाने गरीब विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता वस्तीगृह बांधकामाकरिता निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, शासनाने यावर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ” | | |
| **१४६.** | **२८६** | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.**<br>“ राज्य शासनाने मुंबई, संभाजीनगर (औरंगाबाद) व नागपूर येथे राष्ट्रीय विधी विद्यापीठ, २०१४ च्या अधिनियमान्वये स्थापन केले असून महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या दुसऱ्या टप्प्यातील विविध विस्तारीकरणाच्या कामासाठी आवश्यक असलेल्या रुपये २२३ कोटींपैकी केवळ रुपये १२० कोटी देण्याची हमी देवून उर्वरित सुमारे १०० कोटी रुपयांचा निधी स्वबळावर उभे करण्याचे राज्य शासनाने विधी विद्यापीठांना एका पत्राव्दारे कळविले असणे, तीन विधी विद्यापीठांपैकी संभाजीनगरला (औरंगाबादला) पहिले राष्ट्रीय विधी विद्यापीठ मंजूर झाले असतानाही त्यानंतर स्थापन झालेल्या मुंबई व नागपूर विद्यापीठांना सर्व दृष्टीने | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

झुकते माप दिले जात असून मराठवाड्यात असलेल्या संभाजीनगरातील (औरंगाबादेतील) विधी विद्यापीठाला निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाकडून जाणीवपुर्वक दुर्लक्ष करण्यात येत असणे, विधी विद्यापीठातर्फे हाती घेण्यात आलेल्या दुसऱ्या टप्प्यातील इमारत, ग्रंथालय, मुला-मुलींची वसतिगृह, सेन्टर ऑफ एक्सलन्स (माहिती केंद्र), जेवणावळ व त्यांची बसण्याची व्यवस्था इत्यादी प्रकल्प निधी अभावी बंद करावे लागणे, शासनाने आश्वासित रकमेपैकी नुकतेच ११ कोटी रुपये दिले असुन मुंबई विधी विद्यापीठासाठी एमपीएनएलच्या इमारतीमध्ये वार्षिक २८ कोटी रुपये भाडे देऊन चालवले जात असणे, संभाजीनगर (औरंगाबाद) विधी विद्यापीठ विद्यार्थ्यांकडून घेत असलेली फी त्यांच्या शिक्षणावरच खर्च करण्यात येत असून, देशातील २५ विधी विद्यापीठांपैकी तीन विधी विद्यापीठ महाराष्ट्रात असून मराठवाडय़ासारखा संभाजीनगर (औरंगाबाद) येथे विधी विद्यापीठ २०१७ पासून कार्यरत असल्याने या विधी विद्यापीठातून बाहेर पडणारे विद्यार्थी विधि क्षेत्रातच वकील किंवा न्यायाधीश म्हणून न जाता विविध महावाणिज्यक (कॉर्पोरेट) क्षेत्रात गरजेनुसार विधी तज्ज्ञ पुढे येवू शकत असल्याने याचा फायदा मराठवाड्याच्या मुला-मुलींना रोजगाराच्या संधी निर्माण होणार असून विधी विद्यापीठांची स्थापना महाराष्ट्र नॅशनल लॉ कायद्यांतर्गत झाली असतानाही तसेच त्याचे कुलपती मा.सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती, तर प्र- कुलगुरू मुंबई, मा. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती असून या विद्यापीठाच्या नियंत्रण समितीमध्ये राज्याचे महाधिवक्ता, राज्याचे शिक्षणमंत्री आदींचा समावेश असूनही शासनाच्या निधी अभावी संभाजीनगर राष्ट्रीय (औरंगाबाद) विधी विद्यापीठाच्या विस्तारित प्रकल्पाविषयी प्रश्नचिन्ह निर्माण झालेले असणे, याबाबत स्थानिक जनतेच्या मनात राज्य शासनाविषयी तीव्र नाराजीची भावना पसरलेली असणे, संभाजीनगरातील (औरंगाबादेतील) विधी विद्यापीठाला निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

**विवरण क्रमांक २१**–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **१४७.** | **५४०** | **श्री. नागोराव गाणार,श्री.** प्रविण दरेकर,श्री. प्रसाद लाड,श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर,श्री. रमेशदादा पाटील,श्री. रमेश कराड,श्री. रामदास आंबटकर,श्री. प्रवीण दटके,श्रीमती उमा खापरे,श्री. चंद्रशेखर बावनकुळे,ॲड. निरंजन डावखरे **वि.प.स.**<br>" राज्यात मुंबई विद्यापीठाचा कारभार प्रभारी अधिकाऱ्यांच्या हाती आल्याने सात लाखाहून अधिक विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा बोजवारा उडाला असल्याचे बाब माहे नोव्हेंबर २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात व त्या सुमारास निदर्शनास येणे, विद्यापीठातील एकही महत्त्वाच्या पदावर पूर्ण वेळ अधिकाऱ्याची नेमणूक नसल्यामुळे परीक्षा विभागासह अन्य विभागाच्या कामकाजाचे तीन तेरा वाजलेले असणे ,याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांवर होत असणे, कुलगुरू नसल्यामुळे बोर्ड ऑफ स्टडीज रिसर्च शिफारस व्यवस्थापन परिषदेत सह अन्य कामे ठप्प झालेली असणे, जबाबदार व्यक्ती नसल्यामुळे परीक्षा आणि निकाल संबंधित अनेक निर्णय प्रक्रियेत वेळ कडूपणा तसेच निष्काळजीपणा दिसत असणे, याचा फटका सध्या विधी शाखेच्या अंतिम वर्षाची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना बसत असणे, परीक्षेला अवघे काही तास उरले असताना हे विद्यार्थी अभ्यास सोडून परीक्षा अर्ज भरणे ,शुल्क जमा करणे, हॉल तिकीट मिळवणे परीक्षा केंद्राच्या शोधा शोध करीत असणे, विद्यार्थ्यांना होणाऱ्या या त्रासाला विद्यापीठाचा निष्काळजीपणा जबाबदार असल्याने विद्यार्थी आणि पालकांमधून नाराजी व्यक्त होत असणे, दिनांक २९ नोव्हेंबर २०२२ पासून तीन वर्षे विधी शाखेच्या सत्र पाच ची परीक्षा सुरू होत असून परीक्षेच्या तोंडावर अद्यापही विद्यार्थ्यांना हॉल तिकीट उपलब्ध झालेले नसल्याने काही विद्यार्थ्यांना हॉल तिकीट देण्यात आले मात्र त्यांच्या परीक्षा केंद्रावरच केंद्राचा | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

पत्ता नाही फोर्ट येथील सिद्धार्थ लॉ कॉलेजमध्ये हा प्रकार घडला असने,अनेक विद्यार्थ्यांना हे कॉलेज परीक्षा केंद्र आले व हॉल तिकिटावर नमूद केल्याप्रमाणे विद्यार्थी या परीक्षा केंद्रावर आपले बैठक व्यवस्था पाहण्यासाठी गेले मात्र तिथे गेल्यावर या कॉलेजमध्ये विधी शाखेची परीक्षा नसल्याचे सांगण्यात येणे, त्यामुळे आता परीक्षा कुठे द्यायची असा प्रश्न विद्यार्थ्याला पडत असणे, यातील अनेक विद्यार्थ्यांनी याप्रकरणी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाची संपर्क साधला असता तो होऊ शकलेला नसने सकाळी दहा वाजता परीक्षेला सुरुवात होणार असताना अनेक विद्यार्थी ग्रामीण भागातून परीक्षा देण्यासाठी मुंबईत येणार आहेत पुढे काय करावे हा प्रश्न त्यांच्यासमोर उपस्थित झालेला असणे, त्यामुळे परीक्षेला जाताना नेमक्या कुठल्या परीक्षा केंद्रावर परीक्षेला जायचे याबाबत विद्यार्थी अनभिज्ञ असल्याने तसेच विद्यार्थ्याला जायच्या अगोदर हॉल तिकिटावर प्राचार्याचा शिका व सही घेणे आवश्यक असल्याने महाविद्यालयात जाऊन शिक्का घ्यायचा की वेळेत परीक्षा केंद्रावर पोहोचायचे असा प्रश्न विद्यार्थ्यांसमोर उभा असणे, त्यामुळे विधी शाखेच्या विद्यार्थी आणि पालकांमध्ये नाराजी व्यक्त होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ”



| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४८. | २२३ | **श्री. आमश्या पाडवी वि.प.स.**<br>“ आदिवासी संशोधन तथा प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थेची स्थापना इतर समाजाच्या प्रशिक्षण संस्थेच्या आधी म्हणजेच सुमारे ६० वर्षांपूर्वी सन १९६२ मध्ये होणे, तथापी आदिवासी समाजातील होतकरू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणानंतर पी.एच.डी. परिक्षेकरिता शासनाकडून कोणतेही आर्थिक साहाय्य करण्यात येत नसणे, दुसरीकडे बौद्ध समाजासाठी बार्टी (२०१३), मराठा समाजासाठी सारथी (२०१६) आणि महाज्योती (२०१९) इत्यादी संस्था या फेलोशिपच्या माध्यमातून त्यांच्या हजारो विद्यार्थ्यांना लाभ देत असणे, आदिवाशी समाजातील विद्यार्थी मुख्य प्रवाहात यावेत याकरिता शासनाने आदिवासी शिक्षण तथा प्रशिक्षण संस्था, | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

## विवरण क्रमांक २१–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | पुणे यांचे मार्फत आदिवासी समाजातील पी.एच.डी. परीक्षा पात्र ठरलेल्या किमान १००० विद्यार्थ्यांना फेलोशिप देण्याची योजना सुरू करावी अशी मागणी मागील दोन वर्षापासून विविध संशोधक संघटना आणि सामाजिक संघटनेच्या माध्यमातून करण्यात येत असणे, मागणीच्या अनुषंगाने आयुक्त, आदिवासी संशोधन तथा प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी याबाबतचा सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करणे, उक्त प्रस्तावावर अद्यापही निर्णयात्मक कार्यवाही न होण, परिणामी आदिवासी समाजातील होतकरु विद्यार्थीवर होणारा अन्याय, याबाबत शासनाने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **१४९.** | **२४३** | **ॲड. निरंजन डावखरे,** श्री. प्रविण दरेकर, श्री. प्रसाद लाड,श्री. रमेशदादा पाटील, श्री. नागोराव गाणार, श्री. चंद्रशेखर बावनकुळे **वि.प.स.**<br>“ आदिवासी भाग, वस्ती मधील विकास कामे मार्गी लावण्यासाठी महत्त्वाची असणारी शासनाची ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना राज्य की जिल्हा यंत्रणेने राबवायची यावरून एकमत होत नसल्याने मागील दोन वर्षांपासून ठप्पर बाप्पा योजना बंद पडली असणे, यामुळे आदिवासी वस्ती, आदिवासी लोकसंख्या अधिक असलेल्या गावात नागरी समस्या निर्माण झाल्या असणे, आदिवासी, डोंगराळ, दुर्गम भागातील वस्त्यांमध्ये सर्व प्रकारच्या नागरी सुविधा असाव्यात म्हणून काही वर्षांपूर्वी शासनाने ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना सुरू करणे, ही योजना यापूर्वी जिल्हा प्रशासनाकडून राबविली जात असणे, या योजनेतील कामाविषयी, निधीच्या गैरवापराविषयी अनेक तक्रारी शासनाकडे येऊ लागणे, ठप्पर बाप्पा योजनेचा निधी येऊनही त्यात गैरव्यवहार स्थानिक ठेकेदार, अधिकारी | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | करत असल्याच्या तक्रारी शासनाकडे वाढू लागणे, त्यानंतर ही योजना शासनाने जिल्हा प्रशासनाकडून स्वतःकडे घेणे, या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी शासन स्तरावर दोन वर्षांपूर्वी बैठक झाली, ही योजना पुन्हा जिल्हा प्रशासनाकडे द्यावी अशी मागणी बैठकीत करण्यात येणे, त्यानंतर ही योजना राज्य की जिल्हा स्तरावरून राबवावी याविषयी एकमत न झाल्याने आदिवासी विकासाची ठक्कर बाप्पा योजना बदं होणे, उक्त प्रकरणी तत्काळ निर्णय घेऊन सदरहू योजना सुरू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **१५०.** | **८०** | **श्री. नागोराव गाणार,श्री.** प्रविण दरेकर,श्री. प्रसाद लाड,श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री. रमेशदादा पाटील,श्री. रमेश कराड,श्री. रामदास आंबटकर,श्री. प्रवीण दटके,श्रीमती उमा खापरे,ॲड. निरंजन डावखरे **वि.प.स.**<br>“ राज्यात कोरोनाने आणि कहर केला तेव्हा नर्सेसची प्रचंड गरज निर्माण झाली नर्सिंगचा अभ्यासक्रम पास झालेल्यांना ऑनलाईन गुणपत्रिकाच्या आधारावर महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलने ऑनलाईन नोंदणी करून घेतल्याने तब्बल ३७ हजार नर्सेस शासनाला कोविड काळात मदतीसाठी उपलब्ध होणे, परंतु “ गरज सरो वैद्य मरो ” या म्हणीप्रमाणे ३७ हजार नर्सिंग कौन्सिलने केलेल्या या नोंदणी बोगस ठरवल्याने या नर्सेसचे जीवन उध्वस्त होणार असणे, कोरोना काळात विद्यार्थ्यांना केवळ ऑनलाइन गुणपत्रिका उपलब्ध असल्याने छापील मार्कशीट मिळत नव्हत्या त्यामुळे महाराष्ट्र राज्य सुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांनीही नोव्हेंबर २०२१ मध्ये या संस्थेनेही गुणपत्रकाची छपाई झाली नसल्याने विद्यार्थ्यांची नोंदणी करून घ्यावी अशा आशयाचे पत्र कौन्सिलच्या रजिस्टर यांना देणे, त्या काळात कौन्सिलवर निवडून आलेल्या सदस्यांची समिती नसल्यामुळे प्रशासन नेमलेले असणे, त्यासाठी नियमाप्रमाणे पास विद्यार्थ्यांची गुणपत्रिका तपासून त्यांना नोंदणी करून देणे अपेक्षित असते रजिस्टर यांनी | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१–**पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | कुणी अशा पद्धतीने ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करून देण्याची परवानगी दिली ते सांगावे असे आशयाचे वक्तव्य महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलच्या अध्यक्षांनी करून संबंधित रजिस्टर यांच्यावर विविध विषयाचा ठपका ठेवून २१ सप्टेंबरला कारणे दाखवा नोटीस बजावली त्याचे उत्तर त्यांनी १२ ऑक्टोबरला दिले आणि सोबत राजीनामा दिला असणे, तो न स्वीकारता सदर प्रकरणाची सविस्तर चौकशी करीत असतानाच कोविड काळात हजारो नागरिकांचे प्राण वाचवण्यासाठी आपले प्राण धोक्यात घालून रुग्णाची सेवा करणाऱ्या हजारो नर्सेसची आणि रजिस्टारची अवहेलना न करता मानवतेच्या दृष्टिकोनातून त्या सर्वांना न्याय देण्याची गरज असणे, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही. ” | | |
| **१५१.** | **५६९** | **श्री. नागोराव गाणार,** श्री. प्रविण दरेकर,श्री. प्रसाद लाड,श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री. रमेशदादा पाटील,श्री. रमेश कराड,श्री. रामदास आंबटकर,श्री. प्रवीण दटके,श्रीमती उमा खापरे, श्री. चंद्रशेखर बावनकुळे,ॲड. निरंजन डावखरे,श्री. महादेव जानकर **वि.प.स.**<br>“ आदिवासीबहुल व शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा असलेल्या यवतमाळ येथील वसंतराव नाईक शासकीय महाविद्यालय सध्या व्हेंटिलेटरवर असणे, या रुग्णालयात तेलंगणा, अमरावती, वाशिमसह नांदेड जिल्ह्यातूनही रुग्ण येतात, मात्र, राज्य शासनाच्या दुर्लक्षामुळे या रुग्णालयाचे अस्तित्वच आज धोक्यात आले असणे, राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने विविध अभ्यासक्रमाचा पद मान्यतेसाठी घातलेल्या अटींची पूर्तता झालेली नाही, त्यामुळे येत्या काळात येथील वैद्यकीय पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या जागेवर गंडांतर येण्याची शक्यता असणे, यवतमाळ मेडिकलची सुरुवात एमबीबीएसच्या ५० जागांनी झाली, नंतरच्या काळा सातत्यपूर्ण | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रयत्न करीत या जागा आता २०० पर्यंत पोहोचल्या असून १४ विषयांत पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा सुरू झाला याच्या ५६ जागा असणे, नुकतीच एमसीआयने मेडिसिन विभागातील ८ जागांची मान्यता रद्द होण्याची भीती व्यक्त केल्यामुळे यवतमाळातील वैद्यकीय क्षेत्राचे मोठे नुकसान होणार असणे, राज्य शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाच्या सचिवांकडून राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाकडे शपथेवर वैद्यकीय महाविद्यालयातील रिक्त पदे, हास्टेल, यंत्रसामग्री उपलब्ध करून दिली जाईल, असे वारंवार लिहून देण्यात असणे, वैद्यकीय शिक्षणाचा गुणात्मक दर्जा राहावा, यासाठी एनएमसी अभ्यासक्रमाच्या जागांना मान्यता देण्यापूर्वी पडताळणी करतेवेळी आवश्यक त्या दुरुस्ती सुचविते त्याची पूर्तता करण्यासाठी ठराविक कालावधी दिला जातो, यातही पूर्तता झालेली नसणे, याचा फटका या महाविद्यालयाला बसत असणे, त्यामुळे शासनाच्या वैद्यकीय शिक्षण विभागाबाबत उदासिन धोरणामुळे सर्वच राज्यात डॉक्टर प्रध्यापकांचा मोठा अनुशेष असणे, त्यातही यवतमाळ सारख्या आडवळणावरील गावात डॉक्टर येण्यास तयार नसतात, महानगरातील महाविद्यालयांमध्ये गर्दी असते मात्र बायोकेमिस्ट्री आणि सुपर स्पेशालिटीतील न्युरो सर्जरी येथे बदली झाल्यानंतरही प्राध्यापक रुजू झाले नसणे, राज्य शासनाने त्रुटींची पूर्तता करण्याचे प्रतिज्ञापत्रावर आश्वासन दिले मात्र अजूनही या त्रुटी कायम असल्याने संताप व्यक्त होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |
| **१५२.** | **५७५** | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.**<br>“ विदर्भातील विशेषतः नागपूर व अकोला येथील होमीओपॅथिक आणि आयुर्वेदिक महाविद्यालयांची संख्या मागील वीस वर्षापासून कमी होत असून त्यात अनेक होमीओपॅथीक कॉलेजकडे रुपये १ हजार कोटीची संपत्ती असून महाविद्यालयाकडे असलेल्या जमिनींवर विद्यार्थ्यांनसाठी आवश्यक अशा कोणत्याही उपाययोजना करण्यात आलेल्या नसणे, महाविद्यालयांच्या नावावर | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | असलेल्या जागा अनेक संचालकांनी अधिकाराचा गैरवापर करून जागेंबाबत व्यवहार केलेले असणे, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनसाठी लॅब, ग्रंथालये इत्यादी सुविधा उभारण्यासाठी राखीव ठेवलेल्या जागांवर सुविधा निर्माण करण्याऐवजी सदर जागांचे व्यवहार होत असतानाही शासनाकडून कोणतीही कारवाई करण्यात येत नसणे, महाविद्यालयाच्या जागांबाबतचा निर्णय, विक्री परवानगी धर्मादय आयुक्तांकडे न देण्याबाबत शासनाकडून कोणतीही कार्यवाही होत नसल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजीची भावना पसरलेली असणे, विदर्भातील महाविद्यालयाच्या जागांबाबत संचालकांनी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून बेकायदेशीररित्या व्यवहार केलेल्या महाविद्यालयांच्या जागांची चौकशी करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याबाबत तसेच जागांबाबत झालेले व्यवहार रद्द करून जागा पुन्हा महाविद्यालयाच्या ताब्यात देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **१५३.** | **१३२** | **श्री. अनिकेत तटकरे वि.प.स.**<br>“ दि. १९ ऑगस्ट, २०२२ रोजी मुंबईतील करी रोड येथील साई भक्त गोविंदा पथकासोबत प्रथमेश सावंत नावाचा तरुण दही हंडी फोडण्यासाठी गेलेला असणे, दहिहंडी फोडताना थर कोसळल्याने गंभीर झालेला असणे, त्याला मुंबई येथील रुग्णालयात उपचारासाठी नेले असता त्यात त्याचा दि. ८/१०/२०२२ रोजी झालेला दुर्दैवी मृत्यू, यंदा सर्व निर्बंध शिथिल केल्याने दहिहंडी फोडतांना ३ गोविंदांचा मृत्यू झाल्याची घटना याचसूमारास उघडकीस येणे, मृत्यूमूखी पडलेल्या गोविदांच्या नातेवाईकांना व जखमी झालेल्या गोविंदांना भरीव आर्थिक मदत देण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना.” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५४. | १८८ | **श्री. जयंत पाटील वि.प.स.**<br>" राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळात पदक विजेत्या खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती देणेबाबत शासनाचे धोरण असणे, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या शासन निर्णय क्र.खेआस-२०१० /प्र.क्र.२७२/१० क्रीयुसे दि.०९.१०.२०१० मधील तरतुदीनुसार खेळाडुंना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्यात येत असणे, प्राविण्य प्राप्त खेळाडूंकडून मुख्यत्वे उपजिल्हाधिकारी, पोलीस उपअधिक्ष अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, विक्रीकर अधिकारी गट- अ या पदासाठी पसंती देण्यात येणे, तथापि खेळाडूंच्या थेट नियुक्तीच्या संदर्भात संबंधित विभागाकडून काही प्रश्न उपस्थित करण्यात आल्याने खेळाडूंच्या थेट नियुक्ती धोरणामध्ये सुधारणा करणेबाबत शासन स्तरावर तातडीने निर्णय होवून खेळाडूंच्या शासन सेवेतील थेट नियुक्तीसाठी निश्चित करावयाच्या सेवाशर्ती, सेवाप्रवेश नियमानुसार प्रशिक्षण, रजा विभागीय परिक्षांबाबतचे धोरण तात्काळ निश्चित करून तसेच शासनाच्या मालकीच्या व नियंत्रणाखालील महामंडळात, स्थानिक प्राधिकरणात व विविध स्वरूपाच्या शासकीय सवलती प्राप्त केलेल्या संस्थांमध्ये खेळाडूंना राखीव असलेली ५ टक्के आरक्षणाची नोकरभरती तातडीने राबविण्याची आवश्यकता, यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. " | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |
| १५५. | २६८ | **ॲड. निरंजन डावखरे,डॉ.** रणजित पाटील,श्री. नागोराव गाणार **वि.प.स.**<br>" श्री. मिहिर अपार, रा.बुलडाणा, याने आंतरराष्ट्रीय तिरंदाजी स्पर्धेमध्ये भारतासाठी गोल्ड मेडल मिळवणे, आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची शासन राखणे, भारतामध्ये आल्यावर श्री.मिहीर अपार यांचा केंद्रीय क्रीडा मंत्री, महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल, जिल्ह्यातील विविध लोकप्रतिनिधी यांच्या हस्ते सत्कार समारंभ आयोजित करणे, महाराष्ट्रासाठी ही एक अभिमानाची बाब असणे, मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांनी तिरंदाजीच्या विविध स्पर्धेच्या तयारीसाठी श्री. मिहीर अपार याला उच्च दर्जाची किट उपलब्ध करून देण्याबाबत सूचना शासनास | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | करणे, शासनाने जिल्हा स्तरावरून प्रस्ताव मागवणे, जिल्हा स्तरावरून सदर प्रस्ताव क्रीडा आयुक्त, पुणे यांना सादर होणे, क्रीडा आयुक्त, पुणे दि.६.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये श्री.मिहिर अपार यास उच्च दर्जाची तिरंदाजी किट नाकारण्याबाबत लेखी कळविणे, सदर बाब शासनाच्या निकषात बसत नसल्याचे कारण दाखवून प्रस्ताव नामंजूर करणे, अन्य खेळाडूंच्या बाबतीत देखील हा प्रकार होणे, आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतासाठी सुवर्ण पदक मिळविलेल्या खेळाडूला अशा प्रकारे आर्थिक सहाय्य योजनेतून डावलले हे राज्यातील तयार होणाऱ्या खेळाडूंवर एक प्रकारे अन्याय केल्यासारखे असणे, शासनाने आर्थिक सहाय्य योजनेमध्ये सुधारणा करून श्री.मिहिर अपार व इतर खेळाडूंना उच्च दर्जाचे किट उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ” | | |
| **१५६.** | **८८** | **श्री. विक्रम काळे,श्री.** सतिश चव्हाण,श्री. कपिल पाटील,डॉ. सुधीर तांबे,श्री. जयंत आसगावकर, श्री. किरण सरनाईक,श्री. बाळाराम पाटील,श्री. किशोर दराडे **वि.प.स.**<br>“ राज्यातील जिल्हा परिषदांमधील १३,५१४ रिक्त पदे असल्यामुळे ही रिक्त असलेली पदे भरण्याचा निर्णय शासनाने घेणे, यासाठी राज्यातील लाखो उमेदवारांनी संकेतस्थळावर अर्ज सादर करणे, परंतू, दि. २२/१०/२०२२ रोजी वा त्यासुमारास या रिक्त पदांची भरती प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतल्यामुळे बेरोजगार तरुणांत पसरलेला तीव्र असंतोष, या पदांची भरती करण्याबाबतचे काम शासनाने न्यास या खासगी कंपनीकडे दि. १० मे, २०२२ रोजी दिलेले असणे, परंतू, आता ही भरती प्रक्रिया रद्द केल्यामुळे अर्ज केलेल्या लाखो उमेदवारांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, ही भरती प्रक्रिया रद्द केल्यामुळे उमेदवारांनी | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | भरलेले परिक्षा शूल्क परत देण्याबाबत शिवाय नव्याने पदभरतीसाठी भरती प्रक्रिया सुरू करावी लागणार असल्यामुळे या कालावधीसाठी वयाधिक्य होणाऱ्या उमेदवारांचे नियोजन करण्याची आवश्यकता, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना. ” | | |
| **१५७.** | **२८७** | **प्रा. राम शिंदे वि.प.स.**<br>“ अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील मलठण येथे जिल्हा परिषदेची १ली ते ७ वी पर्यंत व इयत्ता ८वी ते १०वी पर्यंत न्यु इंग्लीश स्कुल असून विद्यार्थ्यांना नदीपात्रातून वाट काढत शाळेला जावे लागत असल्याचे डिसेंबर, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास येणे, तसेच, अनेक लोक पैलतिरी झाडावर कपडे वाळवून पुढील कामाला जात असणे, तसेच विद्यार्थी व विद्यार्थीनी शाळेचे कपडे दप्तरात घेऊन नदी पार केल्यावर मंदिरात कपडे बदलत असल्याने पालकांमध्ये मोठ्या प्रमाणावर नाराजी निर्माण झाल्याचे उघडकीस येणे, मलठण ते जिरवली रस्त्यावर १० फुटापेक्षा जास्त पाणी असून दोन्ही काठावर वेड्या बाभंळीचे साम्रज्य असल्यामुळे सदर पाण्यात खेकडे, साप मोठ्या प्रमाणात असणे, त्यामुळे विद्यार्थी सदर सिनेच्या वाहत्या पाण्यातून जीव मुठीत धरुन शाळेसाठी जात असणे, या संदर्भात मलठण ग्रामस्थांनी अनेक निवेदने समस्या शासनाकडे दिलेल्या असणे, अजूनपर्यंत कोणत्याही स्वरूपाची कार्यवाही न होणे, सदर पाण्यातून विद्यार्थी व विद्यार्थीनी प्रवास करित असल्यामुळे त्यांच्या जीविताला धोका होऊ नये म्हणून शासनाने तात्काळ फायर बोट देण्याची ग्रामस्थांची अनेक वर्षांपासून मागणी असूनही ती मागणी पूर्ण न होणे, त्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र स्वरूपाची नाराजी निर्माण होणे, त्यामुळे शासनाने तातडीने चौकशी करून फायबर बोट ग्रामस्थांना देण्याची गरज, शासनाने याबाबत त्वरित करावयाची कार्यवाही. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **१५८.** | **३३४** | **श्री. गोपिचंद पडळकर वि.प.स.**<br>" राज्यात सुमारे २७००० ग्रामपंचायतीमध्ये एक लाख ४० हजार हुन अधिक ग्रामपंचायत कर्मचारी गेल्या अनेक वर्षापासून तंटपुंजा पगारावर सेवा बजावत असणे, या कर्मचाऱ्यांचे जिव्हाळ्याचे अनेक प्रश्न कित्येक वर्षापासून शासन दरबारी धूळ खात पडून असणे, त्यामुळे गोरगरीब कर्मचाऱ्यांचे अतोनात हाल होत असून अनेकांवर उपासमारीची वेळ आलेली असणे, अधिनियम १९५८ कलम ६१ रद्द करावी, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना महानगरपालिका नगरपालिका नगरपरिषद नगरपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थेतील कर्मचाऱ्यांप्रमाणे शंभर टक्के वेतन शासनाकडून मिळावे, वसुलीची अट रद्द करावी, नवीन दराप्रमाणे किमान वेतनन फरकासह मिळावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी संघाने राज्याचे मा.उपमुख्यमंत्री यांना माहे सप्टेंबर २०२२ च्या सुमारास निवेदनाद्वारे केलेली असणे, सदरहू मागणीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. " | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |
| **१५९.** | **४२१** | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.**<br>" सन २०१५-२०१६ या कालावधीत पंचायत समिती पातूर, जिल्हापरिषद अकोला येथे गट विकास अधिकारी या पदावर कार्यरत असलेले श्री. मधुकर बाळु मुरकुटे, गट विकास अधिकारी या पदावर कार्यरत असणे, सदरहू कालावधीत त्यांना वरीष्ठ कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या आदेशानुसार जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेंतर्गत नाविण्य पूर्ण योजनेमधून पंचायत समिती अंतर्गत सी.सी.टी.व्ही. बसविणेबाबत कार्यवाही केलेली असणे, परंतू राजकीय | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | हेतूने प्रेरित होवून उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पावस्व) जिल्हा परिषद अमरावती यांनी श्री. मुरकुटे यांचे विरुद्ध संयुक्त विभागीय खाते चौकशी सुरू केली असणे, उक्त प्रकरणी चौकशी करण्यासाठी प्रादेशिक अधिकारी, अमरावती विभाग अमरावती यांची नेमणूक केली असणे, शासन निकषानुसार विभागीय महिन्यात चौकशी अहवाल निर्गमीत होणे आवश्यक असणे, परंतू गत पाच वर्षांपासून चौकशी पूर्ण झालेली नसणे, त्यामुळे श्री. मुरकुटे यांना उपमुख्य कार्यकारी अधिकारी या पदासाठी सेवाजेष्ठतेने पात्र असतांना केवळ विभागीय चौकशी पूर्ण न झाल्याने पदोन्नतीपासून वंचित राहावे लागणे, याबाबत चौकशी करून श्री. मुरकुटे यांची विभागीय चौकशी तात्काळ पूर्ण करून चौकशी अहवाल पाठविणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| **१६०.** | ४४५ | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.**<br>“ पालघर जिल्ह्यातील पालघर पंचायत समिती अंतर्गत मौजे बोईसर ग्रामपंचायत हद्दीत विकासक महावीर कंट्रक्शन कंपनी व महावीर इंटरप्राईजेस या कंपनीच्या भागिदारांकडून बोईसर ग्रामपंचायतीचा लेटर हेडचा वापर करून बनावट दस्तऐवज तयार केले असून सदरहू दस्तऐवजचा वापर सर्वे क्रमांक १७१/१७ या भूखंडावरील जमिनीच्या विक्री व्यवहारात देखील करण्यात आलेला असून अशाप्रकारे अनेक विकासकांनी व भुखंड धारकांनी बोईसर ग्रामपंचायतीच्या लेटर हेड चा वापर करून नागरिकांची फसवणूक केली असणे, सदर बनावट दस्तऐवजाबाबत ग्रामपंचायत कार्यालय बोईसर, पंचायत समिती पालघर, जिल्हा परिषद पालघर, जिल्हाधिकारी पालघर व दुय्यम निबंधक पालघर २ येथे नागरिकांनी तक्रारी करूनही अद्यापि कोणतीच कारवाई करण्यात आलेली नसणे, तसेच सदरहू विकासकाकडून सर्वे क्रमांक १०५/१ या भूखंडावर बांधकाम केलेल्या इमारतीत देखील बेकायदेशीर बांधकाम करून नागरिकांची फसवणूक केल्या प्रकरणी सदरहू विकासक व त्यांचे भागिदार यांचे | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

## विवरण क्रमांक २१–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | विरुद्ध बोईसर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आलेला असून त्यावर अद्यापी कोणतीच कारवाई करण्यात आलेली नसणे, तसेच सदरहू विकासकाकडून सर्वे क्रमांक १०५/९ या भूखंडावर बांधकाम केलेले बंगले बेकायदेशीर असून त्याबाबत जिल्हाप्राधिकरण, नगर रचना विभाग पालघर यांच्याकडून बांधकाम परवानगी घेतलेली नसणे, सदरहू बंगल्याच्या बांधकामास स्थगिती देण्यात येऊनही उक्त बांधकाम पुर्ण करण्यात आले असणे, उक्त प्रकरणी शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत चौकशी करून सदरहू विकासकावर गुन्हा दाखल करून त्यांना सहकार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| **१६१.** | **४५१** | **श्री. अभिजित वंजारी,** श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप,डॉ. सुधीर तांबे,डॉ. वजाहत मिर्झा, श्री. राजेश राठोड,श्री. जयंत आसगावकर **वि.प.स.**<br>“ दिनांक २९ नोव्हेंबर २०२२ च्या राज्य शासनाच्या सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभागाच्या वतीने काढलेल्या आदेशानुसार राज्यातील जवळजवळ ७७५१ ग्रामपंचायतीच्या निवडणुकांचे निकाल जाहीर केले असणे, राज्य निवडणूक आयोगाच्या ०९ नोव्हेंबर २०२२ च्या नुसार ७१४७ सहकारी संस्थेच्या निवडणुका पुढे ढकलण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले असणे, तसेच आपल्या राज्यातील अनेक महानगर पालिका, नगर पालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका कुठल्या ना कुठल्या कारणास्तव निवडणुका अपेक्षित (ड्यू) असणे, या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांची मुदत | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | संपल्यामुळे त्यावर प्रशासक बसले असणे त्यामुळे राज्यातील नगरविकास विभाग आणि ग्रामविकास विभागाच्या विकास कार्याला मोठ्या प्रमाणात खीळ बसली असणे, मराठा आरक्षण, ओबीसी आरक्षण, अधिसंख्य कर्मचारी आणि अनेक प्रकारच्या आरक्षणाचा मुद्दा उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असणे, परंतु हा मुद्दा सोडवून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका घेण्यास राज्यशासन उत्सुक दिसत नसणे, यामुळे एकूणच लोकशाहीच्या मूळ गाभ्याला बगल देण्याचे काम राज्यशासनाच्या वतीने केले जात असणे, अनेक ठिकाणी प्रशासक लोकप्रतिनिधीना न जुमानता मनमानी स्वरूपामध्ये काम करीत असणे आणि प्रशासकाच्या नियुक्तीमुळे एका व्यक्तीच्या हातात सत्ता आल्यामुळे करोडो रुपयाचा भ्रष्टाचार होत असणे, तेव्हा लोकशाहीच्या माध्यमातून विकास कार्याला चालना मिळण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या राज्यातील ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर परिषद, नगर पालिका आणि महानगर पालिका या मुदत संपलेल्या निवडणुका तात्काळ घेण्यासंदर्भात तात्काळ निर्णय घेण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| १६२. | ५८५ | **श्री. अनिकेत तटकरे,श्री.** शशिकांत शिंदे,श्री. सतिश चव्हाण **वि.प.स.**<br>“ उमेद अभियानांतर्गत राज्यात ६ लाख स्वयंसहायता समूहातील ६० लाख महिला कुटुंबातील ५०००० समुदाय संसाधन व्यक्ती व ३००० कर्मचारी कार्यरत असणे उमेद अभियानामध्ये कार्यरत सर्व समुदाय संसाधन व्यक्तींना रोजगार हमी कायद्यानुसार एक दिवसाचा रोजगार याप्रमाणे किमान मासिक वेतन रुपये १०००० पर्यंत वाढ व त्यांचा प्रत्येक महिन्यात पाच तारखेपर्यंत मानधन वितरित करणे केडर नियुक्तीवरील बंदी उठवून राज्यात प्रत्येक गावात केडर नियुक्ती करणे ची मागणी असणे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार उमेद मधील शंभर टक्के एस एच जी ना खेळते भांडवल व आर एफ रुपये ३०००० व समुदाय गुंतवणूक | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | निधी सीआयएफ रुपये दीड लाख प्रमाणे संबंधितांना उपजीविका निधी विहित वेळेत उपलब्ध करून देण्याची मागणी असणे अभियानातील सर्व कर्मचाऱ्यांना ५०% मानधन वाढ व ग्रामविकास विभागाअंतर्गत स्वतंत्र केडर निर्माण करून शासकीय सेवेत कायम करण्याची मागणी असणे संबंधिताच्या मागण्याबाबत विचार करण्यासाठी योग्य ती कारवाई व्हावी तसेच मनुष्यबळ संशोधन मार्गदर्शक सूचनेनुसार रिक्त व नवीन पदासाठी पूर्ववत आयजीपी प्रक्रियेद्वारे भरती प्रक्रिया राबवावी यासाठी होत असलेली मागणी यावर शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ” | | |
| **१६३.** | **३२१** | **श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील वि.प.स.**<br>“ सोलापुर जिल्ह्यात २०२१-२२ च्या भुजल सर्वेक्षण अहवालानुसार ११ तालुक्यांमधील २४२ गावांचे पिण्याच्या पाण्याचे स्रोत दुषित असल्याचे आढळुन येणे,भुजल सर्वेक्षणच्या अधिकार्यांनी दिलेल्या माहितीनुसार पाण्यातील जडत्व, लोह, अलकॅलिनिटी, क्लोराईड, सल्फेट आणि टीडीएस चेप्रमाण सरासरीपेक्षा अधिक असणे, परिनामी संबधित २४२ गावांमधील नागरिकांना पोटाचे विकार,स्नायुदुखी,हागवण,उलटी,किडनीचे विकार ईत्यादी आजारांना सामोरे जावे लागत असणे,जिल्ह्यात संबधित बहुतांश गावात पाणीपुरवठा योजनेअंतर्गत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असुन दुषित पाणी शुद्ध करण्याची यंत्रणा नसणे,१५ व्या वित्त आयोगातुन पाणीपुरवठा आणि जलशुद्धिकरण यंत्रणेसाठी मिळालेला निधी अनेक ग्रामपंचायतीकडुन रस्ते,गटारी,हायमास्ट दिवे अशा कामांसाठी खर्च करणे,जिल्हा परिषदेतील संबधीत विभातील अधिकार्यांचे ग्रामपंचायतीच्या निधी खर्चाकडे गांभिर्याने लक्ष नसणे,परिनामी | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | सोलापुर जिल्ह्यातील ११ तालुक्यातील २४२ गावांतील नागरिकांना दुषित प्यावे लागत असल्याने त्यांचे आरोग्य धोक्यात येणे,त्यामुळे संबधित गावातील लोकांमध्ये पसरलेला असंतोष,याकडे प्रशासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष यामुळे संबधित गावांना शुद्ध पाणी मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया. ” | | |
| १६४. | ३७८ | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.**<br>“ राज्यातील ठाणे महानगरपालिका, मिरा-भाईंदर महानगरपालिका, भिवंडी महानगरपालिका व आजूबाजूच्या गावांना अशा ५० लाख लोकवस्ती असलेल्या भागात शुद्ध पाणीपुरवठा करण्यासाठी शासनाच्या अधिपत्याखाली नियुक्त करण्यात आलेल्या स्टेम वॉटर डिस्ट्रिब्युशन अँड इन्फ्रास्ट्रक्टर कंपनी प्रा.लि. कंपनीच्या मुख्यकार्यकारी अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक या पदा करिता नियुक्ती करताना शैक्षणिक पात्रता व अनुभव नसलेल्या व्यक्तीची नियुक्ती करण्यात आलेली असणे, सदर पदाच्या नियुक्तीकरिता २७ उमेदवारांचे अर्ज प्राप्त पडताळणीसाठी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून पाठविण्यता आले असताना उक्त प्राधिकरणाकडून २८ अर्ज पाठविण्यात आल्याने पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने प्राधिकरणाकडे खुलासा मागितलेला असणे, मुख्य कार्यकारी अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक पदावर नियुक्ती केलेल्या उमेदवार श्री.घरत यांची वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चांगले संबंध असल्यामुळे याआधी नियुक्ती करण्यात आलेल्या श्री.पोतदार यांनी रुजु होण्यासाठी केलेला विनंती अर्ज वेळेत वरिष्ठांपर्यंत सादर न केल्यामुळे उशीरा अर्ज प्राप्त झाल्याचे कारणे देत प्राधिकरणाने त्यांची नियुक्ती रद्द करण्यात आलेली असणे, परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी पदी नियुक्ती केलेल्या उमेदवाराने रुजु होण्यासाठी अर्ज करून मुदत वाढ मागितली नसताना सुद्धा त्यांना मुदत वाढ प्राधिकरणाकडून दिलेली असणे, स्टेम वॉटर डिस्ट्रिब्युशन अँड इन्फ्रा स्ट्रक्चर कंपनी प्रा.लि. मंडळावर मुख्य कार्यकारी अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक या पदा | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१–**पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | करिता नियुक्ती करण्यात आलेल्या श्री.घरत यांच्या नियुक्तीबाबत करण्यात आलेल्या तक्रारींबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात येत नसणे, श्री.घरत यांची नियुक्तीकरण्यात आल्यापासून कंपनीतील अनेक महत्वाची पदे रिक्त ठेवण्यात आली असुन इतर अभियंता यांनी कर्मचाऱ्यांची मागणी केली असतानाही मनुष्यबळ देण्यात न येणे, कर्मचाऱ्यांच्या वेतनात कपात करणे इत्यादी तक्रारींची प्राधिकरणाकडून कोणतीही दखल किंवा कारवाई करण्यात येत नसल्याने प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांमध्ये शासनाप्रती नाराजीची भावना निर्माण झालेली असणे, तीन महानगपालिका क्षेत्रातील नागरिकांना स्वच्छ पाणीपुरवठा करण्याचे महत्वाचे काम करणाऱ्या स्टेम वॉटर डिस्ट्रिब्युशन अँड इन्फ्रास्टक्चर कंपनी प्रा.लि. मंडळावर मुख्य कार्यकारी अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक पदी शैक्षणिक पात्रता व पदासाठी आवश्यक असलेल्या अनुभव नसलेल्या व्यक्तीची नियुक्ती करण्यात आल्याने नियुक्ती प्रक्रियेमध्ये झालेल्या अनियमिततेची शासनाने चौकशी करून नियुक्ती रद्द करून जबाबदार व्यक्तीची नियुक्ती करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **१६५.** | **१९७** | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.**<br>“ वाढवण (ता. डहाणू, जि. पालघर) येथे बंदर बांधण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, परंतु उक्त बंदरास स्थानिकांचा विरोध असणे, समुद्रात ५ हजार एकर जमिनीमध्ये भराव करण्यात येणार असून त्यासाठी लागणाऱ्या दगड व मातीसाठी डोंगर भुईसपाट होणार असून त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होणार असणे, तसेच उक्त परिसरातील मत्स व्यावसायिक, डायमेकर्स, इजराईल तंत्रज्ञानाने शेती करणारे शेतकरी व त्यावर आधारित हजारो आदिवासी मजुर | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

तसेच चिकू, आंबा, नारळ बागायतदार उद्धवस्त होणार असणे, उक्त प्रकरणी स्थानिकांनी आंदोलने करून वाढवण बंदर रद्द करण्याबाबत शासनास निवेदन दिलेले असणे, परंतु याकडे शासनाचे होत असलेले जाणीवपुर्वक दुर्लक्ष, त्यामुळे नागरिकांमध्ये शासना विषयी असंतोषाची भावना निर्माण झालेली असणे, सदरहू प्रकरणी शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.''

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **१६६.** | **५०३** | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.**<br>" मालवण (जि.सिंधुदुर्ग) नगरपालिका हद्दीतील राजकोट मेढा या विभागातील समुद्रकिनाऱ्यावर राहणाऱ्या ग्रामस्थांच्या घरांचे समुद्राच्या पाण्यापासून संरक्षण होण्याच्या दृष्टिने राजकोट ते मालवण जेटी बंदर पर्यंत धुपप्रतिबंधात्मक बंधारा चार वर्षापूर्वी शासकीय कोट्यातून मंजूर करण्यात आलेला असणे, सदर ४५० मी. लांबीच्या बंधाऱ्यासाठी रु.६,०१,४६,४००/- एवढ्या रक्कमेचे अंदाजपत्रक अभियंता सिंधुदुर्ग यांच्याकडे सादर करण्यात आलेले असून सदर प्रस्तावात त्रुटी काढून पतन अभियंताकडे फेर सादर करण्यात आलेला असणे, सदर बंधाऱ्याचे काम अर्धवट स्थितीत झाले असून निधीअभावी बांधकाम पूर्ण न झालेले असणे, पतन उप विभाग अधिकाऱ्यांनी सदर भागाची पहाणी केली असता समुद्रकिनाऱ्यावरील जमिनीची धूप मोठ्या प्रमाणात होत असून धुपप्रतिबंधात्मक बंधाऱ्याची आवश्यकता असल्याचे नमूद करण्यात आलेली असणे, कोकणात होणाऱ्या मुसळधार पावसाळयात समुद्राचे पाणी किनाऱ्याजवळच्या घरात घुसुन मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात मालमत्तेचे व आर्थिक नुकसान होत असणे, ग्रामस्थांनी सदर बंधाऱ्याचे बांधकाम निधी मंजूर करून बांधकामास त्वरित करण्याबाबत शासनास निवेदने सादर करण्यात आलेली असून लोकप्रतिनिधींनी आंदोलने सुद्धा केलेली असणे, ग्रामस्थांच्या मागणीकडे शासनाचे होत असलेल्या दुर्लक्षामुळे स्थानिक जनतेमध्ये नाराजीची भावना निर्माण झालेली असणे, राजकोट ते मालवण जेटी बंदर पर्यंत | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | धुपप्रतिबंधात्मक बंधाराच्या कामास निधी मंजूर करून बांधकाम पूर्ण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **१६७.** | **२६२** | **ॲड. निरंजन डावखरे,श्री.** प्रविण दरेकर,श्री. प्रसाद लाड,श्री. रमेशदादा पाटील,श्री. नागोराव गाणार, श्री. चंद्रशेखर बावनकुळे **वि.प.स.**<br>“ कोल्हापूर जिल्ह्यातील श्री शाहु मार्केट यार्डमध्ये कोल्हापूर जिल्हा माथाडी आणि अंसरक्षित कामगार मंडळात नोंदीत असलेल्या मे. जी.व्ही. आलूरकर या ठेकेदाराने लोडींग, अनलोडींग व थापी अशा प्रकारची कष्टाची कामे करणाऱ्या नोंदीत माथाडी कामगारांची कामाची मजूरी आणि मंडळाच्या लेव्हीसह देय असलेली एकूण रक्कम रुपये ८२,४५,७०,९२२ (अक्षरी रुपये ब्याऐंशी कोटी पंचेचाळीस लाख सत्तर हजार नऊशे बावीस) एवढी रक्कम कोल्हापूर माथाडी मंडळात भरणा न केल्याची घटना माहे नोव्हेंबर, २०२२ च्या शेवटच्या सप्ताहात उघडकीस येणे, परिणामी कोल्हापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाची योजना खंड २९ चे उल्लंघन झालेले असणे, तसेच सदर ठेकेदार मंडळाने नेमूण दिलेल्या नोंदीत कामगारांकडून लोडींग व अनलोडींगची कामे करून न घेता इतर कामगारांकडून कामे करून घेत असल्याने तसेच कामगाराची मजूरी व लेव्हीची रक्कम माथाडी मंडळात नियमित भरणा करीत नसल्याने कामगारांचे व माथाडी मंडळाचे फार मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असणे व परिणामीमाथाडी ॲक्ट १९६९ अन्वये स्थापित माथाडी मंडळाच्या योजनेच्याखंड २९ चे उल्लंघन झालेले असणे, तसेच उक्तप्रकरणी चौकशीकरिता कोल्हापूर जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाने माथाडी कायद्याचे कलम १३ नुसार | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | स्वतंत्र चौकशी अधिकारी श्री. एम.वाय.हुंबे यांची नेमणूक केलेली असणे, मात्र अद्यापपर्यंत मे. जी.व्ही.आलूरकर यांच्या गैरव्यवहाराप्रकरणी कोणताही निर्णय किंवा तोडगा निघत नसल्याने आर्थिक विवंचनेत सापडलेले कष्टकरी कामगार व त्यांच्यामध्ये पसरलेला तीव्र असंतोष याबाबत ठेकेदार जी.व्ही.आलूरकर यांची शासनाकडून तातडीने चौकशी करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| १६८. | ३५३ | **श्री. सचिन अहिर वि.प.स.**<br>“ ठाणे येथील वागळे औद्योगिक वसाहत (पश्चिम) येथील सुपरमॅक्स केअर कंपनी विविध खात्यामध्ये कुशल व अकुशल या पद्धतीने १३६१ कामगार कार्यरत असणे, सदर कंपनी ही प्रायव्हेट लिमिटेड असून, या कंपनीमध्ये वेगवेगळया प्रकारची शेव्हींग ब्लेडस् आणि रेझर्स उत्पादित होऊन सर्व उत्पादन वेगवेगळया मार्केटमध्ये विक्रीसाठी वितरित होत असणे, या कंपनीत एकूण ३ युनिट कार्यरत असून या तिन्ही युनिटमध्ये १०० टक्के उत्पादन प्रक्रिया चालू असणे, कंपनीला चांगल्या प्रकारे मार्केटींग असल्याने आतापर्यंत कामगारांनी उत्पादन क्षमता वाढवून कंपनीला फायदेशीर बनविणे, कंपनीची आर्थिक बाजू भक्कम असताना सुद्धा कंपनी गेल्या दीड वर्षापासून कंपनीने कामगारांना वेळेवर वेतन न देणे, त्यांच्या आर्थिक बाबी वेळेवर पूर्ण न करणे, अशा पद्धतीने कंपनी जाणीवपूर्वक प्रकार करित असणे, कामगारांना वेळेवर पगार न दिल्यामुळे कामगार व त्यांच्यावर अवलंबून असलेले कुंटुंब मेटाकुटीस येणे, शेवटी नाईलाजास्तव कामगारांनी ठाणे औद्योगिक न्यायालयात दाद मागणे, न्यायालयाने कामगारांच्या बाजूने न्याय देऊन सुद्धा त्यांच्यावर अन्याय करणे, याबाबत कामगारांनी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य तसेच मा. कामगारमंत्री यांच्याकडे लेखी पत्राद्वारे लक्ष वेधणे, याबाबत शासनाकडून कामगारांवर सर्देव दुर्लक्ष करणे, कामगारांचे वेतन वेळेवर न दिल्यामुळे | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

## विवरण क्रमांक २१–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | कामगार व त्यांच्यावर अवलंबित असलेल्या कुटुंबांचे होत असलेले हाल याबाबत शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया. ” | | |
| **१६९.** | **३७६** | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.**<br>“ मुंबई लगतच व इतरत्र असलेल्या औद्योगिक क्षेत्रामध्ये अनेक रासायनिक कारखाने असणे, सदरहू कारखान्यांपैकी बहुतेक कारखाने हे प्रदुषणाच्या आणि सुरक्षेच्या बाबतीत महाराष्ट्र नियंत्रण मंडळाच्या नियमांकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत असणे, त्यामुळे उक्त कारखान्यांमध्ये मोठ्या प्रमाणात अपघात होऊन कामगारांचा मृत्यू होत असणे, तारापूर औद्योगिक क्षेत्रात गत दोन वर्षात ३० पेक्षा जास्त अपघात होणे, त्यापैकी १० कारखान्यांमध्ये १३ कामगारांचा मृत्यू व ३६ कामगार जखमी झालेले असणे, अपघात ग्रस्त कारखान्यांमध्ये मे. बगेरीया इंडस्ट्रीज लि. डी-१२२, मे. आरे ड्रग्ज लि, प्लॉट क्र ई-३४, मेक्सहिल. फार्मासीटीकल, प्लॉट क्र-जे-७, साळवी केमिकल प्लॉट क्र इ-९०,९९३,९४, मेकोय फार्म क्र.एस-१२, विराज प्रोफाईल लि, जि-२, १/२, सियाराम सिल्क मिल्स प्लॉट क्र.एस-३/१, युनियन पार्क केमिकल प्लॉट क्र ई-११, पेन्नार इंडस्ट्रीज, जे-७२/२, श्री.विनायक केमिकल प्लॉट क्र, टी-११, आरती ड्रग्ज लि, ई१/२१/२२, भारत केमिकल प्लॉट क्र एल-३०, पार्थ पॅकेजिंग, डी.एच ऑरगॅनिक, मे. निर्भय रसायन प्रा.लि प्लॉट क्र. एन-९६ तसेच खेड येथील डिवाईन केमिकल सी-२८ या कारखान्यांचा समावेश असणे, उक्त कारखान्यातील अपघात चुकीचे उत्पादन घेताना केलेल्या प्रक्रियेमुळे झालेले असणे, तसेच उक्त प्रकरणी कोणताही गुन्हा नोंद नसून अपघातात जखमी तसेच मृत्यू झालेले कामगार ईएसआयसी नोंदणीकृतही | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | नसल्याने त्यांना कोणतीही आर्थिक मदत दिलेली नसणे, उक्त प्रकरणी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय विभागाचे होत असलेले जाणीवपुर्वक दुर्लक्ष, त्यामुळे कामगारांमध्ये निर्माण झालेली भितीचे वातावरण, उक्त प्रकरणी चौकशी करून संबंधित कंपनी व्यवस्थापनावर गुन्हे नोंद करून त्यांना सहकार्य करणाऱ्या संबंधित अधिकारी कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **१७०.** | **११६** | **डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे,श्री.** अभिजित वंजारी,श्री. राजेश राठोड,डॉ. वजाहत मिर्झा, डॉ. सुधीर तांबे,डॉ. प्रज्ञा सातव,श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील,श्री. जयंत आसगावकर,श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप **वि.प.स.**<br>“ राज्यातील राजकीय अस्थिरतेचा फायदा घेत व इतर राज्यांच्या उद्योग धार्जिण्या धोरणांमुळे महत्त्वाचे प्रकल्प गुजरातसह इतर राज्यात स्थलांतरित होणे, राज्यातील उद्योगांच्या स्थलांतरास केंद्रातील सरकारचे पाठबळ असण्याची शक्यता असणे, त्यामुळे महाराष्ट्रातील जवळपास २ लाखख कोटींची गुंतवणूक इतरत्र जाणे, तसेच जवळपास दीड लाख रोजगारांपासून राज्यातील तरुण वंचित राहणे, जाणाऱ्या प्रकल्पांमध्ये वेदांता फॉक्सकॉन, टाटा एअर बसं सी २९५, बलक ड्रग प्रकल्प, वैद्यकीय उपकरणे निर्मिती पार्क व विद्युत उपकरणे निर्मिती प्रकल्प यांचा समावेश असणे, सदर प्रकल्पांची महाराष्ट्रातच गुंतवणूक व्हावी याकरिता विद्यमान राज्य सरकारचे दुर्लक्ष असणे, उत्तम दर्जाच्या पायाभूत सुविधा, कुशल मनुष्यबळ असतानाही महाराष्ट्रातून महत्त्वाचे प्रकल्प इतर राज्यात स्थलांतरित होण्यासाठी राज्य सरकारचा विरोध नसणे, प्रकल्पांच्या सद्यस्थितीबाबत विद्यमान उद्योग मंत्र्यांकडून फक्त दिशाभूल केल्याचा आरोप होणे, मध्यप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांकडून उच्च पदस्थ अधिकाऱ्यांसमवेत महाराष्ट्रात/ पुण्यात येऊन महाराष्ट्रातील उद्योगधंद्यांसाठी स्वस्तात जमिनी व कुशल मनुष्यबळ देण्याच | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | उद्योगपतींना अमिष दाखवून देखील विद्यमान सरकारकडून त्यावर कोणतीही प्रतिक्रिया न व्यक्त करणे, उत्तरप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी राज्यातील हिंदी चित्रपट सृष्टीला उत्तरप्रदेश मध्ये येण्याचे आवाहन करणे, महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह कोशारी यांनी महाराष्ट्रातील उद्योगधंद्यांना उत्तराखंडमध्ये येण्याचे आवाहन करणे, महाराष्ट्रातील मोठे प्रकल्प गुजरातसह इतर राज्यांकडे वळविले जात असतानाच औरंगाबाद शहरातील विमान सेवा ही पळवण्यात येऊन देखील त्याकडे कोणाचेही लक्ष नसणे, औरंगाबादमध्ये वापरण्यात येणारी फ्लायबिग एअरलाइन्सची विमाने ईशान्य भारतातील कोलकत्ता, गुहाटी, आगरताळा, पटना इत्यादी शहरांमध्ये उड्डाणाकरिता वापरणे या सर्व बाबींमुळे राज्यातील बेरोजगार तरुणांमध्ये तीव्र असंतोषाची भावना निर्माण होत असून राज्यामध्ये उद्योगधंद्यांना गुंतवणुकीस प्रोत्साहित करण्यासाठी राज्य शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ” | | |
| **१७१.** | **३१४** | **श्री. रमेशदादा पाटील,** श्री. नागोराव गाणार, श्री. प्रविण दरेकर **वि.प.स.**<br>“ मौजे महापे, नवी मुंबई मिलेनियम बिझनेस पार्क येथील भूखंड क्र. जनरल-३१ मोजमाप ८३७९ अशा वर्णनाचा भूखंड स्थानिकांना तसेच प्रकल्पबाधीत व्यक्तीस व त्यांच्या कंपनीस डावलून तसेच पार्किंगसाठी राखीव असताना सुद्धा उद्योग विस्ताराच्या नावाखाली कोणतीही निविदा न मागता रूपा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या विकासक कंपनीस, महामंडळाचे संबंधीत अधिकारी यांच्याशी संगनमत करून आयअ/आयटीएस या प्रयोजनाकरिता सवलतीच्या दरात भूखंड देऊन शासनाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान केल्याची घटना ऑक्टोबर | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | २०२२ मध्ये वा त्या सुमरास उघडकीस येणे, सदरहू प्रकरणी भूखंडाचे वाटप रद्द करून संबंधीतांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची मागणी श्री.नारायण धर्मा डाऊरकर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, एमआयडीसी, अंधेरी, मुंबई यांच्याकडे दि.१३.१०.२०२२ रोजी केली असणे, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावायची कार्यवाही व उपाययोजना. ” | | |
| **१७२.** | **४४९** | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.**<br>“ राज्यातून एकीकडे मोठमोठे उद्योग प्रकल्प बाहेरच्या परराज्यात जात असताना ऊर्जा उपकरण निर्मिती झोन प्रकल्प राज्या बाहेर गेला असल्याचे निदर्शनास येणे, ऊर्जा उपकरण निर्मिती झोन मिळवण्यासाठी राज्यासह इतर आठ राज्य स्पर्धेत असताना राज्य सरकारच्या नाकर्तेपणामुळे ऊर्जा उपकरण निर्मिती झोन प्रकल्प मध्य प्रदेश राज्यात गेला असणे, यासंदर्भात केंद्र सरकारच्या प्रकल्प सुकाणू समितीने दिनांक २२ ऑक्टोबर, २०२२ रोजी दिलेली मंजुरी व दिनांक २ नोव्हेंबर, २०२२ रोजी सदरहू प्रकल्पाबाबत मध्य प्रदेशच्या मुख्य सचिवांना केंद्र सरकारने प्रकल्प मंजुरीचे पत्र दिलेले असणे, बल्क ड्रग पार्क, मेडिकल डिव्हाईस पार्क नंतर ऊर्जा उपकरण निर्मिती झोनही राज्याच्या हातून गेलेला असणे, या झोन निर्मितीसाठी केंद्र सरकारकडून ४०० कोटी रुपयांचे अनुदान राज्याला मिळाले असते परंतु असा मोठा प्रकल्प राज्यातून गेल्यामुळे राज्यातील बेरोजगार तरुणांमध्ये राज्य शासनाविषयी तीव्र असंतोषाची निर्माण झालेली भावना, राज्यात अधिक अधिक उद्योग यावेत, परकीय गुंतवणूक यावी व राज्यातील बेरोजगारांना काम मिळावे यासाठी राज्य शासनाने अधिक कार्यक्षमरीत्या काम करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **१७३.** | **३४** | **श्री. अमोल मिटकरी,श्री.** विक्रम काळे,श्री. शशिकांत शिंदे,श्री. सतिश चव्हाण **वि.प.स.** “ राज्यात विशेषतः नागपूर,अकोला, औरंगाबाद, पुणे, मुंबई इ. विभागामध्ये बालमृत्युचे प्रमाण वाढलेले असून अलिकडील काळात सुमारे ९ हजार ३५७ पेक्षा जास्त नवजात बालकांचा मृत्यु झालेला असल्याची गंभीर माहिती डिसेंबर,२०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात उघडकीस आलेली असणे, आरोग्य विभागाच्या रुग्णालयांतील बालमृत्युदर कमी करण्यासाठी शासनास अपयश आलेले असणे, प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे अनेक अर्भकांचा अतिदक्षता विभागात मृत्यु होत असणे, शासकीय/निमशासकीय रुग्णालयांमध्ये नवजात बालक व मातांच्या आरोग्याबाबत प्रचंड हेळसांड होत असल्याचे वारंवार उघडकीस येत असणे, नवजात बालकांचा मृत्युदर कमी करणे, कुपोषित बालकांची समस्या सोडविणे, मातांच्या आरोग्याबाबत उच्च दर्जाची आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्याची लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दि.११ डिसेंबर,२०२२ तसेच अलिकडील काळात वारंवार मागणी केलेली असतांनाही याबाबत आवश्यक उपाययोजना करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, नवजात बालमृत्यु, मातामृत्युंचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याने त्यांचेमध्ये चिंतेचे वातावरण पसरलेले असणे, सदरबाबत युद्धस्तरावर कार्यवाही करून आवश्यक उपाययोजना करण्यास प्रशासनाचे हेतुपुरस्पर दुर्लक्ष होत असल्याने, सदर गंभीर प्रकरणी शासनाने वेळीच हस्तक्षेप करून तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७४. | १४७ | **श्री. प्रसाद लाड वि.प.स.**<br>“ राज्यातील महामार्गावरील अपघातांची संख्या लक्षात घेता जखमी रुग्णाना तात्काळ मदत मिळावी यासाठी बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजनेची घोषणा ७ वर्षापूर्वी करण्यात आली होती. या अंतर्गत एकूण ७४ प्रकारच्या प्रक्रियासाठी ३० हजार रुपयापर्यंतचे विमा संरक्षण देण्याचे निश्चित करण्यात येणे, यात जे रुग्ण महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत लाभार्थी असतील त्यांना त्या योजनेतून उपचार केले जाणे, त्यामुळे अन्य रुग्णांना राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या माध्यमातून उपचार करण्याचे निश्चित करण्यात येणे, अपघातात कोणत्याही राज्याचा नागरिक जरी जखमी झाला तरी त्यालाही बाळासाहेब ठाकरे अपघात योजनेअंतर्गत पहिले ७२ तास मोफत उपचार अथवा ३० हजार रुपयांची मदत विमा योजनेच्या माध्यमातून देण्याचा निर्णय महाविकास आघाडीच्या कारकिर्दीत २०२१ मध्ये याबाबतचा शासन निर्णय होऊनही त्याची आजमितीस अंमलबजावणीच झालेली नसणे, तत्कालीन महाविकास आघाडी सरकारच्या काळात घेण्यात आलेल्या या निर्णयाची विनाविलंब अंमलबजावणी होण्याचे दृष्टीने शासनाने ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष्य, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |
| १७५. | २९६ | **श्री. नागोराव गाणार वि.प.स.**<br>“ राज्यातील महामार्गावरील अपघातांची संख्या लक्षात घेता जखमी रुग्णाना तात्काळ मदत मिळावी यासाठी बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजनेची घोषणा ७ वर्षापूर्वी करण्यात आली होती. या अंतर्गत एकूण ७४ प्रकारच्या प्रक्रियासाठी ३० हजार रुपयापर्यंतचे विमा संरक्षण देण्याचे निश्चित करण्यात येणे, यात जे रुग्ण महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत लाभार्थी असतील त्यांना त्या योजनेतून | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | उपचार केले जाणे, त्यामुळे अन्य रुग्णांना राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या माध्यमातून उपचार करण्याचे निश्चित करण्यात येणे, अपघातात कोणत्याही राज्याचा नागरिक जरी जखमी झाला तरी त्यालाही बाळासाहेब ठाकरे अपघात योजनेअंतर्गत पहिले ७२ तास मोफत उपचार अथवा ३० हजार रुपयांची मदत विमा योजनेच्या माध्यमातून देण्याचा निर्णय महाविकास आघाडीच्या कारकिर्दीत २०२१ मध्ये याबाबतचा शासन निर्णय होऊनही त्याची आजमितीस अंमलबजावणीच झालेली नसणे, तत्कालीन महाविकास आघाडी सरकारच्या काळात घेण्यात आलेल्या या निर्णयाची विनाविलंब अंमलबजावणी होण्याचे दृष्टीने शासनाने ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष्य, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **१७६.** | **४०८** | **श्री. सुनिल शिंदे,श्री.** विलास पोतनीस **वि.प.स.**<br>“ राज्यात दिनांक २६ सप्टेंबर, २०२२ पासून सुरू झालेल्या माता सुरक्षित तर घर सुरक्षित अभियानांतर्गत द्वराज्यातील १८ वर्षांहून अधिक वयाच्या सुमारे २ टक्के महिला तीव्र कुपोषित गटात असल्याची माहिती अलिकडेच माहे नोव्हेंबर, २०२२ वा त्या दरम्यान माता सुरक्षित तर घर सुरक्षित अभियानाच्या अहवालातून समोर आलेली असणे, राज्यातील तब्बल ४.०१ कोटी महिलांची तपासणी करण्यात येऊन त्यामध्ये सुमारे ७.३४ राख महिलांमध्ये (१.८ टक्के) गर्भवती महिलांच्या तपासणीमध्ये थकवा येणे, लक्ष केंद्रीत अडथळा, पाय सुजणे, चक्कर येणे, चिडचिड होणे, लोहाची कमतरता, शरीरात हिमोग्लोबिन कमी आढळणे, मुदतपूर्व प्रसूती, कमी वजनाची अर्भके तसेच बाळासाठी लोहाचे साठे कमी होणे, | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

बाळाचा विकास खुंटणे, अशा अनेक समस्यांमुळे कुपोषणाचे परिणाम दिसून आल्याची माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये निदर्शनास आणलेली धक्कादायक बाब, माता सुरिक्षत तर घर सुरक्षित अभियानांतर्गत कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाच्या आदिवासी विकास विभागाकडून तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाने पूर्णपणे दुर्लक्ष होणे, आदिवासी बालके मृत्यूच्या सापळ्यात सापडून त्यांची परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत जाणे, सदर कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी कुपोषित बालकांसाठी वापरण्यात येणारा निधी त्यांच्या आरोग्यावर खर्च होत नसल्याने सदर बाबतीत आम जनतेत पसरलेली असंतोषाची भावना, याबाबत तातडीने केंद्र शासनाच्या या निर्देशावर शासनाने पुर्नविचार विचार करून करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया. ”

**१७७.** ५१४ **श्री. प्रसाद लाड वि.प.स.** ३० डिसेंबर, २०२२ चर्चा झाली नाही

“ राज्याच्या आरोग्य विभागात आजमितीस डॉक्टरापासून परिचारिका, कक्षपरिचर, तंत्रज्ञ आदी विविध संवर्गातील एकूण १७ हजार ०५१ पदे रिक्त असल्याची उघडकीस आलेली धक्कादायक बाब, राज्याच्या आरोग्याचा कारभार ज्या आरोग्य संचालनालयामार्फत चालतो तेथेही आरोग्य संचालक, अतिरिक्त संचालक, उप संचालक सहायक संचालक आदी अत्यंत महत्वाची ७० हून अधिक पदे रिक्त असल्याची परिस्थिती, तर जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सकांसह वैद्यकीय अधिकारी अशी एकूण १ हजार ५३४ पदे व विशेषतज्ज्ञांची ५०६ पदेही रिक्तच आहेत, कोरोना-१९ या जागतिक महामारीच्या काळातही मागील महाविकास आघाडी सरकारकडून सदरहू रिक्त पदे भरण्यास झालेल्या चालढकल व दिरंगाईमुळे केंद्र व राज्य सरकारच्या आरोग्य विषयक विविध योजना राबविताना अनेक गंभीर समस्यांना सामोरे जाण्याची अस्तित्वात असलेल्या आरोग्य प्रशासनावर आलेली पाळी, आरोग्य विभागात मोठ्या प्रमाणावर रिक्त असलेल्या विविध संवर्गातील पदामुळे एकीकडे अपुऱ्या

**विवरण क्रमांक २१–**पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | कर्मचारीवर्गामुळे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यावर पडत असलेला कामाचा अधिकचा भार, तर दुसरीकडे या गंभीर परिस्थितीमुळे राज्यातील गोरगरीब रूग्णांना औषधोपचारासाठी करावी लागत असलेली वणवण, प्रसंगी औषधोपचारापासून वंचित रहावे लागत असल्याची परिस्थिती, राज्यात सध्या गोवर व अन्य साथीचा आजाराचा फैलाव सुरू असल्याने तसेच राज्यातील विशेषेकरून ग्रामीण भागातील रुग्णांना सुरळीत व चांगली आरोग्य सेवा मिळावी याबाबत विद्यमान सरकारने गांभीर्याने विचार करून आरोग्य विभागातील डॉक्टरासह विविध संवर्गातील मोठ्या प्रमाणावर रिक्त असलेली पदे भरण्यासाठी एक कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची युद्धपातळीवर अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, याप्रकरणी शासनाने केलेली कार्यवाही, करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| **१७८.** | **१७९** | **श्री. प्रसाद लाड वि.प.स.**<br>“ मुंबई-अहमदाबाद महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी राबविलेल्या भूसंपादन प्रक्रियेत महामार्गात जमीन जात असूनही पालघर तालुक्यातील (जि.पालघर) शलौली आणि सातीवली गावचे निवाडे जाहीर होऊन दीड वर्षांचा कालावधी उलटला तरीही प्रकल्पाबाधित शेतकऱ्यांना त्यांच्या संपादित जमिनीचा मोबदला आजमितीत मिळालेला नसणे, पालघर तालुक्यातील हालोली आणि सातीवली या दोन गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी महामार्गात जात असूनही शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला अद्याप मिळालेला नसल्यामुळे शेतकऱ्यांनी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महामार्गालगत सुरू असलेल्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे काम सप्टेंबर, २०२२ च्या दुसऱ्या पंधरवड्यात रोखण्यात येणे, शेतकऱ्यांच्या आंदोलनानंतर तातडीने | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

नवीन भूसंपादन प्रक्रिया राबवून शेतकऱ्यांना मोबदला देण्याचे आदेश जिल्हाधिकारी, पालघर यांना देण्यात येणे, भूसंपादन प्रक्रिया राबवून सक्षम प्रधिकाऱ्यांनी राष्ट्रीय महामार्ग अधिनियमानुसार निवाडा जाहीर होऊनही आजमितीस मात्र मोबदल्यांसाठी शेतकरी प्रतीक्षेत असणे, मोबदल्याच्या मागणीसाठी तुरुंगवास भोगल्यानंतरही मुंबई-अहमदाबाद महामार्गांचे सक्षम प्राधिकारी आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून मोबदला अदा करण्यास दिरंगाई होत असल्याने बाधित शेतकऱ्यांनी शासनाविषयी तीव्र संताप व्यक्त केलेला असणे, मुंबई-अहमदाबाद महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी संपादित केलेल्या सातीवली व हालोली गावांतील शेतकऱ्यांना विनाविलंब संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला विनाविलंब अदा होण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

**१७९. १८२ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे वि.प.स.** — ३० डिसेंबर, २०२२ — चर्चा झाली नाही

“ मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरणाचे गेल्या १२ वर्षापासून सुरू असलेले काम अद्यापी अपूर्ण अवस्थेत असल्याचे नुकतेच माहे नोव्हेंबर,२०२२ मध्ये निदर्शनास येणे, सदर महामार्गावरील जागोजागी असलेल्या खड्ड्यामुळे आजपर्यंत अपघाताची संख्या दोन हजारांच्यावर जाणे, व जखमींची संख्या पाच हजारावर जाणे, सदर महामार्गाचे काम तातडीने पूर्ण व्हावे याकरिता कोकणातील विविध संस्था, संघटना, लोकप्रतिनिधिंनी अनेक मोर्चे,आंदोलने,उपोषणे, अर्ज-विनंत्या करूनही त्याला प्रशासनाने दाखविलेली केराची टोपली, महामार्गावर झालेल्या अपघातात मृत पावलेल्यांच्या नातेवाईकांना तसेच जखमींना शासनाकडून आर्थिक मदत देण्यास होत असलेला विलंब, महामार्गाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे सुरू असणे, सदर कामास होत असलेल्या विलंबामुळे कामाच्या खर्चात होत असलेली वाढ, मुंबई-गोवा महामार्गाचे काम तातडीने पूर्ण न केल्यास कोकणवासियांनी तीव्र आंदोलन करण्याचा दिलेला इशारा,याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून तातडीने

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम पूर्ण करण्याची कार्यवाही युद्ध पातळीवर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. ” | | |
| **१८०.** | **५०१** | **श्री. अंबादास दानवे,** श्री. विलास पोतनीस,श्री. सुनिल शिंदे **वि.प.स.**<br>“ सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिनस्त असलेली पंतनगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई येथील इमारत क्रमांक १८६ या शासकीय कर्मचारी निवासस्थान असलेल्या इमारतीमध्ये पावसाळ्यात पाणी गळती होत असणे, इमारतीच्या छतातून होणाऱ्या लिकेजला पर्याय म्हणून छतावर पत्र्याच्या शेडचे बांधकाम नसल्यामुळे पाणी गळतीमुळे इमारतीस धोका उद्‌भवण्याची शक्यता निर्माण होणे, इमारतीच्या मलनिस्सःरण व सांडपाणी वाहक पाईप गळती होत असल्याने तसेच मलनिस्सःरण व सांडपाणी वाहक वाहिनीच्या गटारांवर झाकण नसल्याने इमारत व आसपासच्या परिसरात मैल्यामुळे दुर्गंधी पसरणे, इमारत परिसरात असणाऱ्या लाकडी टाकाऊ सामान तसेच इमारत दुरुस्तीवेळ टाकलेल्या रॅबीटमुळे उंदीर सुळसुळाट आणि डासांचा फैलाव होत असणे, इमारतीमधील स्वच्छतेकरिता पुरेश्या स्वरूपात कर्मचाऱ्यांची नसल्याने इमारत परिसरातील अस्वच्छतेमुळे येथील रहिवाशांना वारंवार आरोग्यविषयक समस्यांना सामोरे जावे लागणे, या इमारत परिसरात मातीचे साम्रज्य पसरलेले असून रहिवाशांचा वावर होत असल्याने संपूर्ण इमारत परिसरात पेवर ब्लॉक बसवून इमारत परिसरात असलेल्या वृक्षांचे तुटलेले क्रॉक्रीट कटडे दुरुस्त करून सुशोभिकरण केलेले नसणे, या इमारतीमधील शासकीय निवास्थानातील रहिवाशांच्या सुरक्षेकरिता कायमस्वरूपी सुरक्षारक्षक नेमलेले नसणे,या वसाहतीजवळ सुरू झालेल्या सिमेंट कारखान्यामुळे वसाहतीमध्ये | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

तसेच वसाहतीमधील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात धुळीचे सामाज्र पसरल्यामुळे येथील स्थानिक रहिवाशांना आरोग्य विषयक समस्यांना सामोरे लावे लागणे, मानखुर्द लिंक रोडवरुन या वसाहतीमध्ये प्रवेश करण्यासाठी असलेल्या मुख्य रस्त्यांने प्रवास करताना रस्त्याच्या दोन्ही बाजूला मोठ्या प्रमाणात असलेली मॅग्रोव्हजची जंगले असणे, रस्त्याच्या बाजूला असलेल्या मॅग्रोव्हजमुळे वसाहत परिसरात सरपटणाऱ्या प्राण्याचा मोठ्या प्रमाणावर झालेला सुळसुळाट, घाटकोपर रेल्वे स्टेशन ते शासकीय वसाहती दरम्यानच्या या ४ कि.मी. पल्याच्या प्रवासाकरिता रिक्षा उपलब्ध होत नसल्याणे तसेच वसाहतीमध्ये प्रवासाकरिता बससेवा उपलब्ध नसल्याने येथील रहिवाशांना प्रवासा दरम्यान पावसाळ्यात घाणीचे साम्राज्य असलेल्या झोपडपट्टीतून असलेल्या पायवाटेवरुन शाळेत जाणाऱ्या लहानमुलांसह ये-जा करावी लागणे, त्यामुळे या शासकीय वसाहती सभोवताली असलेल्या झोपडपट्टीमुळे तेथे वास्तव्यास असलेले गुंड प्रवृत्तीचे लोक / गर्दुल्ले यांच्यामुळे वसाहतीमध्ये ये-जा करणाऱ्या रहिवाशी महिला समवेत छेडछाड, लुटमारीच्या घडत असलेल्या घटना, यामुळे महिला रहिवाशी तसेच तेथे वास्तव्यास असलेल्या शासकीय महिला कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेले भितीचे वातावरण,इमारत क्रमांक ४ व ५ च्या मागे गटार असल्याने गटाराचा दुर्गंध येत असणे. इमारत क्रमांक ६ मध्ये चोरी होणे, या वसाहतीमध्ये अचानक उद्‌भवणाऱ्या आरोग्य विषयक समस्यांना सामोरे जाण्याकरिता या रुग्णालयात जाण्याकरिता पर्यायी व्यवस्था उपलब्ध नसणे, कर्मचारी आकृती रायझींग सिटी या वसाहतीमध्ये असलेल्या ७ इमारतीच्या सुरक्षेकरिता ३ सुरक्षा रक्षक कार्यरत असून सुरक्षा रक्षकांच्या संख्येत वाढ न करणे यासंदर्भात रहिवाशांनी वारंवार विनंती अर्ज सादर करून सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी / कर्मचारी यांच्या उदासिनतेमुळे अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही होत नसल्याने स्थानिक रहिवाशांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण,

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | इमारत क्रमांक १८६ या इमारतीमधील समस्यांचा तातडीने निपटारा करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ” | | |
| **१८१.** | **१३५** | **श्री. अनिकेत तटकरे वि.प.स.**<br>“ राज्यातील १४ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमधील ४ लाख दारिद्र्यरेषेवरील व केशरी कार्डधारक शेतकऱ्यांना २ रु. किलो दराने गहू, ३ रु. किलो दराने तांदूळ देण्याची योजना दि. २०/१०/२०२२ रोजी वा त्यासुमारास अचानक बंद करण्याचा निर्णय शासनाने जाहीर करणे. या शेतकऱ्यांना पंतप्रधान गरीब कल्याण योजनेचाही लाभ मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल होणे, अतिवृष्टी व त्यातून झालेल्या पीक हानीमुळे शेतकरी आत्महत्या वाढत असल्याचे भीषण वास्तव समोर आलेले असतांना सरकार अल्पदरातील धान्य देण्याचे बंद केल्यामुळे शेतकऱ्यांना पसरलेला तीव्र असंतोष, ही योजना पुन्हा सुरू करावी, अशी शेतकऱ्यांकडून होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली व करावयाची उपाययोजना.” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |
| **१८२.** | **३१०** | **श्री. प्रवीण दटके,** श्री. नागोराव गाणार,श्री. चंद्रशेखर बावनकुळे **वि.प.स.**<br>“ सार्वजनिक वितरण प्रणाली मार्फत होणारा अन्नधान्य पुरवठा एनपीएच योजनेतील प्राधान्य गटात न मोडणाऱ्या २ लाख ६७ हजार कुटुंबांना म्हणजेच अंदाजे ९ लाख लोकसंख्या असणाऱ्या केसरी शिधापत्रिकाधारकांना उपलब्ध होत नसणे, एन ई आर अंतर्गत कार्डधारकांना अन्नधान्य लाभांपासून वंचित ठेवण्यात आले असणे, यासह प्राधान्य कुटुंबाचे लाभार्थी व अंत्योदय योजनेत लाभार्थी संख्या शिल्लक नसल्याने प्रलंबित शिधापत्रिकाधारकांना योजनेत समाविष्ट करण्यासाठी प्रयोजन नसणे, शिधापत्रिका धारकांना योजनेत समाविष्ट | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | केल्यानंतर प्रत्यक्ष अन्नधान्याचा लाभ मिळवण्यासाठी २ महिने प्रतीक्षा करावी लागत असणे, सदर कालावधी कमी करून शिधा पत्रिका मिळताच धान्य देण्याची कार्यवाही होण्याची आवश्यकता असणे, शिधापत्रिका धारकांचे आधार संलग्न नसणे ,तसेच ऑनलाइन राशन नोंदणी कार्ड आरसीएमएस सिस्टीम प्रक्रियेतील अडचणी दूर करून यंत्रणा सुस्थितीत आणणे आवश्यक असणे, आदि बाबतीत स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी तक्रार निवेदनाद्वारे शासनाकडे कार्यवाहीची मागणी केलेली असणे, सदर विषयाकरिता सामान्य जनतेद्वारा उभारण्यात आलेले जन आंदोलन, सामान्य नागरिकांमधील वाढता असंतोष, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ” | | |
| **१८३.** | **२१** | **श्री. अमोल मिटकरी, श्री.** विक्रम काळे,श्री. शशिकांत शिंदे,श्री. सतिश चव्हाण,श्री. अंबादास दानवे, श्री. रामदास आंबटकर,श्री. नागोराव गाणार,श्री. चंद्रशेखर बावनकुळे,श्री. प्रवीण दटके,श्री. प्रविण पोटे-पाटील,डॉ. रणजित पाटील,श्री. रमेशदादा पाटील,श्री. सचिन अहिर,श्री. महादेव जानकर **वि.प.स.**<br>“ राज्यात जून ते आक्टोबर,२०२२ दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीप हंगामातील ज्वारी, बाजरी, मका, तांदूळ, तूर, सोयाबीन, उडीद, मूग, चवळी, कापूस,टोमॅटो, कांदा इ.पिकांची नासधूस झाल्याने शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झालेले असणे, खरीप हंगामातील पीकांचे नुकसान झालेले असल्याने पीकविमा मिळावा याकरिता सुमारे ३७ लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी विमा कंपन्यांकडे १०७४ कोटी रुपयांच्या नुकसान भरपाईची मागणी केलेली असणे, मात्र नोव्हेंबर,२०२२ अखेर केवळ १०० कोटी रुपयांच्या जवळपास वाटप केलेले असणे, ३७ लाख विमा अर्जांपैकी केवळ १७ लाख अर्जांची नुकसानभरपाई रक्कम निश्चित केलेली असून उर्वरित सुमारे २० लाख अर्जांच्या नुकसानभरपाईची रक्कमच निश्चित केलेली नसल्याची गंभीर तथा धक्कादायक माहिती डिसेंबर, २०२२ च्या पहिल्या | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | आठवड्यात उघडकीस आलेली असणे, लाखो शेतकऱ्यांनी एक हजारापेक्षा जास्त रुपये पीकविम्यासाठी भरलेले असतांना शेतकऱ्यांना ५० रुपयांपासून दोनशे, तीनशे रुपये इतकी अत्यल्प रक्कम देऊन त्यांची थट्टाच केलेली असणे, विमा कंपन्या मात्र कोट्यावधी रुपयांचा नफा कमवित असणे, यासंदर्भात उच्चस्तरीय सखोल चौकशी करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासंदर्भात शासनाने योग्य ती पावले उचलावीत यासाठी लोकप्रतिनिधी, शेतकरी संघटनांनी दि.०९ डिसेंबर,२०२२ रोजी तसेच अलिकडील काळात मा.मुख्यमंत्री,मा.कृषिमंत्री यांचेकडे वारंवार मागणी केलेली असतांनाही, सदरबाबत आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, दि.१९ डिसेंबर,२०२२ पासून सुरू होणाऱ्या नागपूर येथील विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनकाळात तीव्र आंदोलन करण्यात येणार असणे, खरीप पिके हातची वाया गेल्याने आर्थिक अडचणींत सापडलेले शेतकरी आत्महत्या करण्याच्या मनःस्थितीत असतांनाही, सदरबाबत आवश्यक कार्यवाही करण्यास प्रशासनाचे हेतुपुरस्पर दुर्लक्ष होत असल्याने, सदर गंभीर प्रकरणी शासनाने वेळीच हस्तक्षेप करून तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **१८४.** | **४८१** | **श्री. सचिन अहिर वि.प.स.**<br>“ मराठी भाषा दिन किंवा मराठी राज्यभाषा दिन हा १ मे रोजी महाराष्ट्र भर साजरा केला जातो, १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली आणि मराठी भाषिकांचे राज्य अस्तित्वात आल्यामुळे हा दिवस मराठी राजभाषा दिन म्हणून सुद्धा साजरा केला जातो,` | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | मराठी भाषा गौरव दिन हा दरवर्षी २७ फेब्रुवारी रोजी कवि. कुसुमाग्रज यांचा जन्म दिवस म्हणून साजरा केला जातो, परंतू मराठी भाषा साजरा करीत असताना राज्यामध्ये मराठी भाषा भवनाची अद्यापी स्थापना करण्यात आलेली नसणे याबाबत मा. मुख्यमंत्र्यांना मागील अधिवेशनात तशी घोषणाही करून सुद्धा अद्यापी सुरू न होणे, ही शोकांतिका आहे, याबाबत मराठी राजभाषा विभाग त्वरित स्थापन करण्यास शासनाकडून होत असलेली दिरंगाई यामुळे जनमानसांमध्ये पसरलेले कमालीचे संतापाचे वातावरण याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया. ” | | |
| १८५. | २० | **श्री. अमोल मिटकरी,** श्री. विक्रम काळे,श्री. शशिकांत शिंदे,श्री. सतिश चव्हाण,श्री. कपिल पाटील, डॉ. सुधीर तांबे,श्री. जयंत आसगावकर,श्री. किरण सरनाईक,श्री. बाळाराम पाटील, श्री. किशोर दराडे, श्री. प्रसाद लाड,श्री. अरुण लाड,श्री. नागोराव गाणार **वि.प.स.**<br>“ राज्यातील २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शासकीय शाळा बंद करण्याचा निर्णय दि. १३/१०/२०२२ रोजी वा त्यासूमारास शासनाने जाहीर करणे, परिणामी राज्यातील १४ हजार ९८४ शाळा व त्यात शिक्षण घेत असलेल्या १ लाख ५० हजार विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा गहन प्रश्न निर्माण झालेला असणे, कमी पटसंख्येच्या नावाखाली राज्यातील वंचित व दुर्गम भागातील मुलामुलींचे शिक्षण संपुष्टात येण्याची भिती शिक्षण तज्ञांनी व्यक्त करणे, विशेषतः मुली शिक्षणापासून दुरावण्याची जास्त भिती व्यक्त करण्यात येत असणे, जिल्हा परिषदेच्या शाळेत गरीब व कष्टकरी पाल्यांचे मुले व मुली शिक्षण घेत असणे, शिक्षण घेत असल्यामुळे हे मुले-मुली शिक्षणापासून वंचित राहण्याची भिती व्यक्त होत असणे, शिक्षण हक्क कायद्यानुसार बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण उपलब्ध करून देण्याची तरतूद असतांना या शाळा बंद झाल्यास हा हक्क शिक्षणापासून गोरगरिब वंचित शेतकऱ्यांची मुले- मुली शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर जाऊन या विद्यार्थी-विद्यार्थीनींना बालमजुरी, बालविवाह इत्यादी | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

## विवरण क्रमांक २१–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | समस्या निर्माण होणार असल्यामुळे या शाळा बंद करू नयेत, अशी मागणी सर्वच स्तरातून होत असल्यामुळे या शाळा पुर्ववत सुरू ठेवण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ” | | |
| **१८६.** | **१६३** | **श्री. अभिजित वंजारी,** श्री. राजेश राठोड,डॉ. वजाहत मिर्झा,डॉ. सुधीर तांबे,डॉ. प्रज्ञा सातव, श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील,श्री. जयंत आसगावकर,श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप **वि.प.स.** “ अपंग एकात्म शिक्षण योजना प्राथमिक सेवा अंतर्गत सन २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या व त्यानंतर नियुक्त झालेल्या शिक्षकांना शिक्षकांचे वेतन संरक्षण, सेवासातत्य, वेतन फरक इत्यादी लाभ देण्यापासून वंचित असणे, राज्यातील १०५ शिक्षकांची सेवा सातत्याची फाईल गेल्या दोन वर्षापासून सचिव स्तरावर प्रलंबित असणे,त्यामुळे अनेक अपंग शिक्षकांच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण होणे, याच योजनेतील उर्वरित अनेक अपंग शिक्षकांना सेवा सातत्याचा लाभ मिळालेला असणे,परंतु या १०५ शिक्षकांना अजून किती प्रतिक्षा करावी लागणार आहे, असा प्रश्न सर्वसामान्य जनतेमध्ये असणे, परिणामी त्यांच्यात पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने चौकशी करून स्थानिक स्वराज्य शिक्षण संस्थेमध्ये समाविष्ट केलेल्या अपंग एकात्म शिक्षण योजनेतील प्राथमिक स्तरावरील शिक्षकांना तात्काळ सेवा सातत्याचा लाभ मिळवून देण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **१८७.** | **४००** | **श्री. विलास पोतनीस,** श्री. सुनिल शिंदे **वि.प.स.**<br>" राज्यातील एकही मुल शाळाबाह्य राहू नये, प्राथमिक शिक्षणापासून वंचित राहू नये याकरिता महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने दिनांक ११ ऑक्टोबर, २०११ रोजी बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणासाठी अधिसूचना काढणे, बालकांचा व सक्तीचा शिक्षणाचा हक्क मिळण्यासाठी सन २००९ अधिनियम कलम ८ व ९ च्या प्रयोजनार्थ राज्यशासन व स्थानिक प्राधिकरण यांची कर्तव्य निश्चित करणे, त्यानुसार शासन व स्थानिक प्राधिकरण दुर्गम क्षेत्रामध्ये राहणारी बालके, विकलांग बालके, वंचित गटातील बालके, समाजाच्या दुर्बल घटकातील बालके, शाळेत न जाणारी बालके, जी शाळा सोडून गेलेली आहेत अशी बालके, यासह क्षेत्रातील सर्व बालके निश्चित करण्यासाठी व त्यांच्याविषयी सांख्यिकीय माहिती मिळविण्यासाठी नियत दिनांकापासून एका वर्षाच्या आत आणि त्यानंतर प्रत्येक वर्षी सर्वेक्षण करण्यात येईल असे निश्चित करण्यात आलेले असणे, विशेषतः राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये पालघर जिल्ह्यातील डहाणू, पालघर, जव्हार, मोखाडा, तलासरी, वसई, विक्रमगड, वाडा या तालुक्यात सुमारे ६ ते १४ वयोगटातील राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने केलेल्या शाळाबाह्य मुलांच्या सर्वेक्षणातून एक हजाराहून अधिक गोरगरीब आदिवासी मुले शिक्षणापासून वंचित असल्याची धक्कादायक माहिती उघडकीस येणे, सर्वाधिक शाळाबाह्य मुले ही डहाणू तालुक्यातून आढळून येणे, शिक्षण विभागाने केलेल्या शाळाबाह्य मुलांच्या सर्व्हेक्षणातून आदिवासी कुटुंबातील गोरगरीब आदिवासी मुले स्थलांतरामुळे व इतर कारणांमुळे शिक्षणापासून वंचित राहिल्यामुळे आदिवासी शाळाबाह्य मुलांना विविध समस्यांना सामोरे जाऊन शिक्षणापासून वंचित राहिल्यामुळे त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे, अनेक आदिवासी मुला-मुलींना शिक्षण घेण्याची इच्छा असूनही शिक्षण घेऊ न शकणे, त्याचबरोबर आठवीतून नववीत गेलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | मिळत नसल्याने ती मुले पुढील शिक्षण घेऊ न शकणे, घरी असलेल्या किशोरवयीन अशा मुलींची चक्क लग्न लावण्यात आलेली असणे, तर काही मुले मोल-मजूरी तसेच नोकरी करून कुटुंबाला आर्थिक हातभार लावत असणे, अल्पवयात शिक्षणाअभावी लग्न झाली असल्याने मुलींच्या आरोग्याच्या समस्या उद्‌भवून तसेच कमी वयात माता बनल्याने त्या माता व बालकांमध्ये कुपोषणाचे प्रमाण वाढत जाणे, परिणामी शालेय शिक्षण विभागाच्या निर्णयामुळे संपूर्ण पालघर जिल्ह्यातील दुर्गम भागातील ग्रामीण भागातील खेड्यापाड्यातील गोरगरीब शाळाबाह्य मुले शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित राहणार असल्याने राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने तसेच महिला व बालविकास विभागाने माहे डिसेंबर, २०२२ अखेरपर्यंत राज्यातील शाळाबाह्य मुलांच्या सर्वेक्षणाचा अद्याप कोणताही कार्यक्रम आखला गेलेला नसल्याने राज्यातील शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण न झाल्यामुळे गरीब आदिवासी शिक्षणापासून वंचित राहण्याची आलेली पाळी, परिणामी आदिवासी जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ च्या कायद्याचा होत असलेला भंग थांबवून त्याची तातडीने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| **१८८.** | **४२२** | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.**<br>“ चिन्मया विद्यालय तारापूर, बोईसर (ता.जि. पालघर) या संस्थेच्या शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी व त्यांचे पालक यांच्या मुलभूत हक्क व अधिकार डावलून आर्थिक व मानसिक | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | शोषण शाळेचे व्यवस्थापन करीत असल्याचे निदर्शनास आले असणे, उक्त शाळेच्या व्यवस्थापनाने शासकीय परिपत्रकानुसार लॉक डाऊन काळात सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या वार्षिक शुल्कातील १५ टक्के देणे आवश्यक असतांना तसे न करता वार्षिक शुल्क न भरलेल्या विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी ग्रंथालयात बंद करून संपूर्ण वार्षिक शुल्क भरणा करण्यासाठी पालक वर्गावर दबाव निर्माण केला असणे, याबाबत पालक वर्गाकडून पोलीस स्टेशन, बोईसर व मुख्य कार्यकारी अधिकारी, पालघर जिल्हापरिषद यांच्याकडे लेखी स्वरूपात तक्रार दिली असूनही अद्यापी कोणती कारवाई केलेली नसणे, तसेच शासकीय अध्यादेशानुसार शिक्षण विभाग पालघर जिल्हा परिषदेच्या अधिकारी वर्गाच्या उपस्थितीत नव्याने शाळा व्यवस्थापन समितीची स्थापना करणे आवश्यक असणे, तसेच शाळा व्यवस्थापन गत काही वर्षांपासून शासनाच्या परिपत्रकाचे व निर्देशाचे उल्लंघन करून स्वतः च्या सोईचे व शाळा प्रशासनास विरोध न करणाऱ्या पालकांना पालक व्यवस्थापन समितीवर नियमानुसार कोणतीही पालक सभा न घेता परस्पर नियुक्त करीत असणे, परिणामी उक्त शाळेत शिक्षण घेणाऱ्या पालक वर्गामध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, सदरहु प्रकरणी चौकशी करून व्यवस्थापनावर कारवाई करण्याच्या दृष्टीने व कोरोना कालावधीतील वार्षिक शुल्कातील १५ टक्के रक्कम आगामी वर्षाच्या वार्षिक शुल्कात कमी करून पालक व्यवस्थापन समितीवर नियमानुसार पालकांची नियुक्ती करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| १८९. | ४४३ | **श्री. कपिल पाटील वि.प.स.**<br>“ राज्यातील सरकारी-निमसरकारी आणि खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक शाळा आणि ज्युनियर आणि सीनियर कॉलेजातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची हजारो पदे रिक्त असणे, रात्रशाळा टिकविण्यासाठी रात्रशाळेतील दुबार पद्धतीनुसार १७ मे २०१७पूर्वीच्या | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | कार्यरत सर्व मुख्याध्यापक, शिक्षक/शिक्षकेतर यांना पुनर्स्थापित करून कार्यरत शिक्षकांची थकबाकी देण्याची आवश्यकता असणे, रात्रशाळांच्या धोरण समितीवर १५० रात्रशाळा असलेल्या मुंबईतील लोकप्रतिनिधी तसेच महाराष्ट्र राज्य रात्रप्रशाला मुख्याध्यापक संघ व संस्थाचालक यांच्या प्रतिनिधींना स्थान नसणे, विषय शिक्षक उपलब्ध नसल्यामुळे तातडीने शिक्षक भरतीला मान्यता देण्याची आवश्यकता असणे, अप्पर प्रायमरी आणि माध्यमिक शाळांना आरटीई आणि राज्य अधिनियमानुसार विषय शिक्षक व कला, क्रीडा शिक्षकांसह संचमान्यता मंजूर करण्याची गरज असणे, परिणामी लक्षावधी विज्ञान, गणित, इंग्रजी, समाजशास्त्र या विषयांचे अतोनात नुकसान होणे, मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अनुकंपा तत्वावरील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्यात आलेले नसणे, व्यपगत करण्यात आलेली शिपाई व शिक्षकेतर पदे तात्काळ पुनर्स्थापित करण्यात न येणे, अतिथी निदेशक आणि कंत्राटी शिक्षक नावाने शिक्षकांचे शोषण करणे, आरटीई कायद्यानुसार विनाअनुदानित इंग्रजी माध्यमाच्या शाळांना शिक्षण फी प्रतिपूर्ती करण्याची आवश्यकता असणे, नागपूर खंडपीठाच्या आदेशानुसार वेतनेतर अनुदान सातव्या आयोगानुसार देण्यात यावे, शाळा, ज्युनियर व सिनीयर कॉलेजमधील कॉम्पुटर सायन्स आणि बीएससी आयटी हे विषय अनुदानित करण्यात न येणे, समग्र शिक्षा अभियान समावेशित शिक्षणांतर्गत मोबाईल टीचर यांना सेवेत सामावून घेण्यात न येणे, राज्यातील प्राथमिक /माध्यमिक शिक्षक, शिक्षकेतर आणि सेवानिवृत्तांना सातव्या वेतन आयोगाचा पहिला, दुसरा हप्ता मिळालेला नसणे, डीसीपीएस/एनपीएस धारक कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाची थकबाकी मिळत | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | नसणे, यामुळे महाराष्ट्राच्या शैक्षणिक दर्जावर परिणाम होणे, बेरोजगार डी.एड./बी.एड. धारकांमध्ये प्रचंड असंतोष असणे, यामुळे पसरलेला असंतोष आणि संताप. याबाबत शासनाची भूमिका आणि करावयाची कार्यवाही. ” | | |
| १९०. | ४९६ | **श्री. विक्रम काळे वि.प.स.** <br> “ केंद्र सरकारने मुलींच्या शिक्षणासाठी शिक्षणापासून वंचित राहिलेल्या व शाळा अर्धवट सोडून निरक्षरतेच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या मुलींचे किमान ८ वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण व्हावे याकरिता शैक्षणिक वर्ष २००६ पासून कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय ही योजना राज्यात सुरू करण्यात येणे, या योजनेअंतर्गत राज्यात ४३ विद्यालय सुरू करण्यात आलेली असून याच योजनेचा दुसरा टप्पा इ. ९ ते १२ वी करिता ४३ वसतिगृह हे राज्यात सुरू करण्यात येणे, सदरील शाळेत मुख्याध्यापिका, पूर्ववेळ शिक्षक, अर्धवेळ शिक्षक, लेखापाल, शिपाई, चौकीदार, स्वयंपाकी, सहायक स्वयंपाकी अशी विविध पदे कंत्राटी स्वरूपात मानधन तत्वावार २००८ पासून भरण्यात आलेली असणे, तथापि गेल्या १५ वर्षापासून सदरील पदांवर कार्यरत कर्मचारी हे अत्यंत तुटपुंज्या मानधनावर सेवा देत असणे त्याकरिता KGBV च्या सर्व पदांना नियमित करण्यात येवून वेतनश्रेणी लागू व्हावी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येणे, तसेच राज्यातील सर्व कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सेवेत कायम करून वेतनश्रेणी लागू करावी याकरिता जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयासमारे धरणे उपोषण आंदोलन करण्यात येणे, तथापि अद्याप ii कारवाई करण्यात आलेली नसणे, शालेय शिक्षण विभाग व क्रिडा विभाग ने याच योजनेचा दुसरा टप्पा म्हणून इयत्ता ९ ते १२ वी करीता ४३ निवासी वसतिगृह सुरू करून या वसतिगृहासाठी गृहप्रमुख, स्वयंपाकी, चौकीदार ही पदे मानधन तत्वावर भरण्यात येवून कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात प्रवेशित मुलींच्या इयत्ता १२ वी पर्यंतचे शिक्षणाची सोय करण्यात येणे, | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | केंद्र शासनाचे शिक्षण विभागांतर्गत शिक्षणा विभाग नवी दिल्ली यांनी प्रकल्प संचालक सम्रग शिक्षा महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांनी दि. १५ जून, २०२१ अन्वये KGBV शाळेतील शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना कायम करण्याची जबाबदारी ही राज्य शासनाची आहे त्या अनुषंगाने राज्य शासनाने नियम व अटीच्या अधिन राहून कार्यवाही करावी, व संदर्भातील माहिती केंद्र शासनाच्या शिक्षण विभागास कळवावी असे केंद्र शासनाने कळविण्यात येणे, गेल्य १५ ते १६ वर्षापासून कंत्राटी तत्वावर खूप कमी मानधान आपले कर्तव्य पार पाडत आहे तेव्हा शासनाकडून न्याय मिळावाअशी वारंवार मागणी करण्यात येणे, परंतु कोणतीही कार्यवाही न होणे, त्यामुळे यांचेवर आलेली उपासमारीची पाळी, परिणामी त्यांचेमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व शासनाप्रति चिडीची भावना, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवही व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **१९१.** | **५३४** | **डॉ. सुधीर तांबे वि.प.स.** “ राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक भरती वर्षानुवर्षे बंद असल्यामुळे या शाळांमधील विद्यार्थ्याच्या शैक्षणिक गुणवत्तेवर होत असलेला विपरीत परिणाम, राज्यातील शाळांचे वेतनेत्तर अनुदान बंद असणे, त्यामुळे या शाळांमध्ये भौतिक सुविधांचा अभाव असणे, तसेच या शाळांमधील संचमान्यता दुरुस्तीचे प्रस्ताव प्रलंबित असणे, ऑनलाईन वेतनवाढीचे शालार्थ आय.डी अनेक प्रस्ताव प्रलंबित असणे, त्यामुळे येथील शिक्षक वेतनापासून वंचित असणे, यामुळे या शिक्षकांना कौटूंबिक अडचणी निर्माण होत असणे, , उपरोक्त बाबींवर शासनाने निर्णय घ्यावा यासाठी येथील शिक्षक सातत्याने | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | शासनासोबत संवाद- संघर्ष करीत असणे, परंतू याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष परिणामी राज्यातील शैक्षणिक क्षेत्रात पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **१९२.** | **५४१** | **श्री. नागोराव गाणार,श्री.** प्रविण दरेकर,श्री. प्रसाद लाड,श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री. रमेशदादा पाटील,श्री. रमेश कराड,श्री. रामदास आंबटकर,श्री. प्रवीण दटके,श्रीमती उमा खापरे, श्री. चंद्रशेखर बावनकुळे,ॲड. निरंजन डावखरे **वि.प.स.**<br>“ महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील मराठी शाळेच्या मान्यतेचे प्रस्ताव राज्य शासनाकडे पडून असून शाळा सुरू झाल्यावर या शाळांना पाच वर्षानंतर अनुदान द्यावे लागेल या भीतीपोटी शालेय शिक्षण विभागाने हे प्रस्ताव रद्द ठरवले असणे, या भागातील मराठी मातृभाषा असलेल्या विद्यार्थ्यांना याची शिक्षा भोगावे लागत असून प्राथमिक शिक्षण मराठी भाषेत केल्यावर माध्यमिक शाळेचा पर्याय नसल्याने विद्यार्थ्यांना कन्नड माध्यमाच्या शाळेत प्रवेश घ्यावा लागत असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात व त्यासुमारस निदर्शनास येणे, एप्रिल, २००८ ला राज्य शासनाने कायम अनुदानित तत्त्वावर शाळांकडून प्रस्ताव मागितले होते त्यासाठी संस्थेने दहा हजार रुपये ना परतावा शुल्क भरायचे होते त्यावेळेस सीमा भागासह राज्याच्या इतर भागातून ११९१ प्रस्ताव सादर करण्यात आले त्याद्वारे प्रति प्रस्ताव दहा हजार रुपये असे सुमारे एक कोटी १९ लाख रुपये सरकारकडे आधी जमा केले असणे, मात्र २०१२ -१३ मध्ये आणलेल्या बृहत आराखड्यामुळे या प्रस्तावांना मान्यता देणे दूरच शालेय शिक्षण विभागाने मराठी शाळांची गरज नाही असे सांगून हे प्रस्ताव रद्द केले असणे, राज्यात एकही मराठी शाळेची गरज नाही असे ठामपणे सांगणाऱ्या सरकारने आधी ग्रामीण भागात जाऊन परिस्थितीचे सर्वेक्षण करावे आम्ही मागील बारा वर्षापासून सीमा भागातील मराठी शाळा तातडीने सुरू करून विशेष अनुदान | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | मंजूर करावे मराठी भाषेतील शिक्षकांना प्रोत्साहन देण्याची मागणी सीमवर्ती भागात होत असताना सीमा भागातील मराठी शाळांचे प्रस्ताव राज्य सरकारच रद्द करीत असल्याने यासारखे दुर्दैव नाही अशी प्रतिक्रिया मराठी भाषेतील सीमा भागात होत असणे , त्यासाठी सीमा भागात कायम अनुदानित तत्वावर मराठी शाळा देण्याचे धोरण राबवून मराठी भाषेतील शिक्षणाला न्याय द्यावा अशी मागणी येथील ग्रामस्थ आणि लोकप्रतींनिधी करीत असणे, सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील साळमळगेवाडी, तील्ल्याळ, सिद्धनाथ, दरीकोनुर, गुगुवाड, तिकोंडी, पांढरेवाडी, करेवाडी, सुसलाद, सोनलगी, भीवर्गी, धुळकरवाडी, खडनाळ, मोटेवाडी ,सिंदूर, खोजनवाडी, जाडरबोबलाद, येळदरी, पंडोझारी, वज्रवाड, हळ्ळी या ठिकाणी मराठी शाळा व्हाव्यात अशी सीमा भागातील नागरिकांची मागणी असणे, राज्याच्या सीमा भागातील गावनिहाय असलेल्या शाळांच्या अर्जाची संख्या एकूण गावे छत्तीस शाळेसाठी आलेले अर्ज २५३ नवीन मराठी शाळांचे अर्ज पहिले वर्षे १४४ ठिकाणी ६८७ आलेले अर्जज दुसरे वर्ष ७९ ठिकाणी २५१ आलेले अर्ज २००८ च्या जीआर नुसार कायम अनुदान तत्वावर प्रस्ताव मागिवले १३ महिन्यानंतर २० जुलै २००९ च्या जीआर नुसार यातील केवळ मराठी माध्यम शाळेच्या प्रस्ताव रद्द करणे, यामुळे या शाळांच्या मान्यता साठी बृहतआराखडा तयार करण्याचे बरेचसे काम २००९ ते १७ या काळात झाले मात्र मार्च २०१७ च्या जीआर नुसार हा बृहतआराखडाच रद्द करण्यात आल्याने अनेक संस्थांनी कोट्यावधी रुपयाची प्रक्रिया शुल्क भरून दिलेले प्रस्ताव प्रलंबित असून या संस्थांना या प्रस्तावाची परतफेड ही | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | शासनाने दिलेली नसणे, त्यामुळे सीमा भागातील नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झालेला असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना “ | | |
| **१९३.** | ५४६ | **श्री. सचिन अहिर वि.प.स.**<br>“ मुंबई महापालिकेच्या खाजगी अनुदानित प्राथमिक शाळेतील सुमारे चार हजार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सातव्या वेतन आयोगाच्या लाभापासून वंचित असल्याचे नुकतेच माहे डिसेंबर,२०२२ मध्ये उघडकीस येणे, पालिका प्रशासनाने या शिक्षकांना सातव्या वेतन आयोगाचा विनाविलंब लाभ द्यावा, अशी मागणी मुंबई महापालिका शिक्षक-शिक्षकेतर सेनेचे अध्यक्ष यांनी मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केलेली असणे, सन २०१६ पासून शासकीय कर्मचाऱ्यांसाठी सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला परंतु मुंबई महापालिका प्रशासनाने नोव्हेंबर, २०१९ पासून कर्मचाऱ्यांना वेतन आयोग लागू केला असणे परंतु अद्याप कर्मचारी लाभापासून वंचित असणे, परिणामी कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातवरण, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |
| **१९४.** | ५५७ | **श्री. नरेंद्र दराडे,श्री.** किशोर दराडे **वि.प.स.**<br>“ वेतन पथक अधीक्षक व भविष्य निर्वाह निधी पथक, माध्यमिक विभाग अहमदनगर,यांनी २०२० पासून आत्तापर्यंत कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार करून शिक्षकांची आर्थिक व मानसिक पिळवणूक केलेली असणे, राज्यात कोठेही फरक बिला बाबत निधी नसताना वेतन पथक यांनी online स्क्रोल पगार बिलामधून फरक बिले काढलेली असणे , फरक बिल काढण्यासाठी १० टक्के प्रमाणे रक्कम रोख स्वरूपात घेतल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात दाखल झालेल्या असणे, सन २०२० पासून आतापर्यंत सुमारे १८ कोटी रुपयांची अनियमित बिले काढले आहेत व या १८ कोटी रुपयांचे १० टक्के प्रमाणे वेतन पथक अधीक्षक यांनी | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | रोख स्वरूपात पैसे घेतलेले असणे,सदर अनियमित बिला बाबत संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक ,पुणे यांच्याकडे वेतन पथक अधीक्षक अहमदनगर यांची चौकशी सुरू असून,त्या बाबत त्यांच्यावर अजून कोणतीही कारवाई झालेली नसणे, वेतन पथक अधीक्षक माध्यमिक अहमदनगर यांच्या कार्यालयामार्फत शिक्षकांचे शालार्थ ड्राफ्ट मंजूर करण्यासाठी सुमारे १५००० ते २५००० रुपये घेतल्याच्या तक्रारीही शासनाकडे सादर झालेल्या असणे, माहे ऑगस्ट २०२० पासून वेतन पथक अधीक्षक अहमदनगर यांनी शेकडो कर्मचाऱ्यांचे शालार्थ ड्राफ्ट मंजूर करून घेतलेले असणे, शेकडो कर्मचाऱ्यांचे १५००० ते २५००० रुपये प्रमाणे पैसे घेऊन हे ड्राफ्ट मंजूर करून दिलेले असणे, वास्तविक ड्राफ्ट मंजूर करणे हे संबंधित कार्यालयाचे कर्तव्याचे काम असून या कर्तव्याच्या कामासाठी शिक्षकांची आर्थिक पिळवणूक करण्यासाठी पैसे घेतल्याच्या तक्रारीही शासनाकडे सादर झालेल्या असणे, याबाबत मी स्वतः वेतन पथक अधीक्षक अहमदनगर यांना सन २०२० ते २०२२ या कालावधीतील शालार्थ आयडी संदर्भात ऑनलाईन ड्राफ्ट व पगार बिलाचे स्क्रोलच्या छायांकित प्रती मिळण्याचे निवेदन दिले असता त्यांनी अजून कोणतीही कारवाई केलेली नसणे, तसेच माझ्या पत्रावर कार्यवाही करणे बाबत शिक्षणाधिकारी माध्यमिक अहमदनगर यांनी वेतन पथक अधीक्षक माध्यमिक अहमदनगर यांना पत्रव्यवहार केला असता त्यांच्या पत्राला केराची टोपली दाखवलेली असणे, अहमदनगर वेतन पथक अधीक्षक माध्यमिक यांनी सन २०२० पासून कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार करून शिक्षकांची आर्थिक पिळवणूक केलेली असणे,वेतन पथक अधीक्षक अहमदनगर हे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मेडिकल बिल, रजा रोखीकरण बिल, | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | शिक्षण सेवक बिल मंजूर करणे अशा कामासाठी द्व१० टक्के प्रमाणे वसुली करत असणे, त्यामुळे अनेक संघटनांनी यांच्या विरोधात आंदोलने केलेली असणे, परंतु याबाबत शिक्षणाधिकारी,शिक्षण संचालक व शिक्षण आयुक्त या कार्यालयाने कोणतीही कारवाई केलेली नसणे, तरी वेतन पथक अधीक्षक माध्यमिक, अहमदनगर यांनी केलेल्या भ्रष्टाचाराची सकोल चौकशी करून संभंधित सर्व दोषींवर तात्काळ करून त्यांना निलंबित करण्यात यावे यासाठी शासनाने कारवायांची कार्यवाही व उपाययोजना. ” | | |
| **१९५.** | **३२०** | **डॉ. सुधीर तांबे,श्री.** राजेश राठोड,श्री. अभिजित वंजारी,श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री. जयंत आसगावकर,डॉ. वजाहत मिर्झा **वि.प.स.**<br>“ राज्यात शैक्षणिक वर्ष २०१९ - २० पासून अखिल भारतीय तंत्रनिकेतन परिषद, नवी दिल्ली ने काही विनाअनुदानित तंत्रनिकेतन मध्ये मॅकाट्रॉनिक हा कोर्स सुरू करण्यास मंजुरी दिलेली असणे, सदरची मंजुरी दिल्यानंतर महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय प्रसिद्ध करून महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांनी संलग्न करण्यास मान्यता दिलेली असणे, मागासवर्गीय विद्यार्थ्याला शासनाच्या प्रचलित धोरणानुसार व निर्णयानुसार फ्री शिप व स्कॉलरशिप मिळत असते परंतु विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय व विशेष मागास प्रवर्ग विद्यार्थ्यांचे महाडीबीटी पोर्टलवर मॅककाटॉनिक या कोर्सचे मॅपिंग होणे गरजेचे असताना आजपर्यंत झालेले नसल्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थी हे फ्री शिप व कॉलर स्कॉलरशिप पासून वंचित असणे, त्यामुळे त्यांच्यात पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून विमुक्त व भटक्या जमाती,इतर मागासवर्गीय व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे महाडीबीटी पोर्टलवर मॅकाटॉनिक या कोर्सचे मॅपिंग करण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत,शासनाची प्रतिक्रिया. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| **१९६.** | **३८४** | [illegible] राम शिंदे **वि.प.स.**<br>“ धनगर समाजाला आरक्षण मिळावे व ते कायद्याच्या कसोटीवर टिकावे याबाबत अभ्यास करण्याचे काम “ टिस “ या संस्थेला देण्यात आले असून त्यानुषंगाने सदर संस्थेने शासनास अहवाल सादर केला असणे , धनगर समाजच्या अनुसूचित जातीच्या निकषबाबत अद्यापही मा. महाधिवक्ता यांचे अभिप्राय प्राप्त झालेले नसून आरक्षणाचा निर्णय होईपर्यंत आदिवासी विकास विभागामार्फत सुरू असलेल्या अनुसूचित जातीसाठीच्या योजनांचा लाभ धनगर समाजातील बांधवाना लागू करून दर वर्षी १ हजार कोटी ची तरतूत या योजनासाठी करण्याचा निर्णया युती सरकार च्या काळात घेण्यात येणे, परंतु या पैकी केवळ १३ योजना लागू करण्याचा शासन निर्णय दि.०७ ऑगस्ट, २०१९ अन्वये, निर्गमित करण्यात येणे, सन २०१९-२०२० मध्ये आदिवासी समाजाच्या विकासासाठी ज्या योजना राबविल्या जातात त्याच धर्तीवर धनगर समाजाच्या विकासासाठी २२ योजना राबविण्यासाठी रुपये १००० कोटी एवढा निधी घोषित करण्यात आला होता. त्यानुषंगाने २२२५६८२१ व २२२५६८३७ या दोन लेखा शिर्षाखालील प्रत्येकी २५० कोटी प्रमाणे रुपये ५०० कोटी अशी तरतूद केलेली असणे, सदर योजनांसाठी सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षासाठी ५०० कोटी, सन २०२०-२०२१ या वर्षासाठी रुपये ५१५०.०४ लक्ष एवढी अर्थसंकल्पात तरतूद केली असली तरीही उक्त तरतूदीपैकी ४९.५० लक्ष इतका निधी वितरित केला तसेच सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात रुपये ८५ कोटी ३ हजार इतकी तरतूद करूनही पूर्ण निधी अद्याप वितरीत करण्यात आलेला नसून धनगर समाजास आदिवासी समाजाप्रमाणे देण्यात येणाऱ्या २२ योजनांच्या | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | लाभापासून वंचित रहावे लागत असणे,तर दुसऱ्या बाजूला केंद्र सरकारने पाच राज्यातील घटना दुरुस्ती करून आरक्षण लागू केलेले असणे, त्याच धर्तीवर महाराष्ट्रातील धनगर व धनगड ही जात एकच असूनही एसटी आरक्षण लागू होण्यासाठी दुरुस्ती का होत नाही असा संतप्त सवाल राज्यातील धनगर समाजाकडून व्यक्त होत असणे, त्यामुळे धनगर समाजास आरक्षण देण्याबाबत आपल्या राज्य सरकार ने केंद्राकडे शिफारस करावी तसेच आरक्षण लागू होईपर्यंत आदिवासी समाजाप्रमाणे देण्यात येणाऱ्या २२ योजनांचा लाभ धनगर समाजास मिळणेबाबत तातडीने कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **१९७.** | **४५५** | **श्री. बाळाराम पाटील,** डॉ. सुधीर तांबे,श्री. किशोर दराडे,श्री. विक्रम काळे **वि.प.स.**<br>“ ओबीसी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधेत वाढ करून स्पर्धेत सक्षम करण्यासाठी शासनाकडून वसतिगृहे उभारणार असल्याचे निर्णय जाहीर करूनन वसतिगृह प्रत्यक्षात निर्माण केले नसल्याची बाब निदर्शनास येणे, ओबीसी विद्यार्थ्यांचे वसतिगृह केवळ घोषणांमध्ये अडकत असल्याने ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांमध्ये संताप वाढला असणे,महाराष्ट्र विधान मंडळाच्या इतर मागासवर्ग कल्याण समितीच्या ऑक्टोबर, २०१५ मधील पुणे दौऱ्यात झालेल्या बैठकीत जिल्हास्तरावर मागास प्रवर्गातील मुला-मुलींसाठी नवे शासकीय वसतिगृह सुरू करण्याची सूचना राज्य शासनास करण्यात येणे, यास दि. १५ जानेवारी २०१९ रोजी मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात येणे, दि.१६ मे १९८४ रोजीच्या शासन निर्णयानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शासकीय वसतिगृहांमध्ये आर्थिकदृष्ट्या मागास आणि इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी २० टक्के जागा राखीव ठेवण्यात येत असणे, दि.३० जुलै २०१४ रोजीच्या परिपत्रकात अनुसूचित जातीसाठी ८० टक्के, विमुक्त जाती व भटक्या जमातींसाठी दहा टक्के आणि इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गासाठी दहा टक्के आरक्षण वसतिगृहांमध्ये दिले गेले | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१–**पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | असणे,इतर मागासवर्गीयांचे स्वतंत्र कल्याण मंत्रालय स्थापन झाल्यानंतर २१ डिसेंबर २०१८च्या शासन निर्णयानुसार समाजकल्याण विभागाच्या सर्व वसतिगृहांमध्ये ८० टक्के अनुसूचित जातीचे विद्यार्थी, तीन टक्के अनुसूचित जमातीचे, पाच टक्के विमुक्त जाती व भटक्या जमातीचे, पाच टक्के आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील व इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थी, दोन टक्के विशेष मागास प्रवर्गाचे, तीन टक्के दिव्यांग तर दोन टक्के अनाथ विद्यार्थी असे वर्गीकरण करण्यात आले. पण, इतर मागासर्गीय समाजातील विद्यार्थी या वसतिगृहातील प्रवेशापासून वंचित असणे,यास्तव महाज्योती अथवा राज्य शासनाच्या वतीने राज्यातील ओबीसी विद्यार्थ्यांकरिता तात्काळ वसतिगृह सुरू करणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणेबाबत [illegible] ” | | |
| **१९८.** | **५१७** | **श्री. शशिकांत शिंदे वि.प.स.**<br>“ मा.उच्च न्यायालयाने आदेश देऊनही इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या राज्यात ९७६ आश्रमशाळा सुरू असून तेथील वसतिगृह अधिक्षकांना ग्रेड पे व इतर लाभ देण्याची राज्यातील वसतिगृह अधिक्षकांनी शासनाकडे वारंवार विनंती करून सुद्धा अद्यापही त्यांना वाढीव ग्रेड पे देण्यात आलेला नसणे, यासंदर्भात मा. उच्च न्यायालयात पिटीशन दाखल केलेले असता मा.उच्च न्यायालयाने या संदर्भात या वसतिगृह अधिक्षकांना वाढीव ग्रेड पे ४२०० देण्याबाबत आदेश देऊन सुद्धा शासनाचे त्याकडे होणारे दुर्लक्ष, २०१७ मध्ये शासनाच्या विधी व न्याय विभागाने यांच्या बाजूने निर्णय देऊन आदिवासी विभागातील आश्रमशाळा अधिक्षकांना वाढीव ग्रेड पे देण्यात येत असणे, परंतु आदिवासी विकास विभाग व इतर | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | मागास बहुजन कल्याण विभागातील वसतिगृह अधिक्षकांच्या कामाचे स्वरूप एकच असतांना इतर मागास बहुजन कल्याण विभागातील आश्रमशाळा अधिकांना ग्रेड पे देण्यात येत नसल्यामुळे त्यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष, इतर मागास बहुजन कल्याण विभागातील १५० आश्रमशाळा अधिक्षकांना ४२०० ग्रेड पे मंजूर करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना. ” | | |
| **१९९.** | **५८०** | **श्री. प्रवीण दटके वि.प.स.**<br>“ महाज्योती नागपूर या संस्थेने २० हजार टॅब च्या निविदा प्रक्रियेमध्ये प्रकाशित केलेल्या टॅबचे स्पेसिफिकेशन हे एका विशिष्ट कंपनीला पुरवठा आदेश देण्याचे उद्दिष्ट ठेवून, एका विशिष्ट कंपनीच्या उत्पादन स्पेसिफिकेशनचा कॅटलॉग तयार करून प्रकाशित केली असल्याचे दिसून येणे , दि.२४ मे, २०२२ गव्हर्मेंट मार्केट जेईएम GeM या संकेतस्थळावर महाज्योती संस्था नागपूर यांनी जेम बीड (GeM Bid Number/२०२ २/ ए २१६३ ९०७) प्रकाशित केलेली असणे, तंत्रज्ञान संचालनालय DIT यांनी मंजूर केलेल्या प्रकाशनानुसार प्रकाशित करण्यात आलेली नसणे, एका विशिष्ट कंपनीला लाभधारक ठरेल अशा स्पेसिफिकेशनची निविदा प्रकाशित करण्यात आलेली असणे, स्पेसिफिकेशनमध्ये फेरबदल न करता करताना माहिती तंत्रज्ञान संचालनालय यांनी दिलेल्या सल्ल्याची उल्लंघन करण्यात आलेले असणे, एका कंपनीने अनामत रकमेची अनामत रक्कम भरलेली नसताना महाज्योतीने या संस्थांना पात्र करून निविदा प्रक्रिया पूर्ण करून पुरवठा आदेश दिल्याचे दिसून येणे, सदर प्रक्रियेत महाज्योती संस्था आणि पुरवठा आदेश दिलेली कंपनी यांचे एकमेकांशी संगनमत झाल्याची तीव्र शक्यता असणे, याकामी चौकशी होणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

**विवरण क्रमांक २१**—समाप्त

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **२००.** | **२** | **श्री. गोपिचंद पडळकर वि.प.स.**<br>" राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी मानधन वाढ आणि शासकीय सेवेचा दर्जा मिळावा व अन्य मागण्यांसाठी आझाद मैदान मुंबई येथे माहे ऑक्टोबर २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात व त्या सुमारास धरणे आंदोलन केले असल्याची बाब निदर्शनास येणे,अंगणवाडी कर्मचाऱ्यांना सेवा समाप्तीनंतर अर्धी मानधन पेन्शन म्हणून देण्यात यावे, अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्तीच्या रकमेत तीन पट वाढ करण्यात यावी, कर्मचाऱ्यांना आठ तास पूर्ण वेळ काम देऊन वेतन लागू करावे, समान किमान कार्यक्रमानुसार मानधनाच्या रमेकत वाढ करावी, किमान वेतन श्रेणीतील कायद्याप्रमाणे अंगणवाडी कर्मचाऱ्यांना १८ हजार रुपये मानधन दर महिन्यात देण्यात यावे, मिनी अंगणवाडी सेविका कर्मचाऱ्यांना इतर अंगणवाडी सेविका मदतनीस यांच्याप्रमाणे रिक्त पदी नेमणूक करावी या व अन्य मागण्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी शासनाकडे केलेल्या असणे, सदरहू मागाण्यांच्या अनुषंगाने शासनाने उपाययोजना करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. " | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |
| **२०१.** | **२३९** | **ॲड. निरंजन डावखरे,श्री.** प्रविण दरेकर,श्री. प्रसाद लाड,श्री. रमेशदादा पाटील,श्री. नागोराव गाणार, श्री. चंद्रशेखर बावनकुळे **वि.प.स.**<br>" पुणे जिल्ह्यातील कार्ला येथील श्री एकविरा मंदिरात दर्शनासाठी राज्यभरातून येणाऱ्या वयोवृद्ध नागरिकांना त्रास सहन करावा लागणे, या ठिकाणी पोचण्यासाठी रोप वे बसविण्याची आवश्यकता असणे, त्याचबरोबर या ठिकाणी येणाऱ्या लाखो भक्तांच्या सुविधांसाठी कार्ला गडाचा विकास करणे गरजेचे असणे, या ठिकाणच्या रोप वे बरोबरच विकासासाठी शासनाने | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | भरीव तरतूद करण्याची गरज, या संदर्भात जून २०२१ मध्ये राज्य पर्यटन विभाग आणि इंडियन पोर्ट रेल आणि रोप वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला असणे, मात्र अजूनही काम सुरू झालेले नसणे, या कामास स्थगिती मिळाल्याचे निदर्शनास येणे, यावर शासनाने तात्काळ निर्णय घेऊन स्थगिती उठविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| **२०२.** | **३३५** | **श्री. किरण सरनाईक वि.प.स.**<br>“ राज्यात कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय अंतर्गत राज्याच्या शासकीय आय.टी.आय. मधील निदेशक पदाची भरती करण्यात येणार असणे, याबाबत संचालनालयाने पदभरती संदर्भात संचालनालयाच्या संकेतस्थळावर दिनांक १७ ऑगस्ट २०२२ रोजी पदभरती संदर्भात जाहिरात प्रदर्शित केलेली असणे,सध्या कार्यरत असलेल्या तासिका तत्त्वावरील कर्मचाऱ्यांना अंधारात ठेवून शासन सदर पदभरती करीत असून तासिका तत्त्वावरील कर्मचाऱ्यांना डावलण्याचा प्रयत्न करीत असणे, सदर पद भरतीमुळे सध्या कार्यरत अनुभवी तासिका निदेशकांना आपली नोकरी गमवावी लागून निदेशकांवर बेरोजगारी व उपासमारीची वेळ येणार असणे, यापूर्वीही सदर विभागाने अनेक वेळा पदभरती केलेली असणे, त्यात देखील तासिका शिल्प निदेशक यांना वेळोवेळी डावण्यात आलेले असणे, यावेळी देखील तासिका शिल्प निदेशकांचा कोणताही विचार या पदभरती मध्ये केलेल्या नसणे, परिणामी तासिका निदेशकांमध्ये शासनाप्रती चिडीची व संतापाची भावना निर्माण झालेली असणे, सदर विभागामार्फत करण्यात येणाऱ्या भरतीमध्ये प्रामुख्याने तासिका तत्त्वावर कार्यरत असलेल्या शिल्प निदेशकांचा प्रामुख्याने विचार करण्यात यावा अशी मागणी सातत्याने होत असणे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | ३० डिसेंबर, २०२२ | चर्चा झाली नाही |

## विवरण क्रमांक २२

सन २०२२ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०२ अन्वये अशासकीय ठराव

(१) आलेल्या सूचनांची संख्या - ८७

(२) स्वीकृत झालेल्या सूचनांची संख्या - ८२

(३) चर्चा झालेल्या सूचनांची संख्या - –

| अ.क्र. | सदस्यांचे नांव व विषय | ज्या तारखेस सूचना सभागृहात घेतली ती तारीख | शेरा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | **(मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजीच्या बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार खालील ठराव दाखविण्यात आले आहेत) —** | | |
| **१.** | **श्री. सुरेश धस, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ७२—** “ राज्यातील अनुसूचित जमातीच्या जात पडताळणी समित्यांनी दिलेल्या निर्णयाला फक्त उच्च न्यायालयातच अपिल करता येत असल्याने अनेक प्रकरणे निर्णय देताना हेतुपुरस्पर, पुर्वग्रह दूषितपणे जाणीवपूर्वक विरोधात दिले गेल्याचे मा. उच्च न्यायालयात व मा.सर्वोच्च न्यायालयात वारंवार सिध्द होत असून अनेक प्रकरणी जात पडताळणी समित्यांना लाखांवर दंड, समज व निर्णय समितीच बरखास्त केल्याचे मा.उच्च न्यायालयाने/ मा.सर्वोच्च न्यायालयाचे शास्ती म्हणून आहे. अर्थपूर्ण तडजोडीमुळे तसेच राजकीय दबावाखाली येवून येथील निर्णय मोठ्या प्रमाणात बदलत असल्याचे निदर्शनास येत असल्याने संपूर्ण आदिवासी समाजात जात पडताळणी समितीचे कामकाज पक्षपातीपणे होत असल्याचा जनक्षोभ मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेला आहे. खरा लाभार्थी वैधता प्रमाणपत्रापासून वंचित राहू नये म्हणून राज्य शासनाने राज्यातील अनुसूचित जमातीच्या जातपडताळणी समित्यांवर न्यायाधिशांची नेमणूक करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ” | २२ डिसेंबर, २०२२ | ठरावावर चर्चा झाली नाही. |

**विवरण क्रमांक २२—**(समाप्त)

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| **२.** | **श्री. नागोराव गाणार, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ६७—** | | |
| | " राज्यात मान्यता प्राप्त अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा महाराष्ट्र खासगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या) शर्ती, नियमावली, १९८१ मधील तरतुदींच्या अधीन आहे. या नियमावलीतील नियम क्रमांक १९ नूसार सेवा निवृत्ती वेतन (जुनी पेन्शन) व नियम २०(२) नुसार भविष्य निर्वाह निधी योजना शिक्षक व कर्मचाऱ्यांना देय असणे, परंतु दिनांक २९ नोव्हेंबर, २०१० च्या निर्णयान्वये लागू केली असणे, तसेच १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी अंशतः अनुदानित शाळेत नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर यांना ही योजना लागू करणे, सदरहू योजनेतून नियत वयोमानापुर्वी बाहेर पडण्याची तरतूद असणे, तथापि अशाप्रकरणी कर्मचाऱ्यांच्या खाती जमा झालेल्या एकूण रक्कमेच्या ४० टक्के रक्कम वार्षिक (अँन्युईटी) खरेदी करण्यासाठी गुंतविणे अनिवार्य असल्याने राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष असणे, कर्मचाऱ्यांचा एकूण कल पाहता राज्यातील १०० टक्के अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू असलेली अंशदान निवृती वेतन योजना रद्द करून त्याऐवजी महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन नियम १९८२ अन्वये लागू असलेली पूर्वीची निवृत्ती वेतन योजना दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर सेवेत नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. " | २३ डिसेंबर, २०२२ | ठरावावर चर्चा झाली नाही. |
| **३.** | **श्री. रामदास आंबटकर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ९—** | | |
| | " राज्यात विशेषतः विदर्भातील अपूर्ण प्रकल्पांची स्थिती, विदर्भात प्रामुख्याने छोटे-मोठे प्रकल्प गेल्या २० वर्षापासून मंजूर असूनही अद्याप बऱ्याच प्रकल्पांची कामे पूर्ण झालेली नाहीत, अपुऱ्या अनुशेषा अभावी भुसंपादन व पर्यावरण विषयक बाबींमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या, अनेक सिंचन प्रकल्प प्रलंबित आहेत, विदर्भात प्रकल्पांची प्रलंबित कामे पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. " | २३ डिसेंबर, २०२२ | ठरावावर चर्चा झाली नाही. |

******

**विवरण क्रमांक २३**

सन २०२२ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०६ अन्वये शासकीय ठराव

(१) आलेल्या सूचनांची संख्या - २

(२) स्वीकृत झालेल्या सूचनांची संख्या - २

(३) चर्चा झालेल्या सूचनांची संख्या - २

| अ.क्र. | मंत्री व विषय | ज्या तारखेस सूचना सभागृहात घेतली ती तारीख | शेरा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | **मा.उद्योग मंत्री यांचा म.वि.प. नियम १०६ अन्वये शासकीय ठराव :**<br>**ज्याअर्थी,** नागरी विमानचालन महासंचालक, नागरी विमानचालन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी, स्थायी आदेश क्रमांक ७२७ (ई), दिनांक ४ ऑक्टोबर १९९४ द्वारे प्रदान केलेल्या, वायुयान अधिनियम, १९३४ (१९३४ चा २२) या अन्वये तयार केलेल्या वायुयान नियम, १९३७ याच्या नियम ७८ खालील अधिकारांचा वापर करून, सिंधुदुर्ग विमानतळ, सिंधुदुर्ग याकरिता, आयआरबी सिंधुदुर्ग एअरपोर्ट प्रायव्हेट लिमिटेड यास ‘ विमानतळ लायसन - सार्वजनिक हितार्थ वापरार्थ ’ दिले आहे ;<br>**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग येथील उक्त विमानतळाला “ बॅ. नाथ पै विमानतळ, सिंधुदुर्ग ” असे नाव देणे इष्ट आहे आणि त्या प्रयोजनार्थ, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांची मान्यता मिळाल्यानंतर, असा प्रस्ताव, भारत सरकारच्या नागरी विमानचालन मंत्रालयाकडे पाठवणे आवश्यक आहे ; | दिनांक २३ डिसेंबर, २०२२ | मा. उद्योग यांनी मांडलेला ठराव एकमताने संमत करण्यात आला. |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | **त्याअर्थी आता,** महाराष्ट्र विधानपरिषद नियमांच्या नियम १०६ नुसार, महाराष्ट्र विधानपरिषद याद्वारे, सिंधुदुर्ग येथील उक्त विमानतळाला " बॅ. नाथ पै विमानतळ, सिंधुदुर्ग " असे नाव देण्याची शिफारस भारत सरकारला करते. | | |
| २ | **मा.मुख्यमंत्री यांचा म.वि.प. नियम १०६ अन्वये शासकीय ठराव :** | | |
| | **ज्याअर्थी,** नोव्हेंबर, १९५६ मध्ये राज्यांची पुनर्रचना झाल्यानंतर तत्कालीन मुंबई राज्यातील बेळगाव (चंदगड तालुका वगळून) विजापूर, धारवाड व कारवार हे मराठी भाषिक जिल्हे पूर्विच्या म्हैसूर राज्यात विलीन करण्यात आले. महाराष्ट्राने खेडे हा एक घटक, भौगोलिक सलगता, मराठी किंवा कन्नड भाषिक लोकांची सापेक्ष बहुसंख्या व लोकेच्छा या सूत्रानुसार फेररचनेची मागणी करत कर्नाटकातील ८६५ सीमावादीत गावांवर दावा सांगितला आहे. | दिनांक २७ डिसेंबर २०२२ | मा. मुख्यमंत्री यांनी मांडलेला ठराव एकमताने संमत करण्यात आला |
| | **आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासनाने दावा केलेली ८६५ गावे महाराष्ट्रात समाविष्ट व्हावी म्हणून महाराष्ट्र शासनाने केंद्र शासन व कर्नाटक राज्य शासन यांच्याविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात दिनांक २९ मार्च, २००४ रोजी मूळ दावा क्र.४/२००४ (Original Suit) दाखल केला आहे. मा. सर्वोच्च न्यायालयात अंतरिम अर्ज क्र. IA ११/२०१४ वर सुनावणीअंती दिनांक १२ सप्टेंबर, २०१४ रोजी, दाव्यातील साक्षी, पुरावे नोंदविण्यासाठी मा. कोर्ट कमिशनर म्हणून मा. श्री. मनमोहन सरीन, भूतपूर्व मुख्य न्यायाधीश, जम्मू-काश्मिर यांची नियुक्ती केली. परंतु दिनांक १२ सप्टेंबर, २०१४ रोजी पारित केलेल्या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या सदर आदेशात सुधारणा करावी या मागणीसह कर्नाटक शासनाने दिनांक ०६ डिसेंबर, २०१४ रोजी अंतरिम अर्ज क्र. IA १२/२०१४ मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केला आहे. सदर सीमावादाचा प्रश्न न्यायप्रविष्ट असून ही कायदेशीर लढाई महाराष्ट्र शासन सर्व ताकदीने लढत आहे. महाराष्ट्राच्या बाजूने खटला चालविण्यासाठी अनुभवी असणाऱ्या ज्येष्ठ व नामांकीत विधिज्ञांची पॅनलवर नियुक्ती केली आहे. | | |

**विवरण क्रमांक २३—**(पुढे सुरू)

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | **आणि ज्याअर्थी,** सीमा भागातील प्रश्न, सीमा भागातील लाखो मराठी भाषिकांवर तेथील प्रशासनाकडून वर्षानुवर्ष होणारे अन्याय, मराठी भाषिकांना मिळत असलेली दुय्यम वागणूक, त्यांचेवर अत्याचार केले जाणे, त्यांच्या जीविताचा प्रश्न गंभीर होणे, इतकेच नव्हे तर महाराष्ट्राचे मा. समन्वयक मंत्री, सीमाप्रश्न यांनाच कर्नाटकमध्ये प्रवेश करण्यास कर्नाटक प्रशासनाकडून बंदी घालणे, मराठी भाषिकांनी आतापर्यंत शांततेने काढलेल्या अनेक पदयात्रांवर कर्नाटक पोलिसांनी अमानुषपणे लाठीमार करणे, त्यांची आंदोलने चिरडण्याचा प्रयत्न करणे व महाराष्ट्र राज्यातील वाहनांवर हल्ले करणे, तेथील मराठी भाषिकांच्या जमिनी स्थानिक विकास प्राधिकरणांकरिता संपादित करून त्यांचे भूखंड कन्नड भाषिकांना वितरीत करणे तसेच अल्पसंख्याक आयोगाने व मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशासह स्थानिक प्राधिकरणातील दिली जाणारी शासकीय सर्व कागदपत्रे मराठीसह दोन्ही भाषांमध्ये दिली जावी या आदेशाची अंमलबजावणी न करता स्थानिक मराठी भाषिकांची संख्या कमी करण्यासाठी प्रयत्न करणे इ. बाबी कर्नाटकातील स्थानिक प्रशासनाकडून जाणिवपूर्वक केल्या जात आहेत.<br>या सर्व बाबींमध्ये केंद्र शासनाने हस्तक्षेप करण्यासाठी दिनांक १४ डिसेंबर, २०२२ रोजी मा. केंद्रीय गृह मंत्री यांनी नवी दिल्ली येथे कर्नाटकचे मुख्यमंत्री आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री यांच्या बैठकीत दोन्ही राज्यांमध्ये समन्वय ठेऊन मा. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईपर्यंत वाद न वाढविता शांतता ठेवण्याकरिता एकमत केले असतानादेखील विपरीत भूमिका कर्नाटक शासनाने घेतलेली आहे. दरम्यान कर्नाटक विधीमंडळाने एकही इंच जमीन न देण्याच्या दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी केलेल्या ठरावामुळे सीमावादाला चिथावणी देण्याचे काम कर्नाटक सरकारकडून जाणिवपूर्वक केले जात असून कर्नाटक शासनाची ही भूमिका लोकशाही संकेतास धरुन नाही. एकाच देशातील दोन राज्यांमध्ये सौहार्दाचे वातावरण | | |

**विवरण क्रमांक २३—**(पुढे सुरू)

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | राहावे यासाठी महाराष्ट्राने अत्यंत खंबीरपणे व सर्व शक्तीनिशी याबाबतचा कायदेशीर लढा सनदशीर मार्गाने सुरू ठेवला आहे.<br>**आणि ज्याअर्थी,** सद्य:स्थितीत कर्नाटक राज्यात असलेल्या सीमाभागातील ८६५ मराठी भाषिकांसाठी, खेडे हा घटक, भौगोलिक सलगता, मराठी भाषिक लोकांची सापेक्ष बहुसंख्यता व महाराष्ट्रात समाविष्ठ होण्यासाठीची तेथील लोकेच्छा या तत्वांचा महाराष्ट्र राज्याने नेहमीच आदर केला आहे. त्यानुषंगाने त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक उन्नतीसाठी विविध सोईसुविधा व सवलती उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यात मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या लाभांबरोबरच अभियांत्रिकी / वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशासाठी विशेष सवलत, भारतीय प्रशासकीय सेवा पूर्वप्रशिक्षणासाठी सवलत, सारथी व इतर शासकीय संस्थांमार्फत विहीत अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे.<br>**त्याअर्थी,** आता महाराष्ट्र विधानपरिषद याद्वारे कर्नाटक प्रशासनाच्या मराठी भाषिक विरोधी प्रवृत्तीचा तीव्र शब्दात निषेध करण्याबरोबरच महाराष्ट्र विधानसभा नियम १०६ नुसार ही विधानपरिषद याद्वारे असा ठराव करीत आहे की,—<br>१. कर्नाटकातील मराठी भाषिक बेळगाव, कारवार, बिदर, निपाणी, भालकीसह सर्वोच्च न्यायालयातील दाव्यातील सर्व गावे तथा शहरे यांसह ८६५ गावांची इंच न इंच जागा तिथल्या मराठी भाषिक नागरिकांसह कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रात समाविष्ठ करण्यासाठी आवश्यक तो सर्व कायदेशीर पाठपुरावा महाराष्ट्र शासनाद्वारे सर्वोच्च न्यायालयात करण्यात यावा.<br>२. मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या सीमावादासाठी हा सनदशीर मार्गाने, अत्यंत खंबीरपणे, दृढ निश्चयाने व संपूर्ण ताकदीनिशी लढा देण्यात यावा. | | |

**विवरण क्रमांक २३—**(समाप्त)

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| | ३. बेळगाव, कारवार, बिदर, निपाणी, भालकीसह सर्वोच्च न्यायालयातील दाव्यातील सर्व गावे तथा शहरे यांसह ८६५ गावातील मराठी भाषिक जनतेसोबत महाराष्ट्र शासन खंबीरपणे निर्धाराने व सर्व ताकदीनिशी उभे असल्याची ग्वाही देण्यात येत आहे. | | |
| | ४. तसेच याबाबत केंद्र शासनाने मा. गृह मंत्री, भारत सरकार यांच्या बैठकीत झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा आग्रह कर्नाटक शासनाकडे धरावा आणि सीमा भागातील मराठी जनतेच्या सुरक्षिततेची हमी घेण्याबाबत कर्नाटक सरकारला समज देण्यात यावी. | | |
| | ही विधानपरिषद आज निर्धारपूर्वक एकमताने वरीलप्रमाणे ठराव पारित करीत आहे. | | |

******

**विवरण क्रमांक २४**

तारांकित व अतारांकित प्रश्नांच्या सूचनांवरील कार्यवाही

| प्रश्नांचा प्रकार | प्राप्त झालेल्या सूचना | कार्यवाहीत घेतलेल्या सूचना | मागे घेतलेले/ जादा प्रश्न | तारांकित स्वीकृत सूचना | सदस्य/ विभाग निर्देशित | * अतारांकित म्हणून स्वीकृत सूचना | स्वीकृत प्रश्नांसोबत जोडलेले (संम्मिलित) | अस्वीकृत सूचना | व्यपगत झालेल्या सूचना | सदस्य अनुपस्थितीमुळे अनुत्तरीत | तोंडी उत्तरीत झालेले प्रश्न | सभागृहात उत्तरीत झालेल्या प्रश्नांची एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| तारांकित प्रश्न | १८२५ | १६६९ | १५६ | ५९६ | - | २१०* | ५६९ | ६२ | २३२ | - | ३८ | ६.३८% |
| अतारांकित प्रश्न | ३ | ३ | - | ३ | - | - | - | - | - | - | - | - |

*** मूळ तारांकित म्हणून आलेले परंतु अतारांकित म्हणून स्वीकृत**

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२२

## विवरण क्रमांक २५

## अल्प सूचना प्रश्नांवरील कार्यवाही

| आलेल्या सूचना | अस्वीकृत | मागे घेतलेल्या सूचना | सदस्य/विभागाकडे खुलाशासाठी पाठविलेले प्रश्न | संम्मिलित केलेल्या सूचना/अतारांकित स्वीकृत | स्वीकृत सूचना | उत्तरीत झालेल्या सूचना | व्यपगत झालेल्या सूचना | सदस्यांकडून विचारण्यात न आलेल्या सूचना | उत्तर दिलेल्या सूचनांची टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| ०२ | ०२ | - | - | - | - | - | - | - | - | - |

## तारांकित प्रश्न व अतारांकित प्रश्न

एकूण १८२५ तारांकित व ३ अतारांकित (मूळ) प्रश्नांच्या सूचना प्राप्त झाल्या होत्या. प्रश्नांची माहिती खालीलप्रमाणे आहे :—

| क्रमांक | प्रश्न | तारांकित | अतारांकित (मूळ) | एकूण |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | एकूण प्राप्त सूचना (तारांकित) | १८२५ | ३ | १८२८ |
| २ | कार्यवाहीत घेतलेल्या सूचना | १६६९ | ३ | १६७२ |
| ३ | स्वीकृत | ५९६ | ३ | ५९९ |
| ४ | अस्वीकृत | ६२ | ... | ६२ |
| ५ | सदस्य/ विभाग निर्देशित | ... | ... | ... |
| ६ | अतारांकित म्हणून स्वीकृत | २१० | ... | २१० |
| ७ | सम्मिलित | ५६९ | ... | ५६९ |
| ८ | व्यपगत | २३२ | ... | २३२ |
| ९ | तोंडी उत्तरीत झालेले | ३८ | ... | ३८ |
| १० | वेळे अभावी / सदस्य अनुपस्थित असल्याने अतारांकित (वेळे अभावी अतारांकित... सदस्य अनुपस्थित असल्याने अतारांकित......) | ... | ... | ... |
| ११ | अतारांकित उत्तरीत झालेल्या प्रश्नांची संख्या (मागील सत्रातील स्वीकृत प्रश्नांसह) | ... | ... | ... |
| १२ | मागे घेतलेले / जादा प्रश्न | १५६ | ... | १५६ |

(विवरण क्र. २६ व २७)

## विवरण क्रमांक २६

## तिसरे अधिवेशन, २०२२

### तारांकित प्रश्नांची विभागनिहाय सांख्यिकीय माहिती

| अ.क्र. | विभाग | आलेल्या प्रश्नांची संख्या | अस्वीकृत | मागे घेतलेले/ जादा प्रश्न | सदस्य/ विभाग निर्देशित केलेले | सम्मिलीत | अतारांकित स्वीकृत | तारांकित स्वीकृत | तोंडी उत्तरीत प्रश्न | सदस्य अनुपस्थिती मुळे झालेले अतारांकित | वेळे- अभावी अतारांकित | व्यपगत | तोंडी उत्तरांचा शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| १ | नगर विकास विभाग | २१३ | ७ | १७ | - | २७ | ४३ | ७७ | ४ | - | - | ४२ | ५.१९% |
| २ | गृहनिर्माण विभाग | ३८ | ० | ४ | - | १० | २ | १६ | ३ | - | - | ६ | १८.७५% |
| ३ | अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग. | २३ | १ | २ | - | ५ | २ | १० | ० | - | - | ३ | |
| ४ | शालेय शिक्षण विभाग | २६७ | ११ | ३१ | - | १३३ | १६ | ५५ | ६ | - | - | २१ | १०.९१% |
| ५ | अन्न व औषध प्रशासन विभाग | ११ | ० | १ | - | ४ | ० | ६ | ० | - | - | ० | |
| ६ | गृह विभाग | ११३ | २ | ११ | - | २८ | १६ | ४३ | १ | - | - | १३ | २.३३% |
| ७ | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) विभाग. | ८ | ० | ० | - | २ | ० | २ | ० | - | - | ४ | |
| ८ | राज्य उत्पादन शुल्क विभाग | २ | ० | ० | - | ० | ० | २ | ० | - | - | ० | |
| ९ | मदत व पुनर्वसन विभाग | ५५ | ० | ६ | - | ३२ | २ | ८ | १ | - | - | ७ | १२.५०% |
| १० | इतर मागास बहुजन कल्याण विभाग. | २६ | ३ | १ | - | १० | १ | ८ | १ | - | - | ३ | १२.५०% |
| ११ | सामान्य प्रशासन विभाग | २८ | १ | १ | - | ६ | ६ | ९ | १ | - | - | ५ | ११.११% |
| १२ | पशुसंवर्धन विभाग | २४ | १ | ० | - | १६ | १ | ४ | १ | - | - | २ | २५.००% |
| १३ | सामाजिक न्याय विभाग | ८१ | ६ | ९ | - | ३० | १० | १८ | २ | - | - | ८ | ११.११% |
| १४ | ग्रामविकास विभाग | ७६ | १ | ८ | - | २५ | ८ | २३ | १ | - | - | ११ | ४.३५% |
| १५ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | ६४ | २ | ८ | - | २१ | ५ | २० | १ | - | - | ८ | ५.००% |
| १६ | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग. | ७७ | १ | ० | - | २५ | ११ | २८ | ३ | - | - | १२ | १०.७१% |
| १७ | जलसंपदा विभाग | २८ | ० | ४ | - | २ | ५ | १२ | ० | - | - | ५ | |

| अ.क्र. | विभाग | आलेल्या प्रश्नांची संख्या | अस्वीकृत | मागे घेतलेले/ जादा प्रश्न | सदस्य/ विभाग निर्देशित केलेले | सम्मिलीत | अतारांकित स्वीकृत | तारांकित स्वीकृत | तोंडी उत्तरीत प्रश्न | सदस्य अनुपस्थिती मुळे झालेले अतारांकित | वेळे- अभावी अतारांकित | व्यपगत | तोंडी उत्तरांचा शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| १८ | मृद व जलसंधारण विभाग | ८ | ० | १ | - | १ | ० | ४ | १ | - | - | २ | २५.००% |
| १९ | वैद्यकीय शिक्षण विभाग | ३२ | ० | १ | - | ९ | ५ | १५ | ० | - | - | २ | |
| २० | विधी व न्याय विभाग | १० | ० | १ | - | २ | १ | ३ | ० | - | - | ३ | |
| २१ | महसूल विभाग | ४८ | ५ | १ | - | ८ | ११ | २१ | २ | - | - | २ | ९.५२% |
| २२ | वने विभाग | २० | ० | ० | - | ६ | ४ | ९ | ० | - | - | १ | |
| २३ | सहकार विभाग | २१ | १ | २ | - | ४ | ३ | ८ | ० | - | - | ३ | |
| २४ | उद्योग विभाग | ३३ | १ | ३ | - | १६ | ० | ८ | ० | - | - | ५ | |
| २५ | ऊर्जा विभाग | ४४ | ५ | १ | - | १३ | ५ | १४ | ४ | - | - | ६ | २८.५७% |
| २६ | कामगार विभाग | २३ | ० | ० | - | ११ | ३ | ७ | ० | - | - | २ | |
| २७ | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) विभाग. | ८७ | ५ | १४ | - | १५ | ५ | ३६ | ० | - | - | १२ | |
| २८ | परिवहन विभाग | ६४ | ० | १२ | - | १७ | २ | १९ | २ | - | - | १४ | १०.५३% |
| २९ | कृषी विभाग | ६० | १ | १ | - | २५ | ८ | २३ | ० | - | - | २ | |
| ३० | दुग्धविकास विभाग | ४ | ० | ० | - | ० | ० | ४ | ० | - | - | ० | |
| ३१ | पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग. | १४ | ० | ० | - | ३ | २ | ८ | ० | - | - | १ | |
| ३२ | मत्स्यविकास विभाग | ८ | ० | ० | - | १ | १ | ६ | ० | - | - | ० | |
| ३३ | बंदरे विभाग | ८ | ० | १ | - | ३ | १ | २ | १ | - | - | १ | ५०.००% |
| ३४ | क्रीडा विभाग | १२ | ० | १ | - | २ | २ | ३ | १ | - | - | ४ | ३३.३३% |
| ३५ | महिला व बालविकास विभाग | ४५ | ० | ४ | - | २० | २ | १६ | ० | - | - | ३ | |
| ३६ | सांस्कृतिक कार्य विभाग | १६ | ० | ० | - | ५ | ५ | ४ | ० | - | - | २ | |
| ३७ | आदिवासी विकास विभाग | ३८ | ३ | १ | - | १० | ५ | १४ | ० | - | - | ५ | |
| ३८ | अल्पसंख्यांक विकास विभाग | ६ | ० | ० | - | १ | १ | ३ | ० | - | - | १ | |
| ३९ | पर्यटन विभाग | ७ | ० | ० | - | १ | १ | ४ | ० | - | - | १ | |

| अ.क्र. | विभाग | आलेल्या प्रश्नांची संख्या | अस्वीकृत | मागे घेतलेले/ जादा प्रश्न | सदस्य/ विभाग निर्देशित केलेले | सम्मिलीत | अतारांकित स्वीकृत | तारांकित स्वीकृत | तोंडी उत्तरीत प्रश्न | सदस्य अनुपस्थिती मुळे झालेले अतारांकित | वेळे- अभावी अतारांकित | व्यपगत | तोंडी उत्तरांचा शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| ४० | रोजगार हमी विभाग | ११ | ० | ० | - | १ | ४ | ४ | ० | - | - | २ | |
| ४१ | पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग. | १६ | ० | ३ | - | २ | ४ | ४ | ० | - | - | ३ | |
| ४२ | खनिकर्म विभाग | २ | ० | १ | - | ० | ० | ० | ० | - | - | १ | |
| ४३ | फलोत्पादन विभाग | ४ | ० | ० | - | २ | १ | १ | ० | - | - | ० | |
| ४४ | नियोजन विभाग | १० | १ | ० | - | २ | ४ | २ | ० | - | - | १ | |
| ४५ | कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग. | १० | ० | १ | - | ३ | २ | ४ | १ | - | - | ० | २५.००% |
| ४६ | विशेष सहाय्य विभाग | १ | ० | ० | - | ० | ० | १ | ० | - | - | ० | |
| ४७ | वित्त विभाग | १२ | २ | ० | - | ८ | ० | २ | १ | - | - | ० | ५०.००% |
| ४८ | वस्त्रोद्योग विभाग | ३ | ० | १ | - | ० | ० | २ | ० | - | - | ० | |
| ४९ | आपत्ती व्यवस्थापन विभाग | २ | ० | ० | - | ० | ० | २ | ० | - | - | ० | |
| ५० | पणन विभाग | ६ | ० | १ | - | २ | ० | २ | ० | - | - | १ | |
| ५१ | मराठी भाषा विभाग | ५ | १ | २ | - | ० | ० | ० | ० | - | - | २ | |
| ५२ | संसदीय कार्य विभाग | १ | १ | ० | - | ० | ० | ० | ० | - | - | ० | |
| | **एकूण** | **१८२५** | **६२** | **१५६** | **-** | **५६९** | **२१०** | **५९६** | **३८** | **-** | **-** | **२३२** | **६.३८%** |

## विवरण क्रमांक २७

## अतारांकित प्रश्नांची विभागनिहाय आकडेवारी दर्शविणारे विवरणपत्र

| अ.क्र. | विभागाचे नाव | गत सत्रात प्रलंबित राहिलेल्यांपैकी लेखी उत्तर प्राप्त झालेल्या अतारांकित प्रश्नांची संख्या |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | अन्न व औषध प्रशासन विभाग | १ |
| २ | अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग | ३ |
| ३ | अल्पसंख्याक विकास विभाग | ३ |
| ४ | आदिवासी विकास विभाग | १० |
| ५ | आपत्ती व्यवस्थापन विभाग | १ |
| ६ | इतर मागास बहुजन कल्याण विभाग | ११ |
| ७ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | १३ |
| ८ | उद्योग विभाग | ४ |
| ९ | ऊर्जा विभाग | २९ |
| १० | कामगार विभाग | ७ |
| ११ | कृषी विभाग | २२ |
| १२ | कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग | ३ |
| १३ | क्रीडा विभाग | ५ |
| १४ | खार जमिनी विकास विभाग | ४ |
| १५ | गृह विभाग | ४३ |
| १६ | गृहनिर्माण विभाग | १४ |
| १७ | ग्रामविकास विभाग | १४ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| १८ | जलसंपदा विभाग | ८ |
| १९ | दुग्धविकास विभाग | २ |
| २० | नगर विकास विभाग | ५३ |
| २१ | नियोजन विभाग | ३ |
| २२ | पणन विभाग | ३ |
| २३ | परिवहन विभाग | १ |
| २४ | पर्यटन | १ |
| २५ | पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग | २ |
| २६ | पशुसंवर्धन विभाग | २ |
| २७ | पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग | ४ |
| २८ | बंदरे विभाग | ३ |
| २९ | मत्स्यव्यवसाय विभाग | २ |
| ३० | मदत व पुनर्वसन विभाग | १६ |
| ३१ | मराठी भाषा विभाग | १ |
| ३२ | महसूल विभाग | ३८ |
| ३३ | महिला व बालविकास विभाग | ८ |
| ३४ | मृद व जलसंधारण विभाग | १ |
| ३५ | राज्य उत्पादन शुल्क विभाग | १ |
| ३६ | रोजगार हमी योजना विभाग | ६ |
| ३७ | वने विभाग | ३ |
| ३८ | वित्त विभाग | १ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ३९ | वैद्यकीय शिक्षण विभाग | ११ |
| ४० | शालेय शिक्षण विभाग | १४ |
| ४१ | संसदीय कार्य विभाग | १ |
| ४२ | सहकार विभाग | ९ |
| ४३ | सांस्कृतिक कार्य विभाग | ६ |
| ४४ | सामाजिक न्याय विभाग | २२ |
| ४५ | सामान्य प्रशासन विभाग | १२ |
| ४६ | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग | २६ |
| ४७ | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) विभाग | १२ |
| ४८ | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) विभाग | १ |
| | **एकूण** | **४६०** |

## विवरण क्रमांक २८

## तारांकित प्रश्नाबाबतचा तपशील

| अनु-क्रमांक (१) | तपशील (२) | संख्या (३) |
|---|---|---|
| १. | सभागृहासमोर प्रश्नोत्तरे चर्चेकरिता दाखविण्यात आलेल्या दिवसांची संख्या | ९ |
| २. | सभागृहासमोर प्रश्नोत्तरे चर्चेकरिता न ठेवलेल्या दिवसांची संख्या | १ |
| ३. | प्रश्नांच्या सूचना दिलेल्या सदस्यांची संख्या | ४७ |
| ४. | (अ) तोंडी उत्तरे दिली गेलेल्या प्रश्नांची संख्या | ३८ |
| | (ब) तोंडी उत्तरे दिली गेलेल्या अल्प सूचना प्रश्नांची संख्या | - |
| ५. | एका सदस्याकडून जास्तीत जास्त आलेल्या प्रश्नांची संख्या<br>**श्री. नागोराव गाणार, वि.प.स.** | १५३ |
| ६. | एका सदस्यांचे जास्तीत जास्त स्वीकृत झालेल्या प्रश्नांची संख्या<br>**श्री. प्रसाद लाड, वि.प.स.** | २५ |
| ७. | एकाच दिवशी जास्तीत जास्त उत्तरे दिलेल्या प्रश्नांची संख्या | ६ |
| ८. | एकाच दिवशी कमीत कमी उत्तरे दिलेल्या प्रश्नाची संख्या | १ |
| ९. | एकाच दिवशी एका मंत्री महोदयांकडून जास्तीत जास्त उत्तरे दिलेल्या प्रश्नांची संख्या. | ६ |
| १०. | प्रत्येक दिवसाला उत्तरे दिली गेलेल्या प्रश्नांची सरासरी संख्या | ४.२२ |

## विवरण क्रमांक २९

## नियम २८९ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांचा तक्ता

| अ.क्र. (१) | दिनांक (२) | सदस्यांची नावे (३) | विषय (४) | निर्णय (५) |
|---|---|---|---|---|
| (१) | २०/१२/२०२२ | श्री. अंबादास दानवे व इतर सदस्य. | राज्यात महापुरुषांच्या होत असलेल्या अवमानबाबत. | अमान्य |
| (२) | २१/१२/२०२२ | श्री. अंबादास दानवे व इतर सदस्य | राज्यात राजकीय पक्षाकडून महापुरुषांचा झालेला अवमान. | अमान्य |
| (३) | २१/१२/२०२२ | श्री. अंबादास दानवे व इतर सदस्य | नागपूर येथील झोपडपट्टीवासीयांसाठी घरे बांधण्यासाठी देण्यात आलेला भूखंड खाजगी विकासकांना भाडेतत्वावर दिल्याबाबत. | अमान्य |
| (४) | २१/१२/२०२२ | श्री. सुनिल गोविंद शिंदे व इतर सदस्य | माहिम (जि.पालघर) येथील अल्पवयीन मुलीवर अंमली पदार्थाच्या आहारी गेलेल्या युवकांनी बलात्कार केल्याबाबत. | अमान्य |
| (५) | २१/१२/२०२२ | श्री. कपिल हरिश्चंद्र पाटील व इतर सदस्य | समाज कल्याण विभागाने सामाजिक विकास योजनेतून ३६ कोटी रुपयांची खरेदी केलेल्या पुस्तकात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, शाहू महाराज, महात्मा गांधी, सावित्रीबाई फुले यांची किंवा यांच्या विचारांची कोणतीही पुस्तके नसल्याबाबत. | अमान्य |
| (६) | २२/१२/२०२२ | श्री. अंबादास दानवे, वि.प.स. | राज्यात राजकीय पक्षाकडून महापुरुषांचा झालेला अवमान. | अमान्य |
| (७) | २६/१२/२०२२ | श्री. अंबादास दानवे, वि.प.स. | वाशिम येथील ३७.१९ एकर गायरान जमीन बेकायदेशीरपणे दिल्याबाबत. | अमान्य |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
